00044532

BOMBAY BRANCH
OF THE
Royal Asiatic Society.

Digitized with financial assistance from the
Government of Maharashtra
on 15 March, 2016

ORI
[illegible]
Wyo [illegible]
[illegible]532

00044532

# MARATHE TRANSLATION

OF THE

# WYAWAHAR ADHYAYA OF THE MITAKSHARA,

*and of the*

# DAYA BHAG OF THE WYAWAHAR MAYUKH;

*EXECUTED BY*

*RAGHUNATH WITTAL SHASTREE DANTAY.*

---

# मिताक्षरा व्यवहाराध्यायवमयूखदायभाग

यांचें

मराठी भाषांतर,

44532

न्यायाचे उपयोगासाठीं

सरकारचे आज्ञेवरून

रघुनाथ शास्त्री दांते

यांणीं केलें;

तें वाडा विश्राम बाग येथें सरकारी पाठशाळेकडील छापखान्यांत

छापिलें.

शके १७६५

सन १८४४ इसवी

# Preface.

With a view to remedy the inconvenience which must result from the circumstance of the Books which are authorities in Courts of Justice being locked up in the Sanscrit language, and to confer benefit upon Suitors, vakils, and Native Justiciaries, Government was pleased to direct in 1837, through B. Hutt Esquire the Judge of Ahmednuggur, that the Wyawahár Adhyaya of the Mitákshara should be translated into Marathi. The work was accordingly prepared, but obstacles to its acceptance presented themselves: these however were removed through the interference of H. H. Glass Esquire, Judge of Ahmednuggur in succession to Mr. Hutt, A. Bell Esquire of the Suddur Adalut, H. Borradaile Esquire, the Hon'ble Mr. Farish, and other Gentlemen who felt that the work was important.

The translation was submitted by Government to the examination of a Committee composed of Shastris of Zillah Courts and Pandits of the Poona College, with Captain Candy the Superint. as President of the Committee; after it had been revised and corrected according to the suggestions of the Committee, it was put to the Press. While it was passing through the Press, Government sanctioned the addition to it of a translation of the Dáyabhág of the Wyawahár Mayukh. These translations compose this Volume.—

A Glossary of difficult terms has been appended.

# प्रस्तावना

मिताक्षराव्यवहाराध्याय व व्यवहारमयूख यांचा न्यायाचे कामाकडे फार उपयोग पडतो, आणि ते ग्रंथ तर संस्कृतभाषेमुळें गूढ आहेत म्हणून फार अडचणी पडतात, यास्तव त्यांचें मराठी भाषांतर झालें असतां अडचणी दूर होऊन वकील व वादिप्रतिवादी व मुनसफ वगैरे अधिकारी यांस व इतर लोकांस फार उपयोग होईल हें जाणून सरकारानें मिताक्षराव्यवहाराध्यायाचें मराठी भाषांतर करण्याविषयीं मेहेरबान बिंजमीन हट्ट साहेब इस्कोयर अहंमदनगरचे जडज यांचे द्वारें सन १८३७ चे सालीं हुकूम फर्माविला त्यावरून हें भाषांतर बहुतेक तयार केलें, इतक्यांत या कामास कांहीं अडचण आली होती परंतु या कामाची योग्यता व आवश्यकता जाणून मेहेरबान ग्लास साहेब अहंमदनगरचे जडज व नामदार बेलसाहेब प्रभृति सदर अदालतीचे जडज व मेहेरबान हारी बार्डोलसाहेब जे हालीं बंगाल्यांत लाकमीशनर आहेत ते व नामदार फेरिश साहेब व नामदार माजीगवरनरसाहेब व आणखीही विद्वान् साहेबलोक हे मदत झाल्यामुळें ती अडचण दूर झाली, नंतर भाषांतर शेवटास नेलें.

ह्या भाषांतराची परीक्षा करण्यासाठीं पाठशाळेकडील क्यामेटीचे पंडित व कोर्टाकडील शास्त्री असे नेमून मेहेरबान कपतान क्यांडी साहेब पाठशाळेकडील सुपरिन्टेंडेंट हे मुख्य नेमिले होते, त्यांजकडून तपासून आल्यानंतर छापण्याचा हुकूम झाला. तें भाषांतर छापत असतांच सरकारांतून दुसरा हुकूम आला कीं त्यांतच मयूख दायभागाचें मराठी भाषांतर करून घालावें. त्याप्रमाणें तेंही भाषांतर करून घातलें आहे.

मिताक्षरा ही याज्ञवल्क्यस्मृतीची टीका म्हणून संस्कृत मिताक्षराग्रंथ सटीक म्हणजे वर मूळ आणि खालीं टीका असा आहे, त्याप्रमाणेंच या भाषांतरांत ही. वर याज्ञवल्क्यस्मृतीचा मूळार्थ लिहून खालीं टीका म्हणजे मिताक्षरा तिचा अर्थ लिहिला आहे.

अन्य ऋषींच्या ज्या स्मृति त्या टीकाग्रंथांत आल्या आहेत, त्यांचा ही टीकाग्रंथांत अर्थ लिहून हा अमुकाचे स्मृतीचा अर्थ, हें समजण्यासाठीं त्या त्या ऋषींचें नाव लिहिलें आहे. व संस्कृत मिताक्षरेंत लेख्यप्रकरणापुढें धटादि दिव्यप्रकरण आहे त्याचा हालीं उपयोग नाहीं म्हणून तें या भाषांतरांत घेतलें नाहीं. याप्रमाणेंच आणखीही ज्याचा अगदीं उपयोग नाहीं असा जो ग्रंथ तो या भाषांतरांत घेतला नाहीं. यापुस्तकांत पहिलें भाषांतर मिताक्षरेचें समजावें.

हें भाषांतर म्या हयग्रीवन करितां यथामतीनें सुबोध व अक्षरशः आणि शुद्ध केलें आहे.

तथापि यांत जे चुकून दोष राहिले असतील त्यांजविषयीं पंडितांनीं क्षमा करावी.

या ग्रंथांत जे मोठ्या अक्षरांनीं शब्द लिहिले आहेत त्यांचा अर्थ स्पष्ट समजण्यासाठीं शेवटीं कोश केला आहे तेथें पहावा.

आतां या ग्रंथापासून जे सरकारचे अभिप्राय असतील ते ईश्वरानें आशीर्वाद देऊन सिद्धीस न्यावे.

अनुक्रमणिका.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

या प्रकरणाच्या तेरा शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत राजानें व्यवहार पाहण्याचा प्रकार. व सभासदांची नेमणूक. व राजाला न फावेल तर राजप्रतिनिधीची नेमणूक. व व्यवहाराचे विषय. व फिर्यादी हुजूर आल्यानंतर कर्तव्यता. व प्रतिवादीला बोलावून आणण्याचा प्रकार. हाहीचा प्रकार. व अर्ज किंवा जबानी लिहिण्याचा प्रकार. प्रतिवादीनें उत्तर व वादीकडील प्रमाणांचा पुरावा. व निर्णय अशीं अनुक्रमानें सांगितलीं आहेत.

### शाखा १


| पृष्ठ | अंक |
|---|---|
| १ | ग्रंथाची प्रस्तावना. |
| २ | २ व्यवहाराचें स्वरूप. |
| — | ३ राजानें धर्मशास्त्रास अनुसरून ब्राह्मणासहवर्तमान व्यवहार पाहवा. |
| — | ४ राजानें व्यवहार न पाहिल्यास दोष. |


### शाखा २


| पृष्ठ | अंक |
|---|---|
| ३ | १ सभासदांचें स्वरूप व नेमणूक. |
| ४ | २ सभासद तीन असावे. |
| ४ | ४ सभासदांनीं राजाला अन्यायापासून वळवावें. |
| ५ | ६ सभेंत सावकारही असावे. |

# अनुक्रमणिका.

## प्रकरण १
## साधारणव्यवहारमातृका.

### शाखा ३


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ७ | १ | राजाला व्यवहार पाहण्याविषयीं न फावेल तर त्याने प्रतिनिधि (प्राड्विवाक) नेमावा. |
| ६ | ४ | सभासदांनीं खोटा न्याय केल्यास दंड. |
| | | **शाखा ४** |
| ९ | १ | व्यवहाराचा विषय. |
| ९ | २ | व्यवहाराचे अंश. |
| — | ३ | फिर्यादीचे दोन प्रकार व त्यांचें स्वरूप |
| १० | ४ | व्यवहारांचीं प्रकरणें (पदें) |
| | | **शाखा ५** |
| ११ | १ | फिर्यादीला राजानें किंवा सरकारी मनुष्यानें भय देऊं नये. |
| ११ | ३ | फिर्याद योग्य असल्यास हुजूर बोलावून आणण्याचा प्रकार. |
| १२ | ४ | फिर्यादी हुजूर आल्यावर प्रश्न करण्याचा प्रकार. |
| १२ | ५ | प्रतिवादी रोगादिकारणामुळें हुजूर येण्याविषयीं अयोग्य असल्यास बोलावूं नये. |
| १३ | ६ | कोणकोणत्या स्त्रियांस हुजूर बोलावून आणावें. |
| १३ | ७ | राजानें गरज लागल्यास देशकाल जाणून व्याधिग्रस्तादिकांसही आणावें. |
| | | **शाखा ६** |
| १३ | १ | वादीनें प्रतिवादीला योग्य कारण असल्यास द्वाही घालावी |

अनुक्रमणिका.

# प्रकरण १
# साधारणव्यवहारमातृका.


| पृष्ठ | अंक |
|---|---|
| १४ | २ हाहीचे प्रकार चार. योग्यकाळीं हाहीचें उल्लंघन केलें असतां दंड. |
| १४ | ३ अकाळीं हाही देणारा दंड्य व उल्लंघनकरणारा निरपराधी |
| १४ | ४ प्रतिवादीला हुजूर नयेण्याविषयीं योग्य कारण आहे तर त्याणें कोणाला पाठवावें. |

## शाखा ७

| पृष्ठ | अंक |
|---|---|
| १५ | १ जबानी लिहून घेण्याचा प्रकार. |
| १६ | २ अर्जींत व जबानींत काय काय लिहिलें पाहिजे तो प्रकार. |
| १७ | ४ लेखांत वर्षादिकाचा निवेश कोणकोणत्या व्यवहारीं अवश्य केला पाहिजे तो प्रकार. |
| १८ | ६ स्थावरव्यवहारीं देश ठिकाण वगैरे लिहिण्याचा विशेष उपयोग पडतो तो प्रकार. |

## शाखा ८

| पृष्ठ | अंक |
|---|---|
| १९ | १ पक्षाभास व त्याचें स्वरूप |
| २० | २ राजानें टाकलेला व शिष्टांस विरुद्धवाद मनास आणू नये. |
| २२ | ५ वकील वगैरे वादांत जय किंवा पराजय पावले असतां तो मुख्याकडे. |

## शाखा ९

| पृष्ठ | अंक |
|---|---|
| २२ | १ जबानीचा मसूदा करण्याचा प्रकार. |
| २२ | २ जबानी शुद्ध करण्याचा अवधि. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण १

# साधारणव्यवहारमातृका.

| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २२ | २ | जबानी शरू केल्या पूर्वी सभासद उत्तर देववितील तर दंड. |
| | | **शाखा १०** |
| २३ | १ | प्रतिवादीकडील उत्तर कसें असलें पाहिजे तो प्रकार. |
| २३ | ३ | उत्तराचे प्रकार. |
| २४ | ४ | मिथ्योत्तराचें स्वरूप व त्याचे प्रकार. |
| | | **शाखा ११** |
| २५ | — | उत्तराभासांचें स्वरूप व त्यांचे प्रकार आणि त्या प्रकारांचा अर्थ. |
| | | **शाखा १२** |
| २७ | १ | उत्तरांचे संकर. |
| २८ | २ | एका वादांत वादिप्रतिवादींचा प्रमाण निर्देश होत नाहीं. |
| ३० | ७ | संकरस्थळीं प्रथमतः कोणतें उत्तर घेऊन वाद चालवावा तो प्रकार. |
| ३१ | १२ | सकारण मिथ्योत्तराचें उदाहरण |
| | | **शाखा १३** |
| ३४ | १ | वादीकडील पुरावा. |
| ३४ | २ | वादी शब्दें करून ज्याला जें साध्य करावयाचें आहे तो घ्यावा. |
| ३४ | ३ | प्राङ्न्यायोत्तरस्थळीं प्रतिवादीकडून पुरावा. |
| ३४ | ४ | कारणोत्तरस्थळींही प्रतिवादीकडूनच पुरावा. |
| ३५ | ५ | मिथ्योत्तरीं वादीचा पुरावा. |
| ३५ | ८ | जयपराजय प्रकार. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३६ | १ | व्यवहाराचे पाद |


# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

या प्रकरणाच्या अठरा शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत वादिप्रतिवादींनीं वन्यायाधीशानें कसें वर्तावें, व वादिप्रतिवादींपासून जामीन घेणें, व प्रतिज्ञापूर्वक व्यवहार, आणि अर्थशास्त्रापेक्षां धर्मशास्त्र प्रबळ, व भोगवट्याचा प्रकार, व कोणत्या मालाविषयीं किती वर्षांचा भोगवटा पाहिजे, व कोण कोणत्या व्यवहारीं कोणतें प्रमाण सबळ, व धनदंड देण्याची शक्ति नसल्यास त्या विषयींचा प्रकार, व आगमाचा प्रकार, जातवाले व व्यापाराचे अधिकारी व गांवकरी आणि सभासद यांचा बलाबल विचार, व निर्णय झाल्यानंतर ही उलटतात असे व्यवहार कोणते तो प्रकार, व गुरु शिष्य, पितापुत्र, स्त्रीपुरुष, धनीचाकर, यांच्या वादाचा कांहीं प्रकार, व हरवलेलें द्रव्य मालकास परत देण्याचा प्रकार, आणि ठेवा सांपडलेल्याचा प्रकार, यांचें अनुक्रमानें निरूपण केलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३८ | १ | वादीनें उलट फिर्याद करण्याचा निषेध. |
| ३९ | २ | प्रतिवादीवर दुसऱ्यानें फिर्याद करूं नये. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

### शाखा २


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४२ | १ | कज्या साहस इत्यादिक व्यवहारीं उलट फिर्याद करावी. |
| ४३ | ४ | एकदाच दोघे मारामारीविषयीं प्रवृत्त झाले तर त्यांस दंडकरण्याचा प्रकार. |
| | | **शाखा ३** |
| ४४ | १ | वादिप्रतिवादीपासून जामीन घेण्याचा प्रकार. |
| — | २ | योग्यजामीन न मिळे तर त्याविषयींचा प्रकार. |
| ४५ | ३ | वादीच्या अर्थाला प्रतिवादी निन्हव करितो तर त्याला दंड. |
| ४५ | ४ | वादी खोटा फिर्यादी ठरल्यास दंड. |
| ४७ | ९ | कोणत्या व्यवहारीं प्रतिवादीकडून उत्तर घेण्यास विलंबलावूं नये. |
| | | **शाखा ४** |
| ४८ | १ | वादांत खोटा समजण्याचीं चिन्हें. |
| ४९ | ३ | पुरावा न दाखवितां दांडगाईनें शाबीत करितो तर दंड. |
| ५० | ७ | एका अर्थाविषयीं दोघे भांडत असून दोघांचाही सारखा पुरावा आहे तर निर्णय करण्याचा प्रकार. |
| | | **शाखा ५** |
| ५३ | १ | प्रतिज्ञा करून विवाद करीत आहे तर त्या वादांत निर्णयकरण्याचा प्रकार. |

# अनुक्रमणिका.

## प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

### शाखा ६


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ५३ | १ | व्यवहाराच्या पोटीं कृत्रिम असेल तें काढून निर्णय करावा. |
| — | २ | वास्तवार्थ असून पूर्वी निवेदन करीत नाहीं तर तो पुढें रद्द होतो. |
| ५४ | ३ | अनेक वस्तूंची फिर्याद केली असतां निर्णयाचा प्रकार. |
| ५७ | ८ | फौजदारींत एखादें कलम लागू झालें तरी तितक्यानेंच सगळी फिर्याद लागू होते. |
| ५८ | ९ | दोहों स्मृतींचा परस्पर विरोध प्राप्त झाला असतां व्यवस्था. |
| - | १० | धर्मशास्त्र अर्थशास्त्र यांचा विरोध आला असतां निर्णय करण्याचा प्रकार. |
| ६० | | द्विजातींनीं शस्त्रधारण करण्याचा समय. |
| ६१ | १२ | आततायीचे प्रकार. |


### शाखा ७


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ६३ | १ | प्रमाणांचें निरूपण. |
| ६५ | ४ | मानुषप्रमाण नच मिळे तर दिव्य प्रमाण घ्यावें. |
| ६६ | ९ | लेख भोग साक्षी यांतून कोणतें प्रमाण कोणत्या व्यवहारीं लागू पडतें तो प्रकार. |
| ६७ | १२ | देण्या घेण्याच्या व्यवहारीं दुसरा पक्ष जय पावतो. |


### शाखा ८


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ६८ | १ | गहाण, प्रतिग्रह, खरेदी, या व्यवहारीं पहिला पक्ष जय पावतो. |


### शाखा ९


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ७० | १ | स्थावराचा वीस वर्षे व जंगमाचा दहा वर्षे भोगवटा झाला असतां |

अनुक्रमणिका.

## प्रकरण २

# असाधारणव्यवहारमातृका.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| | | त्यावरील मालकाची सत्ता नाहीशी होती. |
| ७२ | ५ | आगमावांचून शेंकडों वर्षे उपभोगकरणारास दंड. |
| ७५ | १२ | उपभोगणारापाशीं खोटपत्र असलें तरी तें विसांवर्षां पुढें निर्दोष होतें. |
| ७६ | १४ | स्थावराचें उत्पन्न वीस वर्षांपुढें व जंगमाचें उत्पन्न दहावर्षांपुढें मालकास मिळणार नाहीं. |
| ७७ | १५ | मालकाच्या परोक्ष भोगवटा असल्यास विसावर्षांपुढेंही उत्पन्न मिळतें. |
| | | **शाखा १०** |
| ७९ | १ | गहाण सीमा वगैरेचा उपभोग मालकासमक्ष झाला तरी उत्पन्नाचें नुकसान होतनाहीं. |
| ८१ | १० | गहाण सीमा वगैरेचा अपहारकरणारास दंड. |
| — | १२ | सांगितलेल्या दंडानें दर्पशम होत नाहीं तर अधिक दंड करावा. |
| ८२ | १४ | धनदंड देण्याची शक्ति नसल्यास धिग्दंडादिक दंड करावे. |
| — | १५ | शारीर दंडाची स्थानें. |
| — | १७ | ब्राह्मणास धनदंड देण्याची शक्ति नसल्यास दंडयोजना. |
| ८३ | १८ | डाग देण्याची व्यवस्था. |
| | | **शाखा ११** |
| ८४ | १ | भोगवटा आगमसहित असलानर प्रमाण. |
| ८५ | २ | भोगवटा कसा असल्यास प्रमाण होतो तो प्रकार. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.


| पृष्ठ॰ | अंक | |
|---|---|---|
| — | ४ | तिहीं पिढ्यांचा भोगवटा आगम समजल्यावांचून प्रमाण होतो. |
| ८७ | ७ | स्मार्तकाळ भोगाचें स्वरूप. |
| — | ८ | शंभर वर्षांपुढें ही अनागम स्मृतिपरंपरा असल्यास भोगवटा प्रमाण नाहीं. |
| | | **शाखा १२** |
| ९० | १ | भोगवटा नाहीं तर आगमही दुर्बळ. |
| — | — | दानाचें स्वरूप. |
| — | २ | स्वीकाराचे प्रकार. |
| ९१ | ३ | दानाचे नियम. |
| | | **शाखा १३** |
| ९४ | २ | आगमाच्या पुराव्याविषयीं. |
| ९५ | ५ | तिघां पुरुषांनीं आगम शाबीत न केला तर नुकसान सर्वांचें एकसारखें. |
| — | ६ | आगम संपादणारा वादाचा निर्णय झाल्यापूर्वीं मरण पावेल तर त्याच्या पुत्रानें आगमाची शाबिती करावी. |
| | | **शाखा १४** |
| ९७ | २ | न्याय करणारांचा बलाबल विचार. |
| | | **शाखा १५** |
| ९९ | १ | जबरी भय इत्यादिकांकडून झालेले व्यवहार उलटतात. |
| १०० | २ | गुरुशिष्य, पितापुत्र, इत्यादिकांच्या परस्पर वादाविषयींचा |

अनुक्रमणिका.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.


| पृष्ठ | अंक | प्रकार. |
|---|---|---|
| | | **शाखा १६** |
| १०३ | १ | जीं द्रव्यें मालकाची परत दिल्हीं जातात तीं कोणतीं व त्यांची मुदत आणि त्यांत राजभाग किती वगैरे प्रकार. |
| | | **शाखा १७** |
| १०६ | १ | राजाला सांपडलेल्या ठेव्याविषयीं. |
| — | २ | विद्वान् ब्राह्मणाला सांपडलेल्या ठेव्याविषयीं. |
| — | ३ | राजा आणि विद्वान् ब्राह्मण या खेरीज इतरांस ठेवा सांपडला असतां त्याविषयीं. |
| १०७ | ४ | ज्याला ठेवा सांपडेल त्यानें राजाला जाहीर न केल्यास दंड. |
| — | ५ | मालकास ठेवा मिळण्याचा प्रकार. |
| | | **शाखा १८** |
| १०८ | १ | चोरीस गेलेल्या द्रव्याविषयीं. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण ३

## ऋणादान

या प्रकरणाच्या चौदा शाखा कल्पिल्या आहेत

या प्रकरणांत सावकारानें कुळाला कर्ज देण्याचा व व्याज घेण्याचा व सूल करण्याचा प्रकार आणि कुळानें सावकाराचें कर्ज देण्याचा प्रकार व अवश्य द्यावयाजोगें कर्ज व बापाचें कर्ज पुत्र बायको वगैरेनीं देऊं नये तें कोणतें व बायकांचें कर्ज नवऱ्यानें फेडावयाजोगें व पुत्र सज्ञान झाल्यावर कर्ज फेडण्याचा प्रकार व कर्ज फेडण्याविषयीं अणखी अधिकारी कोणते तो प्रकार व स्वैरिणी पुनर्भूचे प्रकार व बंधू नवरा बायको पिता पुत्र हे अविभक्त असतां जामिनकी वगैरे व्यवहार नकरण्याचा प्रकार, जामिनकीचें स्वरूप व जामिनाचे प्रकार व जामिनकी बदलचें कर्ज कोण कोणी व किती द्यावें व जामिनानें दिल्हेलें कर्ज कुळाकडून जामिनास परत मिळण्याचा प्रकार आणि जामिनकी विषयींचें कर्ज कोण कोणतें तो प्रकार व गाहाणाचें स्वरूप त्याचे प्रकार व गाहाणासंबंधीं करार व स्थावर जंगम गाहाण व गाहाण डुलतें कोणतें व नडुलतें कोणतें तो प्रकार व गहाणाची नस नस झाल्यास भरून देण्याचा प्रकार व दलालाच्या हवालीं खरेदी किंवा विकरी करावयास दिलेल्या दागिन्या विषयींचा प्रकार आणि कूळ गहाण सोडवावयास तयार असून सावकार सन्निध नसल्यास त्या विषयींचा प्रकार, यांचें अनुक्रमानें निरूपण केलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १०९ | १ | कर्ज देण्या घेण्याचे प्रकार. |
| ११० | २ | गहाण देऊन कर्ज दिल्हें असल्यास व्याजाचा प्रकार. |
| — | ३ | गहाणा वांचून कर्ज दिल्हें असल्यास कोणत्या जातीपासून किती व्याज घ्यावें तो प्रकार. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण ३

## ऋणादान.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | ४ | व्याजाचे प्रकार. |
| | | **शाखा २** |
| १११ | १ | उदीम करावयास अरण्यांत व समुद्रांत जाणाऱ्या कुळापासून व्याज घेण्याचा प्रकार. |
| ११२ | ४ | उसनवार द्रव्याला कधींपासून व्याज चालू. |
| — | ५ | याचितकाचे व्याजाचा प्रकार. |
| | | **शाखा ३** |
| ११३ | १ | पशू दासी यांच्या व्याजाचा प्रकार. |
| ११४ | २ | तेल तूप वगैरे रसाचें पराकाष्ठा किती व्याज घ्यावें तो प्रकार. |
| | ३ | वस्त्र धान्य नाणें यांचें पराकाष्ठा किती व्याज घ्यावें. |
| ११५ | | पुष्प मूल फुलें लोंकर वगैरेचें पराकाष्ठा किती व्याज. |
| | | **शाखा ४** |
| ११७ | २ | कर्ज वसूल करण्याचे उपाय. |
| — | ३ | कर्ज नसतां बळेंच लागू करितो तर त्यास दंड. |
| — | ४ | सावकार सोईनें मागत असतां कुळ फिर्याद करितो तर दंड. |
| ११८ | ५ | जातीच्या अनुक्रमानें कर्ज परत देवविण्याचे प्रकार. |
| | | **शाखा ५** |
| ११९ | १ | कुळ आणि सावकार एक जातीचे असल्यास कर्ज परत देवविण्याचे प्रकार. |
| — | ३ | सधन कुळाकडून कर्ज देवविण्याचा प्रकार |

# अनुक्रमणिका

## प्रकरण ३

## ऋणादान


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १२० | ४ | कूळ दंडेली करितें तर त्याविषयींचा प्रकार. |
| — | ५ | नादार कुळाकडून कर्ज देवविण्याचा प्रकार. |
| — | ६ | कूळ उत्कृष्टजातीचें असून नादार आहे तर कर्ज देवविण्यांचा प्रकार. |
| १२१ | ८ | कूळ ऐवज परत करीन असतां सावकार घेत नाहीं तर व्याज बंद होतें. |
| | | **शाखा ६** |
| १२२ | १ | कुटुंबपोषणार्थ केलेलें कर्ज फेडण्याविषयीं अधिकार. |
| — | २ | कुटुंबपोषणार्थ कोणी ही केलेलें कर्ज मुख्य पुरुषानें देण्याचा प्रकार. |
| १२३ | ३ | कोणतें कर्ज पुत्रादिकानें देऊं नये तो प्रकार. |
| १२४ | ५ | गोळी कलाल इत्यादिकांच्या बायकोनीं केलेले कर्जाविषयीं. |
| १२५ | ६ | कोणतें कर्ज बायकोनें दिल्हे पाहिजे तो प्रकार. |
| | | **शाखा ७** |
| १२६ | १ | बापाचें कर्ज पुत्रादिकांनी देण्याचा प्रकार. |
| १२७ | २ | बाप परागंदा झाल्यावर विसां वर्षांनीं पुत्रादिकांनी कर्ज फेडावें |
| १२८ | ७ | पुत्र विभक्त असल्यास आपापल्या अंशांतून व अविभक्त असल्यास समायिक द्रव्यांतून बापाचें कर्ज फेडण्याचा प्रकार. |
| १२९ | ८ | बापाचें कर्ज पुत्रानें सव्याज व नातवानें मुदलमात्र देण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण २

## ऋणादान.

### शाखा ८


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १३० | १ | रिक्थग्राहाचें स्वरूप. |
| — | २ | योषिद्ग्राहाचें स्वरूप. |
| — | ३ | अनन्याश्रितद्रव्य पुत्राचें स्वरूप. |
| १३२ | ८ | निपुत्रिकरिक्थीचें कर्ज देण्याविषयीं अधिकारी. |
| १३३ | १० | पुनर्भूचे प्रकार. |
| — | — | स्वैरिणीचे प्रकार. |
| १३४ | ११ | योषिद्ग्राह तिच्या पहिल्या नवऱ्याचें कर्ज फेडण्याविषयीं अधिकारी. |
| १३५ | १३ | बहुत पुत्र असले तरी जो बापाची जिंदगी घेतो तोच कर्ज फेडण्याविषयीं अधिकारी. |
| | | **शाखा १०** |
| १३८ | १ | भाऊ व पिता पुत्र वगैरे हे अविभक्त असतां कर्ज, जामिनकी, आणि साक्ष हे व्यवहार करूं नयेत. |
| | | **शाखा ११** |
| १४१ | १ | जामिनकीचें स्वरूप. |
| — | २ | जामिनाचे प्रकार. |
| १४२ | ३ | जामीन आपापल्या करारांत विपरीत होतील तर त्यांविषयीं. |
| १४२ | ५ | माल जामिनाच्या पुत्राकडून देवविण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका

## प्रकरण ३

## ऋणादान


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १४३ | ६ | तारण घेऊन जामीन राहिल्यास पुत्रांनीं तारणांतून जामिनकीचें कर्ज देण्याचा प्रकार. |
| १४४ | ७ | अनेक जामीन राहिल्यास जामिनकीचें कर्ज देवविण्याचा प्रकार. |
| | | **शाखा १२** |
| १४५ | १ | जामिनानें जामिनकी बदल दिलेलें कर्ज कुळाकडून जामिनास देवविण्याचा प्रकार. |
| १४८ | ९ | हजरजामीन कराराप्रमाणें हजर करूं शकत नाहीं तर मुदत देण्याचा प्रकार. |
| १४९ | १० | कोणकोणते जामीन घेऊं नयेत तो प्रकार. |
| | | **शाखा १३** |
| १५० | १ | गहाणाचें स्वरूप. |
| — | २ | गहाणाचे प्रकार व त्यांचें स्वरूप. |
| १५१ | ३ | दामदुपट झाली असतां गहाण डुलतें. |
| — | ४ | मुदतीचें गहाण करार मुदत टळी असतां डुलतें. |
| — | ५ | भोग्य गहाण कधीं डुलत नाहीं. |
| १५२ | ७ | गहाण डुललें तरी चौदा दिवस वाट पाहावी. |
| १५४ | १० | गोप्य गहाणाचा उपभोग घेतला असतां व्याज मिळणार नाहीं. |
| — | ११ | गोप्य गहाणाची फूटतूट झाल्यास भरून द्यावें |
| — | १२ | भोग्य गहाण जायां झाल्यास त्याविषयीं. |
| — | १३ | गहाण सावकारापासून हरवलें किंवा नाश पावलें तर त्या |

# अनुक्रमणिका.

## प्रकरण २

## ऋणादान


| पृष्ठ | अंक. | विषयीं. |
|---|---|---|
| १५५ | — | राजदैविक उपद्रवामुळें गहाणाचें नुकसान झाल्यास तें मालकाचें नुकसान. |
| १५६ | १५ | गहाण प्रतिग्रह क्रय याव्यवहारीं पहिल्यानें व्यवहार झालेला मुस्तकीम परंतु भोगवटा पाहिजे. |
| — | १६ | गहाणजतन केलें असतांही जीर्ण झाल्यास त्याविषयीं. |
| | | **शाखा १४** |
| १५७ | १ | घेतलेल्या कर्जापेक्षां कमी किंवा जास्त किमतीच्या गहाणाविषयीं. |
| — | २ | गहाण नडुलण्याच्या कबूलातीविषयीं. |
| १५८ | ३ | पुण्यच गहाण ठेविलें तर तें डुलत नाहीं. |
| — | ४ | दागीनामध्यस्थाचे हातीं विकावयास दिल्हा असतां मध्यस्थापासून लबाडी होईल तर दुपट देण्याचा प्रकार. |
| — | ५ | कूळ ऐवज देऊन गहाण सोडवीत असतां सावकार देत नाहीं तर दंड |
| १५९ | ६ | कूळ गहाण सोडवायास सिद्ध असून सावकार सन्निधन सल्यास त्या• |
| — | ७ | गहाण विकून सावकाराचा ऐवज देण्यास इच्छितो तर त्याविषयीं |
| १६० | ८ | दाम दुपटीची मुदत टळल्यानंतर कूळ सन्निधन सल्यास सावकारानें काय करावें तो प्रकार. |
| — | ९ | भोग्य गहाणाविषयीं. |
| — | १० | दामदुपट झाल्यानंतर गहाण ठेविल्यास त्याविषयीं |

अनुक्रमणिका

## प्रकरण ४

## उपनिधि.

या प्रकरणाची एकच शाखा कल्पिली आहे.

या प्रकरणांत उपनिधीचें स्वरूप व उपनिधि जशाचा तसा मालकास परत देण्याचा प्रकार व राज दैविक उपद्रवानें उपनिधि नाश पावल्यासत्या विषयींचा प्रकार आणि अनामत ठेव वगैरेचा प्रकार असे अनुक्रमानें सांगितले आहेत.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १६३ | १ | उपनिधीचें स्वरूप. |
| — | २ | उपनिधि जशाचा तसा मालकाचा परत देण्याचा प्रकार. |
| — | ३ | उपनिधि राज दैविक उपद्रवानें नाश पावल्यास त्याविषयीं. |
| १६४ | ४ | मालक मागत असतां रक्षकानें दिल्हें नाहीं आणि पुढें नाश पावल्यास त्याविषयीं. |
| १६५ | ५ | रक्षकानें मालकाच्या आज्ञेवांचून उपनिधीचा उपभोग किंवा व्यापार केल्यास त्याविषयीं. |
| १६६ | ८ | निक्षेपादिकाविषयीं सदरहू प्रकार. |


## प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

या प्रकरणाच्या सात शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत साक्षीचें स्वरूप व साक्षी किती प्रकारचे व साक्षी कसे व किती

अनुक्रमणिका.

## प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

असावे व वर्जसाक्षी कोणते तो प्रकार, व साक्षी घेण्यापूर्वी त्यांस शपथ देण्याचा प्रकार. व साक्षीवर दोषारोप व साक्षींस काय ऐकविलें पाहिजे तो प्रकार, व माहीत असून दुष्टपणामुळें साक्ष देत नाहीं तर त्याविषयींचा प्रकार, व साक्षीदारांचे द्वैध पडलें असतां निर्णयप्रकार, व जयपराजयाचा प्रकार, आणि खोटी साक्ष देणारास व देवविणारास दंड, आणि खून वांचविण्यासाठीं खोटीसाक्ष व खोटें बोलणें याविषयींशास्त्राज्ञा, आणि खोटीसाक्ष देण्यानिमित्त प्रायश्चित्त, हे प्रकार अनुक्रमानें सांगितले आहेत.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १६८ | १ | साक्षीचें स्वरूप. |
| — | २ | कृतसाक्षीचे पांच प्रकार व त्यांचीं स्वरूपें. |
| १६९ | ४ | अकृत साक्षीचे प्रकार. |


### शाखा २


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १७० | १ | साक्षी कसे व किती असावे तो प्रकार. |
| १७१ | २ | आपापल्या जातीचा साक्षी न मिळे तर त्याविषयीं. |
| — | ३ | निषिद्ध साक्षीचे प्रकार. |
| १७४ | ५ | वर्जसाक्षी. |
| — | ६ | एकच साक्षी असून तो कसा असल्यास मान्य होतो तो प्रकार. |
| १७५ | ७ | फौजदारी प्रकरणीं साक्षी घेण्याचा प्रकार. |


### शाखा ३


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १७६ | १ | साक्षीदारांपासून शपथ घेण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण ६

## साक्षीविषयीं.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १७७ | २ | निंद्यवृत्तीनें उपजीवन करणारे ब्राह्मणादिकांस शूद्राप्रमाणें शपथ देण्याचा प्रकार. |
| — | ३ | साक्षींवर प्रतिवादीनें योग्य दूषण दाखविलें तर निर्णय करण्याचा प्रकार. |
| — | ४ | साक्षींवर दोषारोप करून तो शाबीत करूं शकत नाहीं तर दंड. |
| १७८ | ५ | साक्षी रद्द केल्यावर अणखी पुरावा न मिळे तर त्याविषयीं. |
| | | **शाखा ४** |
| १७९ | १ | साक्षींस खोटी साक्ष देण्याविषयीं संत्रास आणण्याचा प्रकार. |
| १८० | ४ | साक्ष न देतील तर काय करावें तो प्रकार. |
| १८१ | ५ | वाका गाऊक असूनही दुसमनकीमुळें नाकबूल जातो तर त्याविषयीं. |
| १८२ | ६ | साक्षींचें द्वैध पडलें असतां निर्णयाचा प्रकार. |
| | | **शाखा ५** |
| १८३ | १ | जयपराजयाचा प्रकार. |
| — | ३ | साक्षीदारांकडून विस्मृतीमुळें खरें खोटें सांगवत नाहीं तर निर्णयाचा प्रकार. |
| १८४ | ४ | पहिल्या साक्षीपेक्षां दुसरे दुपटसाक्षी पूर्वविपरीत साक्ष देतील तर पहिले साक्षी खोटे. |
| १८७ | १० | वादीकडील साक्षी पटल्यानंतर प्रतिवादीनें सात दिवस वाट पाहण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण

## साक्षीविषयीं.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १८९ | १३ | उभयतांचेही साक्षी संख्येनें व गुणानें समान असल्यास निर्णय करण्याचा प्रकार. |
| | | **शाखा ६** |
| १९१ | १ | खोटी साक्ष देणारास व देवविणारास दंड. |
| — | २ | खोटीसाक्ष देण्याविषयीं लालूच वगैरे निरनिराळ्या कारणामुळें दंड |
| १९२ | ३ | खोटीसाक्ष देणारास जातिपरत्वें करून दंड. |
| १९४ | ६ | साक्षपतकरून मी साक्षी नाहीं असें बोलणारास दंड. |
| — | ७ | साक्षपतकरून मी साक्ष नाहीं असें बोलणारा ब्राह्मण असल्यास दंड करण्याचा प्रकार. |
| १९५ | ९ | साक्ष देऊन पुनः विपरीत साक्ष देणारास दंड. |
| — | १० | एकांतीं साक्ष घेऊं नये तो प्रकार. |
| | | **शाखा ७** |
| १९६ | १ | खरी साक्ष दिल्यानें वध होत असल्यास खोटी साक्ष देण्याविषयीं शास्त्राज्ञा. |
| — | ३ | खोटीसाक्ष दिल्यानें एकाचा आणि खरीसाक्ष दिल्यानें दुसऱ्याचा वध घडत असल्यास त्याविषयीं. |
| १९७ | ४ | खोटे साक्षीविषयीं प्रायश्चित्त. |
| १९८ | ७ | मनुष्यांचा प्राण वांचविण्यासाठीं खोटें बोलण्याविषयीं शास्त्राज्ञा. |

अनुक्रमणिका

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

या प्रकरणाच्या चार शाखा आहेत.

या साहव्या प्रकरणांत खदस्तुर लेखाची व दुसऱ्याकडून लिहिलेल्या लेखाची तसनस झाल्यास दुसरा लेख करून देण्याचा प्रकार आणि सरकारी लेखाचा प्रकार वगैरे अनुक्रमानें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २०० | १ | लेखाचे प्रकार. |
| २०१ | २ | दुसऱ्याकडून लिहिविलेला लेख कसा असावा तो प्रकार. |
| — | ४ | लेखांत काय काय लिहिलें पाहिजे तो प्रकार. |
| २०२ | ५ | अधमर्णाचे सहीविषयीं. |
| — | ६ | साक्षीचे सहीविषयीं. |
| — | ७ | अधमर्ण व साक्षी यांस लिहितां येत नसल्यास त्यांविषयीं. |
| २०३ | ८ | लेखकाचे सहीविषयीं. |


### शाखा २


| | | |
|---|---|---|
| २०३ | १ | अधमर्णाचे स्वदस्तुरचे लेखाविषयीं. |
| — | — | जबरी धमकी वगैरे कडून झालेल्या लेखाविषयीं. |
| — | — | लेख तत्तद्देश भाषेंत असावा. |
| २०५ | ५ | गहाणखताचा प्रकार. |


### शाखा ३


| | | |
|---|---|---|
| २०६ | १ | नवीन रोखा करून देण्याचा प्रकार. |
| २०७ | २ | रोखा देशांतरीं असल्यास आणविण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण ६

## लेखाविषयीं.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | ३ | सरकारी लेखाविषयीं. |
| | | **शाखा ४** |
| २०९ | १ | लेखा खरा किंवा खोटा याविषयीं निर्णय करण्याचे उपाय. |
| २११ | ३ | हमेवर्दीनें वसूल देण्याचा प्रकार. |
| — | ४ | पावती देण्याचा प्रकार. |
| | ५ | समाक्ष कर्ज असल्यास त्याविषयीं. |


---

## प्रकरण ७

## दायविभाग.

या प्रकरणाच्या चौदा शाखा कल्पिल्या आहेत.

### सत्तेविषयीं.

या प्रकरणांत सत्तेचा विचार व सत्तेचीं साधनें व विभाग करण्याचा प्रकार व स्वतां द्रव्य संपादन करणाराविषयीं व विषम भागाचा निषेध व अविभाज्य धनें व पितामहद्रव्याच्या विभागाचा प्रकार व विभागानंतर उत्पन्न झालेल्या पुत्राला विभाग मिळण्याचा प्रकार व पुत्रांबरोबर पत्नीस समविभाग देण्याचा प्रकार व असंस्कृत बंधु बहिणीच्या संस्काराचा व बहिणीस चतुर्थांश विभाग देण्याचा प्रकार व भिन्नजातीय पुत्रांच्या विभागाचा प्रकार व द्व्यामुष्यायणपुत्राच्या विभागाविषयीं व वाग्दत्त-

अनुक्रमणिका

# प्रकरण ७

## दायविभाग.

झालेल्या स्त्री विषयांचा प्रकार. तसेंच द्वादशपुत्रांची स्वरूपें व त्यांस विभाग मिळण्याचा क्रम व शूद्रधनविभाग व निपुत्रिकाच्या जिंदगीचे वारीश व सन्यासी वानप्रस्थ इत्यादिकांचे धनाचे अधिकारी व संसृष्टींच्या विभागाचा प्रकार व षंढ पतित इत्यादिकांस विभाग न मिळण्याचा प्रकार व स्त्रीधनाचें स्वरूप व त्याचा विभाग असें अनुक्रमानें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २१२ | १ | दायशब्दाचा अर्थ. |
| — | २ | खुल्या दायाचें स्वरूप. |
| — | ४ | विभागाचें स्वरूप. |
| २१५ | १० | लौकिकत्व सत्ता. |
| २१८ | १८ | सत्ता उत्पन्न होण्याची साधनें व त्याचा अर्थ. |


### शाखा २


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २२४ | १६ | जन्मतः स्वत्व उत्पन्न होण्याचा प्रकार. |
| — | १७ | स्थावरावर पुत्रादिकांची सत्ता. |
| २२५ | १८ | आपत्काळीं स्थावराचे गहाण वगैरे करण्याचा प्रकार. |


### शाखा ३


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २२७ | १ | पित्याचे इच्छेनें विभागाचे प्रकार. |
| २२८ | २ | स्वसंपादित द्रव्याविषयीं विषम विभागाचे प्रकार. |
| — | ३ | विभागकरण्याचे काळ. |

अनुक्रमणिका

# प्रकरण ७

## दायविभाग.

### शाखा ४


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २३० | १ | बायकांसही पुत्रांबरोबर विभाग देण्याचा प्रकार. |
| | | **शाखा ५** |
| २३१ | १ | स्वतां द्रव्य संपादन समर्थ असल्यामुळें बापानें द्रव्य घेऊं इच्छित नसल्यास त्याविषयींचा प्रकार. |
| २३२ | २ | बापानें केलेला विभाग धर्मशास्त्राप्रमाणें नसल्यास उलट तो. |
| | | **शाखा ६** |
| २३२ | १ | आईच्या बापाच्या पाठीमागें विभाग करण्याचा व कर्ज वांटून देण्याचा प्रकार. |
| २३४ | २ | विषमविभागाचानिषेध. |
| | | **शाखा ७** |
| २३६ | १ | आईचें धन कन्यांनीं वांटून घेण्याचा प्रकार. |
| | | **शाखा ८** |
| २३७ | १ | अविभाज्य धनें |
| २३८ | २ | हरण केलेलें क्रमागत क्षेत्र हस्तगत करणारानें चतुर्थांश अधिक घ्यावा. |
| | | **शाखा ९** |
| २४२ | १ | सामान्य अविभाज्य धनें. |
| २४३ | २ | अश्वादिकांचे विभागाविषयीं. |
| २४६ | ११ | पितृद्रव्याचा खर्च करून संपादिलेल्या द्रव्यांत अर्जकास दोन भाग |

अनुक्रमणिका

# प्रकरण ७

## दायविभाग.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | १२ | समायीक द्रव्य वाटविल्यास अर्जकास भागद्दय नाहीं. |
| | | **शाखा १०** |
| २४७ | १ | पितामहाचे धनाचा नातवास पित्याचे द्वारें विभाग मिळण्याचा प्रकार |
| | | **शाखा ११** |
| २४८ | १ | पितामहाच्या जिंदगीवर पुत्र व नातू यांची सत्ता समान |
| २४९ | २ | स्वसंपादितद्रव्याविषयीं पित्याचे विभागाचाप्रकार. |
| २५० | ३ | पुत्राच्या इच्छेने पितामहधनाचा विभाग करण्याचा प्रकार. |
| — | ४ | बापाचे स्वसंपादित द्रव्याविषयीं पुत्रानें अनुमति देण्याचा प्रकार. |
| — | ५ | पितामहधनाचे विक्रयादिकाविषयीं नातवाला निषेध करण्याचा अधिकार. |
| | | **शाखा १२** |
| २५१ | १ | विभक्तजपुत्राच्याविभागाविषयींचा प्रकार. |
| | | **शाखा १३** |
| २५२ | १ | पितानिवर्तल्यानंतर झालेल्या विभक्तज पुत्राचे विभागाविषयीं. |
| — | २ | निपुत्रिक बंधु मरणपावल्यानंतर झालेल्या पुत्राचे विभागाविषयीं. |
| | | **शाखा १४** |
| २५४ | १ | वडिलांनीं विभक्तपुत्रांस दिलेल्या द्रव्यावर विभक्तजपुत्राचा वारसा नाहीं. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### शाखा १५


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २५५ | १ | पिता निवर्तल्यानंतर आईला विभाग देण्याचा प्रकार. |
| २५६ | २ | असंस्कृत बंधूच्या संस्काराविषयीं. |
| — | ३ | अविवाहित बहिणीच्या विवाहाविषयीं. |
| — | ४ | बहिणींस चतुर्थांश विभागाचा अधिकार. |
| | | **शाखा १६** |
| २५९ | १ | भिन्नजातीच्या पुत्रांस विभाग मिळण्याचा प्रकार. |
| २६० | ५ | क्षत्रियादि पुत्रांस प्रतिग्रह संपादित स्थावराचा विभाग नाहीं. |
| २६१ | — | शूद्रापुत्रास स्थावराचा वांटा नाहीं. |
| — | ६ | शूद्रापुत्रास बापाने कांहीं दिल्हें नसल्यास दाहवा अंश |
| | | **शाखा १७** |
| २६२ | १ | समायीकद्रव्यांतून चोरून ठेवलेल्या धनाचे विभागाविषयीं. |
| | | **शाखा १८** |
| २६५ | १ | द्यामुष्यायण पुत्राचें स्वरूप व त्यास जिंदगीचा अधिकार. |
| — | २ | कबुलात नसल्यास द्यामुष्यायण क्षेत्रीचाच पुत्र होतो. |
| २६६ | ३ | नियोगाचा निषेध. |
| | | **शाखा १९** |
| २६८ | १ | वाङ्निश्चय होऊन पति मरण पावला असतां नियोग करण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### शाखा २०


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २६९ | — | बारा प्रकारच्या पुत्रांचीं स्वरूपें. |
| — | १ | औरसपुत्र. |
| — | २ | पुत्रिकाकृत. |
| २७१ | ३ | द्यामुष्यायण. |
| — | ४ | गूढजपुत्र. |
| — | ५ | कानीनपुत्र. |
| — | ६ | पौनर्भवपुत्र. |
| | | **शाखा २१** |
| २७२ | १ | दत्तकपुत्र. |
| — | २ | एकुलत्या पुत्रास दत्तक देण्याचा निषेध. |
| — | ३ | दत्तक घेण्याचा प्रकार. |
| | | **शाखा २२** |
| २७३ | १ | क्रीतपुत्र. |
| — | २ | कृत्रिमपुत्र. |
| — | ३ | स्वयंदत्त. |
| २७४ | ४ | सहोढज. |
| — | ५ | अपविद्धपुत्र. |
| | | **शाखा २३** |
| २७४ | १ | वर सांगितलेल्या पुत्रांस विभाग मिळण्याचा क्रम. |

अनुक्रमणिका

# प्रकरण ७

## दायविभाग


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २७५ | २ | पुत्रिकाकृत कल्पिल्यानंतर औरस झाल्यास विभागप्रकार. |
| — | ४ | औरस पुत्र झाल्यानंतर इतर पुत्रांस विभाग मिळण्याचा प्रकार. |
| २७६ | ७ | त्यांत क्षेत्रज पुत्रांस षष्ठांश. |
| २७७ | ९ | दत्तक पुत्र जनक बापाचें गोत्र व जिंदगी पावत नाहीं. |
| | | **शाखा २४** |
| २८० | १ | बारा प्रकारच्या पुत्रांचाप्रकार सजातीय पुत्रां विषयीं. |
| — | २ | ब्राह्मणोत्पन्न शूद्रापुत्रास जिंदगीचा अधिकार नाहीं. |
| | | **शाखा २५** |
| २८२ | १ | शूद्राच्या दासीपुत्राला विभाग मिळण्याविषयीं. |
| — | ३ | द्विजातीचे दासीपुत्राच्या विभागाविषयीं. |
| | | **शाखा २६** |
| २८३ | १ | निपुत्रिक मरण पावल्यानंतर जिंदगीचे वारीश. |
| २८४ | २ | त्यांत प्रथमतः पत्नी. |
| २९० | १२ | नियोगाचा निषेध. |
| २९७ | २५ | पत्नीच्या अभावीं कन्यांनीं जिंदगी घेण्याचा प्रकार. |
| २९८ | २६ | कन्येच्या अभावीं दौहित्र. |
| २९९ | २७ | दौहित्राच्या अभावीं जननी. |
| — | २९ | जननीच्या अभावीं बाप त्याच्या अभावीं भाऊ. |
| ३०० | ३१ | भावाच्या अभावीं पुतणे. |
| ३०१ | ३२ | भाऊव पुतणे दोघे विद्यमान असल्यास त्याविषयीं. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण ७

## दायविभाग.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | ३४ | पुतण्याच्या अभावीं समानगोत्र सपिंड. |
| ३०२ | ३८ | समानगोत्रसपिंडांच्या अभावीं समानोदकसपिंड. |
| — | ३९ | गोत्रजांच्या अभावीं बांधव. |
| ३०३ | ४० | बांधवांस जिंदगी मिळण्याचाक्रम. |
| — | ४१ | बंधूच्या अभावीं आचार्य त्याच्या अभावीं शिष्य. |
| — | ४२ | शिष्याच्या अभावीं सब्रह्मचारी. |
| — | ४३ | निपुत्रिक ब्राह्मणाची बेवारीश जिंदगी अग्निहोत्र्यास देण्याचाप्रकार. |
| ३०४ | ४४ | ब्राह्मणाखेरीज इतरजातींत बेवारीश जिंदगी राजाने घेण्याचाप्रकार. |
| | | **शाखा २७** |
| ३०४ | १ | वानप्रस्थ यति ब्रह्मचारी यांच्या जिंदगीचे अधिकारी. |
| | | **शाखा २८** |
| ३०७ | १ | संसृष्टीचें स्वरूप. |
| — | २ | निपुत्रिक संसृष्टी मेल्यानंतर जिंदगीचे वारीश. |
| | | **शाखा २९** |
| ३०९ | १ | सखे भाऊ व संसृष्ट सावत्र भाऊ यांस विभाग मिळण्याचाप्रकार. |
| | | **शाखा ३०** |
| ३११ | १ | षंढपतित इत्यादिकांस विभागाचा निषेध. |
| ३१२ | २ | विभागानंतर औषधादिकें करून निर्दोष झाल्यास विभागयोग्यता. |
| ३१३ | ४ | षंढपतित इत्यादिकांचे पुत्रांस विभागाचा अधिकार. |
| — | ६ | षंढपतित इत्यादिकांच्या कन्याविषयीं |

अनुक्रमणिका

## प्रकरण ७

## दायविभाग.



| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३१४ | ७ | षंढ पतित इत्यादिकांच्या स्त्रियांचें पोषणमात्र. |
| | | **शाखा ३१** |
| ३१५ | — | स्त्रीधनाचें स्वरूप. |
| | | **शाखा ३२** |
| ३१७ | १ | अनपत्य स्त्रियांच्या धनाचे वारीश. |
| ३१८ | | अनपत्य स्त्रीच्या धनाचे विवाह भेदें करून वारीश. |
| — | ४ | लेंकुरवाळी स्त्री निवर्तल्यावर जिंदगीचे वारीश. |
| ३१९ | ५ | कन्येच्या शुल्काचे अधिकारी. |
| — | ६ | कन्येच्या अभावीं मातृधनाचे वारीश. |
| ३२० | ७ | कन्या व कन्यांच्या कन्या विद्यमान असल्यास विभाग प्रकार. |
| — | ८ | कन्यांच्या कन्या नसल्यास दौहित्र वारीश. |
| — | ९ | दौहित्राच्या अभावीं पुत्र. |
| ३२१ | १० | निकृष्टजातीय स्त्री निवर्तल्यावर तिच्या जिंदगीचे वारीश. |
| — | ११ | पुत्राच्या अभावीं पौत्र. |
| — | १२ | पौत्राच्या अभावीं नवरा वगैरे. |
| | | **शाखा ३३** |
| ३२२ | १ | वाङ्निश्चय झाल्यावर कन्या परत घेणारास दंड. |
| — | २ | योग्य कारण असल्यास परत घेण्याचा प्रकार. |
| — | ३ | वाङ्निश्चयासाठीं झालेला खर्च परत देण्याचा प्रकार. |
| ३२३ | ४ | वाङ्निश्चय झाल्यावर विवाहापूर्वी कन्या मरण पावल्यास त्या |

अनुक्रमणिका.

प्रकरण ७

दायविभाग

| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| | | विषयांचा प्रकार. |
| ३२४ | ६ | संकटकाळीं नवऱ्यानें घेतलेल्या स्त्रीधनाविषयीं. |
| ३२५ | ८ | दुसरा विवाह करितांना पहिले बायकोस धन देण्याचा प्रकार. |
| | | शाखा ३४ |
| ३२६ | १ | विभागाविषयीं संशय झाल्यास निर्णय प्रकार. |


---

## प्रकरण ८
## सीमाविवाद

या प्रकरणाच्या पांच शाखा कल्पिल्या आहेत

या प्रकरणांत शिवेचे प्रकार, व शिवेच्या वादाचीं कारणें, व शिवेचे निर्णायक, व शिवेच्या खुणा, साक्षीदार, शिवेच्या निवाडपत्राचा प्रकार, शिवेविषयीं खोटी साक्ष देणारास दंड, शिवेच्या खुणा व निर्णायक नसल्यास राजानें शींव पाडून देण्याचा प्रकार, बाग मळा इत्यादिकाविषयीं हीं सदरहू प्रमाणेंच योजनेचा प्रकार, व दुसऱ्याचे शेतांत विहीर वगैरे बांधल्यास मालकानें निषेध करूं नये इत्यादिक प्रकारांचें निरूपण केलें आहे.

अनुक्रमणिका.

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३२८ | १ | सामंतांनीं शींव दाखविण्याचा प्रकार. |
| ३२९ | ३ | शिंवेचे प्रकार. |
| — | ४ | शिंवेच्या वादाचीं कारणें. |
| ३३० | १० | सामंताचें स्वरूप. |
| ३३२ | १२ | वृद्धादिकांचें स्वरूप. |
| ३३३ | १५ | शिंवेच्या उघड खुणा. |
| — | १६ | शिंवेच्या गुप्त खुणा. |


### शाखा २


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३३४ | १ | शिंवेच्या खुणा नसल्यास निर्णय प्रकार |
| ३३५ | ३ | सामंताच्या अभावीं सीमानिर्णायक. |
| — | ४ | साक्षिसामंतांनीं शपथ घेऊन शिंव दाखविण्याचा प्रकार. |
| ३३६ | ६ | शींव समजण्याचा उपाय. |
| ३३७ | ८ | साक्षीस शपथ देऊन प्रश्न करण्याचा प्रकार. |
| — | १० | साक्षी वगैरेस राजदैविक संकट उत्पन्न होण्याची मुदत. |
| ३३८ | ११ | सामंतादिकांस खोट्या साक्षी बदल दंड. |
| ३३९ | १३ | साक्षीस दंड. |


### शाखा ३


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३४० | १ | शिंवेच्या खुणा व निर्णायक नसल्यास राजानें निर्णय करण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका

## प्रकरण ८

## सीमाविवाद.

शाखा ४


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३४१ | १ | बाग, मळे, इत्यादिकांविषयीं निर्णयप्रकार. |
| | | शाखा ५ |
| ३४२ | १ | मर्यादेच्या भंगसीमेचें उल्लंघन व क्षेत्राचें हरण याविषयीं दंड. |
| ३४३ | ३ | दुसऱ्याचें क्षेत्र स्वीय भ्रांतीनें हरणकरणारास दंड. |
| ३४४ | ४ | दुसऱ्याचे जमीनीवर सेतु कूप इत्यादि बांधण्याविषयीं. |
| — | ६ | सेतूचे प्रकार. |
| — | ७ | सेतु इत्यादिकाचे जीर्णोद्धार करणाराविषयीं. |
| ३४५ | ८ | मालकास नपुसतां सेतु इत्यादिक बांधिल्यास त्याविषयीं. |
| ३४६ | ९ | नांगरलेलें शेत टाकून देणाराविषयीं. |


## प्रकरण ९

## स्वामिपाळविवाद.

या प्रकरणाच्या साहा शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत गुरांनीं धान्यनाश केल्यास त्याविषयीं दंडाचा प्रकार, शेतकऱ्यानें नुकसान भरून देण्याचा प्रकार, मार्ग कुरण यांजवळील शेतांत गुरें चरल्यास त्याविषयींचा प्रकार, व कोणकोणत्या पशूंस दंड नाहीं तो प्रकार, व गुराख्यानें कसें वर्त्तावें व

अनुक्रमणिका

# प्रकरण ९

## स्वामिपालविवाद.

त्याचे वेतनाचा प्रकार, आणि गुरें चारण्याचें ठिकाण इत्यादिक सांगितलें आहे.

### शाखा १



| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३४७ | १ | गुरांनीं धान्यनाश केल्यास दंड. |
| ३४८ | ४ | गुरें धान्य खाऊन तेथेंच बसल्यास दंड. |
| ३४९ | ५ | कुरण (विढील) वगैरेचा नाश केला असतां दंड. |
| | | **शाखा २** |
| ३५० | १ | मालकाचें नुकसान भरून देवविण्याचा प्रकार. |
| — | २ | पशुस्वामीच्या अन्यायानें धान्यनाश झाल्यास त्याविषयीं. |
| | | **शाखा ३** |
| ३५१ | १ | मार्गादिकाजवळच्या शेताचे नुकसानाविषयीं. |
| ३५२ | २ | कुंपण न केलेल्या शेताच्या नाशाविषयीं. |
| — | ३ | कुंपण करण्याचा प्रकार. |
| | | **शाखा ४** |
| ३५३ | | पोळ उत्सृष्ट पशु इत्यादिकांविषयीं दंडाचानिषेध. |
| | | **शाखा ५** |
| ३५४ | १ | गुराख्यानें कसें वर्तावें तो प्रकार. |
| — | २ | गुराख्याच्या वेतनाचा प्रकार. |
| — | ३ | गुराख्याच्या अन्यायानें गुरें नाशपावल्यास त्याविषयीं. |
| ३५५ | ४ | राजदैविकउपद्रवानें नाश पावलेल्या गुरांविषयीं. |
| — | ५ | गुराख्याच्या अन्यायानें गुरें नाश पावलीं असतां दंड. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण ९

## स्वामिपालविवाद.

### शाखा ६


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३५६ | १ | गुरें चारण्याचें ठिकाण करण्याचा प्रकार |
| — | २ | ब्राह्मणानें गवत फुलें घेण्याचा प्रकार. |


## प्रकरण १०

## अस्वामिविक्रय.

या प्रकरणाच्या तीन शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत अस्वामिविक्रयाचें स्वरूप, व असें द्रव्य खरीद करणारास मालकानें धरण्याचा प्रकार, व अशा द्रव्याचा अपहार करणारानें मूल दाखविण्याचा प्रकार, व तें द्रव्य मालकानें आपलें असें शाबीन करण्याचा प्रकार, व हरवलेलें अस्वामिक द्रव्य सरकारांत सांपडलें असतां सरकारानें काय करावें तो प्रकार, इत्यादिक अनुक्रमानें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३५८ | १ | अस्वामिविक्रयाचें स्वरूप. |
| — | २ | आपल्यास न कळतां तिऱ्हाइतानें विकलेल्या मालाविषयीं. |
| ३५९ | ३ | अकाळीं किंवा कमी दरानें व्यवहार करण्याचा निषेध |

अनुक्रमणिका.

## प्रकरण १०

## अस्वामिविक्रय

### शाखा २


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३६० | ? | अस्वामिक द्रव्याची खरेदी करणाराने विकणारास धरून देण्याचा प्रकार. |
| ३६१ | ४ | अस्वामिक द्रव्याच्या विकराची शाबिती झाल्यास दंड. |
| — | ५ | मूल देशांतरी असल्यास आणविण्याविषयीं मुदत देण्याचा प्रकार. |
| — | ६ | मूल दाखवूं शकत नाहीं तर खरीदी शाबीत करण्याचा प्रकार. |
| ३६२ | ७ | शाबीत करूं शकत नाहीं तर दंड. |
| — | ८ | हें द्रव्य माझें असें मालक शाबीत करूं शकत नाहीं तर दंड. |


### शाखा ३


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३६३ | १ | सरकारांत न कळवितां चोरास छपविणारास दंड. |
| ३६४ | २ | अस्वामिक द्रव्य राजानें जतन करण्याची मुदत. |
| ३६५ | ३ | सुवर्णादिद्रव्य जतन करण्यानिमित्त कर घेण्याचा प्रकार. |
| — | ४ | अश्वादिद्रव्य जतन करण्या निमित्त कर घेण्याचा प्रकार. |


---

## प्रकरण ११

## दत्ताप्रदानिक.

या प्रकरणाची एकच शाखा कल्पिली आहे

या प्रकरणांत दत्ताप्रदानिक व दत्तानपकर्म यांचें स्वरूप, व देय, अदेय, दत्त-

अनुक्रमणिका.

# प्रकरण ११

## दत्ताप्रदानिक.

आणि अदत्त यांचें स्वरूप, देयद्रव्य कोणतें व अदेयद्रव्य कोणतें व प्रतिग्रह प्रसिद्धपणें करण्याचा प्रकार व दत्तद्रव्य कोणतें व अदत्तद्रव्य कोणतें आणि अदेयद्रव्य देणारा व अदत्तद्रव्य घेणारायांस दंड. असें अनुक्रमानें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३६६ | १ | दत्ताप्रदानिकाचें स्वरूप. |
| — | २ | दत्तानपकर्माचें स्वरूप. |
| — | ३ | दानसंज्ञक व्यवहाराचे प्रकार व त्यांचीं स्वरूपें. |
| ३६७ | ४ | देयद्रव्य कोणतें तो प्रकार. |
| ३६८ | ५ | अदेयद्रव्याचे प्रकार. |
| ३६९ | ७ | प्रतिग्रह प्रसिद्धपणें करण्याचा प्रकार. |
| ३७० | ८ | धमार्थ देऊं केलेल्या द्रव्याविषयीं. |
| — | १० | दत्तद्रव्याचे प्रकार व त्यांचीं स्वरूपें. |
| ३७१ | ११ | अदत्तद्रव्याचे प्रकार व त्यांचीं स्वरूपें |
| ३७२ | १२ | धमार्थ प्रतिश्रुत करून मरण पावल्यास त्याविषयीं. |
| — | १३ | अदत्त घेणारा व अदेय देणारायास दंड. |

अनुक्रमणिका

## प्रकरण १२

## क्रीतानुशय.

या प्रकरणाच्या दोन शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत क्रीतानुशयाचें स्वरूप व खरीद केलेला जिनस जशाचा तसा परत करण्याचा प्रकार व परत करण्याची मुदत व मुदतीच्या बाहेर परत केल्यास त्याविषयींचा प्रकार व कोणता माल किती दिवसांचे आंत परत होतो तो प्रकार व चौकशीनें खास करून घेतलेला माल परत नहोण्याचा प्रकार व सोनें रूपें वगैरे धातू व रेशमी सुती लोकरी कापड यांची वाढ तूट समजण्याचा प्रकार व सांगितलेल्या वाढतुटींत कमज्यास्ती करणारास दंड, असें अनुक्रमानें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३७३ | १ | क्रीतानुशयाचें स्वरूप. |
| — | २ | जिनस पसंद नपडे तर परत करण्याचा प्रकार. |
| ३७४ | ४ | धान्य वगैरे जिनस परत करण्याची मुदत. |
| — | ५ | स्थावर माल परत करण्याची मुदत. |
| ३७५ | ६ | चौकशी करून घेतलेला माल परत होत नाहीं तो प्रकार. |


### शाखा २


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३७५ | १ | सुवर्णादिक धातू आटली असतां कोणत्या धातूस किती तूट येती तो प्रकार. |
| ३७६ | २ | कापडाच्या वाढीविषयीं. |
| ३७७ | ३ | कापडाच्या तुटीविषयीं. |
| — | ४ | कौशेय व वल्कल यांविषयीं. |
| ३७८ | ५ | कापडाची सामान्यतः तूट वाढ समजण्याचा उपाय. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण १३

## अभ्युपेत्याशुश्रूषा.

या प्रकरणाची एकच शाखा केली आहे.

या प्रकरणांत शिष्य, अंतेवासी, नायीक, दास, यांचें स्वरूप व त्यांच्या वर्तणुकीचा प्रकार व दासाचे भेद व दासाला सूट मिळण्याचा प्रकार व अनुलोमजातीनें दास्य करण्याचा प्रकार व शिल्पशास्त्र शिकणाराचे नियम हें अनुक्रमानें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३७९ | १ | अभ्युपेत्याशुश्रूषेचें स्वरूप. |
| — | २ | सेवकाचे प्रकार व त्याचें काम. |
| ३८० | | शिष्यादिकांचे धर्म. |
| | | भृतकाचे प्रकार. |
| ३८० | ३ | दासाचे भेद व त्यांचीं स्वरूपें. |
| ३८२ | ५ | दासाला सूट मिळण्याचीं कारणें. |
| ३८३ | ६ | धन्याचे प्राण संरक्षण करणारास पुत्राबरोबर भाग मिळण्याचा प्रकार. |
| ३८४ | १० | दासाला सूट देण्याचा विधि. |
| ३८५ | ११ | सन्यासभ्रष्ट दासाचे मुक्तते विषयीं. |
| — | १२ | वर्णाच्या अनुलोम्याने दास करण्याचा प्रकार. |
| ३८६ | १३ | अंतेवासीचे धर्म. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण १४.

## संविद्व्यतिक्रम.

या प्रकरणाच्या दोन शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत आपापले धर्म संरक्षण करण्याविषयीं राजानें ब्राह्मणास वृत्ति करून देण्याचा प्रकार व त्यांनीं समयधर्म व राजधर्म संरक्षण करण्याचा प्रकार व धर्माचें उल्लंघन केल्यास दंड व महाजनांचें वचन इतरांनीं मानावें, न मानिल्यास दंड इत्यादिक व वर सांगितलेल्या प्रकाराचा श्रेणी निगम वादी पाखंडी इत्यादिकांचे ठायीं अतिदेश हें अनुक्रमानें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३८८ | १ | संविद्व्यतिक्रमाचें स्वरूप. |
| — | २ | त्रैविद्यांनीं आपापल्या धर्माचे रक्षणासाठीं त्यांस वृत्ति देण्याचा प्रकार. |
| ३८९ | ३ | स्वधर्म राखून समूहधर्म व राजधर्मरक्षणाचा प्रकार. |
| | | **शाखा २** |
| — | १ | गणद्रव्य हरण करणास दंड. |
| ३९० | २ | समयाचें उल्लंघन करणारास दंड. |
| ३९१ | ४ | समूह शुभचिंतकांचें वचन मान्य न करणारास दंड. |
| — | ५ | समूह शुभचिंतकांकडून हुजुरांत आलेल्याचा सत्कार करण्याचा प्रकार. |
| ३९२ | ६ | सरकारांतून मिळालेलें जें तें, शुभचिंतकांस निवेदन न करणारास दंड. |
| ३९३ | ८ | प्राचीन धर्म व प्राचीन वृत्तिही पूर्ववत् चालविण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण १५

## वेतनादान.

या प्रकरणाच्या दोन शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत चाकर इत्यादिकांस वेतन देण्याचा व त्यापासून चाकरी घेण्याचा प्रकार व हत्यारबंद, हेलकरी, गुमास्ता, यांजकडून कामाचें नुकसान झाल्यास भरून देणें व दंड, असे प्रकार सांगितले आहेत.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ३९५ | १ | वेतनादानाचें स्वरूप. |
| — | २ | वेतन घेऊन कराराप्रमाणें काम करीत नाहीं तर दुपट परत देण्याचा प्रकार. |
| — | ३ | आरंभीं मध्यें किंवा शेवटीं कबुलातीप्रमाणें वेतन देण्याचा प्रकार. |
| ३९६ | ४ | चाकरांनीं ओतें संभाळण्याचा प्रकार. |
| — | ५ | वेतनाचा करार न करितां काम घेतल्यास उत्पन्नाचा दाहवा भाग देवविण्याचा प्रकार. |
| ३९६ | ६ | तोटा करितां तर धन्याच्या इच्छेप्रमाणें वेतन देण्याचा प्रकार. |
| ३९७ | ७ | नफा केल्यास अधिक वेतन देण्याचा प्रकार. |
| — | ८ | अनेक चाकरांनीं शेवटास न्यावया जोगें असें काम अनेकांनीं केल्यास कामाप्रमाणें मजूरी. |
| ३९८ | ९ | एकास व्हावयाजोगें काम दोघांनीं केलें तर कामाप्रमाणें वेतन देण्याचा प्रकार. |


### शाखा २


| | | |
|---|---|---|
| | १ | हेलकऱ्यांच्या कसूरीनें नुकसान झालेलें भरून देण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण १५

## वेतनादान.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | २ | आइत्या वेळेस काम काज टाकून जातो तर दुपट वेतन परत देण्याचा प्रकार. |
| ३९९ | ३ | मुहूर्त निश्चय झाला असतां काम टाकितो तर सातवा हिसा कमी करण्याचा प्रकार. |
| — | ४ | मार्गांत चाकरी सोडितो तर वेतन बुडविण्याचा प्रकार. |
| ४०० | ५ | चाकर पतकरलेलें काम करीत असतां धनी त्यास दूर करितो तर त्या विषयींचा प्रकार. |
| — | ६ | आजार वगैरे योग्य कारण असल्यास दंड निषेध. |
| — | ७ | आजारामुळें अंतरलेलें काम पुरें करून देण्याचा प्रकार. |


## प्रकरण १६

## जुगाराविषयीं.

या प्रकरणाच्या तीन शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत जुगाराचें स्वरूप व पैजेचें स्वरूप व जुगाराच्या नायिकाची उपजीविका व जिंकलेलें द्रव्य देविण्याचा प्रकार व नायिकानें राजकर देण्याचा प्रकार व पराजितापासून जित द्रव्य देविण्याचा प्रकार व जयपराजयाविषयीं विप्रतिपत्ति पडल्यास निर्णयोपाय व कपटी

अनुक्रमणिका.

# प्रकरण १६

## जुगाराविषयीं.

जुगाराची मनाई, व जुगाराचे धर्म पैजेविषयी जाणण्याचा प्रकार असें अनुक्रमानें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४०१ | १ | जुगाराचें स्वरूप. |
| — | २ | पैजेचें स्वरूप. |
| ४०२ | ३ | जुगाराच्या नायिकाच्या उपजीविकेचा प्रकार |
| — | ४ | अड्याचें स्वरूप. |


### शाखा २


| | | |
|---|---|---|
| — | १ | नायिकापासून राजकर घेण्याचा प्रकार. |
| ४०३ | २ | पराजितापासून जिंकलेला पण देविण्याचा प्रकार. |
| ४०४ | ४ | जयपराजयाविषयीं विप्रतिपत्ति पडल्यास निर्णयोपाय. |


### शाखा ३


| | | |
|---|---|---|
| — | १ | कपटी फांसे वगैरे कडून ह्मणजे ठकविद्येनें जुगार खेळणारास दंड. |
| ४०५ | २ | चोर समजण्यासाठीं जुगाऱ्यांवर दरोगा नेमण्याचा प्रकार. |
| ४०६ | ३ | पैज ह्मणजे जेठी टोणगे इत्यादिकांचें पणपूर्वक युद्ध त्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण १७

# वाक्पारुष्य.

या प्रकरणाच्या पांच शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत वाक्पारुष्याचें स्वरूप व त्याचे भेद व सवर्णानें परस्परांवर तोंड टाकिलें व शिवीगाळ केली असतां दंड प्रकार उत्कृष्टजातीनें निकृष्टजातीला व निकृष्टजातीनें उत्कृष्टजातीवर तोंड टाकिलें व शिवीगाळ केली असतां दंड प्रकार व पातित्यदोषजनक भाषण केलें असतां दंडप्रकार असें सांगितलें आहे.

## शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४०७ | १ | वाक्पारुष्याचें स्वरूप |
| ४०९ | १ | सत्यदोषानें किंवा मिथ्यादोषानें दुसऱ्याचा (सवर्णाचा) उपहास करणारास दंड. |
| — | ३ | मातापितरादिकांवर तोंड टाकणारास दंड. |
| ४१० | ४ | बरोबरीच्या सवर्णमनुष्यास शिवीगाळ करणारास दंड. |
| — | ५ | आचरणगुणांनीं निकृष्ट सवर्णमनुष्यास शिवीगाळ करणारास दंड. |
| ४११ | ६ | परस्त्रीला व उत्कृष्टाला शिवीगाळ करणारास दंड. |


## शाखा ३


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| | १ | वर्ण व मूर्धावसिक्तादिजातीचे उच्चनीच मनुष्यानीं परस्परांस शिवीगाळ करणारास दंड. |


## शाखा ४


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४१५ | १ | वाचिक विनाशाविषयीं दंड. |
| — | २ | अशक्त मनुष्यास धष्टमनुष्य वाचिक विनाश बोलेल तर त्याविषयीं. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य.

### शाखा ५


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४१६ | १ | पातित्यादिदोषयावयाजोगें भाषणकरणारास दंड. |
| ४१७ | २ | त्रैविद्य, राजे, देव, यांस दुर्भाषणकरणारास दंड. |


---

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

या प्रकरणाच्या पांच शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत हल्लाद्यवयव, शस्त्र उगारणें, मारणें, जखमीकरणें, इत्यादि दंडपारुष्याचे प्रकार; क्षमाकरणारा व अगोदर कलह उत्पन्न करणारा इत्यादिकांचा प्रकार; व सज्जनादिकांचा अपराध करणाऱ्या चांडालादिकांस दंड, व मारामारीचा प्रकार, व अपराध लागू झाल्यास दंडकरण्याचा प्रकार; व निकृष्टजातीनें उत्कृष्टजातीला व उत्कृष्टजातीनें निकृष्टजातीला हाणमार केल्यास दंड; व भिंतवगैरेचा नाशकरणारास दंड, व जनावरें वृक्ष यांस दुख देणारास दंड, असें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४१८ | १. | दंडपारुष्याचें स्वरूप. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण १८

## दंडपारुष्य.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | २ | दंडपारुष्याचे प्रकार. |
| — | ३ | कलहामध्यें क्षमा करितो त्यास दंडाचा निषेध व जो पहिल्यानें भांडण काढितो त्यास अधिक दंड. |
| ४२० | ४ | असाक्षिक दंडपारुष्य झाल्यास निर्णयोपाय. |
| ४२१ | ५ | दुसऱ्याचे अंगावर राख चिखल वगैरे टाकणारास दंड. |
| ४२२ | ७ | परस्त्री व आपल्यापेक्षां मोठे यांचे अंगावर राख वगैरे टाकणारास दंड |
| — | ८ | निकृष्टांचे अंगावर टाकणारास दंड. |
| — | ९ | मोहादिकेंकरून घडल्यास दंडाचा निषेध. |
| | | **शाखा २** |
| ४२३ | १ | ब्राह्मणांस पीडा देणाऱ्या क्षत्रियादिकांस दंड |
| — | ४ | शस्त्रादिक उगारलें असतां दंड. |
| ४२४ | ५ | मारण्याच्या उद्देशानें शस्त्रादिकास स्पर्श केला असतां दंड. |
| | | **शाखा ३** |
| ४२५ | १ | ताडनाच्या इराद्यानें हस्तादिक उगारलें असतां दंड. |
| — | २ | केश व वस्त्रादिक हिसकणारास व मोटकळी बांधून मारणारास दंड. |
| ४२६ | ३ | काष्ठादिकेंकरून मारणारास दंड. |
| — | ४ | रक्तमांसादि दुखविणारास दंड. |
| ४२७ | ५ | जखमी करणारास दंड. |
| — | ६ | गमनादिकाचा निरोध व नेत्रादि भेदन या विषयीं दंड. |
| — | ७ | बहुतांनी एकास मारलें असतां दंड. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.



| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४२८ | ८ | उत्कृष्टानें निकृष्टाचा किंवा निकृष्टानें उत्कृष्टाचा अपराध केला असतां दंड. |
| ४२९ | ९ | कलहांत अपहारिलेलें देऊन दंड करण्याचा प्रकार. |
| — | १० | जखम वगैरे केलेलें दुःख बरें होण्यासाठीं खर्च देववून दंड करण्याचा प्रकार. |
| | | **शाखा ४** |
| ४३० | १ | दुसऱ्याचे घराची भिंत वगैरे फोडणारास दंड. |
| — | २ | दुसऱ्याचे घरांत कांटे सर्प इत्यादि टाकणारास दंड. |
| — | ३ | शेळ्या मेंढ्या वगैरेस इजा देणारास दंड. |
| ४३१ | ४ | क्षुद्रपशूंस ताडनादि केलें असतां दंड. |
| | | **शाखा ५** |
| ४३२ | १ | ज्याचीं कलमें लागतात त्या वृक्षाचे छेदानिमित्त दंड. |
| — | २ | अंबा फणस इत्यादिकाचे छेदानिमित्त दंड. |
| — | ३ | शींव, देवालयें, इत्यादि स्थानांतील वृक्षछेदानिमित्त दंड. |
| ४३३ | ४ | लहान झाडें वेली वगैरे तोडणारास दंड. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण १९

## साहस.

या प्रकरणाच्या चार शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत साहसाचें स्वरूप व साहसाचे प्रकार व साहस करणारास व साहस करून नाकबूल जाणारास दंड व साहस करविणारास दंड. व परीट वगैरेस दंड व त्यांजकडून नुकसान भरून देविण्याचा प्रकार व पितापुत्रांचे कलहांत साक्षीजामीन राहणारास दंड, तराजू सनद, माप, नाणें, यांत लबाडी करणारास व खोटें नाणें वापरणारास दंड व वैद्याविषयींचा प्रकार उदम्याचे लबाडी विषयींचा प्रकार व छतीचा जिनस करून विकणारास दंड, हातचलाखीनें मालाची सदला बदल करणारास व निरखापेक्षां कमजास्ती विकणारास दंड, व निरख ठरविण्याचा प्रकार, हें अनुक्रमानें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४३४ | १ | साहसाचें स्वरूप. |
| — | २ | साहस चोरी वाक्पारुष्य स्त्रीसंग्रहण यांचा भेद. |
| ४३५ | ३ | साहसाचे प्रकार. |
| — | ४ | तीन प्रकारच्या साहसाविषयीं दंड. |
| | | **शाखा २** |
| ४३६ | १ | चोरीचें साहस करणारास दंड. |
| — | ३ | साहस करविणारास दंड. |
| ४३७ | ४ | सामान्य साहस करणारास दंड. |
| | | **शाखा ३** |
| ४३९ | १ | धुवायास दिलेलीं वस्त्रें वापरणारे परीट यांस दंड. |
| — | २ | वस्त्रांची सदला बदल करणारास दंड. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण १९

## साहस.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | ३. | परिटाच्या ह्यगईनें वस्त्रें खराब झाल्यास दंड योजना. |
| ४४० | ४ | पिता पुत्रादिकांचे कलहांत साक्षी व जामीन राहणारास दंड. |
| ४४१ | ५ | तराजू, सनद, माप, नाणें इत्यादिकांस खोटें करणारास दंड. |
| — | ६. | नाणें खरें असतां खोटें व खोटें असतां खरें सांगणाऱ्या सराफास दंड. |
| ४४२ | ७ | खोट्या वैद्य क्रियेवर उपजीवन करणारास दंड. |
| ४४३ | ८ | निरपराधी मनुष्यास धरणारा व अपराधीला सोडून देणारा यास दंड. |
| — | ९ | खोट्या तराजूनें किंवा खोट्या मापानें कमी देणारास दंड. |
| | | **शाखा २—४** |
| ४४४ | १ | चांगल्या मालांत वाईट माल मिसळणारास दंड. |
| — | २ | हलक्या किमतीचा माल कांहीं कृतीनें मोठ्या किमतीचा करणारास दंड |
| ४४६ | ४ | सरकारानें ठरविले निरखापेक्षां कमजास्ती दरानें विकणारास दंड. |
| — | ५ | देशांतराहून आलेल्या मालाचा अवरोध करणारास दंड. |
| ४४७ | ६ | सरकारानें निरख ठरविण्याचा प्रकार. |
| — | ७ | स्वदेशीच्या व परदेशीच्या मालावर नफा घेण्याचा प्रकार. |
| ४४८ | ९ | देशांतरीनें मालाचा निरख ठरविण्याचा प्रकार. |

## अनुक्रमणिका.

# प्रकरण २०

# विक्रीयासंप्रदान.

या प्रकरणाच्या दोन शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत वजनी केली वगैरेची विकरी होऊन तें न देणारा विषयीं, व कालां तरीं संवगाई महागाईमुळें नफ्या तो त्याचा प्रकार, व एकाला विकलेला जिनस दुसऱ्यास विकण्या बद्दल दंड, व चांगला माल दाखवून वाईट माल देणारास दंड, व स्थावर माल परत करण्याची मुदत इत्यादि सांगितलें आहे.

## शाखा १


| पृष्ठ. | अंक. | |
|---|---|---|
| ४४९ | १ | विक्रीयासंप्रदानाचें स्वरूप. |
| — | २ | परीक्षा करून परत देण्याविषयीं जिनसाचे प्रकार. |
| | | **शाखा २** |
| ४५० | १ | जिनसाचें मोल देऊनही न दिल्यास नफ्यासुद्धां देविण्याचा प्रकार. |
| ४५२ | ४ | खरीद करणारा परमुलखीहून माल खरेदीसाठीं आला असल्यास नफ्यासुद्धां देविण्याचा प्रकार. |
| — | ५ | विकलेला जिनस तो घेत नसल्यास दुसऱ्यास विकण्याचा प्रकार. |
| | | विकलेला माल खरीददारानें न घेतल्यामुळें पुढें नुकसान झालें तर त्याविषयीचा प्रकार. |
| ४५३ | ६ | विकरी झाल्यानंतर खरीददार जिनस मागत असतां विकणारानें न दिल्यामुळें माल खराब झाल्यास त्याविषयीं. |
| — | ७ | विकलेला जिनस दुसऱ्यास विकणारा व चोख माल दाखवून वाईट देणारास दंड. |
| — | ८ | मोल न देतां नुसता करार झाला असल्यास दुसऱ्याला विकण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण २०

## विक्रीयासंप्रदान.

### शाखा ३


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४५४ | १ | माल परत न होण्याविषयींचा प्रकार. |
| ४५५ | २ | माल परत करण्याची मुदत. |
| — | ५ | उपभोगानें खराबन होणारा अशा मालाविषयींचा प्रकार. |


---

# प्रकरण २१

## संभूयसमुत्थान.

या प्रकरणाच्या तीन शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत पाथीनें उदीम किंवा कसब करणारांनीं तोटा नफा वांटून घेण्याचा प्रकार, व नुकसान भरून देण्याचा प्रकार, व जकातीचा प्रकार, व श्रुतवृत्तसंपन्न ब्राह्मणास आमंत्रण न करणारास दंड, परमुलखांत मेलेल्या पाथीदाराच्या जिंदगीचा विभाग व यज्ञांतले ऋत्विजाच्या दक्षिणेचा विभाग असें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४५७ | १ | पाथीनें उदीम करणारांनीं तोटा नफा वांटून घेण्याचा प्रकार. |
| ४५८ | २ | पाथीदारांतून ज्यानें नुकसान केलें असेल त्यानें भरून देण्याचा प्रकार. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण २१

## संभूयसमुत्थान.



| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | ३ | उपद्रवापासून मालाचें संरक्षण करणाराविषयीं. |
| ४५९ | ४ | खुषकीवरील जकात घेण्याचा प्रकार. |
| — | ५ | सरकारास उपयोगी अशा मालाविषयीं. |
| — | ६ | जकातदाराला ठकविणारास दंड. |
| ४६० | ८ | जळमार्गावरील जकात घेण्याचा प्रकार. |
| | | शाखा २ |
| ४६१ | १ | पाथीदारांतून कोणी देशांतरीं मेल्यास त्याचे जिंदगीचे विभागाचा प्रकार. |
| | | शाखा ३ |
| ४६७ | १ | पाथीदाराप्रमाणेंच ऋत्विज, शेतकरी, कारागीर यांचे धनविभागाचा प्रकार. |



## प्रकरण २२

## चोरीविषयीं.

या प्रकरणाच्या नऊ शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत चोरीचें स्वरूप, मुद्दा शाबीत करण्याचा प्रकार, शंकितापराध्यानें निर्दोष होण्याचा प्रकार, चोरी अन्वयें दंड, चोरीचा माग काढण्याचा प्रकार, जात, द्रव्य, परिमाण इत्यादिकांच्या तारतम्यानें दंड कल्पनेचा प्रकार, चोर किंवा वधकरणारा यांची मदत करणारास दंड,

अनुक्रमणिका.

## प्रकरण २२

## चोरी विषयीं.

चोरांविषयीं उपेक्षा करणास दंड, खुनाची चौकशी करण्याचा प्रकार, खुनीला दंड, असें क्रमानें सांगितलें आहे.


### शाखा १

| पृष्ठ. | अंक. | |
|---|---|---|
| ४६५ | १ | चोरीचें स्वरूप. |
| ४६६ | २ | चोर धरण्याचा प्रकार. |
| — | ३ | वहम्यानें चोर ओळखण्याचा प्रकार. |

### शाखा २

| पृष्ठ. | अंक. | |
|---|---|---|
| ४६८ | १ | चोरीच्या वहम्यानें धरलेला निर्दोष होऊं शकत नाहीं तर दंड करण्याचा प्रकार. |

### शाखा ३

| पृष्ठ. | अंक. | |
|---|---|---|
| ४६९ | १ | मुद्दा शाबीत झाल्यानंतर काय करावें तो प्रकार. |
| ४७१ | ३ | ब्राह्मणचोरास दंड करण्याचा प्रकार. |
| — | — | डाग देण्याचा प्रकार. |
| — | — | प्रायश्चित्त घेतल्यास डाग देण्याचा निषेध. |

### शाखा ४

| पृष्ठ. | अंक. | |
|---|---|---|
| ४७१ | १ | गांवांत वध किंवा चोरी झाल्यास त्याविषयींचा प्रकार. |
| ४७२ | २ | मार्गांत चोरी झाल्यास त्याविषयींचा प्रकार. |
| ४७३ | ३ | गावांबाहेर चोरी झाल्यास त्याविषयींचा प्रकार. |
| — | ४ | माग न सांपडे तर सामंतांनीं भरून देण्याचा प्रकार. |
| — | ५ | राजाच्यानें चोरी भरून देवत नसल्यास त्याविषयींचा प्रकार. |

# अनुक्रमणिका.

## प्रकरण २२

## चोरीविषयीं.


| कलम | अंक | |
|---|---|---|
| — | ६ | चोरी झाली किंवा नाहीं याविषयीं संदेह झाल्यास निर्णयोपाय. |
| | | शाखा ५ |
| ४७४ | १ | घोडे हत्ती वगैरेची चोरी करणारास दंड. |
| ४७५ | २ | आंगावरील दम्भादिक चोरणारास दंड. |
| | | शाखा ६ |
| ४७६ | १ | अपहृत द्रव्याचे तारतम्यानें दंड. |
| ४७७ | ३ | क्षुद्रद्रव्यें, मध्यमद्रव्यें, आणि उत्तमद्रव्यें, याविषयीं दंडयोजना. |
| ४७८ | ४ | धान्याचे चोरीविषयीं दंड. |
| — | ६ | सोनें वगैरेच्या चोरीविषयीं दंड. |
| ४७९ | ७ | पुरुषस्त्रिया वगैरेच्या चोरीविषयीं दंड. |
| — | ८ | क्षुद्रद्रव्यापहारीं दंड वाढविण्याचा प्रकार. |
| ४८० | १० | भिंत वगैरे फोडणारास दंड. |
| — | ११ | वाटसरांनीं अल्पापहार केल्यास दंडाचा निषेध. |
| | | शाखा ७ |
| ४८१ | १ | चोर किंवा वध करणारा यांस मदत करणारास दंड. |
| — | २ | चोर धरण्याची उपेक्षा करणारा विषयीं. |
| | | शाखा ८ |
| ४८२ | १ | जखम, गर्भपात इत्यादि करणारास दंड. |
| ४८३ | ३ | पत्यादिकांस मारणाऱ्या व आग लावणाऱ्या स्त्रीला दंड. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

### शाखा ९


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४८४ | १ | वधकरणारा अविज्ञात असल्यास ठिकाणा लावण्याचा उपाय. |
| ४८५ | २ | गृहादिक जाळणारा व राजपत्नीशीं जाणारा यास दंड. |


# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहण.

या प्रकरणाच्या पांच शाखा कल्पिल्याआहेत.

या प्रकरणांत प्रथम साहसादिभेदें करून व्यभिचाराचे प्रकार, व्यभिचार समजण्याचीं चिन्हें, व त्याविषयीं जातिपरत्वें करून दंडयोजना, कन्येविषयींचा प्रकार, व वेश्यादिकांचे संगानिमित्त दंडाचा निषेध, व त्यांची देणगी वगैरे देण्याचे वादाचा प्रकार असें सांगितलें आहे.

### शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४८७ | १ | प्रथमसाहसादिभेदें करून व्यभिचाराचे प्रकार. |
| ४८८ | २ | व्यभिचारसमजण्याचे उपाय. |

अनुक्रमणिका.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहण.

### शाखा २


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ४९० | १ | निषेधिलें असतां पुनः परस्पर संभाषणादि करणारास दंड. |
| — | २ | नटादिकांचे स्त्रियांविषयीं सदरहू दंडाचा निषेध. |
| | | **शाखा ३** |
| ४९१ | १ | सजातीय गरतस्त्रीशीं जबरीनें संगकरणारास दंड. |
| — | २ | आपल्यापेक्षां निकृष्टजातीच्या व्यभिचारिणीस्त्रीशीं संग करणारास दंड. |
| ४९२ | ४ | गुरुतल्पगामीला दंड. |
| — | ५ | आपल्यापेक्षां उत्कृष्ट जातीच्या स्त्रीशीं संग करणारास दंड. |
| ४९३ | ७ | निकृष्टवर्णाच्या स्त्रीशीं संगकरणारास दंड. |
| ४९४ | | सरकारांत कळविण्याची सवड नसल्यास स्वतां मारण्याचा प्रकार. |
| ४९५ | १० | कन्येचा अपहार करणारास दंड. |
| — | ११ | निकृष्टजातीच्या सकाम कन्येचें हरण करणारास दंडाचा निषेध. |
| ४९६ | १२ | कन्येला बलात्कारानें क्षत करणारास दंड. |
| — | — | सकाम कन्येला क्षत करणारास दंड. |
| ४९७ | १४ | उत्कृष्टजातीच्या कन्येशीं संग करणारास दंड. |
| — | १५ | सजातीयसकाम कन्येला क्षत करणाराविषयीं. |
| ४९८ | १६ | कन्येला दूषण ठेवणारा व पशूशीं संगकरणारा यास दंड. |
| | | **शाखा ४** |
| ४९९ | १ | साधारणस्त्रीचें स्वरूप. |
| — | ४ | दुसऱ्यानें ठेवलेल्या स्त्रीशीं संगकरणारास दंड. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहण.

### शाखा ५


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ५०४ | १ | देणगी नदेतां बलात्कारानें संगकरणाराला दंड. |
| — | २ | बहुत मिळून एकीशीं बलात्कारानें संगकरणारास दंड. |
| ५०५ | ३ | मोल घेऊन संगकरूं देतनसल्यास दंड. |
| ५०६ | — | संगकरून मोल नदेणारा, किंवा बहुतांकडून संग करविणारा यास दंड. |
| ५०७ | ६ | चांडाळीशीं संगकरणारास दंड. |
| — | — | उत्तमस्त्रीशीं संगकरणाऱ्या चांडालास दंड. |


---

## प्रकरण २४

या प्रकरणाच्या तीन शाखा कल्पिल्या आहेत.

या प्रकरणांत स्त्री पुरुषांनीं धर्म मार्गांत राहण्याचा प्रकार व ते (स्त्रीपुरुष) नराहतील तर राजानें त्यांस दंडादिकें करूनस्वस्वधर्मांत राहविण्याचा प्रकार व जे व्यवहार साक्षात् राजानें निर्णीतकरावयाचे ते व पूर्वीं ऋणादि प्रकरणीं सांगितले नाहींत ते व्यवहार व अन्यायानें घेतलेल्या धनदंडाचा विनियोग असें सांगितलें आहे.

### शाखा १

अनुक्रमणिका.

# प्रकरण २४

## स्त्रीपुंधर्म.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ५०८ | १ | स्त्रीपुरुषांनीं कसें वर्तावें त्याचें दिक्प्रदर्शन. |
| — | २ | स्त्रीपुरुष आपापल्या मार्गांनि राजानें ठेवण्याचा प्रकार. |
| | | **शाखा २** |
| | | **प्रकीर्णक.** |
| ५०९ | १ | जे व्यवहार राजानें च पाहावयाचे ते कोणकोणते. |
| ५१० | २ | सनदेंत कमजास्ती करणारा, व चोर, परदाररत, यांस सोडून देणारा, यांस दंड. |
| — | ३ | ब्राह्मणादिकांकडून अभक्ष्य खावविणारास दंड. |
| ५११ | ४ | सोन्यांत लबाडी करणारा व कुत्सित मांस वगैरे विकणारा यास दंड. |
| ५१२ | ५ | चतुष्पदांकडून दुखापत वगैरे झाल्यास त्याविषयीं दंडाचा प्रकार. |
| — | ६ | झंपलेल्या चतुष्पदाकडून दुखापत घडल्यास त्याविषयींचा प्रकार. |
| ५१३ | ७ | हयगईमुळें हिंसादिक घडल्यास दंड. |
| ५१४ | ९ | जार पुरुषास चोर म्हणणारास दंड. |
| ५१५ | १० | राजाची निंदादिक करणारास दंड. |
| — | ११ | सरकारचा खजीना चोरणारास दंड. |
| — | १२ | सर्वस्वहरण केलें तरी उपजीविकेचें साधन हरण करण्याचा निषेध. |
| ५१६ | १४ | प्रेतावरचें वस्त्रभूषणादि विकणारास दंड. |
| ५१७ | १५ | दुसऱ्याचे डोळे फोडणारास दंड. |
| — | १६ | ब्राह्मणाचा वेष घेणाऱ्या शूद्रास दंड. |
| | | **शाखा ३** |
| ५१८ | १ | विपरीत निर्णय करणारांस दंड. |

अनुक्रमणिका.

## प्रकरण २४

## प्रकीर्णक.



| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | २ | खुद्द राजानें विपरीत निर्णय केल्यास त्याला दंड. |
| ५२० | ४ | यथान्याय निर्णीत केलेल्या व्यवहाराविषयीं पुनः फिर्याद करणारा पुनः पराजित झाल्यास दंड. |
| ५२१ | ६ | अन्यायानें घेतलेल्या धनदंडाचा विनियोग. |

# मयूखदायभाग.

अनुक्रमणिका

## शाखा १


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १ | १ | सत्तेचें स्वरूप. |
| १ | २ | रिक्थाचें स्वरूप. |
| २ | ३ | जन्मेंकरून सत्ताउत्पन्न होते तो प्रकार. |
| ५ | ६ | ब्राम्हणास प्रतिग्रहादिकें करून मिळालेल्याचा प्रकार. |
| ५ | ७ | क्षत्रियास विजयानें मिळाल्याचाप्रकार. |
| ६ | ८ | वैश्यास उद्माने व शूद्रास सेवेनें मिळालेल्याचा प्र |


## शाखा २


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ९ | १ | दायाचें निरूपण. |
| १० | ३ | अटकावलेल्या दायाचें स्वरूप |
| — | — | खुल्या दायाचें स्वरूप. |


## शाखा ३


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १० | १ | दायभागाचें स्वरूप. |
| ११ | २ | नुसत्या बुद्धीनें विभाग करण्याचा प्रकार. |
| ११ | ३ | आईबापाचे मरणानंतर विभागाचा प्रकार. |
| १२ | ४ | आईचा विटाळ किंवा बापाचा काम गेल्यानंतर विभागाचा प्रकार |
| १२ | ५ | परंपरागत स्थावराचा विभाग. |
| १२ | ६ | हरण केलेलें हस्तगत केलें त्या द्रव्याचा विभाग. |
| १२ | ७ | ज्येष्ठाच्या अनुमतीनें विभाग. |
| १४ | ८ | समविभाग. |
| — | ९ | उद्धारविभाग. |
| १५ | १० | जुळ्यामध्यें वडील कोणता तो प्रकार. |

# मयूखदायभाग

## अनुक्रमणिका.


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| १६ | १३ | उद्धार विभागाचा निषेध. |
| — | १४ | विभाग करणाऱ्या पित्याचे दोन अंश. |
| — | १५ | वडिलोपार्जित स्थावरांत पितापुत्रांचे विभाग. |
| | | **शाखा ४** |
| १७ | १ | पत्नींना पुत्रांबरोबर समविभाग. |
| १८ | २ | स्वतां द्रव्य संपादन समर्थ असल्यास त्याविषयीं |
| — | ३ | आईबापाचें कर्ज व जिंदगी वांटून घेण्याचा प्रकार. |
| १९ | ४ | सापत्न मातेचा विभाग. |
| — | ५ | नातवांस पित्याचेद्वारें विभाग. |
| २१ | ८ | पुत्रांस आईचे द्वारें विभाग. |
| | | **शाखा ५** |
| — | १ | भिन्नजातीचे पुत्रांचा विभाग. |
| २२ | २ | प्रतिग्रहसंपादित भूमीचे विभागाचा निषेध. |
| — | ३ | शूद्रापुत्रास स्थावर विभागाचा निषेध. |
| — | ४ | ब्राम्हणादिकांच्या शूद्रापुत्रास विभाग निषेध. |
| — | ५ | शूद्रापुत्रास अन्नाछादन. |
| २३ | ६ | शूद्राचे दासीपुत्रास अर्धवांटा. |
| २३ | ७ | विभागानंतर झालेल्या पुत्राचा विभाग. |
| २४ | ८ | नुसतें कर्ज असल्यास त्याविषयींचा प्रकार. |
| — | ९ | संसृष्टांबरोबर विभक्तांचा विभाग. |
| २५ | ११ | विभागसमयीं स्त्रिया गरोदर असल्यास प्रतीक्षा करावी |
| — | १२ | धाकट्या बंधूचे संस्कार समायीक द्रव्यांतून |

# मयूख दायभाग

अनुक्रमणिका


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| २६ | १४ | विभाग झाल्यानंतर बहिणींची लग्नें करण्याचा प्रकार. |
| | | **शाखा ६** |
| — | १ | बारा प्रकारचे पुत्र. |
| २७ | ६ | दत्तकावांचून इतर पुत्रांचा कलींत निषेध. |
| | | **शाखा ७** |
| — | १ | दत्तकाचा विधि. |
| | | **शाखा ८** |
| ३१ | १ | दत्तक घेण्याचा विधि. |
| ३४ | ५ | शूद्रांत दौहित्र भागिनेयाच्या अभावीं दुसरा दत्तक. |
| ३६ | १० | औरसपुत्र झाल्यास दत्तकाला विभाग. |
| ३७ | १२ | भावाचा पुत्र दत्तक |
| | | **शाखा ९** |
| ३८ | १ | दत्तकाचे दोन प्रकार. |
| ४५ | १० | केवल दत्तकानें सापिंड्य. |
| | | **शाखा १०** |
| ४७ | १ | ज्येष्ठ पुत्र देण्याचा निषेध. |
| ४८ | — | दत्तक घेण्याविषयीं अधिकारी. |
| — | २ | पुत्र देण्याचा विधि. |
| — | ३ | पुत्र घेण्याचा विधि. |
| | | **शाखा ११** |
| ४९ | १ | विभागकाळीं कर्ज वांटून घेण्याचा प्रकार. |
| — | २ | कर्ज फेडून बाकी जिंदगी वांटून घ्यावी. |

# मयूखदायभाग.

अनुक्रमणिका.


| पृष्ठ. | अंक | |
|---|---|---|
| ५० | २ | समाईकांतून कांही छपावून ठेविल्यास त्याविषयीं |
| | | **शाखा १२** |
| ५१ | १ | अविभाज्य धनें. |
| — | ३ | हरण केलेलें परंपरागत द्रव्य हस्तगत करणारास चतुर्थांश. |
| ५२ | ४ | विद्याधनाचें स्वरूप. |
| — | ५ | पितृद्रव्य खर्चून संपादिलेलें विद्याधन |
| ५३ | ६ | संपादकास दोन हिस्से. |
| — | ७ | कुटुंब पोषण करणारास विद्याधनाचा विभाग. |
| ५४ | ९ | आई बापांनीं ममतेनें दिल्याचा विभागनिषेध. |
| | | ध्वजाहृत द्रव्याचा विभाग निषेध. |
| — | ११ | सौदायिक धनाचें स्वरूप. |
| ५५ | १२ | शेतकी वगैरे कडून मिळविलेल्याचे विभाग. |
| | | **शाखा १३** |
| — | १ | जो जें वस्त्रादिक वहिवाटित असेल त्याचा विभागनिषेध. |
| ५६ | २ | पित्याचे वस्त्रादिकां विषयीं |
| — | ३ | एकशाफ ज्येष्ठानें घ्यावें. |
| — | ४ | शिजलेलें अन्न वदानी कूपादिक यांचा विभागनिषेध. |
| — | ५ | योगक्षेमाचा विभाग निषेध. |
| ५७ | ६ | गृहादिमार्ग किंवा गाईचारण्याचें रान यांचा विभागनिषेध. |
| — | ७ | वस्त्रादिकांचे विभागाचा प्रकार. |
| ५८ | ८ | छपावून ठेविल्या द्रव्याचे विभाग. |
| ५९ | ९ | पूर्व विभागांत कृत्रिम झाल्यास पुनः विभाग. |

# मयूख दायभाग

## अनुक्रमणिका

### शाखा १४


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ५९ | १ | विभागाचा निन्हव केला असतां निर्णयोपाय. |
| ६२ | ६ | विभागाचीं चिन्हें. |
| ६३ | ८ | पुनः विभाग करण्याचा प्रकार. |
| ६३ | १० | स्थावर मालाविषयीं सर्वांचें स्वामित्व. |
| ६४ | ११ | पुनः वांटा मागणारास दंड. |


### शाखा १५


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ६४ | १ | निपुत्रिकाचे जिंदगीचे वारीश. |
| — | २ | व्यभिचारिणीला विभाग निषेध. |
| ६५ | ३ | कन्याविरहित पत्नीला स्थावर मालाचा निषेध. |
| — | ४ | स्थावराचे गहाण दाना विषयीं पत्नीला अधिकार. |
| ६६ | ५ | ब्राम्हणाशिवाय बेवारीश जिंदगी राजानें घ्यावी. |
| — | ६ | अविभक्त बंधूंतून कोणी मेल्यास त्याचे धनाविषयीं. |
| — | ७ | अविभक्त मेला असतां बायकोला विभागाचा निषेध. |
| ६७ | ९ | दुर्जन स्त्रीला अन्नाछादन मात्र. |
| — | १२ | पतिव्रता स्त्रीला जिंदगीचा अधिकार. |
| ६८ | १३ | पत्नीच्या अभावीं कन्या वारीश. |
| — | १४ | कन्याचे अभावीं दोहित्र वारीश. |
| — | १५ | दौहित्राच्या अभावीं बाप. |
| ६९ | १६ | आई नसल्यास सखे भाऊ व त्यांच्या अभावीं पुतणे वारीश. |
| — | १८ | पुतण्यांच्या अभावीं गोत्रज वारीश. |
| ७० | २० | बहिणीच्या अभावीं सावत्र भाऊ वारीश. |

# मयूखदायभाग.

## अनुक्रमणिका


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| ७१ | — | सपिंड व समानोदक कोणते तो प्रकार. |
| — | २२ | बंधूंचे प्रकार. |
| ७२ | २६ | बंधूंच्या अभावीं आचार्य. |
| ७२ | २९ | क्षत्रियादिकांची बेवारीश जिंदगी सरकारानें घ्यावी. |
| | | **शाखा १६** |
| ७३ | १ | वानप्रस्थादिकांचें धन घेण्याविषयीं अधिकारी. |
| — | २ | जिंदगी घेणारानें त्याची दाहा दिवस क्रिया करावी. |
| | | **शाखा १७** |
| ७४ | १ | संसृष्टीचें स्वरूप. |
| — | २ | संसृष्टीचें लक्षण. |
| — | ५ | संसृष्टीचा विभाग. |
| ७५ | ७ | संसृष्टींतून कोणी नवें संपादिल्यास विभागप्रकार. |
| ७६ | ८ | संसृष्टीच्या जिंदगीचे वारीश. |
| ७७ | ११ | संसृष्ट मेल्यानंतर पुत्रास विभाग. |
| | | **शाखा १८** |
| ८२ | १ | स्त्रीधनाचे प्रकार. |
| ८३ | — | स्त्रीधनाचीं स्वरूपें. |
| — | ७ | अधिवेदनिक स्त्रीधन |
| ८४ | ८ | नवऱ्यानें देऊं केलेलें स्त्रीधन पुत्रांनीं देण्याचा प्रकार. |
| — | १० | प्रतारणेनें दिलेल्या स्त्रीधनाचा प्रकार. |
| ८५ | १३ | सौदायिक स्त्रीधनाविषयीं. |
| ८६ | १५ | जबरीनें स्त्रीचें धन घेतल्यास दंड. |

# मयूखदायभाग

## अनुक्रमणिका


| पृष्ठ | अंक | |
|---|---|---|
| — | १६ | नवऱ्यानें आपकाळावांचून स्त्रीधन घेण्याचा निषेध. |
| ८७ | १७ | नवऱ्यानें स्त्रीशीं संगादिवर्ज केल्यास तिचें धन परत देण्याचा प्रकार. |
| | | **शाखा १९** |
| ८७ | १ | स्त्रीमरणानंतर तिचे धनाचा वारीश. |
| ८८ | ३ | त्यांत कन्येचा हिसा. |
| ८९ | ७ | कन्यानस कन्येची कन्या वारीश. |
| ९० | — | कर्जापुरतें किंवा कमी स्त्रीधन असल्यास पुत्र वारीश |
| ९१ | १४ | स्त्रीधनाविषयीं विवाहभेदेंकरून वारीश. |
| ९२ | १७ | नवरा व आई नसल्यास स्त्रीधनाविषयीं अधिकारी. |
| — | १८ | बंधुदत्तद्रव्याचा अधिकारी. |
| — | १९ | बहिणीचे शुल्काविषयीं. |
| ९४ | २० | वाग्दत्त कन्या मेल्यास त्याविषयीं. |
| ९४ | १ | षंढपतित इत्यादिकांस विभागाचा निषेध. |
| ९५ | ३ | संन्याशाला विभाग नाहीं. |
| — | ४ | संन्यासभ्रष्ट, अक्रमोढासुत, इत्यादिकांस विभागनिषेध. |
| ९६ | ७ | अनंशांचें पोषण. |
| ९७ | ८ | पतितादिकांचे पोषणाचा निषेध. |
| — | ९ | अनंशांचे पुत्रांस विभाग. |
| ९८ | १० | अनंशांच्या कन्येचें पोषण. |

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.[1]

### शाखा १

अभिषेकादिगुणयुक्त[2] जो राजा[3] त्यानें प्रजापालन करावें, हाच त्याचा मुख्यधर्म होय. तें (यथान्याय प्रजापालन) अपराध्यांस शिक्षा केल्यावांचून घडत नाहीं, आणि अपराधी कोणता (व कोणतें कर्म केल्यानें अपराधी ठरला जातो.) हें ज्ञान व्यवहार पाहिल्यावांचून होत नाहीं. यास्तव प्रतिदिवशीं व्यवहार पहात असावें. उपोद्घात

याज्ञवल्क्य. १ राजानें सभासदां सहवर्तमान नेहमी स्वतां व्यवहार पहात असावें.।

असें पहिल्या अध्यायाचे शेवटीं सांगितलें आहे, परंतु त्या व्यवहाराचें स्वरूप काय, व तो किती प्रकारचा आणि कोणत्या रीतीनें चालवावा, इत्यादि कर्तव्यता सामग्री सांगितली नाहीं ती सविस्तर सांगण्या करितां दुसऱ्या अध्यायाचा आरंभ करितो.

मूळ.

याज्ञवल्क्य. राजानें रागलोभरहित होऊन विद्वान् ब्राह्मणां सहवर्तमान व धर्मशास्त्रास अनुसरून व्यवहार पाहावे.

---

१ मातृका ह्मणजे मांडणी.

२ प्रजापालन करण्यासाठीं राज्यासनीं बसण्याचा कांहींएक संस्कारविशेष आहे.

३ राजा या शब्दांतच इतका अर्थ आहे कीं, प्रजांस सुखी ठेवून त्या आपल्यावर प्रीति करीत असें करणें.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

टीका

व्यवहाराचें लक्षण.

२ **व्यवहार** ह्मणजे (कांहीं एक द्रव्याविषयीं) दुसरा विरुद्ध बोलत असतां हें माझें आहे, असें ह्मणणें. जसें कोणी एक पुरुष, ही जमीन माझी आहे असें ह्मणतो; दुसराहि त्याविरुद्ध ह्मणतो कीं, ही माझी आहे! ते **व्यवहार** अनेक प्रकारचे आहेत.

राजानें धर्मशास्त्रास अनुसरून व्यवहार पाहावे.

३ **राजानें** ह्मणजे क्षत्रियानेंच असें नाहीं, परंतु जो प्रजापालनाविषयीं **अधिकृत** असेल, त्यानें स्वतां **वेद, व्याकरण, धर्मशास्त्र,** जाणणारे अशा **ब्राह्मणां** सहवर्तमान, क्रोधलोभ यांचा त्याग करून, व **धर्मशास्त्रास** अनुसरून, **व्यवहार** पाहावे. **अर्थशास्त्रास** अनुसरून पाहूं नयेत. क्षत्रियांसह वर्तमान पाहूं नयेत.

राजा व्यवहार न पाहील तर त्याविषयीं

४ ब्राह्मणां सहवर्तमान अशी **सहार्थी**[१] तृतीया सांगितल्यावरून त्यांजकडे मुख्यत्व नाहीं; ह्मणूनच जर राजा **व्यवहार** अगदींच न पाहील किंवा विपरीत **व्यवहार** पाहील तर तो (खालीं सांगितले त्या मनुवचनांतील) दोषाचा अधिकारी होईल, **ब्राह्मण** होत नाहींत. (कारण, त्यांजकडे मुख्यत्व नाहीं.)

---

१ सहार्थी तृतीया ह्मणजे सहवर्तमान असा ज्या तृतीयेचा अर्थ होतो ती. अशा तृतीया विभक्तीनें निर्दिष्ट जो त्याला मुख्यत्व नाहीं, ह्मणून प्रकृतीं ब्राह्मणांसहवर्तमान ह्मणजे ब्राह्मणांस घेऊन राजानें व्यवहार पाहावे, यांत राजाकडे मुख्यत्व आणि ब्राह्मणांकडे गौणत्व.

---

सुबोधिनी. २ अभिप्राय हा कीं, राजा मुख्य सबब त्याजकडे विशेष दोष; ब्राह्मणांस तादृश दोष नाहीं. केवळ सर्वात्मना दोष नाहीं असें नाहीं. कारण, "न्यायसभेंत जाऊं नये, गेलें असतां समंजस बोलावें, कारण अगदींच न बोलणारा किंवा विपरीत बोलणारा मनुष्य पातकी होतो" असें जें वचन आहे त्यास विरोध येईल.

# प्रकरण १

## साधारण व्यवहारमातृका.

मनु. ५ दंड करावयास योग्य नव्हत, अशास दंड करणारा व दंड्यांस शिक्षा न करणारा असा **राजा** (इहलोकीं) अपकीर्ति पावून अधोगतीस जातो.

६ **देशाचारादिक व सामयिक** धर्म हे **धर्मशास्त्रास** अविरुद्ध व **धर्मशास्त्र** बोधितच आहेत, ह्मणून त्यांचा पार्थक्येंकरून निर्देश केला नाहीं. तसेंच पुढें ही (७४ व्या प्रकरणीं १ ल्या शाखेच्या २ ऱ्या अंकांत) सांगितलें आहे कीं, " आपल्या धर्माच्या अविरोधानें जो **सामयिक** धर्म होईल तो व जो राजानें केलेला धर्म आहे तोही यत्नानें संरक्षावा.

### शाखा २

मूळ.

याज्ञवल्क्य. **राजानें वेदशास्त्रसंपन्न** व **धर्मज्ञ** सत्यवादी आणि शत्रुमित्रांविषयीं **समदर्शी** असे **सभासद** नेमावे.

टीका.

१ अणखी **राजानें, वेद व्याकरण मीमांसा** संपन्न, **धर्मशास्त्र** जाणणारे, सत्यभाषी, शत्रुमित्रांवर समदृष्टि ठेवणारे, ह्मणजे प्रीतिद्वेषरहित, असे **सभासद, सभेंत** जेणें करून **व्यवहार** पाहावयास बसतील अशा रीतीनें त्यांचा दानमानें करून सत्कार **राजानें** ठेवावा. जरी मुळांत एवंगुण **सभासद** नेमावे असें सामान्यतः सांगितलें, तरी ते (**सभासद**) ब्राह्मण नेमावे कारण. सभासदांची नेमण

कात्यायन. २ अचंचल, बुद्धिमंत, परंपरायात, **धर्मशास्त्र** व **अर्थशास्त्र**[१] यांत निपुण, अशा ब्राह्मण **सभासदां** सहित **राजानें** व्यवहा

१ राजनीतिलक्षण अर्थशास्त्र औशनसादि.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

र पाहावा.

आणि ते (सभासद) तीन नेमावे. कारण, बहुवचन, त्रित्व संख्येनें सार्थ होतें; व मनुवचनही असेंच आहे ह्मणून. — सभासद तीन नेमावे.

मनु. **वेदशास्त्रसंपन्न** असे तीन ब्राह्मण ज्या **सभेंत** बसतात ती केवळ **यज्ञसभा** होय.

बृहस्पति. तर सांगतो कीं, **वैदिक** व लौकिक **व्यवहार** जाणणारे आणि **धर्मशास्त्रज्ञ** असे सात, पांच, किंवा तीन, ब्राह्मण ज्या **सभेंत** आहेत ती **सभा** केवळ **यज्ञशाळे** सारखीच होय.

कात्यायनानें. **ब्राह्मणां**चा आणि **सभासदां**चा स्पष्ट भेद दाखविला आहे, तो असा, **प्राड्विवाक**[1], **अमात्य**, **ब्राह्मण**, **पुरोहित**, **सभासद**, यांसहित धर्मे करून **व्यवहार** पाहणारा **राजा** स्वर्गी राहतो.

३ येथें **ब्राह्मण अनियुक्त**[2] आणि **सभासद नियुक्त** इतका मात्र भेद समजावा. — ब्राह्मण व सभासदांचा भेद.

स्मृत्यंतरींही, सांगितलेंच आहे कीं, **नियुक्त** असो किंवा **अनियुक्त** असो; जो **धर्मशास्त्र** जाणतो तो [**सभेंत**] बोलायास योग्य आहे.

४ परंतु **नियुक्तांनीं** (**सभासदांनीं**) वास्तवार्थ सांगूनही जर **राजा** न ऐकतां विपरीत न्याय करितो तर **सभासदांनीं** त्याचें निवारण करावें, न केल्यास दोष आहे. — सभासदांनीं राजाला अन्यायापासून वळवावें.

---

१ प्राड्विवाकाचें लक्षण तिसऱ्या शाखेच्या पहिल्या अंकांतील कात्यायनवचनांत पाहावें. आणि अर्थ तिसऱ्या अंकांत पहावा

---

सुबोधिनी. २ न्यायसभेंत येऊन व्यवहार पाहावा एतदर्थ ज्यांस निराळें वेतन नाहीं, कुटुंबपोषणार्थ वर्षाशन अग्रहार इत्यादि असल्यास तितकेंच मात्र, आणि नियुक्त ह्मणजे न्यायसभेंत येऊन व्यवहार पाहण्यासाठीं वेतन देऊन नेमलेले.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

कात्यायनानेंही सांगितलें आहे कीं, अन्यायवर्ती राजाला जे सभासद अनुसरतात, तेही त्याज बरोबर दोषाचे भागी होतात, ह्मणून त्यांनीं राजाला बोध करीत असावें.

५ अनियुक्तांनीं (ब्राह्मणांनीं) विपरीत सांगितलें किंवा अगदींच सांगितलें नाहीं, तर मात्र ते दोषी होतात; परंतु राजाचें निवारण न केल्यामुळें दोषी होत नाहींत. कारण, — ब्राह्मणदोषीठरण्याचें कारण.

मनु. न्यायसभेंत जाऊं नये, (गेलें असतां) समंजस भाषण करावें. कारण, (वाचुक असून) अगदींच बोलत नाहीं असा, किंवा विपरीत सांगणारा मनुष्य पातकी होतो.

६ लोकरंजनार्थ कितीएक सावकारही त्या सभेंत असावे. — सावकारांची नेमणूक.

कात्यायन. कुलीन, सुशील, तरुण, सदाचारसंपन्न, धनाढ्य, निर्मत्सर आणि कुलपरंपरायात असे कितीएक सावकारही सभेंत असावे.

## शाखा ३

यावरून राजानें स्वतां व्यवहार पहावा असें (१ल्या शाखेच्या ३ऱ्या अंकांत) सांगितलें, परंतु राजाला न फावेल तर अनुकल्प[१] सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. कार्यांतराच्या पारतंत्र्यामुळें व्यवहार न पाहणारा अशा राजानें सर्व धर्मज्ञ असा ब्राह्मण सभासदां सहवर्तमान नेमावा.

---

१ अनुकल्प ह्मणजे कांहीं एक कारणामुळें मुख्यपक्षाच्या अभावीं जो गौण पक्ष तो.

टीका.

# प्रकरण १

## साधारण व्यवहारमातृका.

टीका.

राजाला व्यवहार पाहण्याविषयीं नफावेल तरत्यानें आपल्या कामावर ब्राह्मण नेमावा.

१ राजाला कार्यांतर उपस्थित झाल्यामुळें **व्यवहार** पाहावयास अवकाश न होईल तर, त्यानें पूर्वीं (२ऱ्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितल्या **सभासदां** सह वर्तमान **व्यवहार** पाहण्याकरितां **शास्त्र प्रतिपादित** धर्म व **सामयिक** धर्म जाणणारा असा ब्राह्मण (**प्राड्विवाक**[1]) नेमावा; क्षत्रियादिक नेमूं नये. आणि तो खालीं कात्यायनानें सांगितलेल्या गुणांचा असावा.

प्राड्विवाकाचें लक्षण

कात्यायन. इंद्रियनिग्रह करणारा, कुलीन, शत्रुमित्रभावरहित आणि भयकारक नव्हे असा, अचंचल, **धर्मशास्त्रज्ञ**, पापभीरु, काम करण्याविषयीं उत्सुक, **अक्रोध**, असावा.

ब्राह्मण प्राड्विवाक न मिळे तर कोण नेमावा.

२ अशा प्रकारचा ब्राह्मण न मिळेल तर क्षत्रिय, तोही न मिळे, तर वैश्य नेमावा; परंतु शूद्र कधीं नेमूं नये.

कात्यायन. ब्राह्मण जेथें न मिळेल तेथें **धर्मशास्त्रज्ञ** असा क्षत्रिय किंवा त्याच्या अभावीं तसाच वैश्य नेमावा, परंतु शूद्र अगदीं वर्ज करावा.

नारदानें. (राजा असला तरी **व्यवहार** पाहण्याविषयीं) हा (**प्राड्विवाक**) च मुख्य[2] सांगितला आहे. "**राजानें धर्मशास्त्रास** मुख्य करून व **प्राड्विवाकाच्या** मतास अनुसरून एकाग्रचित्तानें यथानुक्रम **व्यवहार**

---

सुबोधिनी. १ हा व्यवहार पाहण्याविषयीं राजप्रतिनिधी म्हटला आहे आणि हा सभासदांहून निराळा.

---

सुबोधिनी. २ मुख्य मांगण्याचें कारण, राजा बहुकार्यव्याकुळ असल्यामुळें त्यास अवकाश नाहीं व चित्तस्वास्थ्यही नाहीं. आणि धर्मशास्त्रास मुख्यत्व सांगितल्यावरून ही राजनियुक्त पुरुषच व्यवहार पाहण्याविषयीं अधिकारी, असा नारदाचा आशय.

# प्रकरण १

## साधारण व्यवहार मातृका.

पाहावे.''

स्वमतानें पाहूं नये. जसें जासुदाच्या द्वारें राजा परचक्रांतील वर्तमान समजतो, तसाच प्राड्विवाकाच्या द्वारें व्यवहार पाहावा.

३ प्राड्विवाक शब्दाचा योगार्थच इतका आहे कीं, वादिप्रतिवादींस प्रश्न करून त्यांचें भाषण विरुद्ध किंवा न्यायसंमत आहे, याचा सभासदांसहवर्तमान विचार करणें, ह्मणून ही त्याची यौगिक संज्ञा आहे. स्मृत्यंतरींही प्राड्विवाकाचें लक्षण असेंच सांगितलें आहे. प्राड्विवाकशब्दाचा अ

मूळ.

याज्ञवल्क्य. जे सभासद स्नेहानें, लोभानें, किंवा भयानें, ही शास्त्रविरुद्ध इत्यादि निर्णय करितात, त्या प्रत्येकांस विवादाच्या दुप्पट दंड करावा.

टीका.

४ पूर्वी (२ऱ्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितलेले सभासद[1] केवळ रजोगुणानें व्याप्त होउन जर प्रीतीनें किंवा लोभानें अथवा भयानें शास्त्रविरुद्ध किंवा आचारविरुद्ध न्याय करितात तर राजानें ज्या ज्या व्यवहारीं पराजय निमित्त जो जो दंड सांगितला आहे त्या त्या दंडाच्या दुप्पट प्रत्येक सभासदास दंड करावा. सभासदांस दंड.

प्रीति, लोभ, भय, असा विशेष निर्देश करण्याचें कारण, प्रीति लोभ इत्यादि कारणामुळें जर विपरीत न्याय झाला तर दुप्पट दंड, अज्ञान किंवा

---

१ सभासदशब्देंकरून प्राड्विवाक वगैरे दुसरे नियुक्त असतील ते घ्यावे.

---

सुबोधिनी. २ सभासदांस दुप्पट दंड सांगितल्यावरून अनियुक्त ब्राह्मणांस कमी दंड योजावा. कारण सभासदांकडे दोन अपराध आहेत. शास्त्रोल्लंघन. व राजाज्ञेचा भंग. अनियुक्तांकडे शास्त्रोल्लंघनाचा मात्र अपराध.

मोह.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

मोह यांकडून घडल्यास दुष्ट दंड नाहीं.

गोतम. ५ **राजा सर्वांचा शिक्षक**, पण ब्राह्मणांवांचून.

असें जें वचन आहे तेणें करून ब्राह्मणाला दंड न करावा, असें समजूं नये. कारण गोतम वचनाचें तात्पर्य इतकेंच कीं, ब्राह्मण सर्वांपेक्षां पूज्य आहे.

स्मृति. **राजानें ब्राह्मणाचा वध करूं नये, ब्राह्मणाला बांधूं नये, त्याला दंड करूं नये, त्याला गांवांतून बाहेर घालवूं नये, त्याला कुत्सितशब्दांनीं अपवाद ठेवूं नये, आणि त्याचा परिहार करूं नये.**

असे जे साहा प्रकार सांगितले आहेत ते जो ब्राह्मण लौकिक **व्यवहार, वेद, व वेदांग** जाणणारा; **वाकोवाक्य, इतिहास, पुराण** यांत निपुण असून त्यांची अपेक्षा बाळगणारा, व तद्द्वारा उपजीवन करणारा व अठ्ठेचाळीस **संस्कार**[१] ज्यास केले आहेत असा व तीन कर्मांचे ठायीं किंवा **षट्कर्मां**[२]चे ठायीं आसक्त, तसाच **सामयिक व आचारप्राप्त** धर्म जाणणारा असा **बहुश्रुत** असेल त्याविषयीं मात्र आहेत; साधारण ब्राह्मणाविषयीं सांगितले नाहींत.

---

१ हे संस्कार गर्भाधान पुंसवन इत्यादिक गोतमानें सुबोधिनींत सांगितले आहेत, विस्तरभयास्तव येथें सांगत नाहीं.

२ तीन कर्में ह्मणजे दान, अध्ययन, यजन, आणि षट्कर्में ह्मणजे अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिग्रह,

# प्रकरण १

# साधारणव्यवहारमातृका.

## शाखा ४

### व्यवहाराचा विषय सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **धर्मशास्त्रविरुद्ध व आचारविरुद्ध** वर्तणुकीनें दुऱ्यांकडून पीडित झाल्यामुळें **राजाकडे फिर्याद** जातो तर तो **व्यवहारविषय** ह्मटला आहे.

टीका.

१ धर्मशास्त्र विरुद्ध व आचार विरुद्ध वर्तणुकीनें दुसऱ्यांकडून पीडित झाल्यामुळें राजाकडे[1] किंवा **प्राड्विवाका**कडे ज्या गोष्टी विषयीं फिर्याद जातो, ती गोष्ट **व्यवहाराचा विषय** ह्मटली आहे — व्यवहारविषयह्मणजे काय.

२ प्रतिज्ञा, उत्तर, संशयहेतु, परामर्श, **प्रमाण**, निर्णय, प्रयोजन, एतद्रूप जो **व्यवहार** त्याचें हें (१ला अंक) साधारण लक्षण सांगितलें. — व्यवहाराचे अंश.

३ तो (**व्यवहारविषय**) दोन प्रकारचा **शंकितापराध आणि निश्चितापराध**. — अपराध दोन प्रकारचा

नारद. फिर्याद (अभियोग) दोन प्रकारची, शंकितापराध आणि निश्चितापराध. शंकितापराध ह्मणजे दुर्व्यसनी,

---

सुबोधिनी- १ राजाशब्दें करून पूगश्रेणी (यांचें स्वरूप दुसऱ्या प्रकरणीं १४ व्या शाखेच्या १ल्या अंकांत सांगितलें आहे) इत्यादिक जे जातीचे व व्यापाराचे अधिकारी आहेत तेही घ्यावे

## प्रकरण १

## साधारण व्यवहार मातृका.

(जुगारी व्यभिचारी दारुबाज इत्यादिक) यांच्या संगती मुळें (यांच्या हातून असें कर्म घडलें असेल अशा शंकेनें) अपराधी धरणें. निश्चितापराध ह्मणजे प्रत्यक्ष मुद्दा सांपडल्यामुळें किंवा नेंतें दुष्कर्म करीत असतां पाहिल्यामुळें अपराधी धरणें

निश्चितापराध ही दोन प्रकारचा. — निश्चितापराध दोन प्रकारचा

प्रतिषेधरूप आणि विधिरूप. प्रतिषेधरूप ह्मणजे मजपासून सोनें वगैरे घेऊन हा मला परत देत नाहीं. विधिरूप ह्मणजे माझ्या क्षेत्रादिकाचा अपहार करितो.

कात्यायनानेंही. निश्चितापराधाचे प्रकार असेच सांगितले आहेत.

४ अणखी त्या व्यवहाराचे अठरा भेद सांगतो.

मनु. *ऋणादान, निक्षेप, अस्वामिविक्रय, संभूयसमुत्थान, दत्ताप्रदानिक, वेतनादान, संविद्यतिक्रम, क्रीतानुशय, विक्रीयासंप्रदान, स्वामिपालविवाद, सीमाविवाद, वाक्पारुष्य, दंडपारुष्य, स्तेय, साहस, स्त्रीसंग्रहण, स्त्रीपुंधर्म, दायविभाग, द्यूतसमाह्वय, अशीं व्यवहाराचीं अठरा प्रकरणें आहेत — मुख्यत्वें १८ प्रकरणें कोणतीं

हीं (प्रकरणें) अणखीं तत्तत्साध्य भेदें करून पुष्कळ झालीं आहेत

नारद. यांचे ही अणखी मनुष्यांच्या क्रिया भेदें करून १०८

---

* हीं प्रकरणें मनुस्मृतींत सदरीं लिहिल्या अनुक्रमानेंच सांगितलीं आहेत, परंतु येथचा अनुक्रम समजण्यासाठीं त्या त्या प्रकरणावर तोतो अंक लिहिला आहे.

# प्रकरण १

## साधारण व्यवहार मातृका

भेद आहेत, ह्मणून या व्यवहाराला शतशाख असें ह्मटलें आहे.

### शाखा ५

१ ४ थ्या शाखेच्या १ ल्या अंकांत "राजाकडे फिर्याद जातो तर" असें सांगितल्यावरून फिर्याद करणें तर फिर्यादीनें स्वतांच येऊन फिर्याद करावी. राजानें किंवा राजपुरुषानें फिर्यादीला भर देऊं नये. फिर्यादीला राजानें किं वा सरकारी मनुष्यानें भर देऊं नये.

मनु. राजानें आपण होउन कांहीं कार्य उपस्थित करवूं नये. व त्याच्या पुरुषानेंही. आणि दुसऱ्यानें आणिलेली फिर्याद कधीं बुडवूं नये.

२ एका मनुष्याचा एक दोन किंवा बहूत मनुष्याशींही व्यवहार होतो. एका मनुष्याचा अनेकांशींही व्यवहार होतो.

नारद. एकाचा बहूतांवर (किंवा बहूतांचा एकावर) व स्त्रियांचा व चाकरांचा असा वाद राजानें मनास आणूं नये.

असें जें वचन. तें फिर्यादीचे विषय[1] निरनिराळे असून एक दोन फिर्याद केल्यास त्या विषयीं जाणावें

३ वादी हुजूर आला असतां राजानें पुसल्यावर त्यानें नम्रप

---

सुबोधिनी. १ विषय निरनिराळे ह्मणजे असें, याजकडे माझे शंभर रुपये येणे आहेत अशी एकानें एकावर फिर्याद केली असतां, तींतच दुसरा कांहीं अंशीं फिर्याद करितो, तिसराही करितो. तर असा वाद राजानें घेऊं नये. याप्रमाणेंच बहुतांवर एकानें एकसमयावच्छेदें करून फिर्याद केलेली ही घेऊं नये.

# प्रकरण १

## साधारण व्यवहारमातृका.

णानें आपला दावा सांगावा. नंतर फिर्याद योग्य असल्यास राजानें सरकारी शिक्का किंवा शिपाई पाठवून त्याच्या प्रतिवादीला बोलावून आणावें आणि व्याधिग्रस्तादिकांस[1] बोलावूं नये. हें अर्थसिद्धच आहे, ह्मणून सांगितलें नाहीं, परंतु स्मृत्यंतरीं तर स्पष्ट सांगितलें आहे तें असें.

राजानें कोणाकडून प्रतिवादीला बोलावून आणावें.

कात्यायन. ४ फिर्यादी न्यायसभेंत येऊन नम्रपणानें पुढें उभा राहिलेला जो त्याला पुसावें कीं, तुझें काय कार्य आहे? तुला काय पीडा झाली आहे? सांग भिऊं नको; तुला कोणी, कोठें, केव्हां, कशासाठीं, पीडा केली? याप्रमाणें पुसावें. असें पुसल्यावर तो जें बोलेल त्याविषयीं राजानें किंवा प्राड्विवाकानें सभासद व ब्राह्मण यां सहवर्तमान विचार करून फिर्याद योग्य असल्यास वादीपाशीं सरकारी खुणेचा शिक्का देऊन किंवा शिपाई पाठवून प्रतिवादीला बोलावून आणावें.

फिर्यादी हुजूर आल्यावर राजानें त्याला काय पुसावें.

कात्यायन. ५ व्याधिग्रस्त, बाल, वृद्ध, उत्पन्नसंकट, नित्यनैमित्तिककर्माचें अनुष्ठान करणारा, हुजूर आणिलें असतां पाठिमागें कांहींतरी ज्याचें मोठ्या कार्याचा नाश होईल असा जो, इष्टाच्या (मित्रादिकांच्या) वियोगानें दुःखित, राजकार्याविषयीं तत्पर, किंवा त्याचे घरीं लग्न उत्साहादिक उपस्थित झाल्यामुळें परस्वाधीन, कैफी, भूतग्रस्त, वेडा, आर्त, चाकर, यांस राजानें बोलावूं नये; आणि अनाथस्त्री[2], तरुणी, कुलीनस्त्री, बाळंतीण, ब्राह्म-

प्रतिवादी कसा असला तर बोलावण्याविषयीं अयोग्य.

---

१ पुढें ५ व्या अंकांत सांगितलेल्यास

स्मृ. बोधिनी. २ जिच्या विषयीं सर्वांस शोक होतो ती.

BOMBAY BRANCH OF THE ASIATIC SOCIETY

# प्रकरण १

## साधारण व्यवहारमातृका.

णी स्त्री, कन्या, यांसही बेलावूं नये, कारण या स्त्रिया आपा पल्या जातीच्या स्वाधीन असतात.

कात्यायन. ६ ज्या स्त्रिया कुटुंबपोषण करीत आहेत त्या, **स्वैरिणी**[१], कलावंतीण, (कसबीण) कुलहीन, **पतित**, यांस बोलावून आणावें. — कोणकोणत्या स्त्रिया हुजूर आणाव्या.

कात्यायन. ७ **राजा**नें देश, काल, जाणून व कार्याचें बलाबल पाहून **व्याधिग्रस्ता**दिकांस (५ व्या अंकात सांगितलेल्यांस)ही वाहनादिक पाठवून बोलावून आणावें. — राजानें गरज लागल्यास देशकाल जाणून रोग्यास बोलावून आणावे.

कात्यायन. ८ तसेंच फिर्यादीचें तारतम्य व कार्याचें गौरव पाहून जे अरण्यांत राहणारे **संन्यासी** (बैरागी, वानप्रस्थ.) **इत्यादिक** आहेत, त्यांसही राग नयेई अशा सत्कारानें बोलावून आणावें. — गरज लागल्यास संन्यासी वगैरे यांस बोलावून आणावें.

## शाखा ६

द्वाही देण्याची व्यवस्था अर्थसिद्ध आहे, ती नारद सांगतो.

नारद. १ वक्तव्यार्थ सांगूं लागलें असतां न ऐकतां तेथून जातो तर, आणि आपलें वचन अगदींच मानीत नाहीं तर, आपण सरकारांत सांगून सरकारचें बोलावणें पोंचे तों पर्यंत त्याला वादीनें द्वाही द्यावी. — प्रतिवादीनें ऐकेल तर त्याला द्वाही द्यावी.

---

१ स्वैरिणी चार प्रकारची. हिचें स्वरूप ३ व्या प्रकरणी ८ व्या शाखेच्या १ अंकांत सांगितलें आहे.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

हाही ह्मणजे **राजाज्ञेनें** प्रतिबंध करणें.

नारद. २ [1]**स्थान** हाही, **कालकृत** हाही, **प्रवासकृत** हाही आणि **कर्मकृत** हाही, अशा चार प्रकारच्या हाहीचें **आसिद्धानें** उल्लंघन करूं नये; कारण योग्यकाळीं हाही घातली असतां जो तिचें उल्लंघन करितो तो **दंड्य** ठरतो, पण अयोग्यकाळीं हाही देणाराही **दंड्य** ठरतो. — हाही चार प्रकारची. योग्यकाळीं हाहीचें उल्लंघन केलें असतां दंड

नारद. ३ नदी उतरून पार जात असतां, **दुर्गम** अरण्यांत किंवा **दुर्गम** देशांत जात असतां, **उपप्लव इत्यादि** संकटांत असतां, व **आश्रमांतर** घेण्या विषयीं उद्युक्त, **रोगार्त**, यज्ञ करण्या विषयीं सिद्ध, इष्टवियोगानें दुखित, एकानें ज्यावर फिर्याद केली आहे तो, सरकार काम करावयास जात असतां, आणि गुराखी गुरें राखीत असतां, शेतकरी पेरणी करीत असतां, **शिल्पी** (लोहार, सुतार **इत्यादिक**) आपापलें काम करीत असतां, हत्यारबंद लढत असतां, अशा अडचणीच्या प्रसंगीं दुसऱ्याची हाही उल्लंघन करणारा अपराधी होत नाहीं; हाही देणारा दंडास योग्य होतो. — अडचणीच्या प्रसंगीं हाही देणारा दंड्य तोडणारा निरपराधी.

४ [2]प्रतिवादी हा ९ व्या शाखेच्या ९ व्या अंकांत सांगितल्या प्रमाणें असल्यामुळें तो स्वतां न येतां पुत्र पिता मित्र **इत्यादिकांस** — प्रतिवादी हा हुजूर येण्याविषयीं अयोग्य आहे तर त्यानें कोणाला पाठवावें.

---

सुबोधिनी. १ स्थान हाही ह्मणजे या ठिकाणावरून तूं जाऊं नको.
कालकृत हाही ह्मणजे सायंकाळ पर्यंत जाऊं नको.
प्रवासकृत हाही ह्मणजे तूं गांवास जाऊं नको.
कर्मकृत हाही ह्मणजे अमुक काम करूं नको.

---

२ प्रसंग विशेषीं जामीन साक्षी वगैरे विषयीं ही या प्रमाणें जाणावें.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

पाठवितो तर ते **परार्थवादी** होत नाहींत.

नारद. जो भाउ नव्हे, पिता नव्हे, पुत्र नव्हे, अथवा **आज्ञांकित** ही नव्हे, असा तिऱ्हाईत जर वाद सांगेल तर तो **परार्थवादी**, सब ब **दंड्य** व **व्यवहारां**त विरुद्ध बोलणारा ही **दंड्य** होतो.

## शाखा ७

प्रतिवादीला सरकारी शिक्का, आज्ञापत्र, शिपाई, यांतून कोणी एकाकडून हुजूर आणि त्यानंतर काय करावें तें सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य. वादीनें जसा वाका निवेदिला तसा प्रतिवादीच्या समक्ष लिहावा, आणि तो लेख वर्ष, मास, पक्ष, दिवस, नाव, जात, **इत्यादिकां**नीं युक्त असावा.

### टीका

१ प्रतिवादी **न्यायसभें**त हजर झाल्यावर त्याच्या समक्ष वादीनें जसा पूर्वी[१] वाका सांगितला असेल तसाच लिहून घ्यावा, कमज्यास्ती सांगेल तर घेऊं नये. कारण पहिल्यापेक्षां विपरीत सांगतो तर तो वादांत लबाड ठरला असें समजावें. (जबानी लिहून घेण्याचा प्रकार.)

स्मृति. सांगतो एक प्रकार आणि तद्विरुद्ध लिहून देतो. **प्रमाण** (प्रतिवादीच्या लबाडीचे प्रकार.)

---

१ वहिवाटींत जी जबानी लिहून घेतात ती आणि हा प्रकार एकच

# प्रकरण.

## साधारणव्यवहारमातृका

दाखवितच नाहीं, दाखविलें असतां विसंगत दाखवितो, ऐका ठिकाणी राहात नाहीं; विचारिलें असतां उत्तर देत नाहीं; बोलाविलें असतां पळतो; असा पांच प्रकारचा वादींत लबाड समजावा.

२ आणि ती जबानी (**भाषा**) वर्ष, मास, पक्ष, (शुक्ल आणि कृष्ण) वार, तिथि, वादिप्रतिवादींचीं नावें, ब्राह्मणादि जाति, **इत्यादिकें** करून युक्त असावी. जबानींत कायकाय लिहिलें पाहिजे.

मूळांतील **इत्यादिक** शब्दें करून द्रव्य, त्याच्या संख्या, ठिकाण, क्षमा, वेळा, वगैरे घ्यावी.

स्मृत्यंतर. प्रयोजना सहित, धर्माशीं संयुक्त, व परिपूर्ण, आणि ज्याचा अर्थ स्पष्ट, व अन्वय संगत वार, आणि ज्या विषयीं फिर्याद आहे, तो अर्थ त्यांत असावा, व **वाचकशब्दघटित** आणि **प्रकृतार्थोपयोगी** आणि प्रसिद्ध शब्द घटित व निश्चित व अविरुद्ध व स्वार्थ साधना विषयीं समर्थ, आणि संक्षिप्त असून सकलार्थघटित व देशकाल (आचार) यांशीं अविरुद्ध आणि वर्ष ऋतु, (वसंतादिक) मास, पक्ष, तिथि, वार, वेळ, देश, प्रदेश, ठिकाण, घर, **विवादास्पदीभूत** जें द्रव्य त्याचें नाव, परिमाण संख्या, आपले वादी प्रतिवादीचें नाव, जात, आकृति, वय, आणि उभयतांच्या पित्याचीं नावें, व अनेक राजाचीं नावें, आणि (अन्यायाचे) क्षमेच्या खुणा, आपली पीडा, आणि हरण करणारा व देणारा **इत्यादिकां**चा निवेश, असें जें राजाला लेखनद्वारा निवेदन केलें जातें त्याला जबानी (**भाषा**)

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

असें ह्मटलें आहे **भाषा**,[1] **प्रतिज्ञा**, **पक्ष**, हे (जबानीचे) पर्यायवाचक शब्द जाणावे.

३ फिर्याद करितेवेळेस (४थ्या शाखेच्या १ल्या अंकांत) वादीचानुस्ता वाका मात्र लिहून घ्यावा, आणि प्रतिवादीच्या समक्ष संवत्सर, महिना, वगैरे तपशीलवार लिहून घ्यावें इतका विशेष.

४ (अर्जीमध्यें) वर्षाचा निवेश जरी सर्व **व्यवहारां**त उपयोग पडत नाहीं, तरी गहाण, **प्रतिग्रह**, **क्रय**, या **व्यवहारीं** निर्णयार्थ उपयोग पडतो. कारण, — लेखांत वर्षाचा निवेश कोणत्या व्यवहारीं अवश्य पाहिजे.

याज्ञवल्क्य. गहाण **प्रतिग्रह** आणि **क्रय** या **व्यवहारीं** प्रथम झालेला **व्यवहार** मुस्तकीम **प्रमाण** होतो.

५ **ऋणादान** प्रकरणीं ही संवत्सर लिहिण्याचा उपयोग पडतो. तो असा कीं, सावकारापासून कुळानें एका वर्षांत अमुक संख्या द्रव्य (रुपये मोहरा वगैरे) घेऊन त्याच वर्षी परत दिल्हें. पुनः दुसरे वर्षी कुळानें त्याच सावकारापासून तितक्या संख्येचें च व तेंच[2] (रुपये मोहरा वगैरे) द्रव्य घेतलें. नंतर सावकार मागूं लागला असतां कूळ बोलेल, कीं घेतलें होतें खरें, प — देण्याघेण्याच्याबाबी संवत्सर लिहिण्याचा उपयोग पडतो.

---

१ भाषा, प्रतिज्ञा, पक्ष, ह्मणजे वहिवाटींत जी वादिची जबानी घेतात, तिचे हे संस्कृतांत पर्याय वाचक शब्द आहेत.

---

२ तेंच ह्मणजे प्रथमतः जर रुपये घेतले असले तर दुसऱ्यानें ही रुपयेच.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

रंतु परत दिल्हें. तेव्हां सावकार त्याला कुंठित करील, कीं घेतलेलें परत दिल्हें खरें, परंतु तो गतवर्षींचा **व्यवहार**. या वर्षांत घेतलें तें दे.

या प्रमाणेंच महिना, तिथी, वगैरे चाही उपयोग पडतो तो यथा संभव योजावा.

६ देश, ठिकाण, वगैरे यांचा उपयोग तर प्रायः **स्थावरव्यवहारीं**च पडतो. स्थावरव्यवहारी देशठिकाण वगैरे लिहिण्याचा विशेष उपयोग पडतो.

स्मृत्यंतर. **देश**, तसेंच **स्थान**, **सन्निवेश**, **जाति**, **संज्ञा**, **अधिवास**, **प्रमाण**, **क्षेत्रनाम**, बाप आजा यांचीं नावें, पूर्वीच्या **राजाचें** वर्णन, अशीं हीं दाहा स्थावर **व्यवहारीं** लिहावीं.

**देश** ह्मणजे **मध्यदेश** (कोंकण) **इत्यादिक**.

**स्थान** ह्मणजे काशी (नाशीक) **इत्यादिक**.+१

**सन्निवेश** ह्मणजे पूर्वेस किंवा उत्तरेस अमुकाचें घर क्षेत्र **इत्यादिक**.

**जाति** ब्राह्मण क्षत्रिय **इत्यादिक**.

**संज्ञा** ह्मणजे वादि प्रतिवादींचीं नावें व त्यांच्या बापाचें व आजाचें नाव.

**अधिवास** ह्मणजे शेजारीं राहणारे जन.

**प्रमाण** ह्मणजे घर **क्षेत्र इत्यादिकांचें** परिमाण **निवर्तनादिक**.*२

---

+ १ इत्यादिक ह्मणजे प्रांत परगणा जिल्हा तालुका सुभा वगैरे यथा संभव घ्यावे. ह्मणजे असें प्रांत कोंकण, परगणे शिराळ. जिल्हा पुणें, सुभा नगर, तालुका सुवर्णदुर्ग वगैरे.

---

* २ निवर्तन ह्मणजे दाहा हाताचा एक दंड असे तीस दंड ह्मणजे एक निवर्तन आदिशब्देंकरून कोश योजन वगैरे घ्यावें

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

क्षेत्राचें नाव, बागाईत किंवा जिराईत, काळी किंवा पांढर,
पूर्वेच्या तिहीं राजाचें वर्णन.
या दाहा प्रकारांचा **निवेश**[1] स्थावर **व्यवहारीं** करावा.

सारांश वर्ष, मास, **इत्यादिकांचा** ज्या ज्या **व्यवहारीं** जितका उपयोग पडेल तितकें तेथें लिहावें.

## शाखा ८

पक्षाभास ह्मणजे काय

याप्रमाणें **पक्षाचें** (जबानीचें) स्वरूप सांगितलें. या **पक्षाच्या** स्वरूपाहून निराळे असून **पक्षा**सारिखे भासतात, ते **पक्षाभास** समजावे हें अर्थसिद्धच आहे. ह्मणून योगीश्वरानें पार्थक्यें करून सांगितलें नाहीं, परंतु दुसऱ्या ग्रंथकर्त्यांनीं तर स्पष्ट सांगितलें आहे. तें असें,

पक्षाभास कोणते

स्मृत्यंतर १ **अप्रसिद्ध, निराबाध, निरर्थ, निष्प्रयोजन, असाध्य**, किंवा **विरुद्ध**, अशा प्रकारचा **पक्षाभास** असेल तो टाकावा.

**अप्रसिद्ध**, यानें माझें सशाचें[2] शिंग घेतलें आहे

---

१ निवेश करण्याच्या रीतीचें दिक्प्रदर्शन, मी अमुकाचा पुत्र, व अमुकाचा नातू, माझें नाव, वय, जात, अमुक व अमुक ठिकाणचा राहणारा, अमुक प्रांतांत अमुक गांवीं अमुकाच्या क्षेत्राच्या किंवा गृहाच्या उत्तरेस किंवा पूर्वेस, माझी काळी किंवा पांढर अमुक विघे लांबी रुंदीचें क्षेत्र किंवा घर आहे, तें अमुकवंशीय राजानें अमुक सालीं दिलें आहे, किंवा खरेदी केलें आहे. त्याजवर प्रतिवादी हा अमुकाचा पुत्र अमुक माव करी सत्ता करितो.

---

२ सशाच्या शिंगाचा मुळींच असंभव, ह्मणून त्या विषयाची फिर्याद अप्रसिद्ध.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

नें हा देत नाहीं.

**निराबाध**——माझ्या घरांतील दिव्याच्या उजेडानें हा आपल्या घरांत काम धंदा करितो.

**निरर्थ**——ज्यामध्यें कांहींच अर्थ नाहीं असा वायकळ शब्द प्रयोग.

**निष्प्रयोजन**——हा मनुष्य माझ्या घराजवळ सुस्वर अध्ययन करितो. (किंवा गातो.)

**असाध्य**——यानें कपाळास आंठी घालून माझा उपहास केला. या वादानें साधन होणार नाहीं ह्मणून असाध्य. फारच थोड्या वेळांतला **व्यवहार** सबब साक्षी संभवत नाहीं. लिहिणें तर दुरापास्तच. अल्पत्वामुळें **दिव्य प्रमाण** ही संभवत नाहीं.

**विरुद्ध**——मुक्यानें मला शिव्या दिल्या किंवा जो शहराशी व **राष्ट्रा**शीं विरुद्ध वादतो.

स्मृति. २ जो विवाद **राजा**नें टाकिला, किंवा जो पौरजनांशीं विरोध करणारा, **अथवा** जो **सर्व राष्ट्रा**शीं विरुद्ध, प्रजेशीं विरुद्ध, व अणखी ही शहरें, गांव, **महाजन**[१], यांशीं विरुद्ध असतील ते सर्व वाद **राजा**नें घेऊं नयेत. राजानें टाकलेला वशिष्टांशीं विरुद्ध असा वाद मनास आणूं नये.

३ अनेक प्रकरणांनीं (**ऋणादान, ठेव, साहस, इत्यादिकांनीं**) **संकीर्ण** अशी फिर्याद केली असतां

---

१ महाजन ह्मणजे शिष्ट, राजमान्य, संभावित लोक ते.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

सिद्ध होत नाहीं. असें जें सांगितलें त्यापेक्षां अनेक वस्तूंनीं (सोनें रुपेयांनीं) **संकीर्ण** अशी फिर्याद केली तर सिद्ध होती, असें ह्मणावें ह्मणजे दोष नाहीं. ह्मणजे असें, माझें यानें सोनें, कापड, रुपये **इत्यादिक** अपहारिलें; अशा प्रकारची फिर्याद निर्दोष आहे.

४ **ऋणादानादिकप्रकरणांनी** (कर्ज, ठेव, **साहस**, **इत्यादिकांनी**) **संकीर्ण** अशा फिर्यादीस **पक्षाभास** जर ह्मणावें तर तेंही ह्मणतां येत नाहीं. कारण जसें माझे रुपये यानें व्याजीं घेतले आहेत; आणि याजपाशीं मी सोनें ठेविलें आहे; आणि हा माझें **क्षेत्र** जबरीनें घेतो, **इत्यादिकव्यवहार** ग्राह्य खरे, परंतु त्या त्या **क्रियाभेदा** मुळें अनुक्रमानें ग्राह्य आहेत. एक समयावच्छेदें करून ग्राह्य होत नाहींत.

कात्यायन. ज्यामध्यें बहुत फिर्यादी आहेत असा जो वाद तो जर निर्णय योग्य आहे तर **राजा**नें तत्वार्थ समजून निर्णय होण्या साठीं घ्यावा.

तस्मात् अनेक **प्रकरणांनी संकीर्ण** असा वाद एकदांच घेत लाजात नाहीं. असा त्याचा (३ऱ्या अंकाचा) अर्थ[१].

५ वादी शब्देंकरून जो वादीचा पुत्र, पिता, **इत्यादिक** असेल तो वादीच्याच ठिकाणीं समजावा. तसाच **नियुक्त** (वकील) ही आहेंसु

Y वादी शब्दें करून जो वादीच्या नर्फेंना असेल ते ही वादीच्या ठिकाणीं समजावा.

---

१ अर्थ ह्मणजे एका प्रकरणाची (ऋणादानाची) फिर्याद केल्यावर तिचा निर्णय झाल्यावर ठेवी विषयीं फिर्याद, तो फेसला झाल्यावर चोरी बद्दल फिर्याद अशा अनुक्रमानें करावी. एकदांच तिन्ही चारी विषयांची फिर्याद करूं नये.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

कें वादीच्या ठिकाणींच समजावा. कारण ते **एकार्थवादी** च आहेत

स्मृत्यंतरही असेंच आहे कीं वादीनें **नियुक्त** केलेला किंवा प्रतिवादीनें पाठविलेला असा जो कोणी ज्याच्या अर्थाविषयीं वाद सांगतो त्याचा जो जय किंवा पराजय तो मुख्याचा. वकील वगैरे वादांतजय किंवा पराजय पावले असतां तो मुख्याकडे.

या स्मृतीवरून **नियुक्तास** जे जय, पराजय, ते त्याच्या मुख्याचे असें समजावें.

## शाखा ९

१ नंतर ही जबानी (७ व्या शाखेचा १ला, २ अंक) भूमीवर किंवा फळीवर खडूनें लिहावी, आणि कमजास्ती करण्यानें शुद्ध करून नंतर कागदावर लिहावी. जबानीचा मसूदा कशावर लिहावा तो प्रकार.

कात्यायन. **प्राड्विवाका** नें वादीची जबानी खडूनें फळीवर लिहविलेली शुद्ध करवून नंतर कागदावर लिहवावी.

२ शुद्ध करणेंही प्रतिवादीकडून **उत्तर** होण्यापूर्वी झालें पाहिजे, **उत्तर** दिल्यावर होणार नाहीं. कारण अशानें **अनवस्था** होईल. जबानी शुद्ध करण्याचा अवधि.

नारद. जो पर्यंत प्रतिवादीनें **उत्तर** झालें नाहीं तोंपर्यंत वादीची जबानी शुद्ध करावी. प्रतिवादीच्या **उत्तरा** नें कुंठित केल्यावर शुद्ध करण्याची निवृत्ति झाली.

३ जर वादीची जबानी शुद्ध केल्यापूर्वीच **सभासद** प्रतिवादीकडून **उत्तर** देवविताल तर **राजा** नें ३ ऱ्या शाखेच्या ४ थ्या अंकांत सांगितल्याप्रमाणें **सभासदां** स दंड करून पुनः पहिल्यापासून **व्यवहार** चालवावा. जबानी शुद्ध केल्यापूर्वी सभासद उत्तर देवविती ल तर दंड.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

### शाखा १०

याप्रमाणें वादीची जबानी शुद्ध करून कागदा
वर लिहिल्यानंतर पुढें काय करावें तें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. वादीचा वाका ज्यानें ऐकिला अशा प्रतिवादीनें **उत्तर** वादीच्या समक्ष लिहावें. प्रतिवादीकडीलउत्तर.

टीका.

१ अर्जाचा (किंवा जबानीचा) अर्थ ज्यानें ऐकिला अशा प्रतिवादीनें **उत्तर** फिर्यादीचे समक्ष लिहावें. तें **उत्तर** जेणेंकरून वादीच्या वादाचें निराकरण होई असें असलें पाहिजे. प्रतिवादीकडीलउत्तर कसेंअसलेंपाहिजे.

नारद जेणेंकरून वादाचें निराकरण होई असें, व न्यायसंमत, संदेहरहित, अविरुद्ध, प्रसिद्धपदवाक्यघटित, आणि **दुर्बोध-विभक्तिसमास**रहित, आणि तत्तद्देशभाषेंकरून सुबोध, असें जें **उत्तर** तें योग्य **उत्तर**.

तें **उत्तर** चार प्रकारचें.

२ **सत्योत्तर, मिथ्योत्तर, कारणोत्तर, प्राङ्न्यायोत्तर.** उत्तराचेप्रकार

कात्यायनानें ही **उत्तरा**चे प्रकार असेच सांगितले आहेत.

३ **सत्योत्तर**—याजकडे माझे शंभर रुपये आहेत अशी फिर्याद केली असतां, मजकडे आहेत खरे असें कबूल होणें. सत्योत्तर

स्मृति. वादीच्या अर्थाविषयीं कबूल होणें याला **सत्योत्तर** ह्मटलें आहे.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

४ **मिथ्योत्तर**—— मी जाणत नाहीं. मिथ्योत्तर.

कात्यायन. जर वादीच्या फिर्यादीचा प्रतिवादी **अपन्हव** करितो तर तें **व्यवहारांत मिथ्योत्तर** असें समजावें.

तें **मिथ्योत्तर** चार प्रकारचें आहे.

कात्यायन. याची फिर्याद खोटी आहे, [२] मला कांहींच ठाऊक नाहीं, [३] त्या वेळेस तेथें मी सन्निध नव्हतों; [४] त्या वेळेस मी जन्मलोंही नव्हतों.

५ **कारणोत्तर**[*१]—— मी याचें सोनें घेतलें होतें खरें परंतु परत दिल्हें किंवा यानें मला **दान** दिल्हें. कारणोत्तर.

नारद. वादीनें जो विषय लिहून दिल्हा असेल त्याला प्रतिवादी कबूल करून कारण सांगतो, तर तें **कारणोत्तर** ह्मटलें आहे.

६ **प्राङ्न्यायोत्तर**[*२]—— ज्या **व्यवहारीं** प्रतिवादी बोलेल, कीं या वादाविषयीं पूर्वीं यानें मजवर फिर्याद केली होती त्या वेळेस मी याला यथान्याय जिंकिलें आहे. प्राङ्न्यायोत्तर.

कात्यायन. यथान्याय **पराजय** केला असतां जर पुनः फिर्याद

---

*१ हें कारणोत्तर एकटें राहात नाहीं, सत्योत्तरासहित किंवा मिथ्योत्तरासहित, ह्मणजे असें, वादीची फिर्याद कबूल करून योग्य कारणानें रद्द करणें किंवा मिथ्योत्तर सांगून तत्समर्थनार्थ कारण सांगणें.

---

*२ प्राङ्न्यायोत्तर मिथ्योत्तरास घेऊन असतें, एकटें राहत नाहीं.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

करितो तर या वादांत हा पूर्वीं मी पराजित केला आहे असें उत्तर दिल्हें जातें तें **प्राङ्न्यायोत्तर** ह्मटलें आहे.

### शाखा ११

उत्तराभासांचें लक्षण

या प्रमाणें **उत्तराचें** लक्षण सांगितलें याहून निराळे असून जे **उत्तरा** सारिखे भासतात ते **उत्तराभास** अर्थसिद्धच आहेत, परंतु स्मृत्यंतरीं स्पष्ट करून दाखविले आहेत ते असे.

उत्तराभासांचें स्वरूप.

स्मृत्यंतर. **संदिग्ध, अप्रकृत, अत्यल्प, अतिभूरि, पक्षैकदेशव्यापि, व्यस्तप्रकरण, अव्यापि, निगूढार्थ, पूर्वापरविरुद्ध, व्याख्यागम्य, असार,** असें **उत्तर** असल्यास तें स्वार्थाविषयीं साधक होत नाहीं.

१ **संदिग्ध**—— यानें माझें [1]**सुवर्णशत** घेतलें अशी फिर्याद केली असतां **उत्तर** करितो कीं खरें. **सुवर्णशत** किंवा [2]**माषशत** घेतलें असेल.

---

१ उन्हाच्या कवडशामध्यें जें रज दृग्गोचर होतें त्याचें नाव त्रसरेणु, ते आठ त्रसरेणु ह्मणजे एक लिक्षा, तीन लिक्षा ह्मणजे एक राजसर्षप, तीन राजसर्षप ह्मणजे एक गौरसर्षप, ते साहा ह्मणजे एक मध्यमयव, तीन यव ह्मणजे एक कृष्णल, पांच कृष्णल ह्मणजे एक माष, असे सोळा माष ह्मणजे एक सुवर्ण परिमाण.

२ येथें माष ह्मणजे वर सांगितलेल्या सुवर्णाचा सोळावा भाग.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

२ **अप्रकृत**— **सुवर्णशता**ची फिर्याद केली असतां **उत्तर**, शंभर **पण** घेतले आहेत.

३ **अत्यल्प**— शंभर **सुवर्णां**ची फिर्याद केली असतां **उत्तर**, मला याचें पांच **सुवर्ण** देणें आहे.

४ **अतिभूरि**— शंभर **सुवर्णां**ची फिर्याद केली असतां **उत्तर** दोनशें लागतों आहें.

५ **पक्षैकदेशव्यापि**[1]— याजकडे माझें सोनें व कापड येणें आहे, अशी फिर्याद केली असतां **उत्तर**, रुपये मात्र घेतले, कापड घेतलें नाहीं.

६ **व्यस्तप्रकरण**[2]— यानें माझें शंभर रुपये देणें आहे अशी कर्जाची फिर्याद केली असतां **उत्तर**, यानें मला मारिलें.

७ **अव्यापि**— मध्यदेशांत काशी (अमुक) क्षेत्रीं पूर्व दिशेस माझें **क्षेत्र** आहे तें यानें जबरीनें घेतलें आहे. अशी फिर्याद केली असतां **उत्तर**, **क्षेत्र** अपहारिलें खरें.

८ **निगूढार्थ**— यानें माझें **सुवर्णशत** घेतलें अशी फिर्याद केली असतां **उत्तर**, काय? मी एकट्यानें

---

१ पक्ष ह्मणजे फिर्याद तिचा जो एकदेश ह्मणजे एक अंश त्याचें व्यापि ह्मणजे अनुकूल ह्मणजे अर्थ इतका कीं सगळ्या फिर्यादींतल्या एका रकमे विषयीं मात्र कबूल होणें.

२ व्यस्तप्रकरण एका प्रकरणाची फिर्याद केली असतां दुसऱ्या प्रकरणानें उत्तर देणें.

## प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

च घेतलें आहे? ह्मणजे येणेंकरून **प्राड्विवाक, सभ्य** किंवा वादी किंवा अणखी कोणी यानीं घेतलें असावें असा ही अर्थ होतो.

९ **पूर्वापरविरुद्ध**—— सोनें घेतल्याची फिर्याद केली असतां **उत्तर**, घेतलें खरें परंतु आतां मी त्याचें लागत नाहीं.

१० **व्याख्यागम्य**——**दुर्बोध** अशा **विभक्ति** व **समास** यांकडून युक्त व **अध्याहार** सापेक्ष किंवा अन्यदेशभाषेनें दिलेलें.

११ **न्यायविरुद्ध**—— यानें माझें **सुवर्णशत** व्याजीं घेतलें. पैकीं व्याजमात्र दिल्हें मुदल दिल्हें नाहीं. अशी फिर्याद केली असतां **उत्तर**, खरें व्याज दिल्हें, मुदल घेतलेंच नाहीं.

## शाखा १२

१ **उत्तर** असा (१० व्याशाखेच्या १ल्या अंकांत) असा एक वचनांत निर्देश केल्यावरूनच अनेक **उत्तरांचा संकर** नसावा असें सिद्ध झालें.

कात्यायन. फिर्यादीच्या एकदेशीं **सत्योत्तर** व एकदेशीं **कारणोत्तर**, आणि एकदेशीं **मिथ्योत्तर**, असें असल्यास तें **संकरामुळें अनुत्तर** जाणावें. उत्तराचे संकर.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

**अनुत्तर** होण्याचें कारणही तोच सांगतो.

कात्यायन. एका वादांत दोहों वादींचा **प्रमाणनिर्देश** संभवत नाहीं, व एका वादांत उभयतांची ( वादिप्रतिवादींची ) अर्थसिद्धि होत नाहीं. आणि एकाकडून दोन **क्रिया** नसाव्या.

एकाच वादांतसदरहू पक्षकारयांचा प्रमाण निर्देश संभवत नाहीं.

२ **मिथ्योत्तर, कारणोत्तर** यांच्या **संकर**स्थळीं वादिप्रतिवादी या दोघांसही पुरावा दाखविला पाहिजे कारण.

नारद. प्रतिवादीनें **मिथ्योत्तर** दिल्हें असतां **प्रमाण** (साक्षिलेखादि) दाखविणें वादीचें काम आहे. आणि **कारणोत्तर** दिल्हें असतां तें शाबीत करणें प्रतिवादीचेंच काम आहे.

यास्तव एका **व्यवहारांत** वादिप्रतिवादींचा **प्रमाणोपन्यास** प्राप्त होईल, परंतु तो विरुद्ध आहे जसें—— यानें माझे शंभर रुपये आणि **सुवर्णशत** घेतलें आहे, अशी फिर्याद केली असतां **उत्तर**, (हें खोटें) सोनें घेतलेंच नाहीं (असें प्रतिवादीने **मिथ्योत्तर** दिल्यावर सोनें घेतलें या विषयीं **प्रमाण** दाखविणें हें वादीचें काम आहे) आणि रुपये घेतले होते, पण परत दिल्हे (अशा **कारणोत्तरा**विषयीं **प्रमाण** दाखविणें हें प्रतिवादीचेंच काम आहे. ह्मणून एका वादांत वादिप्रतिवादी या दोघांचा **प्रमाणनिर्देश** विरुद्ध आहे.)

३ **कारणोत्तर, प्राङ्न्यायोत्तर** यांच्या **संकर**स्थळीं दोन्हीं **उत्तरां**चा पुरावा प्रतिवादीनेंच दाखविला पाहिजे कारण.

व्यास. **प्राङ्न्यायोत्तर, कारणोत्तर** या स्थळीं प्रतिवादीनें **क्रिया** दाखवावी.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

जसें, यानें माझें **सुवर्णशत** व शंभर रुपये घेतले आहेत, अशी फिर्याद केली असतां प्रतिवादीनें **कारणोत्तर, सुवर्णशत** घेतलें होतें खरें पण परत दिल्हें. हें त्यानें साक्षी व पावती **इत्यादिकें** करून शाबीत करावें. **प्राङ्न्यायोत्तर,** रुपयाविषयीं तर याला पूर्वीच वादांत म्या जिंकिलें आहे. असें जयपत्र (निवाडपत्र) किंवा तो वाद पाहणार **सभासद इत्यादिकें** करून शाबीत करावें. असा दोहों **उत्तरां**चा विरोध समजावा.

४ जेथें तीन **उत्तरांचा संकर** असेल तेथें ही याप्रमाणेंच समजावें. जसें;— यानें माझें **सुवर्णशत** व रुपये शंभर आणि कापड घेतलें आहे, अशी फिर्याद केली असतां **उत्तर, सुवर्णशत** घेतलें आहे खरें पण परत दिल्हें. (हें **कारणोत्तर**) रुपये घेतले नाहींत. (हें **मिथ्योत्तर**) कापडाविषयीं तर पूर्वींच यानें मजवर फिर्याद केली होती त्या वेळेसच याला मी जिंकिलें आहे. (हें **प्राङ्न्यायोत्तर**) तीन उत्तरांचा संकर.

५ याप्रमाणें चोहों **उत्तरांच्या (सत्योत्तर, मिथ्योत्तर, कारणोत्तर,** आणि **प्राङ्न्यायोत्तर** यांच्या) संकराविषयींही जाणावें. परंतु अशा प्रकाराचीं **संकरोत्तरें** एकसमयावछेदें करून घडलीं तर तीं **अनुत्तरें** जाणावीं. कारण प्रत्येक **व्यवहाराची** सिद्धि त्यात्या **प्रमाणा**च्या स्वाधीन आहे. चार उत्तरांचा संकर

६ अनुक्रमानें **उत्तरें** दिल्यास तींही उत्तरें होतात. परंतु तो अनुक्रम तर वादिप्रतिवादी व **सभासद** यांच्या इच्छेप्रमाणें घ्यावा.

# प्रकरण ३

## साधारण व्यवहार मातृका.

दोहोंउत्तरांचा संकर असल्यास ज्यांत बहुत विषय आहे त्याचा प्रथम निर्णय करावा.

७ ज्या स्थळीं दोहों **उत्तरांचा संकर** आहे त्यांत जें **प्रभूतार्थविषय उत्तर** असेल त्याचें **प्रमाण** घेऊन तो **व्यवहार** अगोदर पुरा करावा नंतर **अल्पविषयउत्तराचा व्यवहार** चालवावा.

८ जेथें **सत्योत्तराचा** दुसऱ्या **उत्तरांशीं संकर** आहे तेथें दुसऱ्या **उत्तरावरून** चौकशी पाहावी. कारण, **सत्योत्तर**स्थळीं पुरावा देण्याची गरज नाहीं.

हारीत. ९ "**मिथ्योत्तर, कारणोत्तर**, आणि **सत्योत्तर**, किंवा दुसरें **उत्तर** अशीं एका **व्यवहारांत** असतील तर प्रथमतः कोणतें **उत्तर** घेऊन **व्यवहार** पाहवा" अशी आकांक्षा घेऊन तिचें निवारणही सांगतो." जें (**उत्तर**) **प्रभूतार्थविषय** असेल किंवा ज्यांत पुरावा सफल असेल तेंच त्या वादांत **असंकीर्णउत्तर** जाणावें. नाहींतर **संकीर्णउत्तर**[१]" ह्मणून **संकीर्णउत्तरस्थळीं व्यवहार**निर्णया विषयीं इच्छेप्रमाणें अनुक्रम घ्यावा असें तात्पर्य.

१० **प्रभूतार्थविषय** ह्मणजे असें, यानें सोनें, शंभर रुपये, आणि कापड, असें माझें देणें आहे; अशी फिर्याद केली असतां **मिथ्योत्तर**: सोनें व रुपये घेतलेच नाहींत. **कारणोत्तर**, कापड घेतलें होतें तें परत दिल्हें. या **उत्तरामध्यें मिथ्योत्तर प्रभूतार्थविषय**

---

१ संकीर्णउत्तर ह्मणजे ज्याउत्तरांत विषयाचें न्यूनाधिक्य नाहीं. व ज्यांत पुरावा संदिग्ध आहे तें तेथें इच्छेप्रमाणें अनुक्रम ह्मणजे वादिप्रतिवादी सभासद यांच्या इच्छेनें ठरेल तो अनुक्रम

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

आहे. ह्मणून वादीकडील पुरावा घेऊन प्रथमतः चौकशी चालवावी. नंतर कापडाविषयींचा (**कारणोत्तराविषयीं**) **व्यवहार** चालवावा. याप्रमाणें **मिथ्योत्तर, प्राङ्न्यायोत्तर** यांच्या **संकर**स्थळीं आणि **कारणोत्तर, प्राङ्न्यायोत्तर** यांच्या **संकर**स्थळीं ही योजना करावी.

११ त्याच (१० व्या अंकांत सांगितलेल्या) फिर्यादींत, सोनें आणि रुपये घेतले खरे, देईन. (हें **सत्योत्तर**) कापड घेतलेंच नाहीं, (हें **मिथ्योत्तर**) अथवा परत दिल्हें. (हें **कारणोत्तर**) किंवा कापडाच्या वादाविषयीं याला मी पूर्वींच जिंकिलें आहे. (हें **प्राङ्न्यायोत्तर**) अशा प्रकारच्या **उत्तरसंकर**स्थळीं **सत्योत्तर** जरी **प्रभूतार्थविषय** आहे, तरी त्याला **प्रमाणा**ची गरज नाहीं, ह्मणून **मिथ्योत्तरादिकां**चा पुरावा (साक्षिलेख्यादि) घेऊन चौकशी करावी.

१२ ज्या **व्यवहारीं मिथ्योत्तर, कारणोत्तर** हीं **प्रतिज्ञे**ला सर्वांशीं कुंठित करावयाजोगीं आहेत. ह्मणजे असें, गाईचें शिंग धरून कोणी एक ह्मणतो ही गाय माझी, अमुक वेळेस नाहींशी झाली होती, ती आतां याच्या घरीं पाहिली. प्रतिवादी ह्मणतो ही गोष्ट खोटी. (हें **मिथ्योत्तर** व याचें साधक **कारणोत्तर** की) यानें दाखविल्या वेळेच्या पूर्वींच माझ्या घरीं होती किंवा माझ्या घरींच ही जन्मली. अशा स्थळीं हें **उत्तर प्रतिज्ञे**चें निराकरण करण्याविषयीं समर्थ आहे. ह्मणून याला **अनुत्तर** ह्मणतां येत नाहीं. **मिथ्योत्तर** ही ह्मणतां येत नाहीं. कारण (**मिथ्योत्तरस्थळीं प्रमाणनिर्देश** वादीकडून झाला पाहि

सकारणमिथ्योत्तराविषयीं उदाहरण.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

जे.) एथें तर **क्रियोपन्यास** प्रतिवादीनें केला आहे. **कारणोत्तर** ही ह्मणतां येत नाहीं. कां, **कारणोत्तर**स्थळीं प्रथमतः **सत्योत्तर** असलें पाहिजे, तसें येथें नाहीं. यास्तव अशा **उत्तरास सकारण मिथ्योत्तर** ह्मणावें. कारण, येथें **मिथ्योत्तरा**चें प्रतिपादन करण्याविषयीं प्रतिवादीकडूनच **क्रियोपन्यास** आहे. कारण, "**कारणोत्तर**स्थळीं प्रतिवादीकडून **प्रमाण निर्देश** असावा." असें (नारद) वचन आहे. ह्मणून,

१३ शंका— "मिथ्योत्तरस्थळीं वादीनें पुरावा दाखवावा" या वचनावरून (१२ व्या अंकांत) वादीचा **प्रमाण निर्देश** कां होत नाहीं ह्मणाल तर हें (१२ व्या अंकांतलें) जें **मिथ्योत्तर** तें **शुद्ध मिथ्योत्तर** नव्हे. तसेंच "**कारणोत्तर**स्थळीं प्रतिवादीनें प्रमाण दाखवावें" हेंही शुद्ध **कारणोत्तर** कां होत नाहीं बरें?

१४ समाधान— तुमची शंका नीट नाहीं. कारण, कोणतें ही **कारणोत्तर मिथ्योत्तरा**वांचून राहत नाहीं. ह्मणून शुद्ध कारणोत्तराचा अगदीं अभाव आहे. जें प्रसिद्ध **कारणोत्तर** पूर्वी (१० व्या शाखेच्या ५ व्या अंकांत) सांगितलें तेथें ही वादीच्या फिर्यादीचा एकदेशीं **सत्योत्तरानें** स्वीकार केल्यानेंच अर्ध्या **पक्षाला मिथ्योत्तरत्व** येतें. ह्मणजे असें, खरें शंभर रुपये घेतले. (हें **सत्योत्तर**) परंतु आतां देणें नाहींत (हें **मिथ्योत्तर**) कारण, परत दिल्हे (हें **कारणोत्तर**)

१५ प्रकृत उदाहरणीं (१२ व्या अंकांतील गाईच्या वादाविषयीं) फिर्यादीच्या एकदेशाचा स्वीकार नाहीं इतका विशेष.

हारीतानें ही. हेंच स्पष्ट करून सांगितलें आहे कीं, **मिथ्योत्तर** व **कारणोत्तर** यांच्या **संकर**स्थळीं **कारणोत्तर** घेऊन वाद चालू करावा. ज्यास्थळीं

## प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

**मिथ्योत्तर**, **प्राङ्न्यायोत्तर** हीं फिर्यादीच्या सर्वांशीं व्यापक आहेत. जसें, हा माझे शंभर रुपये लागतो अशी फिर्याद केली असतां (**उत्तर**) ही गोष्ट खोटी आहे. (हें **मिथ्योत्तर**) याचें साधक **प्राङ्न्यायोत्तर**, या वादांत पूर्वींच म्या याला जिंकिलें आहे, अशास्थळींही प्रतिवादीकडूनच पुरावा झाला पाहिजे. कारण,

स्मृत्यंतर **प्राङ्न्यायोत्तर** दिल्हें असतां त्याचा पुरावा प्रतिवादीनें केला पाहिजे.

अशा वचनावरून शुद्ध (**मिथ्योत्तरा**वांचून) **प्राङ्न्यायोत्तरा**चा कोणत्याही **व्यवहारीं** अभावच आहे. ह्मणून तें **अनुत्तर** होऊं लागेल.

**सत्योत्तरा**[1]सही वादीच्या फिर्यादीचा स्वीकार केल्यामुळें तितक्यानें त्याच्या वादाचें निराकरण झालें, ह्मणून **सत्योत्तर** ही **उत्तरांत** मोजलें आहे.

१६ जेथे **कारणोत्तर**, **प्राङ्न्यायोत्तर** यांचा **संकर** आहे. ह्मणजे असें, यानें १०० रुपये घेतले आहेत; अशी फिर्याद केली असतां प्रतिवादी **उत्तर** देतो. घेतले खरे पण परत दिल्हे; ययाचा दाविषयीं पूर्वींच म्या याला जिंकिलें आहे. अशास्थळीं प्रतिवादीच्या इच्छेप्रमाणें **प्रमाणनिर्देश** होतो. ह्मणून कोणत्याही **व्यवहारीं** एका वादांत वादिप्रतिवादी याउभयतांचा **क्रियोपन्यास** संभवत नाहीं असा निर्णय झाला.

कारणोत्तर प्राङ्न्यायोत्तरयांचासंकर.

---

१ चवथ्या शाखेच्या दुसऱ्या अंकांत व दाहव्या शाखेच्या पहिल्या अंकांत जो उत्तर शब्दाचा अर्थ सांगितला आहे, तो सत्योत्तरांत संभवत नाहीं. ह्मणून सत्योत्तर उत्तरच नाहीं, अशी शंका उपस्थित झाली तिचें निवारण सांगितलें.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

### शाखा १२

याप्रमाणें प्रतिवादीचें **उत्तर** लिहून घेतल्या
वर वादाची सिद्धि पुराव्याच्या स्वाधीन आहे म्ह-
णून पुरावा कोणी दाखवावा हें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य नंतर वादीनें आपल्या वादाचा पुरावा तत्काळ लिहून द्यावा.

टीका.

१ प्रतिवादीचें **उत्तर** लिहून घेतल्यावर वादीनें आपल्या वादाचा जो (साक्षिलेख्यादि) पुरावा असेल तो तत्काळ लिहून द्यावा. "तत्काळ लिहून द्यावा" असें सांगितल्यावरून प्रतिवादीला **उत्तर** लिहून देण्यास कालविलंब लागला तरी दोष नाहीं, असें सुचविलें. हें पुढें (२ऱ्या प्रकरणाच्या ३ऱ्या शाखेच्या ९व्या अंकांत) विशद सांगितलें आहे. वादीकडील पुरावा.

२ वादीनें "आपल्या वादाचा (साक्षिलेख्यादि) पुरावा लिहून द्यावा." असें (मूळवचनांत) सांगितल्यावरून वादी किंवा प्रतिवादी कोणीही असो, ज्याला जें सिद्ध करावयाचें असेल त्यानें तें सिद्ध करण्यासाठीं **प्रमाण** लिहून द्यावें असें दर्शविलें. वादी शब्दें करून ज्याला जें साध्य करावयाचें आहे तो घ्यावा.

३ यास्तव **प्राङ्न्यायोत्तर** स्थळीं प्रतिवादीनें आपलें **प्राङ्न्यायोत्तर** सिद्ध करण्यासाठीं **तत्साधक** (जयपत्रादिक) **प्रमाण** दाखविलें पाहिजे. प्राङ्न्यायोत्तरस्थळीं प्रतिवादीचा पुरावा.

४ तसेंच **कारणोत्तर** स्थळींही प्रतिवादीनेंच आपलें **कारणोत्तर** सिद्ध करण्याचा जो पुरावा असेल तो दाखविला कारणोत्तरस्थळींही प्रतिवादीकडून पुरावा.

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

पाहिजे..

५ **मिथ्योत्तर**स्थळीं तर वादीनेंच **प्रमाण** दाखविलें पाहिजे. मिथ्योत्तरस्थळीं वादीकडून पुरावा.

६ "वादीनें लिहून द्यावें," असें (मूळांत) सांगितल्यावरून दुसऱ्याकडून लिहून घेऊं नये असें सुचविलें.

७ यास्तव **सत्योत्तर**स्थळीं **सत्योत्तरा**नेंच **व्यवहार** सिद्ध झाल्यामुळें पुढें वादी प्रतिवादी असा **व्यपदेश**च नाहीं. ह्मणून **प्रमाणा**ची गरज उभयपक्षीं ही नाहीं. यास्तव तितक्यानेंच **व्यवहार** संपतो असें सिद्ध झालें. सत्योत्तरस्थळीं पुराव्याची गरज नाहीं.

हारीत ही. हेंच स्पष्ट करून दाखवितो कीं "**प्राङ्न्यायोत्तर**स्थळीं व **कारणोत्तर**स्थळीं तर प्रतिवादीनें पुरावा दाखविला पाहिजे. **मिथ्योत्तर**स्थळीं वादीनें पुरावा दाखवावा. **सत्योत्तर**स्थळीं पुरावा दाखविण्याची गरज नाहीं.

पुढें काय करावें तें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य, **प्रमाणा**ची सिद्धि झाल्यास जय पावतो, नाहीं तर पराजय पावतो.

टीका.

८ नंतर पुढें (५ व्या व ६ व्या प्रकरणांत) सांगितलेल्या साक्षी व लेख **इत्यादिकप्रमाणा**चा पुरावा झाल्यास **व्यवहारां**त जय पावतो, पुरावा न झाल्यास पराजय पावतो. पुरावा झाल्यास जय, नाहीं तर पराजय.

या प्रमाणें (आरंभापासून एथपर्यंत) **व्यवहारां**

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

चें स्वरूप सांगून **उपसंहार** करितो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. असा हा विवादाविषयीं **चतुष्पाद व्यवहार** दाखविला आहे.

### टीका.

९ १ ल्या शाखेच्या २ ऱ्या अंकांत सांगितलेला जो **व्यवहार** त्याचे चार **पाद** आहेत. ते असे, फिर्याद (७ व्या शाखेचा १ ला अंक) हा पहिला **पाद**. प्रतिवादीचें **उत्तर** (१० व्या शाखेचा १ अंक) हा दुसरा **पाद**. **प्रमाणनिर्देश** (१२ व्या शाखेचा १ अंक) हा तिसरा **पाद**. जय किंवा पराजय (१२ व्या शाखेचा ८ वा अंक) हा चौथा **पाद**. याप्रमाणें हा **चतुष्पाद व्यवहार**, **ऋणादान** वगैरे सर्व वादाविषयीं जाणावा. व्यवहाराचे चार अंश.

स्मृति. **व्यवहार** ह्मणजे मनुष्यें स्वार्थाविषयीं परस्पर विवाद करीत असतां **न्यायें** करून व वचनें करून (यथार्थ) निर्णय करणें.

असा जो **व्यवहार** त्याचे चार अंश ह्मणजे फिर्याद, **उत्तर**, पुरावा, आणि निर्णय, असे चार **पाद** आहेत. ह्मणून हा **चतुष्पाद** ह्मटला आहे.

१० **सत्योत्तरस्थळीं व्यवहाराचे** दोनच **पाद** आहेत. कारण, तेथें **प्रमाणनिर्देशाची** गरज नाहीं. व **प्रमाणद्वारा** वादसिद्धि होत नाहीं. सत्योत्तरस्थळीं व्यवहाराचे दोन पाद.

**उत्तर** दिल्यानंतर वादिप्रतिवादींतून कोणी **प्रमाण** दाखवावें याविषयीं **सभासदांनी** विचार करण्याची गरज नाहीं. का

# प्रकरण १

## साधारणव्यवहारमातृका.

रण, वादिप्रतिवादींतून कोणीं **प्रमाण** दाखवावें हें **उत्तराव**रूनच अवगत होतें, ह्मणून **परामर्शाची** योगीश्वरानें **व्यवहाराचेपादांत** गणना केली नाहीं. व त्यांत **व्यवहार** करणारांचा संबंधही नाहीं. अतएव **परामर्शाची व्यवहाराचे** अंशांत गणना नको असें सिद्ध झालें.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

### शाखा १

याप्रमाणें सर्व व्यवहारांस उपयोगी अशी **साधारणव्यवहारमातृका** सांगून सांप्रत **व्यवहारांचे** विशेषनिर्णय दाखविणारी अशी **असाधारणव्यवहारमातृका** सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य. फिर्यादींतून पार पडल्यावांचून वादीवर उलट फिर्याद करूं नये.

### टीका.

१ प्रथमतः वादीनें जी आपल्यावर फिर्याद केली असेल तिचें निराकरण केल्यावांचून वादीवर उलट फिर्याद करूं नये. वादीनें उलट फिर्याद करूं नये.

२ जरी[1] **कारणोत्तर** उलट फिर्यादरूपच आहे खरें, तरी येथें जो उलट फिर्यादीविषयीं निषेध सांगितला, तो आपल्यावरच्या फिर्यादीचें निराकरण करणारें असें उलट फिर्यादरूप जें **कारणोत्तर** त्याविषयीं नव्हे. आपल्यावरील फिर्यादीचें निराकरण नकर

---

सुबोधिनी. १ यानें माझे शंभर रुपये घेतले आहेत अशी कोणी फिर्याद केली असतां प्रतिवादी उत्तर देतो, रुपये घेतले होते खरे (हें सत्योत्तर) पण परत दिल्हे (हें कारणोत्तर) असें जें पूर्वीं सांगितलेलें कारणोत्तर त्याविषयीं ही वरचा निषेध लागू पडतो, सबब कारणोत्तरास उत्तर येणार नाहीं अशी उत्थाप्याकांक्षा घेऊन समाधान करितो.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

णारी जी नुसति उलट फिर्याद निज विषयीं हा निषेध असें समजा वें.

वरचा प्रकार (१ अंक) प्रतिवादीविषयीं सांगि-
तला, आतां वादीविषयीं सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. एकानें ज्यावर फिर्याद केली आहे त्यावर दुसऱ्यानें फिर्याद करूं नये. आणि पूर्वीं जे निवेदन केलें असेल त्याला **वैरुध्य** आणूं नये.

### टीका.

३ एकानें ज्यावर फिर्याद केली असतां तो त्या फिर्यादींतून पार पडल्यावांचून दुसऱ्या वादीनें त्यावर फिर्याद करूं नये. एकाप्र॰ज्यावर दुसऱ्यावादीनें फिर्याद करूं नये.

४ वादीनें प्रथमतः जें निवेदन केलें असेल, त्यास त्यानें **वैरुध्य** आणूं नये. ह्मणजे असें, जें वस्तु ज्या प्रकारानें फिर्यादींत निवेदिलें असेल तसेंच जबानींत लिहून द्यावें; विपरीत लिहून देऊं नये.

५ शंका—हा प्रकार (४ अंक) १ल्या प्रकरणाच्या ७व्या शाखेच्या १ल्या अंकांत सांगितलाच आहे. मग पुनः येथें सांगण्याचें प्रयोजन काय?

६ समाधान—१ल्या प्रकरणाच्या ७व्या शाखेच्या १ल्या अंकांत फिर्यादींत ज्या वस्तूचें निवेदन केलें असेल तेंच वस्तु जबानींत लिहून द्यावें. ह्मणजे असें, एका प्रकरणांत (**ऋणादानादिकांत**) ही निरनिराळ्या वस्तू लिहून देऊं नयेत, असें सांगितलें आहे. एका फिर्यादींत अनेक वस्तूंचा निवेश नसावा.

# प्रकरण १

## असाधारणव्यवहारमातृका

जसें, यानें मजपासून १०० रुपये व्याजीं घेतले आहेत, अशी फिर्याद करून प्रतिवादीच्या समक्ष जबानींत लिहिते समयीं १०० पागोटीं व्याजीं घेतलीं आहेत, असें लिहून देऊं नये. दिल्हें असतां जरी एका **प्रकरणांत** (**ऋणादानादिकांत**) दुसरें प्रकरण (**साहसादिक**) प्रविष्ट नाहीं, तथापि **वस्तुभेद** झाल्यामुळें तो **हीनवादी** ठरला सबब **दंड्य** होतो.

७ आणि येथें (४ थ्या अंकांत) तर "वादीनें प्रथमतः निवेदन केलें असेल त्यास **वैरुध्य** आणूं नये." या वचनावरून **वस्तुभेद** नसला तरी त्यांत प्रकरणभेदाचा निवेश नसावा. जसें,—— यानें माझे १०० रुपये व्याजीं घेतले आहेत, ते देत नाहीं, अशी **ऋणादान** (दिवाणी) प्रकरणीं फिर्याद करून जबानींत लिहून देते वेळेस, यानें मजपासून १०० रुपये जबरीनें घेतले. असें **साहस** (फौजदारी) प्रकरणीं बोलतो. तर असें बोलूं नये. एका फिर्यादींत दोन प्रकरणें नसावीं.

सारांश येथें (१ ल्या प्रकरणाच्या ७ व्या शाखेच्या ३ ल्या अंकांत) फिर्यादींत व जबानींत **वस्तुभेद** सांगूं नये, असा निषेध सांगितला. आणि येथें (चालत्या शाखेच्या ४ थ्या अंकांत) **प्रकरणभेद** निषेधिला ह्मणून **पुनरुक्तिदोष**[१] येत नाहीं.

---

१ चालत्या शाखेचा ४ था अंक व १ ल्या प्रकरणाच्या ७ व्या शाखेचा १ ला अंक या दोहोंचा अर्थ एकच भासतो ह्मणून पुनरुक्त दोष आला त्याचें निवारण केलें.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

नारद. पूर्वीच्या वाद सोडून जो पुनः दुसऱ्या वादाचा अंबलंब करितो. त्यानें **ऋणादानादिक प्रकरणांचा संकर** केला. ह्मणून तो **हीनवादी** जाणावा.

८ **हीनवादी** ठरला सबब दंडास योग्य होतो, पण चाल त्या वादापासून भ्रष्ट होत नाहीं. याखव प्रतिवादी व वादी यांकडून गफलत होऊं नये, एतदर्थच हा १ल्या व ३ ऱ्या व ४ थ्या अंकांत सांगितलेला उपदेश केवळ चालत्या वादाची सिद्धि किंवा असिद्धि या विषयीं नाहीं. याखव पुढें (८६ व्या शाखेंतील ३ऱ्या अंकाचे वचनांत) सांगितलें आहे कीं, "**राजानें व्यवहाराच्या** पोटीं कृत्रिम असेल तें काढून वास्तवार्थास अनुसरून वादाचा निर्णय करावा."

९ परंतु हा प्रकार (८ वा अंक) **धनव्यवहारीं** (दिवाणीचे बाबदींत) जाणावा. **क्रोधमूलक व्यवहारीं** (फोजदारी प्रकरणीं) **प्रमादानें** बोलण्यांत विपर्यास झाला असतां चालत्या वादांतून देखील भ्रष्ट होतोच.

नारद. सर्व प्रकारच्या **धनव्यवहारीं** कृत्रिमानें भाषण विपर्यास घडला असतां त्या वादांत पराजय पावत नाहीं. जसें **परस्त्री, भूमि, ऋणादान** या **व्यवहारीं प्रमादानें** भाषणांत विपर्यास घडला असतां दंडास योग्य होतो, पण त्या वादांत पराजित होत नाहीं.

या प्रमाणेंच सर्व **धनव्यवहारीं** समजावें. अर्थात् **क्रोधनिमित्तक व्यवहारीं प्रमादानें** भाषण विपर्यास घडला असतां **दंड्य** होऊन चालत्या वादापासून ही भ्रष्ट होतो असें सुचविलें.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

जसें, यानें माझ्या डोकीवर लात मारिली असें फिर्यादीनें निवेदन करून जबानींत लिहून देते वेळेस हातानें पायांवर मारिलें, असें बोलणारा केवळ **दंड्य** च असें नाहीं त्या वादांत पराजितही होतो.

## शाखा २

पहिल्या शाखेच्या १ ल्या अंकाचें (उलट फिर्यादीचा निषेध सांगितला त्याचें) बाधक वचन येथें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. कलह व **साहस** कर्मे यावादांत उलट फिर्याद करावी.

टीका.

फौजदारी प्रकरणीं उलट फिर्याद केल्यास बाध नाहीं.

१ कलह ह्मणजे **वाक्पारुष्य, दंडपारुष्य**. **साहस** ह्मणजे विष, शस्त्र, **इत्यादिकें** करून प्राणनाश करणें वगैरे. या **व्यवहारीं** जर उलट फिर्याद संभवेल तर आपल्यावरील फिर्यादीचा परिहार झाल्यापूर्वीही वादीवर उलट फिर्याद करावी.

२ येथें ही अशी शंका येते कीं, ही उलट फिर्याद जी सांगितली ती पहिल्या फिर्यादीचें निराकरण करणारी नव्हे, ह्मणून तिला **उत्तरत्व** ह्मणतां येत नाहीं. निराळी फिर्याद ह्मणावी तर एका वादांत दोहों वादींच्या फिर्यादी एकसमयावच्छेदें करून संभवत नाहींत. (यास्तव ही उलट फिर्याद निरर्थक)

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

३ खरें पण येथें (१ल्या अंकांत) जो उलट फिर्यादिकरण्याचा उपदेश सांगितला, तो एक समयावछेदें करून **व्यवहार** घडण्यासाठीं सांगितला नाहीं. फिर्यादीपेक्षां कमी दंड आपणास असावा, किंवा अधिक तरी होऊं नये एतदर्थ. जसें, यानें मला मारिलें, आणि शिव्या दिल्या, अशी फिर्याद केली असतां प्रतिवादी अशी उलट फिर्याद करून शाबीत करितो कीं, अगोदर यानें मला मारिलें, आणि शिव्या दिल्या. तर प्रतिवादीला दंड कमी होईल.

नारद. जो अगोदर (विनापराध) दुसऱ्यास शिवीगाळ करितो (किंवा मारितो,) तो निश्चयें अपराधी ठरतो. आणि जो त्याला (शिवीगाळ, मारहण, करणारास) उलट करितो तोही अपराधी खरा, पण पहिल्यानें अपराध करणारा अधिक दंडाचें पात्र होतो.

४ जर दोघांची एक समयावछेदें करून मारामारी वगैरे विषयीं प्रवृत्ति घडली तर कोणासही अधिक दंड नाहीं — एकदांच दोघे मारामारी विषयीं प्रवृत्त झाले तर त्यास दंड.

स्मृति. **वाक्पारुष्य, दंडपारुष्य, साहस, या व्यवहारांत** एक समयावछेदें करून दोघे प्रवृत्त झाले आणि दोघांचे अपराध समान आहेत तर दोघांस शिक्षा हीसमानच करावी.

५ याप्रमाणें जरी एकदांच दोघांचा परस्पर विवाद संभवतनाहीं, तरी फोजदारी प्रकरणीं (कलहादिकांत) उलट फिर्याद लागू होती. दिवाणीप्रकरणीं (**ऋणादिक व्यवहारीं**) तर निरर्थकच होती.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

### शाखा ३

याप्रमाणें वादिप्रतिवादींनीं (न्यायसभें
त) कोणत्यारीतीनें वर्तावें तें सांगितलें. आ
तां न्यायाधीशानें सभासदांसहवर्त
मान काय केलें पाहिजे तें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. निर्णयाचे कार्याविषयीं समर्थ असा उभयतांपासून जामी
न घ्यावा.

टीका.

१ न्यायाधीशानें सर्व व्यवहारीं वादिप्रतिवादींपासू
न जामीन घ्यावा. तो असाकीं, शाबीत केलेलें धन व पराजयनिमि
त्त दंड ठरेल तो देण्यास समर्थ. वादिप्रतिवादींपासून जामीनघेण्याचाप्रकार

२ जामीन न मिळे तर वादिप्रतिवादींच्या संरक्षणार्थ शि
पाई योजावे, आणि त्यांस वादिप्रतिवादींकडून दररोज भत्ता दे
वावा. योग्यजामीन नमिळेतर त्याविषयींचाप्रकार.

कात्यायन. जर दोघांतून कोणास योग्य जामीन न मिळे तर शिपायांकडू
न त्याची रखवाली करवून त्याकडून शिपायांस दररोज संध्याकाळीं
भत्ता देवावा.

न्यायाधीशानें वादिप्रतिवादींपासून नि
र्णयाचे कार्यासाठीं जामीन घ्यावा, असें सां
गितलें. तें निर्णयाचें कार्य कोणतें तें सांगतो.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

मूळ

याज्ञवल्क्य. **निह्नव** केल्यामुळें शाबीत केलेलें धन देवबून तितकाच राजदंड घ्यावा. खोटी फिर्यादकरणारापासून फिर्यादीचे दुपट धन घ्यावें.

टीका.

३ वादीनें केलेल्या फिर्यादीचा प्रतिवादीनें **निन्हव** केल्यावरून वादीनें साक्षिलेख वगैरे पुरावा दाखवून प्रतिवादीवर आपला दावा शाबीत केला, तर **राजानें** वादीनें **विवादास्पदीभूत** द्रव्य देवावें. आणि **निन्हव** केला सबब तितकाच राजदंड घ्यावा.

वादीच्या अर्थाचा प्रतिवादी निन्हव करितील, त्याला दंड.

४ जर वादी आपण केलेली फिर्याद प्रतिवादीवर शाबीत करूं शकत नाहीं, तर वादीच खोटा फिर्यादी ठरला, सबब त्यापासूनच **राजानें** **विवादास्पदीभूत** धनाच्या दुपट दंड घ्यावा.

वादी खोटा फिर्यादी ठरल्यास दंड.

५ याप्रमाणेंच **प्राङ्न्यायोत्तर** स्थळीं व **कारणोत्तर** स्थळींही योजना करावी. तो प्रकार असा कीं, **प्राङ्न्यायोत्तर** स्थळीं वादीच **निन्हववादी** असें प्रतिवादीनें जयपत्रादिकें करून व **कारणोत्तर** स्थळीं साक्षिलेखांकडून शाबीत केलें असतां वादीपासूनच **विवादास्पदीभूत** द्रव्याइतका **निन्हव** निमित्त दंड घ्यावा. जर प्रतिवादी आपलें **कारणोत्तर** किंवा **प्राङ्न्यायोत्तर** शाबीत करूं शकत नाहीं, तर प्रतिवादीच खोटा ठरला; सबब **राजानें** त्यापासून दुपट दंड घेऊन वादीनें **विवादास्पदीभूत** धन देवावें.

**सत्योत्तर** स्थळीं तर वादीचा दावा कबूल केल्यावरून **निन्हव** नाहीं,

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

ह्मणून शाबीत करण्याची गरज नाहीं, यास्तव दंड नाहीं.

६ वर सांगितलेले प्रकार (३रा ४था ५वा अंक) **ऋणादानींच** समजावे. कारण, इतर **व्यवहारीं** त्यात्या प्रकरणीं निरनिराळे दंड सांगितलेच आहेत. आणि **अधनव्यवहारीं** तर वादाचें मूळ कारण द्रव्य नाहीं, ह्मणून मुळीं **तत्सम** धनदंडच संभवत नाहीं, ह्मणून वरचे अंक सर्व **व्यवहारां** विषयीं नव्हत.

७ **राजानें** कुळाकडून सावकाराचें द्रव्य देवविलें असतां कुळापासून शेंकडा १० रुपये दंड घ्यावा. असा (३ ऱ्या प्रकरणीं ५ व्या शाखेच्या ३ अंकांत) सांगितलेला प्रकार ही **ऋणादाना** विषयीं खरा, परंतु विशेष नियम सांगायाचा तो तेथेंच सांगितला आहे.

८ हेच प्रकार सर्व **व्यवहारां** विषयीं ही योजावे. ते असे, प्रतिवादीनें आपल्यावरील फिर्यादीचा **निन्हव** केल्यावरून वादी जर साक्षिलेखांकडून प्रतिवादीवर आपला दावा शाबीत करितो, तर प्रतिवादीनें त्यात्यास्थळीं त्यात्या प्रकरणीं सांगितलेला धनदंड **राजाला** द्यावा "हा **अनुवाद**." जर वादी आपला दावा शाबीत करूं शकत नाहीं, तर खोटा वादी ठरला सबब, त्यात्या प्रकरणीं सांगितलेल्या धनदंडाच्या दुपट दंड द्यावा "हा **विधि**." येथें ही **प्राड्न्यायोत्तर** स्थळीं व **कारणोत्तर** स्थळीं ही वर (५ व्या अंकांत) सांगितल्याप्रमाणेंच योजना करावी.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

(१ल्या प्रकरणाच्या १३व्या शाखेच्या १ल्या अंकांत) "प्रतिवादीला उत्तर देण्यास कालविलंब लागला तरी दोष नाहीं" असें सांगितलें आहे त्याचें बाधक येथें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **साहस**, चोरी, **वाक्पारुष्य**, **दंडपारुष्य**, गाय, **अभिशाप**, अनर्थ, स्त्री, या वादांत तत्काळ **उत्तर** घ्यावें. अन्यत्र स्थळीं इच्छेप्रमाणें अवकाश सांगितला आहे.

टीका.

कोणकोणते व्यवहारीं प्रतिवादीकडून उत्तर घेण्यास विलंब लावूं नये.

१ **साहस** ह्मणजे विष, शस्त्र, **इत्यादिकें** करून प्राणनाश करणें, चोरी, **वाक्पारुष्य**[17], **दंडपारुष्य**[18], दुभती धेनु, **अभिशाप**, प्राण धन यांचा विनाश, तसेंच कुलस्त्रीवर **व्यभिचारारोप**, व दासीवर **स्वत्वविवाद**, इतक्या विवाद स्थळीं तत्काळ **उत्तर** देवावें, अवकाश करूं नये. इतर **व्यवहारीं उत्तर** देण्याचा अवधि वादी, प्रतिवादी, **सभासद**, **न्यायाधीश**, यांच्या इच्छेनें नेमावा.

# शाखा ४

वादांत खोटा समजण्याचीं चिन्हें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जो एका ठिकाणीं ठरत नाहीं, व जो ओंठानें कोपरे चाटतो, व ज्याचे कपाळावर घाम येतो. व ज्यानें तोंड **वैवर्ण्य** पावतें, ज्याचा कंठ दाटतो, अथवा जो तोत्रें बोलूं लागतो, आणि जो विरुद्ध व मनस्वी

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

वडवडतो, जो प्रत्युत्तरानें व प्रतिवीक्षणानें सत्कार देत नाहीं, तसें व जो ओंठ वांकवितो; असे जो मानसिक, वाचिक, कायिक, विकार स्वभावानें पावेल, तो वादांत किंवा साक्षीविषयीं खोटा जाणावा.

टीका

वादांत खोटा समजण्याचीं चिन्हें.

१ न्यायसभेंत आल्यानंतर जो एका ठिकाणीं राहात नाहीं, इकडे तिकडे फिरतो तो, व जिभेनें ओंठाचे प्रांतभाग चाटितो तो, "ही कर्मजन्य विकृति" व ज्याच्या कपाळावर घाम येतो, आणि तोंडावर पांडुरकी किंवा काळिमा येती तो "ही कायिक विकृति:" व जो सद्गदित, किंवा व्यत्यस्त, व पूर्वापरविरुद्ध, पुष्कळ भाषण करितो तो, "ही वाचिक विकृति:" व जो दुसऱ्याचे प्रश्नाचा प्रत्युत्तर देण्यानें सत्कार करित नाहीं, किंवा दुसऱ्याचे दृष्टीचा प्रतिवीक्षणानें सत्कार करित नाहीं तो, "या मानसिक विकृतीच्या रचना:" तसेंच जो ओष्ठ वांकडे करितो तो, "ही शारीर विकृति चहोय:" वादांत किंवा साक्षीविषयीं खोटा असें जाणावें. परंतु ह्या वरसांगितलेल्या विकृती भयादि कारण नसतां स्वाभाविक असतील तर.

२ हे वरसांगितलेले विकार दोषीपणाचा वहेमामात्र दाखविणारे, केवळ यांवरून दोषाचा निश्चय न होतो, असें नाहीं. कारण, हे विकार स्वाभाविक किंवा नैमित्तिक हें चोकशीनें समजावयाचें कठीण आहे. कदाचित् एखादा चतुरपुरुष समजेल, तरी परार्जय निमित्त कार्य होणार नाहीं. जसें मरणाऱ्या मनुष्याचीं मरणचिन्हें दिसूनआलीं

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

तरी त्यानें मृतकार्य करीत नाहींत. तसेंच याचा पराजय होईल असें चिन्हांवरून अवगत आलें तरी तो पराजयनिमित्त कार्य पाव तोच असें नाहीं.

मूळ.

याज्ञवल्क्य. संदिग्ध अर्थाला बळेंच जो साध्य करितो, व जो चुकावतो, आणि बोलावून आणिलें असतां कांहीं बोलत नाहीं, तो लबाड व दंड्य ही सांगितला आहे.

टीका.

३ कुळानें नाकबूल केलेला अर्थ साक्षिलेख इत्यादि प्रमाणानें शाबीत न करितां दाही वगैरे कडून बळें घेऊं इच्छितो, तो हीनवादी व दंडयोग्य होतो. पुरावा न दाखवितां दांडगाईनें वसूल करितो तर दंड

४ जो कुळ सतां देण्यास कबूल असतां, किंवा सावकार साक्षि लेखादिकानें शाबीत केलेलें मागत असतां, तोंड चुकावतो तो, व ज्याला न्यायसभेंत बोलावून आणिलें असतां कांहींच बोलत नाहीं तोही वादांत खोटा व दंडास योग्य होतो. सावकार मागत असतां जो तोंड चुकावतो त्याला दंड

५ फिर्यादी विषयीं किंवा साक्षीविषयींही तो लबाड समजावा. असें प्रस्तुत[1] आहे ह्मणून हा केवळ लबाड आहे इतकेंच समजावें असें नाहीं, तर त्यास दंडही असावा एतदर्थ दंडाचा निवेश केला. परंतु दंड्य ठरला तरी चालत्या वादांतून भ्रष्ट होत नाहीं असें दिसून येतें, परंतु तें येथें न व्हावें, ह्मणून खोटा ठरतो असेंही सांगितलें.

---

१ प्रस्तुत ह्मणजे १ ल्या अंकापासून उपक्रम चालला आहे ह्मणून

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

६ ज्या वादांत दोघेही फिर्यादी एक समयावच्छेंकरून न्यायाधीशाकडे फिर्याद आले.तो प्रकार असा,एक पुरुष प्रतिग्रहादिकें करून क्षेत्र (स्थावर) संपादून कांहीं दिवस त्याचा उपभोग घेऊन सकुटुंब देशांतरीं गेला .दुसराही तेंच क्षेत्र प्रतिग्रहादिकेंकरून संपादनकरून कांहीं काळ उपभोगून देशांतरीं गेला. नंतर दोघेही एकदांच येऊन हें माझें क्षेत्र असा परस्पर वाद करीत करीत न्यायाधीशाकडे फिर्याद गेले असतां त्यांतून कोणाचा पुरावा (साक्षि भोग लेख) मुस्तकीम होईल हें सांगतो.

वादाविषयीं दोताचें उदाहरण.

मूळ.

याज्ञवल्क्य. उभयतांचेही साक्षी असल्यास पूर्ववादीचे साक्षी घ्यावे पूर्ववादीचा पक्ष शाबीत न झाल्यास उत्तरवादीचे साक्षी प्रमाण होतात.

टीका.

७ दोहीं फिर्यादीचेही साक्षी असल्यास जो पूर्ववादी ह्मणजे अगोदर हें मला मिळून मी याचा उपभोग घेतला. असें बोलणारा, त्याचे साक्षी घ्यावे. ज्यानें पूर्वी फिर्याद केली असेल त्याचे साक्षी अगोदर घेऊनयेत. जर उत्तरवादी ह्मणजे जो असें ह्मणतो कीं खरें. यानें पूर्वी घेतलें व उपभोगिलें,परंतु हेंच क्षेत्र याच मनुष्यापासून राजानें विकत घेऊन मला दिल्हें,अथवा दुसऱ्यानें दान घेऊन मला दिल्हें.असें शाबीत करितो. तर पूर्ववादीचा पक्ष रद्द झाला,सबब उत्तरवादीचे साक्षीच मुस्तकीम प्रमाण समजावे.

कांहीं एका अर्थाविषयीं दोघे भांडत असून दोघांचेंही प्रमाण आहे तर निर्णय करण्याचा प्रकार.

८ हा (वरसांगितलेला) च अर्थ संयुक्त. मिथ्योत्तरस्थळीं पूर्ववादीचे साक्षी घ्यावे.प्राङ्न्यायोत्तरस्थळीं व कारणोत्तरस्थ

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

ळीं **पूर्ववादीचा पक्ष** रद्द झाला सबब **उत्तरवादीचे** साक्षी (प्रमाण) मुक्तकीम. असा अर्थ अयुक्त. कारण, असा अर्थ १ल्या प्रकरणाच्या १३ व्या शाखेच्या २ न्या अंकांत सांगितलाच आहे. यास्तव पुनः सांगण्यानें **पुनरुक्तिदोष** मात्र येतो.

नारदानें ही पहिलाच अर्थ स्पष्ट करून दाखविला आहे. तो असा "प्रतिवादीनें **मिथ्योत्तर** दिल्हें असतां **स्वार्थसाधकप्रमाणांचा** पुरावा दाखविणें वादीचें काम आहे. प्रतिवादीनें **कारणोत्तर** दिल्हें असतां प्रतिवादीनेंच तत्साधक **प्रमाण** दाखविलें पाहिजे. तसेंच **प्राङ्न्यायोत्तरस्थळीं** ही प्रतिवादीनेंच जयपत्र वगैरे **प्रमाण** दाखविलें पाहिजे." असें सांगून "एका अर्थाविषयीं दोघे भांडत आहेत व दोघांचेही साक्षी आहेत, तर **पूर्ववादीचे** साक्षी **प्रमाण** घ्यावे," असें सांगितलें, परंतु हा (६ व्या अंकांतला शेताविषयींचा) वाद सर्व **व्यवहारां**हून विलक्षण आहे म्हणून निराळा प्रतिपादन केला.

### शाखा ५

#### मूळ.

याज्ञवल्क्य. जर प्रतिज्ञापूर्वक वाद आहे, तर त्यांत पराजितापासून दंड व त्यानें केलेली प्रतिज्ञा घेऊन मालकाचें द्रव्य देवावें.

#### टीका.

प्रतिज्ञाकरून विवाद करित आहेत तर त्यास्थळीं निर्णय करण्याचा प्रकार

१ जर या वादांत जिंकलों तर अमुक रुपये देईन अशा प्रतिज्ञापूर्वक वादांत प्रतिज्ञा करणारा (प्रतिवादी) पराजित झाला असतां

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

त्यापासून **राजानें** पूर्वी (३ ऱ्या शाखेच्या ३ ऱ्या अंकांत) सांगितलेला दंड घेऊन व **प्रतिज्ञात** द्रव्य घेऊन वादीचें **विवादास्पदीभूत** द्रव्य देवावें.

२ प्रतिज्ञा करणारा वादी आहे आणि तो पराजित होतो. तर त्यापासून (३ ऱ्या शाखेच्या ४ थ्या अंकांत सांगितल्याप्रमाणें) दंड घेऊन **प्रतिज्ञात** द्रव्य घ्यावें — वादी प्रतिज्ञा करितो तर त्याविषयीं.

३ ज्या **व्यवहारीं** वादिप्रतिवादींतून कोणी एक रागाच्या झपाट्यानें प्रतिज्ञा करितो कीं, जर मी या वादांत पराजय पावेन तर १०० **पण** देईन. आणि दुसरा कांहींच प्रतिज्ञा करीत नाहीं, तर असाही **व्यवहार** चालतो. चालला असतां त्यांत प्रतिज्ञा करणारा पराजित होईल तर त्यापासून वरसांगितल्याप्रमाणें पराजयनिमित्त दंड घेऊन **प्रतिज्ञात** द्रव्य घ्यावें. प्रतिज्ञा न करणारा पराजित झाला तर त्यापासून नुसता दंड मात्र घ्यावा, **प्रतिज्ञात** द्रव्य घेऊं नये. कारण "त्यानें केलेला पण" असा वचनांत विशेष निर्देश केला आहे. — जो प्रतिज्ञा करील त्यापासून मात्र प्रतिज्ञात द्रव्य घ्यावें.

४ ज्या वादांत एक १०० **पणांची** प्रतिज्ञा व दुसरा ५० **पणांची** प्रतिज्ञा करितो त्या वादांतही (पराजितापासून पराजयनिमित्त दंड घेऊन) प्रतिज्ञा करणाऱ्या दोघांपासून **प्रतिज्ञात** द्रव्य घ्यावें. "जर प्रतिज्ञा पूर्वक वाद आहे" असे वर सांगितल्यावरून प्रतिज्ञाविरहितही वाद चालतो, असें दाखविलें. — दोघे प्रतिज्ञा करीतात. तर दोघांपासूनही प्रतिज्ञातद्रव्य घ्यावें.

# प्रकरण २

# असाधारणव्यवहारमातृका.

## शाखा ६

मूळ.

याज्ञवल्क्य राजानें व्यवहारांतलें कपट काढून वास्तवार्थाकडून निर्णय करावा. वास्तवार्थ असूनही पूर्वी निवेदन केला नाहीं तर रद्द होतो.

टीका.

१ राजानें व्यवहाराच्या पोटीं जितकें कृत्रिम असेल तितकें काढून टाकून वास्तवार्थास अनुसरून व्यवहार सिद्धीस न्यावा.

व्यवहाराच्यापोटीं कृत्रिम असेल तें काढून निर्णय करावा.

२ वास्तवार्थ असूनही त्याचा उपन्यास न केला तर तो हानीप्रत पावतो. यास्तव जेणें करून वादिप्रतिवादी खरेंच सांगतील असा राजानें सभासदांसहवर्तमान सामदानादिक उपायांकडून यत्न करावा. असें केलें असतां साक्षिलेख्यादि प्रमाणांची गरज न लागतां व्यवहाराचा निर्णय होतो. (आणि हाच मुख्यपक्ष) सर्वथा वास्तवार्थ अवगत होऊं शकतच नाहीं, तर साक्षी वगैरे प्रमाणें घेऊन निर्णय करावा हा अनुकल्प आहे!

वास्तवार्थ असून पूर्वी निवेदन करीत नाहीं तर तो पुढें रद्द पडतो.

स्मृति

व्यवहार निर्णय करण्याचे दोन पक्ष आहेत.

भूतानुसारी. आणि छलानुसारी.

भूतानुसारी ह्मणजे वास्तवार्थ अवगत करून घेऊन त्यावरून निर्णय करणें

छलानुसारी ह्मणजे प्रमादानें भाषण विपर्यास घडल्यास साक्षी वगैरे प्रमाणांवरून निर्णय करणें.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

त्यांत वास्तवार्थास अनुसरून निर्णय करणें हा मुख्यपक्ष. दुसरा पक्ष हा **अनुकल्प**. कारण, साक्षिलेख्यादि **प्रमाणांनीं** कदाचित् वास्तवार्थाप्रमाणें निर्णय होतो; कदाचित् होत नाहीं. कारण, साक्षिलेखादिकांत ही लबाडी संभवती.

२ ऱ्या अंकानें उदाहरण सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. वादीनें अनेक रकमा लिहून दिलेल्या प्रतिवादीनें नाकबूल केल्यामुळें एखादी रकम शाबीत केल्यास **राजानें** सर्व देवाव्या; परंतु पूर्वी निवेदन केल्या नसतील त्या देववूं नयेत.

टीका

३ जसें याजकडे सोनें, रुपें, कापड, वगैरे माझें येणें आहे. अशी फिर्याद केली असतां प्रतिवादीनें सर्वांचाच **निन्हव** केल्यावरून वादी त्यांतून एखादी रकम साक्षी वगैरे करून लागू करितो, तर सोनें वगैरे सर्व रकमा, ज्या पूर्वी फिर्यादींत लिहून दिल्या असतील त्या, **राजानें** वादीस देवाव्या. परंतु अर्जींत लिहून न देतां कांहीं वेळानंतर पूर्वी मी ही रकम अर्जींत लिहिण्यास विसरलों असें ह्मणतो तर ती रकम **राजानें** देववूं नये.

४ हा (वर सांगितलेला) प्रकार केवळ **वाचनिक** नव्हे; कारण, प्रतिवादीच्या खोटेपणाचा एकदेशीं तर निश्चय होतो, पण अन्यस्थळीं खोटेपणाविषयीं शंका मात्र येती. तसेंच वा

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

दीचाही एखाद्या रकमेविषयीं खरेपणा निश्चित होतो, आणि अन्यस्थळीं खरेपणाचा संभव येतो. याप्रमाणें जिला तर्क ह्मणतात अशी जी **संभावनात्मक** बुद्धि तिणें **सहकृत** अशा याज्ञवल्क्य वचनावरून असा निर्णय होतो कीं, एखादी रकम लागू केली असतां **राजानें** वादीच्या सर्व रकमा देवाव्या.

सारांश **तर्कास** व **वाक्यास** अनुसरून **व्यवहार** निर्णय केला असतां वास्तवार्थ विपरीत झाला तरी त्याचान्याय करणारांकडे दोष नाहीं.

गौतमही. न्याय प्रकरणीं वास्तवार्थ समजण्याविषयीं तर्क हा व्यापक उपाय, त्याणें निश्चय करून वास्तव निर्णय करावा. "असें सांगून" **राजा** व **आचार्य** हे दोषी होतनाहींत असा **उपसंहार** करितो.

५ वादीनें एकदेशीं दावा शाबीत केला ह्मणून प्रतिवादीचा वाका ग्राह्य नव्हे. असें येथें सूचविलें नाहीं. एकदेशीं शाबीत केलें असतां **राजानें** सगळें देवावें; इतकें मात्र वचनांत (३ अंकांत) आहे.

कात्यायन. वादीनें जरी अनेक वस्तूंची (सोनें रुपें कापड यांची) फिर्याद केली तरीं साक्षिलेख्यादि **प्रमाणां**कडून वादी जितका अंश शाबीत करील तितकाच पावेल (सर्व मिळणार नाहीं)

असें जें वचन आहे, तें पुत्रादिकांनीं द्यावयास योग्य असें जें बापाचें कर्ज त्याविषयीं. कारण, तशास्थळीं पुत्रादिकांवर अनेक वस्तूंची फिर्याद केली असतां पुत्रादिक ह्मणेल कीं, याविषयीं मला

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

कांहींच गऊक नाहीं तर तो खोटें बोलणारा होत नाहीं ह्मणून हें (या शाखेचे ३ऱ्या अंकांतलें) उदाहरण येथें[1] लागू पडत नाहीं. वरचें कात्यायन वचन सामान्य शास्त्रा विषयीं आहे ह्मणून विशेष शास्त्राचा (३ऱ्या अंकाचा) विषय जें निन्हवोत्तर त्यावांचून (इतरस्थळीं) अज्ञानानें दिल्हेल्या उत्तरा विषयीं प्रवृत्त होतें.

कात्यायन. ६ शंका— स्थिरप्राय[2] असेजे ऋणादिक धनव्यवहार त्यांत वादीनें सकल साध्यार्थाच्या एकदेशीं प्रतिवादीवर दावा सांगितला किंवा साध्यांशापेक्षां अधिक अंशीं सांगितला तर सकल साध्याची निश्चयें सिद्धि होत[3] नाहीं.

असें सांगणारा जो कात्यायन तो असें प्रतिपादन करितोकीं अनेक वस्तूंची (सोनें रुपें वगैरेची) फिर्याद करून तिची साक्षीकडून एकदेशीं किंवा अधिक अंशीं शाबिती केली असतां सगळाच वाद

---

१ येथें ह्मणजे कात्यायन वचनांत

---

सुबोधिनी. २ स्थिरप्राय ह्मणजे स्त्रीसंग्रहणादि व्यवहारस्थळीं केवळमुद्दा दिसणें अथवा शिथिल कारणावरूनच स्त्रीसंग्रहण, चोरी, वगैरे वादाची सिद्धि होती, ह्मणून ते व्यवहार अस्थिर होतात. कर्जदेण्याच्या व्यवहारीं तर मुख्तकीम साधनानें व्यवहार सिद्धि होती. सबब ते (ऋणादानादि) व्यवहार स्थिरप्राय ह्मटले आहेत.

---

सुबोधिनी. ३ उदाहरण यानें मजपासून सोनें, रुपये, कापड, घेतलें अशी फिर्याद केली असतां प्रतिवादीनें म्या कांहींच घेतलें नाहीं, असें निन्हवोत्तर केल्यावरून वादीनें साक्षिलेख्यादिक प्रमाणांकडून साध्यार्थाचे एकदेशीं ह्मणजे सोनें किंवा रुपये अथवा कापड यांतून एखाद्या वस्तू विषयीं लागू करितो, अथवा फिर्यादीपेक्षां अधिक रकम (धान्य) लागू करितो, तर निश्चयें त्याची फिर्याद निरर्थक होऊन लबाड ठरला जातो.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

बुडतो, परंतु फिर्यादी पैकीं एखादी रकम लागू केली असतां शाबीत न केलेल्या ज्या रकमा त्यांची सिद्धि कशी होईल बरें?

७ समाधान —— वादीनें स्वतां लिहून दिल्हेल्या सर्व रकमा शाबीत होण्यासाठीं जे साक्षी दाखविले त्यांजकडून वादाची एकदेशीं शाबिती झाली किंवा अधिक अंशीं शाबिती झाली असतां वादीचा साराच दावा रद्द होतो, असा याचा (५ व्या अंकाचा) अर्थ. त्यांत ही निश्चयें सिद्ध होत नाहीं, अशा वचन तात्पर्यावरून पुनश्च पूर्वी प्रमाणें संशय आहेच ह्मणून अणखी **प्रमाणां**चीअपेक्षा आहे. कारण, "**व्यवहारा**च्या पोटीं कृत्रिम असेल तें काढून **राजा**नें वास्तवार्थास अनुसरून निर्णय करावा" असा नियम आहे.

दिवाणी प्रकरणीं एखादे रकम लागून झाली तर वादरद्द होतो.

८ **साहसादिकव्यवहारीं** तर सकल **साध्यार्था**ची सिद्धि व्हावी, ह्मणून वादी जे साक्षी दाखवितो त्यांकडून वादाचा जरी एखादा अंश शाबीत झाला तरी तितक्यानेंच सर्व विवादाची सिद्धि होती.

फौजदारींत एखादी रकम लागू झाली तरी तितक्यानेंच सगळी फिर्याद लागू होती.

कात्यायनवचनही असेंच आहे कीं, **स्त्रीसंग्रहण**, **साहस**, चोरी या विवादांत साक्षी कडून एकदेशीं दावा लागू केला असतां तितक्यानेंच वादीचा सर्व दावा लागू होतो.

(६ व्या शाखेच्या ३ऱ्या अंकांतील याज्ञवल्क्य) व (४ थ्या अंकांतील कात्यायन) स्मृति यादोहोंस्मृतींचा परस्पर विरोध आल्यामुळें परस्परांचा बाध होतो, ह्मणून **अप्रामाण्य** कां मानूं नये; **विषयव्यवस्था** किमर्थ करावी; अशी

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

शंका उपस्थित झाली, तिचें निराकरण सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. दोहों स्मृतींचा विरोध आला असतां व्यवहारापेक्षां न्याय प्रबळ.

टीका

दोहों स्मृतींचा परस्पर विरोध प्राप्त झाला असतां व्यवस्था.

९ जेथें दोहों स्मृतींचा परस्पर विरोध येतो तेथें विरोधपरिहारार्थ व विषयव्यवस्थादिकांविषयीं सामान्यविशेषलक्षण जो न्याय तोच बलवत्तर होय तो न्याय, अन्वयव्यतिरेकलक्षण जो वृद्धव्यवहार तेणें करून अवगत होतो, यास्तव प्रकृत उदाहरणीं विषयव्यवस्थाच योग्य. याप्रमाणें अन्यत्रस्थळींही विषयव्यवस्था व विकल्पादिक हीं यथासंभव योजावीं.

याप्रमाणेंच सर्वत्र प्रसंगीं प्राप्त झालें असतां अपवाद सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. अर्थशास्त्रापेक्षां धर्मशास्त्र बलवत्तर अशी शास्त्रमर्यादा आहे.

धर्मशास्त्र व अर्थशास्त्र यांचा विरोध आला असतां अर्थशास्त्राचा बाध

१० (पहिल्या प्रकरणाच्या १ ल्या शाखेच्या ३ र्‍या अंकांत) धर्मशास्त्रास अनुसरून इत्यादिक सांगितल्यावरूनच औशनसादिक अर्थशास्त्राचा निरास झाला, यास्तव येथें अर्थशास्त्र म्हणजे धर्मशास्त्रांतर्गत जें राजनीतिलक्षण अर्थशास्त्र

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

तें विवक्षित आहे. त्या **अर्थशास्त्र** व **धर्मशास्त्र** यांच्या प्रतिपादक स्मृतींचा परस्पर विरोध आला असतां **अर्थशास्त्रा**पेक्षां **धर्मशास्त्र** प्रबळ, अशी शास्त्रमर्यादा आहे. जरी **अर्थशास्त्र** व **धर्मशास्त्र** यांचे करणारे एकच होत ह्मणून स्वरूपतः विशेष नाहीं तथापि **प्रमेयरूप** जो धर्म त्यास प्राधान्य आहे, आणि अर्थास **अप्राधान्य** आहे. ह्मणून **अर्थशास्त्रा**पेक्षां **धर्मशास्त्र** प्रबळ, असें त्याचें तात्पर्य. धर्माचें प्राधान्य शास्त्राचे आरंभीं दाखविलें आहे.

तस्मात् **धर्मशास्त्र**, **अर्थशास्त्र** यांचा परस्पर विरोध आला असतां **अर्थशास्त्रा**चा बाधच, तेथें **विषयव्यवस्था** नाहीं, आणि **विकल्प** ही नाहीं. या विषयीं उदाहरण.

स्मृति. ११ **गुरु** किंवा **बाल वृद्ध** अथवा साधारण ब्राह्मण अथवा **बहुश्रुत** ब्राह्मण जरी आहे, आणि तो **आततायी** आला असतां विचार न करितां त्याला मारावेंच. प्रसिद्धपणें किंवा गुप्तपणेंही **आततायी**चा वध झाला असतां मारणाराला कांहीं दोष लागत नाहीं. कारण, याचा राग त्याच्या रागाला मारितो. (हा त्याला मारितो असें नाहीं) — अर्थशास्त्राचें उदाहरण.

स्मृति. तसेंच रणांत **आततायी** आलेला जरी **वेदपारग** असला तरी त्याला मारावेंच. मारिलें असतां ब्रह्महत्येचा दोषी होत नाहीं इत्यादिक **अर्थशास्त्र**.

स्मृति. १२ जर नकळतां ब्रह्महत्या घडली तर तीविषयीं **प्रायश्चित्त** द्वारा शुद्धि सांगितली आहे, परंतु जाणून **प्रमादानें** ब्रह्महत्या घड — धर्मशास्त्राचें उदाहरण

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

ली तर तें पाप कोणत्याही **प्रायश्चित्तानें** जात नाहीं. इत्यादिक **धर्मशास्त्र** आहे.

१३ **धर्मशास्त्र** व **अर्थशास्त्र** यांचा परस्पर विरोध आला असतां **धर्मशास्त्रच** प्रबळ हें युक्त.

१४ खरें परंतु हें (वरच्या २ स्मृतीचें) उदाहरण येथें लागू पडत नाहीं. कारण हे (९ वा १० वा अंक) **एकार्थविषयक** नाहींत, ह्मणून मुळीं दोहों स्मृतींचा परस्पर विरोधच येत नाहीं; यास्तव **बलाबल** विचार करावयास अवसरच नाहीं.

या विषयीं अणखी **उपपादन** करितो.

स्मृति. जेथें धर्माचा उपरोध होत आहे, अशा स्थळीं **द्विजांनीं** शस्त्र धारण करावें, असा उपक्रम करून, आपल्या संरक्षणार्थ, व यज्ञसाहित्याच्या संरक्षणार्थ, तसेंच युद्धांत, आणि स्त्री ब्राह्मण यांच्या वध निवारणासाठीं, **आततायीला अकूट** शस्त्रानें मारणारा **दंडार्ह** होत नाहीं." असें सांगून" त्याचा **अर्थवाद** दाखविण्यासाठीं हा (९ वा) अंक सांगितला. (तो **अर्थवाद** असा कीं) **गुरु बाल** वगैरे हे जरी सर्वात्मना **अवध्य** आहेत तथापि ते **आततायी** आहेत तर त्यांस मारावेंच, यावरून इतरांस मारावें हें सांगायास नको. **कैमुतिन्यायें** करून

द्विजांनीं शस्त्र धारण करण्याचा समय.

---

१ एकार्थविषयक ह्मणजे ज्या विषयीं एका स्मृतींत विधि सांगितला, त्याच अर्थाविषयीं अन्य स्मृतींत निषेध असतो अशीं जीं वचनें तीं येथें एकार्थविषयक नाहींत ह्मणजे असें, ९ व्या अंकांतील स्मृति अर्थवादरूप आहे ह्मणून तिला स्वार्थाविषयीं प्रामाण्य नाहीं.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

चसिद्ध होते.

यास्तव असा **अर्थवाद** सांगितल्यावरून **गुरु,बाल, बहुश्रुत**,वगैरेस मारावें असें त्या (११व्या अंकातल्या) वचनाचें तात्पर्य नव्हे.

सुमंतुवचनही असेंच आहेकीं;" **आततायी**च्या वधाविषयीं दोषनाहीं,परंतु गाय,ब्राह्मण यांच्या वधा खेरीज.

मनुही. **आचार्य,प्रवक्ता**,माता,पिता,**गुरु**,ब्राह्मण,गाई,तपस्वी, यांची **हिंसा** करूंनये.

आसा **आचार्यादिकां**च्या हिंसेचा निषेध केल्यावरून हें (वरचें) वचन सार्थक होतें.अन्यथा केवळ हिंसेचा निषेध **सामान्यशास्त्रा**नेंच सिद्ध आहे(मग एथें सांगण्यानें पुनरुक्त दोष मात्र येतो) **आततायी**चा वध केला असतां वधकरणाराकडे दोषनाहीं, असेंजें (११व्या अंकांतलें) वचन,तेहीं ब्राह्मणादिकांहून भिन्नस्थळींच जाणावें.

स्मृति. १३ आगलावणारा,विषप्रयोगकरणारा,शस्त्रधारी,द्रव्यापहारकरणारा,स्त्रीचेंहरणकरणारा,आणि **क्षेत्रा**चेंहरणकरणारा, असे हेसाहा **आततायी** आहेत. आततायीचे प्रकार.

स्मृति. तसेंच तरवार,विष,अग्नि,यांकडून घात करणारा,शापदेण्याविषयीं हात उगारणारा,मंत्रप्रयोगानेंमारणारा,**राजा**जवळ चहाडी करणारा,भार्येचा अतिक्रम करणारा,दुसऱ्यांचे छिद्र पाहाणारा, **इत्यादिक** सर्व **आततायी** जाणावे.

१४ असें सामान्यतः **आततायी** दाखविले,यास्तव आ आततायीचावधनहोना

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

त्मसंरक्षणासाठीं ब्राह्मणादिक **आततायी**चें हिंसा नहोतां निवारण केलें असतांही **प्रमादा**नें जर ते मारले जातील, तर ते थें **लघुप्रायश्चित्त** द्यावें,पण राजदंड नाहीं, असा निर्णय.

निवारण करावें.

तस्मात् एथें (९ व्या अंकावर) दुसरें उदाहरण सांगितलें पाहिजे तें सांगतो.

स्मृति. १५ सुवर्ण, भूमि यांच्या लाभापेक्षां मित्रलाभ वरिष्ठ, या स्तव मित्रलाभाविषयीं यत्नकरावा." हें **अर्थशास्त्र**" आणि **राजा**नें **धर्मशास्त्रा**स अनुसरून प्रीति, द्वेष यांचा त्याग क रून **व्यवहार** पाहावा." हें **धर्मशास्त्र**" यांचा कचित् **व्य वहारीं** विरोध येतो, तो असा, **चतुष्पाद व्यवहार** चालू झा ला असतां वादिप्रतिवादींतून एकाचा पक्ष धरिल्यानें मित्रप्रा प्ति होती, परंतु **धर्मशास्त्रा**प्रमाणें चोकशी होत नाहीं. दुसऱ्या चा पक्ष धरिल्यानें **धर्मशास्त्रा**प्रमाणें निर्णय होतो, पण मित्रप्रा प्ति होत नाहीं. तर अशास्थळीं **अर्थशास्त्रा**पेक्षां **धर्मशास्त्र** प्रबळ. यास्तवच **धर्मशास्त्र** व **अर्थशास्त्र** हीं दोन्हींही प्रा प्त झालीं असतां **अर्थशास्त्रा**स अनुसरणकरणाराला हेंच

धर्मशास्त्र, अर्थशास्त्र यांचाविरोध.

---

प्रायश्चित्तमयूख १ लघुप्रायश्चित्त ह्मणजे जें कामतः ब्रह्महत्याकरणारास बारावर्षांचे प्रा यश्चित्त सांगितलें आहे त्याच्या अर्धं, ह्मणजे साहावर्षांचें प्रायश्चित्त.

---

२ ११ व्या व १२ व्या अंकांचें उदाहरण सांगितलें तें एकार्थ विषयक न व्हे ह्मणून लागूपडत नाहीं. अतएव दुसरें उदाहरण सांगतो.

---

३ चतुष्पाद व्यवहार ह्मणजे व्यवहाराचे चार अंश त्यांची सांखळी १ ल्या प्रकरणांतील १३ व्या शाखेचे ९ व्या अंकांत पाहावी.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

मोठें **प्रायश्चित्त** आपस्तंबानें दाखविलें आहे, तेथें **द्वादश वार्षिक प्रायश्चित्ताचा परामर्श** होतो.

## शाखा ७

( १ ल्या प्रकरणांतील १२ व्या शाखेच्या १ ल्या अंकात सांगितलें आहे कीं) "वादीनें आपल्या वादाचा पुरावा असेल तो तत्काळ लिहून द्यावा." तो पुरावा कोणता तो एथें सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य. लेख, भोगोटा आणि साक्षी असें **प्रमाण** सांगितलें, यांतून कोणतें न मिळे तर, **दिव्यप्रमाणां**तून एखादें घ्यावें.

### टीका

१ प्रमाण ह्मणजे जेणें करून निर्णय केला जातो तें. तें दोन प्रकारचें. **मानुष** आणि **दिव्य**. त्यांत **मानुष प्रमाण** तीन प्रकारचें. लेख, भोग, आणि साक्षी. त्यांत लेख दोन प्रकारचा. **शासन**, (सरकारी सनद) व **जानपद**. पैकी- प्रमाणांचें निरूपण.

---

आचार. अ. १ शासन - सनद ह्मणजे राजानें निबंध (करबाब, जकात, वगैरे) किंवा भूमि, जें कोणास दान किंवा अणखी प्रकारानें इनाम वगैरे दिलें असेल तें पुढें होणारे राजे यांनीं अविछिन्न चालवावें एतदर्थ जो त्या बद्दल लेख करून दिला जातो. तो असा कीं, राजानें आपल्या वंशाचे शौर्योदार्यादि गुणपूर्वक आपल्या तिघां पूर्वजांचीं नावें व आपलें नाव व दिलेलें जें भूमि किंवा निबंध त्याचें परिमाण. ह्मणजे असें, निबंध असल्यास अमुक बाबेस अमुक रुपये (शेकडा साहोत्रा दाहोत्रा वगैरे) किंवा अमुक उत्पन्नास अमुक. भूमि असल्या

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

शासन लेखाचें स्वरूप पूर्वींच (१ल्या अध्यायांत) सांगितलें आहे. जानपदाचें स्वरूप पुढें (६व्या प्रकरणांत) सांगितलें आहे. साक्षीचें स्वरूपही पुढें (५व्या प्रकरणांत) सांगितलें आहे.

२ शंका—लेख व साक्षी हे शब्दद्वारा **प्रमाण** होतात हें नीटच आहे, पण भोग **प्रमाण** कसा होईल?

३ समाधान—भोगही कांहीं विशेषणांनीं विशिष्ट होत्सा तां स्वत्वाचें साधन जें प्रतिग्रह, क्रय, इत्यादिक, तें सामानाधिकरण्यें करून दाखवितो. यास्तव भोगाचा अनुमान किंवा अर्थापत्तियांत अंतर्भाव आहे, ह्मणून भोग ही **प्रमाण** होतो.

लेखसाक्षीयांचा शब्द प्रमाणांत अंतर्भाव.

---

स अमुक नदीचे दक्षिणेस व अमुक खुणेपासून इतकीं निवर्तनें पश्चिमेसचे अमुक लांबीरुंदीचें क्षेत्र किंवा गांव अमुकशकाचे अमुकसालीं, अमुकपर्वणीस, किंवा अमुककामानिमित्त, अमुकास दिलें असे असें पटावर किंवा ताम्रपटावर लिहून खालीं अमुकाचापुत्र जो अमुक नावाचा मी, त्या मला हें मान्य आहे असें स्वहस्तानें लिहून वर आपल्या मुद्रेनें चिन्हित करून दिला जातो. तें

---

सुबोधिनी. २ शंका अशीकीं, प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, आणि शाब्द, असे चार प्रकारचें जें क्रम प्रमाण आहे त्यांतच या प्रमाणांचा अंतर्भाव, निराळे नाहीं अतएव लेख व साक्षी याचा शब्द प्रमाणांत अंतर्भाव होतो. पण भोगाला कोणत्या प्रमाणांत अंतर्भाव करून प्रामाण्य आणितां

---

सुबोधिनी. ३ समाधान असें कीं, जसा लेखसाक्षीचा शब्दप्रमाणांत अंतर्भाव तसा भोगाचाही अनुमानांत किंवा अर्थापत्तीत अंतर्भाव. तो असा हें क्षेत्रादिक, या मनुष्यानें क्रया दि संपादित असावें कारण याचा बिनहरकत चिरकाल उपभोग आहे ह्मणून हें अनुमान. अथवा ह्या भूमीचा बिनहरकत व बहुकाळ हा उपभोग करीत आहे. यावरून ही भूमि याची क्रयप्रतिग्रहादि संपादित आहे जरही भूमि याची क्रय प्रतिग्रहादि संपादित नसती तर याचा बिनहरकत बहुकाळ उपभोग घडला नसता ही अर्थापत्ति एवंच या दोहों प्रमाणांत भोगाचा अंतर्भाव आहे ह्मणून भोग ही प्रमाणच आहे.

---

४ कांही विशेषणानीं विशिष्ट ह्मणजे ११व्या शाखेच्या ३ अंकांत सांगितलेल्या पांच विशेषणानी युक्त असा

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

मानुषप्रमाण नच मिळे तर दिव्य.

४ लेख, भोग, साक्षी, या तिहींतून एखादेंही न मिळे तर पुढें[1] सांगितलेल्या **दिव्यां**तून एखादें **दिव्य**, जात, देश, काळ, द्रव्य, **इत्यादि**कांच्या तारतम्यानें **प्रमाण** योजावें.

५ तस्मात् **मानुषप्रमाणा**च्या अभावीं **दिव्यप्रमाण**, असें या वचनावरून अवगत होतें. कारण[2] **दिव्यानें** स्वरूप व **प्रामाण्य** हीं **शास्त्रगम्य** आहेत यास्तव ज्या **व्यवहारीं** परस्पर विवाद करणारे दोघे एकदांच **न्यायाधीशा**कडे फिर्याद आले असतां, त्यांतून जरी एक **मानुषप्रमाण** दाखवितो, आणि दुसरा **दिव्यप्रमाण** करूं इच्छितो, तरी **मानुषप्रमाण**च घ्यावें.

कात्यायन. जर एक **मानुषप्रमाण** दाखवितो, आणि दुसरा **दिव्य** करितो, तर **राजानें मानुषप्रमाण** घ्यावें; **दिव्य** घेऊं नये.

वादाच्या एकदेशींजरी मानुषप्रमाण मिळेल तर दिव्य करूं नये.

६ जेथें सकल **साध्यार्था**च्या एकदेशींही जरी **मानुषप्रमाण** संभवेल तरी तेथें **दिव्य** घेऊं नये. जसें, यानें मजपासून १०० रुपये अमुक व्याजानें घेतले आहेत, ते हा परत देत नाहीं, अशी फिर्याद केली असतां प्रतिवादीनें **अपन्हव** केल्यावरून वादी ह्मणतो कीं, रुपये यानें घेतले या विषयीं साक्षी आहेत, परंतु अमुक घेतले, व अमुक व्याज कबूल केलें, या विषयीं साक्षी नाहींत यास्तव **दिव्यें** करून शाबीत करितों. तर मुदला विषयीं साक्षि **प्रमाणा**

---

१ पुढें ह्मणजे संस्कृतांत पुढें सांगितलें आहे, परंतु वहिवाटींत उपयोगी नाहीं ह्मणून या पुस्तकांत घेतलें नाहीं.

---

मुबोधिनी. २ कारण दृष्टप्रमाण संभवत असतां अदृष्ट प्रमाण घेणें अन्याय आहे; यास्तव दिव्यानें स्वरूप व प्रमाण हीं शास्त्रगम्य आहेत, ह्मणून जेथें दृष्टप्रमाण न मिळेल तेथें योजावीं.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

चा पुरावा झाला, तिनक्यानेंच संख्येची व व्याजाची शाबिती झाली. दिव्याची गरज नाहीं.

कात्यायनानेंही असेंच सांगितलें आहे कीं, वादाच्या एकदेशीं जरी मानुषप्रमाण मिळेल तरी तेंच घ्यावें, दिव्यप्रमाण सर्वांशीं पुरावा करावयाजोगें असलें तरी घेऊं नये.

स्मृति. ७ जे गुप्तरूपें साहस करणारे आहेत, त्यांची दिव्यप्रमाणानें चौकशी करावी.

असें जें सांगितलें तेंही मानुषप्रमाणाच्या अभावींच जाणावें.

नारद. अरण्यांत, निर्जनस्थळीं, रात्रीं, अंतर्गृहांत, साहस करणारा, व ठेवीचा अभिलाष करणारा; यांविषयीं दिव्यप्रमाणें करूनच निर्णय संभवतो.

असें जें वचन तेंही मानुषप्रमाणाच्या अभावींच. तस्मात सर्वथा मानुषप्रमाणाच्या अभावींच दिव्यप्रमाणानें निर्णय हें औत्सर्गिक सिद्ध झालें.

परंतु याचें बाधकवचन पाहण्यांत येतें, तें असें.

स्मृति. ८ साहस[१०], वाक्पारुष्य[१७], दंडपारुष्य[१८], आणि दुसरींही जीं बलात्कारानें केलेलीं कार्यें, त्यांविषयीं दिव्यप्रमाणच साक्ष.

तसाच लेख्यादिकांविषयींही कांहीं व्यवहारी नियम पाहण्यांत येतो तो असा.

स्मृति. ९ पूग श्रेणी गण इत्यादिकांची जी स्थिति सांगितली आहे, तिजविषयीं प्रमाण लेखच. दिव्य नाहीं. व साक्षीही ना-

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

हींत.

स्मृति. १० तसेंच द्वार, मार्ग, अंगण, (परस) पाणी जाण्याचा मार्ग, (नळमोरी) इत्यादिक व्यवहारीं भोगवटाच प्रमाण होय. दिव्य नाहीं व साक्षी ही नाहींत.

११ तसेंच ***दत्तानपकर्म. दत्तैप्रदानिक, स्वामिपालविवाद. विक्रीयासंप्रदान, क्रीतानुशय, जुगार, पैज, हे विवाद उपस्थित झाले असतां निर्णया विषयीं साक्षीच प्रमाण. दिव्य नाहीं, लेखही नाहीं.

उभय पक्षीं ही पुरावा असून त्यांतून सबळ कोणता व दुर्बळ कोणता याचा विवेक झाला नसतां दोहों पक्षांतून कोणता पक्ष सबळ तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. सर्वत्र धनव्यवहारीं उत्तरपक्षाचें प्रमाण बलवत्तर

टीका

१२ ऋणादान वगैरे सर्व धनव्यवहारीं उत्तरपक्ष ह्मणजे दुसरा पक्ष शाबीत करणारा जय पावतो. पूर्वपक्ष (वादीचा पक्ष) शाबीत झाला तरी वादी पराजित होतो.

जसें;–सावकार (कुळाला कांहीं निष्क देऊन खत घेऊन

---

*** ह्या अंकावरून तीं तीं प्रकरणें घ्यावीं.

## प्रकरण २
## असाधारणव्यवहारमातृका.

त्यावरून निष्क) दिल्हेले शाबीत करितो, कूळही (पावती दाखवून) परत दिल्हेलें शाबीत करितो, तर सावकाराजवळ खत व कुळाजवळ पावती असा दोहों पक्षीं पुरावा असतांही पावतीचा पुरावा मुस्तकीम, ह्मणून पावती दाखविणारा जय पावतो.

(तसेंच, कुळानें सावकारापासून प्रथमतः) शेंकडा दुहोत्रा व्याजीं १०० (निष्क) घेऊन पुढें (सावकाराच्या निकडीमुळें व आपल्या गरजेस्तव त्याच शेंकड्याला) तिहोत्रा व्याज कबूल केलें; तर अशास्थळीं उभयपक्षीं पुरावा असतांही तिहोत्रा व्याजाची कबुलात (उत्तरपक्ष) च सबळ होय. कारण, पाठीमागून केलेला व्यवहार ह्मणून; व पहिल्या वादाचा बाध केल्यावांचून उत्तरवादाची सिद्धि होत नाहीं, असें आहे.

स्मृत्यंतरींही असेंच सांगितलें आहे कीं, पूर्वपक्षाचा बाध केल्यावांचून उत्तरपक्षाची सिद्धि होत नाहीं.

### शाखा ८

याचें (१२व्या अंकाच्या वचनाचें) बाधकवचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. गहाण, प्रतिग्रह, क्रय, या व्यवहारीं पूर्वपक्षाचें प्रमाण बलवत्तर होय.

टीका.

१ गहाण, प्रतिग्रह, खरेदी, या तिंहीं व्यवहारीं पूर्वपक्षच जय पावतो. तो प्रकार असा, एकच क्षेत्र प्रथमतः एकाजवळ गहाण ठेवून कांहीं द्रव्य घेऊन पुनः तेंच क्षेत्र दुसऱ्यापा

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

शीं गहाण ठेवून अणखी द्रव्य घेतो, तर अशा **व्यवहारीं** पहिल्यानें ज्यापाशीं गहाण ठेविलें आहे त्याचेंच तें गहाण हो तें, दुसऱ्या गहाण ठेवणाराचें नाहीं. याप्रमाणेंच **प्रतिग्रह**, **क्रय** याविषयीं जाणावें.

२ शंका — एकापाशीं गहाण ठेवलेल्यावर तें सुटे पर्यंत त्याजवर (मालकाचें) **स्वत्वच** नाहीं, ह्मणून त्याचें पुनः गहाण ठेवणेंच संभवत नाहीं. याप्रमाणेंच दिल्हेल्याचें पुनः **दान** व विकलेल्याचा पुनः **विक्रय** ही संभवत नाहीं. तस्मा त् हें (१ल्या अंकाचें) वचन निरर्थक झालें.

३ समाधान — एकाजवळ गहाण ठेवलेल्यावर ज री मालकाचें **स्वत्व** नाहीं तथापि अज्ञानानें किंवा लोभानें जर एखादा त्याचेंच फिरून गहाण वगैरे करितो, तर तशा स्थ ळीं पहिल्यानें गहाण ठेवणाराचा पुरावा मुस्तकीम, ह्मणून **न्यायमूल**च हें वचन असें जाणावें.

## शाखा १

### कांहीं विशेषणांनीं विशिष्ट असा भोगवटा

---

सुबोधिनी. १ येथें न्याय ह्मणजे एकाजवळ गाहाण ठेवलेल्याचें दिल्हेल्याचें विकलेल्याचें पुनः गहाण, दान, विक्रय, करण्याविषयीं मालकाचें स्वत्व संभवतनाहीं अशी (रीति) आहे, हाच न्याय.

---

सुबोधिनी. २ कांहीं विशेषणांनीं विशिष्ट ह्मणजे बिनहरकत चिरकालिक वगैरे ११व्या शाखेच्या ३ऱ्या अंकांत सांगितलेला.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

**प्रमाण**, असें सांगतानां कांहीं प्रकारचा भोग कार्यंतिरास उपयोगी होतो, तें सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य. आपल्या समक्ष स्थावराचा तिन्हाईत उपभोग करीत असतां मालक प्रतिबंध करीत नाहीं, अशीं वीस वर्षें गुजरलीं तर मालकाच्या स्थावराची हानि होती. याप्रमाणेंच जंगमाविषयीं दाहा वर्षें गुजरल्यास हानि होती.

### टीका.

१ तिन्हाईत मालकाच्या समक्ष अविच्छिन्न वीस वर्षें स्थावराचा तसाच दाहा वर्षें हत्ती घोडा वगैरे जंगमाचा उपभोग करीत आहे, व मालक "माझें हें स्थावर तूं वहिवाटूं नको असा" निषेधही करीत नाहीं, तर अविच्छिन्न वीस वर्षें उपभोगिल्यामुळें मालकाचें स्थावर हानि[1] पावतें; व जंगम दाहा वर्षें उपभोगिल्यामुळें हानि[1] पावतें. (उपभोगणाराचें तें होतें) — स्थावराचा वीस वर्षें व जंगमाचा दाहा वर्षें भोग वटा झाला असतां मालकाची नाहींशीं होतात

२ शंका — भोगणारास निषेध (द्वाही वगैरे) न केल्यानें मालकाचें **स्वत्व** नाहींसें होतें, असें सांगणें सयुक्त नाहीं. कारण, **दान, विक्रय इत्यादिक** जसें मालकाच्या **स्वत्व**नाशास कारण असें लोकांत व शास्त्रांत प्रसिद्ध आहे, तसें निषेध न करणें हेंही एक **स्वत्व**नाशाचें कारण, असें लोकांत व शास्त्रांत प्र

---

१ हानि पावतें ह्मणजे मालकाची सत्ता जाऊन उपभोग करणाराची सत्ता होती, असा अर्थ घेऊन येथें विचार चालला आहे, पण मालकास उत्पन्न मिळणार नाहीं असें पुढें १४ व्या अंकांत सांगितलें आहे.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

सिद्ध नाहीं.

३ वीस वर्षे भोगवटा झाल्यानें भोगणाराचें **स्वत्व** उत्पन्न होतें ह्मणावें तर असें ह्मणणें नीट नाहीं. कारण, स्वत्वाविषयीं उपभोग **प्रमाण** नाहीं. यद्यपि **प्रमाण** झाला तरी **स्वत्वा**चा **उत्पादक** होणार नाहीं; **ज्ञापक** मात्र होतो. (कारण जें जें **अनुमानादिक प्रमाण** तें तें **प्रमेयाचें उत्पादक** होत नाहीं, **ज्ञापक** मात्र होतें.) आणि जिंदगी, खरेदी, विभाग **इत्यादिक** जीं **स्वत्व** उत्पन्न होण्याचीं साधनें गौतमानें सांगितलीं आहेत, त्यांत भोग सांगितला नाहीं.

गौतम. [1] जिंदगी, [2] (**रिक्थ**) खरेदी, [3] वांटा, [4] **परिग्रह**, [5] **निधिप्राप्ति**, व ब्राह्मणाला [6] **प्रतिग्रह प्राप्त**, क्षत्रियाला **विजय प्राप्त**, आणि वैश्यांस वाट आणि शूद्रांस **सेवालब्ध**. स्वत्व उत्पन्न होण्याचीं साधनें आठ आहेत.

अशीं आठच **स्वत्वोत्पत्तीचीं** साधनें गौतम सांगतो त्यांत भोग सांगत नाहीं.

४ वीस वर्षांचा भोगवटाच **स्वत्व** उत्पन्न करितो असें हेंच (१ल्या अंकाचें मूळ) वचन प्रतिपादन करितें, असें ह्मणणें ही योग्य नाहीं. कारण, **स्वत्व** व **स्वत्वाचीं** कारणें लोकसिद्ध आहेत; **शास्त्रगम्य** नाहींत. ह्मणून वचनें करून सांगायास नकोत. हें ७ व्या प्रकरणीं (१ल्या शाखेंत) विशद सांगि-

---

या वचनाचा विशद प्रकार ७ व्या प्रकरणीं १ल्या शाखेच्या १८व्या अंकांत सांगितला आहे.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

तलें आहे तर गोतमवचनांत कां सांगितलीं ह्मणाल तर इतकीं स्वत्व कारणें आहेत असा नियम बांधण्यासाठीं मात्र.

५ दुसरें असें कीं, जर आगमविरहित भोगवटा सत्ता उत्पन्न होण्याविषयीं कारण मानिला, तर खालीं सांगितलेल्या स्मृतीस विरोध येतो.

स्मृति. जो दुसऱ्याचा (स्थावर किंवा जंगम) माल आगमावांचून शेंकडों वर्षे वहिवाटतो, त्याला राजानें चोराच्या दंडानें शिक्षा करावी.

६ जर हें (वरचें) वचन मालकाच्या परोक्ष उपभोगाविषयीं, आणि या शाखेच्या १ ल्या अंकांतलें वचन समक्ष भोगाविषयीं, ह्मणावें, तर असेंही ह्मणणें युक्त नाहीं. कारण, वरच्या स्मृतींत समक्ष उपभोग किंवा परोक्ष उपभोग असा विशेष निर्देश सांगितला नाहीं.

कात्यायन वचनही असेंच आहे कीं, पशु, स्त्री, पुरुष इत्यादिकांच्या ग्राहकानें किंवा त्याच्या पुत्रानें बलात्कारें त्याचा (पशुवगैरेचा) उपभोग घेऊं नये, असा धर्म व्यवस्थित आहे.

जरी समक्ष उपभोग केला, तरी तो मालकाची सत्ता नाहींशी करण्याविषयीं कारण नाहीं, ह्मणून स्वत्वहानि संभवत नाहीं.

---

१ ह्मणजे जर स्वत्व व स्वत्वाचीं साधनें लोकसिद्ध आहेत तीं वचनें करून सांगायास नकोत मग गौतमानें कां सांगितलीं ह्मणाल तर

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

७ "गहाण, **प्रतिग्रह**, **क्रय**, या व्यवहारीं **पूर्वपक्ष** सबळ" असें (८ व्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगितलें, त्यांचें बाधक हें (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकांचें) वचन ह्मणजे एक स्थावर किंवा जंगम एकापाशीं गहाण गुंतवून अणखी दुसऱ्यापाशीं गहाण गुंतविलें, तर दुसऱ्यानें गहाणघेणारा जो त्याणें त्या स्थावराचा वीस वर्षे व तशा धनाचा दाहा वर्षे उपभोग केल्यामुळें **उत्तरपक्ष** (उपभोगणारा) जय पावतो. असें हें (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचें मूल) वचन प्रतिपादन करितें. असें मानावें तर असेंही ह्मणतां येत नाहीं. कारण, एकापाशीं गहाण वगैरे ठेवलेलें दुसऱ्यापाशीं गहाण वगैरे करणें हा वस्तुत: **उत्तरपक्ष** च नव्हे. कारण, जें आपलें असेल तेंच गहाण ठेवावें, विकावें, किंवा **दान** करावें. व गहाण ठेवलेल्यावर, विकलेल्यावर, **दान** केलेल्यावर, पूर्वमालकाचें **स्वत्व** च नाहीं. आणि ज्यावर **स्वत्व** नाहीं त्याचें **दान प्रतिग्रह** केले असतां दंड सांगितला आहे.

स्मृति. जें द्यावयास योग्य नव्हे, तें देणारा व जें **प्रतिग्रहास** योग्य नव्हे, तें घेणारा त्या दोघांसही चोराप्रमाणें शिक्षा करून **उत्तमसाहस** दंड करावा.

तसेंच जर हें (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकानें) वचन गहाण वगैरे तिहींचें (८ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचें) बाधक मानिलें, तर याचें (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचें) हो जें बाधक पुढें (१० व्या शाखेच्या १ ल्या २ ऱ्या अंकांत) सांगितलें आहे, त्याची उपपत्ति होणार नाहीं.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

८ तस्मात् वीसवर्षे उपभोग केल्यामुळें मालकानें स्थावर व जंगम दाहा वर्षें उपभोग केल्यामुळें हानि पावतें. असें (९ व्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितलें, त्याची उपपत्ति होत नाहीं; व **व्यवहारहानि** ही होत नाहीं. कारण,

नारद. उपेक्षा करून उगीच राहतो (ह्मणजे निषेध करीत नाहीं) अशीं जर वीस वर्षे भूमी विषयीं व दाहा वर्षे धना विषयीं अतिक्रांत झालीं, तर मालकाचा वाद लागू होत नाहीं.

अशी नारदानें उपेक्षे विषयीं योग्य कारण नसतां उपेक्षा केली सबब **व्यवहारहानि** मात्र सांगितली; **वस्तुहानि** सांगितली नाहीं.

मनूनेंही. हा सज्ञान व **प्राप्तव्यवहार** असतां याच्या समक्ष ज्या भूमि वगैरेचा उपभोग केला, त्याची **व्यवहारहानि** झाली. तें द्रव्य उपभोग करणाराचें होय.

अशी **व्यवहारहानि** दाखविली. **वस्तुहानि** नाहीं.

९ **व्यवहारहानि** ह्मणजे अशी, उपभोगणारा ह्मणतो कीं, हा सज्ञान व **प्राप्तव्यवहार** अला असतां याच्या समक्ष अविछिन्न बिन हरकत वीस वर्षे मी उपभोग करीत आलों, आणि याविषयीं साक्षीही आहेत. जर यानें द्रव्य (स्थावरजंगम) अन्यायानें मी उपभोग करीत आलों, तर हा इतके दिवस कां उगीच राहिला. तेव्हां मालक निरुत्तर होतो. याप्रमाणें निरुत्तर झाला तरी, त्याचा वास्तवीक **व्यवहार** चालू होतोच. कारण "कृत्रिम काढून वास्तवार्थास अनुसरून **राजानें** चौकशी करावी"

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

असा नियम आहे.

१० जरी त्या उपभोगिल्या द्व्यावरील मालकाची सत्ता नाहींशी होत नाहीं व **व्यवहारहानि** ही होत नाहीं. तथापि पाहत असून हरकत नकरितो तर **व्यवहारहानी**ची शंका होईलच. ती नव्हावी ह्मणून उगीच राहूं नये. एतदर्थ हें (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचें) वचन, असें मत ह्मणावें, तर तेंही नव्हे. कारण, **स्वत्वोत्पत्ती**च्या शंके विषयीं **स्मार्तकालिक**[1] उपभोग कारण होत नाहीं. (कारण, साक्षी वगैरेचा संभव आहे ह्मणून)

११ (समक्ष उपभोग करीत असतां) उगेंच राहूं नये, इतकेंच सांगण्याचें प्रयोजन ह्मणावें तर, वचनांत[2] वीस वर्षांचा व दाहा वर्षांचा निर्देश केला आहे तो निरुपयोगी होईल.

१२ वचनांत विसां वर्षांचा निर्देश एतदर्थ केला कीं, उपभोगणारापाशीं जें गहाणपत्र वगैरे पत्र आहे (तें खोटें आहे तरीं) त्यावर विसां वर्षांपुढें मालक **दोषोद्भावन** करूं लागेल तर लागू पडणार नाहीं. उपभोगणारापाशीं खोटें जरी असलें तरी तें वीस वर्षांनंतर निर्दोष होतें.

कात्यायन. मालक प्रतिबंध करावयास समर्थ असतांही त्याच्या समक्ष ज्या लेखाच्या आधारानें उपभोग केला जातो. तें **पत्र**[3]

---

सुबोधिनी. १ स्मार्तकालिक उपभोग ह्मणजे हा माझें क्षेत्रादिक, प्रतिग्रहादिक, स्वत्व हेतु नसतां धटाईनें उपभोग करीत आहे, असा स्मरणयोग्य कालीन भोगवटा.

२ वचनांत ह्मणजे ९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचे मूळवचनांत.

३ गहाणपत्र, दानपत्र, खरीदपत्र, इत्यादिक.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

(उपभोगासुद्धां) वीसवर्षे अतिक्रांत झाल्यावर निर्दोष झालें.

असेंही ह्मणतां येत नाहीं. कारण, ९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचें बाधक असें "गहाण सीमा वगैरे" प्रतिपादक वचन पुढें (१० व्या शाखेच्या १ ल्या २ ऱ्या अंकांत) सांगितलें आहे. तेथेंही "वीसवर्षे झाल्यावर मालक पत्रावर **दोषोद्भावन** करूं लागेल तर चालणार नाहीं" हा न्याय लागू पडेल, सबब बाधकवचन संभवणार नाहीं.

कात्यायन. १३ वीसवर्षे गहाण अविछिन्न भोगिलें असतां त्या गहाणपत्रानेंच उपभोगणाराची सत्ता सिद्ध होती. वीसवर्षानंतर तें गहाणपत्र निर्दोष होतें. तसेंच, सीमाविवादाचा निर्णय केल्यानंतर जें **सीमापत्र** केलें जातें, त्याविषयीं तकरार करणें असल्यास वीसवर्षेपर्यंत करावी, पुढें नाहीं. — शिंवेच्या निंवाडपत्राविषयीं

या प्रमाणेंच जंगमाच्या हानीविषयीं दाहा वर्षांचा अवधि (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगितला, त्याचाही निरास झाला.

तस्मात् या (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाच्या) वचनाचा दुसरा अर्थ सांगितला पाहिजे तो सांगतो.

१४ येथें[१] वीस वर्षानंतर स्थावराची व दाहा वर्षानंतर जंगमाची हानि होती. ह्मणजे त्याचें उत्पन्न मालकास मिळणार नाहीं (भोग — स्थावराचें उत्पन्न विसां वर्षांपुढें व जंगमाचें उत्पन्न दाहा वर्षांपुढें मिळणार नाहीं.

---

१ येथें ह्मणजे ९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाच्या मूल वचनांत.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

णारा घेईल.)

सत्ता नाहींशी होती, किंवा **व्यवहारहानि** होती, असें नाही. ह्मणजे असें, बिन हरकत वीस वर्षे उपभोग झाल्यानंतरही जरी मालक न्यायेंकरून आपलें **क्षेत्रादिक** पावतो, तथापि त्यानें उत्पन्न मिळणार नाहीं. कारण, निषेध (द्वाही) न करणें हा मालकाचाच अपराध ह्मणून, व या (९व्या शाखेंतील १ ल्या अंकाचे) वचनावरूनही,

१५ परोक्ष उपभोग आहे तर विसां वर्षांपुढेंही मालकास उत्पन्न मिळतेंच. कारण, त्याच (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचे) वचनांत "मालकाच्या समक्ष" असें ह्मटलें आहे.

मालकाच्या परोक्ष भोगवटा असल्यास विसा वर्षांपुढें उत्पन्न मिळतें.

समक्ष उपभोग असून मालक निषेध करीत आहे तर, विसां वर्षांनंतरही मालकास उत्पन्न मिळेल. कारण, त्याच (१ल्या) अंकांत "माझें हें स्थावर तूं वहिवाटूं नको, असा निषेध करीत नाहीं तर" असें सांगितलें आहे.

वीस वर्षांच्या आंत तर समक्ष उपभोग, व बिनहरकत उपभोग, असला तरी उत्पन्न मिळतेंच. कारण, त्याच वचनांत वीस वर्षांचा अवधि दाखविला आहे.

१६ शंका —— **क्षेत्रादिक** द्रव्यावर जसें मालकाचें **स्वत्व** आहे, तसें त्याच्या उत्पन्नावरही **स्वत्व** आहेच मग "उत्पन्न मिळणार नाहीं" असें सांगणें अगदींच संभवत नाहीं.

१७ समाधान —— खरें, परंतु त्या उत्पन्नाचा नाश न होतां तसेंच राहील तर. जसें, जे त्या **क्षेत्रा**पासून उत्पन्न झाले जे सुपारी

# प्रकरण २

# असाधारणव्यवहारमातृका.

फणस (अंबा) वगैरे वृक्ष, त्यांवर मालकाचें **स्वत्व** आहे, तसें वृक्षादिकांपासून उत्पन्न जें (फलादिक) त्यावर **स्वत्व** नाहीं. कारण, तें उत्पन्न उपभोगानें नष्ट झाल्यामुळें उत्पन्नावरचें **स्वत्व** ही उपभोगाबरोबरच नाश पावलें, सबब उत्पन्न मिळणार नाहीं.

स्मृति. जो शेंकडों वर्षें **आगमा** वांचून उपभोग करितो, त्या दुष्टाला **राजा**नें चोराप्रमाणें शिक्षा करावी.

या वचनावरून उपभोग करणारानें जें उत्पन्न उपभोगिलें असेल त्याचें मोल ठरवून तितकें द्रव्य द्यावें असें प्राप्त झालें, परंतु "वीस वर्षें उपभोग झाल्यामुळें हानि पावतें" अशा १ ल्या अंकाचे वचनानें या स्मृतीचा बाध केला. राजदंड तर विसां वर्षांपुढेंही आहेच. कारण, **आगम** नसतां उपभोग केला सबब, व (राजदंड न घेण्या विषयीं) बाधक वचनही नाहीं, ह्मणून.

१८ तस्मात् मालकानें उपेक्षा केली या त्याच्या अपराधामुळें वया (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाच्या) वचनावरूनही विसां वर्षांपुढें स्थावरानें उत्पन्न मालकास मिळणार नाहीं असें सिद्ध झालें.

या प्रमाणेंच जंगमाविषयीं दाहा वर्षांचा प्रकार जाणावा.

## शाखा १०

यानें (९ व्या शाखेच्या १ ल्या अंकाच्यावचनानें)

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

बाधक वचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. गहाण, सीमा, ठेव, **जडधन बालधन** यांवांचून तसें, **उपनिधि** राजधन **स्त्रीधन श्रोत्रिया**चें धन यांवांचून ही.

टीका.

१ गहाण, सीमा, ठेव, **अज्ञानधन** व **बालधन** तसेंच **उपनिधि**, राजधन, **स्त्रीधन**, आणि **श्रोत्रिया**चें धन, यांवांचून

गहाणसीमावगैरेचाउपमालकानमक्ष झालातर त्याचें नुकसान होतना

ठेव ह्मणजे रूप व संख्या दाखवून जें संरक्षणार्थ दुसऱ्याजवळ ठेवलेलें द्रव्य ती.

नारद. आपलें द्रव्य निःशंकपणें विश्वासानें एखाद्यापाशीं जें ठेविलें जातें, तें ठेव या नावाचें **व्यवहार** प्रकरण सांगितलें आहे.

२ सदरहू गहाण वगैरे विषयीं मालक समक्ष असून निषेध करीत नाहीं, तरी स्थावराचें वीस वर्षांपुढें व धनाचें दाहा वर्षांपुढें देखील उत्पन्न मालकास मिळतें. कारण, उत्पन्न नमिळण्याविषयीं मालकाचा अपराध नाहीं, व त्या त्या द्रव्याविषयीं उपेक्षा करण्याचें निरनिराळें योग्य कारणही आहे.

३ गहाणाचा तर गहाण ठेवल्यामुळेंच उपभोग घडतो, सबब उपेक्षेविषयीं मालकाचा अपराध नाहीं:

४ सीमा तर बहुत वर्षे टिकाया जोगी अशा कोंडा कोळसे वगैरे चिन्हांनीं सुसाध्यच आहे सबब उपेक्षा संभवती.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

ठेव व निधि यांचा उपभोगच निषिद्ध आहे, सबब त्या निषे धाचा अतिक्रम करून उपभोग घडेल, तर उपभोगणारापासून मा लकास सव्याज उत्पन्न मिळेलच, ह्मणून उपेक्षा संभवती.

५ **अज्ञानधन** व **बालधन** यांच्या उपेक्षेविषयीं तर अज्ञानपणा व बाळपणा हेंच कारण आहे, ह्मणून उपेक्षा होणें सयुक्त आहे.

६ राजधनाविषयींही **राजा** अनेक कार्यांत व्यग्र असतो, सबब उपेक्षा संभवती.

७ **स्त्रीधना**विषयीं तर स्त्रियांचें अज्ञान व अप्रौढपणा हेंच उपेक्षेला कारण आहे.

८ **श्रोत्रिया**च्या धनाविषयीं **श्रोत्रिय** अध्ययन, अध्यापन व अर्थविचार, अनुष्ठान, यांत निमग्न असल्यामुळें उपेक्षा युक्तच आहे.

९ तस्मात् गहाण, सीमा, वगैरे (१ल्या अंकांत सांगि तलेल्या) सर्वांविषयीं उपेक्षेचीं योग्य कारणें आहेत, ह्मणून मालकासमक्ष बिनहरकत उपभोग झाला तरी, कधींही उ त्पन्नाची हानि होत नाहीं.

गहाण, सीमा, वगैरेचा अपहार करणारा
विषयीं दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. गहाण वगैरेचा अपहार करणारापासून मालकाचें द्रव्य परत देवबून तितकाच दंड घ्यावा किंवा शक्त्यनुसार घ्यावा.

# प्रकरण २
## असाधारणव्यवहारमातृका.

### टीका.

गहाणसीमा वगैरेचा अपहार करणारास दंड.

१० गहाण, सीमा, ठेव, **अज्ञान धन**, **बालधन**, **निधि**, राजधन, **स्त्रीधन**, आणि **श्रोत्रियाचें** धन, हीं बहुत वर्षे उपभोग केल्याच्या बळानें उपभोगणारा जर अपहार करितो, तर त्यापासून मालकाचें **विवादास्पदीभूत** द्रव्य देववून "हा **अनुवाद** केला" तितकाच राजदंड घ्यावा "हा **विधि** सांगितला."

११ जरी घरें, शेत, **इत्यादिक** स्थळीं **विवादास्पदीभूत** द्रव्याइतका राजदंड संभवत नाहीं, तथापि "मर्यादेचा भेद केला असतां **प्रथमसाहस** दंड, सीमेचा अतिक्रम केला असतां **उत्तमसाहस** दंड, आणि **क्षेत्राचें** हरण केलें असतां **मध्यमसाहस** दंड" असा पुढें (८व्या प्रकरणीं ५व्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितलेला योजावा.

तितक्यानें दर्पशम होत नाहीं तर अधिक दंड राव.

१२ जर **विवादास्पदीभूत** द्रव्याइतका दंड केल्यानें अपहार करणाराचा दर्पशम होत नाहीं, तर पुष्कळ धनदंड करावा. बहुधनानें ही दर्पशम होत नाहीं, तर त्याच्या शक्तीप्रमाणे दंड करावा. सारांश जितक्या दंडानें अपहारकरणाराचा दर्पशम होईल तितका दंड करावा. कारण, गौतमानें "दंड ह्मणजे दमन करणें, असें सांगितलें आहे, त्या दंडानें उद्धटांस शिक्षा करावी." असा दंडशब्द **दमनवाचक** केला आहे.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

१३ ज्याला त्या (**विवादास्पदीभूत**) द्रव्या इतका ही दंड देण्याची शक्ति नाहीं, त्यालाही जितका दंड केल्यानें पीडा होईल तितका करावा.

जितकें द्रव्य देण्याची शक्ति नसल्यास पीडा होई ल तितका दंड.

१४ ज्यापाशीं काहींच द्रव्य नाही, त्याला **धिग्दंड इत्यादिकें** करून शिक्षा करावी.

धनदंड देण्याची शक्ति नसल्यास धिग्दंड वगैरे दंडाचे प्रकार

मनु. प्रथमतः **धिग्दंड**[*१] करावा, दुसरा **वागदंड** करावा, तिसरा धनदंड करावा, याहून पुढें **वधदंड** करावा.

१५ **वधदंड** ही ब्राह्मणां वांचून इतरांस नऊ प्रकारचा सांगितला आहे, यालाच **शारीरदंड** ह्मटलें आहे.

मनु. **उपस्थ**[१], उदेर[२], जीभ[३], हात[४], पाय[५], डोळे[६], नाक, कान, देह (वध) आणि धनदंड अशीं स्वायंभू मनूनें दंडाचीं दाहा स्थानें सांगितलीं आहेत. परंतु तीं तीन (क्षत्रिय, वैश्य, शूद्र) वर्णांविषयीं मात्र. ब्राह्मणास तर **शारीरदंड** न करितां घालवावें.

शारीर दंडाचीं९स्थानें आहेत.

१६ या इतक्या अवयवांतून ज्याज्या अवयवाकडून अपराध घडला असेल त्यालाच पीडा करावी. अथवा त्यापासून मजूरी घ्यावी किंवा बंदिशाळेंत पाठवावें.

मजूरी घ्यावी किंवा बंदीशाळेंत पाठवावें.

कात्यायन. धनदंड देण्यास शक्ति नाहीं असें समजल्यास आपल्या स्वाधीन ठेवून मजूरी करवावी. मजूरी करावयाची शक्ति नसेल तर बंदिशाळेंत पाठवावें; परंतु ब्राह्मणां वांचून

१७ ब्राह्मणाला जर धनदंड देण्याचें सामर्थ्य नाहीं, तर त्याला त्याचें काम करूं देऊं नये (वगैरे खालीं गौतम वचनांत

ब्राह्मणास धनदंड देण्याची शक्ति नसल्यास कोणती शिक्षा.

---

*१ धिग्दंड ह्मणजें धिक्कार करणें आणि वाग्दंड ह्मणजे शब्दानी निर्भर्त्सना करणें

# प्रकरण २
# असाधारणव्यवहारमातृका

सांगितलेल्या शिक्षा योजाव्या.

गौतम. ब्राह्मण जर अन्यायवर्ती झाला, तर त्याचा जो व्यापार असेल तो त्याला करूं देऊं नये. त्याच्या अपराधाची (जाहिरनामा, दवंडी वगैरे करून) प्रसिद्धि करावी, डाग द्यावा, हांकून द्यावा.

नारद ही "वध. सर्वस्वहरण, गांवांतून हांकून देणें, डाग देणें, व ज्या अवयवानें अपराध केला असेल तो तोडणें, असा **उत्तमसाहस** दंडाचा **विधि** सामान्यतः सर्वांस समान सांगितला आहे. असें सांगून "ब्राह्मणाला **वधा**वांचून दंड करावा. कारण, ब्राह्मण **वधदंडास** योग्य नाहीं; त्याला **शिरोमुंडन**, गांवांतून हांकून देणें, कपाळीं डाग देणें, गाढवावर बसवून फिरविणें, (धिंड काढणें) हे दंड करावे."

ब्राह्मण वधदंडास योग्य नाहीं ह्मणून त्याला दुसरे दंड करावे.

१८ डाग देण्याविषयीं व्यवस्था सांगितली आहे ती अशी

मनु. **गुरुतल्पगमना**विषयीं **भगाकार** डाग द्यावा; मद्यप्राशनाच्या (अपराधाविषयीं) **सुराध्वजाकार** डाग द्यावा; **स्तेया**[3]विषयीं **श्वपदाकारानें** डागावें; ब्रह्महत्यारीला **कबंधाकार** डागावें.

डाग देण्याची व्यवस्था

---

१ एथें गाढवावर बसवून फिरविणें असें सांगितलें. संस्कृतांत "खयाणं गर्दभेन च" असें सांगितलें तेथें तृतीयेचे दोन अर्थ होतात. साहार्थी तृतीया आणि करणीं तृतीया. सहार्थी तृतीया केली तर, गाढवाबरोबर फिरविणें असा अर्थ होतो. करणीं तृतीया घेतली तर, सदरीं लिहिल्या प्रमाणें अर्थ होतो.

२ एथें सामान्यतः डाग द्यावा असें सांगितलें परंतु अन्यवचनावरून कपाळीं डाग द्यावा असें सिद्ध आहे.

३ स्तेय ह्मणजे एथें सुवर्णस्तेय घ्यावें.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

आपस्तंब. ब्राह्मणाचा **चक्षुर्निरोध** करावा.

असें जें वचन आहे त्याचा अर्थ असा कीं, ब्राह्मणाला गावांतून बाहेर घालवितेवेळेस वस्त्रादिकेंकरून त्याचे डोळे बांधावे. असा त्याचा अर्थ. केवळ डोळे काढावे असें नाहीं. अन्यथा "ब्राह्मणास क्षत न होतां घालवावें" व "ब्राह्मणाला **शारीर** दंड नाहीं" **इत्यादिक** जीं मनुगौतम वचनें आहेत, त्यांस विरोध येईल.

### शाखा ११

भोग **स्वत्वसमानाधिकरण** आहे ह्मणून **स्वत्वा**विषयीं **प्रमाण** असें (१० व्या शाखेंत) सांगितलें परंतु नुसता[1] भोगवटा क्वचित् स्थळीं **स्वत्वा**वांचून ही घडतो, ह्मणून कसा भोगवटा असल्यास तो **प्रमाण** होतो, हें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य भोगापेक्षां **आगम** बलवत्तर **प्रमाण**, परंतु तो भोगवटा **पूर्वक्रमागत** नसेल तर.

टीका

१ **आगम** ह्मणजे सत्ता उत्पन्न होण्याचें जें **प्रति**- भोगवटा आगमसहित असला तर प्रमाण.

[1] नुसता ह्मणजे पुढें २ऱ्या अंकांत सांगितलेल्या विशेषणावांचून.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

**ग्रह** खरेदी वगैरेसाधनतो. तो भोगाहूनहीसबळ **प्रमाण** होतो. कारण, सत्ता समजण्याविषयीं भोगवटा **आगम** सहित असला तरच कारण होतो; तुसता भोगवटा होत नाहीं.

नारद. ज्या भोगवट्याचा **आगम** शुद्ध आहे, तोच भोगवटा **प्रमाण** होतो. ज्याचा **आगम** शुद्ध नाहीं, तो भोग **प्रमाण**च होत नाहीं.

२ नुसत्या भोगवट्यावरून **स्वत्वा**चा निश्चय करवत नाहीं. कारण, परकीयद्रव्याचा अपहारादिकें करूनही उपभोग संभवतो. आगमावांचूनतुसताभोगवटाप्रमाणनाहीं.

स्मृति. जो केवळ भोगवटामात्र शाबीत करितो, परंतु **आगम** दाखवीत नाहीं. तर तो (उपभोगणारा) भोगवट्याच्या मिषानें त्या द्रव्याचा चोर समजावा.

३ यास्तव **आगम**[1]सहित, चिर[2]कालिक, अ[3]विछिन्न, बिन[4]हरकत, आणि प्रतिवादीच्या समक्ष, असा पांचा विशेषणांनीं युक्त भोगवटा **प्रमाण** होतो, असें सिद्ध झालें. भोगवटाकसाअसल्यासप्रमाणहोतो.

स्मृत्यंतर. **आगम** सहित, चिरकालिक, अविछिंन, बिनहरकत, आणि प्रतिवादीच्या समक्ष, असा पांच प्रकारचा भोगवटा.

कचित्स्थळीं **आगमनिरपेक्ष** भोगही **प्रमाण** होतो असें सांगतो.

४ तिहीं पिढ्यांपासून क्रमानें चालत आलेला जो भोगवटा त्यावांचून **आगम** सबळ. **पूर्वक्रमागत** भोगवटा तर **आगमा**पेक्षांही अधिक म्हणजे **आगमनिरपेक्ष प्रमाण** तिहीपिढ्यांचाभोगवटाआगमज्ञानावांचूनहीप्रमाणहोतो.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

होतो. **आगमनिरपेक्ष** ह्मणजे ज्या भोगाविषयीं **आगम** जाणण्याची गरज नाहीं असा. परंतु **स्वत्व** ज्ञान झालें पाहिजे ते **स्वत्व** ज्ञान तिही पिढ्यांच्याभोगावरूनच अवगत होतें.

५ हा प्रकार (४ था अंक) **अस्मार्तकाल** भोगवट्या विषयीं जाणावा. आणि १ ला अंक **स्मार्तकाल** भोगवट्या विषयीं.

शंभर वर्षांचे आंत आगमसहित भोगवटा प्रमाण होतो.

यास्तव स्मरणयोग्य कालीं **योग्य प्रमितीची अनुपलब्धि** आहे, ह्मणून हा भोगवटा **आगमा** वांचून आहे, असा निश्चय होतो. अतएव स्मरणयोग्य कालीं **आगमसापेक्ष**च भोगवटा **प्रमाण** होतो. ह्मणजे शंभर वर्षांचे आंतला भोगवटा आहे तर **आगम** समजण्याची गरज लागती. कारण **स्मार्तकालीं** नुसता भोगवटा **प्रमाण** मानिला तर बलात्कारानें झालेलाही भोगवटा **प्रमाण** होऊं लागेल.

६ **अस्मार्तकालीं** तर **अभावग्राहकप्रमाण**[१] नसल्यामुळें या भोगवट्याचें मूळसाधन जो **आगम** तो नाहींच असा निश्चय करवत नाहीं. ह्मणून सतत आलेला भोगवटा **आगमा** वांचूनही **प्रमाण** होतो.

कात्यायनही. **स्मार्तकालीं** स्थावराविषयीं **आगम** सहित भोगवटा **प्रमाण**. आणि **अस्मार्तकालीं** तर हा **आगमा**-वांचून उपभोग करीत आहे, असा निश्चय करवत नाहीं. ह्मणून तीन पिढ्या अविछिन्न चालत आलेला भोगवटाच **प्रमा**

---

१ अभावग्राहक प्रमाण — आगमाचा अभाव दाखविणारें जें प्रमाण तें. ह्मणजे याचा भोगवटा आगमांवाचून आहे, असें दाखविणारें

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

७ **स्मार्तकाल** शंभरवर्षे पर्यंत. कारण, "पुरुषाचा आयुर्दाय शतवर्षे पर्यंत" असें श्रुत आहे. ह्मणून शंभरवर्षांहून अधिक चालत आलेला, निरंतर, बिनहरकत, प्रतिवादीच्या समक्ष, आणि **आगमा**च्याअभावाविषयीं निश्चय नाहीं असा भोगवटा **स्वत्वा** विषयीं **प्रमाण** होतो.

८ परंतु **अस्मार्तकालीं** ही जर **अनागमस्मृतिपरंपरा**[१] आहे, तर सतत चालतेला भोगवटाही **प्रमाण** होऊं शकत नाहीं.

मनुही. सांगतो कीं "जो **आगमा**वांचून शेंकडों वर्षेही (दुसऱ्याचें स्थावरादिक) उपभोगितो त्याला **राजानें** चोराच्या दंडानें शिक्षा करावी.

शंका —— या (मनु) वचनांत "जो **आगमा**वांचून भोगितो" असा एकवचनीं निर्देश व "शेंकडों वर्षेही" असा **अभ्यर्थबोधक**[२] "ही" शब्दाचा निर्देश केल्यावरून, पहिल्या पुरुषानें **आगमा**वांचून चिरकाळ उपभोग केल्यामुळें त्याला दंड सांगितला, असें कां मानूनये?

समाधान —— असें मानिलें असतां दुसऱ्या व तिस

---

१ अनागमस्मृतिपरंपरा ह्मणजे हा बहुत वर्षे आगमावांचून उपभोग करीत आहे असें आह्मी वाडवडिलांपासून ऐकत आलों, असा जनसंवाद.

---

२ अभ्यर्थबोधक असा "ही" शब्द ह्मणजे संस्कृतांत जो "अपि" शब्द आहे त्याचा वाचक मराठींत "ही" शब्द आहे. जसें, तो खोटें बोलतो आणि रामाही खोटें बोलतो.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

ज्या पिढीचा भोगवटा **आगम** विरहित असला तरी **प्रमाण** होऊं लागेल. व "पहिल्या पुरुषानें (संपादकानें) **आगम** शाबीत करावा दुसऱ्या पुरुषानें **आगम** सहित भोगवटा दाखवावा" असें जें नारद वचन आहे त्यास विरोध येईल.

९ तस्मात् सर्वत्र (१ल्या २ऱ्या ३ऱ्या पिढी विषयीं) **आगमा** वांचून उपभोग असल्यास वरचें (मनु) वचन योजावें.

स्मृति. पित्यासुद्धां तीन पिढ्यांनीं अन्यायानेंही जरी उपभोगिलें आहे, तरी तें सतत तिही पिढ्यांनीं उपभोगिलें सबब फिरूं शकत नाहीं.

असें जें वचन आहे त्यांत पित्यासुद्धां तीन पिढ्या ह्मणजे, पित्याची पिढी चौथी, आणि वरच्या तीन पिढ्या, अशी योजना करावी. आणि "सतत तीन पुरुषांपासून चालत आलेला." असें त्या वचनांत आहे, तेंही **अस्मार्त्तकाल** भोगाचें **उपलक्षण** समजावें. अन्यथा कदाचित् एका वर्षांतही तिहीं पुरुषांचा अतिक्रम संभवतो. सबब दुसऱ्या वर्षींच **आगम** विरहित भोगवटा **प्रमाण** होऊं लागेल. आणि असें झालें असतां "**स्मार्तकालीं** स्थावराविषयीं **आगम** सहित भोगवटा **प्रमाण**." असें जें (६ व्या अंकांतील कात्यायनाचें) वचन आहे त्यास विरोध येतो.

१० वरच्या (९ व्या अंकांतील) स्मृतींत "अन्यायानेंही जरी उपभोगिलें" असें आहे, त्याचा अर्थ असा कीं, अन्यायानें उपभोगिलें असतांही तें परावृत्त होत नाहीं, मग ज्या भोगाविषयीं अन्यायाचा निश्चय नाहीं, तो भोगवटा परावृत्त होत नाहीं हें सांगायास नको. असा

# प्रकरण २
## असाधारणव्यवहारमातृका.

त्याचा अर्थ जाणावा. कारण, **अप्यर्थबोधक** "ही" शब्द आहे ह्मणून.

स्मृति. **आगम** नसतांही तिघां पूर्वजांनीं जें उपभोगिलें आहे, तें परत घेववत नाहीं. कारण, तो भोगवटा अविछिन्न तीन पिढ्यांचा ह्मणून.

असें जें वचन आहे त्यांत ही "**आगम** नसतां" ह्मणजे **आगमाची उपलब्धि** नसतां, असा अर्थ वस्तुगत्या केवळ **आगमा**चा अभाव घेऊं नये. कारण, जर **आगमा**चा अगदीं अभाव आहे तर, शेंकडों उपभोग झाले तरी **स्वत्व** उत्पन्न होणार नाहीं.

११ शंका — **स्मार्तकालीं आगम**सहित भोगवटा **प्रमाण** असें (५ व्या अंकांत) सांगितलें त्याची उपपत्ति होत नाहीं. ती अशी, जर **आगम** (भोगाखेरीज) दुसऱ्या **प्रमाणा**वरून ज्ञात झाला, तर तेणेंकरूनच सत्ताज्ञान होतें. झालें असतां सत्तेविषयीं किंवा **आगमा**विषयींही भोगवटा **प्रमाण** मानायास नको. जर दुसऱ्या **प्रमाणां**कडून **आगम** नसमजला, तर **आगम** विशिष्ट भोग तरी **प्रमाण** कसा होईल?

१२ समाधान — दुसऱ्या **प्रमाणां**कडून ज्ञात झालेला असा जो **आगम** तद्विशिष्ट व अविछिन्न असा भोगवटा कालांतरीं **स्वत्व** दाखवितो. परंतु दुसऱ्या **प्रमाणां**कडून अवगत झालेला असाही **आगम** असून तो भोगरहित आहे तर कालांतरीं सत्तेचें साधन होऊं शकत नाहीं. कारण,

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

मध्यंतरीं **दान विक्रय इत्यादिकें** करून स्वसत्तेची हानि संभवती. याप्रमाणें सर्व निर्दोष जाणावें.

## शाखा १२

**आगम** सहित भोगवटा **प्रमाण** सांगितला. आतां **आगम** ही भोगविशिष्ट असल्यास **प्रमाण** होतो याविषयीं सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. ज्या **आगमा**चा स्वल्प देखील भोगवटा नाहीं, तो **आगम**ही दुर्बळच.

### टीका

१ ज्या **आगमा**विषयीं स्वल्प देखील भोगवटा नाहीं तो **आगम**ही पूर्ण **प्रमाण** होऊं शकत नाहीं. भोगवटानाहींतरआगमहीदुर्बळपडतो.

अभिप्राय हा कीं, **दान** ह्मणजे आपलें **स्वत्व** जाऊन दुसऱ्याचें **स्वत्व** उत्पन्न होणें, तें (दुसऱ्याचें **स्वत्व**) जर दुसरा स्वीकार करितो, तर उत्पन्न होतें. अन्यथा होत नाहीं. दानाचेंस्वरूप.

२ तो स्वीकार तीन प्रकारचा. **मानसिक, वाचिक,** आणि **कायिक. मानसिक** स्वीकार ह्मणजे "हें माझें असो" असा संकल्परूप. **वाचिक** स्वीकार ह्मणजे "हें माझें असो" असा वाणीनें उच्चार करणें. **कायिक** स्वीकार तर स्वीकाराचेप्रकार.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

ग्रहण, स्पर्शन, **इत्यादिक** अनेक प्रकारचा आहे.
अशा तीन प्रकारच्या स्वीकाराविषयीं
नियम सांगतो.

स्मृति. ३ कृष्णाजिन पुच्छाचेठायीं स्पर्शकरून द्यावें. गाय पुच्छाचेठायीं स्पर्शकरून द्यावी. हत्ती शुंडादंडीं स्पर्शकरून द्यावा. तसेंच **अश्वदान** केंसडे धरून करावें. आणि **दासीदान** तिच्या मस्तकीं **अभिमर्श** करून करावें. दानकरण्याविषयींनियम

आश्वलायनही सांगतो. "**प्रतिग्राह्य** पदार्थ जर प्राणी (मनुष्य) आहे तर, **प्रतिग्रह** करणारानें ह्मणावें कीं, हा तूं माझा आहेस. **प्रतिग्राह्य** द्रव्यानेंही ह्मणावें कीं, मी तुमचा आहें. जर **प्रतिग्राह्य** पदार्थ अप्राणी (मनुष्यभिन्न गाय वगैरे) किंवा कन्या आहे तर, **प्रतिग्रह** करणानें **अभिमर्शन** करावें.

४ त्यांत हिरण्य वस्त्र **इत्यादिकां** विषयीं हातावर उदक दिल्यानें ग्रहण वगैरेचा संभव आहे, ह्मणून तीन प्रकारचा (**कायिक, वाचिक, मानसिक**) स्वीकार संभवतो.

५ स्थावराविषयीं तर उत्पन्न भोगिल्यावांचून **कायिक** स्वीकार संभवत नाहीं. ह्मणून थोडा तरी उपभोग झाला पाहिजे, नाहीं तर **दान विक्रय इत्यादिक** साधनाला पूर्णता नाहीं. यास्तव भोग सहित **आगमा**पेक्षां भोगरहित (ज्याचें उत्पन्न भोगिलें नाहीं असा) **आगम** अगदीं दुर्बळ पडतो. स्थावराचाउपभोगझाल्यावांचूनतेआपलेसेहोतनाहीं.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

६ परंतु हा (५ व्या अंकांतला) प्रकार **पूर्वापरकाला**[1]ची माहिती नसल्यास जाणावा. **पूर्वापरकाला**ची माहिती असल्यास (**पूर्वकालिक**) **आगम** भोगरहितअसलातरी सबळ **प्रमाण** होतो.

## शाखा १३

अथवा दुसरा[2] कल्प.

लेख साक्षी आणि भोग असें तीन प्रकारचें **प्रमाण** सांगितलें. हीं तिन्हीं मिळत असल्यास कोणत्या स्थळीं कोणतें **प्रमाण** सबळ हें सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. भोगवट्यापेक्षां **आगम** बलवत्तर **प्रमाण**, परंतु तो भोगवटा परंपरागत नसेल तर. ज्या **आगमा**चा स्वल्प देखील भोगवटा नाहीं तो **आगम**ही दुर्बळ.

### टीका.

१ पहिल्या पुरुषानें साक्षीकडून शाबीत केलेला **आगम**

---

१ पूर्वापरकाल ह्मणजे प्रथमकाल आणि त्याहून उत्तरकाल

---

२ दुसरा कल्प ह्मणजे ११ व्या शाखेच्या १ ल्या २ र्‍या वगैरे अंकाच्या याज्ञवल्क्य वचनाचा दुसरे प्रकारे अर्थ सांगतो.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

लेख भोग साक्षी असा तीन प्रमाणांतून कोणतें प्रमाण कोणत्या व्यवहारीं सबळ.

भोगापेक्षां मुख्तकीम **प्रमाण** होतो, परंतु तो भोगवटा जर तीन पिढ्या चालत आलेला नसेल तर. भोगवटा तीन पिढ्यांचा आहे असें चौथ्या पिढीनें लेखाकडून शाबीत केलें तर असा भोगवटा **आगमा**पेक्षांही मुख्तकीम **प्रमाण** होतो. मधल्या (२ऱ्या व ३ऱ्या) पिढीविषयीं केवळ (भोगरहित) **आगमा**पेक्षां स्वल्पभोगसहित **आगम** असला तरी **प्रमाण** होतो.

नारदही हें व स्पष्टकरून दाखवितो.

नारद. पहिल्यापुरुषाची (संपादकाची) सत्ता समजण्याविषयीं **आगम प्रमाण**, दुसऱ्या पुरुषाच्या सत्तेविषयीं **आगम** सहित भोगवटा **प्रमाण**, आणि पुढें अविछिन्न बहुतवर्षें चालत आलेला भोगवटाच **प्रमाण** होतो.

वीस वर्षें वहिवाट झाल्यानंतर स्थावराचें उत्पन्न, व दाहा वर्षें भोगवटा झाल्यावर धनाचें उत्पन्न (भोगणारा घेईल) मालकास मिळणार नाहीं. असें (९ व्या शाखेच्या१४व्या अंकांत) सांगितलें. तेथें जर मालकास उत्पन्न मिळणार नाहीं, तर उपभोगणारास दंड ही होणार नाहीं, असें प्राप्त झालें असतां उपभोगणारा व **आगम** संपादक पुरुषांच्या अनुक्रमानें व **प्रमाण** व्यवस्थेनें दंडव्यवस्था सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ज्यानें **आगम** संपादिला त्यावर फिर्याद केली असतां संपा

दकानें त्याची शाबिती करावी. पुत्रानें किंवा नातवानें करूनये. कारण, तेथें वहिवाटच सबळ.

टीका.

२ ज्या पुरुषानें भूमि वगैरेचा **आगम** संपादिला, त्यास "हें **क्षेत्रादिक** तूं कसें संपादिलेंस" असें विचारिलें असतां त्यानें तो **आगम** लेख्यादिकें करून शाबीत करावा.

आगमाच्याशाबितीविषयीं.

येणेंकरून पहिला (आगमसंपादक) पुरुष जर **आगम** शाबीत करून देत नाहीं, तर त्याला दंड करावा, असें सिद्ध झालें.

आगमशाबीतकरीतनाहीं तर दंड.

३ दुसऱ्या पुरुषास (**आगम**संपादकाच्या पुत्रास) विचारिलें असतां तो **आगम** न शाबीत करो, परंतु त्यानें अविछिन्न, बिनहरकत, प्रतिवादीच्या समक्ष, असा भोगवटा मात्र शाबीत केला पाहिजे.

दुसऱ्या पुरुषानें अविछिन्न भोगवटा शाबीत करावा.

येणेंकरून द्वितीय पुरुष जर **आगम** शाबीत करीत नाहीं, तर तो **दंड्य** होत नाहीं. पण अविछिन्न बिनहरकत असा भोग शाबीत करीत नाहीं, तर त्याला दंड करावा, असें प्रतिपादित झालें.

भोगवटा शाबीत नाहीं तर दंड

४ तिसरा पुरुष (नातू) केवळ **आगम** व **आगम**सहित भोग शाबीत न करो, परंतु त्यानें परंपरागत भोगवटा मात्र शाबीत केला पाहिजे.

तिसऱ्यापिढीनें भोगवटा शाबीत केलापाहिजे, न केल्यास दंड.

येणेंकरून तिसऱ्या पुरुषानें (नातवानें) परंपरागत भोगवटा न शाबीत केला, तर दंड. **आगम** शाबीत करीत नाहीं, किंवा, **आगम** सहित भोगवटा शाबीत करीत नाहीं, तरी दंड

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

नाहीं. कारण, दुसऱ्या व तिसऱ्या पुरुषाविषयीं भोगवटाच सबळ, त्यांत दुसऱ्या पिढीविषयीं बळकट, तिसऱ्या पिढी विषयीं तर विशेष बळकट, असें जाणावें.

५ परंतु तिघे पुरुष जर **आगम** शाबीत करीत नाहींत, तर उत्पन्नाचें नुकसान सर्वांचें सारखेंच. दंडाविषयींमात्र (वर सांगितल्याप्रमाणें) तरतम भाव जाणावा.

तिघांपुरुषांनीं आगमन शाबीत केला तर उत्पन्न मिळत नाहीं.

स्मृति. ज्यानें **आगम** संपादिला, तो जर **आगम** शाबीत करीत नाहीं, तर **दंड्य** होतो. पुत्र किंवा नातू **दंड्य** होत नाहींत; उत्पन्नाचें नुकसान सर्वांचें सारखेंच.

**अस्मार्तकालिक** उपभोग तर **आगम** समजल्यावांचूनही **प्रमाण** होतो. असें (११ व्या शाखेच्या ४ थ्या अंकांत) सांगितलें, त्याचें बाधक येथें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ज्यावर फिर्याद तो मेला, तर त्याचे वारसानें त्याची शाबिती करावी. कारण, **आगमा**वांचून केलेला भोगवटा तेथें **प्रमाण** होणार नाहीं.

टीका.

६ जर **आगमसंपादका**वर कोणी फिर्याद केली, आणि तो (संपादक) निवाडा झाल्यापूर्वींच मरण पावेल, तर जो त्याचा वारीस (पुत्रादिक) असेल त्यानें त्या

आगमसंपादक वादाचा निर्णय झाल्यापूर्वीं मरण पावेल तर त्याच्या पुत्रानें आगमाची शाबिती करावी.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

**आगमा**ची शाबिती करावी. तशा **व्यवहारीं** साक्षी वगैरे पुराव्यानें शाबीत केलेलाही भोगवटा जर **आगम** विरहित असेल तर **प्रमाण** होऊं शकणार नाहीं. कारण, पूर्वी केलेल्या फिर्यादीनें त्याला हरकत केली ह्मणून.

नारद ही. वाद सांगणारा वादाचा निर्णय झाल्यापूर्वीं मरण पावेल, तर त्याच्या पुत्रानें तो अर्थ (आगम दाखवून) शाबीत करावा. त्याची शाबिती भोगवट्याकडून होऊं शकणार नाहीं.

### शाखा १४

वाद सांगणारा वाद निर्णय झाल्यापूर्वींच मरण पावला असतां वाद कुंठित होत नाहीं, असें सिद्ध झालें. आतां **व्यवहार** निर्णयही झाला व वादसांगणाराही जीवंत आहे तर **व्यवहार** कोठें प्रवृत्त होतो, आणि कोठें होत नाहीं, त्याची नीट व्यवस्था दाखविण्यासाठीं न्यायकर्त्यांचें बलाबल सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **राजा**नें नेमलेले **पूग, श्रेणी**, आणि **कुलें**, हे **व्यवहार** पाहण्या विषयीं **व्युत्क्रमा**नें उत्तरोत्तर वरचढ जाणावे.

टीका.

१ **सभासद राजा**नें **व्यवहार** पाहण्याविषयीं नेमलेले

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

(१ल्या प्रकरणाच्या २ऱ्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितले.

**पूग**—निरनिराळ्या जातीचे व निरनिराळा व्यापार करणारे असून एकाठिकाणीं राहिलेले. जसे गांवकरी, नगरकर.

**श्रेणी**—नानाजातीचे, किंवा एकाजातीचे असून एका व्यापारानें उपजीविका करणारांची मंडळी. जसे **हेंडाबूक**, तांबोळी, साळी, चांमार **इत्यादिकांचे** मेहेतरे.

**कुल**—भाऊबंद वगैरे जातवाले.

२ हे (वरसांगितलेले) **सभासद** वगैरे चार, मनुष्यांच्या **व्यवहाराचा** निवाडा करण्या विषयीं चोथ्यापेक्षां तिसरा, त्यापेक्षां दुसरा, असे **सभासद** पर्यंत वरचढ जाणावे. ह्मणजे असें, **सभासदांनीं** निर्णय केला असतां पराजितांस जरी स्वपराजय झाल्यामुळें यांनीं नीट चोकशी केली नाहीं, अशा बुद्धीनें असंतोष झाला, तथापि **पूगादिकां** कडे त्यांची चोकशी जाणार नाहीं. या प्रमाणेंच **पूगा** नें निर्णीत केलेला **व्यवहार श्रेणी** कडे चोकशी साठीं जाणार नाहीं. तसाच **श्रेणी** नें निर्णीत केलेला **व्यवहार कुला** कडे जाऊं शकणार नाहीं.

वरिष्ठन्यायकर्त्यांनें निवडलेला वाद कनिष्ठन्यायकर्त्याकडे जात नाहीं.

---

१ पूग ह्मणजे प्रायः पाटील, कुळकर्णी, देशमूख, जमीदार, वगैरे असावे.

---

२ श्रेणी ह्म॰ व्यापारीमंडळीचे मुख्यजे शेटे, महाजन, मेहेतरे वगैरे.

---

सुबोधिनी २ हेंडाबूक ह्मणजे एकादेशाहून दुसरे देशांत जाऊन किंवा पाठवून व्यापार करणारे. हाशब्द गुजराथेंत प्रसिद्ध आहे. (सोदागर हेडे कारवान वगैरे.)

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

२ **कुला**नें निर्णीत केलेल्या **व्यवहारा**ची चौकशी **श्रेणी**कडे होईल. **श्रेणी**नें निर्णीत केलेल्या **व्यवहा**राची चौकशी पुनः **पूगा**कडे जाऊं शकते. **पूगा**नें निर्णीत केलेला **व्यवहार** पुनः चौकशी साठीं **सभासदां**कडे जाईल. कनिष्ठन्यायकर्त्यांनीं निवाडा केलेला वाद वरिष्ठ न्यायकर्त्याकडे जातो.

नारद तर **सभासदां**नीं निर्णीत केलेला ही **व्यवहार राजा**कडे चौकशी साठीं जातो, असें सांगतो.

नारद **कुल, श्रेणी, पूग, सभासद**, आणि **राजा**, हे **व्यवहार** निर्णया विषयीं (एकापेक्षां दुसरा, त्यापेक्षां तिसरा, असे **राजा** पर्यंत) चढत्या पायरीचे जाणावे.

तो **व्यवहार राजा**कडे गेल्यानंतर **राजा**नें दुसरे **सभासद** घेऊन व पूर्वीच्या **सभासदां**सह वर्तमान प्रतिज्ञापूर्वक **व्यवहार**निर्णय करावा. त्यांतजर **कुदृष्टवादी**[*1] पराजय पावतो, तर त्याला दंड करावा. जर त्यानें वाद जिंकिला, तर पूर्वीच्या **नियुक्तांस** (सभासदास) दंड करावा.

## शाखा १५

कनिष्ठन्यायकर्त्यांनीं निर्णीत केलेला **व्यवहार** उलटतो. (ह्मणजे वरिष्ठन्यायकर्त्याकडे जातो.) वरिष्ठन्यायकर्त्यानें निर्णीत केलेला **व्यवहार** उलटत नाहीं. (ह्मणजे कनिष्ठाकडे चौ-

---

*1 कुदृष्टवादी ह्मणजे माझ्या वादाचा निर्णय यथान्याय झाला नाहीं असें बोलणारा जो वादी किंवा प्रतिवादी तो.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका

करीला जात नाही) असें वर सांगितलें.
आतां वरिष्ठानें निर्णीत केलेला ही कांहीं प्र
कारचा **व्यवहार** उलटतो. असें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य · जबरीनें व भयानें उपस्थित केलेले, तसेच स्त्रियांनीं, रात्रीं, अंतर्गृहांत, गांवाबाहेर, आणि शत्रूंनीं केलेले ही, वाद उलटवावे.

टीका

१ बलात्कारानें, व भयानें, उपस्थित केलेले वाद; तसेच स्त्रियांनीं केलेले वाद; व पुरुषांनीं रात्रीं, अंतर्गृहांत, व गांवाबाहेर (रानांत) केलेले; व शत्रूंनीं केलेले वाद; उलटवावे. जबरीवगैरेकडून जालेले वाद उलटतात.

मूळ

याज्ञवल्क्य · **मत्त, उन्मत्त**, आर्त, दुःखित, **बाल**, भीत, **इत्यादिकानें** उपस्थित केलेला व निःक्षाइतानें आणिलेलाही वाद सिद्ध होत नाहीं.

टीका

**मत्त—मादक** द्रव्य (भांग दारू वगैरे) पिऊन मस्त झालेला, **उन्मत्त**—वात, कफ, पित्त, **सन्निपात, ग्रहावेश**, यांकडून पीडित झालेला. (वेडा वगैरे) **व्याधिग्रस्त**—इष्टवियोगानें झालेलें जें अनिष्ट त्यानें दुःखित, व **बाल** व शत्रूंपासून भय पावलेला, यांनीं उपस्थित केलेला वाद उलटतो. व **इत्यादिक** म्हणजे आणखी जे पुराशीं विरुद्ध व राष्ट्राशीं विरुद्ध **व्यवहार**, तेही घेऊं नयेत.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

मनु. जो विवाद नगराशीं विरुद्ध व राष्ट्राशीं विरुद्ध व जो राजानें टाकलेला तो घेऊंनये, असें धर्मज्ञांनीं सांगितलें आहे.

आणि जो ज्या व्यवहारीं नियुक्त नव्हे, व ज्याचा त्या वादाशीं संबंध नाहीं, अशानें केलेला व्यवहार ही सिद्धि पावत नाहीं.

स्मृति २ गुरु शिष्य, पितापुत्र, स्त्रीपुरुष, धनीचाकर, यांचा परस्पर विवाद झाला असतां तो राजानें मनास आणूंनये.

असेजें वचन आहे तेंही गुरुशिष्य इत्यादिकांच्या अत्यंत व्यवहार निषेधा विषयीं नव्हे. कारण, यांचा ही व्यवहार कदाचित् ग्राह्य आहे.

तेंच उपपादन करून सांगतो.

गोतम. ३ गुरूनें शिष्यास शिक्षा करणें तर शिष्य अशक्त असल्यास न मारितां (वाक्‌दंडानें) करावी. (शक्त असल्यास) बारीक दोरीनें कांबटीनें, करावी. या वांचून अणखी कशानें ताडन केलें असतां राजानें गुरूला शासन करावें.

मनु. (गुरूनें शिष्याला मारणें तर) उत्तमांगावर कधीं मारूं नये.

असें आहे ह्मणून जर गुरु कोपावेशें करून मोठ्या दंडानें मस्तकीं ताडन करितो, आणि शिष्य ही धर्मशास्त्रविरुद्ध वर्तणुकीनें पीडित झाल्यामुळें राजाकडे फिर्याद जातो, तर ती फिर्याद घेण्यास योग्य आहे. गुरुशिष्यांचा वाद कसा असल्यास मनास आणावा.

४ तसेंच पुढें (७ व्या प्रकरणांत ११ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचेवर्त्तनांत) सांगितलें आहे कीं, पितामहानें संपादिलेल्या स्थावर वगैरे पितापुत्रांचा वाद कोणत्या बाबदींत असल्यास मनास आणावा.

## प्रकरण २

# असाधारणव्यवहारमातृका.

विषयीं पितापुत्राचें **स्वत्व** समान आहे, यास्तव जर पिता **विक्रयादिकें** करून त्या पितामहसंपादित स्थावर वगैरेचा नाश करितो, सबब पुत्र **न्यायाधीशा**कडे फिर्याद जातो, तर पितापुत्रांचाही **व्यवहार** संभवतो.

५ तसेंच (७ व्या प्रकरणांत ३३ व्या शाखेच्या ६ व्या अंकात सांगितलें आहे कीं.) "(जवळ द्रव्य नसल्यामुळें)" दुकाळांत व धर्मकृत्यासाठीं, बंदांतून सुटण्यासाठीं, नवऱ्यानें घेतलेलें **स्त्रीधन** जर त्याची परत देण्याची इच्छा नाहीं, तर स्त्रीला परत मिळणार नाहीं." अशा वचनावरून दुकाळ वगैरे योग्य कारणावांचून नवरा **स्त्रीधन** घेऊन खर्चितो, आणि जवळ धन असतां व ती मागत असतांही जर देत नाहीं, तर स्त्रीपुरुषांचाही **व्यवहार** ग्राह्य होतो. कोणत्या बाबदींत स्त्रीपुरुषांचा वाद राजानें मनास आणावा.

६ तसेंच **भक्तदासा**चाही धन्याबरोबर वाद पुढें (१४ व्या प्रकरणीं २ ऱ्या शाखेंत) सांगितला आहे, व **गर्भदासा**नाही **गर्भदास** वगैरेस उद्देश करून सांगितला आहे. तो असा, धनी सेवकांच्या वादाविषयीं.

नारद. या दासांमधून जो प्राणसंकटापासून धन्याला मुक्त करितो, तो दासपणापासून सूट पावून पुत्राबरोबर विभागाचा अधिकारी होतो.

असें सांगितलें आहे ह्मणून जर धनी त्याला सूट देत नाहीं, व पुत्राबरोबर विभाग देत नाहीं, तर त्याचा धन्याबरोबर विवाद कोण नि

44532

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

वारण करूं शकेल?

७ तस्मात् **गुरु** शिष्यांचा, पितापुत्रांचा, स्त्रीपुरुषांचा, आणि धनी चाकरांचा, परस्पर वाद इहलोकीं वपरलोकींही श्रेयस्कर नव्हे. ह्मणून **सभासदां** सहवर्तमान **राजा**नें प्रथमतः शिष्य, पुत्र, स्त्री, चाकर, यांचें निवारण करावेंच, असें २च्या अंकाच्या स्मृतीचें तात्पर्य आहे. जर विवाद करण्याविषयीं शिष्यादिकांचा फारच आग्रह आहे तर, वर (३ च्या ४ थ्या ५ व्या ६ व्या अंकांत) सांगितल्यारीतीनें **व्यवहार** चालू होतो.

गुरुशिष्य, पितापुत्र, स्त्रीपुरुष, यांचा वाद इहलोकीं वपरलोकीं निंद्य, सबब राजानें प्रथमतः त्याचें निवारण करावें.

नारद. ८ एकाचा बहुतांशीं वाद, स्त्रियांचा वाद, चाकरांचा वाद, **राजा**नें मनास आणूं नये; असें धर्मज्ञानीं सांगितलें आहे.

एकाचा बहुतांशीं वाद एका अर्थाविषयीं असल्यास घ्यावा.

या वचनांत "एकाचा बहुतांशीं वाद" असें जें आहे तें "जो **गणद्रव्य** हरण करितो तो, व जो केलेल्या संकेताचें उल्लंघन करितो" तसेंच "बहूत मिळून एकाला मारणारांस" **इत्यादि** वचनावरून एका अर्थाविषयीं एकाचा बहुतां बरोबर वाद असल्यास त्याविषयीं जाणावें, परंतु विवादाचीं कारणें जर निरनिराळीं आहेत, तर एका बरोबर बहुतांचा एक समयावच्छेदें करून **व्यवहार** चालू होत नाहीं.

९ तसेंच वरल्या नारदवचनांत "स्त्रियांचा वाद" असें ह्मटलें आहे, त्याचा अर्थही असाच कीं, गोळी कलाल वगैरेच्या स्त्रियांस स्वातंत्र्य आहे, ह्मणून त्यांचा विवाद घेण्यास योग्य होतो, त्यांहून अन्य ज्या कुलस्त्रिया नवरा जीवंत असतां त्याच्या स्वाधीन असतात, सबब त्यांचा विवाद अग्राह्य होतो.

राजानें कोणकोणत्या स्त्रियांचा वाद मनास आणावा.

# प्रकरण २

# असाधारणव्यवहारमातृका.

१० तसेंच (सदरहू नारदवचनांत) "चाकरांचा वाद" असें जें ह्मटलें आहे, त्याचाही अर्थ असा कीं, चाकरांस धन्याच्या परतंत्रपणामुळें स्वतांच्या विवादा विषयीं धन्याची आज्ञा घेतली पाहिजे, नाहीं तर चालणार नाहीं.

धनी चाकरांचा खासगी चा वाद देखील धन्याच्या आज्ञे वांचून चालवूं नये.

## शाखा १६

कोणकोणते व्यवहार उलटतात ते सांगून आतां कोणनें द्रव्य परत द्यावयाजोगें तें सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. हरवलेलें द्रव्य सांपडलें तर राजानें मालकास द्यावें, परंतु मालक आपलेंसें खुणांनीं शाबीत करील तर; अन्यथा तितकाच दंड घ्यावा.

### टीका.

१ हरवलेलें सोनें वगैरे द्रव्य, चौकीदार पाहारेकरी वगैरेंस सांपडलेलें जें त्यांनीं सरकारांत दिल्हें, तें सरकारानें मालकाचें परत द्यावें. परंतु जर मालक तें द्रव्य रूपसंख्या वगैरे खुणा पटवून आपलेंसें शाबीत करील तर. जर शाबीत करूं शकत नाहीं, तर खोटें बोलला सबब हरवलेल्या द्रव्या इतकाच दंड करावा.

हरवलेलें द्रव्य सांपडलें असतां मालकास परत द्यावें.

२ द्रव्यावर मालकाची सत्ता उत्पन्न होण्याचीं साधनें जीं सांगितलीं आहेत, त्यांत **अधिगम** ही आहे. ह्मणून सरकारास जें द्रव्य

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

सांपडलें, त्यावर सरकाराची सत्ता झाली असतांही याच (९ व्या अं काचे) वचनानें मालकास परत द्यावें असें सांगितलें.

३ सांपडले सदरहू धनाविषयीं राजानें मालकाची वाट को ठपर्यंत पाहावी, त्याविषयीं मुदत (११ व्या प्रकरणाच्या २ऱ्या शाखेच्या २ऱ्या अंकांत) सांगितली आहे ती अशी.

याज्ञवल्क्य. हरवलेलें, व चोरीस गेलेलें, द्रव्य चौकीदार किंवा पाहरेकरी यांनीं सरकारांत दिल्यानंतर एका वर्षांत मालक हजर झाल्यास मिळेल, पुढें सरकारानें घ्यावें.

मनूनें तर तीन वर्षें वाट पाहावी असें सांगितलें आहे "हरवलेलें द्रव्य सांपडलें असतां तें राजानें तीन वर्षें राखावें. तीन वर्षांचेआंतजर मालक हजर होईल तर त्याला द्यावें, पुढें राजानें घ्यावें."

४ तीन वर्षें अवश्य राखावें. त्यांत पहिल्या वर्षांत मालक हजर होईल तर सगळेंच द्यावें. एकावर्षानंतर मालक हजर होईल तर साहावा हिसा रक्षणानिमित्त घेऊन बाकीचें मालकास द्यावें.

मनु. ५ हरवलेलें द्रव्य सांपडलें असतां त्यांतून राजानें सद्धर्मास अनुसरून साहवा दाहवा किंवा बारवा हिसा घ्यावा.

असें जें वचन त्यांत पहिल्या वर्षीं मालकाचें सगळें द्यावें, दुसऱ्या वर्षीं बारावा हिसा (रक्षणानिमित्त) घेऊन बाकी मालकास द्यावें. तिसऱ्यावर्षीं दाहावा आणि चौथ्या वगैरे वर्षीं साहावा भाग घेऊन बाकी द्यावें.

६ राजानें अधिगंत्याला आपल्या भागांतून चतुर्थांश द्या हरवलेलें द्रव्य ज्यानें सा

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

वा. जर त्या द्रव्याचा मालक सांपडत नाहीं तर मगत्या द्रव्याचा चतुर्थांश **अधिगंत्या**ला देऊन बाकी **राजा**नें घ्यावें. राजादिल्हें त्याला चौथा हिस्सा द्यावा

गौतम. हरवलेलें द्रव्य सांपडलें असतां एकवर्ष **राजा**नें तसेंच राखून पुढें **अधिगंत्या**ला चतुर्थांश देऊन बाकी **राजा**नें घ्यावें.

याच वचनांत "एकवर्ष" असें एकवचन सांगितलें तें अविवक्षित. कारण, **राजा**नें तीन वर्षे राखावें असें (३ऱ्या अंकांतील मनु) वचनांत सांगितलेंच आहे.

त्याच[1] वचनांत "पुढें **राजा**नें घ्यावें" असें सांगितलें आहे तें हा मालक हजीर न होईल तर तीन वर्षांपुढें **राजा**नें खर्चावें. अशा आज्ञेविषयीं जाणावें. पुढें मालक हजर झाला असतां व द्रव्यही खर्चिलें असतां **राजा**नें आपला अंश वजा करून हरवलेल्या द्रव्या इतकें द्रव्य (सरकारांतून) मालकाचें द्यावें.

हा (१ल्या अंकापासून एथपर्यंत सांगितलेला) प्रकार सोनें वगैरे द्रव्याविषयीं समजावा. पशु वगैरे हरवलेलें सांपडलें असल्यास त्याविषयीं तर पुढें (३१व्या प्रकरणीं २ऱ्या शाखेच्या ४ अंकांत वचनांत) "एकाखुराचे पशूबद्दल चार **पण** द्यावे वगैरे सांगितलेंच आहे.

## शाखा १७

रस्त्यांत चौकीपाशीं शाळेंत[2] पडलेलें सोनें वगैरे हरवलेलें सांपडलें असतां त्याचा विधि

---

१ त्याच ह्मणजे ३ऱ्या अंकांतील मनुवचनांत.

---

२ शाळा ह्मणजे घोडशाळा धर्मशाळा वगैरे घ्याव्या.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

सांगितला. आतां भूमींत बहूत दिवस पुरलेलें सोनें वगैरे जें **निधि** रूप द्रव्य तें मांपडलें असतां त्याचा विधि सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **राजा**ला **निधि** सांपडला तर त्यानें अर्धा ब्राह्मणांस द्यावा. विद्वान् ब्राह्मणास सांपडल्यास त्यानें सर्व घ्यावा. कारण तो सर्वांचा प्रभु होय. इतरांस सांपडला असतां **राजा**नें साहवा भाग घ्यावा. जर **निधि** सांपडलेला त्यानें सरकारांत जाहीर केला नाहीं, आणि परभारें समजलें, तर त्यापासून **निधि** घेऊन दंडही घ्यावा.

टीका.

१ वर सांगितलेला ठेवा **राजा**ला सांपडला असतां त्यानें त्यांतून निमे ब्राह्मणास देऊन बाकी आपल्या जामदारखान्यांत ठेवावा. — राजाला सांपडलेल्या ठेव्या विषयीं

२ ब्राह्मणास जर ठेवा सांपडला आणि तो ब्राह्मण वेदशास्त्रसंपन्न व सदाचार संपन्न आहे तर त्यानें सर्वही घ्यावा. कारण तसा ब्राह्मण सर्वजगाचा नियंता होय. — विद्वान ब्राह्मणाला सांपडलेल्या ठेव्याविषयीं.

३ जर **राजा** आणि विद्वान् ब्राह्मण यांखेरीज इतरांस म्हणजे अविद्वान् ब्राह्मणास व क्षत्रियादिकांस ठेवा सांपडला तर साहवा भाग **अधिगंता** जो त्याला देऊन बाकी **राजा**नें घ्यावा. — राजा विद्वान ब्राह्मण यांखेरीज इतरांस ठेवा सांपडल्यास त्याविषयीं.

वसिष्ठ. ठेवा ज्याला सांपडला आहे त्यापासून **राजा**नें घ्यावा. आणि त्याला साहवा हिसा द्यावा.

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

गौतम. सांपडलेला ठेवा **राजानें** घ्यावा, परंतु विद्वान् ब्राह्मणास सांपडला असेल तर घेऊं नये. ब्राह्मणाखेरीज दुसऱ्यास सांपडेल तर तो साहवा हिसामात्र पावेल. (बाकी राजा घेईल) असें कोणी ह्मणतात.

४ कोणास **निधि** सांपडला असतां त्यानें स्वतां **राजा**ला न कळवितां परभारें केलें तर **राजानें** त्यापासून सगळा **निधि** घेऊन शक्त्यनुसार दंडही घ्यावा. ठेवा सांपडल्यावर सरकारांत जाहीर न केल्यास दंड.

५ जर सांपडलेल्या **निधीचा** मालक हजर होऊन रूपसंख्या वगैरे फडून आपलासा शाबीत करून देतो, तर **राजानें** त्याला त्याचा **निधि** देऊन त्यांतून साहावा किंवा बारावा अंश घ्यावा. मालक हजर होऊन शाबीत करितो तर आपला ठेवा पावतो.

मनु. हा ठेवा माझा आहे, असें खरेपणानें मालक शाबीत करील, तर त्यापासून **राजानें** साहावा किंवा बारावा अंश घ्यावा. (आणि ठेवा मालकास द्यावा.)

"साहावा किंवा बारावा अंश" असा जो वर (मनुवचनांत) विकल्प सांगितला, तो ब्राह्मणादिक **वर्ण** व काल **इत्यादिकां**च्या तारतम्यानें योजावा.

## शाखा १८

चोरीस गेलेल्या द्रव्याविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. चोरीस गेलेलें द्रव्य **राजानें स्वदेशीयास** द्यावें. कारण,

# प्रकरण २

## असाधारणव्यवहारमातृका.

देणारा राजा मालकाचें व चोराचेंही पाप घेतो.

टीका.

१ राजानें चोरीस गेलेलें द्रव्य चोरापासून जिंकून आपल्या देशांत राहाणारांतून ज्याचें तें असेल त्याला द्यावें. कारण, न देणारा राजा ज्याचें द्रव्य चोरीस गेलें त्याच्या पापाचें व चोराच्याही पापाचें पात्र होतो. चोरीस गेलेलें द्रव्य ज्याचें त्यास न दिल्यास राजा पापी होतो.

मनु. चोरीस गेलेलें द्रव्य कोण त्याही वर्णाचें (ब्राह्मणादिकाचें) असो ज्याचें त्याला द्यावें. तें न देतां राजा स्वतां उपभोगितो तर तो तें चोराचें पाप भोगितो.

२ परंतु जर चोरापासून घेऊन आपणच उपभोगितो तर चोराच्या पापाचें पात्र होतो. आणि जर चोरीस गेलेलें द्रव्य हस्तगत होण्याविषयीं उपेक्षा करितो, तर मालकाच्या पापाचा विभागी होतो.

३ जर चोरीस गेलेलें द्रव्य हस्तगत करण्याविषयीं यत्न करीत असतांही हस्तगत होऊं शकत नाहीं तर राजानें आपल्या भांडारांतून द्यावें. चोरीस गेलेलें द्रव्य हस्तगत करूं शकत नाहींतर, आमदारखान्यांतून दे द्यावें.

गौतम. चोरांनीं हरण केलेलें जिंकून ज्याचें त्याला द्यावें. अथवा (असें न होईल तर) आपल्या कोशांतून द्यावें.

द्वैपायनही. चोरांनीं हरण केलेलें द्रव्य जर, राजा त्यानें हस्तगत करवत नाहीं, तर तें आपल्या भांडारांतून द्यावें.

BOMBAY BRANCH ASIATIC SOCIETY

# प्रकरण ३

## ऋणादान

### शाखा १

याप्रमाणें **साधारण** व **असाधारणव्यवहारमातृका** सांगून आतां **व्यवहार** प्रकरणांतलें आद्य जें **ऋणादान** (दिवाणी) प्रकरण त्याचें निरूपण करितो.

दिवाणी **व्यवहाराचे** प्रकार सात आहेत. द्यावयास योग्य असें कर्ज कोणतें, व द्यावयास अयोग्य कर्ज कोणतें, व देण्याचा अधिकारी कोण, व कोणत्यासमयीं द्यावें, आणि कसें द्यावें, असे कुळाविषयीं पांच प्रकार; देणें आणि परत घेणें, असे दोन प्रकार सावकाराविषयीं आहेत. कर्ज देण्याघेण्याचे प्रकार सात आहेत.

नारदानेंही[1] हेंच स्पष्ट करून दाखविलें आहे.

त्यांत प्रथमतः सावकारानें कुळाला कर्ज देण्याचा प्रकार सांगतो. कारण तन्मूलक इतर (६) प्रकार आहेत.

मूळ.

याज्ञवल्क्य. गहाणाच्या कर्जाला दरमहिना ऐंशीवा[2] हिसा व्याज. नुसत्या

---

१ यावचनाचा अर्थ वर लिहिल्याप्रमाणें अगदीं एकसारिखा आहे ह्मणून निराळा सांगितला नाहीं.

---

२ ऐंशीवा हिसा ह्मणजे शेंकडा सवा पडतो.

# प्रकरण ३

## ऋणादान.

कर्जाला **वर्णा**च्या अनुक्रमानें दोन तीन चार पांच असें व्याज आहे.

टीका.

२ सावकारानें गहाण घेऊन कुणाला कर्ज दिल्हें असेल तर दर महिना कर्जाचा ऐंशीवा हिसा व्याज घ्यावें, हें यथाशास्त्र आहे. गहाण घेऊन कर्ज दिल्हें असल्यास ऐंशीवा हिभाव्याज

३ गहाणावांचून कर्ज दिल्हें आहे तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, या अनुक्रमानें दर महिन्यास शेंकडा दुहोत्रा, तिहोत्रा, चहोत्रा, पांचोत्रा, व्याज घ्यावें. ह्मणजे असें, ब्राह्मण कूळ असल्यास त्यापासून दुहोत्रा, क्षत्रियापासून तिहोत्रा, वैश्य कूळ असल्यास चहोत्रा, आणि शूद्रापासून पांचोत्रा, व्याज घ्यावें. गहाणाशिवाय दिलेल्या कर्जाचें व्याज.

४ असें दर महिना जें व्याज घेतलें जातें त्याला (शास्त्रांत) **कालिक** व्याज ह्मटलें आहे. हेंच व्याज (तीस) दिवसांच्या हिशेबानें विभागून दर रोज घेतलें असतां याला **कायिक** व्याज असें ह्मटलें आहे.

नारद. **कायिक**[१], **कालिक**[२], **कारित**[३], आणि चक्रवाढ[४], असें शास्त्रांत चारप्रकारचें व्याज सांगितलें आहे. व्याजाचे प्रकार.

असें सांगून त्याचें स्वरूपही तो (नारद) च सांगतो.

**कायिक** ह्मणजे दर महिना जी व्याजाची कबुलात असेल तिच्या हिशेबानें दर रोज जें **पण** किंवा त्याचा पाव वगैरे घेतलें जातें व्याज तें.

**कालिक** ह्मणजे दर महिन्यास दिलें जातें जें व्याज तें.

# प्रकरण ३

## ऋणादान

**कारित** ह्मणजे कुळानें स्वसंतोषानें जें व्याज कबूल केलेलें तें.

चक्रवाद ह्मणजे व्याजालाही पुनः व्याज घेतलें जातें तें.

## शाखा २

कर्ज घेणाराविषयीं अणखी व्याजाचे प्रकार सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. दुर्गम अरण्यांत जाणारांनीं शेंकडा दाहा आणि समुद्रांत जाणारांनीं शेंकडा वीस व्याज द्यावें.

टीका.

१ जे व्याजीं द्रव्य काढून अधिक नफा मिळावा एतदर्थ उदीम करावयास जेथें द्रव्याचा, किंवहुना प्राणाचाही नाश होईल अशा शंकास्पद अरण्यांत जातात, त्यांनीं दर महिना शेंकडा दाहोत्रा व्याज द्यावें. — अरण्यांत व्यापारासाठीं जाणारांपासून दाहोत्रा व्याज.

२ जे समुद्रांत उदीम करावयास जातात, त्यांनीं शेंकडा दर महिना विसोत्रा व्याज द्यावें. कारण, कदाचित् मुद्दलही बुडेल अशी शंका आहे ह्मणून. — व्यापारासाठीं समुद्रांत जाणारांपासून विसोत्रा व्याज

आतां **कारित** व्याजाचा प्रकार सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. अथवा सर्वांनीं सर्वजातींत स्वतां करार केलेलें व्याज द्यावें

# प्रकरण ३

## ऋणादान

टीका.

३ (सर्वजातीच्या उच्चनीच भेदावांचून) सर्व ब्राह्मणादिक अधमर्णानें कोणत्याही जातीच्या सावकारापासून गहाण ठेवून किंवा गहाणावांचूनही कर्ज घेतलें असेल त्याविषयीं जशी व्याजाची कबुलात केली असेल तसें द्यावें. करार केलेलें व्याज.

कचिद्व्यवहारीं करार न केलेलें व्याज-
ही होतें.

नारद. ४ जें [१]सावकारानें कुळाला संतोषानें उसनें दिलेलें तें **प्रीतिदत्त**, त्याचें व्याज साहा महिने पर्यंत मिळणार नाहीं. पुढें (सावकाराची इच्छा असल्यास) व्याज चालू होईल. उसनें घेतलें त्यास साहा महिन्या पुढें व्याज.

जो **याचितक** (तसलमान) घेऊन देशांतरास जातो त्या
पासून कधीं पासून व्याज घ्यावें तें कात्यायन सांगतो.

कात्यायन. ५ कोणी एक **याचितक** घेऊन तें न देतां देशांतरास गेला तर एका वर्षापुढें **याचितकाचें** व्याज चालू होतें. याचितक द्रव्याचें व्याजा विषयीं

**याचितक** मालक मागत असतां जो दिल्या
वांचून देशांतरीं जातो त्यापासून व्याज घेण्या
चा प्रकार कात्यायन सांगतो.

कात्यायन. ६ **याचितक** घेऊन मालकानें मागितलें असतां तसाच देशांतरास जाईल तर तीन महिन्यानंतर **याचितकानें**

---

१ हें मी स्वसंतोषानें तुला कर्ज दिलें आहे, याचा तूं व्यापार वगैरे कर, असें सुबोधिनींत प्रीतिदत्ताचें स्वरूप सांगितलें आहे, तेंव लोकांत उसनें घेतात तें ही प्रीतिदत्तच असावें

# प्रकरण ३

## ऋणादान.

व्याज चालू होईल.

७ जो आपल्या देशीं असून मालक मागत असतांही **याचितक** देत नाहीं त्यापासून **राजानें** मागितलेल्या दिवसापासून त्याचें **अकारित**[1] व्याज देवावें.

स्मृत्यंतरीं[2]. हेंच स्पष्ट करून दाखविलें आहे.

**अकारित** व्याजाचें बाधक वचन नारद सांगतो.

नारद. ८ विकत दिलेल्या जिनसाचें मोल, **भृति**, ठेव, व जो धनदंड क्रम केलेला तो, तसेंच **वृथादान**, जुगार, पैज, यांचें व्याज चालू होत नाहीं, परंतु कबुलात नसेल तर. इतक्या द्रव्यांस कबुलाती वांचून व्याज नाहीं.

## शाखा ३

आतां द्रव्याच्या भेदें करून व्याजाचाही अणखी भेद सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. पशु, दासी, यांचीं तर संततीच व्याज.

### टीका.

१ पशु व दासी यांची संततीच व्याज. पशूच्या व दासीच्या पशु दासी यांची संतती च व्याज.

---

१ अकारित ह्मणजे चालत्या शाखेच्या ४थ्या अंकांत सांगितलेलें.

२ स्मृतीचा अर्थ वरच्या अंकास अगदीं मिळून आहे ह्मणून निराळा लिहिला नाहीं.

# प्रकरण ३
# ऋणादान

पोषणाविषयीं सामर्थ्य नाहीं, आणि त्यांचें पोषण होऊन आपणास संतति पाहिजे असें असल्यास त्यानें पशु, स्त्रिया, व्याजीं द्याव्या, हें संभवतें. आणि ज्याला त्यांचें दूध व चाकरी घेण्याची इच्छा आहे त्यानें वर सांगितल्याप्रमाणें व्याजीं घेतल्या असतां संभव आहे.

व्याजीं दिल्हेलें द्रव्य व्याज न घेतां बहूत वर्षें राहिलें असतां कोणत्या द्रव्याचें पराकाष्ठा किती व्याज तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **रसा**चें पराकाष्ठा आठपट व्याज, कापडाचें चौपट, धान्याचें तिपट, आणि नाण्याचें पराकाष्ठा दुपट व्याज घ्यावें.

टीका.

२ तेल, तूप, वगैरे **रस** करार केलेल्या वादीनें कुळाला दिल्हा, आणि वाढ न घेतां बहुतवर्षें तसाच कुळाकडे राहिला, तर तो पराकाष्ठा आठपट वाढतो; यापेक्षां अधिक वाढत नाहीं. तेल तूप वगैरे रसांची पराकाष्ठा आठपट वाढ.

३ तशीच वस्त्राची पराकाष्ठा चौपट वाढ, धान्याची तिपट वाढ, आणि नाण्याची पराकाष्ठा दाम दुपट घ्यावी; अधिक घेऊं नये. वस्त्राची चौपट वाढ.

वसिष्ठ तर **रसा**ची पराकाष्ठा तिपट वाढ सांगतो.

वसिष्ठ. नाणें दुपट, धान्य **रस** तिपट, व पुष्प मूल फळ आणि वजनी जिन्नस यांची पराकाष्ठा आठपट वाढ.

# प्रकरण ३

## ऋणादान

मनु तर धान्य आणि फुलें, मुळें, फळें,

याचा आठपट वाढ सांगतो.

मनु. धान्य, **शद**, **लव**, **वाह्य**, यांची पराकाष्ठा पांचपट वाढ, यापेक्षां अधिक नाहीं.

धान्य——गहूं तांदूळ वगैरे.

**शद**—— बागाईतांत झालेला जिन्नस ह्मणजे फुलें मुळें फळावळ **इत्यादिक**.

**लव**——मेंढ्यांची लोंकर व **चमरी**चे केश वगैरे पासून निर्मित केलेलें धाबळी शाळजोडी कांबळें वगैरे.

**वाह्य**—— बैल, घोडा, वगैरे.

इतक्याची वाढ पांचपटीपेक्षां अधिक वाढत नाहीं.

याप्रमाणें याज्ञवल्क्य, वसिष्ठ, मनु, यांनीं बहुतकाळ राहिलेलें नाणें, धान्य, **इत्यादिकां**च्या व्याजाविषयीं न्यूनाधिक प्रकार सांगितले. त्यांत कुळाची शक्ति व दुकाळ **इत्यादिक** तारतम्य पाहून व्यवस्था करावी.

४ हे दामदुपटीचे वगैरे प्रकार एकवार कर्ज दिल्हें आहे आणि एकवार परत घेणें असल्यास व्याजविषयीं जाणावें.

५ ज्या कुळाकडे कर्ज आहे त्यास सावकारानें सांगितलें कीं तुझ्याकडे जें कर्ज आहे, तें अमुकास दे, असें सांगितल्यावरून त्यानें दिल्हें, अथवा त्याच पुरुषापाशीं त्या द्रव्याची वारंवार घेवदेव केली, तर तें पूर्वी घेतलेल्या व्याजासुद्धां दामदुपट वगैरे वाढीपेक्षां अधिक वाढतेंच.

# प्रकरण ३

## ऋणादान.

६ एकवार व्याजीं दिल्हें असतांही जर दररोज दरमहिना किंवा दरवर्षास कुळापासून व्याज पावत आहे तर कर्जाची दामदुपट संभवत नाहीं. यास्तव पूर्वी घेतल्या व्याजासुद्धां दुपटीपेक्षां अधिकही वाटतेंच.

मनूनेंही. असेंच सांगितलें आहे.

गौतमाचें मतही. सदरहू (५ व्या व ६ व्या) अंका प्रमाणेंच आहे.

या प्रमाणें सावकारानें कुळाला कर्ज देण्याचे व त्यापासून व्याज घेण्याचे प्रकार सांगितले.

## शाखा ४

कर्ज देण्याचा प्रकार सांगितला. आतां व्याजीं दिल्हेलें द्रव्य कोणत्या रीतीनें घ्यावें हें सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. कुळानें कबूल केलेलें कर्ज सावकार वसूल करितो, तर राजानें निवारण करूंनये; सावकार मागत असतां कूळ फिर्यादि जाईल तर दंडकरून मालकाचें धन देवावें.

### टीका.

१ कुळानें कबूल केलेलें किंवा सावकार साक्षिलेख्याकडून शाबीत करून तें धर्मादिक उपायांनीं परत घेतो, तर राजानें त्याचें निवारण करूंनये.

# प्रकरण ३

## ऋणादान

**धर्मादिक** उपाय मनु दाखवितो.

मनु. २ **धर्म, व्यवहार, छल, अचरित,** आणि **बल,** या पांच उपायांकडून सावकारानें आपलें द्रव्य वसूल करून घ्यावें. कर्ज वसूल करण्याचे उपाय.

**धर्म** ह्मणजे प्रीतियुक्त व सत्यभाषण.

**व्यवहार** ह्मणजे साक्षिलेखवगैरे प्रमाण.

**छल** ह्मणजे लग्नकार्याच्या निमित्तानें त्यापासून दागिना वगैरे मागून आणणें.

**अचरित** ह्मणजे उपास करणें, धरणें घेणें.

**बल** ह्मणजे पायांत बिडी घालणें बंदिशाळेंत पाठविणें वगैरे.

या पांच उपायांनीं सावकारानें आपलें द्रव्य कुळापासून हस्तगत करावें.

३ कुळानें कबूल केलेलें द्रव्य सावकार (उगवून) घेत असतां **राजा**नें निवारण करूनये, असें (मुकांत) सांगितल्यावरून नाकबूल केलेलें द्रव्य जर (बळेंच) साध्य करितो तर **राजा**नें निवारण करावें. कर्ज नसतां बळेंच लागू करून वसूल करूं इच्छितो तर दंड.

कात्यायनही हेंच स्पष्ट करून दाखवितो.

कात्यायन. कूळ यथान्याय बोलत असतां सावकार त्याला पीडा करितो, तर **राजा**नें त्यापासून **विवादास्पदीभूत** द्रव्याइतका दंड घेऊन त्याचा वाद रद्द करावा.

४ (२ र्‍या अंकांत सांगितल्या) **धर्मादिक** उपायांनीं सा सावकार सोईनें मागत अस

# प्रकरण ३

## ऋणादान

धकार कुळाकडील आपलें द्रव्य मागत असतां जर कुळ **राजा**कडे जाऊन फिर्याद करितें, तर **राजा**नें त्याला शास्त्यनुसार दंड करून सावकाराचें द्रव्य देवावें. तां कुळ फिर्याद करितें तर दंड.

द्रव्य देवविण्याचे प्रकार.

स्मृति ५ जर कुळ ब्राह्मण आहे तर त्याजकडून **राजा**नें सामोपचारानें सावकाराचें कर्ज देवावें. अन्यजातीच्या[१] कुळाकडून देशाचाराप्रमाणें देवावें. आणि जे दुष्ट आहेत त्यांस पीडा होई अशी शिक्षा करून सावकाराचें कर्ज देवावें. **दायाद** किंवा मित्र ही असो त्याजकडून **छलानें**च देवावें.

या शाखेचा ४ था अंक हा १ ल्या प्रकरणाच्या ४ थ्या शाखेच्या १ ल्या अंकाचें **प्रत्युदाहरण** समजावें.

## शाखा ५

एका कुळापाशीं अनेक सावकार एक समयावच्छेदें करून मागत असल्यास **राजा**नें कोणत्या अनुक्रमानें देवावें तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. कर्ज घेतलेल्या अनुक्रमानें कुळाकडून सावकारांचें देवावें. भिन्न जातीत तर प्रथमतः ब्राह्मणाचें, नंतर क्षत्रियाचें, दे

---

१ अन्यजातीच्या ह्मणजे ब्राह्मणावांचून दुसऱ्या जातीच्या

# प्रकरण २

## ऋणादान

वावें.

टीका.

१ सगळे सावकार एकजातीचे आहेत, तर ज्या अनुक्रमानें कर्ज घेतलें असेल त्याच अनुक्रमानें कुळाकडून **राजानें** देवावें.

कुळ सावकार एकजातीचे असल्यास घेतलेल्या अनुक्रमानें देवावें.

२ आणि सावकार भिन्नजातीचे असल्यास प्रथमतः ब्राह्मणाचें कर्ज नंतर क्षत्रियाचें अशा जातीच्या अनुक्रमानें देवावें.

भिन्नजातीचे असल्यास जातीच्या अनुक्रमानें देवावें.

सावकार दुर्बळ असल्यामुळें कुळाकडील कर्ज **धर्मादिक** उपायांनीं हस्तगत करावयास अशक्त सबब **राजानें** देवविलें तर कुळास दंड व सावकारापासून **भृति** घेण्याचा प्रकार सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. **राजानें** देवविलेल्या बद्दल शेंकडा दशक घ्यावें, आणि ऐवज पावलेल्या सावकारापासून शेंकडा पंचक घ्यावें.

टीका.

३ (सावकार दुर्बळ असल्यामुळें **धर्मादिक** उपायानें कुळाकडील आपलें द्रव्य घेण्याविषयीं असमर्थ सबब) **राजानें** कुळाकडून देवविलें तर, शेंकडा दशक ह्मणजे द्रव्याचा दाहावा अंश कुळापासून **राजानें** दंड घ्यावा, आणि सावकाराचें द्रव्य देवविलें सबब त्यापासून शेंकडा पंचक ह्मणजे द्रव्याचा विसावा अंश **भृति** घ्यावी.

सधन कुळाकडील कर्ज देवविण्याचा प्रकार.

# प्रकरण ३

## ऋणादान.

४ आपला ऐवज मागूं लागलें असतां कुळानें निह्नव केल्यामुळें जर सावकार साक्षिलेख्यादि प्रमाणानें लागू करितो, तर २ ऱ्या प्रकरणाच्या ३ ऱ्या शाखेंतील ३ ऱ्या अंकाप्रमाणें राजदंड घेऊन सावकाराचें द्रव्य देवावें. कुळ दंडेली करितें तर सावकाराचें द्रव्य देववून दंड करावा.

सधन कुळाकडून द्रव्य देवविण्याचा प्रकार सांगितला. आतां निर्धन कुळाकडून कसें देवावें हें सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. निकृष्ट जातीचें कूळ निर्धन झाल्यास ऋणमुक्त करण्यासाठीं त्यापासून काम घ्यावें. ब्राह्मण कूळ निर्धन झाल्यास लाभानुसार सोई सोईनें फेड करून घ्यावी.

### टीका.

५ जर सावकारापेक्षां कूळ नीच जातीचें (किंवा एका जातीचें आहे) आणि तें निर्धन आहे तर त्याच्या जातीस उचित असें काम घेऊन सावकारानें त्याला ऋणमुक्त करावें. परंतु जेणें करून त्याच्या कुटुंबपोषणास प्रतिबंध होईल असें काम घेऊं नये. नादार कुळाकडील कर्ज देवविण्याचा प्रकार.

६ जर ब्राह्मण कूळ निर्धन आहे तर त्याला जसजसा लाभ होईल तसतसें देवावें.

७ एथें (मुळांत) निकृष्ट जातीचें असें ह्मटलें तेणें करून समान जातीचेंही ग्रहण होतें. यास्तव समान जातीचें कूळ निर्धन झाल्यास ऋणमुक्त करण्यासाठीं यथायोग्य काम करवावें. तसेंच "ब्राह्मण

# प्रकरण २

## ऋणादान.

कूळ" असें मूळांत ग्रहण केलें, तेंही उत्कृष्ट जातीच्या संग्रहार्थ. यास्तव क्षत्रियादि जातीपासून वैश्यादि जातीनें सोईसोईनें यथालाभ फेड करून घ्यावी.

मनुही हेंच स्पष्टकरूनदाखवितो.

मनु. स्वजातीच्या किंवा निकृष्टजातीच्या कुळानें काम करून आपल्यास ऋणमुक्त करावें; उत्कृष्ट जातीच्या कुळानें सोईसोईनें द्यावें.

### मूळ.

याज्ञवल्क्य. व्याजीं दिल्हेलें द्रव्य कूळ देत असतां सावकार आपलें घेतनाहीं, तर तें मध्यस्थापाशीं ठेवावें, ह्मणजे तेव्हांपासून व्याज बंद होतें.

### टीका.

८ कूळ व्याजीं घेतलेलें द्रव्य सावकारास परत देत असतां सावकार व्याजाच्या लोभानें घेत नाहीं, तर तें कुळानें मध्यस्थाजवळ ठेवावें, ह्मणजे ठेविल्या मितीपासून त्याचें व्याज बंद होतें. कूळ सावकाराचें द्रव्य परत देत असतां तो घेत नाहीं, तर व्याज बंद होतें.

९ तिऱ्हाइताजवळ ठेविल्यानंतर सावकार मागत असतां कूळ देत नाहीं, तर तेव्हांपासून पुनः पहिल्याप्रमाणेंच व्याज चालू होतें.

## शाखा ६

आतां अवश्य दिल्हें पाहिजे असें ऋण, व तें कोणाचें कोणी व कधीं द्यावें हें सांगतो.

# प्रकरण ३

## ऋणादान.

मूळ.

याज्ञवल्क्य. **अविभक्तां**नीं कुटुंबासाठीं जें कर्ज केलें असेल, तें कुटुंबी मृत किंवा परागंदा झाला तर वारसांनीं द्यावें.

टीका.

जें कर्ज अवश्य दिल्हें पाहिजे तें देण्याविषयीं अधिकारी.

१ वक्तांनीं मिळून किंवा प्रत्येकानें **अविभक्त** असतां कुटुंब पोषणार्थ जें कर्ज केलें असेल तें कुटुंबी (मुख्यपुरुष) यानें द्यावें, तो मेला किंवा परागंदा झाला तर त्याचे जे वारीश असतील त्यांनीं द्यावें.

अणखी कोणी द्यावें, याविषयीं **प्रत्युदाहरण** सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. नवऱ्याचें कर्ज स्त्रीनें, तसेंच पुत्राचें कर्ज आईनें व बापानेंही देऊं नये. आणि बायकोचें कर्ज नवऱ्यानेंही देऊं नये. परंतु, सदरहू कर्ज कुटुंबपोषणा शिवाय असेल तर.

टीका.

कुटुंब पोषणार्थ कोणीही केलेलें कर्ज मुख्यपुरुषानें द्यावें.

२ नवऱ्यानें केलेलें कर्ज बायकोनें देऊं नये, पुत्रानें केलेलें कर्ज आईनें व बापानेंही देऊं नये. तसेंच बायकोचें कर्ज नवऱ्यानें देऊं नये. परंतु तें कुटुंब पोषणार्थ नसल्यास. कुटुंब पोषणार्थ कोणीहीं केलेलें असेल तें कुटुंबीनें द्यावें, त्याच्या अभावीं जिंदगी घेणारानें द्यावें.

# प्रकरण ३

## ऋणादान.

बापाचें कर्ज पुत्रानें, नातवानें, द्यावें असें पुढें (७व्या शाखेच्या १ल्या अंकाचे वचनांत) सांगितलें आहे, त्याचें बाधक येथें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. मद्य, स्त्री, जुगार, यांसाठीं केलेलें, दंड व शुल्क[1] यांची बाकी, तसेंच **वृथादान** ही, असें पित्याचें कर्ज पुत्रानें देऊं नये.

टीका.

३ मद्य प्राशनानिमित्त केलेलें, स्त्रीव्यसन निमित्त, जुगार संबंधी, दंड व शुल्क यांची बाकी, तसेंच **वृथादान** ह्मणजे धूर्त, भाट, जेठी, **इत्यादिकांस** देऊं केलेलें, असें जें बापाचें कर्ज आहे तें पुत्रादिकानें कलाल वगैरेस देऊं नये. अशा व्यसनानिमित्त बापानें केलेलें कर्ज पुत्रानें देऊं नये.

स्मृति. धूर्त, भाट, जेठी, कपटी वैद्य, नट, चोर, यांस दिल्हेलें निष्फळ होतें.

४ वरच्या अंकांत दंड व शुल्क यांची बाकी देऊं नये असें सांगितल्यावरून (बाकी मात्र देऊं नये) भर रकम असल्यास द्यावी, असें समजूं नये.

उशना. दंड किंवा त्याची बाकी, तसेंच शुल्क अथवा त्याची बाकी, वजें **व्यवहार** संबंधी नसेल तें ही पुत्रानें देऊं नये.

गौतमही. मद्य, शुल्क जुगार, आणि दंड, या विषयींचें देणें पुत्राच्या

---

[1] शुल्क ह्मणजे जकात, कर, धारा, वगैरे समजावें.

# प्रकरण २

## ऋणादान.

माथ्यावर नाहीं येणेंकरून (३ ऱ्या अंकानें) कोणतें कर्ज परत देऊं नये तें सांगितलें.

२ ऱ्या अंकांत "बायकांचें कर्ज नव ऱ्यानें देऊं नये" असें जें सांगितलें त्या चें बाधकवचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. गौळी, कलाल, नट, रंगारी, पारधी, यांच्या स्त्रियांचें कर्ज नवऱ्यानें फेडावें. कारण, त्यांची उपजीविका त्यांचे स्त्रियां चे स्वाधीन.

टीका.

५ गौळी, कलाल, नट, रंगारी, पारधी यांच्या स्त्रियांनीं केलेलें कर्ज नवऱ्यांनीं द्यावें. कारण, त्यांची उपजीविका त्यांच्या स्त्रियांच्या स्वाधीन आहे. यावरून अणखीही ज्यांची उपजीविका स्त्रियांच्या स्वाधीन आहे, त्यांच्या स्त्रियांनीं केलेलें कर्ज नवऱ्यानें द्यावें असें सिद्ध होतें.

गौळी कलाल इत्यादिकांच्या बायकांनीं केलेलें कर्ज नवऱ्यांनीं द्यावें.

(२ ऱ्या अंकांत सांगितलें कीं) "नवऱ्याचें कर्ज बायकोनें देऊं नये" त्याचें बाधकवचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. नवऱ्याच्या आज्ञेवरून कबूल केलेलें, किंवा नवऱ्याबरोबर केलेलें, अथवा स्वतां केलेलें कर्ज, स्त्रीनें फेडावें. याहून दुसरें कर्ज स्त्री देऊं शकत नाहीं.

# प्रकरण ३

# ऋणादान

## टीका.

६ नवरा आसन्न मरण झाला असतां, किंवा देशांत रीं जाण्यास सिद्ध असतां, त्याच्या आज्ञेवरून कबूल केलेलें त्याचें कर्ज बायकोनें द्यावें; व जें कर्ज नवऱ्या सहवर्तमान केलें आहे, तेंही नवऱ्याच्या अभावीं पुत्र (नातू) नसल्यास बायकोनें द्यावें; आणि जें कर्ज स्वतां केलें असेल तेंही तिनेंच द्यावें याशिवाय दुसरें कर्ज देण्यास बायको अधिकारी नाहीं. बायकोनें दिल्हें पाहिजे असें नवऱ्याचें कर्ज कोणतें.

७ शंका——— सदरहू तीन प्रकारचें कर्ज बायकोनें द्यावें, असें सांगायास नको. कारण, हें सिद्धच आहे, ह्मणून संदेह येणार नाहीं.

स्मृति. ८ समाधान——— भार्या, पुत्र, दास, या तिघांच्या स्वाधीन द्रव्य नाहीं. कारण, यांस जें मिळेल तें ज्यापाशीं हे आहेत त्याचें तें द्रव्य होय.

अशा वचनावरून भार्याही निर्धन आहे. ह्मणून सदरहू तीन प्रकारचें कर्ज देणार नाहीं, अशा शंकेमुळें ६ वा अंक सांगितला. परंतु भार्या, पुत्र, दास, या तिघांच्या स्वाधीन द्रव्य नाहीं, असें जें वचन सांगितलें, त्याचें तात्पर्य निर्धनत्वाविषयीं नाहीं. केवळ परस्वाधीनपणाविषयीं मात्र आहे; याविषयीं ७ व्या प्रकरणीं स्पष्ट केलें आहे.

९ शंका——— (६ व्या अंकाचे वचनांत) "याहून दुसरें कर्ज बायको देऊं शकत नाहीं" असें सांगितलें तेंही सांगायास नको. कारण, तीन प्रकारचें कर्ज बायकोनें द्यावें, असा

# प्रकरण ३

## ऋणादान.

**विधि** सांगितल्यानंतर, याशिवाय कर्ज देऊं नये, हा निषेध सिद्ध होतो.

१० समाधान —— (६ व्या अंकांत शेवटीं) "या शिवाय दुसरें कर्ज" ह्मणजे ६ व्या शाखेच्या ३ऱ्या अंकांत सांगितलेलें जें नवऱ्याचें कर्ज तें त्याच्या आज्ञेवरून कबूल केलेलें. अथवा त्याबरोबर केलेलें जरी आहे, तरी बायकोनें देऊं नये, असा **अपवाद** करण्यासाठीं सांगितलें.

## शाखा ७

अणखी जें ऋण अवश्य दिल्हें पाहिजे, व कोणी द्यावें, आणि कधीं द्यावें, हे तीन प्रकार सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. पिता परागंदा, मृत, किंवा **अचिकित्सनीय** रोगग्रस्त, झाला असतां व **निह्नव** केल्यामुळें साक्षीकडून[1] शाबीत केलेलें कर्ज पुत्रांनीं व नातवांनीं द्यावें.

टीका.

१ पिता अवश्य देय ऋण न फेडतां जर परागंदा झाला, किंवा मरण पावला, अथवा ज्याची चिकित्सा होत नाहीं अशा रोगा

पित्यानें आपलें कर्ज फेडलें नाहीं तर पुत्रांनीं नातवांनीं फेडावें.

---

१ येथें साक्षी शब्दें करून लेख भोग वगैरे प्रमाणें घ्यावीं.

# प्रकरण ३

## ऋणादान.

नें ग्रस्त झाला, तर त्याचें कर्ज पुत्रांनीं किंवा नातवांनीं, पित्या चें धन नसल्यासही पुत्रत्वामुळें व पौत्रत्वामुळें, अवश्य द्यावें. तो देण्याचा क्रमही असाच. पित्याच्या अभावीं पुत्रानें, पुत्राच्या अभावीं नातवानें, द्यावें. परंतु जर पुत्रानें किंवा नातवानें **निह्नव** केला, तर तें सावकारानें साक्षी **इत्यादिकें** करून शाबीत केलें द्यावें.

२ येथें (१ ल्या अंकांत) पिता परागंदा झाल्यावर द्यावें, इतकेंच सांगितलें. परंतु कधीं द्यावें, याविषयीं कालनियम तर नारदानें सांगितलेला घ्यावा.

नारद. बाप, चुलता, किंवा वडील बंधू, परागंदा झाल्यावर वीस वर्षांनंतर त्यांचें कर्ज पुत्रानें[1] फेडावें. — बाप परागंदा झाल्यावर विसां वर्षांनीं पुत्रादिकांनीं कर्ज फेडावें.

३ बाप मरण पावल्यावरही पुत्र जर **अप्राप्तव्यवहार** आहे, तर कर्ज देण्यास अधिकारी नाहीं. **प्राप्तव्यवहार** असेल तर त्यानें द्यावें.

तो कालही तोच (नारद) दाखवितो.

नारद. ४ आठ वर्षेंपर्यंत शिशु, ह्मणजे गर्भांत असल्या सारिखाच जाणावा; नंतर सोळा वर्षेंपर्यंत **बाल**, त्यालाच **पोगंड** असें ह्मटलें आहे; नंतर (सोळा वर्षांचे वयापुढें) पुत्र, व्यवहार जाणणारा व आईबापाच्या पाठीमागें स्वतंत्र होतो. — अप्राप्तव्यवहार पुत्राविषयीं.

५ जरी आई, बाप, मेल्यावर **बाल** असतांही स्वतंत्र

---

१ पुत्र शब्देंकरून पुतण्या, कनिष्ठ बंधू हेही घ्यावे.

# प्रकरण ३

## ऋणादान.

वागूं लागला, तरी ऋण देण्यास अधिकारी होत नाहीं.

स्मृति. जरी **अप्राप्तव्यवहार** असून स्वतंत्र वागूं लागला तरी ऋण देण्यास अधिकारी होत नाहीं. कारण, स्वातंत्र्य ज्येष्ठपणावर आहे, व तें ज्येष्ठपण गुण वय यांवांचून येत नाहीं.

६ जे द्याही देण्याविषयीं व हुजूर बोलावण्याविषयीं निषेधिले आहेत, त्यांत **अप्राप्तव्यवहारा**चीही गणना केली आहे. हुजूर बोलावून आणावया च्या निषेधाविषयीं.

स्मृति. **अप्राप्तव्यवहार**, दूत, धर्म करावयास सिद्ध, **व्रतस्थ** संकटांत पडलेला, यांस द्याही देऊं नये; व **राजानें** हुजूर बोलावूं नये.

स्मृति. यास्तव पुत्र व्यवहार जाणणारा झाला ह्मणजे त्यानें आपला स्वार्थ सोडून बापाला असें ऋणमुक्त करावें कीं, जेणेंकरून तो नरकांत न जाई.

श्राद्धाविषयीं तर **बाला**सही अधिकार आहे.

गोतम. पितृकर्मावांचून अन्यत्र स्थळीं (बालानें) श्रुति ह्मणूं नये.

७ (१ल्या अंकांत) पुत्रांनीं व नातवांनीं, असें बहुवचन दाखविल्यावरून बहुतपुत्र असून जर ते विभक्त आहेत, तर आपापल्या विभागांतून बापाचें कर्ज फेडावें. एकत्र आहेत तर **गुणप्रधानभावें** करून जो सर्वांत मुख्य असेल त्यानें समाईक द्रव्यांतून फेडावें. पुत्र विभक्त असल्यास आपल्या अंशांतून व अविभक्त असल्यास समाईक द्रव्यांतून बापाचें कर्ज फेडावें.

# प्रकरण ३

## ऋणादान.

नारद. पितृमरणानंतर विभक्तपुत्रांनीं यथाशक्ति कर्ज फेडावें. अविभक्त असल्यास त्यांत जो कुटुंब निर्वाह करीत असेल त्यानें द्यावें.

८ (१ ल्या अंकांत) पुत्रांनीं व नातवांनीं बापाचें कर्ज द्यावें, असें जरी सामान्यत: सांगितलें, तथापि जसें बाप सव्याज देतो, तसेंच पुत्रांनींही द्यावें. नातवानें तर मुद्दल मात्र द्यावें, व्याज देऊं नये, इतका विशेष समजावा.

बृहस्पति. शाबीत केलेलें बापाचें कर्ज पुत्रांनीं स्वतां केलेल्या कर्जाप्रमाणेंच द्यावें. नातवानें मुद्दलमात्र द्यावें, आणि प्रपौत्रानें अगदींच देऊं नये.

परंतु जर त्याला पणजाचें धन मिळालें नसेल तर. हें पुढल्या वचनांत (८व्या शाखेच्या १४ व्या अंकांत) स्पष्ट सांगितलें आहे.

### शाखा ८

या प्रमाणें ऋण देण्याविषयीं क्रम, त्याचा पुत्र, व नातू असे तीन अधिकारी सांगून त्यांचा समवाय असल्यास कोणत्या अनुक्रमानें द्यावें हेंही सांगितलें. आतां ऋण देण्याविषयीं अणखी अधिकारी कोणते, व त्यांचा समवाय असल्यास कोणत्या अनुक्रमा

# प्रकरण २

## ऋणादान.

जें द्यावें तें मागणें.

मूळ.

याज्ञवल्क्य. **रिक्थग्राह**, **योषित्ग्राह**, व **अनन्याश्रितद्रव्य** असा पुत्र, हे निपुत्रिकाचें कर्ज देण्यास अधिकारी आहेत.

टीका.

१ **रिक्थ** (जिंदगी) म्हणजे दुसऱ्याचें द्रव्य असतां अन्याच्या **क्रयादिका**वांचून जें आपलें असें होतें तें; त्याला विभागद्वारा घेणारा जो तो **रिक्थग्राह**, त्यानें कर्ज द्यावें. म्हणजे असें, जो ज्याचें द्रव्य **रिक्थ**रूपें करून घेतो त्यानें त्याचें कर्ज फेडावें. चोर वगैरेनीं फेडूं नये.

२ **योषित्ग्राह**[१] म्हणजे जो ज्याची बायको घेतो तो. त्यानें त्याचें (तिच्या पहिल्या नवऱ्याचें) कर्ज फेडावें.

**रिक्थग्राहाहून योषित्ग्राह** निराळा सांगण्याचें कारण, स्त्रीचा विभाग संभवत नाहीं; स्त्री हें द्रव्य खरें, परंतु **रिक्थ**रूप द्रव्य नव्हे. कारण, जें द्रव्य विभागास योग्य आहे, त्याविषयींच **रिक्थ** शब्दाची प्रवृत्ति आहे.

३ पुत्र असून जर **अनन्याश्रितद्रव्य** आहे, म्हणजे ज्याच्या आईबापाचें धन त्या पुत्रावांचून दुसऱ्याच्या स्वा

---

१ योषित्ग्राह म्हणजे पाटाचा नवरा असावा. अद्यापि शूद्रांत पाटलावण्याची चाल आहे तिला मूळ हेंच असावें.

# प्रकरण २

## ऋणादान.

धीन नाहीं असा, त्यानें त्यानें कर्ज द्यावें.

तिघांचा समवाय असल्यास देण्याचा क्रमही मुळांत सांगितल्याप्रमाणेंच. ह्मणजे, प्रथमतः **रिक्थग्राहानें** कर्ज द्यावें; त्याच्या अभावीं **योषित्‌ग्राहानें**; त्याच्या अभावीं (अनन्याश्रित द्रव्य) पुत्रानें द्यावें.

४ शंका—— या तिघांचा समवायच संभवत नाहीं. कारण,

स्मृति. बापाचें **रिक्थ** घेण्याविषयीं पुत्रच अधिकारी, भाऊ नाहींत, व पितरही नाहींत.

अशा वचनावरून पुत्र असतां अन्यास **रिक्थ** घेण्याचा अधिकार नाहीं.

५ **योषित्‌ग्राह** तर सुतरां संभवत नाहीं. कारण,

स्मृति. स्त्रियांनीं दुसरा भर्ता करावा अशी कोठें शास्त्राज्ञा नाहीं.

६ पुत्रानें द्यावें असें जें सांगितलें, तेंही अयुक्तच. कारण, पूर्वीं (७ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचे वचनांत) सांगितलेंच आहे कीं, पुत्रांनीं नातवांनीं कर्ज द्यावें. (यास्तव पुनः येथें सांगितल्यानें पुनरुक्त दोषमात्र येतो)

७ तसेंच पुत्राचें **अनन्याश्रितद्रव्य** असें जें विशेषण आहे तेंही निरर्थक. कारण, (४ थ्या अंकांत सांगितलेंच आहे कीं.) पुत्र असतां **रिक्थ** घेण्याविषयीं दुसऱ्यास अधिकार नाहीं. असल्यास **रिक्थग्राहानें** कर्ज फेडावें असें पूर्वीं (१ ल्या अंकांत) सांगितलेंच आहे.

# प्रकरण २

## ऋणादान.

८ "निपुत्रिक जो **रिक्थी** त्यांचे कर्ज" हें ही सां सांगू नये. कारण, पुत्र असतांही **रिक्थग्राहानें** ऋण द्यावें, असें सांगितलेंच आहे. अर्थात् पुत्र नसल्यास विशेषेंकरून **रिक्थग्राहानें** द्यावें हें सिद्धच आहे.

९ समाधान——पुत्र असतांही दुसरा **रिक्थग्राह** संभवतो. कारण, **क्लीब** आंधळा, बहिरा, पांगळा, अशा प्रकारचा पुत्र आहे, तर तो **रिक्थ** घेण्यास अधिकारी होत नाहीं. यास्तव त्याला अंश न देतां पोषणमात्र करावें. असें पुढें (७ व्या प्रकरणीं ३० व्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगितलें आहे.

गौतमही. **सवर्णपुत्र** असूनही जर दुर्वृत्त आहे, तर अंशाचा विभागी होतनाहीं.

यास्तव **षंढादिक** पुत्र असतां व **सवर्णपुत्र** असूनही तो जर दुर्वृत्त आहे, तर चुलता किंवा त्यांचा[1] पुत्र **रिक्थग्राही** होतो.

१० (**योषित्ग्राह**ही संभवतो, तो असा) **योषित्ग्राह** जरी शास्त्रनिषिद्ध आहे, तथापि शास्त्रीय निषेधाचें उल्लंघन करून जो दुसऱ्याची स्त्री घेतो तो त्याचें (पहिल्या नवऱ्याचें) कर्ज देण्याविषयीं अधिकारी होतो.

**योषित्ग्राह**, जो चार **स्वैरिणीं**तून शेवटलीचा

१ त्यांचा ह्मणजे चुलत्याचा किंवा षंढादिकांचा संभवेल.

# प्रकरण ३

## ऋणादान.

आणि तीन **पुनर्भू** यांतून पहिलीचा अंगीकार करितो तो.

नारद. **परपूर्व**[※१] अशा सात स्त्रिया यथाक्रमें करून सांगितल्या आहेत, त्यामध्यें **पुनर्भू** तीन प्रकारची, आणि **स्वैरिणी** चार प्रकारची.

पुनर्भूचे प्रकार.

१ ज्या कन्येचें लग्नमात्र झालें परंतु नवऱ्याशीं संग झाला नाहीं, आणि पुनः दुसऱ्याशीं लग्न केलें जातें ती पहिली **पुनर्भू**.

२ जिचें प्रथमतः एकाशीं लग्न झालें, पुढें ती व्यभिचारिणी उघाडीस आल्यामुळें वडिलांनीं देशादि धर्म पाहून दुसऱ्यास दिल्ही जाती ती दुसरी.

३ जी लग्नाचा नवरा मेला आणि दीरही नाहींत, ह्मणून **बांधवांनीं सवर्ण सपिंड** अशा दुसऱ्यास दिल्ही जाती ती तिसरी.

स्वैरिणीचे प्रकार.

१ **सापत्य** किंवा **निरपत्य** स्त्री नवरा जिवंत असतां स्वेच्छेनें परपुरुषाशीं संगत होती, ती पहिली **स्वैरिणी**.

२ कुंवारपणींचा नवरा टाकूनजी परपुरुषाचा आश्रय करिती, आणि पुनः नवऱ्याचे घरीं येती ती दुसरी.

३ नवरा मेल्यानंतर प्राप्त झालेल्या दिरादिकांचा त्याग

---

※१ परपूर्व ह्मणजे जिचा लग्नाचा नवरा आहे किंवा होता आणि दुसऱ्याशीं संगत होती ती.

# प्रकरण २

## ऋणादान.

करून स्वेछेनें परपुरुषाशीं संगत होती ती तिसरी. दुंकाळ पडल्यामुळें देशांतराहून प्राप्त झालेलीअथवा द्रव्य देऊन विकत घेतलेली किंवा खावयास नमिळेस वव आतुर होऊन मी तुझी आहें असें बोलून प्राप्तझा लेली ती चौथी.

जो सदरहूतीन **पुनर्भू**तून पहिलीचा, तसाच चार **स्वैरिणीं**तून शेवटलीचा अंगीकार करितो, त्यानें पहिल्यान वऱ्याचें कर्ज द्यावें.

तसाच दुसऱ्या प्रकारचाही **योषित्-ग्राह** पहिल्या नवऱ्याचें कर्ज देण्यावि षयीं अधिकारी असें नारद सांगतो.

नारद. ११जी सधन किंवा **सापत्य** स्त्री ज्याचा अंगीकार करिती, त्यानें तिच्या पहिल्या नवऱ्याचें कर्ज द्यावें. किंवा तशीच (धन व अपत्य यासुद्धां)टाकावी. पाटाच्या नवऱ्यानें पहिल्यानवऱ्याचें कर्ज फेडावें.

स्मृति. ११ तसेंच अधनवअपुत्रमरण पावला असतां त्याची स्त्री जो घेतो तो. तिच्या नवऱ्याचें कर्ज फेडण्याविषयीं अधिकारी होतो. कारण, स्त्री हेंच त्याचें (पहिल्यानवऱ्याचें) धन होय.

१२ तसेंच "पुत्रानें द्यावें" असें जें पुनः सांगितलें तें यासाठीं कीं, **रिक्थग्राहा**च्या अभावीं **योषित्ग्राहा**नें द्यावें, त्याच्या अभावीं पुत्रानें द्यावें, अशा अनुक्रमा साठीं मात्र सांगितलें.

# प्रकरण ३

## ऋणादान.

१३ तसेंच (या शाखेच्या ३ऱ्या अंकांत) "अनन्याश्रित द्रव्य" असें जें पुत्राचें विशेषण आहे तें यासाठीं कीं, बकृत पुत्र असतां बापाचें द्रव्य न मिळालें तरी, जो रिक्थ घेण्यास अधिकारी आहे तोच पुत्र कर्ज देण्याचा अधिकारी होईल. आंधळा, बहिरा, इत्यादिक पुत्र होणार नाहींत.

बकृत पुत्र असून जो बापाची जिंदगी घेतो तोच कर्ज फेडण्याविषयीं अधिकारी.

१४ तसेंच (या शाखेच्या १ल्या अंकांत) "त्या निपुत्रिकाचें कर्ज फेडावें" असें जें सांगितलें तें यासाठीं कीं, ज्याला पुत्र व नातू नाहींत, आणि पणतू वगैरे आहेत, परंतु त्यांस जर पणज्याचें रिक्थ मिळालें असेल तरच ते कर्ज देण्याविषयीं अधिकारी होतील, अन्यथा होणार नाहींत. पुत्र पौत्रांस रिक्थ न मिळालें तरी ते कर्ज देण्यास अधिकारी आहेत, असें पूर्वीं (७व्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितलेंच आहे.

पुत्र, नातू हे जिंदगी न मिळाली तरी बापाचें कर्ज फेडण्याविषयीं अधिकारी आहेत.

नारद. पिता मरण पावल्यानंतर त्याचें कर्ज पुत्रांनीं द्यावें, पुत्राच्या मागें नातवांनीं द्यावें, प्रपौत्रांनीं देऊं नये.

या प्रमाणें (चालत्या शाखेच्या १ल्या अंकाचे वचनावर शंका प्राप्त झाली होती तिचें समाधान होऊन) सर्व निर्दोष जाणावें.

# प्रकरण ३

# ऋणादान.

## शाखा १

### अथवा दुसरा प्रकार.

१ **योषित्ग्राहा**च्या अभावीं पुत्रानें द्यावें असें सांगितलें, आणि पुत्राच्या अभावीं **योषित्ग्राहा**नें द्यावें, असें सांगायाचें कारण, "निपुत्रिकाचें" असें (८ व्या शाखेच्या १ल्या अंकाचे वचनांत) सांगितलें. तर्थे **रिक्थ** शब्दानें स्त्रीच घ्यावी. कारण, मागें (११ व्या अंकांत) सांगितलें कीं, स्त्री हेंच त्याचें धन होय. आणि दुसरेंही असें कीं, "जो ज्याची बायको घेतो तो त्याचें धन घेतो.

शंका —— **योषित्ग्राहा**च्या अभावीं पुत्रानें द्यावें, आणि पुत्राच्या अभावीं **योषित्ग्राहा**नें द्यावें, हें परस्पराशीं विरुद्ध आहे. कारण, जर दोघे आहेत तर कोणीच देऊं नये असें प्राप्त झालें.

२ समाधान —— शेवटली **स्वैरिणी** व पहिली **पुनर्भू** यांचा अंगीकार करणारा (अंक१०) आणि सधन स्त्रीनें ग्रहण करणारा (अंक ११) या दोघांच्या अभावीं पुत्रानें कर्ज फेडावें, आणि पुत्राच्या अभावीं निर्धन निरपत्य स्त्रीग्राही यानें कर्ज द्यावें. योषित्ग्राहांनीं कर्ज फेडावें.

नारदानेंही असेंच सांगितलें आहे.

# प्रकरण ३

## ऋणादान.

(८ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचे वचनांत) निपुत्रिकाचें कर्ज (रिक्थीनें[1]) द्यावें, असें जें सांगितलें आहे त्याचा दुसरा अर्थ.

३ **रिक्थग्राह, योषित्ग्राह,** आणि पुत्र, यांनीं कोणाचें कर्ज द्यावें, अशा आकांक्षेवरून सावकारास द्यावें, तो नसल्यास त्याच्या पुत्रादिकांस द्यावें; परंतु पुत्रादिक नसल्यास कोणाला द्यावें? अशी आकांक्षा प्राप्त झाली असतां त्या सावकाराच्या पुत्रादिक वंशाच्या अभावीं **रिक्थ** घेण्यास अधिकारी, जो वारीस असेल त्याला द्यावें. रिक्थग्राह, योषित्ग्राह, आणि पुत्र यांनीं कोणास कर्जाचा वसूल द्यावा.

नारद. ब्राह्मण **उत्तमर्णाचें** जें कर्ज द्यावयाचें आहे तें तो (उत्तमर्ण) नाहीं तर त्याच्या पुत्रादिकांस द्यावें, पुत्रादिकही नाहीं, तर कुळांतील जो कोणी असेल त्याला द्यावें. तोही नाहीं, तर **बांधवांस**[2] द्यावें," असें सांगून पुढें सांगितलें कीं," जर कुळांतील कोणी नाहींत, व संबंधी, **बांधव** ही कोणी नाहींत, तर तें ब्राह्मण सावकाराचें कर्ज ब्राह्मणास द्यावें, तेंही नसल्यास उदकांत टाकावें.

---

१ रिक्थीनें म्हणजे रिक्थ घेण्यास जो योग्य त्यानें.

---

२ बांधव हे ०३ प्रकारचे बंधु यांचा विशदप्रकार दायविभागप्रकरणीं सांगितला आहे.

# प्रकरण ३

## ऋणादान.

### शाखा १०

सांप्रत कोणत्या पुरुषानें ऋण घेऊं नये, असें सांगतांना प्रसंग संगतीनें त्या पुरुषास दुसऱ्या व्यवहाराचा निषेध सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. भाऊ, पितापुत्र, स्त्रीपुरुष, हे **अविभक्त** असतां यांनीं जामिनकी, कर्ज, साक्ष, हे व्यवहार करूं नयेत, असें सांगितलें आहे.

टीका.

१ भाऊ, नवरा बायको, पिता पुत्र, हे **अविभक्त** असतां यांनीं जामिनकी, कर्ज, आणि साक्ष, असे तीन व्यवहार परस्परांच्या अनुमतीवांचून करूं नयेत, असें मन्वादिक ऋषींनीं सांगितलें आहे. कारण, साक्ष व जामिनकी याबद्दल कदाचित् समाईक द्रव्यांतून खर्च होतो, आणि कर्जही असल्यास अवश्य द्यावें लागतें. परस्परांची अनुमति असल्यास **अविभक्त** असतांही जामिनकी, कर्ज, साक्ष, होऊं शकतात; आणि विभाग झाल्यानंतर परस्परांच्या अनुमतीवांचूनही जामिनकी वगैरे होतात. बंधूवगैरे अविभक्त असतां जामिनकी साक्ष कर्ज हे व्यवहार करूं नयेत.

२ शंका —— स्त्रीपुरुषांचा विभाग झाल्यापूर्वी जो जामिनकी वगैरेचा निषेध सांगितला, त्याची उपपत्ति होत नाहीं. कारण, स्त्रीपुरुषांचा विभाग होत नाहीं ह्मणून विशे

# प्रकरण ३

## ऋणादान.

षणाला वैय्यर्थ आले.

स्त्री पुरुषांचा विभाग होत नाहीं हें आ

पस्तंब दाखवितो.

आपस्तंब. स्त्री पुरुष यांचा विभाग होत नाहीं.

३ समाधान —— खरें परंतु **श्रौत. स्मार्त**, अग्नि साध्य जीं कर्में व तज्जनित फलें त्या विषयीं मात्र विभाग नाहीं, असा त्याचा अर्थ, सर्व कर्मा विषयीं किंवा द्रव्या विषयीं विभाग होत नाहीं असें नव्हे.

४ तेंच स्पष्ट सांगतो. "स्त्रीपुरुषांचा विभाग होत नाहीं," असें स्वमत सांगून, कां होत नाहीं, यांचें कारण ही तोच सांगतो. "जेव्हां स्त्रीचें पाणिग्रहण झालें, तेव्हांच तिला विवाहाग्निसाध्य कर्माविषयीं, तसेंच पुण्य व तज्जनित फलें या विषयींही" नवऱ्या सहवर्त अधिकार आहेच.

स्मृति. तसेंच गृहस्थानें **स्मार्त** कर्म विवाहाग्नीवर प्रत्यहीं करावें.

असें सांगितलें. यास्तव **श्रौत स्मार्त** अग्नि साध्य कर्मावांचून इतर कर्मा विषयीं व **पूर्त**[१] विषयीं स्त्रीपुरुषांस पार्थक्यें करून अधिकार आहे.

तसेंच जें यागादिक पुण्यांचीं फलें जीं स्वर्गादिक या विषयींही स्त्रीपुरुषांस सहाधिकार आहे.

ज्या पुण्य कर्मा विषयीं स्त्रीपुरुषांस सहाधिकार आहे. त्यांच्या फला विषयींही सहाधिकार आहे असें जाणावें. परंतु

---

१ पूर्त ह्मणजे वापी कूप तडाग देवालयें इत्यादिकांचें बंधन आणि अन्नप्रदान इत्यादिक.

# प्रकरण २

## ऋणादान.

पूर्तें नवऱ्याची आज्ञा घेऊन केलेलीं जरी आहेत, तरी त्या च्या फलाविषयीं सहाधिकार नाहीं.

५ शंका— द्रव्याच्या स्वामित्वाविषयींही नव ऱ्या सहवर्तमान अधिकार आहे व द्रव्यग्रहणाविषयींही. कारण, नवऱ्याच्याप्रवासाशिवाई **नैमित्तिक दान** ही स्त्रीनें केलें असतां तें स्तेय होत नाहीं, असें सांगितलें आहे.

६ .समाधान—खरें येणेंकरून बायकोला द्रव्य स्वामित्व दाखविलें, परंतु तिला भाग नाहीं असें नाहीं. कारण, द्रव्यग्रहणाविषयीं स्त्रीनें स्वामित्व आहे, असें सांगून त्याचें कारणही सांगितलें आहे. तें असें, भर्त्या- च्या प्रवासाबद्दल किंवा **नैमित्तिक** (अवश्यकर्तव्य) **दान**, अतिथिभोजन, भिक्षाप्रदान, **इत्यादिक** स्त्री नें केलें असतां तें स्तेय होत नाहीं. असें मन्वादिक ऋ षींनीं सांगितलें आहे. यास्तव स्त्रीलाही धनाविषयींस्वा मित्व आहे. अन्यथा तिनें केलेलें (**दान**, अतिथिभोजन, **पूर्त**, **इत्यादिक**) तें स्तेय होईल.

तस्मात् स्त्रीलाही नवऱ्याच्या इच्छेनें द्रव्यविभाग आहे, स्वेच्छेनें नाहीं. याविषयीं पुढें (७ व्या प्रकरणीं ४ थ्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगितलें आहे कीं, जर पुत्रांस समविभाग देतो, तर बायकांसही तसेच द्यावे.

# प्रकरण २

# ऋणादान.

जामिनकी विषयीं.

## शाखा ११

आतां जामिनकीचें निरूपण करितो.

मूळ.

याज्ञवल्क्य. हजरजामीन, विश्वासजामीन, आणि मालजामीन, अशी जामिनकी सांगितली आहे. पैकीं पहिले दोघे विपरीत वर्तले असतां त्यांकडून मालकाचें धन देवावें. मालजामिनाच्या तर पुत्रांकडूनही देवावें.

टीका.

१ जामिनकी ह्मणजे ज्याशीं कर्ज देणें घेणें वगैरे व्यवहार करायाचा आहे, त्याचा विश्वास पटावा एतदर्थ दुसऱ्या पुरुषाशीं करार करणें. जामिनकी.

२ विषयभेदेंकरून जामीन तीन प्रकारचा. जामिनाचे प्रकार.

हजरजामीन, विश्वासजामीन, आणि मालजामीन.

हजरजामीन गरज लागेल तेव्हां याला मी हाजर करीन.

विश्वासजामीन माझ्या विश्वासावर तूं याला धन दे, हा तुशीं प्रतारणा करणार नाहीं. कारण, हा असुकाचा पुत्र, व सर्वधान्य पिकावयाजोगी अशी याची जमीन, किंवा गाव, आहे.

मालजामीन जर हा देणार नाहीं तर मीच तु

# प्रकरण ३

## ऋणादान.

जामिनकी विषयीं.

झें धन देईन.

३ हजरजामीन हजर न करील, व विश्वासजामिनाचा विश्वास खोटा पडेल, तर त्याजकडून सावकारानें **विवादास्पदीभूत** द्रव्य देववावें.

४ कूळ दंडेलीनें किंवा निर्धनपणामुळें न देईल, तर मालजामिनाच्या पुत्रांकडूनही सावकारानें द्रव्य देवावें. मालजामिनाच्या पुत्रांकडूनही सावकारानें द्रव्य देवावें.

"मालजामिनाच्या पुत्रांकडूनही" असें सांगणारानें हजरजामीन, व विश्वासजामीन यांच्या पुत्रांकडून देववूं नये, व मालजामिनाच्या नातवाकडून देववूं नयें असें सुचविलें.

हेंच अणखी स्पष्टकरून सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. हजरजामीन, किंवा विश्वासजामीन, मरण पावला तर त्याच्या पुत्रांनीं जामिनकीचें कर्ज देऊं नये. मालजामिनाच्या पुत्रांनींही द्यावें.

टीका.

५ हजरजामीन, किंवा विश्वासजामीन, मरण पावला असतां त्याच्या पुत्रांनीं जामिनकीचें कर्ज देऊं नये. मालजामीन मरण पावला असतां त्याच्या पुत्रांनीं मुद्दल मात्र द्यावें, व्याज देऊं नये. नातवांनीं तर अगदींच देऊं नये. हजरजामीन, विश्वासजामीन, मेले तर त्यांचे पुत्राकडे जामिनकीचा संबंध नाहीं. मालजामिनाच्या पुत्रांकडून देवावें.

# प्रकरण २

## ऋणादान.

### जामिनकी विषयीं.

व्यास. आजाचें कर्ज नातवानें आणि जामिनकी बद्दलबापाचें कर्ज पुत्रानें मुद्दलमात्र द्यावें. पणजाचें कर्ज पणतूनें व आजाचें जामिनकी बद्दलचें कर्ज नातवानें अगदींच देऊं नये.

परंतु मालजामिनानें कुळापासून तारण घेतलेलें नसेल तर व पणजाचें द्रव्य पणतूला मिळालें नसेल तर त्यानें देऊं नये असा निर्णय

स्मृति. जर कूळ निर्धन आहे आणि मालजामीन सधन आहे तर त्यानें मुद्दल द्यावें, व्याज देऊं नये.

अशी जी स्मृति आहे तिचीही व्याख्या अशीच कीं, मालजामीन सधन असतां ह्मणजे सधन असतां मरण पावलातर त्याच्यापुत्रानें मुद्दलच द्यावें.

६ जर हजरजामीन व विश्वासजामीन हे जामिनकी पुरतें तारण घेऊन जामीन झाले तर त्यांच्या पुत्रांनीं त्याच तारणानें जामिनकीचें कर्ज फेडावें.

तारणघेऊन जामीन राहिले असल्यासपुत्रांनींही जामिनकीचें कर्ज द्यावें.

कात्यायन. तारण घेऊन हजरजामीन किंवा विश्वासजामीन झाला आणि पुढें मरणपावला किंवा दूरदेशीं गेला, तर त्याच्या पुत्रानें त्या तारणांतून जामिनकीचें कर्ज फेडावें.

ज्या व्यवहारीं अनेक जामीन आहेत तेथें कसें देवावें हें सांगतो.

# प्रकरण ३

## ऋणादान.

### जामिनकीविषयीं.

मूळ.

याज्ञवल्क्य. जर बहूत जामीन होतील तर त्यांनीं आपापल्या अंशानें कर्ज फेडावें. जर **एकछायाश्रित** जामीन आहेत, तर सावकार इच्छेप्रमाणें घेऊं शकेल.

टीका.

७ जर एका **व्यवहारीं** दोन किंवा बहूत जामीन आहेत, तर त्यांनीं तें कर्ज यथांश विभागून आपापला अंश द्यावा.

एकाव्यवहारीं अनेक जामीन असल्यास आपापल्या हिश्शें द्यावें.

जर **एकछायाश्रित** जामीन ह्मणजे बहूत जामीन राहून कुळाप्रमाणेंच प्रत्येक जामिनानें सर्व कर्ज फेडण्याचा करार केला आहे, तर सावकाराच्या इच्छेप्रमाणें, सबब, सावकार त्यांतून ज्यापाशीं आपला अर्थ मागेल त्यानेंच सर्व द्यावा. अशास्थळीं यथाविभाग कल्पना नाहीं. जर वर सांगितलेल्या जामिनांतून कोणी देशांतरीं गेला, आणि त्याचा पुत्र सन्निहित आहे, सबब सावकार त्यापाशीं आपला अर्थ मागूं लागेल, तर त्यानेंच सर्व द्यावा. आणि जर त्यांतून कोणी मरण पावेल, तर त्याच्या पुत्रानें मुद्दलमात्र द्यावें.

कात्यायन. **एकछायाश्रितां**तून जो हजर असेल त्यापासून सावकार आपला अर्थ घेईल. जर त्यांतून कोणी परागंदा झाला, तर त्याच्या पुत्रापासून सव्याज घेईल आणि मरणपावेल तर त्याच्या पुत्रापासून मुद्दलमात्र (याप्र

# प्रकरण २

## ऋणादान.

जामिनकीविषयीं.

माणें हजरजामीन विश्वासजामीन यांविषयीं जाणावें.)

## शाखा १२

जामिनकीचें कर्ज देण्याचा प्रकार सांगून आतां जामिनानें दिल्हेलें कर्ज त्याला परत मिळण्याचा प्रकार सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **राजा**नें सावकाराचें जें द्रव्य जामिनाकडून प्रसिद्ध देविलें असेल तें कुळाकडून जामिनाला दुपट देवावें.

टीका.

१ जें कर्ज सावकाराची तसदी लागल्यामुळे जामिनाकडून किंवा त्याच्या पुत्राकडून सर्वांसमक्ष **राजा**नें देवविलें असेल, तें जामिनाला कुळाकडून मुदतीची गरज न धरितां तत्काळ दुपट देववावें. परंतु दुपटीच्या लोभानें जर जामीन आपण होऊन सावकारास देतो, तर दुपट मिळणार नाही. सावकारास जामिनानें दिलेलें द्रव्य कुळाकडून जामिनाला दुपट देवावें.

नारद. जामीन सावकाराची तसदी लागल्यामुळें कुळाबद्दल जें द्रव्य सावकास देतो, तें कुळाकडून जामिनास दुपट देवावें.

# प्रकरण २

## ऋणादान.

### जामिनकी विषयीं.

सदरहू जो दुपट देण्याचा प्रकार सांगितला तो नाण्या विषयीं जाणावा.

२ शंका —— वर सांगितलेलें (याज्ञवल्क्य नारद) वचन दुपट द्रव्य देवावें इतकेंच प्रतिपादन करितें, परंतु त्या दुपट देण्याच्या प्रकाराची पूर्वी (३ ऱ्या शाखेंत) सांगितलेल्या मुदतीचा बाध न करितांही उपपत्ति होती जसें—पुत्र जन्मला असतां (पुत्रजन्म निमित्त व पुत्रगत पवित्रत्वरूप फल कामनोद्देशें करून) याग करावा, असें सांगितलें आहे, तो सोयर न फिटतां तत्काळ करावा असें नाहीं.

आणखी तत्काळ सव्याज द्यावें यापक्षीं पशु स्त्रिया यांस तत्काळ संततीचा संभव नाहीं ह्मणून केवळ मुद्दल द्यावें असें प्राप्त झालें.

३ समाधान —— "मुदत टळून फार दिवस झाले, तर वस्त्र चौपट, धान्य तिपट, आणि नाणें दुपट द्यावें" असें (३ ऱ्या शाखेंत) सांगितल्यावरून दुपट घेण्याचा प्रकार सिद्ध असतां पुनः येथें "दुपट देवावे" असें (चालत्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगणें निरर्थक होईल. पशू व स्त्रिया त्या चिरकाळ राहिल्या असतां संतति, नाहीं तर पशू व स्त्रिया घ्याव्या. असें प्रमत्त आहे.

जर जामिनकीनें कर्ज दिल्यानंतर कितीएक दिवसांनीं जामिनाला कूळ भेटतें तर त्या वेळेस पशू स्त्रिया यांची

# प्रकरण ३

## ऋणादान.

### जामिनकी विषयीं.

संततीही संभवतीच ती घ्यावी, अथवा पूर्वी झालेल्या संततीसुद्धां त्या पशू स्त्रिया घ्याव्या, असेंही संभवतें; त्यापेक्षां शंकायुक्त नव्हे.

४ दुसरें असें कीं, जामिनकी प्रीतीनें केली जाते, सबब जामिनानें जें दिल्हें तें स्नेहाच्या पोटीं दिलें गेलें, यास्तव प्रीतिदत्तानें मागितल्यापूर्वी व्याज चालू होत नाहीं.

स्मृति. जें कांहीं प्रीतिदत्त आहे, त्याचें मागितल्यावांचून व्याज चालू होत नाहीं. आणि मागत असतां दिल्हें नाहींतर शेंकडा पांच प्रमाणें व्याज चालू होतें.

या वचनेंकरून प्रीतिदत्ताला मागितल्याशिवाय व्याज नाहीं. जामिनकीचें द्रव्यही प्रीतिदत्तच होय असें असतांही, व नमागितलेंतरी, दिलेल्या दिवसापासून कालक्रमानें दुपट होईपर्यंत वाढतेंच. असें या (चालत्या शाखेच्या १ ल्या अंकांतील) वचनानें सांगितलें.

५ परंतु असेंही ह्मणणें नीट नाहीं. वर सांगितलेल्या अर्थाची या (चालत्या शाखेच्या १ अंकांतल्या) वचनेंकरून अगदीं प्रतीति होत नाहीं. कुळानें जामिनाला दुपट द्यावें इतकें मात्र येथें (या शाखेच्या १ल्या अंकांत) अवगत होतें.

६ तस्मात् मुदतीची गरज न धरितांच दुपट द्यावें. कारण, एतदर्थच हें (१ल्या अंकाचें) वचन आहे. यास्तव

# प्रकरण २

## ऋणादान.

### जामिनकीविषयीं.

हें चांगलें सांगितलें.

जामिनानें दिल्हेलें कुळाकडून दु-
पट देवावें असें सर्व द्रव्याविषयीं प्रा
प्त झालें असतां त्याचें बाधक सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. स्त्री पशु यांची संतति च व्याज, धान्य तिपट, वस्त्र चौपट, आणि रस आठपट देवावा.

टीका.

७ जसें जामिनानें दिल्हेलें नाणें मुदतीची गरज नठेवितां तत्काळ कुळाकडून जामिनाला दुपट देवावें तसेंच स्त्रिया पशू इत्यादिक[1] हीं पूर्वीं सांगितलेल्या व्याजासुद्धां द्यावीं.

वचनाचा अर्थही पूर्वींच ( ३ऱ्या शाखेच्या १ ल्या २ऱ्या ३ऱ्या अंकांत) सांगितला आहे.

८ सारांश ज्या द्रव्याचें जें पराकाष्टा व्याज सांगितलें आहे, तें द्रव्य जामिनानें सावकारास दिल्हेलें कुळाकडून त्या व्याजासुद्धां मुदतीची गरज न ठेवितां तत्काळ देवावें.

जामिनानें दिलेलें कुळाकडून सावकारास तत्काळ सव्याज देवावें.

९ जर हजरजामीन कबूल केलेल्या मुदतींत कुळाला हजर करूं शकत नाहीं. तर कुळाचा ठिकाणा लावण्यासाठीं त्याला दिढा महिन्याची सवड द्यावी, त्या मुदतींत जर हजर करि

कुळाचा ठिकाणा लावण्यासाठीं हजीर जामिनाला अवकाश द्यावा.

---

१ पूर्वीं ह्मणजे ३ऱ्या शाखेच्या २ऱ्या ३ऱ्या अंकांत.

# प्रकरण ३

## ऋणादान.

जामिनकी विषयीं.

तो तर त्याला जामिनकीपासून सोडावें, नाहीं तर कुळाबद्दल सावकाराचें धन देवावें.

कात्यायन. नाहींसें झालेल्या कुळाचा शोध करण्यासाठीं जामिनास दिढ महिन्याचा अवकाश द्यावा. जर त्यांत हजर करितो, तर जामीन सोडून द्यावा. मुदतीच्याआंत हजर करीत नाहीं तर **विवादास्पदीभूत** द्रव्य देवावें. व कूळ मरण पावलें असल्यासही हाच प्रकार जाणावा.

जामिनकी विषयीं वर्ज कोणकोणते ते

ही कात्यायनच सांगतो.

कात्यायन. १० धनी, शत्रु, धन्यानें नियुक्त केलेला, **निरुद्ध**, दंडलेला, ज्यावर पातकाचा **अभिशाप** आहे तो, वारीस, मित्र, व **नैष्टिकब्रह्मचारी**, व जो राजकार्याविषयीं नियुक्त, व सन्यासी, आणि जो **विवादास्पदीभूत** द्रव्य व तितका राजदंड देण्यास समर्थ नाहीं तो, व ज्याचा बाप जीवंत आहे तो, स्वेच्छाचारी, आणि जो कोणास ठाऊक नाहीं तो, हे स्वार्थसाधनाविषयीं जामीन घेऊं नयेत. जामिनकीविषयी वर्जे.

# प्रकरण ३

# ऋणादान.

गहाणाविषयीं

## शाखा १३

दिलेलें कर्ज परत येण्याविषयीं विश्वासा-
चीं कारणें दोन आहेत. जामीन आणि
गहाण. पैकीं जामिनाचें निरूपण केलें, आतां
गहाणाचें निरूपण करितो.

नारदही. कर्ज देण्याविषयीं विश्वासाचीं कारणें दोन आहेत. जामीन आणि गहाण.

१ गहाण —— कुळानें स्वतां घेतलेलें द्रव्य परत येण्याचा विश्वास येण्यासाठीं सावकारानें जें द्रव्यांतर घेतलें जातें तें. गहाण ह्मणजे काय.

२ तें गहाण दोन प्रकारचें. **कृतकाल** आणि **अकृतकाल**. हेंही प्रत्येक अणखी दोन प्रकारचें. **गोप्य** आणि **भोग्य**. गहाण चार प्रकारचें.

नारद. गहाण —— विश्वास पटण्यासाठीं जें द्रव्यांतर ठेविलें जातें तें. तें दोन प्रकारचें. **कृतकालापनेय** व **यावद्देयोद्यत**. तें प्रत्येक अणखी दोन प्रकारचें. **गोप्य** आणि **भोग्य**.

**कृतकालापनेय** —— गहाण ठेविते वेळेसच अमुक वेळेस दिवाळीला वगैरे मी हें गहाण सोडवीन, नाहीं तर पुढें गहाण डुलेल, असा करार केलेल्या मुदतीस सोडविलें जातें तें.

**यावद्देयोद्यत** —— घेतलेलें धन परत देईन

# प्रकरण २

## ऋणादान.

### गहाणाविषयीं.

तेव्हां आपलें गहाण सोडवीन, असें सोडविण्याविषयीं मुदत न केलेलें जें गहाण तें.

**गोप्य** —— जतन करावया जोगें जें गहाण तें.

**भोग्य** —— उपभोग घ्यावया जोगें जें गहाण तें.

असें जें दोहों प्रकारचें गहाण त्याविषयीं विशेष सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. दामदुपट झाली असतां गहाण सोडविलें नाहीं तर डुलतें; मुदत करून ठेविलेलें गहाण मुदत टळली असतां डुलतें; **भोग्य** गहाण कधीं डुलत नाहीं.

### टीका.

३ व्याजीं दिलेलें द्रव्य आपण करार केलेल्या व्याजानें कालें करून दुपट झालें असतांही जर कूळ द्रव्य देऊन आपलें गहाण सोडवीत नाहीं तर तें डुलतें. (दामदुपट झाली असतां गहाण डुलतें.)

४ **कालकृत** गहाण दामदुपट घेण्या पूर्वीं किंवा पुढें ही असो, करार केलेली मुदत टळली ह्मणजे डुलतें. (मुदतीचा करार केलेलें गहाण मुदत टळली ह्मणजे डुलतें.)

५ ज्या गहाणाचें उत्पन्न भोगिलें जातें तें गहाण (बागाईत जिराईत वगैरे) कधींही डुलत नाहीं. (भोग्य गहाण कधीं डुलत नाहीं.)

६ **कृतकाल** गहाण **गोप्य** असो किंवा **भोग्य** असो त्याची करार मुदत टळली ह्मणजे तें डुलतें असें ४ थ्या अंकांत सांगितलें आणि **अकृतकाल** असें **भोग्य** गहाण कधीं

# प्रकरण २

# ऋणादान.

## गहाणाविषयीं.

डुलत नाहीं असें ५ व्या अंकांत सांगितलें, अर्थात् ३ रा अंक **अकृतकालगोप्य** गहाणाविषयीं जाणावा.

७ दामदुपट झाल्यावर, व करार मुदत टळल्यावर, जरी गहाण डुलतें, तरी सावकारानें अणखी चौदा दिवस वाट पाहावी. मुदत टळल्यावर गहाण डुललें तरी सावकारानें चौदा दिवस वाट पाहावी.

बृहस्पति. दामदुपटीची मुदत टळल्यावर व करार मुदत टळल्यावर सावकारानें दोन मसकें प्रतीक्षा करावी; त्यामध्यें जर कूळ द्रव्य देईल तर आपलें गहाण पावेल.

८ शंका —— वर (३ ऱ्या ४ थ्या अंकांत) गहाण डुलण्याचा प्रकार सांगितला, त्याची उपपत्ति होत नाहीं. कारण, गहाणावरील कुळाचें **स्वत्व** जाण्याचें हेतुभूत जें **दान विक्रय इत्यादिक** तें घडलें नाहीं. व सावकाराचें **स्वत्व** उत्पन्न होण्याचें कारणभूत जें **प्रतिग्रह क्रय इत्यादिक** तेंही सावकाराकडून घडलें नाहीं, आणि (खालीं सांगितलेल्या) मनुवचनासही विरोध येतो.

मनु. गहाण बहुकाळ राहिल्यामुळें तें दुसऱ्या ठिकाणीं गहाण ठेवावयास योग्य होत नाहीं, व त्याचा **विक्रय**ही होत नाहीं.

असा दुसऱ्या ठिकाणीं गहाण ठेवण्याचा व विकण्याचा निषेध सांगितल्यावरून त्यावर सावकाराची सत्ता नाहीं असें अवगत होतें.

९ समाधान —— गहाण देणें हेंच लोकांत **सोपाधि**

# प्रकरण २

## ऋणादान.

गहाणाविषयीं.

**क स्वत्वनिवृत्तीचें** कारण आहे. आणि गहाण ठेवणेंही **सोपाधिक स्वत्वोत्पत्तीचें** कारण प्रसिद्ध आहे. त्यांत दामदुपट झाली व करारमुदत टळली असतां द्रव्य देणें कुंठित झालें, सबब (गहाण डुलण्याविषयींचे) सदरहू याज्ञवल्क्यवचनें करून त्या गहाणावरील कुळाचें अगदींच **स्वत्व** जाऊन सावकाराचें **स्वत्व** उत्पन्न होतें. मनुवचनासही विरोध येत नाहीं. कारण "**भोग्य** गहाणाविषयीं तर पैक्याला व्याज नाहीं" असा **भोग्य** गहाणाविषयीं उपक्रम करून सांगतो कीं, **भोग्य** गहाण बहुत वर्षे राहिलें तरी त्याचें दुसऱ्यापाशीं गहाण ठेवणें किंवा **विक्रय** होत नाहीं, असा निषेध सांगितल्यानें त्या सावकाराचें त्यावर **स्वत्व** नाहीं असें सिद्ध झालें. तसें येथें (५ व्या अंकांत) ही सांगितलें आहे कीं, "ज्या गहाणाचें उत्पन्न भोगिलें जातें, तें गहाण कधीं डुलत नाहीं."

**गोप्य** गहाणाविषयीं तर मनु पार्थक्यें करून सांगतो.

मनु. बलात्कारानें **गोप्य** गहाण भोगूं नये, भोगिलें असतां व्याज मिळणार नाहीं.

येथें ही पुढें (१० व्या अंकाचे वचनांत) सांगितलें आहे कीं "**गोप्य** गहाण भोगिलें असतां व्याज नाहीं." तस्मात् २ रा अंक तर **गोप्य** गहाणाच्या उद्देशानें सांगि

# प्रकरण २

## ऋणादान.

गहाणाविषयी

तला. याप्रमाणें सर्व निर्दोष जाणावें.

मूळ.

याज्ञवल्क्य. **गोप्य** गहाण उपभोगिलें असतां व्याज नाहीं, आणि **उपकारक** गहाण निरुपयोगी केलें असतांही व्याज मिळणार नाहीं. व गहाण **राजदैविक** उपद्रवावांचून जायां झालें किंवा गहाळलें गेलें तर भरून द्यावें.

टीका.

१० तांब्याची कढई (भांडीवस्त्रें) वगैरे जें **गोप्य** गहाण तें उपभोगिलें असतां व्याज मिळणार नाहीं. जरी थोडा उपभोग झाला आणि व्याज पुष्कळ झालें, तरी बुडतें. कारण, त्यानें करारावें उल्लंघन केलें. तसेंच, बैल कढई वगैरे **भोग्य** गहाण निरुपयोगी केलें असतां व्याज मिळणार नाहीं. गोप्य गहाणाचा उपभोग घेतला असतां व्याज मिळणार नाहीं.

११ त्यांत कढई वगैरे **गोप्य** गहाणाची फूटतूट झाल्यास सावकारानें पहिल्याप्रमाणें करून द्यावें आणि वापरलें असल्यास व्याज घेऊं नये. गोप्य गहाणाची फूटतूट झाल्या भरून द्यावें.

१२ **भोग्य** गहाण (कढई बैल वगैरे) जर जायां झालें तर जशाचें तसें करून द्यावें. आणि व्याजाची कबूलात असल्यास व्याज मिळणार नाहीं. भोग्य गहाण जायां झाल्यास पहिल्याप्रमाणें करून द्यावें.

१३ जर गहाण हरवलें, किंवा अगदींच नाश पावलें, तर तसेंच दुसरें घेऊन द्यावें. किंवा मोल द्यावें दिल्हें असतां गहाण सावकारापासून हरवलें किंवा नाश पावलें तर तसेंच दुसरें गहाण द्यावें.

# प्रकरण २

# ऋणादान.

## गहाणाविषयीं.

सावकार आपलें सव्याज मुदल पावेल आणि जर तें हरवलेलें वगैरे गहाण भरून देत नाहीं, तर मुदलही मिळणार नाहीं.

नारद. सावकारापासून गहाण नष्ट झालें असतां मुदल देखील मिळणार नाहीं, परंतु **दैविक राजिक** उपद्रवावांचून नष्ट झालें असल्यास.

**दैविक** उपद्रव ह्मणजे, अग्नि, उदक, देश, यांपासून झालेला जो उपद्रव तो. तसा आपल्या अन्यायावांचून आकस्मिक झालेला **राजिक** उपद्रव, यांकडून नाश झाला असल्यास कुळानें सव्याज मुदल द्यावें, किंवा दुसरें गहाण द्यावें.

राजदैविकउपद्रवांमुळें गहाणाचें नुकसान झाल्यास तें मालकाचें नुकसान.

स्मृति. नदीला पूर येऊन **क्षेत्र**(घर) वाहवलें किंवा **राजानें** हरण केलें (त्या बरोबर गहाणही नाश पावलें) तर सावकारास दुसरें गहाण द्यावें, किंवा सावकारानें द्रव्य द्यावें.

येथें "नदीला पूर येऊन **क्षेत्र** वाहावलें" असें ह्मटलें तें **दैविक** उपद्रवाचें उपलक्षण जाणावें.

## मूळ.

याज्ञवल्क्य. गहाण ठेवलें हें भोगवट्यानें सिद्ध होतें. गहाण जतन केलें असतांही निःसार होईल तर सावकाराला दुसरें गहाण द्यावें किंवा पैका द्यावा.

## टीका.

१४ गहाण **गोप्य** किंवा **भोग्य** असो त्याची उपभोग

# प्रकरण २

## ऋणादान.

गहाणाविषयीं.

द्वारा गहाण ठेविलें अशी सिद्धि होती; केवळ साक्षी लेखा-
कडून होतनाहीं; व केवळ सांगण्यावरून ही सिद्धि होतनाहीं.

नारद. जंगम स्थावर असें दोन प्रकारचें गहाण सांगितलें आ
हे, त्या दोहों प्रकारच्या गहाणाची उपभोगानें सिद्धि होती, अ
न्यथा होत नाहीं.

उपभोगद्वारा गहाणाच्या सिद्धीनें फळ
(काय तें दाखवितो)

१५ " गहाण, **प्रतिग्रह, क्रय**, या **व्यवहारीं पूर्व पक्षाचें प्रमाण** बलवत्तर." ह्मणजे, **पूर्वपक्ष** जर भोगास हित आहे तरच तो सबळ होतो. **पूर्वपक्ष** असूनही उप भोगरहित आहे तर मुस्तकीम **प्रमाण** होऊं शकत नाहीं. गहाण प्रतिग्रह क्रय या व्यवहारीं पहिल्यानें व्यवहार झाले त्या मुस्तकीम परंतु भोगवटा पाहिजे.

१६ तें गहाण जतन करीत असतांही फार दिवस ठेविल्यामुळें जर जीर्ण ह्मणजे सव्याज मुद्दल फिटावया पुरता ऐवज त्यांत नाहीं असें झालें तर कुळानें दुसरें गहाण द्यावें अथवा सावकाराचा पैका घ्यावा. गहाण सावकारानें जतन केलें असतां जीर्ण झाल्यास मालकानें दुसरें गहाण द्यावें.

असें सांगितल्यावरून सावकारानें गहाण काळजीनें जतन ठेवावें असें सुचविलें.

# प्रकरण २

# ऋणादान.

### गहाणाविषयीं.

## शाखा १४

१३ व्या शाखेच्या ३ ऱ्या अंकानें बाध
क वचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **चरित्र** च गहाण ठेविलें आहे तर सव्याज पैकाच देवावा. आणि **सत्यंकार**[1] केलेलें द्रव्य ही दुपट देवावें.

टीका.

१ **चरित्र** च गहाण ह्मणजे सावकाराच्या स्वच्छांतःकरणामुळें कुळानें थोडकें द्रव्य घेऊन फार किमतीचें गहाण ठेविलें तें, अथवा कुळाच्या स्वच्छांतःकरणामुळें सावकारानें अधिक द्रव्य देऊन थोडक्या किमतीचें गहाण ठेविलें तें त्या गहाणाचें द्रव्य **राजा**नें सव्याज देवावें. ह्मणजे आशय असा कीं, सदरहू गहाण दामदुपट झाली तरी डुलत नाहीं, दामदुपटच द्यावी.

कर्जापेक्षां कमजास्त किमतीचें गहाण दामदुपट झाली तरी डुलत नाहीं.

२ तसेंच गहाण ठेवते वेळेसच करार केला कीं, दामदुपट झाली तरी दामदुपटच देईन, पण गहाण डुलणार नाहीं, तरती दाम दुपटच देवावी.

---

१ सत्यंकार शब्दाचा एक अर्थ खालीं २ ऱ्या अंकांत पाहावा, व दुसरा अर्थ ४ थ्या अंकांत पाहावा.

# प्रकरण २

## ऋणादान.

गहाणाविषयीं

अथवा (मुळांतील) चरित्र पदाचा

दुसरा अर्थ.

३ चरित्र ह्मणजे गंगास्नान अग्निहोत्र इत्यादिकापासून झालेलें पुण्य. तें पुण्यच ज्या व्यवहारीं गहाण ठेवून कांहीं द्रव्य घेतलें, तर तें द्रव्य दामदुपट देवावें, गहाण डुलणार नाहीं.

पुण्यच गहाण ठेवलें तर तें डुलत नाहीं.

गहाणाच्या प्रसंगसंगतीनें दुसरेंही सांगतो.

४ अंगठी वगैरे दागीना खरेदी करणें किंवा विकणें आहे, यासाठीं ज्या दलालाच्याहातीं सदरहू दागीना दिल्हा त्याकडून त्यांत लबाडी होईल तर दुपट देवावा. त्यांतही ज्यानें दुसऱ्याच्या हातीं तो खरेदीकरण्यासाठीं किंवा विकण्यासाठीं दिल्हा त्याजकडूनच त्यांत लबाडी असेलतर दागीना देऊंनये. आणि ज्याच्या हवालीं केला तो जर दगलबाजी करितो तर दुपट देवावें.

कांहीं दगीना मध्यस्थाचे हातीं विकावयास दिल्हा असतां मध्यस्थापासून लबाडी होईलतर दुपट देवावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. कूळ गहाण सोडवूं इच्छितें तर तें मोकळें करावें, अन्यथा तो चोर ठरेल. सावकार सन्निध नसल्यास त्याचे आप्तापाशीं सव्याज पैका देऊन गहाण परत घ्यावें.

टीका.

५ कूळ द्रव्य देऊन गहाण सोडविण्यास सिद्ध झाल्यावर सावकारानें गहाण मोकळें करावें, व्याजाच्या लोभानें ठेवूं

कूळ ऐवज देऊन गहाण सोडवीत असतां सावकार देत नाहीं तर दंड.

# प्रकरण ३

## ऋणादान.

### गहाणाविषयीं.

नये. मोकळें न केल्यास चोराप्रमाणें दंडावें पात्र होतो.

६ कूळ गहाण सोडावयास तयार असतां सावकार सन्निहितनाहीं तरसावकाराचे जे आप्त असतील त्यांपाशीं स व्याज मुदल देऊन आपलें गहाण सोडवावें.

जर सावकार व त्याचे आमही सन्निध नाहींत, अथवा सावकार सन्निध आहे, पण कूळ तेंच गहाण विकून सावकाराचें द्रव्य देऊं इच्छितो, तर कसें करावें याविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. अथवा त्यावेळेसच गहाणाची किंमत ठरवून तेथें ठेविलें असतां व्याज बंद होतें.

टीका.

७ त्यावेळेसच त्या गहाणाची किंमत ठरवून सावकारापाशींच व्याज खुंटवून ठेवावें त्यास पुढें व्याज नाहीं. ह्मणजे जोंपर्यंत सावकार आपली रकम पावून गहाण परत देईल अथवा जोंपर्यंत ऐवज फिटून राहिलेली किंमत कुळाला मिळेल तोंपर्यंत.

कूळ गहाणविकून सावकाराचा ऐवज देण्यास इच्छितो तर त्याविषयीं.

जरी दामदुपट झाली तरी दामदुपटच घ्यावी, गहाण डुलणार नाहीं, असा कर्ज घेते वेळेसच करार ठरला, पुढें दामदु

# प्रकरण २

## ऋणादान.

गहाणाविषयीं.

पट झाली असतांही कूळ संन्निध नाहीं

तर सावकारानें काय करावें तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. कूळ सन्निध नसल्यासही गहाण ससाक्ष विकावें.

टीका.

८ दामदुपट झाली आणि कूळ सन्निध नाहीं, तर सावकारानें कुळाच्या आप्तासमक्ष व ससाक्ष तें गहाण विकून आपला ऐवज फेडून घ्यावा. जर, दामदुपट झाली असतां दामदुपट घ्यावी, गहाण डुलणार नाहीं, असा कर्ज घेते वेळेस करार केला नाहीं, तर पूर्वी (१३ व्या शाखेच्या ३ ऱ्या अंकांत) सांगितल्याप्रमाणें गहाण डुलतें. करार केला असल्यास वरच्या वचनाप्रमाणें करावें.

**भोग्य** गहाणाविषयीं विशेष सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. गहाण ठेवून दामदुपट झाली व सावकारासही **भोग्य** गहाणानें उत्पन्न दुपट पोंचलें, तर गहाण परत द्यावें.

टीका.

९ जर कर्ज दिलेलें धन करार केलेल्या व्याजानें दुपट झालें, आणि गहाण द्रव्यानें उत्पन्नही सावकारास दुपट पोंचलें, तर सावकारानें गहाण मोकळें करावें. भोग्यगहाणाविषयीं विशेष.

१० जर प्रथमतः दामदुपट झाली असतां तूं आपलें

# प्रकरण २

## ऋणादान.

गहाणाविषयीं.

गहाण सोडवावें, असा गहाण ठेवते वेळेसच करार केला सबब व कारणांतरामुळें भोग न झाला सबब दामदुपट झाली, नंतर गहाणाचा उपभोग सानकार घेऊन तें उत्पन्नही दुपट झालें, तर सावकारानें गहाण मोकळें करावें; व अधिक उपभोग झाल्यास तेंही भरून द्यावें.

कोणत्याही प्रकारें सव्याज मुदल फिटण्यासाठींच गहाणाचा उपभोग, याविषयीं हें वचन आहे. या गहाणाला लौकिकांत क्षय गहाण ह्मणतात.

११ ज्या व्यवहारीं व्याज फिटे पुरता मात्र गहाणाचा उपभोग करावा, असा करार आहे तेथें दामदुपटीपेक्षां अधिक झालें तरीं मुदल फिटेपर्यंत सावकारानें गहाणाचा उपभोग घ्यावा.

हेंच बृहस्पति स्पष्ट करून सांगतो.

बृहस्पति. ज्याचें उत्पन्न भोगलें जातें तें **भोग्य** गहाण दोन प्रकारचें. एक सव्याज मुद्दल फिटण्यासाठीं, आणि दुसरें केवळ व्याज फिटण्यासाठीं. त्यापैकीं सव्याज मुद्दल फिटण्याच्या कराराचें जें गहाण आहे तें सव्याज मुद्दल फिटलें ह्मणजे कुळानें परत घ्यावें, आणि जें गहाण केवळ व्याज फिटण्याच्या करारचें आहे तें कुळानें मुद्दल मात्र देऊन परत घ्यावें.

गहाणाचा उपभोग दोन प्रकारचा, एक सव्याज मुद्दल फिटण्यापुरता व एक केवळ व्याजमात्र फिटण्यापुरता.

याचें बाधक सांगतो.

बृहस्पति. १२ तें (सदरहू दोन प्रकारचें) **भोग्य** गहा

व्याजापुरताच गहाणाच्या

# प्रकरण ३

## ऋणादान.

गहाणाविषयीं

णानें उत्पन्न सावकाराला व्याजापेक्षांही अधिक पावेल, तर मुद्दल मिळणार नाहीं. मुद्दल न देतां कूळ आपलें गहाण घेईल. उपभोगाच्या करार असल्यास त्याविषयीं.

१३ जर नुसतें व्याज फिटण्यापुरतें देखील तें (फल भोग्य) गहाण नाहीं, तर मुद्दल देऊनही गहाण परत मिळ णार नाहीं. बाकी व्याज दिल्हें पाहिजे.

पुनः दोहोंचा (१२व्या व १३व्या अंकाचा)

**अपवाद** सांगतो.

सदरहू (१२व्या व १३व्या अंकांतले) प्रकार सांगितले ते सावकार व कूळ यांची परस्परांची अनुमति नसल्यास, जर परस्परांची अनुमति आहे तर चांगलेंही गहाण कूळ मुद्दल देईपर्यंत सावकार वहिवाटतो, व केवळ निकृष्ट असलें तरीं नुसतें मुद्दल दिल्यानेंच कुळाचें तें परत मिळतें, व्याज द्यावया स नको.

# प्रकरण ८

## उपनिधि.

### शाखा १

मूळ.

याज्ञवल्क्य. जें द्रव्य पात्रांत गुप्त करून त्याचें स्वरूप न सांगतां दुसऱ्याचे हातीं ठेविलें जातें तो **उपनिधि**. तो जशाचा तसा परत द्यावा.

टीका.

१ **उपनिधि**— रूप संख्या **इत्यादिक** न सांगतां करंडा वगैरे पात्रांत घालून तें मुद्रित करून विश्वासानें दुसऱ्यापाशीं ठेविलें जातें जें द्रव्य तो. उपनिधीचें स्वरूप.

नारद. मोजल्यावांचून व अमुक द्रव्य आहे असें ठाऊक न करितां खूण करून जें दुसऱ्याचे हातीं ठेविलें जातें तो **उपनिधि**, आणि जें द्रव्य मोजून व दाखवून ठेविलें जातें ती ठेव (निक्षेप)

२ तें द्रव्य ज्यापाशीं मुद्रित करून ठेविलें आहे त्यानें तसेंच ठेवणाराचें परत द्यावें. उपनिधि जशाचा तसा परत द्यावा.

कोणत्या प्रकारानें नाश पावलेलें परत देऊं नये तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **उपनिधि राजिक दैविक** चोरी यांकडून अपहृत झाला असल्यास देववूं नये.

टीका.

३ **उपनिधि राजिक** किंवा **दैविक** उपद्रवा राजदैविकउपद्रवानें नुकसा

# प्रकरण ४

## उपनिधि

नें व चोरांकडून जर नाश पावला आहे, तर ठेवणारास परत मिळणार नाहीं, तें नुकसान मालकाचें, परंतु तो ज्यापाशीं विश्वासानें ठेविला त्याच्या लबाडी शिवाय वास्तवीक सदरहू उपउपद्रवांनीं नाश पावला असल्यास.

न झालेला उपनिधि मालकास परत मिळणार नाहीं.

नारद. जर **दैविक** व **राजिक** उपद्रवानें **रक्षका**च्या अर्थाबरोबर जर तो **उपनिधि** नष्ट झाला, तर तें नुकसान मालकाचें. परंतु तें **रक्षकाच्या** कपटानें झालें नसेल तर.

याचें बाधकवचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. मालकानें मागितला असतां दिला नाहीं, आणि पुढें **उपनिधि** नष्ट झाला, तर तो भरून देववून तितकाच दंड घ्यावा.

टीका.

४ मालकानें आपलें द्रव्य मागितलें असतां **रक्षकानें** दिल्हें नाहीं, आणि पुढें **राजदैविक** वगैरे उपद्रवानें जरी नाश पावलें तरी त्या द्रव्याची किंमत ठरवून **रक्षका**पासून **राजा**नें मालकाचें देववून तितकाच दंड घ्यावा.

मालक मागत असतां रक्षकानें दिल्हें नाहीं आणि पुढें राजदैविक उपद्रवानें नाश पावेल तर नुकसान रक्षकाचें व तितकाच दंड.

**उपनिधी**च्या उपभोग करणारा विषयीं दंड सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. जो स्वेच्छेनेंच **उपनिधि** वहिवाटतो, त्याला दंड करून

# प्रकरण ४

## उपनिधि.

नफ्यासुद्धां मालकाचा परत देवावा.

टीका.

५ जो मालकाच्या आज्ञेवांचून **उपनिधी**चा उपभोग करितो किंवा लाभार्थ व्यापार करितो त्याला उपभोगानुसार किंवा लाभानुसार दंड करून तो **उपनिधि** उपभोगिला असल्यास सव्याज व व्यापार केला असल्यास नफ्यासुद्धां मालकाचा देवावा. रक्षकानें मालकाच्या आज्ञेवांचून उपनिधीचा उपभोग किंवा व्यापार केल्यास नफ्यासुद्धां देवऊन दंड करावा.

उपभोगिला असल्यास किती व्याज द्यावें तें कात्यायन सांगतो.

कात्यायन. ६ ठेव, व्याजाची बाकी, खरेदीचा पैसा, व विकरीचा पैसा, हे मागत असतांही दिल्हे नाहींत, तर त्यांचें शेंकडा पांच प्रमाणें व्याज वाढतें. रक्षकानें उपभोगिला असल्यास शेंकडा पांच प्रमाणें व्याज द्यावें.

सदरहू प्रकार सांगितले ते **उपनिधी**चा अपहार केला असल्यास जाणावे. उपेक्षेनें किंवा अज्ञानानें नाश पावला असल्यास कात्यायनच विशेष सांगतो.

कात्यायन. ७ **उपनिधी**चा अपहार केला असल्यास सव्याज देवावा. हयगईनें तो नाश पावला असल्यास मुद्दलमात्र देवावा. आणि अज्ञानामुळें नाश पावला असल्यास चतुर्थांश कमी करून देवावा. हयगईनें नाश पावल्यास मुद्दलमात्र, अज्ञानपणानें नाश पावल्यास चतुर्थांश कमी करून देवावा.

सदरहू जे **उपनिधी** विषयीं प्रकार सांगितले, त्यांचा **याचिता**दिका विषयीं **अतिदेश** सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. **याचित, अन्वाहित, न्यास, निक्षेप इत्यादिका**

# प्रकरण ४

## उपनिधि.

विषयींही हाच विधि जाणावा.

टीका.

८ **यांचित**——विवाहादिक उत्साह कार्यांत जे व स्त्र अलंकार वगैरे मागून नेलेलें तें.

**अन्वाहित**——जें द्रव्य एकाच्या हातीं दिल्हें अस तां त्यानें ही मालकास दे असें सांगून दुसऱ्याच्या हवालीं केलें तें.

**न्यास**——घरधन्याला न दाखवितां त्याच्या परो क्ष घरांतील माणसांच्या हवालीं करून सांगितलें कीं मालका स दे असें जें द्रव्य तो.

**ठेव**——रूप संख्या वगैरे दाखवून खुद्द धन्याच्या ह वालीं केलें जातें ती.

**प्रतिन्यास**——कांकण वगैरे दागीना करावया साठीं सोनार वगैरेच्याहातीं दिलेल्या सुवर्णादिकांची तमनस न होतां आपला दागीना यावा ह्मणून त्यापासून कांहीं बदला घेत लेलें वगैरे द्रव्य.

नारद. हा (निक्षेपाविषयीं सांगितलेला) च प्रकार **याचित, अन्वाहित, इत्यादिक, न्यास, उपनिधि, व प्रतिन्यास**, यांविषयीं जाणावा.

हीं सदरहू **याचित** वगैरे सांगितलीं त्यांविषयींही हेच **उपनिधीचे** परत देणें वगैरे प्रकार जाणावे.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

### शाखा १

लेख भोगवटा आणि साक्षी असें प्रमाण (२ ऱ्या प्रकरणाच्या ७ व्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितलें त्यापैकीं भोगाचें निरूपण (२ ऱ्या प्रकरणाच्या ९ व्या शाखेंत) केलें, आतां साक्षीचें स्वरूप सांगतो.

१ साक्षी —— प्रत्यक्ष पाहिल्यानें किंवा ऐकिल्यानेंही होतो. साक्षीचें स्वरूप.

मनु. समक्ष पाहिल्यानें व ऐकिल्यानें साक्षी प्रमाण सिद्ध होते.

तो साक्षी दोन प्रकारचा.

२ **कृत** साक्षी आणि **अकृत** साक्षी.

**कृत** साक्षी ह्मणजे साक्षीविषयीं निर्दिष्ट तो व **अकृत** साक्षी साक्षीविषयीं निर्दिष्ट नव्हे तो.

**कृत** साक्षी पांच प्रकारचा आणि **अकृत** साक्षी साहा प्रकारचा एकूण साक्षीचे प्रकार ११ आहेत.

नारद. अकरा प्रकारचा साक्षी ऋषींनीं शास्त्रांत सांगितला आहे, त्यांत **कृत** साक्षी पांच प्रकारचा आणि **अकृत** साक्षी साहा प्रकारचा.

त्या साक्षींचा भेदही तोच (नारद) सांगतो.

नारद. ३ **लिखित**, **स्मारित**, **यदृच्छागत**, **गूढसाक्षी**, **पंड** साक्षी. असा पांच प्रकारचा **कृत** साक्षी. कृतसाक्षी पांचप्रकारचा

**लिखिता** दिकांचें स्वरूप कात्यायन सांगतो.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

कात्यायन. **लिखित** साक्षी——वादीनें स्वतां आणिला असतां जो पत्रकावर आपली साक्ष लिहून देतो तो; आणि **स्मारित** ह्मणजे ज्याची पत्रावर साक्ष नाहीं तो.

**स्मारि**ताचें स्वरूपही तोच स्पष्टकरून दाखवितो.

कात्यायन. **स्मारित** साक्षी——वादीनें आपली वादसिद्धि व्हावी एतदर्थ वारंवार आपला वाद पाहून त्या साक्षीला ऐकवून स्मरण दिल्हें जातें तो.

**यदृच्छागत**——जो प्रसंगीं सहज आला असतां साक्षीस ठेविला जातो तो.

**स्मारित** व **यदृच्छागत** या दोहोंची लिहिलेली साक्ष नसली तथापि भेदही तो (कात्यायन)च सांगतो.

कात्यायन. कार्यसिध्यर्थ बोलावून आणिलेला, व जो प्रसंगानें आलेला, असे दोघेही साक्ष लिहून दिल्यावाचून वादीच्या पक्षाचे साधक होतात.

स्मृति. **गूढ** साक्षी——वादी स्वकार्यसिध्यर्थ साक्षीला दडवून ठेवून प्रतिवादीचें बोलणें ज्याकडून स्पष्ट ऐकवितो तो.

स्मृति. पड साक्षी——जो साक्षीचे बोलण्यावरही ऐकिल्यामुळें अथवा ऐकविल्यामुळें साक्षी ठेविला जातो तो.

नारद साहा प्रकारच्या **अकृत** साक्षीचा भेद दाखवितो.

नारद. ४ गांव, **प्राड्विवाक**, राजा, व **व्यवहार** करण्याविष अकृतसाक्षीसाहाप्रकार

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

यीं नियुक्त, आणि जो वादीनें पाठविलेला, तसें कुळागती च्या विवादाविषयीं कुळांनला, हेही (स्वतःसिद्ध) साक्षी जाणावे.

येथें **प्राड्विवाक** ग्रहण केलें तें कारकून **सभासद** यांचे संग्रहार्थ.

स्मृति. **राजा व्यवहार** पहान असतां तेथें कारकून, **प्राड्विवाक**, **सभासद**, हेही अनुक्रमानें साक्षी सांगितले आहेत.

## शाखा २

साक्षी कसे व किती असावे तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. तपस्वी, दानशील, कुलीन, सत्यवादी, **धर्मप्रधान**, सरळबुद्धीचे, पुत्रवंत, धनाढ्य, आणि **श्रौतस्मार्त** कर्मतत्पर, असे आपापल्या **वर्णा**चे व जातीचे, अथवा सर्व जातींत सर्व प्रकारचे साक्षी घ्यावे. ते किमानपक्ष तीन असावे.

टीका.

१ तपस्वी, दानशील, कुलीन, सत्य बोलणारे, धर्मरूप पुरुषार्थजो त्याचे ठायीं तत्पर, अर्थ काम तत्पर नव्हत, सरळ बुद्धीचे, पुत्रवंत व सधन आणि **नित्यनैमित्तिक** कर्माविषयीं तत्पर, एवंगुणविशिष्ट किमानपक्ष तीन साक्षी असावे.

साक्षीश्रुतवृत्तसंपन्न असावे व ते किमानपक्ष तीन असावे.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

तिहींपेक्षां कमी नसावे; तिहींपुढें पाहिजे तितके होतात.

२ **मूर्धावसिक्त इत्यादिक अनुलोम** जातींत व **प्रतिलोम** जातींत ज्या जातीचा त्या जातींत साक्षी असावा. ब्राह्मणादि **वर्णां**त ज्या **वर्णा**चा त्या **वर्णां**त साक्षी असावा. ह्मणजे, ब्राह्मणाचे ब्राह्मण वर सांगितल्या गुणांचे साक्षी असावे. याप्रमाणें क्षत्रियादिकांविषयीं जाणावें. तसेंच स्त्रियांची साक्ष स्त्रियांनीं द्यावी.

मनु. स्त्रियांची साक्ष स्त्रियांच देतात.

जर आपले सजातीय व आपल्या **वर्णा**चे साक्षी न मिळतील तर ज्या जातीचे व ज्या **वर्णा**चे मिळतील ते घ्यावे.

१ ल्या अंकांत सांगितल्या प्रमाणें साक्षी न मिळतील तर खालीं (३ र्‍या व ४ थ्या अंकांत) जे साक्षी विषयीं निषेधिले आहेत त्यांवांचून इतर साक्षी घ्यावे. ह्मणून साक्षी विषयीं निषिद्ध साक्षी सांगावयाचे ते नारद पांच प्रकारचे दाखवितो.

नारद ३ वर्ज साक्षी हा शास्त्रांत पांच प्रकारचा सांगितला आहे. **वचननिषिद्ध, दोषनिषिद्ध, भेदनिषिद्ध, स्वयमुक्ति,** आणि **मृतांतर.** साक्षीविषयीं वर्ज

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

### वचननिषिद्ध साक्षी कोणते ते सांगतो.

नारद. श्रोत्रिय, वानप्रस्थ, वृद्ध, संन्यासी इत्यादिक यांचा वाचनिक निषेध सांगितल्यामुळें हे साक्षी होऊं शकत नाहींत. निषेधाविषयीं कारण सांगितलें नाहीं. वचनानें निषेध केलेले साक्षी

(ह्या वचनांतल्या) इत्यादिक शब्दें करून बापाबरोबर कलह करणारे वगैरे घ्यावे.

शंख. बापाशीं कलह करणारा, गुरुगृहीं राहणारा, वानप्रस्थ, सन्यासी, पाखंडी, हे साक्षी होत नाहींत.

स्मृति. चोर, साहसी, तामसी, जुगारी, ठक, हे दुष्टत्वामुळें साक्षीविषयीं निषिद्ध कारण, त्यांचे ठायीं सत्य नाहीं. दोषामुळें निषिद्ध साक्षी.

### भेदनिषिद्ध साक्षीचें स्वरूपही तोच सांगतो.

नारद. ज्यांनीं पत्रावर साक्ष घातली आहे ते, किंवा माझे अमुक साक्षी आहेत असे वादीनें दाखवून दिल्हेले, त्यांमध्यें एखादा विपरीत साक्ष देतो, तर ते सर्वही भेदामुळें साक्षी होत नाहींत. भेदामुळें निषिद्ध साक्षी.

### तसें स्वयमुक्ति साक्षीचें स्वरूप सांगितलें आहे.

स्मृति. जो साक्षीविषयीं निर्दिष्ट नसतां स्वतांच येऊन साक्ष देतो तो साक्षी घेऊनये. त्याला शास्त्रांत सूची (चहाड) ह्मटलें आहे. स्वयमुक्ति साक्षी.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

### मृतांतर साक्षीचेंही लक्षण सांगतो.

स्मृति. ज्या कोणी वादीनें किंवा प्रतिवादीनें जो वाका साक्षीस ऐ कविला पाहिजे कीं, या अर्थाविषयीं तुह्मी साक्ष आहां, तो वादी किंवा प्रतिवादी मरण पावला, आणि वाकाही निवेदित केला नाहीं, असें असतां त्या साक्षींनीं कोणत्या अर्थाविषयीं व कोणा साठीं साक्ष द्यावी. ह्मणून मृतांतर साक्षी होत नाहीं. मृतांतर साक्षी.

४ परंतु जर पिता आसन्नमरण झाला असतां किंवा स्वस्थ असतांही पुत्रादिकांस श्रुत केलें आहे कीं, या अर्थाविषयीं अमुक साक्षी आहेत, तर तेथें मृतांतरही साक्षी होतो.

नारद. वादी मरण पावला असतां मृतांतर साक्षी होत नाहीं, परंतु वादी मुमूर्षु असतां त्यानें साक्षीविषयीं पुत्रादिकांस मजकूर ऐकविला नसेल तर.

स्मृति. तसेंच वादी किंवा प्रतिवादी स्वस्थ असतांही त्यानें यथान्याय वाका पुत्रादिकांस श्रुत केला, आणि पुढें तो (वादी किंवा प्रतिवादी) मरण पावला असतांही अन्वाहित वगैरे सहा[१] व्यवहारीं (मृतांतर) साक्षी होतो.

अणखी निषिद्ध साक्षी सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. स्त्री, बाल, वृद्ध, जुगारी, मत्त, उन्मत्त, अभिशापित, नट, पाखंडी, खोटें करणारा, इंद्रियहीन, पतित,

---

१ हे सहा व्यवहार ४थ्या प्रकरणीं पाहावे.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

आप्त, अर्थसंबंधी, सहाय, शत्रु, चोर, साहसी, दृष्टदोष, बंधूंनीं टाकलेला, इत्यादिक हे साक्षी विषयीं वर्ज जाणावे.

टीका.

५ स्त्री, बाल, वृद्ध "वृद्ध शब्देंकरून वचन निषिद्ध जे श्रोत्रिय इत्यादिक ते घ्यावे." जुगारी, दारू वगैरे पिऊन मस्त झालेला, उन्मत्त, ब्रह्महत्यादि पातकेंकरून अभिशापित, नट, पाखंडी, निर्ग्रंथ, (नास्तिक) वगैरे, खोटेपत्र वगैरे करणारा, बहिरा वगैरे पतित, आप्त, विवादास्पदीभूत अर्थाचा संबंधी, सहाय, शत्रु, चोर, साहसी, ज्यांचा अप्रामाणिकपणा दिसून आला तो, भावाबंदांनीं टाकलेला, इत्यादिक ह्मणजे अणखी जे स्मृत्यंतरीं सांगितलेले दोषनिषिद्ध व भेदनिषिद्ध, स्वयमुक्ति, मृतांतर, हे व सदरहू स्त्री, बाल, वगैरे साक्षी होत नाहींत. साक्षीविषयीं वर्ज

(१ ल्या अंकांत) किमान तीन साक्षी असावे असें सांगितलें त्याचें बाधक सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. धर्मज्ञ असा मनुष्य उभयतांस मान्य असल्यास एकही साक्षी होतो.

टीका.

६ ज्ञानपूर्वक नित्यनैमित्तिक कर्माचरण करणारा असा एकही मनुष्य साक्षी होतो. परंतु, तो वादिप्रतिवादींस अनुमत असला पाहिजे; तसेच दोघेही होतात; तिहींपेक्षां अधिक साक्षी असले तरी ते नित्यनैमित्तिक कर्माचरण करणारे असले पाहिजेत. परंतु, ते श्रुतवृत्तसंपन्न व सत्यवादी असा असल्यास उभयतांच्या अनुमतानें एकही साक्षी पुरे होतो.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

वादि प्रतिवादींच्या अनुमतीवांचूनही साक्षी होतात. एक किंवा दोन साक्षी वादि प्रतिवादींच्या अनुमतीवांचून होत नाहींत.

(१ल्या अंकांत) तपस्वी दानशील वगैरे साक्षी घ्यावे असें सांगितलें त्याचें बाधक सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **स्त्रीसंग्रहण**, चोरी, **पारुष्य**, **साहस**, या वादांत सर्व प्रकारचा साक्षी घ्यावा.

७ **स्त्रीसंग्रहण**[२३], चोरी[२२], **पारुष्य**[१७], **साहस**[१९], या **व्यवहारीं** (३ऱ्या अंकांतील नारदवचनांतील) **वचननिषिद्ध** साक्षी व (चालत्याशारेच्या १ल्या अंकांत सांगितलेले) गुणाविरहित साक्षी असले तरी ते घ्यावे. परंतु, **दोषनिषिद्ध** व **भेदनिषिद्ध** व **स्वयमुक्ति** हे साक्षी घेऊं नयेत. कारण, त्यांचे ठायीं सत्य नाहीं, हा हेतु येथेंही लागतो.

बृहस्पति. ८ मनुष्यवध, चोरी, **स्त्रीसंग्रहण**, **वाक्पारुष्य**, **दंडपारुष्य**, असें चार प्रकारचें **साहस** सांगितलें आहे.

या वचनावरून जरी **स्त्रीसंग्रहण**, चोरी, **पारुष्य**, यांचा **साहसां**तच अंतर्भाव आहे, तथापि तीं (स्त्रीसंग्रहण, चोरी, पारुष्यहीं) दांडगाईनें, बलात्कारानें, जनसमक्ष, केलीं असतां **साहस** ह्मटलीं जातात. आणि तींच गुप्तरूपें केलीं तर **स्त्रीसंग्रहण**, चोरी, **पारुष्य**, अशा निरनिराळ्या संज्ञा पावतात. ह्मणून त्यांचा **साहसाहून** पृथक् निर्देश केला.

# प्रकरण ७.

## साक्षीविषयीं.

### शाखा ३

साक्षींची साक्ष घेण्यापूर्वी त्यांस काय ऐकवि
लें पाहिजे तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. वादिप्रतिवादींच्या समक्ष साक्षींस (वाका) ऐकवावा.

टीका.

१ एकत्र जमा झालेल्या साक्षींस वादिप्रतिवादींच्या समक्ष खा साक्ष घेण्याचेपूर्वी त्यांस शपथ देण्याचा प्रकार.
लीं सांगितलेला वाका ऐकवावा.

गौतम. एकत्र न मिळालेल्या साक्षींस प्रश्न केला असतां त्यांनीं उत्तर देऊं नये.

या विषयीं कात्यायन विशेष सांगतो.

कात्यायन. न्यायसभेंत वादिप्रतिवादींच्या समक्ष सर्व साक्षींस प्राड्विवाकानें अभिमुख होऊन सांत्वन करून देव ब्राह्मणांच्या सन्निध द्विजांस खरी साक्ष पुसावी, आणि त्यास उत्तराभिमुख किंवा पूर्वाभिमुख करून पूर्वाण्हीं साक्ष घ्यावी. समस्त मिळालेले सदाचारसंपन्न व ज्यांस बाका माहीत आहे अशा साक्षींस बोलावून शपथ देऊन निरनिराळें पुसावें.

ब्राह्मणादि साक्षींस श्रुतकरण्याविषयीं मनु विशे
ष नियम सांगतो.

मनु. ब्राह्मणाला सत्याची शपथ द्यावी; क्षत्रियाला वाहनें आयुधें यांची शपथ द्यावी; वैश्याला पशु, धान्य, सोनें, यांची शपथ द्यावी; आणि

BRANCH OF THE ... ASIATIC SOC.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

शूद्राला तर सर्व पातकांनीं शापित करावें.

अर्थ.

जर खोटी साक्ष देशील तर तुझें सत्य नाश पावेल, अशी ब्राह्मणाला शपथ द्यावी; तुझीं वाहनें व शस्त्रें निष्फळ होतील, अशी क्षत्रियाला; व तुझीं पशु धान्यें कांचनें हीं निष्फळ होतील, अशी वैश्याला; आणि शूद्राला तर, तूं खोटी साक्ष देशील तर सर्व पातकें तुझ्या शिरीं होतील, अशी शपथ द्यावी.

याचें बाधकही तोच (मनु) दाखवितो.

मनु. २ गुरें राखणारे, व वाणीपणा करणारे, व **कारु**, व गायक, जासूद, प्रतिषिद्ध अशा वाटीनें उपजीविका करणारे, असे जे विप्र (ब्राह्मण क्षत्रिय वैश्य) त्यांस शूद्राप्रमाणें मानावें.

निंद्यवृत्तीनें उपजीवन करणारे ब्राह्मणादिकांस शूद्रांसारिखे मानावे.

३ प्रतिवादीनें साक्षीवर दूषणें दिल्हीं असतां तीं जर प्रत्यक्ष योग्य बाल्यादिक दूषणें (ह्मणजे २ ऱ्या शाखेच्या ३ ऱ्या व ४ थ्या व ५ व्या अंकांत सांगितल्याप्रमाणें) आहेत, तर तसाच निर्णय करावा, जर दिल्हेलीं दूषणें योग्य नाहींत, तर त्या साक्षीचें वचनावरून व लौकिक रीतीवरून निर्णय करावा, अणखी साक्षी घेऊं नयेत. कारण, **अनवस्था**[१]रूप दोष येईल.

प्रतिवादीनें साक्षीवर तकार घेतलेली योग्य नसल्यास त्याप्रमाणें निर्णय करावा.

४ जर प्रतिवादी साक्षीवर **दोषोद्भावन** करून तो दोष स्पष्ट

साक्षीवर घेतलेली तक

---

१ अनवस्था ह्मणजे अधिकरणाच्या किंवा आश्रयाच्या परंपरा संबंधानें कांहीं एक पदार्थाची विश्रांति न होणें. जसें पहिल्या साक्षीवर दोषोद्भावन झाल्यामुळें दुसरे साक्षी, त्यांवर दोषारोप झाल्यामुळें तिसरे, या प्रमाणें परंपरा चालली असतां शेवट होणार नाहीं.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

शाबीत करूं शकत नाहीं, तर त्याला तारतम्यानें दंड करावा. जर त्यावर दोष शाबीत करितो, तर ते साक्षी होत नाहींत. तर योग्य असल्यास ते रद्द करावे.

स्मृति. जर साक्षींवर दोष शाबीत करूं शकत नाहीं, तर त्याला दंड करावा; शाबीत करितो, तर ते साक्षीच्या कामांतून रहित करावे.

५ वादीनें दिलेले सर्व साक्षी दोषी ठरले असतां वादी दुसरें कांहीं साधन दाखवूं शकत नाहीं, तर तो पराजित होतो. साक्षी रद्द झाल्यावर अणखी पुरावा दाखवीत नाहीं तर पराजित.

स्मृति. जर वादी दुसरे **प्रमाणाची** आकांक्षा न धरितां केवळ साक्षीच्या सत्यावर विश्वास ठेवितो, आणि शास्त्रमार्गानें पराजय पावला, तर त्याला दंड करावा. जर दुसरें (लेखवगैरे) **प्रमाणाची** आकांक्षा धरितो, तर तें त्यानें दाखवावें, असा अभिप्राय.

## शाखा ४

### साक्षींस कसें श्रुत करावें तें सांगतो.

#### मूळ.

याज्ञवल्क्य. जे **पातकी, महापातकी** यांचे लोक, आगलावणारांचे जे लोक, व स्त्री बालक यांचा घात करणारांचे जे लोक त्या सर्वांतें, जो खोटी साक्ष देईल तो पावतो. आणि जें त्वां जन्मशतांनीं केलेलें पुण्य तें सर्व, ज्याचा तूं खोटा पराजय करितोस त्याचें असें जाण.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

टीका.

खोटी साक्ष देण्याविषयीं साक्षीस त्रास आणि त्याचा प्रकार.

१ जो खोटी साक्ष देतो त्याला **पातक**,[१] **उपपातक**, **महापातक**[२] करणारे, आग लावणारे, स्त्री बाल यांची हत्या करणारे, यांचे लोक प्राप्त होतात. तसेंच जें पुण्य तूं शेंकडों जन्म घेऊन केलेलें, तें सर्व ज्याचा तूं खोटी साक्ष देण्यानें पराजय करितोस त्याजकडे जातें. असें श्रुत करावें.

२ परंतु हें ऐकविणें शूद्राविषयीं जाणावें कारण "शूद्राला तर सर्व पातकांनीं शापित करावें" असें (३ऱ्या शाखेच्या १ल्या अंकांतील मनुवचनांत) सांगितलें आहे. व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, हे जर त्याच शाखेच्या २ऱ्या अंकात सांगितल्या प्रमाणें आहेत, तर त्याविषयीं हीं जाणावें.

३ हा वर (१ल्या अंकांत) सांगितलेला प्रकार साक्षीस (खोटी साक्ष देण्याविषयीं) त्रास उत्पन्न व्हावा एतदर्थ, अन्यथा केवळ आपलें अनेक जन्मार्जित पुण्य पराजिताकडे जातें, व खोटें बोलणारास **महापातका**दि फल प्राप्त होतें, असें ह्मणण्याची उपपत्ति होत नाहीं.

नारद. पुराणें, धर्माचीं प्रतिपादक वचनें, सत्याचा महिमा सांगणें, आणि अनृत भाषणाचें **दोषोद्भावन** करणें, यांकडून साक्षीस अत्यंत भय उत्पन्न करावें.

---

१ उपपातकें ह्मणजें गोवध, व्रात्यपणा (योग्य कालीं उपनयन न करणें) स्तेय, ब्रह्मस्व न फेडणें, वगैरे पुष्कळ सांगितलीं आहेत.

२ महापातकें ह्मणजे ब्रह्महत्या, मद्यप्राशन, सोनें चोरणें, गुरुपत्नीशीं संग करणें, आणि या चौहोंचा सहवास, हीं महापातकें ह्मटलीं आहेत. याखेरीज दुसरीं जीं पातकें तीं सामान्य पातकें.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

सदरहू प्रकार साक्षींस ऐकविल्यानंतरही साक्ष न देतील तर पुढें काय करावें तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जो मनुष्य साक्ष देत नाहीं त्यापासून राजानें शेचाळिसावे दिवशीं सावकारांचें सर्व कर्ज देववून दशमांश दंड घ्यावा.

टीका.

जोसाक्षदेतनाहीं त्यापासून सावकारांचें कर्जदेववून दंड घ्यावा.

४ जो साक्ष पतकरून व मजकूर ऐकून घेऊन समयीं साक्ष देत नाहीं. त्यापासून राजानें सावकाराचें सव्याज कर्ज देवावें. आणि दशमांश दंड घ्यावा. कारण "राजानें (कुळाकडून) देवविलेल्या द्रव्याबद्दल शेंकडा दशक घ्यावें". असें (३ऱ्या प्रकरणांतील ५व्या शाखेच्या ३ऱ्या अंकाचे वचनांत) सांगितलें आहे.

हा प्रकार शेचाळिसावे दिवशीं जाणावा, त्याचे आंत साक्ष देईल तर (कांहींच) देऊं नये, परंतु ही मुदत ज्याला व्याधि वगैरे उपद्रव नाहीं त्याविषयीं.

मनु. मनुष्य निरोगी असून ऋणादि व्यवहारीं दिढा महिन्यांतही साक्ष देत नाहीं, तर त्यापासून सर्व सव्याज कर्ज व दशमांश (दंड) घ्यावा.

या वचनांतील निरोगी शब्देंकरून राजदैविक उपद्रवरहितांचाही संग्रह करावा.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

गऊक असतां जो दुष्टपणामुळें साक्ष
न पतकरीत नाहीं त्याविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. गऊक असूनही जो नराधम साक्ष देत नाहीं, तो निश्चयें पापानें व दंडानेंही **कूटसाक्षी** समान.

टीका.

५ ज्या नराधमाला विवादसंबंधी वाका विशेषें करून ठाऊक असतांही साक्ष देत नाहीं तो अपराधानें व दंडानें खोटी साक्ष देणारासमान दोषी व **दंड्य** होतो. **कूटसाक्षी**स दंड पुढें (६व्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितला आहे. **कूटसाक्षी**स दंड करून पुनः वाद चालवावा. निर्णय झाल्यानंतरही जर ती खोटी साक्ष उघाडीस आली, तर तो वाद उलटावा.

साक्षीदारांस वाका चांगला ठाउक असूनही दुशमनकीमुळें नाकबूल जातो तर तो कूटसाक्षी.

मनु. ज्या ज्या वादांत खोटी साक्ष दिल्ही असेल तो तो वाद निर्णीत केला असला तरी निर्णीत न केल्यासारिखा, ह्मणून उलटावा.

साक्षींचें **द्वैध** प्राप्त झालें तर कसा निर्णय
करावा तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **द्वैध** पडलें असतां बहुतांचें वचन घ्यावें, समसंख्याकांचें **द्वैध** पडलें तर **गुणवानांचें**, तसेंच **गुणवानांचें द्वैध** पडलें तर विशेष **गुणवान** असतील त्यांची साक्ष घ्यावी.

# प्रकरण ५
## साक्षीविषयीं.

टीका.

६ साक्षींचें द्वैध असतां बहुतांची साक्ष असेल ती प्रमाण मानावी; समसंख्य साक्षींचें द्वैध पडलें तर त्यांत जे गुणी असतील त्यांची साक्ष प्रमाण; गुणवानांची विप्रतिपत्ति पडली तर जे विशेष गुणी ह्मणजे वेदशास्त्र, आचार, धन, पुत्र, इत्यादि गुणसंपन्न असतील त्यांची साक्ष घ्यावी. — साक्षीदारांचें द्वैध पडल्यास त्यांत बहुसंमत जी साक्ष ती घ्यावी

७ जर कितीएक गुणी आणि दुसरे बहूत अशा साक्षींचें द्वैध प्राप्त झालें असतां गुणवानांचीच साक्ष प्रमाण घ्यावी. कारण, "धर्मज्ञ असा मनुष्य उभयतांस मान्य असल्यास एकही साक्षी पुरे होतो." असें पूर्वी (२ ऱ्या शाखेच्या ६ व्या अंकाचे वचनांत) गुणाधिक्या विषयीं मुख्यत्व सांगितलें आहे. — कांहीं गुणवान् आणि दुसरे बहूत आहेत तर गुणवानांची साक्ष प्रमाण.

८ जे (२ ऱ्या शाखेच्या ३ ऱ्या अंकांतील नारद वचनांत) भेदनिषिद्ध साक्षी सांगितले आहेत, ते सर्व संख्येनें व गुणेंकरून समान असल्यामुळें विशेष समजण्यांत आला नाहीं तर ते भेदनिषिद्ध साक्षी झाले. जर विशेष समजला तर ते भेदनिषिद्ध होत नाहींत.

---

१ येथें गुणी ह्मणजे २ ऱ्या शाखेच्या १ ल्या अंकांत सांगितल्याप्रमाणें असावे.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

### शाखा ५

साक्षींनीं कशी साक्ष दिल्ही असतां जय होतो व कशी दिल्ही असतां पराजय होतो तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ज्याचा वाद खरा आहे असें साक्षी सांगतील तो जय पावेल, ज्याची साक्षी विपरीत सांगतील त्याचा पराजय निश्चित.

टीका.

ज्याचा वादखरा असें साक्षीसांगतीलतोजयपावेल

१ ज्या वादीच्या वादाविषयीं साक्षी साक्ष देतील कीं, याचा द्रव्य,जाति,संख्या,एतद्विशिष्ट वाद खरा आहे असें आह्मास माहित आहे, तो जय पावतो.

२ ज्या वादीच्या वादाविषयीं साक्षी सांगतील कीं, याचा वाद खोटा आहे, त्याचा पराजय निश्चित झाला.

साक्षीदाराकडून विस्मृतीमुळें खरें खोटें सांगवत नाहीं, तर त्याविषयींचाप्रकार.

३ जेथें साक्षी विस्मृतीमुळें वादाविषयीं सत्य किंवा मिथ्या सांगत नाहींत, तेथें दुसऱ्या **प्रमाणानें** (लेख भोग वगैरेनीं) निर्णय करावा. परंतु **राजानें** त्यांस वारंवार पुसूं नये, जें स्वाभाविक बोलतील तेंच घ्यावें.

स्मृति. **राजानें** त्यांचें जें निर्दोष स्वाभाविक भाषण असेल तेंच घ्यावें, साक्षी एकवार बोलले असतां वारंवार पुसूं नये.

२ ऱ्या अंकाचें बाधक सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. साक्षींनीं साक्ष दिल्ही असतांही जर दुसरे **गुणवान** किंवा दु

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

पट(साक्षी) विपरीत बोलतील तर पहिले साक्षी खोटे जाणावे.

टीका.

४ पूर्वी[१] सांगितलेल्या साक्षींनीं वादीच्या अर्थाविषयीं प्रतिकूळ साक्ष दिल्ही असतां जर पहिल्यापेक्षां विशेष **गुणवान** किंवा दुपट संख्येने वादीच्या तर्फेनें साक्ष देतील तर पहिले साक्षी खोटे ठरतील.

पहिल्या साक्षींपेक्षां दुसरे दुपट साक्षी पूर्व विपरीत साक्ष देतील तर पहिले खोटे.

५, शंका——वर सांगितल्याची उपपत्ति होत नाहीं. कारण, वादी, प्रतिवादी, **सभासद**, **न्यायाधीश**, यांनीं परीक्षा करून **प्रमाण** केलेले अशा साक्षींनीं साक्ष दिल्ही असतां दुसरें **प्रमाण** (दुसरे साक्षी) शोधिलें तर **अनवस्थारूप** दोष येतो.

नारद. लेख किंवा साक्षी **प्रमाण** जर पूर्वी निवेदन केलें नाहीं आणि **व्यवहार** निर्णय झाल्यानंतर दाखविलें जातें, तर तें व्यर्थ होतें. जसें धान्यें पक्व झाल्यानंतर पर्जन्यवृष्टि अनुपयोगी. तसेंच **व्यवहार** निर्णीत झाल्यानंतर **प्रमाणनिर्देश**ही निष्फळ जाणावा.

६, समाधान——जेव्हां वादी आपल्या वादाच्या खरेपणामुळें हा वाद निःसंशय असाच अशी वादीच्यामनाची पक्की खातरी झाल्यानें व साक्षीविषयीं प्रसिद्धपणें दोषही आढळत नाहीं तरी त्याची साक्ष आपल्या अर्थाविषयीं प्रतिकूळ पडल्यामुळें अप्रमाण मानून साक्षी

---

१ पूर्वी म्हणजे २ऱ्या शाखेच्या १ल्या अंकांत

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं

वरही दोषकल्पना करितो, तेव्हां दुसरें **प्रमाण** शोधण्याविषयीं कोण निवारण करूं शकेल. आणि असें सांगितलें आहे कीं "ज्यानें मुख्य कारण सदोष व ज्याविषयीं मिथ्याग्रह होतो, तो **व्यवहार** व असमीचीन. जसें विषयाचें[1] प्रत्यक्ष होण्याविषयीं मुख्य कारण जें नेत्रेंद्रिय त्यास दोषाचा निश्चय नसतांही भ्रमानें **शुक्तिरजत** पदार्थाचें विपरीत प्रत्यक्ष झाल्यामुळें तज्जनित ज्ञान — अप्रमाण मानून, तेणेंकरून त्या ज्ञानाचें कारण जें नेत्रेंद्रिय त्याविषयीं दोषकल्पना होती. तसें येथेंही जाणावें.

स्मृति. **राजानें सभासदां** सहवर्तमान साक्षिभाषणाची चोकशी करावी.

अशी साक्षींच्या परीक्षेवांचूनही त्यांच्या भाषणांची चोकशी करण्याचा उपदेश आहे.

कात्यायनही. हे साक्षी योग्य आहेत असें न्यायें करून सिद्ध झालें ह्मणजे त्यांच्या वाक्यांचीपरीक्षाकरावी. असे परीक्षीत जे साक्षी त्यांचे भाषणानें शुद्ध जालेला जो अर्थ तोच शुद्ध निर्णीत, अशी शास्त्रमर्यादा आहे.

मनु. ज्याशीं प्रकृत धनसंबंध आहे ते व आप्तही साक्षी घेऊं नयेत.

असा न्याय आहे ह्मणून जेव्हां साक्षी योग्य असें सिद्ध झालें ह्मणजे त्या भाषणाची परीक्षा पाहावी.

---

१ विषय ह्मणजे ज्या इंद्रियानें ज्याचें प्रत्यक्ष होतें तो त्या इंद्रियाचा विषय ह्मटला आहे. श्रोत्रेंद्रियानें शब्दाचें प्रत्यक्ष होतें, रसनेंद्रियानें रसाचें होतें, तसेंच चक्षुरिंद्रियानें पदार्थ दृग्गोचर होतो हें चाक्षुष प्रत्यक्ष.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

ती वाक्य शुद्धि तर सत्यार्थ प्रतिपादनें करून होती. कारण,

स्मृति. सत्यार्थ कथनानें वाक्य शुद्धि होती.

याप्रमाणें योग्य जें साक्षिरूप **प्रमाण** व त्याचें यथार्थ जें भाषण त्यापासून जो वास्तवार्थ अवगत झाला तोच तथ्य, अशी न्यायकरणा रांची रीति आहे. ह्मणजे कारणदोष व बाधज्ञान यांचा अभाव असतां जो वास्तवार्थ अवगत होतो तोच निर्णायक

७ शंका—वादीनें स्वतां **प्रमाण** दाखविलेल्या साक्षीस टाकून दुसरें साक्षी **प्रमाण** कशासाठीं घ्यावें.

८ समाधान——परंतु हा कांहीं वादीचा दोष नाहीं. कारण,

कात्या० "जो मुख्यकीम **प्रमाण** टाकून दुर्बळ **प्रमाणा**चा अवलंब करि तो त्याचा **सभासदां**नीं जय निर्णय केला असतां पुनः तें लागू हो ऊं शकत नाहीं."

असा कात्यायनानें विवाद निर्णय झाल्यानंतर दुसरें **प्रमाण** घेण्याचा निषेध सांगितल्यावरून अर्थात् निर्णय होण्यापूर्वी दुसरे **प्रमाणा**चा अवलंब करावा असें दर्शविलें.

नारदही. **व्यवहार** निर्णय झाल्यानंतर पुरावा दाखविणें व्यर्थ आहे.

असें नारदानें ही निर्णय झाल्यानंतरच अणखी **प्रमाण** दाखविणें निषेधिलें आहे, पूर्वी नाहीं.

९ तस्मात् प्रथम साक्षींनीं (वादीच्या) अर्थाविषयीं साक्ष दिल्ही असतां वादीचा संतोष न होईल तर त्यानें दुसरे साक्षी द्यावे असें सिद्ध झालें. सिद्ध झालें असतां, ज्यांची साक्ष घेतली त्यापेक्षां विशेष **गुणी** किंवा (संख्येनें) दुपट असे पूर्वी निर्दिष्ट केलेले सन्निध नसले

वादीकडील पहिले साक्षी चीप्रतिकूळ साक्ष पडल्या स दुसरे साक्षी घ्यावे.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

तरी तेच **प्रमाण** घ्यावे.

स्मृति. साक्षी जें स्वाभाविक बोलतील तेंच **व्यवहार** निर्णयाविषयीं घ्यावें, हें सर्व **व्यवहारीं** समानच आहे ह्मणून.

नारदही. लेख किंवा साक्षी **प्रमाण** जर पूर्वी निवेदन केलें नाहीं आणि **व्यवहार** निर्णय झाल्यानंतर दाखविलें जातें तर तें व्यर्थ होतें. पूर्वी निर्दिष्ट केलेले साक्षी मिळत नाहींत तर दुसरेही त्यां सारिखे साक्षीच घ्यावे, पण **दिव्य** करूंनये.

स्मृति. साक्षी मिळतअसतां **राजानें दिव्य प्रमाण** घेऊंनये.

असें आहे ह्मणून त्याच्या असंभवीं **दिव्य प्रमाण** करावें, इतउत्तर वादीचा संतोष नहोई तरी दुसरें **प्रमाण** शोधूं नये. कारण, याविषयीं वचन नाहीं, ह्मणून तितक्यानेंच **व्यवहार** पुरा करावा.

१० साक्षींनीं आपल्यास प्रतिकूळ साक्ष दिल्यानें ती अप्रमाण मानणारा प्रतिवादी असंतुष्ट होऊन हे खोटे साक्षी, असा दोषारोप करितो, तरी प्रतिवादीला **प्रमाण** दाखविण्यास अवसरच नाहीं. ह्मणून त्यानें सात दिवसांची मुदत करावी, त्यांत जर साक्षी **राजिक दैविक** उपद्रव झाल्यानें ते दोषी ठरले, तर त्यांपासून **विवादास्पदीभूत** कर्ज देवून तारतम्यानें दंड करावा. जर दोष निश्चय होत नाहीं, तर प्रतिवादीनें तितक्यानेंच संतुष्ट व्हावें. वादीकडील साक्षीपटल्यानंतर प्रतिवादीनें सात दिवसवाट पाहावी.

मनु. ज्या साक्ष देणारास सप्तकामध्यें रोग अग्नि यांचा उपद्रव होईल किंवा जातींतून कोणी मरेल त्यापासून वादीचें कर्ज देवून दंड करावा.

हा (वर सांगितलेला) प्रकार या शाखेच्या १ ल्या अंकाचा

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं

बाध करणारा समजावा.

११ कोणी ५ व्या शाखेच्या ४ थ्या अंकांतील वचनाचा असा अर्थ करितात, कीं वादीनें दाखविलेले साक्षींनीं वादीच्या तर्फेनें साक्ष दिल्ही असतां प्रतिवादी जर त्यांपेक्षां दुसरे **गुणी** किंवा त्यांपेक्षां (संख्येनें) दुपट साक्षींकडून आपल्या तर्फेची साक्ष देववितो, तर पहिले वादीचे साक्षी खोटे.

१२ परंतु असा अर्थ करणें नीट नाहीं. कारण, प्रतिवादीकडून **प्रमाण** दाखविणेंच सयुक्त नाहीं. तें असें, वादी ह्मणजे स्वार्थाविषयीं वाद सांगणारा आणि तद्विरुद्ध बोलणारा तो प्रतिवादी, ह्मणजे नाहीं ह्मणणारा. (अभाव सांगणारा) त्यांत अभावाची सिद्धि **भावसिद्धि**[1] झाल्यावांचून होत नाहीं, परंतु भावसिद्धीला अभावाच्या सिद्धीची गरज नाहीं, ह्मणून भावालाच साध्यत्व हें सयुक्त. कारण, अभावाची स्वरूपतः साक्षी वगैरे कडून सिद्धि संभवत नाहीं, अतएव वादीनें **प्रमाण** (साक्षी लेख भोग) दाखवावें हें सयुक्त.

अणखी, प्रतिवादीकडील उत्तरास अनुसरूनच सर्व **व्यवहारीं प्रमाण निर्देश** नियमित अशी स्मृति आहे

स्मृति. **प्राङ्न्यायोत्तर** व **कारणोत्तर** स्थळीं प्रतिवादीनें **प्रमाणांचा** पुरावा केला पाहिजे. आणि **मिथ्योत्तर** स्थळीं तर

---

१ भाव ह्मणजे याजकडे माझें अमुक येणें आहे अशी सत्तारूप क्रिया, आणि अभाव ह्मणजे मी घेतले नाहींत असें नाहीं ह्मणणें.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

वादीनें **प्रमाण** दाखविलें पाहिजे. **सत्योत्तर**स्थळीं **प्रमाणा**ची गरजच नाहीं.

एका **व्यवहारां**त वादी प्रतिवादी या उभयतांचा **प्रमाणनिर्देश** होत नाहीं.

स्मृति. एका **व्यवहारां**त दोहों वादींकडून पुरावा संभवत नाहीं.

तस्मात् प्रतिवादी जर वादीच्या साक्षीपेक्षां **गुणी** किंवा दुपट साक्षींकडून आपल्या तर्फेची साक्ष देववितो, तर वादीचे साक्षी खोटे ठरतात. असा ( या शाखेच्या - ४ थ्या अंकांतील वचनाचा ) अर्थ केला त्याची उपपत्ति होत नाहीं.

१३ अणखी असें कीं, ज्या **व्यवहारीं** दोघेही फिर्यादीच, माझें हें धन **दायलब्ध**, हें माझें **दायलब्ध**, असें पहिल्यानें एकाला मिळालें, आणि मग दुसऱ्यास, असा पूर्वापर कालज्ञानावांचून विवाद करीत आहेत, व दोघांचेही साक्षी आहेत, तर कोणाचे साक्षी घ्यावे, अशी आशंका असतां सांगतो.

नारद. एका अर्थाविषयीं दोघे भांडत आहेत, आणि दोघांचेही साक्षी आहेत, तर **पूर्ववादी**चे साक्षी **प्रमाण** घ्यावे. उभयतांचेही साक्षी संख्यानें गुणांकडून असल्यास कोणाचें सबळ प्रमाण.

अशा वचनें करून जो फिर्याद करितो त्याचे साक्षी घ्यावे असें सिद्ध झालें असतां त्याचें बाधक हें ( या शाखेच्या ४ थ्या अंकांतील ) वचन. यास्तव **पूर्ववादी** व **उत्तरवादी** अशा

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

दोघां वादींचेही साक्षी गुणानें व संख्येनें समान आहेत तर **पूर्व वादी**चे साक्षी **प्रमाण** घ्यावे. जर **उत्तरवादी**चे साक्षी (पूर्व वादीच्या साक्षीपेक्षां) विशेष **गुणी** किंवा दुपट आहेत, तर **उत्तरवादी**चेच साक्षी घ्यावे.

येथें अभावाला साध्य दशा नाहीं; कारण, दोघेही फिर्यादीच झाले, सबब हें **उत्तर** चौहों[१] प्रकारच्या **उत्तरा**पेक्षां विलक्षण आहे, ह्मणून प्रकृत उदाहरणीं (वरच्या नारदवचनांत) साक्षी विषयीं व्यवस्था सांगितली ती नीट नाहीं.

१४ जसें दुसऱ्याच्या मतीं एका **व्यवहारीं** एका वादीचीं दोन **प्रमाणें** (पहिल्या साक्षीपेक्षां गुणवंत व दुपट साक्षी) होतात; तसें वादी प्रतिवादी या दोघांचेही आपापल्या तर्फेचे निरनिराळे साक्षी **प्रमाण** घेतले असतां विरोध येत नाहीं, असें जें मत आहे तेंही आचार्यांस अनुमत नाहीं. कारण, या शाखेच्या ४ थ्या अंकांतील वचनांत शब्दापासून अर्थापासून किंवा प्रकरणापासूनही सदरहू अर्थाची (१३ व्या अंकाची) प्रतीति होत नाहीं, ह्मणून प्रसंगसंगति पुरे.

---

१ चौहों प्रकारचें ह्मणजे १ल्या प्रकरणांतील १०व्या शाखेच्या २ऱ्या अंकांत सांगितलेलें

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं

### शाखा ६

(५ व्या शाखेच्या ४ थ्या अंकांत) खोटे साक्षी सांगितले त्यांस दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. खोटे साक्षी करणारा व खोटी साक्ष देणारा हे वादाच्या दुपट प्रत्येक दंडावे; ब्राह्मण हद्द पार करावा.

टीका.

खोटी साक्ष देणारास व देवविणारास वादाच्या दुपट दंड.

१ जो लांच वगैरे देऊन खोटे साक्षी करितो तो, व लांच वगैरे घेऊन खोटी साक्ष देणारे ते, यांप्रत्येकांपासून त्यात्या वादांत जोजो पराजयनिमित्त दंड सांगितला आहे त्याच्या दुपट दंड घ्यावा. तो (खोटी साक्ष देवविणारा किंवा देणारा) जर ब्राह्मण आहे तर त्यापासून दंड घेऊं नये, गांवांतून हांकून द्यावा.

खोटी साक्ष देण्याविषयीं लालूच वगैरे निरनिराळ्या कारणामुळें दंड.

२ परंतु हा दंडप्रकार लालूच वगैरे निरनिराळें कारण माहित नसल्यास व एकवार घडलें असल्यास योजावा. लालूच वगैरे निरनिराळें कारण समजण्यांत आलें व वारंवार असा प्रकार घडण्यांत आला तर खालीं मनूनें सांगितलेले दंड योजावे.

मनु. लोभामुळें (खोटी साक्ष देवविणारास किंवा देणारास) सहस्र दंड करावा; मोहानें असें करणारास **प्रथमसाहस**; भयानें असें करणारास दोन **मध्यमसाहसें**; स्नेहभावामुळें असें करणारास **प्रथमसाहसा**च्या चौपट दंड करावा; कामातुरपणामुळें असें करणारास **प्रथमसाहसा**च्या दहापट; आणि क्रोधानें असें करणारास **उत्तमसाहसा**च्या तिपट दंड; अज्ञानामुळें असें करणारास दोनशें; आणि मूर्ख

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

पणामुळें असें घडल्यास शंभर दंड करावा.

वरच्या मनुवचनांत सहस्र वगैरे दंड संख्या सांगितली, तेथें तांब्याचे **पण** घ्यावे.

मनु. ३ तीन **वर्ण** जर खोटी साक्ष देतात (किंवा देववितात) तर त्यांस धार्मिक **राजानें** दंड करून मारावें आणि ब्राह्मणास तर दंड करून **विवास** करावें. खोटी साक्ष देणारास जातिपरत्वें करून दंड.

हा प्रकार वारंवार घडल्यास त्याविषयीं जाणावा. कारण, "देतात" असा वर्तमान कालीं निर्देश केला आहे ह्मणून तीन **वर्ण** ह्मणजे क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांस पूर्वीं (१ल्या अंकांत) सांगितलेला दंड करून मारावें असें वर सांगितलें, तें मारणें ह्मणजे ओंठ कापणें, जीभ कापणें, वध, ह्या शिक्षा खोट्या साक्षीच्या अपराधतारतम्यानें योजाव्या. ब्राह्मणास तर धनदंड करून हद्दपार करावें किंवा **विवास** ह्मणजे नागवें करावें, अथवा **विवास** ह्मणजे गृहविच्छिन्न करावें.

ब्राह्मणासही लालूच वगैरे कारण समजण्यांत न आल्यास व एकवार अपराध घडल्यास त्यात्यास्थळीं सांगितलेला धनदंड करावा; वारंवार घडल्यास तर धन-दंड करून जात, द्रव्य, अपराध, यांच्या तारतम्यानें नग्न करणें, घर मोडणें, राष्ट्रांतून हांकून देणें, ह्या शिक्षा योजाव्या.

लालूच वगैरे कारण समजण्यांत न आलें व एकवार घडलेला खोट्या साक्षीचा अपराध थोडक्या अर्थाविषयीं आहे, तर ब्राह्मणालाही क्षत्रियादिकांप्रमाणें अर्थदंडच महान्, अर्थाविषयीं

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

तर (धनदंड करून) देशांतून हांकून देणेंच शिक्षा.

येथेंही वारंवार (खोटी साक्ष देणें किंवा देवविणें) घडलें असल्यास सर्वांस वरच्या (मनुवचनांत) सांगितल्या प्रमाणेंच दंड योजावे.

४ ब्राह्मणास धनदंड नाहीं असें समजूं नये; कारण, ब्राह्मणास शारीर दंड तर पूर्वींच (२ऱ्या प्रकरणांतील १०व्या शाखेच्या १५व्या अंकांत) निषेधिला आहे, व धनदंडही न केला तर स्वल्प अपराधाविषयीं देखील नग्न करणें, घरविच्छिन्न करणें, डाग देणें, हांकून देणें, ह्या शिक्षा कराव्या लागतील, किंवा अगदींच दंड करूं नये, असें प्रसक्त होईल, व (खालीं सांगितलेल्या) मनुवचनासही विरोध येतो.

मनु. चारी वर्ण प्रायश्चित्त न करितील तर त्यांस धनदंडासुद्धां यथाशास्त्र शारीर दंड योजावा." तसेंच गुप्त ब्राह्मणीशीं बलात्कारानें संग करणाऱ्या ब्राह्मणास सहस्र (पण) दंड करावा."

शंख. तीन वर्णांस (क्षत्रिय, वैश्य, शूद्र, यांस) धनापहार, वध, कैद, ह्या शिक्षा आणि ब्राह्मणास नग्न करणें, घरविच्छिन्न करणें, देशांतून हांकून देणें, डाग देणें, ह्या शिक्षा.

असें जें वचन आहे त्यांत धनापहार ह्मणजे सर्वस्व हरण समजावें; कारण, वधा बरोबर धनापहार पठित आहे.

स्मृति. बंधनापासून वध होईपर्यंत जितकी शिक्षा तो सर्व शारीरदंड ह्मटला आहे. आणि काकिणीपासून सर्वस्व हरणापर्यंत सगळे धनदंड ह्मटले आहेत.

असा वध दंडा बरोबर सर्वस्व हरण दंड पठित आहे.

# प्रकरण ५

## साक्षाविषयीं.

मनु. ५ ब्राह्मणाच्या शरीरास क्षत न होतां व धनाला धोका न लागतां त्याला देशांतून बाहेर करावें.

असें जें सांगितलें आहे तें ही **प्रथमसाहस** अपराधाविषयीं, सर्वापराधाविषयीं नव्हे. कारण, ब्राह्मणाला **शारीर** दंड तर कधीं करूं नये.

मनु. जरी ब्राह्मण सर्व प्रकारचीं पापें आचरीत असला तरीं त्याला कधींही मारूं नये; तसेंच ब्राह्मणवधाहून दुसरा मोठा अधर्म या भूलोकीं कोणता नाहीं, यास्तव **राजानें** ब्राह्मणवधाविषयीं मनांत कल्पना देखील आणूं नये.

मूळ.

याज्ञवल्क्य. ज्याला दुसऱ्यां बरोबर साक्ष ऐकविली असतांही **तमोगुणाक्रांत** होऊन तीं नाकबूल करितो, त्यापासून आठपट दंड घ्यावा; ब्राह्मणाला तर **विवास** करावें.

टीका.

६ जो साक्ष पतकरून दुसऱ्या साक्षी बरोबर साक्ष ऐकविली असतांही **तमोगुणादिकें** करून आक्रांत होऊन त्या साक्षीस "मी या विषयीं साक्षी नव्हतो:" असा नाकबूल होतो. त्यापासून ज्या ज्या विवादीं पराजयनिमित्त जो दंड सांगितला असेल तो आठपट घ्यावा.

साक्ष पतकरून मी साक्षी नाहीं असें ह्मणणारांस आठपट दंड.

७ ब्राह्मण आठपट दंड देण्यास समर्थ नसल्यास **विवास** करावा. ह्मणजे नग्न करणें, घर विच्छिन्न करणें, देशांतून हांकून देणें, ह्या शिक्षा अपराधतारतम्यानें योजाव्या. इतरांस आठपट दंड देण्याचें

ब्राह्मणास आठपट दंड देण्याचें सामर्थ्य नसल्यास हद्दपार करावें.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

सामर्थ्य नसल्यास त्या त्या जातीस जें योग्य तें काम घेणें, बेडी घालणें, बंदिशाळेंत ठेवणें, वगैरे शिक्षा नारनम्यानें योजाव्या.

हा वरचा (७ व्या अंकांतील) दंडविधि ६ व्या शाखेंतील १ ल्या व २ ऱ्या अंकस्थळींही योजावा.

८ जर सगळे साक्षी निह्नव करितात तर सगळेही समान अपराधी ठरले, (यास्तव त्या प्रत्येकापासून ६ व्या व ७ व्या अंकाप्रमाणें दंड घ्यावा.) सगळे साक्षी नाकबूल जातात तर सर्वांस सारखा दंड.

९ जर साक्ष देऊन पुनः विपरीत बोलतात, तर अपराध नारतम्यानें दंड करावा. साक्ष देऊन पुनः विपरीत साक्ष देणारास दंड.

कात्यायन. साक्ष देऊन विपरीत बोलणारे तर वाग्दोषी ठरले सबब दंड्य होतात.

१० दुसऱ्यानें शिकविलेले किंवा दुसऱ्याकडून किंवा एकांतीं साक्षी घेऊं नयेत. एकांतीं साक्ष घेऊं नये व साक्षीचा फितूरही करूं नये.

नारद. दुसऱ्यानें शिकविलेल्याची साक्ष घेऊं नये व एकांतीं साक्ष घेऊं नये. व दुसऱ्याकडून त्यांचा भेदही पाडूं नये. कारण, असें करणारा दोषी ठरतो.

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

### शाखा ७

साक्षींनीं अगदींच साक्ष न देणें व खोटी साक्ष देणें सर्व **व्यवहारीं** निषेधिलें आहे, त्याचें बाधक सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जेथें **वर्णी**चा वध होत आहे तेथें साक्षीनें अनृत बोलावें.

टीका.

१ जेथें खरी साक्ष दिल्यानें **वर्णी**चा ह्मणजे शूद्र वैश्य क्षत्रिय ब्राह्मण यांचा वध घडतो आहे, तशा स्थळीं साक्षीनें खोटें बोलावें, खरें बोलूं नये, असा सत्य भाषणाचा निषेध सांगितल्यावरून पूर्वीं (५व्या शाखेच्या चवथ्या अंकांत) निषेधिलेली खोटी साक्ष आणि (१थ्या शाखेच्या ४थ्या अंकांत) निषेधिलेलें अगदींच साक्ष न देणें या दोहों विषयींही अभ्यनुज्ञा सांगितली.

*खरी साक्ष दिल्यानें चातुर्वर्ण्याचा वध होतो आहे तर खोटी साक्ष द्यावी.*

२ जेथें **शंकितापराध** वगैरे स्थळीं खरी साक्ष दिल्यानें **वर्णी**चा वध घडतो, आणि खोटी साक्ष दिल्यानें कोणाचाही वध घडत नाहीं, तेथें खोटी साक्ष देण्याविषयीं शास्त्राज्ञा आहे.

३ ज्या **व्यवहारीं** खरें बोलण्यानें वादिप्रतिवादींतून एकाचा वध घडतो, व खोटें बोलण्यानें दुसऱ्याचा वध घडतो, तेथें उगेंच राहावें, परंतु जर **राजा** मान्य करितो तर. जर मौन धरिलें पण **राजा** साक्ष घेतल्यावांचून सोडीत नाहीं, तर साक्षींत भेद पाडून **भेदनिषिद्ध** साक्षीचे कोटींत तरी शिरावें. तेंही न घडे तर खरेंच बोलावें; कारण, खोटी साक्ष दिल्यानें **वर्णी**च्या

*खोटी साक्ष दिल्यानें एकाचा आणि खरी साक्ष दिल्यानें दुसऱ्याचा वध घडतो तशा स्थळीं उगेंच राहावें.*

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

वधाचा दोष व अनृतभाषणाचा दोष घडतो, आणि सत्यभाषण केलें तर केवळ वधदोषच घडतो, तर त्याविषयीं यथाशास्त्र प्रायश्चित्त करावें.

खोटी साक्ष देणें किंवा अगदींच न बोलणें याविषयीं शास्त्राज्ञा आहे, ह्मणून प्रत्यवाय नाहीं याविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. त्याचे प्रायश्चित्तार्थ द्विजांनीं सरस्वती देवतोद्देशें करून चरुहोम करावा.

टीका.

४ खोटी साक्ष देणें व मौन धरणें एतन्निमित्त जो दोष त्याचे परिहारार्थ प्रत्येक द्विजांनीं सरस्वती देवतोद्देशें करून चरु होम करावा. खोटें बोलण्याचें प्रायश्चित्त.

५ कड बाहेर उतू न जातां आंतल्या आंत वाफेनें शिजलेल्या भाताविषयीं चरु शब्दाची प्रसिद्धि आहे.

खोटी साक्ष देणें अगदींच साक्ष न देणें जें निषेधिलें तें करण्याविषयीं येथें आज्ञा सांगितली, "अनृत बोलूं नये" आणि "न बोलणारा व विरुद्ध बोलणारा मनुष्य पातकी ठरतो." असें जें सामान्यतः अनृतभाषण व अगदींच न बोलणें, त्याचा जो निषेध सांगितला त्याच्या उल्लंघनानिमित्त व दोषाच्या परिहारासाठीं हें प्रायश्चित्त.

६ खोटी साक्ष देणें व साक्ष न देणें याविषयीं अभ्यनुज्ञा

# प्रकरण ५

## साक्षीविषयीं.

असली तरी जो सामान्यत: अनृतभाषण व मौन याच्या निषेधाच्या उल्लंघना निमित्त दोष वर सांगितला आहे, तो तसाच राहिला, सबब, खोटी साक्ष देणें व साक्ष न देणें या विषयींचें जें (४ थ्या अंकाचें) वचन तें निरर्थक असें मानूं नये. कारण, खोटी साक्ष देणें व अगदीं साक्ष न देणें यापासून मोठा दोष लागतो, आणि सामान्यत: अनृत भाषण व मौन यांपासून फार थोडा दोष लागतो. ह्मणून वरचें (४ थ्या अंकाचें) अभ्यनुज्ञा वचन सार्थ आहे. जरी मोठ्या दोषाच्या परिहारानें **आनुषंगिक** अल्पदोषाची निवृत्ति अन्यत्र स्थळीं होती, तथापि येथें खोट्या साक्षी विषयीं अभ्यनुज्ञा वचन व प्रायश्चित्त विधान सांगितल्यावरून मोठ्या दोषाचा परिहार झाल्यानें स्वल्पही **आनुषंगिक** दोषाचा परिहार होत नाहीं असें अवगत होतें.

७ याप्रमाणेंच अन्यत्रस्थळींही वधाच्या उद्देशानें वाटसरू वगैरेस कोणीं प्रश्न[१] केला असतां अनृत भाषणाविषयीं आज्ञा जाणावी. तशास्थळीं अनृतभाषण केलें असतां प्रायश्चित्त नाहीं. कारण, निराळा निषेध सांगितला नाहीं. वध निवारणार्थ अनृत भाषण केलें आणि दुसऱ्या कारणावरून कालांतरें करून तें समजण्यांत आलें असतां साक्षीस किंवा दुसऱ्या अनृत भाषण करणारास दंड नाहीं असें (४ थ्या अंकाचे) वचनावरून अवगत होतें. मनुष्याचा प्राण वाचविण्यासाठीं खोटें बोलावें.

१ कोणी हत्यारबंद रानांत वगैरे ठिकाणीं कोणास मारायास धांवत असतां मध्यें वाटसरास विचारितो कीं, फलाणा कोणत्या वाटेनें गेला तूं पाहिलास?

# प्रकरण ६

## लेखाविषयीं

### शाखा १

भोग व साक्षी यांचें निरूपण केलें, आतां लेखा चें निरूपण करितो.

लेख दोन प्रकारचा.

**शासन** आणि **जानपद**

त्यांत **शासना**चें निरूपण पूर्वींच[1] केलें. **जानपदा**चें स्वरूप आतां सांगतो

**जानपद** लेख दोन प्रकारचा.

१ स्वहस्तानें लिहिलेला, आणि दुसऱ्याकडून लिहविलेला. त्यांत स्वहस्तानें लिहिलेला लेख साक्षिविरहित आणि दुसऱ्याकडून लिहविलेला लेख ससाक्ष हा दोहों प्रकारचा लेख देशाचाराचे वहिवाटीप्रमाणें **प्रमाण** होतो.

नारद स्वहस्तानें लिहिलेला साक्षिविरहित आणि दुसऱ्याकडून लिहविलेला ससाक्ष असा दोन प्रकारचा लेख. याचें **प्रमाण** देशचाली प्रमाणें.

दुसऱ्याकडून लिहविलेला लेख सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य जो कांहीं अर्थ परस्परांच्या अनुमतानें व्यवस्थित झाला त्याविषयीं ससाक्ष लेख करावा. त्यांत धनिकनाम पूर्वीं असावें.

---

१ पूर्वीं ह्मणजे आचाराध्यायांत परंतु येथें त्याचें स्वरूप ६३वे पृष्ठांत नोटींत दाखविलें आहे

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

टीका.

२ ज्या सुवर्णादिक द्रव्याविषयीं सावकार व कूळ यांच्या परस्पर संतोषानें करार झाला कीं, अमुक मुदतीस इतकें द्रव्य द्यावें, व त्याला दरमहा अमुक व्याज; त्या द्रव्याविषयीं कालांतरीं विवाद पडला असतां वास्तव निर्णय होण्याविषयीं पूर्वी (५ व्या प्रकरणांतील २ या शाखेच्या १ ल्या व २ या अंकांत) सांगितलेल्या साक्षी निशीं लेख करावा, आणि त्यांत सावकारानें नाव प्रथमतः लिहावें. दुसऱ्याकडून लिहविलेला लेख ससाक्ष असावा.

३ अथवा पूर्वी (५ व्या प्रकरणांतील २ या शाखेच्या १ ल्या व ३ या अंकांत) सांगितलेले साक्षी असावे.

स्मृति. **व्यवहार** करणारानें जो **व्यवहार** केला त्याची सिद्धि व्हावी एतदर्थ **व्यवहारीं** साक्षी ठेवावे, अथवा स्वदस्तुर लेख करावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. संवत्सर, महिना, पक्ष, दिवस, नाव, जात, गोत्र, **गुणनाम**, आपल्या पित्याचीं नांवें **इत्यादिक** त्यांत असावें.

टीका.

४ संवत्सर, मास-चैत्र **इत्यादिक**, पक्ष-शुक्ल किंवा कृष्ण, तिथि, सावकार व कूळ यांचीं नावें, व जात गोत्र व **गुणनाम** यांकडून युक्त असा लेख करावा, व आदि शब्दें करून त्यांच्या बापाचें नाव द्रव्यरूप संख्या हीं त्या लेखांत असावीं. लेखांत काय काय असावें तो प्रकार

मूळ.

याज्ञवल्क्य. लेखार्थ संपल्यावर **अधमर्णानें** स्वहस्तानें लिहावें, असें कीं,

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

जें वर लिहिलें तें अमुकाच्या पुत्राला मला हें मान्य आहे.

टीका.

सावकार व कूळ यांच्या परस्पर संतोषानें व्यवस्थित जो लेख्यार्थ तो पुरा झाल्यानंतर कुळानें स्वहस्तानें आपलें नाव लिहावें, कीं जें यांत वर लिहिलें आहे तें अमुकाचा पुत्र जो मी त्या मला मान्य आहे. कुळानें स्वाक्षी आपली मान्यता लिहावी.

मूळ

याज्ञवल्क्य. साक्षींनींही याविषयीं मी अमुकाचा पुत्र, व अमुक, असें स्वहस्तानें लिहून द्यावें, आणि ते साक्षी सम असावे.

टीका.

६ त्या लेखांत जे साक्षी लिहिले असतील त्यांनींही मी अमुकाचा पुत्र या अर्थाविषयीं साक्षी आहें, असें प्रत्येक साक्षीनें स्वहस्तानें लिहून द्यावें, आणि ते साक्षी **गुणीं** व संख्येनें सम असावे. साक्षीनींही स्वहस्तानें साक्ष लिहून द्यावी.

७ जर कुळास किंवा साक्षीस लिहितां येत नाहीं तर कुळानें दुसऱ्याकडून व साक्षीनेंही दुसऱ्या साक्षीकडून सर्व साक्षींच्या समक्ष स्वाभिप्राय लिहून द्यावा. कूळ व साक्षीयांस लिहितां येत नसल्यास दुसऱ्याकडून सही करावी.

नारद. कूळ किंवा साक्षी यांस लिहितां येत नसल्यास कुळानें दुसऱ्याकडून व साक्षीनें दुसऱ्या साक्षीकडून सर्व साक्षींच्या समक्ष आपला मजकूर लिहवावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. उभयतांचे सांगितल्यावरून अमुकाचे पुत्रानें व अमुकानें ह्या हें लिहिलें असें लेखकानेंही शेवटीं लिहावें.

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

टीका.

८ नंतर लेखकानेंही सावकार व कूळ याउभयतांच्या सांगि तल्यावरून अमुकाच्या पुत्रानें म्या हा लेख लिहून दिल्हा. असें शेवटीं लिहून द्यावें.

## शाखा २

आतां स्वहस्तानें लिहिलेल्या लेखाचें निरूप ण करितो.

मूळ.

याज्ञवल्क्य. स्वदस्तूरचा लेख तर साक्षी वांचूनही **प्रमाण** होतो, पण जब री धमकी या वांचून असल्यास.

टीका.

१ कुळानें स्वहस्तानें लिहिलेला लेख साक्षी विरहित असला तरी **प्रमाण** होतो, परंतु तो जर बलात्कारानें व लोभ, क्रोध, **इत्यादि कें**करून लिहिलेल्या वांचून असेल तर, असें मन्वादिकऋषींनीं सांगि तलें आहे. कुळाचा स्वदस्तूरलेख साक्षीविरहित प्रमाणहोतो.

नारदही. **मत्त**, ब्रह्महत्यादि पापें करणारा, स्त्री, **बाल**, यांनीं केले ला लेख व बलात्कारानें केलेला. तसाच भय, ठकबाजी, यांक डून केलेला लेखही **प्रमाण** होत नाहीं. जबरी भय व गैरे कारणा कडून झालेला लेख प्रमाण नाहीं.

याप्रमाणें स्वहस्तानें लिहिलेला व दुसऱ्याकडून लिहविलेला लेख, देश चालीप्रमाणें गहाणाच्या व्यवहारीं वगहाणाखेरीज व्यवहारीं ही अ-

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

र्थसंगतीचा लोप न होतां व अक्षरांचा लोप न होतां लिहावा; केवळ चांगले शब्दच त्यांत असावे असें नाहीं आणि तो त्या त्या देश भाषेनें लिहावा.

नारद. देशाचारास अविरुद्ध आणि ज्यामध्यें **गोध्य** गहाण, **भोग्य** गहाण, **कृतकाल** गहाण, वगैरे प्रकार स्पष्ट असावा. व अर्थसंगति अक्षरें यांचा लोप नसावा.

असा लेख असल्यास **प्रमाण** जाणावा. सारांश **राजशासना** प्रमाणें चांगलेच शब्द असावे असा नियम नाहीं.

लेखाच्या प्रसंग संगतीनें लेख देऊन घेतलेलें

ही कर्ज तीन पुरुषांनींच द्यावें असें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. रोख्याचें कर्जही तीन पुरुषांनींच द्यावें.

टीका.

२ जसें ससाक्ष घेतलेलें कर्ज तीन पुरुषांनीं (घेणारा त्याचा पुत्र व नातू यांनीं) द्यावें, तसें रोख्याचें कर्जही घेणारा, त्याचा पुत्र, व नातू, या तिघांनींच द्यावें. चौथ्यानें (पणतूनें) देऊं नये असें नियमित केलें रोख्याचें कर्ज तिहीं पुरुषांनीं फेडावें.

३ शंका "पुत्रांनीं व नातवांनीं कर्ज द्यावें" असें सामान्यत: यावत्कर्जमात्र तिघांनीं फेडावें, असें (२ ऱ्या प्रकरणांत ७ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचे वचनांत) नियमित आहेच.

४ समाधान खरें, परंतु हें च (२ ऱ्या प्रकरणांतील ७ व्या शाखेच्या १ अंकाचें) सामान्य वचन रोख्याचे कर्जाविषयीं मानिलें असतां स्मृत्यंतरीं जीं बाधक वचनें आहेत तीं येथें प्राप्त होऊं लागतील, अशी शंका न व्हावी, एतदर्थ हें (२ ऱ्या अंकाचें) वचन सांगितलें.

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

कात्यायन लेखाचें स्वरूप सांगून वरचा प्रकार स्पष्ट करून सांगतो.

कात्यायन. याप्रमाणें लेखा लिहून देऊन घेतलेलें कर्ज कालातिक्रम झाल्यानंतर देखील वडिलांचे फेडावें. लेखा देऊन घेतलेलें कर्ज मुदत टळल्यावरही फेडावें.

येथें वडिलांचें असा बहुवचन निर्देश केल्यावरून व कालातिक्रम सांगितल्यावरून चौथ्या वगैरेही पुरुषानें द्यावें असें अवगत होतें.

हारीतही. ज्यापाशीं लेखा असेल त्याला धन मिळेल.

या वचनांत ही ज्यापाशीं लेखा आहे तोच कर्जाचा वसूल घेईल असें सामान्यतः सांगितल्यावरून चौथा पुरुष (पणतू) वगैरे कर्जाचा वसूल पावतो असें अवगत होतें.

यास्तव (वरच्या वचनावरून चौथा पुरुष वगैरेस कर्ज देण्याघेण्याचा अधिकार आहे,) अशी शंका प्राप्त झाली, तिच्या निराकरणार्थ हें मूळ वचन असें सयुक्त. कात्यायन व हारीत वचनें याज्ञवल्क्य वचनाच्या अर्थास अनुसरून योजावीं.

याचें (२ र्‍या अंकाचें) बाधक वचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जों पर्यंत तें परत दिल्हें जात नाहीं तों पर्यंत गहाण भोगावें.

टीका.

५ गहाण खत देऊन घेतलेलें कर्ज तिघांनींच (घेणारा, पुत्र, नातू, यांनीं) द्यावें, असा नियम केल्यावरून, जसा चौथ्या पुरुषास (पणतूस) कर्ज फेडण्याविषयीं अधिकार नाहीं, तसा गहाण सोडण्याविषयींही गहाणखताविषयीं.

# प्रकरण ६
## लेखाविषयीं.

अधिकार नाहीं, असें प्राप्त झालें असतां त्याचा बाध करण्यासाठीं हें सांगितलें कीं, जों पर्यंत चौथ्या किंवा पांचव्या पुरुषानें कर्ज फेडिलें जात नाहीं तों पर्यंतच सावकारानें गहाण भोगावें, असें सांगितल्यानें गहाण ठेऊन घेतलेलें कर्ज फेडण्या विषयीं चौथ्या वगैरे पुरुषासही अधिकार दाखविला.

६ शंका—— परंतु असें सांगणेंही अयोग्य. कारण, "ज्या गहाणाचें उत्पन्न भोगलें जातें तें गहाण कधीं डुलत नाहीं," असें (३ ऱ्या प्रकरणांत १३ व्या शाखेच्या ५ व्या अंकांत सांगितलें आहे.)

७ समाधान—— खरें परंतु तें (गहाण डुलण्या विषयींचें वचन) ही सदरहू (५ व्या अंकांतील) बाधक वचन नसल्यास तीन पिढ्यां विषयींच होऊं शकेल. या प्रमाणें सर्व निर्दोष जाणावें.

## शाखा ३

प्रासंगिक समाप्त करून प्रकृत सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. लेख देशांतरीं असला, किंवा वाचावया जोगा नाहीं असा, पुसटला, गहाळला, चोरीस गेला, फाटला, जळाला, तुकडे पडले, तर दुसरा लेख करून द्यावा.

टीका.

१ जर लेख वाद निर्णयाविषयीं अनुपयोगी झाला, दूरदेशीं राहिला, किंवा अक्षरें किंवा पदें वाचावया जोगीं नाहींत असा, पुसटला, लेखा निर्णयाविषयीं अनुपयोगी वगैरे झाला तर दुसरा लेख करावा.

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

अथवा चोरीस गेला, फाटला, जळाला, किंवा दोन तुकडे झाले, तर दुसरा लेख करून द्यावा.

२ परंतु हें जर सावकार व कूळ या उभयतांस मान्य आहे तर, मान्य नसल्यास विवादसमयीं तो देशांतरीचा लेख आणावयाकरितां मार्गाच्या तारतम्यानें मुदत द्यावी. जर दूरदेशीं राहिला अथवा हरवला तर साक्षीकडूनच **व्यवहार** निर्णय करावा. — देशांतरीं राहिलेला असल्यास आणावा.

नारद. लेख देशांतरीं राहिला, किंवा जर्जर झाला, अथवा अक्षरें पुसटली, अगर चोरीस गेला, परंतु विद्यमान आहे तर, तो आणावयाकरितां मुदत द्यावी, आणि गहाळला असल्यास साक्षीकडून निर्णय करावा.

साक्षी नाहींत तर **दिव्यप्रमाणा**नें निर्णय करावा.

स्मृति. ज्या **व्यवहारीं** लेख नाहीं व साक्षी नाहींत तेथें **दिव्यप्रमाण** घ्यावें.

असें **जानपद** व्यवस्थापत्र सांगितलें. **शासन** लेखाची व्यवस्थाही अशीच. परंतु विशेष इतका तो सांगतो.

स्मृति. ३ **राजा**च्या स्वहस्तलेखानें युक्त व राजमुद्रेनें चिन्हित व समक्ष असें राजकीय निवाडपत्र सर्व **व्यवहारीं** सांगितलें आहे. — सरकारी सनद लिहिण्याचा प्रकार.

तसेंच दुसरें ही सरकारी जयपत्र वृद्धवसिष्ठ सांगतो.

वसिष्ठ. जो वादीनें वादाचा उपन्यास केलेला तो, व प्रतिवादीचें उत्तर, व उभयतांकडून **प्रमाणा**चा पुरावा, आणि त्यावरून जो निर्णय केला असेल तो, एतद्विशिष्ट जें तें जयपत्र ह्मटलें आहे. आणि **प्राड्विवाका**च्या स्व

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

हस्तलेखानें व **राजमुद्रेनें** चिन्हित, असें तें जयपत्र वादनिर्णयझाला असतां वादजिंकणारास द्यावें.

तसेंच **सभासदां**नींही अमुकाचा पुत्र जोमीतामला हें मान्यआहे असें स्वतां लिहिलेलें द्यावें.

मनु. जे त्या **व्यवहारीं** स्मृतिशास्त्र जाणणारे **सभासद** समक्ष असतील त्यांनींही लिहिण्याचे संप्रदायानुरूप स्वतां लिहिलेलें संमतिपत्र द्यावें.

**सभासदां**तही जर परस्परांची संमति नाहीं, तर **व्यवहार** निःशल्य होत नाहीं.

नारद. ज्या **व्यवहारीं** हा निर्णय यथान्याय झाला अशी **सभासदां**ची संमति होती तो **व्यवहार** निःशल्य संमति नसल्यास निःशल्य नव्हे.

हें वर सांगितलेलें जयपत्र **चतुष्पादव्यवहारीं**.

स्मृति. साध्यार्थाची सिद्धि व **चतुष्पाद**सहित आणि **राजमुद्रेनें** चिन्हित असें जें तें जयपत्र ह्मटलें आहे.

स्मृति. ४ सांगतो एकप्रकार, आणि विपरीत लिहून देतो **प्रमाण**दाखवीतच नाहीं, दाखविलें असतां विसंगत दाखवितो, एकाठिकाणीं ठरत नाहीं, विचारिलें असतां **उत्तर**देत नाहीं, बोलाविलें असतां येत नाहीं, असा पांच प्रकारचा खोटवादी सांगितला आहे.

ज्या **व्यवहारीं** असा खोटवादी ठरला त्या खोटवादीस जयपत्र मिळणार नाहीं. तर पराजयपत्र. तेंपराजयपत्र जर कालांतरीं तो फिरूनवाद सांगूं लागेल तर त्याला दंडहोण्यासाठीं आणि वर (३ऱ्याअंकांत) सां

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

गिंवलेलें जयपत्र तर प्राड्न्यायोत्तराचा पुरावा होण्यासाठीं, इतका विशेष.

## शाखा ४

लेखाविषयीं संदेह प्राप्त झाला असतां निर्णय करण्याचे उपाय सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. संशयित लेखाचा निर्णय स्वदस्तूरचा लेख वगैरे, व युक्ति, प्राप्ति, निशाणी, **प्रमाण**, संबंध, **आगम**, या हेतूंकडून करावा.

### टीका.

१ लेख खरा किंवा खोटा असा संशय प्राप्त झाल्यास दुसरे त्याचे स्वदस्तूचे लेख पाहावे, त्यासारिखींच याजवरील अक्षरें असल्यास खरा.

लेखा खरा किंवा खोटा याचा निर्णय करण्याचे उपाय.

मूळांतील वगैरे शब्दें करून अणखीही त्या लेखावरील साक्षी व लेखक यांचे दुसरे स्वदस्तूचे लेख व या लेखावरील त्यांचे दस्तूरचा लेख यांवरून संदिग्ध लेखाची परीक्षा करावी. व देश, काल, पुरुष, यांचा त्या द्रव्याशीं संबंध, ह्मणजे त्यादेशीं व त्यावेळेस या पुरुषाचेंच हें द्रव्य असेल अशी युक्ति, **प्रमाणा**चा पुरावा, अथवा निशाणी[१] ह्मणजे श्रीकारादि चिन्ह, वादी प्रतिवादी याउभयतांच्या

---

१ निशाणीचे दोन प्रकार आहेत, ते असे जें त्याचें उपजीविकेचें साधन असतें तें लिहिणें

# प्रकरण ६

## लेखाविषयीं

परस्पर विश्वासानें देण्या घेण्याचा व्यवहारसंभव व **आगम**, इतक्या कारणांकडून संदिग्ध लेखाचा निर्णय करावा.

२ जर लेखाच्या संदेहामुळें निर्णय होऊं शकत नाहीं तर साक्षींकडून निर्णय करावा.

कात्यायन. लेखाविषयीं दोषारोप झाला असतां वादीनें त्या लेखावरील साक्षी दाखवावे.

हारीत. हा लेख मी लिहिला नाहीं, यानें खोटा लेख करविला आहे, असें वादी शाबीत करील तर तो लेख रद्द करून **दिव्यप्रमाणा**नें निर्णय करावा.

असें जें हारीतानें **दिव्यप्रमाण** सांगितलें तें साक्षी नसल्यास जाणावें.

या प्रमाणें लेखाचा निर्णय होऊन कर्ज द्यावें असें सिद्ध झालें असतां कुळाला एकदांच सगळा ऐवज देण्याचें सामर्थ्य नसल्यास कसें द्यावें तें सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. कुळानें धन परत देऊन लेखाचे पाठीवर लिहून द्यावें किंवा सावकारानेंच धन पावलेलें लेखाचे पाठीवर लिहावें, अथवा स्वदस्तुरची निराळी पावती द्यावी.

---

लिहिणें, ह्मणजे असें, शेतकऱ्यानें नांगराची, शिपायानें हत्याराची, सोनारानें हतोड्याची, वगैरे निशाणी करावी. दुसरा प्रकार असा कीं; जें ज्याचें आराध्यदैवत असतें त्याचें नाव लिहिणें, गजानन, श्रीकार, व्यंकटेश, सांब इत्यादि

# प्रकरण ६

## लेखाविषयीं.

टीका.

३ जर कुळ एकदांच सगळा ऐवज देण्यास असमर्थ आहे, तर जितकी रकम द्यावयाची आहे ती देऊन "मी इतकें दिल्हें" असें लेखाचे पाठीवर लिहून द्यावें, अथवा "इतकें मला पावलें" असें सावकारानें त्याच लेखाचे पाठीवर स्वदस्तूर लिहावें, किंवा स्वदस्तूरनी निराळी पावती द्यावी.

भररकम देण्याचें सामर्थ्य नसल्यास हप्तेबंदीनें वसूल द्यावा.

सगळें कर्ज फिटल्यावर लेख काय करावा तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. सर्व कर्ज फिटल्यावर लेख फाडावा, अथवा शुध्यर्थ पावती द्यावी.

टीका.

४ कुळानें हप्तेबंदीनें किंवा एकदांच भर रकम सावकारास दिल्यानंतर पूर्वीचा लेख फाडून टाकवावा. जर लेख दुर्गम देशांत राहिला अथवा गहाळला तर ऋणमुक्तिसाठीं कुळानें भरपाईची पावती लिहून घ्यावी.

ऐवज फिटल्यावर पावती लिहून घ्यावी.

ससाक्ष जें कर्ज घेतलें तें फिटल्यानंतर काय करावें तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जें ससाक्ष कर्ज असेल तें साक्षी समक्ष द्यावें.

टीका.

५ जें ससाक्ष कर्ज घेतलें आहे तें त्या साक्षींच्या समक्ष सावकारानें परत द्यावें.

ससाक्ष कर्ज साक्षींच्या समक्ष द्यावें

---

संस्कृतांत या प्रकरणाचे पुढें दिव्यप्रकरण सांगितलें आहे, परंतु सांप्रत दिव्यप्रकरणाचा उपयोग नाहीं ह्मणून त्याचें भाषांतर केलें नाहीं. शपथांचा हालीं उपयोग आहे, ह्मणून त्याचें निरूपण करावयाचें तें पूर्वी ५ व्या प्रकरणीं ३ ऱ्या शाखेच्या १ ल्या अंकांत केलेंच आहे.

# प्रकरण ७

# दायविभाग.

## सत्तेविषयीं

**मानुष** आणि **दैव** असें दोन प्रकारचें **प्रमाण** सांगितलें. आतां याज्ञवल्क्य **दायविभागाचें** निरूपण करितो.

१ येथें **दाय** शब्दें करून जें द्रव्य, मालकाचें जें नातें त्यानिमित्तानेंच दुसऱ्याचे सत्तेंत येतें तें. — दायशब्दाचा अर्थ.

तो **दाय** दोन प्रकारचा.

खुला (**अप्रतिबंध**) आणि अटकावलेला (**सप्रतिबंध**)

२ खुला **दाय** — पुत्राच्या व पौत्राच्या नात्यानें बापाचे धनावर व पितामहाचे धनावर सत्ता उत्पन्न होती तें धन. — खुला दाय ह्मणजे काय.

३ अटकावलेला **दाय** — चुलता भाऊ **इत्यादिकांची** पुत्राच्या अभावीं व मालकाच्या अभावीं सत्ता उत्पन्न होती ह्मणून पुत्र विद्यमान असणें व मालक विद्यमान असणें हा (चुलते वगैरेंच्या सत्तेविषयीं) प्रतिबंध आहे, त्याच्या (पुत्र व मालकयांच्या) चुलतेपणा, बंधुत्व, ह्या संबंधानें त्यांची सत्ता उत्पन्न होती तें धन. — अटकावलेला दाय ह्मणजे काय.

या प्रमाणेंच त्यांच्या पुत्रादिकांविषयींही समजावें.

४ विभाग — द्रव्य समुदायाविषयीं जी अनेकांची स्वामित्वें, त्यांची द्रव्य समुदायाच्या त्या त्या एकदेशीं व्यवस्था करणें. — विभागशब्दाचें लक्षण.

नारदही हेंच इष्टमानून सांगतो.

नारद. जेथें पित्याच्या जिंदगींत पुत्रांनीं विभाग केला जातो, तें **दायविभाग** यानावाचें **व्यवहार** प्रकरण ह्मटलें आहे.

# प्रकरण ७
## दायविभाग.
## सत्तेविषयीं.

येथें "पित्याच्या" असें सांगितलें तें सत्तेचानिमित्तभूत जो संबंध त्याचे संग्रहार्थ. तसेंच "पुत्रांनीं" हें ही जवळच्यांचे संग्रहार्थ.

५ आतां इतकें येथें निरूपण करावयाचें आहे कीं, विभाग करण्याचा काळ कोणता, व कशाचा विभाग, व कसा विभाग, आणि विभाग करण्याविषयीं अधिकारी कोणते.

त्यापैकीं कोणता काळ, व कसा विभाग. आणि विभाग करण्याचे अधिकारी कोणते, हें पुढें त्या त्या वचनाच्या अर्थकथनीं सांगितलें आहे.

कशाचा विभाग याविषयीं येथें विचार कर्तव्य.

६ काय? विभागानें सत्ता उत्पन्न होती. किंवा आपली सत्ता असतां त्याचा विभाग केला जातो.

त्यांत प्रथमतः सत्तेचें निरूपण करितो.

काय? **शास्त्रसिद्ध** सत्ता किंवा **लोकसिद्ध** सत्ता.

७ तर **शास्त्रसिद्ध**च सत्ता ह्मणावी हें योग्य.कारण,

गौतम. **रिक्थ, क्रय, संविभाग, परिग्रह, अधिगम**, इतक्या निमित्तांनीं मालक होतो. (तसेंच) ब्राह्मणास **प्रतिग्रहादिकें** करून जें मिळालें तें अधिक, क्षत्रियास विजयप्राप्त, वैश्यास उदमानें मिळालेलें, शूद्रास सेवालब्ध.

जर सत्ता **लोकसिद्ध** मानिली तर हें गौतमवचन निरर्थक होईल.

८ तसेंच चोराच्या **अतिदेशा**विषयीं मनुवचन (खालीं-

# प्रकरण ७
## दायविभाग.
### सत्तेविषयीं

सांगितलें ) आहे त्यासही विरोध येतो.

मनु. जो ब्राह्मण चोराच्या हातून **याजन अध्यापन** यांच्या निमित्तानें धन पावतो, तो चोरासारिखा समजावा.

असें जें चोरापासून **याजनादि** कारणानें द्रव्य संपादन करणारास दंडविधान सांगितलें त्याची उपपत्ति होणार नाहीं, जर सत्ता **लोकसिद्ध** मानिली तर.

९ अणखी असें कीं, जर सत्ता **लोकसिद्ध** मानिली तर (दोष येतो तो असा) माझें द्रव्य यानें अपहारिलें, असें बोलूं नये. कारण, त्यावर अपहर्त्याचीच सत्ता आहे. जर दुसऱ्याचें द्रव्य त्यानें अपहारिलें, या वाक्यांतच दुसऱ्याचें ह्मणजे दुसऱ्याचें सत्ताविशिष्ट असा अर्थ होतो ह्मणून अपहार करणाराची त्याजवर सत्ताच नाहीं असें ह्मणाल तर, जसें लोकांत सोनें रुपें **इत्यादिक** प्रत्यक्ष पाहिलें असतां हें सुवर्णादिक आहे किंवा नाहीं, असा संशय होत नाहीं, तसाच हें यानें द्रव्य किंवा अन्यानें द्रव्य (दुसऱ्याचें द्रव्य दुसऱ्यानें अपहारिलें असतां अपहार करणारा ह्मणेल कीं, माझें द्रव्य यानें अपहारिलें. नंतर सभासदांनीं ऐकिल्यावर त्यांस यानें द्रव्य किंवा अन्यानें ) असा सत्तेविषयीं वगैरे संशय होतो तो होणार नाहीं. तस्मात् **शास्त्रसिद्ध** सत्ता ह्मणावी हें युक्त.

१० सिद्धांत[1] — जें जें **लौकिक** क्रियांचें साधन होतें, तें तें

---

१ ७व्या अंकापासून येथपर्यंत सत्ता शास्त्रसिद्धच असा पूर्वपक्ष सिद्ध करून सिद्धांत मत सांगतो. जसें व्रीहीयव इत्यादिक लौकिक क्रियांचें साधन होतात तशी सत्ताही लौकिक व्यवहारांचें साधन आहे ह्मणून लोकसिद्धच सत्ता असें सिद्ध झालें.

# प्रकरण ७

## दायविभाग.

## सत्तेविषयीं.

**लौकिक**. जसें व्रीहि (तांदूळ) वगैरे, अथवा **अनुमान प्रमाणा**वरून **लोकसिद्ध**च सत्ता ह्मटली पाहिजे. कारण, ती ही लोकव्यवहारांचें साधन आहे.

जें जें **लौकिक** नव्हे तें तें लोकव्यवहारांचें साधन ही होत नाहीं. जसें **शास्त्रसिद्ध** जे **आहवनीयादिक** अग्नी ते (लौकिक नव्हत ह्मणून) लोकव्यवहारोपयोगी ही होत नाहींत. (तशी सत्ता ही **शास्त्रसिद्ध** मानिली तर लोकव्यवहाराचें साधन होणार नाहीं.)

११ शंका —— **आहवनीयादिक** अग्निही पाकादिक क्रियांचें साधन होतातच, मग ते लोकव्यवहारोपयोगी कां न ह्मणावे.

१२ समाधान —— असें नव्हे. कारण, **आहवनीयादिक** अग्निही पाकादिक्रियांचें साधन आहेत, परंतु **आहवनीयत्वें** करून (ह्मणजे आहवनीयादि शब्दवाच्य जो अग्नि तेणें करून) नाहींत, केवळ प्रत्यक्ष गोचर जो अग्नि तेणें करून आहेत. तसें येथें ही स्ववर्णादिक "सुवर्णादि शब्दवाच्य जो द्रव्य विशेष तेणें करून" **क्रय, दान इत्यादि** क्रियासाधन होत नाहीं. केवळ **स्वत्वें** करूनच होतें. कारण, ज्या द्रव्यावर ज्याची सत्ता नाहीं, तें द्रव्य त्याचा **क्रय विक्रय इत्यादिक** व्यापार साधूं शकत नाहीं.

१३ आणखी असें कीं, ज्यांस **शास्त्रीय व्यवहार** अगदींच माहीत नाहीं, असे जे **म्लेंछ** (वगैरे) त्यामध्येंही **स्वत्वव्यवहार**

# प्रकरण ७

## दायविभाग.

## सत्तेविषयीं

पाहण्यांत येतो . कारण, त्या लोकांचाही खरेदी विकरी वगैरे व्यापार दृष्टीस पडतो ह्मणून.

१४ दुसरें असें कीं **नियतोपायक** सत्ता लोकसिद्धच असें न्यायजाणणारे मानितात. तो प्रकार असा. **लिप्सासूत्रीं तृतीयवर्णकांत** द्रव्य संपादन करण्याचे जे **प्रतिग्रहादिक** नियम सांगितले आहेत. ते यज्ञासाठीं. असें मानिलें असतां त्या (**प्रतिग्रहादिकें** करून संपादिलेल्या) द्रव्यावर मूळीं पुरुषाची सत्ताच होणार नाहीं कारण सत्ता **लोकसिद्ध** नाहीं. अशी पूर्वपक्षाच्या असंभवाची आशंका करून द्रव्यसंपादनाला **प्रतिग्रहादिकें** करून **स्वत्वसाधनता लोकसिद्ध** आहे, असा गुरूनें पूर्वपक्ष सिद्ध केला.

१५ द्रव्यसंपादन यज्ञासाठीं, असें मानिलें असतां त्या संपादित द्रव्यावर सत्ताच नाहीं ह्मणून तशा द्रव्यानें केलेला जो याग तो यागच होणार नाहीं, असा कोणी **प्रलाप** केला आहे. कारण संपादनानें त्या द्रव्यावर सत्ता येत नाहीं असें ह्मणणें विरुद्ध असें गुरु ह्मणतो.

१६ सिद्धांतीही सत्ता **लौकिक** असें मानूनच विचार प्रयोजन सांगितलें आहे. यास्तव नियमाचें उल्लंघन करणें हा पुरुषाचा दोष यागाचा नव्हे. ह्मणजे अर्थ असा . जेव्हां द्रव्य संपादनाचे जे **प्रतिग्रहादिक** उपाय ते यज्ञासाठीं असें मानिलें तेव्हां **प्रतिग्रहादि** नियमें करून संपादिलेल्या द्रव्यानेंच यज्ञ सिद्ध होतो.

# प्रकरण ७

## दायविभाग.
## सत्तेविषयीं.

**प्रतिग्रहादि** नियमाचा अतिक्रम करून संपादिलेल्या द्रव्यानें यज्ञसिद्धि होत नाहीं. म्हणून नियमाचें उल्लंघन केल्याचा दोष पुरुषाकडे नाहीं. असें पूर्वपक्षाचें मत. सिद्धांतीं तर द्रव्यसंपादनाचे **प्रतिग्रहादिक** जे नियम आहेत ते पुरुषार्थासाठीं. म्हणून त्या नियमाचें उल्लंघन करून संपादिलेल्या द्रव्यानें यागसिद्धि होती. नियमाचें उल्लंघन केल्याचा दोष पुरुषाकडे.

असें नियमाचा अतिक्रम करून संपादिलेल्या द्रव्यावरही **स्वत्व** अंगिकारिलें आहे. अन्यथा यागसिद्धि होणार नाहीं. असें मानिल्यानें केवळ चोरी वगैरे अन्यायानें संपादिलेल्या द्रव्यावर सत्ता होईल असें मानूं नये. कारण लौकिकांत तशा द्रव्यावर सत्तेची प्रसिद्धि नाहीं. व व्यवहारासही वैरुध्य येतें.

१७ या प्रमाणें **प्रतिग्रहादिक** उपायांनीं उत्पन्न झालेलें **स्वत्व लोकसिद्ध** असें सिद्ध झालें असतां, ब्राह्मणास **प्रतिग्रहादिक** उपाय, क्षत्रियांस विजयादिक व वैश्यांस शेतकी वाद वगैरे आणि शूद्राला सेवा वगैरे असे जे (द्रव्यसंपादनाविषयीं) नियम सांगितले, ते. **अदृष्टार्थ** जाणावे. सत्ता उत्पन्न होण्याचे विशेष उपाय.

१८ **रिक्थ क्रय इत्यादिक** उपाय तर सर्वांचे सारखेच. ते ७ व्या अंकांत सांगितले आहेत तेथें. सत्ता उत्पन्न होण्याचे सर्वसाधारण उपाय.

**रिक्थ** —— खुला **दाय** (जिंदगी)

**क्रय** —— खरेदी.

**संविभाग** —— अटकावलेला **दाय**.

# प्रकरण ७

## दायविभाग.

## सत्तेविषयीं.

**परिग्रह** —— ज्यावर पूर्वी कोणाची सत्ता नाहीं अशा जल, तृण, काष्ट, **इत्यादिकां**चा स्वीकार करणें.

**अधिगम** —— ठेवा वगैरे सांपडणें.

इतक्या कारणावरून मालक होतो. व हीं निमित्तें समजलीं असतां त्यावरून त्या त्या द्रव्याचा मालक समजला जातो.

ब्राह्मणाला **प्रतिग्रहादिकें** करून जें मिळालें तें अधिक.

क्षत्रियाला विजयादिकेंकरून मिळालेलें अधिक.

वैश्यास शेतकी गुराखीपणा **इत्यादिकें** करून मिळालेलें तें अधिक.

शूद्राला द्विजसेवेपासून **भृति** मिळती ती अधिक.

१९ या प्रमाणें सत्ता उत्पन्न होण्याचीं साधनें **लोकसिद्ध** असतां **अनुलोम** जातीय आणि **प्रतिलोम** जातीय यांस जें विशेष ह्मणजे **सूतांस**[१] **अश्वसारथ्य इत्यादिक** सांगितलें त्या सर्वांचा **भृति** शब्देंकरून संग्रह होतो. कारण तें (अश्वसारथ्य वगैरे) ही **भृति**रूपच होय ह्मणून तें तें अधिक जाणावें.

२० (अनपत्य मरण पावला असतां) "जिंदगीची वारीश पत्नी तिच्या अभावीं कन्या" **इत्यादिक** जी (२६ व्या शाखेच्या १ ल्या अंकाची) मूळ स्मृति, तीही मालकाच्या संबधानें बद्दल वारीश प्राप्तझा

---

१ सूत हा क्षत्रियापासून ब्राह्मणीचे गर्भीं झालेला अतएव प्रतिलोम जातीचा आहे.

# प्रकरण ७

## दायविभाग.

## सत्तेविषयीं.

ले असतां व सत्ता **लोकसिद्ध** असतांहीं (स्वामिसंबंधरूप कारणानें अनेक वारीस असल्यामुळें) व्यामोह न व्हावा एतदर्थ.या प्रमाणें सर्व निर्दोष जाणावें

२१ जेव्हां सत्ता **लोकसिद्ध** मानिली तेव्हां "माझ्या द्रव्याचा यानें अभिलाष केला असें बोलूं नये!" असें ह्मणणेंही अप्रयोजकच. कारण सत्तेचें साधनीभूत जें **दान क्रय इत्यादिक** त्यांच्या संदेहावरून सत्तेविषयींही संदेहाची उपपत्ति होती.

२२ विचार करण्याचें प्रयोजन इतकेंच कीं जर सत्ता **शास्त्रसिद्ध** मानिली तर "ब्राह्मणांनीं निंद्यकर्मानें जें द्रव्य संपादन केलें त्याचा त्याग केल्यानें, जपानें व तपश्चर्येनें ते शुद्ध होतात." अशा वचनावरून **दुष्प्रतिग्रह वाणिज्य इत्यादिकें** करून संपादिलेल्या द्रव्यावर मुळीं संपादकाची सत्ताच नाहीं. ह्मणून त्याच्या पुत्रांस तें विभागयोग्यच होणार नाहीं.

२३ सत्ता **लोकसिद्ध** मानिली ह्मणजे (सदरहू स्मृतीचा अर्थ समर्पक बसतो तो असा) **दुष्प्रतिग्रहादिकें** करून संपादिलेल्याही द्रव्यावर संपादकाची सत्ता आहेच ह्मणून त्याच्या पुत्रांस ते विभागयोग्यच होतें. "त्याचा त्याग केल्यानें, जपानें, तपश्चर्येनें ते शुद्ध होतात." असें जें प्रायश्चित्त (वरच्या स्मृतींत) सांगितलें तें संपादकासच त्याच्या पुत्रांस तर तें **दाय**रूपें करून स्वसत्तात्मक होतें. अतएव त्यांजकडे दोषाचा अगदीं संबंध नाहीं.

मनुही. **दाय[1] लाभ[2] क्रय[3] जय[4] व्याज[5] बट्टा व चाकरी[6]** आणि

# प्रकरण ७

## दायविभाग.

## सत्तेविषयीं.

**संप्रतिग्रह** असे द्रव्यप्राप्तीचे सात **आगम धर्म्य** आहेत.

## शाखा २

१. आतां याचा संशय होतो कीं विभागानें सत्ता उत्पन्न होती. किंवा आपलें असतां त्याचा विभाग होतो.

२. (पूर्वपक्षाचें मत) विभागानें सत्ता उत्पन्न होती हें अयुक्त. कारण पुत्र झाला ह्मणजे पुत्रवानानें **आधान** सिद्ध करावें असें विधान आहे. जर जन्में करून सत्ता उत्पन्न होईल, तर उत्पन्न झालेल्या पुत्राचें ही त्या द्रव्यावर **स्वत्व** समानच आहे. ह्मणून द्रव्यसाध्य जीं **श्रौत** कर्में त्यांविषयीं बापाला अधिकार नाहींसा होईल.

३. तसेंच विभागापूर्वी पित्यानें संतोषानें दिलेल्या द्रव्याचा विभाग नाहीं असा निषेध सांगितला आहे त्याची ही उपपत्ति होणार नाहीं. कारण सर्वांच्या अनुमतीनें दिल्यामुळें विभागाची प्राप्तीचा संभवही नाहीं.

स्मृति. ४ **शौर्यसंपादित, स्त्रीधन** आणि जें **विद्यासंपादित** हीं तीन धनें **अविभाज्य** तसेंच बापानें संतोषानें दिल्हेलें जें. तेंही.

विष्णु. ५ तसेंच नवऱ्यानें संतुष्ट होऊन स्त्रीला दिलें. तें नवरा

# प्रकरण ७

## दायविभाग.

## सत्तेविषयीं.

मरणपावल्यानंतरही तिने यथेछ उपभोगावें. अथवा स्थावरावांचून द्यावें.

असें जें प्रीतिदानाविषयीं वचन आहे त्याची उपपत्ति होणार नाहीं. जर जन्मेंकरून सत्ता उत्पन्न होती असें मानिलें तर.

स्मृति. ६ मणि, मोतीं, पोंवळीं, या सर्वांचा मालक पिता होतो. परंतु सर्व स्थावराचा तर पिता मालक नाहीं. व पितामहहीं नाहीं.

स्मृति. ७ तसेंच पित्याच्या प्रसादानें लब्ध जीं वस्त्रें भूषणें त्यांच्या (पुत्रादिकांनीं) उपभोग करावा. परंतु स्थावर जरी पित्याच्या संतोषानें मिळालें आहे. तरी (यथेछ) उपभोग करूं नये.

८ अशीं जीं स्थावराच्या प्रीतिदानाविषयीं निषेधवचनें आहेत. तीं पितामहसंपादितस्थावराविषयीं. पितामह निवर्तल्यानंतर त्या धनावर (स्थावर जंगमावर) जरी पितापुत्रांची सत्ता समान आहे. तथापि मणि, मोती, वगैरे (जंगम) पित्याचेंच स्थावरावर मात्र पितापुत्रांची सत्ता समान. असें याच (७ व्या अंकाचे) वचनावरून अवगत होतें.

९ तस्मात् जन्मेंकरून **स्वत्व** उत्पन्न होत नाहीं. तर मालक मरण पावल्यानें किंवा विभागानें **स्वत्व** होतें. यास्तव बापाच्या पाठिमागें, विभाग झाल्यापूर्वी द्रव्यावरील सत्ता नष्ट झाल्यामुळें तें धन दुसरा घेत असतां त्याचें निवारण केलें जाणार नाहीं. अशा दूषणाला अवकाशच राहिला नाहीं.

# प्रकरण ७
## दायविभाग.
## सत्तेविषयीं.

१० एकच ज्यास पुत्र आहे असा पिता मरण पावल्यानेंच (जिंदगीवर) पुत्राची सत्ता उत्पन्न होती ह्मणून विभागाची गरज नाहीं.

११ सिद्धांत[1] —— **लोकसिद्ध** च सत्ता असें (१ ल्या शाखेच्या १० व्या अंकांत) सांगितलें. पुत्रादिकाचें जन्मेंकरून **स्वत्व** असें लोकांत विशेष प्रसिद्ध आहे. त्याचा **अपन्हव** करवत नाहीं. व विभाग शब्दही. ज्याला बहूत मालक आहेत असें जें द्रव्य त्याविषयीं लोकांत प्रसिद्ध. दुसऱ्याच्या धनाविषयीं नव्हे. व **अस्वामिक** धनाविषयींही नव्हे.

गौतमही. जन्मेंकरूनच द्रव्याचें स्वामित्व पावतो असें आचार्यांचें मत आहे.

१२ जन्मेंकरून **स्वत्व** उत्पन्न होतें या पक्षींच ६ व्या व ७ व्या अंकाची उपपत्ति होती.

६ व्या व ७ व्या अंकाचीं वचनें पितामहस्थावराविषयींचीं असें ह्मणणेंही नीट नाहीं. कारण "स्थावराचा मालक पिता नाहीं व पितामह ही होत नाहीं" असें त्यावचनांत सांगितलें आहे.

१३ पितामहाचें जरी स्वसंपादित कांहीं असलें तरी तें देण्याविषयीं पुत्र व नातु विद्यमान असतां पितामहास अधिकार नाहीं असें जें वचन तेंही जन्मेंकरूनच **स्वत्व** दाखवितें.

---

१ २ ऱ्या अंकांत विभागानें सत्ता होती अशी पूर्वपक्षाची सिद्धि केली आतां सिद्धांत सांगतो.

# प्रकरण ७

## दायविभाग.

## सत्तेविषयीं.

१४ जसें दुसऱ्यांच्या मतीं मणि, मोतीं, वस्त्रें, भूषणें, **इत्यादिक** जरी पितामहाचीं आहेत, तरी त्यांवर बापाचीच सत्ता असें वचनें करून सिद्ध होतें तसें आमच्या मतीं ही पित्यानें संपादित जीं हीं (मणि, मोतीं, वस्त्रें, भूषणें, इत्यादिक) त्याचें **दान** करण्याविषयीं बापास अधिकार आहे असें वचनें करून सिद्ध होतें. यांत विशेष नाहीं.

१५ ५ व्या अंकांत विष्णुवचनांत जें **प्रीतिदान** जाणविलें तें स्वतां संपादिलेलें स्थावर असलें तरी पुत्रादिकांची अभ्यनुज्ञा पाहिजे. असा त्याचा अर्थ करावा. कारण पूर्वी (६ व्या व ७ व्या अंकांत) सांगितलेल्या वचनावरून स्थावरा खेरीजच द्रव्य, तें **प्रीतिदाना** विषयीं योग्य आहे असें निश्चित झालें.

द्रव्यसाध्य जीं **वैदिक** कर्में त्यांविषयीं पित्याला अधिकार नाहीं. असें जें (२ ऱ्या शाखेच्या २ ऱ्या अंकांत) सांगितलें, तेथें त्या त्या स्थळीं सांगितलेल्या विधानबळानेंच अधिकार अवगत होतो.

१६ तस्मात् पित्याच्या, व पितामहाच्या, द्रव्यावर (पुत्राची) जन्में करूनच सत्ता उत्पन्न होती.

तथापि पित्यानें अवश्य कर्तव्य जीं **वाचनिक धर्मकृत्यें, प्रीतिदान**, व कुटुंब पोषण, संकट परिहार, **इत्यादिका** साठीं स्थावराखेरीज द्रव्याचा विनियोग करण्याविषयीं पित्याला स्वातंत्र्य आहे असें सिद्ध झालें.

१७ स्थावर तर स्वसंपादित किंवा वडिलोपार्जित असलें तरी त्याविषयीं पुत्रादिकानें पारतंत्र्य आहेच.

# प्रकरण ७

## दायविभाग.

## सत्तेविषयीं.

स्मृति. स्थावर व **द्विपद** जरी स्वसंपादित आहे तरी सर्व पुत्रांची अनुमति घेतल्यावांचून त्याचें **दान** होत नाहीं व **विक्रय** होत नाहीं. जे जन्मले व जे जन्मले नाहींत (ह्मणजे पुढें जन्म घेणारे) व जे गर्भांत आहेत तेही उपजीविकेची इच्छा धरून असतात. यास्तव तिचें **दान** व **विक्रय** नाहींत.

यावें बाधक वचन.

स्मृति. १८ आपत्कालीं, कुटुंबासाठीं, विशेषतः धर्मकृत्यासाठीं, एकानें देखील स्थावराचें गहाण, **दान**, **विक्रय** करावे.

अर्थ

**अप्राप्तव्यवहार** व अनुमत देण्याविषयीं असमर्थ असे पुत्र किंवा नातू अथवा भाऊ ही तसेच असून **अविभक्त** आहेत. आणि सकल कुटुंबास व्यापक असा आपत्काल आला असतां नें कुटुंब पोषण व अवश्यकर्तव्य पितृश्राद्धादिक यासाठीं स्थावराचें **दान**, गहाण, **विक्रय** एकानें देखील करावें. परंतु तो समर्थ (प्राप्तव्यवहार) असल्यास.

स्मृति. १९ **सपिंड** विभक्त किंवा **अविभक्त** असोत, स्थावरमाला विषयीं त्यांचा अधिकार एकसारिखाच. ह्मणून (स्थावराचें) **दान**, गहाण, **विक्रय** हें करण्याविषयीं एकटा धनी नाहीं.

असें जें वचन आहे त्याचा हा अर्थ असाच कीं, भाऊ वगैरे **अविभक्त** असतां द्रव्य समाईक असल्यामुळें एकट्यालाच अधिकार नाहीं. ह्मणून एकानें सर्वांची अनुमति अवश्य घेतली पा

# प्रकरण ७

## दाय विभाग.

## सत्तेविषयीं.

हिजे.

विभक्त झाल्यानंतरही विभक्त किंवा **अविभक्त** आहेत असा संशय न होतां व्यवहार सुरळीत व्हावा, एतदर्थ सर्वांची आज्ञा पाहिजे. केवळ एकासच अधिकार नाहीं असें नव्हे. यास्तव विभक्ताची अनुमति घेतल्यावांचूनही व्यवहार सिद्ध होतो.

स्मृति. २० आपले गांवकरी, स्वज्ञात, **सामंत**, **दायाद**, यांची अनुमति व हिरण्य सहित उदक दान, या साहा कारणांनीं भूमि (दान विक्रयादिद्वारा दुसऱ्याच्या सत्तेंत) जाती.

असें जें सांगितलें, त्यांतही गांवाची अनुमति एतदर्थ पाहिजे कीं,

स्मृति. "**प्रतिग्रह** करणें तो प्रसिद्धपणें करावा, त्यांत स्थावर **प्रतिग्रह** तर विशेषें करून प्रसिद्धपणें करावा." असें आहे म्हणून झालेला व्यवहार प्रसिद्धपणे असावा एतदर्थ, केवळ गांवाच्या अनुमतीवांचून व्यवहार सिद्ध होत नाहीं असें नव्हे.

**सामंता**ची अनुमति तर सीमासंबंधी विवाद नव्हावा एतदर्थ, व ज्ञाति **दायाद** यांच्या अनुमतीचें प्रयोजन तर वर सांगितलेंच आहे.

(वरच्या स्मृतींत) "हिरण्य सहित उदकदान" असें जें त्याचाही अर्थ

स्मृति. असा कीं, "स्थावराचा **विक्रय** होत नाहीं, म्हणून (वारीश व गैरेची) अनुमति घेऊन तें गहाण ठेवावें." असा स्थावराचे **विक्रया** विषयीं निषेध सांगितला आहे.

स्मृति. "स्थावराचा **प्रतिग्रह** जो करितो आणि **दान** करितो, ते दोघेही पुण्य करणारे निश्चयें स्वर्गी जाणारे होतात." अशी स्थावराचे

# प्रकरण ७

# दायविभाग.

## सत्तेविषयीं.

**दाना**विषयीं प्रशंसा सांगितल्यावरून स्थावराचा **विक्रय** करणें तरी हिरण्यसहित उदक देऊन **दान**रूपें करून करावा.

२१ पित्यानें संपादित व पितामहसंपादित धनावर जरी (पुत्राची व नातवाची) जन्मतःच सत्ता आहे. तथापि विशेष सांगायाचा तो पुढें (११ व्या शाखेंत) सांगितला आहे.

## शाखा ३

कोणत्या काळीं व कोणी व कसा विभाग करावा हें येथें निरूपण करितो.

१ मूळ.

याज्ञवल्क्य. जर पिता विभाग करील तर इच्छेप्रमाणें पुत्रांस विभाग देवो.

टीका.

१ जेव्हां पिता विभाग करूं इच्छितो तेव्हां त्यानें स्वेच्छेप्रमाणें आपल्यापासून पुत्रांस विभक्त करावें. बापानें आपल्या इच्छेप्रमाणें पुत्रांस विभक्त करावें

पित्याची इच्छा निरंकुश ह्मणून विभागाविषयीं अनियम प्राप्त झाला असतां नियम सांगतो.

---

१ पूर्वी १ ल्या शाखेच्या ५ व्या अंकांत विभाग करण्याचा काळ कोणता व कशाचा विभाग वगैरे त्या त्या ठिकाणीं निरूपण केलें, असें मानून कशाचा विभाग या विषयानें मात्र येथपर्यंत निरूपण केलें. बाकी राहिल्या अंशाचें आतां निरूपण करितो.

# प्रकरण ७

# दायविभाग.

मूळ.

याज्ञवल्क्य. ज्येष्ठाला **श्रेष्ठ** विभाग किंवा सर्वांस सम विभाग करावे.

टीका.

२ ज्येष्ठपुत्रास **श्रेष्ठ** विभाग मध्यमास मध्यम विभाग कनिष्ठाला कनिष्ठ भाग देऊन विभक्त करावें. अथवा सर्वांस समविभागी करावें.

ज्येष्ठाला श्रेष्ठ, मध्यमाला मध्यम, कनिष्ठाला कनिष्ठ विभाग.

**श्रेष्ठादिक** विभागाचे प्रकार

मनु सांगतो.

मनु. ज्येष्ठपुत्राला सर्व समयीक द्रव्यांतून विसावा अंश (शेंकडा ५) **उध्दार** व सर्वद्रव्यांतून जें श्रेष्ठ असेल तें मधल्याला. त्यापेक्षां[1] अर्धे. कनिष्ठाला चतुर्थांश.

हा जो **विषम** विभाग सांगितला तो स्वसंपादित द्रव्याविषयीं. परंपरागत द्रव्यावर तर पितापुत्रांचें **स्वत्व** समानच आहे, असें पुढें (११ व्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगितलें आहे. ह्मणून पित्याच्या इच्छेप्रमाणें **विषम** विभाग सांगितला तो योग्य नाहीं.

हा विषमविभाग स्वसंपादित द्रव्याविषयीं

३ १ ल्या अंकाचें मूळवचनावरून जेव्हां पित्याची विभाग करण्याची इच्छा आहे. तो एक विभागकाळ, व पिता जीवंत असतां

पिता जिवंत असतां विभाग करूं इछितो तो एक विभागकाल.

---

१ त्यापेक्षां अर्धे ह्मणजे चाळिसावा भाग (शेंकडा २॥) व सर्वद्रव्यामध्यें जें मध्यम असेल तें. कनिष्ठाला चतुर्थांश ह्मणजे समयीकद्रव्यांतून ऐंशीवा भाग (शेंकडा १।) व कनिष्ठ द्रव्य असें जाणावें.

# प्रकरण ७

## दायविभाग.

द्र्व्याविषयीं निस्पृह व **निवृत्तरमण** आहे तर व आई **निवृत्तरजस्क** आहे तर पित्याची विभाग करण्याची इच्छा नसली तरी पुत्रांच्या इच्छेनें विभाग होतो.

नारद. आईबाप मरण पावल्यानंतर पुत्रांनीं धन सारिखें वांटून घ्यावें "अशी आईबापांच्या मागें विभाग व्यवस्था दाखवून" आई **निवृत्तरजस्क** असतां बहिणींचीं लग्नें झालीं असतां (पुत्रांनीं विभाग करावा.) आणि पिता **निवृत्तरमण** व द्र्व्याविषयीं निस्पृह झाला असतां पुत्रांनीं विभाग करावा.

येथें ही पुत्रांनी सम विभाग घ्यावें असा संबंध येतो.

गोतमही. बापाच्या मागें पुत्रांनीं **रिक्थ** वांटून घ्यावें "असें सांगून" आई **निवृत्तरजस्क** झाली असतां, "दुसरा विभागकाळ दाखवितो," पिता जीवंत असतां जर विभाग करायास इच्छितो, तर "तो तिसरा विभागकाळ".

४ तसें च जननी **सरजस्क** व पिता इच्छित नाहीं, अथवा अधर्मवर्ती अथवा **महारोगग्रस्त** आहे तर पुत्रांच्या इच्छेनें विभाग होतो.

शंख. पिता **निवृत्तरमण**, **वृद्ध**, अधर्मवर्ती, **महारोगग्रस्त**, झाला असतां (पुत्रांच्या इच्छेनें) जिंदगीचा विभाग होतो.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### शाखा ४

पित्याच्या इच्छेनें विभाग दोन प्रकारचा सांगितला. सम आणि **विषम**. त्यांत सम विभागाविषयीं विशेष सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जर पुत्रांस समविभाग देतो; तर **पत्नी**लाही समविभाग द्यावे. परंतु ज्यांस नवऱ्यानें किंवा सासऱ्यानें **स्त्रीधन** दिल्हें नाहीं त्यांस.

टीका.

१ जर पिता स्वेच्छेनें पुत्रांस सारखे वांटे देतो, तर आपल्या **पत्नीस**ही पुत्रांच्या वांट्या बरोबर सम विभाग द्यावे. परंतु ज्या स्त्रियांस नवऱ्यानें किंवा सासऱ्यानें **स्त्रीधन** दिल्हें नसल. **स्त्रीधन** दिल्हें असल तर अर्धा विभाग द्यावा. असें पुढें ८३ व्या शाखेच्या ८ व्या अंकांत सांगितलें आहे. बायकांसही पुत्रांबरोबर विभाग द्यावे.

२ जर पिता **श्रेष्ठादि** भागेंकरून ज्येष्ठादि पुत्रांस विभाग करून देतो, तर **श्रेष्ठादि** विभाग मिळणार नाहींत केवळ **उद्धार** काढून बाकी राहिलेल्या समायिक द्रव्यांतून समविभागच पावेल. व आपला **उद्धार**ही.

आपस्तंब. घरांतील **परीभांड** व अलंकार हे भार्येचे.

---

१ ह्मणजे ३ व्या शाखेच्या २ अंकांत सांगितल्याप्रमाणें.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### शाखा ५

१ ल्या शाखेच्या २ ल्या अंकांत समविभाग व **विषम** विभाग. असे दोन पक्ष सांगितले त्या उभयपक्षांही बाधक वचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. स्वतां समर्थ सबब पितृद्रव्य इच्छित नाहीं तर त्याला यत्किंचित् तरी देऊन फारखत करून घ्यावी.

टीका.

१ जो (पुत्र किंवा भाऊ) स्वतां द्रव्य संपादनाविषयीं समर्थ असल्यामुळें बापाचें द्रव्य घेऊं इच्छित नाहीं तर त्याला कांहीं न्यूनमूल्य वस्त देऊन फारखत करून घ्यावी. कारण पुढें त्याच्या पुत्रादिकांस वांटा घेण्याची इच्छा नव्हावी. एतदर्थ. बापानें द्रव्य घेऊं इच्छित नाहीं तर किंचित् द्रव्य देऊन फारखत करावी.

१ ल्या शाखेच्या २ अंकांत जो **विषम** विभाग सांगितला, त्यांत **शास्त्रोक्त** जो **उद्धारादि विषम** विभाग. त्या खेरीज ऐच्छिक **विषम** विभागाविषयीं निषेध सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य **विषम** विभागानें विभक्त झालेले जे त्यांचा तो **विषम** विभाग जर **धर्मशास्त्रा** प्रमाणें आहे तर पित्यानें

# प्रकरण ७

# दायविभाग.

केलेला उलटत नाहीं.

टीका.

२ न्यूनाधिक विभागेंकरून विभक्त जे पुत्र त्यांचा तो **विषम** विभाग जर **धर्मशास्त्रा**प्रमाणें आहे तर तो पित्यानें केला तो केलाच, उलटत नाहीं. असें मन्वादिक ऋषींनीं सांगितलें आहे.

बापानें केलेला विभाग धर्मशास्त्राप्रमाणें नसल्यास उलटतो

जर तो **विषम** विभाग **धर्मशास्त्रा**प्रमाणें नाहीं, तर पित्यानें केलेला असला तरी उलटतोच.

नारद. **व्याधित, कुपित,** व ज्याचें अंतःकरण विषयासक्त, आणि शास्त्रविपरीत करणारा, असा पिता विभाग करण्याविषयीं अधिकारी नाहीं.

## शाखा ६

विभाग करण्याविषयीं अणखी कालांतर व **कर्त्रंतर** व प्रकार यांचा नियम सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. आईबाप निवर्तल्यावर पुत्रांनीं जिंदगी व कर्जें हीं समान वांटून घ्यावीं.

टीका.

१ आईबापाच्या मागें "हा विभागकाल दाखविला" पुत्रांनीं "हा अधिकारि नियम दाखविला" त्यांची जिंदगी आणि

आईबापाच्यापाठीमागें जिंदगी व कर्जें हीं समान वांटून घ्यावीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

कर्ज हीं समविभाग वांटून घ्यावीं "हा प्रकार नियम सांगितला."

मनु. २ शंका ——आईच्या व बापाच्या पाठीमागें "असा उपक्रम करून" ज्येष्ठानेंच बापाची सर्व जिंदगी घ्यावी, आणि इतरांनीं बापाच्या आज्ञेंत राहिल्याप्रमाणें भावाच्या आज्ञेंत राहून उपजीवन करावें. "असें सांगून" सर्व समयीक द्रव्यांतून विसावा अंश **उद्धार** व सर्वद्रव्यांत जें श्रेष्ठ असेल तें ज्येष्ठाला, मधल्याला त्यापेक्षां अर्धें, आणि कनिष्ठाला तर चतुर्थांश.

सर्व समयीक द्रव्यांतून विसावा अंश (शेंकडा ५) **उद्धार** व सर्व द्रव्यांत जें श्रेष्ठ असेल तें ज्येष्ठपुत्रास द्यावें. मधल्याला त्यापेक्षां अर्धे ह्मणजे चाळीसावा अंश (शेंकडा २॥) **उद्धार** व मध्यम द्रव्य द्यावें. आणि कनिष्ठाला चतुर्थांश ह्मणजे ऐंशीवा हिसा (शेंकडा १।) **उद्धार** व हीनद्रव्य द्यावें, असा मनूनें आईबाप मरण पावल्यानंतर विभागकरणारे जे (पुत्रादिक) त्यांस **उद्धार** विभाग सांगितला आहे. तसेंच,

मनु. जर (समयीक द्रव्यांतून) **उद्धार** न काढिला तर विभाग योजना अशीकीं, ज्येष्ठपुत्रानें विभागापेक्षां एक अंश अधिक घ्यावा, त्याच्या धाकट्यानें अर्धा अंश अधिक घ्यावा, इतर कनिष्ठांनीं एकेकच हिसा घ्यावा. अशी विभागाची यथाधर्मव्यवस्था जाणावी.

ह्मणजे ज्येष्ठपुत्रास दोन भाग, त्याच्या पाठीमागून झालेल्यास दीड भाग, वरकडांस ऐकेकच भाग. असा आईबापांच्यामागें विभागकरणारांस **उद्धार** विभागावांचूनही **विषम** विभाग मनूनें दाखविला व आईबाप जीवंत असतां तर (३ ऱ्या रेघेच्या १ अंकांत)

# प्रकरण ७

# दायविभाग.

## अर्थ.

स्वतां (याज्ञवल्क्यानें) च दाखविला.

असा **विषम** विभाग सर्वकालिक असतां समानच वांटे करावे. असा नियम कसा केला.

३ समाधान—— हा (वर सांगितलेला) **विषम** विभाग **शास्त्रविहित** खरा तथापि लोकविरुद्ध ह्मणून आचरूं नये. विषमविभाग लोकविरुद्ध ह्मणून आचरूं नये.

स्मृति. धर्म असूनही जो लोकविरुद्ध व स्वर्गप्राप्तीचें साधन नाहीं, तो आचरूं नये.

याज्ञवल्क्य. **श्रोत्रिय** घरीं आला असतां मोटा धुरीण बैल किंवा मोठा बोकड त्याला अर्पण करावा.

असें विधान सांगितलें आहे तथापि लोकविरुद्ध आहे ह्मणून आचरण होत नाहीं.

स्मृति. जसा **नियोग** धर्म व **अनुबंध्या** गाईचा वधही सांप्रत (कलिमध्यें) नाहीं. तसा **उद्धार** विभागही सांप्रत चालत नाहीं.

आपस्तंबही. पिता जीवंत असतां त्यानें पुत्रांस जिंदगी वांटून द्यावी. "असें स्वमत सांगून" ज्येष्ठ पुत्रच जिंदगीचा वारीश असें कोणी ह्मणतात. "असो ज्येष्ठाला सर्वधन घेण्याचा **एकीय** मतानें उपन्यास करून." देशविशेषीं सुवर्ण, काळ्या गाई, **कृष्णभौम**,

---

सुबोधिनी. १ कृष्णभौम ह्मणजे भूमीपासून झालें शेपादिधान्य. किंवा कृष्णायस.

# प्रकरण ७

## दायविभाग.

हीं ज्येष्ठाची, रथ[1] पित्याचा, आणि घरांतील **परीभांड** व अलंकार भार्येचे आणि ज्ञातिधन[2] असा **एकीय** मतानें **उद्धार** विभाग सांगून तो शास्त्रनिषिद्ध आहे असें निराकरण करिता झाला.

तो शास्त्रनिषेध मनु स्वतांच दाखवितो.

मनु. पुत्रांस जिंदगी वांटून द्यावी. असें सामान्यतः श्रुत आहे. तस्मात् **विषम** विभाग जरी **शास्त्रविहित** आहे तथापि लोकविरुद्ध व स्मृतिविरुद्ध ह्मणून आचरूनये. अतएव समच विभाग करावे असें नियमित केलें.

## शाखा ७

आई बापांचें द्रव्य पुत्रांनीं वांटून घ्यावें असें (६ व्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगितलें त्यांत **मातृधना** विषयीं बाधक वचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. कर्ज फिटून राहिलेलें आईचें धन कन्यांनीं घ्यावें.

---

१ रथ पित्याचा येथें कोणी ह्मणतात कीं पित्याचा रथ ह्मणजे पिता जो रथ वापारीत होता. तो ज्येष्ठ पुत्रानें घ्यावा. परंतु वचनाचें तात्पर्य पाहिलें असतां रथ पित्याचा ह्मणजे पित्याचा जो रथ असेल तो त्याच्या उद्देशानें धर्म करावा. असा अर्थ बरा रथशब्दें करून आणखीही जें त्याचें वाहन असेल तें घ्यावें.

---

सुबोधिनी. २ ज्ञातिधन ह्मणजे आईबाप वगैरे यांस जें पिता वगैरेपासून मिळालें असेल. तें ज्येष्ठपुत्र पिता भार्या यांनीं यथांश वांटून घ्यावें.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### टीका.

१ आईनें केलेलें कर्ज फिटून बाकी राहिलेलें आईचें धन कन्यांनीं वांटून घ्यावें. यास्तव कर्ज फिटण्या पुरतेंच किंवा त्यापेक्षांही कमी जर आईचें धन असेल तर पुत्रांनीं वांटून घ्यावें. ह्मणजे असें आईनें केलेलें कर्ज पुत्रांनींच फेडावें, लेकींनीं फेडू नये. कर्ज फिटून राहिलेलें **मातृधन** तर कन्यांनीं घ्यावें. हें योग्यच आहे. आईचें धन लेकींनीं वांटून घ्यावें

स्मृति. पुरुषाचें वीर्य अधिक असल्यास पुत्र होतो. आणि स्त्रीचें शुक्र अधिक झाल्यास कन्या होती.

यास्तव कन्येचे गायीं स्त्रीचे अवयव अधिक आहेत ह्मणून **स्त्रीधन** लेकीकडे जातें. पुत्राचे गायीं पित्याचे अवयव अधिक आहेत ह्मणून बापाचें धन पुत्रांकडे जातें.

याविषयीं गौतम विशेष सांगतो.

गौतम. २ **स्त्रीधन अविवाहित** व निर्धन अशा कन्यांकडे जातें. स्त्रीधन अविवाहित कन्यांनीं घ्यावें.

### याचा अर्थ.

कांहीं कन्या विवाहित व कांहीं **अविवाहित** अशा असल्यास **अविवाहित** कन्यानींच **स्त्रीधन** घ्यावें. सर्व विवाहित झाल्या असल्यास त्यांत ज्या निर्धन असतील त्यांनीं घ्यावें.

# प्रकरण ७

## दायविभाग.

कन्याच्या अभावीं कर्ज फिटून उरले

लें आईचें धन कोणी घ्यावें हें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. कन्यांच्या अभावीं पुत्रादिकांनीं घ्यावें.

टीका.

३ कन्यांच्या अभावीं **मातृधन** पुत्रादिकांनीं घ्यावें हें (६व्या शाखेच्या १ल्या अंकाचे वचनावरून) सिद्धच आहे, तथापि स्पष्ट करून दाखविलें. कन्यांच्याअभावींपुत्र घेतील

## शाखा ८

**अविभाज्य** धन कोणतें हें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. आईबापांच्या द्रव्याचा व्यय न होतां जें कांहीं स्वतां संपादिलें, व तसेंच **मित्रलब्ध** व **विवाहलब्ध** हें वारिशांस मिळणार नाहीं. आणि हरण केलेलें परंपरागत द्रव्य जें संपादिलें जातें तें, व **विद्यालब्ध** धन हीं वारिशांस देऊं नये.

टीका.

१ जें स्वतां संपादिलें तें, व जें मित्रापासून लब्ध झालें तें, व जें **विवाहलब्ध** तें, असें द्रव्य जर आईबापांच्या द्र स्वतांसंपादिलेल्याद्रव्याचाविभागनाहीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

## अविभाज्य धनाविषयीं

त्याचा खर्च न करितां प्राप्त झालें आहे तर तें भावांस मिळणार नाहीं.

२ तसेंच जें परंपरागत द्रव्य (सरकारांत राहिलें अथवा जप्त) दुसऱ्यांनीं हरण केलेलें. पिता **इत्यादिकां**च्या असामर्थ्यामुळें हस्तगत न झालेलें. तें पुत्रांमधून जो कोणी इतर बंधूच्या आज्ञेनें, व आईबापांच्या द्रव्याचा खर्च न करितां हस्तगत करितो. त्यानें त्याचा वांटा वारिशांस देऊं नये. **अर्जका**नेंच तें घ्यावें.

३ वर[1] सांगितल्याप्रमाणें जर **क्षेत्र** संपादिलें आहे. तर **अर्जका**नें त्याचा चतुर्थांश घेऊन बाकी क्षेत्र (अर्जकासुद्धां) सर्वांनीं समविभाग वांटून घ्यावें. हरण केलेलें क्रमागत क्षेत्र हस्तगत करणारानें चतुर्थांश अधिक घ्यावा.

शंख. पूर्वीं नष्ट झालेली अशी परंपरागत भूमि जो कोणी हस्तगत करितो. त्याला चतुर्थांश देऊन (अर्जकासुद्धां) इतरांनीं यथाविभाग ती वांटून घ्यावी.

४ तसेंच आईबापांच्या द्रव्याचा व्यय न होतां वेदाध्यन किंवा **अध्यापन** अथवा वेदार्थाचें व्याख्यान यांकडून संपादिलें. तेंही वारीशांस देऊं नये. **अर्जका**नेंच घ्यावें. विद्यासंपादित धनाचा विभाग नाहीं.

५ अर्थात् पितृमातृ द्रव्याचा व्यय करून प्रत्युपकारानें जें **मित्रलब्ध** व पितृमातृद्रव्य खर्चून जें **आसुरादि**[2] विवाहां आईबापांचें द्रव्य खर्च करून संपादिलेलें द्रव्य सर्व वारसांनीं वांटून घ्यावें

---

१ वर ह्मणजे २ऱ्या अंकांत

---

२ विवाह आठ प्रकारचे आहेत ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस, आणि पैशाच पैकीं आसुरादिक चार विवाह ब्राह्मणा खेरीज इतरजातींत.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### अविभाज्यधनाविषयीं.

न लब्ध. आणि मातृपितृधनाच्या व्ययानें जे **क्रमायात**[१] **तें** **धृत**. तसेंच **विद्यालब्ध**, हीं धनें सर्व भावांनीं व पित्यानें सारि खीं वांटून घ्यावीं.

६ " आईबापाच्या द्रव्याचा व्यय न होतां " (१ला २रा व ३रा ४था या अंकांत) या वाक्याची **अनुवृत्ति** केली आहे ह्मणून च. आईबापाच्या द्रव्याचा खर्च[२] करून जें कांहीं **प्रतिग्रह लब्ध** झालें तेंही वांटून घ्यावें.

७ " पितृद्रव्याचा खर्च न करितां जें कांहीं स्वतां संपादिलें " हें वाक्य जर निराळें मानिलें तर **मित्रलब्ध** **विवाहलब्ध** **इत्यादिक** विशेषेंकरून सांगायास नको. कारण आईबापाचें द्रव्य न खर्चितां जें जें संपादिलें तें **अविभाज्य** येणेंकरूनच **मित्रलब्ध इत्यादिक** धनाचा संग्रह होतो.

८ आईबापाचें द्रव्य खर्चूनही जें मित्रादिकांपासून लब्ध झालें तें **अविभाज्य** असें ह्मटलें असतां **मित्रलब्ध विवाहलब्ध इत्यादिक** वचन सार्थ होतें. खरें. परंतु शिष्टाचारास विरोध येतो. व **विद्याधना**विषयीं नारदवचनासही विरोध येतो.

---

१ ह्मणजे २र्‍या व ३र्‍या अंकांत सांगितलेलें.

---

२ येथें कोणी ह्मणतात कीं मातृपितृद्रव्याचा खर्च न करितां जें कांहीं प्रतिग्रहलब्ध झालें तेंही वांटून घ्यावें. अशीं दोन मतें आहेत परंतु वर लिहिलेला पक्ष बरा दिसतो.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### अविभाज्यधनाविषयीं.

नारद. विद्याध्ययन करणाऱ्या भावांचें कुटंबपोषण जो भाऊ करितो, तो जरी विद्याहीन असला तरी, व कबूलात झाली नसली तरी त्या **विद्याधना**चा विभागी होतो.

तसेंच **अविभाज्य विद्याधनाचें** स्वरूप कात्यायन सांगतो.

कात्यायन. परान्न भोजनें करून जी दुसऱ्यापासून विद्या संपादिली त्या विद्येकडून जें मिळालेलें धन तें **विद्याधन** ह्मटलें आहे.

९ तसेंच "आई बापांच्या धनाचा खर्च नकरितां स्वतां जें कांहीं संपादिलें" हें वाक्य जर निराळें मानिलें तर **प्रतिग्रहलब्ध** धनही **अविभाज्य** आहे तें शिष्टाचारास विरुद्ध होईल.

मनूही हेंच स्पष्टकरून दाखवितो.

मनु. आई बापांच्या द्रव्याचा खर्च न करितां स्वकष्टानें "सेवा युद्धादिकें करून" जें संपादिलें त्याचा विभाग वारीसांस देऊंनये. व **विद्याधना**चाही विभाग देऊंनये.

१० शंका —— मातृपितृधनाच्या व्यया वांचून जें **मित्रलब्ध विवाहलब्ध इत्यादिक** धन तें **अविभाज्य** असें सांगायास नको. त्याविषयीं विभागाची प्रसक्तीच येत नाहीं. कारण जें ज्यानें संपादिलें तें त्याचेंच दुसऱ्याचें होतनाहीं. असें लोकां

# प्रकरण ७

## दायविभाग.

### अविभाज्य धनाविषयीं.

त विशेष प्रसिद्ध आहे. आणि कांहीं एक प्रसक्त झालें असतांच त्याचा निषेध केला जातो.

येथें कोणी अशी प्राप्ति सांगतो.

स्मृति. ११ पिता मरण पावला असतां जें कांहीं द्रव्य ज्येष्ठपुत्र मिळवितो त्यांत त्याच्या कनिष्ठ बंधूंचा विभाग आहे परंतु ते (कनिष्ठ बंधू) जर विद्यासंपादन करीत आहेत तर.

अर्थ.

ज्येष्ठ, मध्यम, किंवा कनिष्ठ, आणि पिता मरण पावला असतां किंवा जीवंत असतां कनिष्ठ बंधूचा अगर वडील बंधूचा विभाग. याप्रमाणें स्मृतीचा अर्थ करून पिता विद्यमान असो किंवा नसो **मित्रलब्ध इत्यादिक** धनाचा विभाग प्राप्त झाला. अतएव त्याचा निषेध केला.

१२ समाधान —— वर केलेली शंकाच सयुक्त नाहीं कारण "वारिशांस देऊं नये" असा येथें (१ल्या अंकाचे वचनांत) निषेध सांगितला तो विभाग प्राप्त झाल्यावरून त्या विभागाचा निषेध सांगितला असें नव्हे. केवळ **लोकसिद्धा**चा हा **अनुवाद** केला. कारण या प्रकरणीं जीं वचनें आहेत. तीं प्रायः लोकरूढीचीच **अनुवादक** आहेत.

अथवा (समाधानाविषयीं दुसरा कल्प)

स्मृति. १२ **अविभक्तां**नीं जें संपादिलें त्याविषयीं सर्व समभागी होतात.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### अविभाज्यधनाविषयीं.

अशा प्रकारें विभागप्राप्ती विषयीं प्रसक्त झालेल्या स्मृतीचें हें (१ल्या अंकाचें मूळवचन) बाधकवचन असें जाणून तुह्मी संतुष्ट व्हावें.

१४ यास्तव ११ व्या अंकांतल्या स्मृतींतील ज्येष्ठादि पदें* **अविविक्षितस्वार्थपर** मानून बंधूंची विभाग प्राप्ति आहे असें समजणें हा व्यामोह मात्र. यास्तव **मित्रलब्ध** व **विवाहलब्ध इत्यादि** (१ल्या अंकांतील) वचनें करून उक्त जें पिता जीवंत असतां किंवा मेल्यावर धनाविषयीं **अविभाज्यत्व**, त्याची ही (११ व्या अंकाची) स्मृति **अपवादक** अशी व्याख्या करावी.

## शाखा ९

### नशींच अणखी अविभाज्य द्रव्यें मनु सांगतो.

मनु. वस्त्र, वाहन, अलंकार, **कृतान्न**, उदक, स्त्रिया, **योगक्षेम**, **प्रचार** हीं **अविभाज्य** ह्मटलीं आहेत.

अर्थ.

१ वापरलेलीं मात्र वस्त्रें **अविभाज्य**. कारण जें ज्यानें जें ज्यानें वापरलें तें त्याचें त्याचा विभाग नाहीं.

---

* ज्येष्ठादिपदें अविविक्षित स्वार्थपर ह्मणजे ज्येष्ठपद बोध्य जो आपला अर्थ तत्परत्व ज्येष्ठादिपदांस न मानितां केवळ मध्यम कनिष्ठया अर्थाचीं हीं उपलक्षक होतात. याप्रमाणेंच कनिष्ठादिपदें जाणावीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### अविभाज्य धनाविषयीं.

वापरलें तें त्याचेंच दुसऱ्याचें नव्हे. पित्यानें वापरलेली तर पिता मरण पावल्यावर विभाग करणाऱ्या पुत्रादिकांनीं श्राद्धीं उपविष्ट ब्राह्मणास द्यावीं.

बृहस्पति. वस्त्र, अलंकार, शय्या, वाहन **इत्यादिक** असेल तें, पिता मरण पावल्यानंतर गंधपुष्पादिकें करून पुजून श्राद्धीं उपविष्ट ब्राह्मणांस अर्पावें.

जीं नवीं (कोणी वापरलेलीं नव्हत अशीं) आहेत तीं तर **विभाज्य**च होतात.

२ वाहन — घोडा पालखी वगैरे जें ज्याचें बसायाचें असेल तें त्याचेंच (त्याचा विभाग नाहीं) पित्याचें असल्यास त्याचा वर सांगितल्या वस्त्राप्रमाणेंच विनियोग करावा. वाहन वगैरे जें ज्याचें बसायाचें तें त्याचेंच विभाग नाहीं

घोडे वगैरे बहुत आहेत आणि त्यांचे धनी त्या घोडे वगैरेच्या विकरीवर उपजीवन करणारे आहेत, तर त्या अश्वादिकांचे ही विभाग होतात.

जर अश्वादिक **विषम*** आहेत तर ते **अविभाज्य** ह्मणून ज्येष्ठा

---

सुबोधिनी. * विषम ह्मणजे तीन, पांच, सात, असा विषम संख्या वाचक विषम शब्द नव्हे. येथें विषम ह्मणजे जितके वांटे केले पाहिजेत तितक्यांस अपर्याप्त किंवा त्यापेक्षां यत्किंचित् अधिक जी संख्या तद्ग्राह्य विषमशब्द. ह्मणजे असें, तीन अश्व किंवा बकऱ्या तीन आहेत आणि पुत्र तीन आहेत तर विभाग बरोबरच होतील. अश्व विषम संख्याक आहेत ह्मणून अविभाज्य असें नव्हे. परंतु अश्व चार आणि पुत्र तीन किंवा पांच आहेत तर बरोबर विभाग घडत नाहीं यास्तव ज्येष्ठास द्यावे असें सांगितल्यावरून विभागापुरते अश्वादिकांचा विभाग करून उर्वरित अश्वादिक ज्येष्ठास द्यावें असा विषम शब्दाचा अर्थ जाणावा.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### अविभाज्यधनाविषयीं.

नेंच घ्यावे.

मनु. शेळ्या बकऱ्या आणि **एकशफ** हीं जर **विषम** आहेत तर वांटे करूंनयेत शेळ्या बकरीं **एकशफ** ज्येष्ठानेंच घ्यावीं.

३ अलंकार हा जो ज्यानें धारण केला आहे. तो त्याचाच. धारण न केलेला असा समायीक असल्यास तो वांटून घ्यावा — दागीना जो ज्यानें धारण केला तो त्याचा.

स्मृति. पति जीवंत असतां स्त्रियांनीं※ जो दागीना वापरला असेल तो वारीशांनीं वांटून घेऊंनये वांटून घेतील तर ते अधोगतीस जातात.

अर्थात् जे धारण केलेले नसतील ते विभागयोग्य होतात असें सिद्ध जालें.

४ **कृतान्न** —— तांदळाचे मोदक **इत्यादिक** शिजविलेलें जें अन्न. तेंही **अविभाज्य** त्याचा उपभोग यथा संभव करावा. — शिजलेल्या अन्नाचा विभाग नाहीं.

५ उदक **वापी कूप इत्यादिक** तीं जर **विषम** आहेत तर त्याचें मोल ठरवून ही तद्वारा विभाग करूंनये. त्याचा पाळीपाळीनें उपभोग करावा. — उदकाचा विभाग नाहीं.

६ स्त्रिया —— दासी. त्याही **विषम** असल्यास मोल ठरवून द्रव्य द्वारा वांटूं नयेत. पाळीपाळीनें त्यांच्या हातून काम घ्यावें पित्याच्या ठेवणाईत **स्वैरिणी** वगैरे. ह्या जरी सम (विभागपर्याप्त) असल्या तरी पुत्रांनीं विभागूं नयेत. — दासींचा विभाग नाहीं.

---

सुबोधिनी. ※ स्त्रिया शब्द उपलक्षण मात्र सांगितल्यावरून जो ज्यानें धारण केला असेल तो त्याचाच असें वर सांगितलें त्याला विरोध येत नाहीं तसाच पति शब्दही पुत्रादिकांचा उपलक्षक जाणावा.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### अविभाज्यधनाविषयीं.

गौतम. उपभोगार्थं नियमित अशा स्त्रियांचा विभाग नाहीं.

७ **योग** — अलब्ध लाभाचें साधनीभूत जें **श्रौत स्मार्त** अग्निसाध्य यज्ञादिक कर्म तें.

**क्षेम** — लब्ध झालें त्याचे संरक्षणाचें कारणीभूत जें तडाग बाग **इत्यादिक पूर्त** कर्म तें.

हीं दोन्हीं पित्याचीं द्रव्य खर्चून जरी संपादिलेलीं आहेत तरी यांचा विभाग होत नाहीं.

लोगाक्षी ही. **क्षेम** ह्मणजे **पूर्त** आणि **योग** ह्मणजे यज्ञादिक, हीं विभागिलीं जात नाहींत. तसेंच शयन आसन (बैठक) हींही विभागिलीं जात नाहींत.

८ कोणी असें ह्मणतात कीं, **योगक्षेम** शब्दें करून **योगक्षेम** करणारा **राजा** प्रधान पुरोहित **इत्यादिक** घ्यावे.

दुसरे ह्मणतात कीं, **योगक्षेम** ह्मणजे शस्त्र, चामर, छत्र, चर्मीजोडा **इत्यादिक**.

९ **प्रचार** — गृहादिकांत जाण्यायेण्याचा मार्ग, तोही **अविभाज्य**.

उशना. १० **याजना**पासून जें लब्ध तें व **क्षेत्र** व वाहन व केलेलें अन्न **वापी कूपा**दिक आणि स्त्रिया (पित्यानें राखलेल्या स्वैरिणी) त्यांचे सगोत्रांचीं सहस्र कुलें होईपर्यंत ही वांटे होऊं शकत नाहींत.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### अविभाज्यधनाविषयीं.

असा जो उशनानें **क्षेत्रा**विषयीं विभागाचा निषेध सांगितला तो ब्राह्मणापासून विवाहित क्षत्रियादिक स्त्रीचे गर्भी उत्पन्न जो पुत्र तद्विभागविषयीं जाणावा.

स्मृति. **प्रतिग्रह**प्राप्त भूमीचा विभाग क्षत्रियादि पुत्रांस देऊं नये. जर कदाचित् त्यांचा पिता देईल तर पिता निवर्तल्यानंतर ब्राह्मणीपुत्रानें तो घ्यावा.

पित्याच्या प्रसन्नतेकडून लब्ध झालेलें द्रव्य **अविभाज्य** असें पुढें सांगितलें आहे.

नियमाचें उल्लंघन करून संपादिलेलें द्रव्य, विभाग योग्य नाहीं याचा निरास पूर्वींच (१ल्या शाखेच्या २२ व्या अंकांत) केला आहे.

११ पितृद्रव्याचा व्यय करून जें संपादिलें तें वांटून घ्यावें. असें सिद्ध झालें, परंतु त्यांत **अर्जका**नें दोन भाग घ्यावे. पितृद्रव्याचा व्यय करून जें संपादिलें त्यांत अर्जकानें दोन अंश घ्यावे.

वसिष्ठ. भावामध्यें जो कोणी कांहीं संपादन करितो त्यानें दोन भाग घ्यावे. याचें बाधक वचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. समाधिक द्रव्य वाढविलें असतांही समच विभाग सांगितला आहे.

टीका.

१२ **अविभक्त** बंधूंतून कोणी एकानें जरी समाधिक द्रव्य शेतकी सावकारा वगैरे करून वाढविलें तरी विभाग समानच,

# प्रकरण ७

## दायविभाग.

## अविभाज्यधनाविषयीं.

अर्जकास भागद्वय नाहीं.

### शाखा १०

पितृद्रव्याविषयीं पुत्रांनीं कसा विभाग घ्यावा, तो प्रकार सांगितला. आतां पितामहद्रव्याचा नातवांनीं कोणत्या रीतीनें विभाग घ्यावा याविषयीं विशेष सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. नातवास आपापल्या पित्याच्या द्वारें विभाग.

टीका.

१ जरी पितामह द्रव्यावर पित्या सारिखें नातवाचें ही जन्मतःच स्वत्व आहे, तथापि त्यांस (नातवांस) बापाच्या द्वारेंच पितामह द्रव्याचा विभाग, स्वतः नाहीं. ह्मणजे असें जर अविभक्त बंधू पुत्रवंत होऊन निवर्तले त्यांत एकाला दोन दुसऱ्याला तीन अन्याला चार असे पुत्र आहेत तर एकाच्या दोन पुत्रांस एकच पित्रंश वांटून घ्यावा, दुसऱ्याच्या तिघां पुत्रांनीं ही एकच आपल्या बापाचा अंश वांटून घ्यावा. आजोबाचें धन नातवानीं वांटून घेण्याचा प्रकार.

२ नसेंच कांहीं बंधू जीवंत आहेत आणि कांहीं पुत्रवंत होऊन

# प्रकरण ७

## दायविभाग.

मरण पावले आहेत तेथेंही अशीच व्यवस्था कीं जीवंत आहेत ते आपापले अंश पावतात. आणि मेलेल्यांचे पुत्र ही आपापल्या पित्याचा जो विभाग असेल तितकाच घेण्याविषयीं अधिकारी होतात. अशी वचनसिद्ध व्यवस्था जाणावी.

## शाखा ११

पिता विभक्त किंवा बंधुहीन आहे तर नातवाला पितामह द्रव्याचा विभाग नाहीं. कारण पिता निवर्तला असतां "बापाच्या द्वारें विभाग" असे (१० व्या शाखेंत) सांगितलेंच आहे. अथवा विभाग असो पण पितृसंपादित द्रव्याप्रमाणें पित्याच्या इच्छेनेंच विभाग असावा अशी शंका घेऊन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. भूमि **निबंध** व द्रव्य जें पितामह संपादित आहे त्यावर पुत्राचें व नातवाचें ही स्वामित्व समानच.

टीका

१ जमीन-साळीचें शेत वगैरे, **निबंध** ह्मणजे एकापानभाऱ्यास इतकी पानें, किंवा एका सुपारीचे ओझ्यास इतक्या सुपाऱ्या, इत्यादिक, अजाच्या जिंदगीवर पुत्र व नातु यांची सत्ता समान.

# प्रकरण ७

## दायविभाग.

द्रव्य सोने रुपें वगैरे जें पितामहानें प्रतिग्रह, विजय, इत्यादिकें[1] करून संपादित आहे त्यावर पुत्राची सत्ता लोकप्रसिद्धच आहे ह्मणून नातवाचा विभाग आहेच आणि उभयतांचें (पितापुत्रांचें) स्वत्व समान आहे ह्मणून विभागाविषयीं पित्याचीच इच्छा नियामक नाहीं व पित्यास दोन विभाग असेंही नाहीं.

यास्तव "बापाच्या द्वारें विभाग" असें जें (१० व्या शाखेंत) सांगितलें तें जरी पितापुत्राचें स्वत्व समान आहे तरी वाचनिक जाणावें.

२ ३ऱ्या शाखेच्या २ऱ्या अंकांत सांगितलेला विभाग प्रकार पित्यानें संपादिलेल्या द्रव्याविषयीं जाणावा. पित्याचे स्वसंपादित द्रव्याचा विभाग

स्मृति. आपल्यापासून पुत्रांस विभाग देणाऱ्या पित्यानें स्वतां दोन अंश घ्यावे.

असें जें वचन तें ही पित्याच्या स्वसंपादित द्रव्याविषयींच

स्मृति. तसेंच आईबाप जीवंत असतां पुत्र जरी वयातीत झाला तरी अस्वतंत्र.

असा जो पराधीनपणा सांगितला तोही आईबापांनीं संपादिलेल्या द्रव्याविषयींच.

स्मृति. तसेंच आईबाप जीवंत असतां पुत्र वांटे करण्याविषयीं समर्थ नाहींत अशी जी स्मृति. तीही (आईबापानीं संपादिलेल्याविषयीं.) पुत्राच्याइच्छेनें विभागकरण्याचाप्रकार.

---

१ इत्यादिक ह्मणजे वाटी, दिढी, सावकारा, सेवालब्ध वगैरे.

# प्रकरण ७

## दायविभाग.

३ एवंच माता सरजस्क व पिता सस्पृह आणि विभाग करायास न इछिणाराही. असा असतां पुत्रांच्या इच्छेनें पितामह द्रव्याचा विभाग होतो.

४ तसेंच पिता अविभक्त असतां पितामह, द्रव्य कोणास देईल किंवा विकूं लागेल तर त्याचा निषेध करण्याविषयींही नातवास अधिकार आहे. पित्यानें स्वतां संपादिलेल्या विषयीं तर पुत्राला निषेध करण्याविषयीं अधिकार नाहीं. पण त्याच्या पराधीनतेंमुळें अनुमति केली पाहिजे. ह्मणजे असें पित्यानें संपादिलेल्या व अजानें संपादिलेल्या द्रव्यावर जरी नातवाचें जन्मतःच स्वत्व आहे तथापि पितृसंपादित द्रव्य पित्याच्या स्वाधीन, व पित्यानें संपादन केल्यामुळें पित्यास प्राधान्यही आहे. सबब पित्याला स्वार्जित द्रव्याचा विनियोग करण्याविषयीं पुत्रानें अनुमति करावी.

५ पितामहानें संपादिलेल्या द्रव्यावर दोघांचें (पुत्राचें नातवांचे) स्वत्व समानच आहे ह्मणून (पिता यथेष्ट विनियोग करूं लागल्यास) पुत्राला निषेध करण्याविषयींही अधिकार आहे. इतका विशेष.

मनुही. पितामहानें संपादिलेल्या द्रव्याचें कोणी हरण केलें आणि पितामहाकडून हस्तगत न झालेलें जर पिता हस्तगत करिता, तर तें पित्यानें स्वतां संपादिलें द्रव्य त्याचें विभाग करूं इच्छित नाहीं तर पुत्रांबरोबर वांटे होऊं सकणार नाहींत.

असें सांगण्यानें पितामहानें संपादिलेल्या द्रव्याविषयीं जरी बाप

# प्रकरण ७

## दायविभाग.

विभाग करूं इच्छित नाहीं तरी त्याचे पुत्राच्या इच्छेनेंच त्या पुत्राबरोबर वांटे करावे असें दाखवितो.

### शाखा १२

विभाग झाल्यानंतर उत्पन्न झालेल्या पुत्रास विभाग कसा द्यावा हें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. विभक्त झाल्यानंतर **सवर्ण** भार्येचागर्यी झालेला पुत्र विभागाचा अधिकारी होतो.

टीका.

१ पुत्र विभक्त झाल्यानंतर सजातीय भार्येचें गर्यी उत्पन्न झालेला पुत्र माता पिता निवर्तल्यानंतर त्यांच्या द्रव्याचा विभागी होतो. परंतु आईचा अंश जर कन्या नसेल तर मिळेल. कारण "कर्ज फिटून राहिलेलें आईचें धन कन्यांनीं घ्यावें" असें (७व्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितलें आहे. विभागानंतर झालेला पुत्र आईबापांचें द्रव्य घेतो.

२ **असवर्ण**[1] भार्येचे गर्यी झालेला पुत्र, पितृधनांतून यथाविभाग आपला मात्र अंश पावतो आणि आईचा अंश तर (कन्या नसल्यास) सर्वही पावतो. असवर्णभार्येचा पुत्र तर आपल्या जननीचें सर्व द्रव्य घेतो.

---

१ असवर्ण ह्मणजे ज्याजातीचा नवरा तद्भिन्न अनुलोम जातीची स्त्री.

# प्रकरण ७

## दायविभाग.

मनुही हेंच सांगतो.

मनु. विभागानंतर झालेला पुत्र आई बापांचेंच मात्र धन घेण्याविषयीं अधिकारी होतो.

स्मृति. विभाग होण्यापूर्वीचा पुत्र विभाग झाल्यानंतर आई बापांच्या अंशाचा मालक होत नाहीं आणि विभागानंतर झालेला पुत्रही पहिल्या भावांच्या अंशाचा मालक होत नाहीं.

३ तसेंच विभाग झाल्यानंतर बापानें जे कांहीं संपादिलें असेल तें सर्व, **विभक्तज** पुत्राचेंच. विभागानंतर बापानें संपादिलेलें तें सर्व विभक्तज पुत्राचें.

स्मृति. पुत्रांबरोबर विभक्त झालेल्या पित्यानें जे कांहीं स्वतां संपादिलें असेल तें सर्व **विभक्तजाचेंच** विभागापूर्वीच्या पुत्रांचा त्या धनावर वारसा नाहीं. जे विभक्त होऊन पुनः पित्याशीं **संसृष्ट** झाले, त्यांबरोबर **विभक्तजानें** पिता निवर्तल्यानंतर फारिखत करावी.

मनूचें मतही सदरहू प्रमाणेंच आहे.

## शाखा १३

पिता निवर्तला व पुत्रही विभक्त झाले
नंतर उत्पन्न झालेल्या पुत्रास कसा वि
भाग मिळावा हें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. वांटून घेतलेल्या द्रव्याचा आय व्यय तपासून जी बाकी आहे त्यांतून त्याला विभाग द्यावा.

# प्रकरण ७

## दायविभाग.

टीका.

पितानिवर्तल्यावर विभक्तजपुत्राचा विभाग.

१ पिता निवर्तल्यानंतर वांटे करते वेळेस जर आई गरोदर आहे. असें भावांस समजण्यांत नयेतां विभाग झाले. नंतर पुत्र उत्पन्न झाला, तर भावांनीं जो आपापला वांटा घेतला असेल त्याचा आदा ह्मणजे दररोज दरमहिना किंवा दरसाल जें उत्पन्न होतें तें व खर्च ह्मणजे पित्यानें केलेलें ऋण फेडणें वगैरे, त पास करून त्याला वांटा द्यावा. तो प्रकार असा. आपापल्या भागांत जें उत्पन्न (व्याज वगैरे) झालें असेल तें मिळवून व पित्या चें ऋण फेडून बाकी राहिलेल्या आपापल्या भागांतून कांहीं कांहीं काढून सभाग समवांटा करून **विभक्तजास** द्यावा.

विभक्तजपुतण्याचा विभाग

२ हाच प्रकार अनपत्य भाऊ मरण पावला असतां विभा गकाळीं बायको गरोदर आहे असें समजण्यांत न आलें आणि विभाग झाल्यानंतर पुत्र झाला तर त्याविषयीं ही जाणावा.

जर (भावजय किंवा आई) गरोदर आहे असें विभागका ळीं समजण्यांत आलें तर प्रसूत होईपर्यंत प्रतीक्षा करून नंतर विभाग करावा

वसिष्ठ बचन ही वर सांगितल्या प्रमाणेंच आहे.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### शाखा १४

पित्याचें व आईचें सर्वधन घेण्यास **विभक्तज** अधिकारी असें (१२व्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितलें, परंतु जर विभक्त पिता किंवा माता विभक्तपुत्रास ममतेनें अलंकारादिक देतात तर तेथें **विभक्तजानें** हरकत करूंनये व दिल्हेलें परत घेऊंनये याविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. आईबापांनीं जें ज्याला दिल्हें असेल तें त्याचेंच सत्तात्मक होतें.

टीका.

१ विभक्त झालेल्या आईबापांनीं पूर्वी विभक्त झालेल्या ज्या पुत्रास दिलेलें जें अलंकारादिक असेल तें त्याचेंच त्यावर **विभक्तजाची** सत्ता नाहीं.

वडिलांनी विभक्तपुत्रास दिलेल्यावर विभक्तज्याचा वारसा नाहीं.

या न्यायेंकरूनच विभागापूर्वीही जें ज्याला दिल्हें असेल तें त्याचेंच तसेंच **विभक्तज** पुत्र नसला तरी विभक्त आईबापांपासून पुत्रादिकांस जें मिळालें असेल तें आईबाप निवर्तल्यावर त्यांची जिंदगी वांटून घेणाऱ्या भावांमध्यें जें ज्याला दिल्हें असेल तें त्याचेंच इतरांची त्यावर सत्ता नाहीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### शाखा १५

पिता जीवंत असतां विभागकाळीं आपल्या पत्नीसही पुत्रांबरोबर समविभाग द्यावा असें (४थ्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितलें. आतां पिता निवर्तल्यावर विभागसमयीं जननीलाही स्वपुत्रांबरोबरोबर समविभाग घेण्याचा अधिकार आहे हें प्रदर्शित करावयासाठीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. पिता निवर्तल्यावर वांटे करणारांनी जननी ही समविभाग पावेल.

टीका.

१ पिता निवर्तल्यानंतर विभागसमयीं जननी ही पुत्रांसमान वांटा घेण्यास अधिकारी आहे, परंतु जर **स्त्रीधन** दिल्हें नसेल तर, मिळालें असल्यास अर्धा वांटा मिळेल असें पुढें (३३व्या शाखेच्या ८ अंकांत) सांगितलें आहे. पितानिवर्तल्यावर आईला पुत्रांशीं समविभाग.

पिता मरण पावल्यावर जर बंधू **असंस्कृत** आहेत तर त्यांच्या संस्काराविषयीं कोण अधिकारी हें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. **पूर्वसंस्कृत** बंधूंनीं **असंस्कृत** बंधूंचे संस्कार करावे.

# प्रकरण ७

## दायविभाग.

टीका.

१ पिता निवर्तल्यावर विभाग करणाऱ्या **संस्कृत** बंधूंनी **असंस्कृत** बंधूंचे संस्कार सामयीक द्रव्यानें करावे. असंस्कृत बंधूंचे संस्कार संस्कृत बंधूंनीं करावे.

**असंस्कृत** भगिनीविषयीं विशेष सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. आणि त्यांनीं बहिणीचे संस्कार आपापल्या अंशांतून चतुर्थांश देऊन करावे.

टीका.

२ भावांनीं आपापल्या अंशांतून चतुर्थांश देऊन आपापल्या **असंस्कृत** भगिनीचे संस्कार (विवाहादिक) करावे असें सांगितल्यावरून कन्या देखील पित्याच्या पाठीमागें विभागाच्या अधिकारी होतात असें प्राप्त झालें. अविवाहित बहिणीचे विवाह भावांनीं करावे.

४ "आपापल्या अंशांतून" ह्मणजे प्रत्येक जातीच्या भावानें स्वांशांतून चतुर्थांश द्यावा. असा अर्थ नाहीं तज्जातीची ती कन्या तज्जातीय पुत्राच्या विभागाच्या चतुर्थांशाची विभागी होती.

ह्मणजे असें, जर ब्राह्मणी कन्या आहे तर ब्राह्मणीपुत्राचा जितका विभाग आहे. त्यांतील चतुर्थांश तिचा होतो तो असा. जर कोणी एकाची ब्राह्मणी **पत्नी** आहे व पुत्र एक, आणि कन्याही एक आहे, तर सर्व द्रव्याचे २ विभाग करून त्यांतील एका भागाचा चतुर्थांश कन्येला देऊन बाकी (१ भाग आणि ३/४ तीन चतुर्थांश) पुत्रानें घ्यावें. बहिणी चौथा हिसा विभागाच्या अधिकारी.

५ जर दोन पुत्र आणि एक कन्या आहे तर सगळ्या पितृधना

# प्रकरण ७

## दायविभाग.

चे ३ विभाग करून त्यांतील एका विभागाचा चतुर्थांश कन्येला देऊन बाकी (२ विभाग आणि ३/४ तीन चतुर्थांश) दोघांनीं वांटून घ्यावे.

६ जर एक पुत्र आणि दोन कन्या आहेत तर पितृधनाचे ३ वांटे करून त्यांतील एका वांट्याचे ४ हिसे करून २ हिसे दोघी कन्यांस देऊन बाकी (२ भाग आणि ३/४ दोन चतुर्थांश) पुत्रानें घ्यावे. या प्रमाणें समानजातीय व विषम भाऊ बहिणी यांविषयींही यो जावें.

७ जर एक ब्राह्मणीपुत्र व क्षत्रियाकन्या एक आहे तर पितृद्र्व्याचे ७ विभाग करून क्षत्रियापुत्राचे जे ३ विभाग त्याचे पुनः ४ अंश करून चतुर्थांश क्षत्रियाकन्येला देऊन बाकी (४ विभाग व तीन विभागांचें ३/४ तीन चतुर्थांश) ब्राह्मणीपुत्रानें घ्यावे.

८ जर ब्राह्मणीपुत्र दोन व क्षत्रियाकन्या एक आहे तर पितृद्रव्याचे ११ विभाग करून त्यांतील क्षत्रियापुत्राचे जे ३ विभाग त्यांचा चतुर्थांश क्षत्रियाकन्येला देऊन बाकी (८ विभाग व तीन विभागाचे ३/४ तीन चतुर्थांश) दोघां ब्राह्मणीपुत्रांनीं विभागून घ्यावे

या प्रमाणें जातीचें वैषम्य असतां व भाऊ बहिणींच्या संख्येचा सम विषम भाव असतां सर्वत्र योजना करावी.

९ आपापल्या अंशांतून चतुर्थांश देऊन" असें (३ ऱ्या अंकाचे मूळवचनांत) सांगितलें तेथें ४ थ्या अंशाची विवक्षा नधरितां केवळ संस्कारापुरतें द्रव्य द्यावें, असा अर्थ करणें संयुक्त नव्हे. कारण (खालीं सांगितलेल्या) मनुवचनास विरोध येतो.

# प्रकरण ७

## दायविभाग.

मनु. भावांनीं आपापल्या अंशांतून कन्यांस पार्थक्येंकरून अंश द्यावा. आपल्या अंशांतून चतुर्थांश न देणारे पतित होतात.

याचा अर्थ.

ब्राह्मणादिक जातीचे भावांनीं ब्राह्मणी **इत्यादिक** आपापले जातीच्या भगिनीस आपापले जातीस विहित जे अंश ह्मणजे "४ भाग ब्राह्मणीपुत्रानें ३ क्षत्रियापुत्रानें घ्यावे" असें पुढें (१६ व्या शाखेंत) सांगितलेले. त्या आपापल्या भागांतून चोथा चोथा भाग द्यावा परंतु सामान्यत: आपापल्या भागांतून काढून चतुर्थांश द्यावा असें सांगत नाहीं. तर आपापल्या जातीस विहित जो एक स्वांश (ह्मणजे ब्राह्मणाला ४, क्षत्रियाला ३ वैश्याला २, शूद्रास १ अंश) त्यांतून प्रत्येक कन्येला एक एक चतुर्थांश द्यावा. अशी जातिवैषम्यें करून व संख्येच्या सम विषम भावें करून विभागक्लृप्ति वर सांगितलीच आहे.

"न देणारे पतित होतात" असा अकरणी दोष सांगितल्यावरून अवश्य विभाग दिल्हाच पाहिजे असें अवगत होतें.

येथें (मनुवचनांत) ही चतुर्थ भाग, देण्याची विवक्षा नको संस्कार (विवाहा) पुरतें द्रव्य दानच विवक्षित. असें ह्मणूं नये. कारण दोहों (याज्ञवल्क्यमनु) स्मृतींत ही चतुर्थांश दानाच्या अविवक्षेविषयीं प्रमाण नाहीं. आणि चतुर्थांश न देण्याविषयीं दोष ही सांगितला आहे.

चतुर्थांश दानाची अपेक्षा धरली तर **बहुभ्रातृक** बहिणी सधन होतील व **बहुभगिनीक** भाऊ निर्धन होईल. असें जें कोणी ह्मणतात त्याचाही वर सांगितल्या रीतीनें परिहार झालाच.

येथें आपल्या भागांतून चतुर्थांश द्यावा. असें सांगत नाहीं. कारण

# प्रकरण ७

## दायविभाग.

असें सांगितल्यानें तसें (बहु भ्रातृक जी बहीण ती सधन आणि बहु भगिनीक भाऊ निर्धन) होईल.

यास्तव आमचे सहाय जे मेधातिथिप्रभृति ग्रंथकर्ते यांनीं केलेला च अर्थ चतुरस्त्र आहे, भारुचीचा अर्थ सयुक्त नाहीं.

१० तस्मात् पित्याच्या मागें कन्या देखील अंशाची विभागी होती. पूर्वी (पिता जीवंत असतानां) तर जें कांहीं पिता देतो तितकेंच मिळेल. विभाग मिळण्याविषयीं विशेष वचन नाहीं. या प्रकारें सर्व निर्दोष जाणावें.

## शाखा १६

याप्रमाणें ३ र्‍या (व ६ व्या) शाखेंत समान जातीय बंधूंनीं परस्पर व पित्याबरोबर विभाग करण्याची रीति सांगितली, आतां भिन्न जातीच्या पुत्राच्या विभागाचा प्रकार सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **वर्णाच्या अनुलोम** स्त्रियांचे ठायीं ब्राह्मणोत्पन्न पुत्र चार, तीन, दोन, एक असे विभाग पावतात. तसेंच क्षत्रियोत्पन्न पुत्र हो तीन, दोन, एक, तसेच वैश्योत्पन्न पुत्र दोन, एक, असे पावतात.

टीका.

१ ब्राह्मणास चार (ब्राह्मणी क्षत्रिया वैश्या आणि शूद्रा) क्षत्रि

# प्रकरण ७

## दायविभाग.

याला तीन (क्षत्रिया वैश्या शूद्रा) याप्रमाणें वैश्यास दोन आणि शूद्रास एक अशा भार्या (आचाराध्यायांत विवाह प्रकरणीं) सांगितल्या आहेत, त्यांत ब्राह्मणोत्पन्नपुत्र आपापल्या **वर्णा**च्या अनुक्रमानें चार, तीन, दोन, आणि एक, अशा विभागाचे अधिकारी होतात.

ह्मणजे असें, ब्राह्मणापासून ब्राह्मणी स्त्रियांचे ठायीं झालेले प्रत्येक पुत्र चार चार अंश पावतात. ब्राह्मणापासून क्षत्रियेच्या ठायीं झालेल्या प्रत्येक पुत्रांनीं तीन तीन भाग घ्यावे. ब्राह्मणापासून वैश्येला झालेले पुत्र प्रत्येक दोन दोन भागाचे अधिकारी होतात. ब्राह्मणापासून शूद्रीला झालेले प्रत्येक पुत्र एकैक अंशाचे विभागी होतात. ब्राह्मणीपुत्रास चारविभाग.

२ क्षत्रियापासून क्षत्रियेला झालेल्या प्रत्येक पुत्रास तीन तीन भाग मिळतील, क्षत्रियापासून वैश्येला झालेले प्रत्येक पुत्र दोन दोन भाग पावतील क्षत्रियापासून शूद्रीला झालेला प्रत्येक पुत्र एकैक विभाग पावतो. क्षत्रियापुत्रासतीनविभाग.

३ वैश्यापासून वैश्येला झालेले प्रत्येक पुत्र दोन दोन विभाग पावतात, त्याच पासून शूद्रीला झालेले प्रत्येक पुत्र एकैक भागाचे अधिकारी होतात. वैश्यापुत्रासदोनविभाग

४ शूद्राला तर एकच (सजातीय) भार्या सबब भिन्नजातीय पुत्र नाहींत, ह्मणून पूर्वी सांगिल्याप्रमाणें (एकैकच) प्रत्येकास विभाग. शूद्रापुत्रासएकच

५ जरी १ला २रा ३रा हे अंक सामान्यतः सांगितले खरे तथापि ते अंक **प्रतिग्रह** संपादित भूमी वांचून इतर भूमी विषयीं जाणावे.

# प्रकरण ७

## दायविभाग.

स्मृति. ब्राह्मणापासून क्षत्रियादि स्त्रीचाठायीं झालेल्या पुत्रास प्रतिग्रहसंपादित जमीन देऊं नये. जरी त्यांच्या बापानें दिल्ही असेल तरी तो निवर्तल्यावर ब्राह्मणीपुत्रानें हरण करावी.

" प्रतिग्रहसंपादित जमीन देऊं नये " असें सांगितल्यावरून क्रयादिकें करून प्राप्त भूमीचा विभाग क्षत्रियादिपुत्रांस आहेच. कारण शूद्रापुत्राविषयीं मात्र निषेध खालीं सांगितला आहे.

क्रयादिसंपादित भूमीचा वांटा क्षत्रियादिपुत्रास आहे

देवल. शूद्राचा ठायीं द्विजापासून झालेला पुत्र भूमीच्या (स्थावराच्या) विभागाचा अधिकारी होत नाहीं.

शूद्रापुत्रास भूमीचा वांटा नाहीं.

जर क्रयादिप्राप्त भूमीचा वांटा क्षत्रियादिपुत्रांस मिळणार नाहीं. तर शूद्रपुत्राला जमीनीच्या विभागाविषयीं सदरहू विशेष प्रतिषेध सांगितला त्याची उपपत्ति होणार नाहीं.

मनु. ९ ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य, यांपासून शूद्रेचे ठायीं झालेला पुत्र विभागाचा अधिकारी होत नाहीं. जितकें बापानें दिल्हें असेल तितकें मात्र त्याचें धन होईल.

असें जें वचन तें पिता जीवंत असतां शूद्रापुत्रास कांहीं दिल्हें असतां त्याविषयीं. जर बक्षीस दिल्हें नाहीं तर शूद्रापुत्र एकाहिश्शाचा अधिकारी होतो. यास्तव विरोध नाहीं.

# प्रकरण ७

# दायविभाग.

## शाखा १७

सर्व विभाग होऊन कांहीं शेष राहिलें असल्यास त्याविषयीं सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. परस्परांनीं अपहार केलेलें द्रव्य विभाग झाल्यानंतर जें उघाडीस येतें तें पुनः त्यांनीं समविभाग वांटून घ्यावें, अशी शास्त्र मर्यादा आहे.

### टीका.

१ परस्परांनीं (गुप्तपणें) अपहार केलेलें समायीक द्रव्य, विभागकाळीं समजण्यांत न येतां पित्रधनाचा विभाग झाला, नंतर उघाडीस आलें तर तें समविभाग वांटून घ्यावें अशी शास्त्रमर्यादा आहे. समायीकद्रव्यांतून अभिलाष केलेल्या धनाचे समविभाग करावे.

येथें समविभाग, असें सांगितल्यानेंच **उद्धार** विभागाचा निषेध झाला, आणि वांटून घ्यावें असें सांगितल्यावरून ज्यानें उघाडीस आणिलें असेल त्यानेंच घेऊं नये. असें दाखविलें.

या प्रमाणें वरचें वचन सार्थक होतें. ह्मणून तें, (वचन) समुदायद्रव्यापहारीं दोष नाहीं असें दाखवीत नाहीं.

२ शंका—— मनूनें तर ज्येष्ठपुत्रानें समायीकद्रव्यापहार केला असतां त्याला मात्र दोष सांगितला धाकट्या भावांविषयीं नाहीं.

मनु. जो वडील भाऊ लोभानें धाकट्या भावांशीं प्रतारणा करितो. तो वडील भाऊ विभागहीन करून राजानीं त्याला शिक्षा करावी.

# प्रकरण ७

## दायविभाग.

३ समाधान——परंतु असें नाही. कारण **संभावितस्वातंत्र्य** व वडीलपणामुळें पितृस्थानापन्न जो ज्येष्ठ, त्याला ही दोष मागणारा जो मनु त्यानें ज्येष्ठाच्या स्वाधीन व पुत्रस्थानापन्न अशा धाकट्या भावांसही **दंडापूपिकान्यायें**[१] करून विशेषेंकरून दोष प्रदर्शित केला.

तसाच अणखी ही सामान्यतः दोषश्रुत होतो.

४ विभाग योग्याला जो विभाग देत नाहीं त्याला तो भागापासून भ्रष्ट करितो. आणि तो विभागापासून भ्रष्ट झालेला आपल्यास विभागहीन करणाराचा नाश करितो; ह्मणजे दोषी करितो. जर त्याचा नाश करीत नाहीं तर त्याच्या पुत्राचा किंवा पौत्राचा नाश करितो.

असा ज्येष्ठादिकांचा विशेष निर्देश नकरितांच समायीक द्रव्यापहारीं दोषश्रुत आहे.

५ आतां समायीक द्रव्यावर आपलें ही (अपहार करणाराचें) **स्वत्व** आहेह्मणून हें आपलेंच अशा बुद्धीनें घेतलें असतां दोष नाहीं.

असें जें मत तेंही असमंजस, कारण हें आपलें अशा बुद्धी

---

१ दंडापूपिका न्याय ह्मणजे एका दंडांत कांहीं घारगे ओंवले असतां तो दंड उचलला ह्मणजे सहजच त्या बरोबर घारगेही येतात. कारण ते त्याच्यांत ओंवले गेले. याप्रमाणेंच ज्येष्ठ पुत्रास समायीक द्रव्यापहारीं दोष सांगितला, तो ज्येष्ठाच्या आज्ञेंत वागणारे जे कनिष्ठ त्यांसही येतो.

# प्रकरण ७.

## दायविभाग.

नें घेतलें तरी समायीकपणामुळें अन्याचेंही स्वत्व आहे ह्मणून परद्रव्याचाही अपहार घडतोच (दुसऱ्याचें द्रव्य घेऊंनये. इत्यादिक निषेधशास्त्राची येथें प्रसक्ति झाली) सबब दोष आहेच आहे.

६ जसें मुगांचा चरूनष्टझाला असतां मुगांसारखीच उडदांची आकृति आहे. ह्मणून सारखेपणामुळें उडीद घेतले असतां "उडीद यज्ञास उपयोगी नव्हत" असा निषेध तेथें प्रसक्त होत नाहीं. कारण हे मूग अशा बुद्धीनें उडीद घेतलें असें पूर्वपक्षकर्त्याचें मत. परंतु सिद्धांत असा कीं मुगांच्या बुद्धीनें जरी उडीद घेतले तरी निषेधकोटिप्रविष्ट जे उडीद त्यांचें ग्रहण झालेंच ह्मणून निषेधाची ही प्रसक्ति आली.

तस्मात् वचनावरून व वर सांगितल्या न्यायें करूनही समायीक द्रव्यापहारीं दोष आहेच असें सिद्ध झालें.

### शाखा १८

#### द्व्यामुष्यायण[1] पुत्राला विभागाचा विशेष दाखवितांना त्याचें स्वरूप सांगतो.

---

१ याह्यामुष्यायण प्रकरणींचा व्यवहार बहून करून शेतकी मानिस्तच आहे ह्मणून शब्दही शेतकींतलेच योजिले आहेत. ते असे क्षेत्र शब्द शेताच्या अर्थी रूढ आहे. प्रकृतीं तत्तुल्य बायको. अर्थात् क्षेत्री व क्षेत्रस्वामी शब्दें करून ही मालक ह्मणजे नवरा, तसाच बीजी ह्मणजे बीज नो, ह्मणजे पेरणी करणारा, जसें शेत अर्धेलीच्या कराराने दिलें असल्यास उत्पन्नही दोघांचें तसेंयेथं

# प्रकरण ७

## दायविभाग.

मूळ.

याज्ञवल्क्य. निपुत्रिकानें परकीय क्षेत्रीं गुरूच्या नियोगें करून उत्पादित जो पुत्र तो उभयतांचेही जिंदगीचा वारीश व पिंड देणारा होतो.

टीका.

१ "गुरूच्या आज्ञेवरून दीर इत्यादिकानें पुत्रासाठीं निपुत्रिक स्त्रीशीं (ऋतुकालीं) संग करावा" अशा (आचाराध्यायीं) सांगितलेल्या विधानें अपुत्र दीर इत्यादिकानें स्वतां दुसऱ्याच्या स्त्रीचेठायीं गुरु नियोगें करून उत्पादित जो पुत्र, तो हा दोघांच्या ह्मणजे बीजी, क्षेत्री यांच्या जिंदगीचा यथाशास्त्र अधिकारी व पिंड देणारा होतो. ह्मणजे अर्थ असा जर संग करण्याविषयीं गुरूच्या आज्ञेवरून नियुक्त दीर वगैरे स्वतां ही अपुत्र अतएव आपल्यास पुत्र पाहिजे आणि क्षेत्रीला ही पुत्र पाहिजे एतदर्थ संगत झाला असतां त्यापासून जो पुत्र उत्पन्न होतो तो द्विपितृक त्यालाच द्व्यामुष्यायण अशी संज्ञा आहे. तो दोघांच्याही जिंदगीचा अधिकारी व दोघांसही पिंड देणारा होतो. द्व्यामुष्यायण पुत्र दोघां बापांस पिंड देऊन त्यांची जिंदगी पावतो.

२ जर नियुक्त (दीरवगैरे) पुत्रवान असून केवळ क्षेत्रीलाच पुत्र असावा एतदर्थ प्रयत्न करितो; तर तो उत्पन्न झालेला क्षेत्रीचाच पुत्र होतो. बीजीचा नव्हे. ह्मणून तो पुत्र बीजीच्या जिंदगीचा वारीश व श्राद्ध करणाराही होत नाहीं. नियुक्त पुत्रवान् आहे तर क्षेत्रीचाच पुत्र होतो.

मनुही हेंच सांगतो.

मनु. या क्षेत्रीं उत्पन्न झालेलें अपत्य आपलें दोघांचें होईल. असा करार करून क्षेत्रस्वामीनें जें क्षेत्र, बीजीच्या संततीसाठीं दि

# प्रकरण ७

## दायविभाग.

ल्हें जातें, त्या क्षेत्रीं झालेल्या अपत्याचे **बीजी** व **क्षेत्री** हे दो घे स्वामी असें ऋषींनीं सांगितलें आहे.

मनु. तसेंच या क्षेत्रीं उत्पन्न झालेलें अपत्य आपलें दोघांचें होईल असा **बीजी, क्षेत्री** यांचा परस्पर करार न होतां दुसऱ्या च्या **क्षेत्रीं** जें अपत्य उपजविलें तें अपत्य **क्षेत्री**चेंच होय. कारण **बीजा**पेक्षां **क्षेत्र** बलवत्तर होय. असा न्याय आहे. तो गाई अश्व **इत्यादिकांत** तसा प्रकार पाहण्यांत येतो.

३ येथेंही जो **नियोग** सांगितला तो जी **वाग्दत्त** झाली ती विषयींच जाणावा. कारण त्या शिवाय दुसऱ्या **नियोगा** विषयीं मनूनें निषेध सांगितला आहे.

मनु. (गुरूनें) **नियुक्त** जी स्त्री, तिनें संततीचा क्षय झाला असतां दिरापासून किंवा **सपिंडा**पासून इष्ट प्रजा संपादावी. अशा विधवेच्या ठायीं **नियुक्ता**नेंही घृताभ्यंग करून व मौन धरून एक पुत्र उत्पन्न करावा, दुसरा करूं नये.

असा **वाग्दत्त** स्त्री विषयीं **नियोगा**चा उपन्यास करून आपणच त्याचा (खालीं) निषेध करितो.

मनु. विधवा स्त्रीला **द्विजांनीं** अन्याशीं संग करायास योजूं नये. कारण दुसऱ्याशीं संगत होण्याविषयीं **नियोग** करणारे केवळ सनातन धर्माचा नाश करितात. व विवाह मंत्रामध्यें **नियोगाचें** विधान कोठेंही सांगितलें नाहीं. तसेंच विवाह विधांनही विधवेचा पुनर्विवाह सांगितला नाहीं. ह्मणून विद्वान् **द्विजांनीं** हा (नियोग) केवळ पशुधर्म ह्मणून निंदित केला

# प्रकरण ७

## दायविभाग.

आहे. जेव्हां वेनराजा राज्य करीत होता त्या वेळेस त्यानें मनुष्यांस ही हा (नियोग) धर्म चालू केला. तो राजर्षिमुख्य वेनराजा सकल पृथ्वीचा उपभोग करीत असतां तो केवळ विषयलुब्ध होऊन **वर्णां**चा संकर करिता झाला. तेंव्हापासून जो कोणी मोहानें विधवेला संतत्यर्थ दुसऱ्याशीं संगत होण्यासाठीं **नियुक्त** करितो, त्याची विद्वज्जन निंदा करितात.

४ येथें (वरच्या मनुवचनांत) **नियोग, विहितप्रतिषिद्ध**[१] केला ह्मणून विकल्प आहे असें मानूं नये. कारण विधवेला **नियोग** करणारे निंदित होतात. असें ऐकण्यांत आहे. अणखी स्त्रीधर्मात व्यभिचाराविषयीं बहूत दोषही सांगितले आहेत. आणि इंद्रियनिग्रह तर विशेषेंकरून सांगितला आहे.

मनु. भर्ता मरण पावल्यानंतर स्त्रीनें कंदमूलफलादि भक्षणेंकरून देह क्षीण करावा. परंतु परपुरुषाचें नाव देखील घेऊं नये. "असा उपजीवनार्थ ही परपुरुषाचे आश्रयाचा प्रतिषेध करून" विधवेनें मरणपर्यंत क्षमाशील, नियत ब्रह्मचर्यव्रत धारण करून, जो पतिव्रता स्त्रियांचा परमोत्कृष्ट धर्म आहे त्याची इच्छा करीत राहावें. संतति न करितां केवळ बाळपणापासून ब्रह्मचर्यव्रतसंपन्न असे अनेक सहस्र ब्राह्मण स्वर्गलोकीं गेले आहेत. तशी भर्ता मेल्यावर पतिव्रता स्त्री जर ब्रह्मचर्य धारण करिती तर ती अपुत्र असूनही स्वर्गलोकीं जाती जसे ते ब्रह्मचारी — विधवेनें व्रतस्थ असावें.

---

१ विहित प्रतिषिद्ध ह्मणजे कोणी एक कार्याचें विधान सांगून मग त्याचा निषेध केला जातो तें कार्य. प्रकृती नियोग धर्माचें विधान सांगितलें नंतर निषेधही केला.

गेले. आणि जी स्त्री अपत्यलोभानें परपुरुषाशीं संग करिती ती इह लोकीं निंदित होऊन अधोगतीस जाती.

असा पुत्रार्थ परपुरुषाचा समागम निषेधिला आहे.

५ तस्मात् (४थ्या अंकांत) **नियोग विहितप्रतिषिद्ध** आहे ह्मणून विकल्प असावा असें ह्मटलें तें समर्पक नाहीं.

## शाखा १९

या प्रमाणें विवाहित स्त्रीच्या **नियोगा** विषयीं
वर निषेध सांगितला आतां कोणता **नियोग**
यथाशास्त्र तें सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. वाङ्निश्चय झाल्यानंतर ज्या कन्येचा पति मरतो तिशीं तिच्या सख्या दिरानें यथाशास्त्र परिणयन करावें. नंतर घृताभ्यंग, मौन, यांकडून युक्त होऊन श्वेत वस्त्र परिधान केलेली व मनोवाक्काय संयत अशा त्या स्त्रीशीं गर्भधारण होई पर्यंत, प्रत्येक **ऋतूंत**, एकेक वार, एकांती, संग करावा.

### टीका.

१ कन्या ज्याला **वाग्दत्त** झाली, तो प्रतिग्रहा वांचून तिचा पति झाला. असें या वचनावरून समजतें. तो जर **वाग्दान** झाल्यावर मेला तर त्याच्या वडील किंवा धाकट्या सख्या भावानें तिशीं विवाह

# प्रकरण ७

## दायविभाग.

करावा.

या प्रमाणें यथाशास्त्र विवाह करून शुभ्र वस्त्र धारण केलेली व मन, वाणी, शरीर यांचें दमन करणारी अशा त्या स्त्रीशीं त्यानें ही घृताभ्यंग व मौन यांकडून युक्त होऊन गर्भधारण होईपर्यंत प्रत्येक **ऋतूंत**, एकांती, एकेक वार, संग करावा.

२ हा (वर सांगितलेला) तर **वाचनिक** विवाह घृताभ्यंगादिक नियमाप्रमाणें **नियुक्त्या** संयोगाचे अंग होय ह्मणून दिराची स्त्रीच असें सिद्ध होत नाहीं. यास्तव तिचे गर्भी उत्पन्न झालेलें अपत्य **क्षेत्रस्वामीचें**च होतें दिराचें होत नाहीं. परंतु जर करार आहे तर उभयतांचें ही होतें.

### शाखा २०

समान जातीय पुत्रांच्या विभागाविषयीं कृति सांगितली. आतां मुख्य व गौण पुत्र यांस विभाग घेण्याची व्यवस्था सांगतांना प्रथमतः त्यांचें स्वरूप सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. धर्मविवाहित स्त्रीचे गर्भी आपल्यापासून उत्पन्न झालेला **औरसपुत्र**, त्या सारिखाच **पुत्रिकासुत**, सगोत्रापासून किंवा इतरापासून आपल्या **क्षेत्रीं** उत्पन्न झालेला **क्षेत्रज** पुत्र, घरांत गुप्तांत उत्पन्न जो तो **गूढज** पुत्र, कन्येपासून झालेला जो तो **कानीन** तो

# प्रकरण ७.

## दायविभाग.

मातामहाचा पुत्र ह्मटला आहे. **अक्षत** किंवा **क्षत** अशा **पुनर्भू**चे गयीं उत्पन्न. तो **पौनर्भव** पुत्र, ज्याचें आई किंवा बाप **दान** करितात तो **दत्तक** पुत्र. आईबापांनी जो विकला तो **क्रीत** पुत्र, जो स्वतां पुत्रलेंकरून केलेला तो **कृत्रिम**, जो स्वतांच दुसऱ्याचा पुत्र होतो. तो **स्वयंदत्त**, गरोदर स्त्रीशीं विवाह केला असतां जो पुत्र होतो. तो **सहोढज**, टाकिलेला जो पुत्रलेंकरून घेतला तो **अपविद्ध**.

टीका.

१ **औरस** —— धर्मविवाहित पत्नीचेठायीं झालेला पुत्र. तो, हा मुख्य पुत्र. औरसपुत्र

२ **पुत्रिकासुत** —— लेंकींचा मुलगा. हाही **औरसा**सारखाच (कारण कन्याही औरसच सबब तिजपासून झालेला पुत्रही औरसासारिखा परंतु त्याला औरसत्वमात्र नाहीं.) पुत्रिकासुत

वसिष्ठ. **अभ्रातृक** कन्या मी तुला सालंकृत करून देतों या कन्येला जो पुत्र होईल तो माझा पुत्र. (असा कन्यादान करितेवेळेस करार करून दिल्हेल्या लेंकीला झालेला पुत्र)

अथवा **पुत्रिका** च पुत्ररूपेंकरून मानलेली कन्याही **औरस** समानच कारण तींत बापाचे अवयव अल्प आणि आईचे अवयव बहुत आहेत.

# प्रकरण ७

## दायविभाग.

वसिष्ठ. कन्या हा द्वितीय पुत्रच.

३ द्व्यामुष्यायण— हा जनकाचा पुत्र तर खरा परंतु औरसापेक्षां निकृष्ट, कारण अन्यक्षेत्रीं निपजला म्हणून. द्व्यामुष्यायणपुत्र.

क्षेत्रज[1]— जो सपिंडापासून किंवा दिरापासून उत्पन्न, तो. क्षेत्रजपुत्र.

४ गूढज— नवऱ्याच्या घरीं असतां गुप्तरूपें जन्मला, परंतु निकृष्टजातीय नसून किंवा उत्कृष्ट जातीय नसून हा अमुक पुरुषापासून झाला असा निश्चय नसतांही सवर्णापासून झालेला इतका निश्चय पाहिजे. गूढजपुत्र

५ कानीन— जो कुंवारीचे पोटीं सवर्णापासून जन्मला तो. तो मातामहाचा पुत्र परंतु जर ती (कुंवारी) अविवाहित असली आणि पितृगृहींच राहत आहे तर. विवाहित असल्यास ज्याशीं विवाह झाला त्याचा पुत्र. कानीनपुत्र.

मनु. कन्या पितृगृहीं असतां निजपासून जो पुत्र जन्मला जातो त्याला कानीन म्हटलें आहे. विवाहानंतर झाल्यास ज्याशीं विवाह झाला असेल त्याचा तो होतो.

६ पौनर्भव— जो अक्षत किंवा क्षत अशा पुनर्भू. च्या ठायीं सवर्णापासून जन्मला तो. पौनर्भवपुत्र.

शाखा २१

1 क्षेत्रज द्व्यामुष्यायण हे पर्याय वाचक शब्द परंतु कांहींसा भेद वाटतो. या क्षेत्रीं उत्पन्न झालेला पुत्र आपले उभयतांचा होईल असा करार झालेला पुत्र द्व्यामुष्यायण आणि तद्भिन्न तो क्षेत्रज असावा.

# प्रकरण ७.

## दायविभाग.

### शाखा २१

१ दत्तक — जो आईनें भर्ता परागंदा झाला किंवा मरण पाव ला असतां त्याच्या आज्ञेवरून अथवा बापानेंच अगर उभयतांनीं ज्या कोणी सवर्णाला पुत्र दिल्हा जातो तो. त्याचा दत्तकपुत्र होतो. दत्तकपुत्र

मनु. आईनें किंवा बापानें अथवा उभयतांनीं आपत्कालीं उदक दानपूर्वक प्रीतीनें जो पुत्र सवर्णास दिल्हा जातो. तो दत्तकपुत्र जाणावा.

२ आपत्कालीं असें ह्मटल्यावरून चालत्या काळांत देऊंनये. परंतु हा (चालत्या काळीं देण्याचा) निषेध देणारास (घेणाराला नव्हे) तसाच एकुलता पुत्र असल्यासही देऊंनये. एकुलता पुत्र दत्तक देऊंनये.

वसिष्ठ. एकुलता पुत्र देऊंनये आणि प्रतिग्रहही करूंनये.

तसेंच अनेक पुत्र असले तरी वडील पुत्र दत्तक देऊंनये कारण "ज्येष्ठ पुत्र झाल्यानेंच मनुष्य पुत्रवंत होतो" ह्मणून पितृकार्य करण्याविषयीं ज्येष्ठपुत्रासच मुख्यत्व आहे. अनेक पुत्र असले तरी ज्येष्ठ पुत्र देऊंनये.

#### दत्तक घेण्याचा प्रकार.

वसिष्ठ. ३ दत्तक घेणारानें बंधूस बोलावून राजाला निवेदन करून मध्य घरांत होम करून दत्तक घ्यावा. आणि तो अदूरबांधव (ह्मणजे ज्याचे बंधू दूरदेशीं नाहींत असा) व बंधुसंनिकृष्ट (ह्मणजे जवळचा) च घ्यावा. दत्तक घेण्याचा विधि

अदूर बांधव शब्दें करून अत्यंत दूर देश व भाषाभेद यांचा निषेध सां

# प्रकरण ७

## दायविभाग.

गितला.

या प्रमाणेंच **क्रीत स्वयंदत्त कृत्रिम** या पुत्रांविषयीं यो जावें. कारण **दत्तका** प्रमाणेंच त्यांचाही प्रकार आहे.

## शाखा २२

१ **क्रीत**पुत्र— जो आईबापांनीं मिळून अथवा आईनें किं वा बापानें विकला त्याचा तो **क्रीत**पुत्र. येथेंही **दत्तका** प्रमाणें च पुत्रविक्रय करणें तर आपत्कालींच आणि **सवर्णास** विका- वा परंतु वडील किंवा एकुलता विकूं नये. क्रीतपुत्र.

मनु. जो संतत्यर्थ ज्या सदृश किंवा असदृश पुत्राला आईबापां जवळून विकत घेतो, तो त्या विकत घेणाराचा **क्रीत**पुत्र होतो.

असें जें सांगितलें तेथें सदृश असदृश ह्मणजे गुणेंकरून सदृश किंवा असदृश असा त्याचा अर्थ, जातीनें सदृश असदृश अ सें नाहीं. कारण (२४ व्या शाखेंत) "मी सजातीयपुत्राविषयीं हा वि धी सांगितला आहे". असा शेवटीं उपसंहार केलाच आहे.

२ **कृत्रिमपुत्र** —— जो पुत्रार्थीनें स्वतां धन **क्षेत्र इ त्यादिक** आपली जिंदगी दाखविणें वगैरे लालुचेनेंच केलेला तो. प रंतु तो मातापितृहीन असला पाहिजे. कारण आईबाप असतां तो त्यांच्या स्वाधीन (आंगचा धनी नाहीं) कृत्रिमपुत्र

३ **स्वयंदत्त** —— दत्तात्मा जो मातापितृविहीन किंवा आईबाप जीवंत असून त्यांनीं टाकलेला मी तुझा पुत्र होतों. असें बोलून स्वयंदत्त.

# प्रकरण ७.

## दायविभाग.

स्वतां प्राप्त झालेला.

४ **सहोढज** —— जो गर्भांत असून गर्भिणीचा विवाह झाला असतां तिज बरोबर विवाहित होतो तो. सहोढज.

५ **अपविद्ध** —— जो आई बापांनीं टाकलेला असतां दुसऱ्यानें कोणी घेतला जातो, तो त्या घेणाराचा पुत्र होतो.

वर जे पुत्राचे प्रकार सांगितले ते सजातीयाविषयीं जाणावे.

## शाखा २३

या प्रमाणें मुख्य व गौण पुत्रांचा अनुक्रम सांगून त्यांचे विभागाविषयीं क्रम सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ह्यां मध्यें पहिल्याच्या अभावीं दुसरा, त्याच्या अभावीं तिसरा, असा उत्तरोत्तर पिंड देणारा व जिंदगी घेणारा होतो.

टीका.

१ ह्या, वर[1] सांगितलेल्या बारा पुत्रांत पहिल्या पुत्राच्या अभावीं दुसरा, त्याच्या अभावीं तिसरा; तिसऱ्याच्या अभावीं चौथा, अशा (बाराव्या पुत्रापर्यंत) अनुक्रमानें श्राद्ध करणारा व जिंदगीचा मालक जाणावा. वरसांगितलेल्यापुत्रांस विभाग मिळण्याचा क्रम.

---

१ वर ह्मणजे २० व्या शाखेच्या १ ल्या अंकाचे वचनांत.

# प्रकरण ७

## दायविभाग.

**औरस** व **पुत्रिकासुत** हे दोघेही कायम आहेत तर जिंदगीचा मालक **औरस** असें (२० व्या शाखेच्या २ऱ्या अंकावरून) प्राप्त झालें त्याविषयीं मनु बाधक सांगतो.

मनु. २ **पुत्रिकासुत** कल्पिल्यानंतर जर **औरसपुत्र** होईल तर दोघांस समसमान विभाग, कारण स्त्रियांस ज्येष्ठत्व नाहीं.

वसिष्ठ तर सर्व पुत्रांमध्यें पूर्व पुत्र असतां इतर पुत्र चतुर्थांशाचा अधिकारी होतो असें सांगतो.

वसिष्ठ. ३ **दत्तक** घेतल्यावर जर **औरस** पुत्र होईल तर **दत्तक** चतुर्थांशाचा विभागी होईल. — दत्तक घेतल्यावर औरस झाला तर दत्तकाचा चतुर्थांश.

४ **दत्तका** विषयीं जो वर सांगितलेला प्रकार तो **क्रीतपुत्र कृत्रिमपुत्र इत्यादिकां** विषयींही जाणावा. कारण, तेथेंही पुत्र करण्याचा विधि **दत्तका** प्रमाणेंच आहे.

कात्यायन. **औरसपुत्र** झाल्यावर इतरपुत्र चौथ्या हिशाचे विभागी होतात. परंतु ते जर **सवर्ण** आहेत तर. **असवर्ण** आहेत तर अन्नाछादनमात्र पावतात. — औरसपुत्र असल्यास सवर्णपुत्र चौथ्याहिशाचे अधिकारी. असवर्ण अन्नाछादनमात्र पावतील.

**सवर्ण** ह्मणजे **क्षेत्रज, दत्तक, इत्यादिक** ते **औरस** असतां चतुर्थांशाचे विभागी होतात. आणि **असवर्ण** ह्मणजे **कानीन, गूढोत्पन्न, सहोढ, पौनर्भव**, हे **औरस** असतां चौथ्या

# प्रकरण ७

## दायविभाग.

हिशाचे देखील वारीश होत नाहींत. केवळ अन्नाच्छादन मात्र पाव तील.

विष्णु. ५ **कानीन, गूढोत्पन्न, सहोढज, पौनर्भव, हे असवर्ण** आहेत ह्मणून श्राद्ध करण्यास व जिंदगी घेण्यास अधिकारीच होत नाहींत.

असें जें वचन आहे तेंही जर **औरस** पुत्र असला तर असवर्णास चतुर्थांशाच्या निषेधाविषयीं जाणावें. **औरसा**दिकांच्या अभावीं तर **कानीना**दिकांस ही बापाची सगळी जिंदगी घेण्यास अधिकार आहेच कारण "पहिल्याच्या अभावीं दुसरा, त्याच्या अभावीं तिसरा" वगैरे प्रकार १ ल्या अंकाचे मूळवचनांत सांगितलाच आहे.

मनु. ६ एक **औरस** पुत्र मात्र बापाच्या जिंदगीचा मालक होतो. त्यानें इतर पुत्रांस जीवनासाठीं अन्नाच्छादन मात्र द्यावें.

असें जें वचन आहे तें **दत्तका**दिक पुत्र जर निर्गुण किंवा **औरसा**शीं प्रतिकूळ आहेत तर त्यांविषयीं जाणावें.

त्यांत **क्षेत्रज** पुत्राविषयीं तोच (मनु) विशेष सांगतो.

मनु. ७ **औरस** पुत्रानें पित्याच्या जिंदगीचा विभाग करितेसमयीं **क्षेत्रज** पुत्रास पित्याच्या जिंदगींतून साहावा अथवा पांचवा हिसा द्यावा. औरस असतां निर्गुण क्षेत्रज पुत्र पांचव्या हिशाचा अधिकारी.

त्यांत (साहावा अथवा पांचवा विभाग या विकल्पाचें तात्पर्य असें कीं) प्रतिकूळ असून निर्गुण आहे तर साहावा आणि प्रतिकूळ किंवा

# प्रकरण ७

## दायविभाग.

निर्गुण आहे तर पांचवा असें योजावें.

मनु तर पुत्रांच्या दोन षट्कांचा उपन्यास करून पहिलें षट्क वारीश बंधू व दुसरें षट्क वारीश नसता बंधू असें सांगतो.

मनु. ८ **औरस, क्षेत्रज, दत्तक, कृत्रिम, गूढोत्पन्न,** आणि **अपविद्ध**, हे साहा वारीश बंधू, व **कानीन, सहोढ, पौनर्भव, क्रीत, स्वयंदत्त,** व **शूद्रापुत्र**,[1] हे साहा वारीश नसतां बंधू.

असें जें वचन त्याची ही व्याख्या अशी कीं आपल्या पित्याचे जे **सपिंड** व **समानोदक** यांचा जवळचा कोणी जिंदगी घेणारा नसल्यास प्रथम षट्काला मात्र जिंदगी घेण्याचा अधिकार. दुसरे षट्काला तर त्यांच्या अभावीं देखील जिंदगी घेण्याचा अधिकार नाहीं, बंधुत्व मात्र. एक गोत्रत्वें करून व **सापिंड्यें** करून उदकप्रदान (तिलांजलि) **इत्यादि** क्रियाकरणें षट्क द्वयास समान जाणावें.

मनु. ९ **दत्तकपुत्र** आपल्या जनकाचें गोत्र व जिंदगी यांचा — दत्तपुत्र आपल्या जनकाचा पासें गोत्र व जिंदगी पावतना हीं.

---

1 शूद्रापुत्र, जो ब्राह्मणापासून विवाहित शूद्रेचा गर्भी जन्मला तो अनुलोमज औरसपुत्र खरा, परंतु द्वादश विधपुत्रांतून अन्यतम असतां त्याला पित्याची जिंदगी घेण्यास अधिकार नाहीं. ह्मणून या प्रकरणीं मनूनें (औरस पुत्रांत अंतर्भाव न करितां) शेवटीं निवेश केला.

# प्रकरण ७.

## दायविभाग.

अधिकारी होत नाहीं (तर ज्याचा दत्तक होतो त्याचें गोत्र व जिंदगी पावतो.) तसेंच पिंडदान (श्राद्धादिक) ही ज्याचें गोत्र व जिंदगी पावतो त्याच्या उद्देशें करून करावें. कारण देणारापासून स्वधा (श्राद्धादिक) निवृत्त होते.

१० वरच्या वचनांत **दत्तक** ग्रहण केलें तें पुत्राचे **प्रतिनिधी** दाखविण्यासाठीं केलें.

पित्याची जिंदगी घेण्याचा अधिकार तर पहिल्याच्या अभावीं दुसरा अशा अनुक्रमानें उत्तरोत्तर सर्वांस समानच आहे.

मनु. पुत्रच पित्याची जिंदगी घेण्याविषयीं अधिकारी होतात, भाऊ होत नाहींत, पितर (आई बाप) ही होत नाहींत.

असें **औरसा** खेरीज (पुत्रिकासुत वगैरे) जे पुत्राचे **प्रतिनिधी** त्यांस जिंदगी घेण्याचें प्रतिपादन केलें आहे.

११ **औरसास** तर "एकटा **औरस** पुत्रच पित्याच्या जिंदगीचा मालक." येणें करून जिंदगी घेण्याचा अधिकार सांगितलाच आहे.

१२ वारीशशब्द तर "वारीशांकडूनही देवावें." **इत्यादिक**[1] स्थळीं पुत्राखेरीज इतर जे जिंदगी घेणारे त्यांचा वाचक प्रसिद्धच आहे.

वसिष्ठ **इत्यादिकांच्या** वचनांतील षट्क ह्यांतही कोणी—

१ इत्यादिशब्देंकरून कात्यायन, विष्णु, मनु वगैरे.

# प्रकरण ७

## दायविभाग.

एकाचा व्यत्यासेंकरून[1] पाठ केला आहे तो सगुण, निर्गुण, याविषयीं जाणावा.

गौतम वचनांत तर **पौत्रिकेय** दाहावा असें सांगितलें आहे. तें विजातीयाविषयीं जाणावें.

१२ तस्मात् पहिल्याच्या अभावीं दुसरा, त्याच्या अभावीं तिसरा, असे उत्तरोत्तर बाराव्यापुत्रापर्यंत विभागाचे अधिकारी होतात असें सिद्ध झालें.

मनु. सहोदर बंधूंत एक जरी पुत्रवान् होईल तर त्यापुत्रेंकरून सर्व सहोदरही पुत्रवंत. असें मनु बोलला. भावाचापुत्र असतां इतरपुत्र दत्तक घेऊंनये.

असें जें वचन आहे तेंही पुतण्याला पुत्र करणें संभवत असतां इतरांस पुत्रकरण्याविषयीं निषेध आहे. असें सुचविण्यासाठीं सांगितलें: केवळ पुतण्याच पुत्र होतो असें प्रतिपादन करण्यासाठीं सांगितलें नाहीं. कारण "भाऊ, त्याच्या अभावीं भावाचा पुत्र, त्याच्या अभावीं **गोत्रज**, त्याच्या अभावीं **बांधव**" असे पुढें (२६ व्या शाखेच्या १ल्या अं-

---

१ व्यत्यास म्हणजे असा, २० व्या शाखेंत याज्ञवल्क्यानें तर औरस, पुत्रिकासुत, क्षेत्रज, गूढज, कानीन, पौनर्भव, दत्तक, क्रीत, कृत्रिम, स्वयंदत्त, सहोढ, आणि अपविद्ध, असा द्वादशविध पुत्रांचा अनुक्रम सांगितला. परंतु स्मृत्यंतरीं अन्यथा प्रकार सांगितला. त्याच शाखेच्या २ ऱ्या अंकांतील दुसऱ्या वसिष्ठवचनांत कन्या हाच दुसरा पुत्र असें सांगितलें. २३ व्या शाखेंत ४ थ्या अंकांत कात्यायनानें ही सवर्ण आणि असवर्ण अशा दोन कोटी करून, असवर्णकोटींत कानीन, गूढोत्पन्न, सहोढ, पौनर्भव, यांचा निवेश केला. ५ व्या अंकांत विष्णूनें, तसेंच मनूनें वारीश बंधू आणि वारीश नसतां बंधू अशा दोन कोटी करून, वारीश बंधूचे कोटीमध्यें औरस, क्षेत्रज, दत्तक, स्वयंकृत, गूढोत्पन्न, अपविद्ध, यांचा निवेश केला. आणि वारीश नसतां बंधूचे कोटींत कानीन, सहोढ, क्रीत, पौनर्भव, स्वयंदत्त, व शूद्रापुत्र.

# प्रकरण ७

# दायविभाग.

कांत) सांगितलें त्याशीं विरोध येईल.

## शाखा २४

आतां सांगितलेल्या विस्ताराचा उपसंहार
करून त्याविषयींच कांहीं नियम सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. मी सजातीय पुत्रांविषयीं हा विधि सांगितला आहे.

टीका.

१ हा वर (२३व्या शाखेच्या १ल्या अंकाचे वचनांत) सांगितलेला प्रकार समानजातीय पुत्रांविषयींच जाणावा, भिन्नजातीय पुत्रांविषयीं नव्हे.

त्यांत (बारा पुत्रांत) ही **कानीन, गूढोत्पन्न, सहोढ,** आणि **पौनर्भव**, हे बापाच्या द्वारें **सवर्ण**, स्वतां **सवर्ण** नाहींत. कारण त्यांस (कानीन वगैरेंस) **वर्ण** (ब्राह्मणादिक) व जाति यांच्या लक्षणाचा अभाव सांगितला आहे.

तसेंच **अनुलोमजातीचे** जे **मूर्धावसिक्तादिक** यांचा **औरसांत** अंतर्भाव आहे. ह्मणून त्यांच्याही अभावीं **क्षेत्रजादिकांस** दाय ग्रहणाविषयीं अधिकार जाणावा.

२ **शूद्रापुत्र** औरस असला तरी इतर पुत्रांच्या अभावींही सर्व जिंदगी पावत नाहीं. शूद्रापुत्रास जिंदगी घेण्याचा अधिकार नाहीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

मनु. जरी सत्पुत्र असला किंवा अपुत्र असला तरी शूद्रापुत्रास[1] दशमांशापेक्षां अधिक देऊं नये हें यथाधर्म.

### अर्थ.

सत्पुत्र ह्मणजे **द्विजाति**[2]पुत्र ज्यास आहेत तो, किंवा अपुत्र ह्मणजे ज्यास **द्विजाति**पुत्र नाहींत तो. असा असून तो मरण पावला असतां त्याचा **क्षेत्रजा**दिक पुत्र अथवा अन्य कोणी **गोत्रज** यानें शूद्रापुत्राला मयताच्या जिंदगींतून दशमांशापेक्षां अधिक देऊं नये.

येणें करून (सदरहू मनुवचनावरून) **सवर्णा**पुत्राच्या अभावीं क्षत्रियापुत्रांनीं व वैश्यापुत्रांनीं सर्व धन घ्यावें असें सुचविलें.

## शाखा २५

आतां शूद्रधनाच्या विभागाविषयीं
विशेष सांगतो.

---

१ १६व्या शाखेच्या आरंभांत शूद्रापुत्रास एकच विभाग सांगितला. आणि येथें तर दशमांश सांगितला यामुळें विरोध दिसतो. परंतु विरोध नाहीं, कारण ब्राह्मणीपुत्राचे चार भाग, क्षत्रियापुत्राचे तीन, वैश्यापुत्राचे दोन, आणि शूद्रापुत्राचा एक, मिळून दाहा. त्यांतील दशमांश.

---

२ द्विजातिपुत्र ह्मणजे ब्राह्मण क्षत्रिय वैश्य याजातींच्या विवाहित स्त्रीयांचे ठायीं झालेले.

# प्रकरण ७

## दायविभाग.

मूळ.

याज्ञवल्क्य. शूद्रापासून दासीचेठायीं झालेलाही पुत्र पित्याच्या इच्छे नें विभाग पावतो. पिता मेल्यावर औरसपुत्रांनीं त्याला अर्धा वांटा द्यावा. अभ्रातृक आहे तर सर्व जिंदगी घेईल, पण कन्ये चा पुत्र नसल्यास.

टीका.

१ शूद्रापासून दासीचे ठायीं झालेला पुत्र पिता जीवंत असतां पित्याच्या इच्छेंकरून वांटा पावतो. परंतु पिता निवर्तल्यावर जर लग्नाच्या बायकोचे पुत्र आहेत तर त्यांनीं त्या दासीपुत्राला आपल्या वांट्याचा अर्धा हिसा द्यावा.

शूद्राचा दासीपुत्र बापाच्या पाठीमागें अर्धा हिसा पावतो.

२ जर लग्नाच्या बायकोचे पुत्र नाहींत तर पित्याची सगळी जिंदगी दासीपुत्र घेईल. परंतु जर लग्नाच्या बायकोची कन्या किंवा दौहित्र नसतील तर. असल्यास दासीपुत्र अर्ध्या विभागाचा अधिकारी.

असल पुत्र नसल्यास सगळी जिंदगी दासीपुत्र घेतो.

३ येथें (मुळांत) "शूद्रापासून" असें सांगितल्यावरून अर्थात् द्विजातींपासून दासीच्या ठायीं झालेला पुत्र तर पित्याच्या इच्छेनेंही विभाग पावत नाहीं व (बाप मेल्यावर). अर्धा विभाग देखील पावत नाहीं. मग सगळी जिंदगी घेणें तर दुरापास्तच आहे. इतकेंच कीं अनुकूळ असला तर अन्नाछादन मात्र घेईल.

द्विजातींच्या दासीपुत्रास अगदींच विभाग नाहीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### शाखा २६

मुख्य व गौण पुत्र जिंदगीचे वारीश हें निरूपण केलें. आतां त्या सर्वांच्या अभावीं जिंदगीचे वारीश कोण व त्यांचा अनुक्रम कसा तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. सर्व ही जातींत निपुत्रिक मरण पावला असतां त्याच्या जिंदगीचे वारीश **पत्नी**, कन्या आई, बाप, भाऊ, पुतणे, **गोत्रज**, **बंधू** शिष्य, **सब्रह्मचारी**, त्यांतून पहिल्याच्या अभावीं दुसरा असें उत्तरोत्तर जाणावे.

टीका.

१ पूर्वीं (२० व्या शाखेंत) सांगितलेले बारा पुत्र. ज्यास नाहींत असा अपुत्र मरण पावल्यानंतर जिंदगी घेण्याचे अधिकारी **पत्नी**, लेंकी, आई, बाप, भाऊ, पुतणे, **गोत्रज**, **बांधव**, शिष्य, **सब्रह्मचारी**, हे पत्नी इत्यादिक वारीश सांगितले त्यांतून पहिल्याच्या अभावीं दुसरा जिंदगीचा वारीश, त्याच्या अभावीं तिसरा, याप्रमाणें उत्तरोत्तर सब्रह्मचारीपर्यंत क्रम जाणावा. निपुत्रिकाच्या जिंदगीचे वारीश पत्नी कन्या वगैरे.

सर्व **मूर्धावसिक्ता**दिक **अनुलोम** जातीचे व सूतादिक **प्रतिलोम** जातीचे व ब्राह्मणादि **वर्ण** यांस हाच जिंदगी घेण्याचा क्रम जाणावा.

# प्रकरण ७

## दायविभाग.

२ त्याक्रमांत **पत्नी** ह्मणजे विवाहितस्त्री. ती जिंदगीची वारीश. **पत्नी** असा एकवचनांत निर्देश केला तो **जात्यभिप्रायें**[1] करून. यास्तव अनेक **सजातीय** व **भिन्नजातीय पत्नी** असल्यास त्यांनीं यथांश[2] विभागून घ्यावी.

वृद्ध मनूही **पत्नी**लाच सर्व द्रव्य घेण्याचा अधिकार सांगतो.

वृद्धमनु. नवऱ्याच्या शय्येचें रक्षण करणारी, व्रतस्थ, व निपुत्रिक अशा **पत्नी**नेंच त्याला पिंड द्यावा, आणि त्याची सगळी जिंदगी घ्यावी.

बृहद्विष्णुही. अपुत्राच्या जिंदगीची वारीश **पत्नी**, तिच्या अभावीं कन्या, तिच्या अभावीं पिता, त्याच्या अभावीं माता.

कात्यायन. नवऱ्याचें धन **पत्नी** घेईल, परंतु ती जर व्यभिचारिणी नसेल तर. तिच्या अभावीं कन्या, परंतु ती **अविवाहित** असेल-तर

---

१ जात्यभिप्राय ह्मणजे अनेक व्यक्तींवर राहणारा असा सत्तारूप एक धर्म आहे. त्या धर्माच्या पुरस्कारें अनेक सजातीय अशा वस्तूंचा वाचक असा एकवचनांत निर्देश करणें. ह्मणजे असें, ती फौज, तें सैन्य, ती बायको, तें माणूस, "बायको जमा झाली" तेथें फारमाणूस मिळालें आहे इत्यादिक.

---

२ यथांश ह्मणजे ब्राह्मणीनें चार क्षत्रियेनें तीन वैश्येनें दोन आणि शूद्रेनें एक अंश या प्रमाणें.

# प्रकरण ७

## दायविभाग.

स्मृति. निपुत्रिकाच्या जिंदगीची वारीश कुलीन[1] पत्नी अथवा कन्याही, तदभावीं पिता, त्याच्या अभावीं माता, भाऊ, पुतणे, सांगितले आहेत.

बृहस्पतिही. स्वकुलोत्पन्न जे पिता, माता, सहोदर, हे विद्यमान असतां निपुत्रिक मरणपावल्यानंतर जिंदगीची वारीश पत्नी.

३ शंका — वर सांगितलेल्या वचनाशीं विरुद्ध अशी वचनें पाहण्यांत येतात.

नारद. जर भावांतून कोणी निपुत्रिक मरेल किंवा संन्याशी होईल, तर त्याचें धन इतर भावांनीं वांटून घ्यावें परंतु स्त्रीधनावांचून. आणि जो मृत झाला त्याच्या स्त्रियांचें मरणपर्यंत पोषण करावें परंतु पतिव्रता असल्यास. पतिव्रता नसल्यास अन्नाच्छादन देखील देऊं नये.

असें नारदानें पत्नी विद्यमान असतांही भावांनीं धन घ्यावें. व स्त्रियांचें पोषण मात्र करावें. असें सांगितलें.

मनु. अपुत्राची जिंदगी पित्यानें घ्यावी, अथवा भावांनीं घ्यावी.

असें मनूनें अपुत्राचें धन पित्याकडे किंवा भावांकडे जातें असें दाखविलें आहे.

मनु. तसेंच निपुत्रिकपुत्राची जिंदगी आईनें घ्यावी. आई निवर्तल्यावर पितामहीनें घ्यावी.

---

१ कुलीन ह्मणजे सत्कुलांत झालेली अर्थात् सुशील अव्यभिचारिणी अशी.

# प्रकरण ७.

## दायविभाग.

असा आईला व पितामहीला जिंदगीचा संबंध दाखविला आहे.

शंख. अपुत्र मृत झाला असतां त्याचें धन भावांकडे जातें, त्याच्या अभावीं आईबाप घेतील, किंवा ज्येष्ठ **पत्नी**.

असा शंखानें भावांस, आईबापांस, आणि ज्येष्ठ **पत्नी**स क्रमानें धनसंबंध दाखविला आहे.

कात्यायनही. विभक्त असून अपुत्र मरण पावला तर जिंदगीचा वारीस पिता अथवा भाऊ किंवा जननी अगर पितामही असा क्रम.

**इत्यादिक** जीं विरुद्ध वाक्यें आहेत त्यांची धारेश्वर व्यवस्था दाखवितो.

४ अपुत्राची जिंदगी **पत्नी**नें घ्यावी. असें दाखविणारा जो वचनसमुदाय तो विभक्त भावाच्या **पत्नी** विषयीं. परंतु ती जर **नियोग** इछिणारी आहे तर.

**पत्नी नियोग** इछिणारी आहे तर तिला धनसंबंध, स्वातंत्र्यें करून नाहीं. असा अर्थ कोठून ह्मणाल तर (सांगतों) "अपुत्राचें धन पिता घेईल किंवा भाऊ घेनील" **इत्यादिक** वचनावरून तेथें कांहीं तरी व्यवस्थाकारण सांगितलें पाहिजे. तें यावांचून दुसरें व्यवस्थाकारण दिसत नाहीं व गौतमवचनावरूनही असें सिद्ध होतें.

गौतम. पिंड गोत्र **ऋषि** यांचा ज्यांस संबंध आहे ते अपुत्राचें **रिक्थ** घेतील, किंवा स्त्री घेईल. परंतु ती **नियोग** इछिणारी

# प्रकरण ७

## दायविभाग.

आहे तर.

मनुही. जो आपल्या मेलेल्या भावाचें धन घेतो व स्त्री घेतो त्या नें आपल्या भावाला संतति उत्पन्न करून देऊन तें भावाचें धन त्याचे संततीलाच द्यावें

५ **इत्यादिक** वचनावरून हें दाखविलें जातें कीं, भ्राता जिंदगीनें विभक्त असूनही जर मृत झाला, तर त्याच्या **पत्नी** ला संततिद्वाराच धनसंबंध आहे. अन्यथा नाहीं. तसेंच **अविभक्त** असतांही

स्मृति. कनिष्ठ बंधु ज्येष्ठ बंधूचे भार्येला जर पुत्र उत्पन्न करितो तर. तेथें समविभाग होईल. अशी धर्मव्यवस्था आहे.

वसिष्ठही. (स्त्रीला) जिंदगीचे लोभासाठीं **नियोग** नाहीं.

असा जिंदगीचे लोभास्तव **नियोगा**चा निषेध करून **नियोग**द्वाराच **पत्नी**ला धनसंबंध आहे. अन्यथा नाहीं. असें दाखवितो.

६ **नियोग** नसतांही **पत्नी**चें पोषण मात्र करावें. असें नारदवचनावरून सिद्ध होतें.

नारद. भावांच्या स्त्रियांचें आमरणपर्यंत पोषण करावें.

याज्ञवल्क्यही पुढें (३० व्या शाखेच्या ७ व्या अंकाचे वचनांत) सांगतो.

याज्ञवल्क्य. ह्यांच्या (भावांच्या) निपुत्रिक स्त्रिया सदाचारसंपन्न आहेत तर पोसाव्या. आणि व्यभिचारिणी तशाच प्रतिकूळ असतील त्या घालवून द्याव्या.

# प्रकरण ७

## दायविभाग.

७ अणखी असें कीं द्विजांचें धन यज्ञासाठीं, व स्त्रियांस तर यज्ञाविषयीं अधिकार नाहीं. ह्मणून स्त्रियांस धन ग्रहण अयोग्य.

तसेंच अणखी कोणी सांगतो.

स्मृति. द्रव्यसंपादन यज्ञासाठीं, अतएव यज्ञाविषयीं जे अनधिकारी त्या सर्वांस रिक्थ देऊं नये. ते अन्नाछादनमात्र पावतील. धन यज्ञासाठीं विहित आहे ह्मणून त्याचा धर्माकडेच विनियोग करावा. स्त्री, मूर्ख, अधर्मवतर, यांनें गर्यां करूं नये.

८ असें[1] जें सांगितलें, त्याची उपपत्ति होत नाहीं. कारण पत्नी, (तिच्या अभावीं) कन्या, इत्यादिकांचे प्रतिपादक जें वचन[2] त्यांत नियोगाची अगदीं प्रतीति नाहीं आणि तेथें नियोग सांगणेंही अप्रस्कृत आहे.

९ अणखी असें कीं, पत्नीला जिंदगी घेण्याविषयीं नियोगच निमित्त, किंवा नियोगानें उत्पन्न झालेलें अपत्य निमित्त.

जर नियोग निमित्त मानिलें तर जिला (नियोग झाला पण) अपत्य झालें नाहीं अशा पत्नीलाही धनसंबंध

---

१ असें जें ह्मणजे ४थ्या अंकापासून येथपर्यंत.

---

२ वचन ह्मणजे ३ ऱ्या अंकाचें वचन.

# प्रकरण ७

## दायविभाग.

प्राप्त होतो. उत्पन्न झालेल्या पुत्रास धनसंबंध येत नाहीं.

जर नियोगाने उत्पन्न जें अपत्य, तें (धनग्रहणाविषयीं) निमित्त मानिलें तर पुत्रासच धनसंबंध प्राप्त झाला सबब वचनांत[1] "पत्नी" असा प्रथमतः उपक्रम केला तो व्यर्थ.

स्त्रियांस नवऱ्याच्याद्वारें धनसंबंध, किंवा पुत्रद्वारा, अन्यथा नाहीं. असें जें मत आहे तेंही नीट नाहीं. कारण "अध्यग्नि, अध्यावहनिक, प्रीतिदत्त, तसेंच भाऊ, आई, बाप, यांकडून मिळालेलें. असें साहाप्रकारचें स्त्रीधन सांगितलें." इत्यादिकच नाशीं विरोध येतो.

आणखी असें कीं "सर्वपुत्रांच्या अभावीं पत्नी कन्या" असा उपक्रम केला त्यांत नियुक्तेला धनसंबंध सांगणाराने क्षेत्रजासच धनसंबंध सांगितल्या सारखा होतो. आणि तो तर पूर्वींच सांगितला आहे. मग या अपुत्रप्रकरणीं[2] "पत्नी" असा आरंभ करायास नको.

गोतम. १० पिंड, गोत्र, ऋषि, यांचा ज्यांस संबंध आहे. ते निपुत्रिकाची जिंदगी घेतील किंवा स्त्री घेईल. किंवा जी नियोगापासून गर्भेच्छा धरील ती स्त्री घेईल.

अशा गोतमवचनावरून नियुक्तस्त्री वारीश ह्मणावी, तर

---

१ वचनांत ह्मणजे १ल्या अंकाचे वचनांत.

---

२ अपुत्रप्रकरणीं ह्मणजे २६ व्या शाखेंत.

# प्रकरण ७
## दायविभाग.

तेंही नीट नाहीं. कारण "जर ती नियोगापासून गर्भ धरील तर अनपत्य नवऱ्याचें धन पावेल" असा अर्थ या (गौतम) वचनावरून अवगत होत नाहीं. इतकाच त्याचा अर्थ कीं निपुत्रिकाचें धन. त्याचे पिंड, गोत्र, ऋषि, या संबंधाचे असतील ते घेतील. किंवा स्त्रीने घ्यावें. त्या स्त्रीने नियोगापासून गर्भेच्छा धरावी किंवा व्रतस्थ राहावें. असा तिला वैकल्पिक अन्य धर्माचा उपदेश सांगितला. त्या विकल्प वाचक "किंवा" या शब्दापासून "जर" या अर्थाची अगदीं प्रतीति होत नाहीं.

११ दुसरें असें कीं व्रतस्थ पत्नीलाच धनग्रहण युक्त आहे. स्मृतिनिंदित व लोकनिंदित अशा नियुक्त स्त्रीला धनग्रहण युक्त नाहीं.

स्मृति. नवऱ्याच्या शय्येचें संरक्षण करणारी, व्रतस्थ, अशा अपुत्र स्त्रीनेच आपल्या नवऱ्यास पिंड द्यावा. आणि त्याचें सर्व धन घ्यावें.

असें व्रतस्थ स्त्रीलाच धनग्रहण सांगितलें आहे.

तसाच नियोगाविषयीं तर मनु निषेध सांगतो.

मनु. १२ द्विजांनी विधवेला अन्यपुरुषाचे गर्भी नियुक्त करूं नये. कारण अन्याशीं नियुक्त करणारे, सनातन धर्माचा उच्छेद करितात.

वसिष्ठ. जिंदगीच्या लोभास्तव स्त्रीला नियोग उक्त नाहीं.

असें जें वचन आहे त्याची ही व्याख्या अशी कीं अविभक्त किं

# प्रकरण ७

## दायविभाग

वा **संसृष्ट** झालेला असा नवरा मेला असतां त्याच्या स्त्रीला ध नसंबंध नाहीं. व आपल्या अपत्यास धनसंबंध असावा एतदर्थ तिनें **नियोग** करूं नये.

नारद. ह्याच्या (निपुत्रिक मेलेल्या भावाच्या) स्त्रियांचे आमरणप र्यंत पोषण करावें.

असें जें वचन, तें ही "**संसृष्टी**चा जो भाग असेल तो त्यांचा (संसृष्टींचा) च" असें **संसृष्टीं**स प्रस्तुतलआहे ह्मणून त्याच्या (संसृष्टींतून एखाद्या मेलेल्याच्या) अनपत्य स्त्रियांचे पोषणमात्र करावें असें प्रतिपादन करितें.

नारद. १२ भावांतून कोणी निपुत्रिक मरेल, अथवा सन्यस्त होईल तर त्याचें धन त्या इतरांनीं वांटून घ्यावें. परंतु **स्त्रीधना** शिवाय.

असें जें वचन, तें ही **संसृष्टी** विषयींच. असें मानिलें तर वर चें वाक्य व हें वाक्य हीं एकार्थ प्रतिपादक झालीं ह्मणून **पुनरुक्त दोष** येतो. अशी आशंका घेऊं नये. कारण पूर्वीं सांगितलेल्याची च आतां व्याख्या करितांना **स्त्रीधन अविभाज्य** आणि त्याचें (अविभक्ताच्या किंवा संसृष्टाच्या स्त्रियांचें) पोषणमात्र करावें. अशा वाक्यें करून दोहों अर्थांचें विधान केलें. (केवळ पूर्वोक्त अर्थ च पुनः सांगितला असें नाहीं.)

याज्ञवल्क्य. भावांच्या निपुत्रिक स्त्रिया सदाचारसंपन्न आहेत तर पोसा व्या. व्यभिचारिणी तशाच प्रतिकूल असतील त्या घालवाव्या.

असें जें वचन, तें नपुंसकादिकांच्या स्त्रियांविषयीं असें पुढें

# प्रकरण ७.

## दायविभाग.

(३० व्या शाखेच्या ७ व्या अंकाचे वचनांत) सांगितलें आहे.

१४ द्विजाचें धन यज्ञार्थ आहे, आणि स्त्रियांस तर यज्ञाविषयीं अधिकार नाहीं, ह्मणून त्यांस धनग्रहणच युक्त नाहीं.

असें जे मत तेंही अप्रयोजक कारण, जर सर्वद्रव्यसमुदाय यज्ञोपयोगी कल्पिले, तर द्रव्यसाध्य जें दान, धर्म, होम, इत्यादिक तें घडणार नाहीं.

१५ बरें जर यज्ञ शब्द धर्ममात्राचें उपलक्षण. यास्तव दान, होम. इत्यादिक ही धर्मांतर्गतच आहेत ह्मणून द्रव्य समुदायास धर्मार्थत्व विरुद्ध नाहीं. असें मत आहे ह्मणावें तर द्रव्यसाध्यजे अर्थ, काम, यांची तर सिद्धीच होणार नाहीं.

याज्ञवल्क्य. धर्म, अर्थ, आणि काम, यांची हानि करूं नये. यथाशक्ति आचरावें.

गोतम. धर्म, अर्थ, व काम, यांच्या आचरणावांचून पूर्वाह्ण, मध्याह्न, अपराह्ण, हे काळ उगेच विफळ घालवूं नयेत.

मनु. ह्या (विषयासक्तीनें दोषजनक) इंद्रियांचे रूपादिविषयाच्या उपभोगावांचून तसें[1] दमन होऊं शकत नाहीं.

---

सुबोधिनी. १ तसें ह्मणजे अविनाशी अशा विषयांत सर्वदा संचार करणारी अशींजीं इंद्रियें त्यांच्या नियमाविषयीं यत्न करावा. असा इंद्रियसंयमाविषयीं मनु उपक्रम करून सांगतो कीं सर्व काम्यविषयांचा उपभोग करावा. यापेक्षां परित्याग करावा हें समीचीन. कारण विषयासक्तीनें दोषोत्पादक जीं हीं इंद्रियें त्यांचें रूपादिविषयोपभोगावांचून तसें दमन होऊं शकत नाहीं कीं जसें विषयोपभोगानें दमन करवतें. परंतु तोउप

# प्रकरण ७

## दायविभाग.

इत्यादिक जीं याज्ञवल्क्य गौतम मनु वचनें आहेत त्यांशीं विरोध येतो.

१६ अणखी असें कीं जर द्रव्य यज्ञार्थ मानिलें तर "हिरण्य धारण करावें" असें हिरण्यधारणास यज्ञार्थतेनें निराकरणकरून सिद्धांतीं पुरुषार्थसाधकत्वच (मीमांसेंत) सांगितलें आहे तें विपरीत कथन होईल. (असा न्यायविरोधही येईल.)

१७ यज्ञशब्द जर धर्मोपलक्षकहोईल तर स्त्रियांसही पूर्त धर्मकृत्याविषयीं अधिकार असल्यामुळें त्यांस धनग्रहण विशेषें करून युक्तच आहे. "स्त्रियांस मुळीं स्वातंत्र्यच नाहीं" असें जें पारतंत्र्य दाखविणारें वचन आहे, तेणेकरून असो पारतंत्र्य. पण धन घेण्याविषयीं काय विरोध.

१८ शंका —— "यज्ञार्थ द्रव्य उत्पन्न केलेलें" इत्यादिक (७व्या अंकांतील) जी स्मृति तिची उपपत्ति कशी?

समाधान——यज्ञार्थ संपादिलें जें धन त्याचा यज्ञाविषयींच विनियोग करावा पुत्रादिकांनीही. असा त्या वचनाचा अर्थ, कारण. "यज्ञार्थ लब्ध जें धन तें यज्ञार्थ न देणारा भास किंवा कावळा होईल" असा जो दोष सांगितला तो पुत्रादिकांचे ठायीं समानच आहे.

कात्यायन. १९ बेवारीश जिंदगी राजानें घ्यावी पण भालकाच्या स्त्रि

---

भोग अनिषिद्ध विषयांचा असला पाहिजे कारण अनिषिद्ध विषयोपभोगाला दैवस्थ्यास्य दकत्वें करून कर्तव्यता आहे. म्हणून अर्थ व काम अवश्य साधावे.

# प्रकरण ७

## दायविभाग.

यांस अन्नाछादनापुरतें, व मालकाच्या श्राद्धादिकापुरतें, व चा करांसाठीं ठेवून बाकी राहिलेली. परंतु जर **श्रोत्रिया**चें द्रव्य बेवारीचें आहे तर मालकाच्या स्त्रिया व श्राद्धादिक व चाकर यां पुरतें राखून बाकी **श्रोत्रियास** द्यावें.

असें जें वचन तेंही **अवरुद्ध**स्त्रीविषयींच कारण स्त्रीश ब्दाचा निर्देश आहे ह्मणून.

नारद. ब्राह्मणाशिवाय अन्यजातींतली बेवारीश जिंदगी **राजा**ने घ्यावी. आणि मालकाच्या स्त्रियांस उपजीविका द्यावी. असा **दाय** घेण्याचा विधि सांगितला आहे." हें वचनही **अवरुद्ध**स्त्री विषयींच कारण स्त्रीशब्दाचा निर्देश केला आहे. येथें (२६व्या शाखेच्या १ल्या अंकाचे मूळवचनांत) तर **पत्नी** शब्दाचा निर्देश केला आहे. ह्मणून विवाहित, व व्रतस्थ अशी जी **पत्नी** तिला धनग्रहणाविषयीं विरोध नाहीं."

२० तस्मात् विभक्त व **असंसृष्ट** असा निपुत्रिक मरण पावला असतां त्याची **पत्नी** प्रथमतः जिंदगी घेणारी हा अर्थ सिद्ध झाला. कारण विभाग तर पूर्वीं (४थ्या शाखेंत) उक्तच आहे व **संसृष्टी** पुढें (३९व्या शाखेंत सांगितले आहेत.)

येणेंकरून श्रीकरादिकांनीं **पत्नी**ला जो अल्पधनाविष यीं अधिकार सांगितला तोही निरस्त झाला. तो प्रकार असा, **औरस**पुत्र असला तरी व मालक जीवंत असतां किंवा मेल्यानं तरही **पत्नी**ला पुत्रसमांशग्रहण असें (४थ्या शाखेच्या १ल्या अंकाचें मूळवचनांत) सांगितलें आहे कीं "जर पुत्रांस समविभा

# प्रकरण ७

## दायविभाग.

ग देतो तर **पत्नी**लाही समविभाग द्यावा" तसेंच "पिता निवर्तल्यावर वांटे करणाराची जननीही समविभाग पावेल" असें (१५ व्या शाखेच्या १ ल्या अंकांचे मूळवचनांत) आहे ह्मणून अपुत्रमयतानें धन **पत्नी**ला अन्नाछादनाहून अधिक मिळणार नाहीं असें ह्मणणें केवळ व्यामोहमात्र.

अगर्वा "**पत्नी**लाही समविभाग द्यावा" असें (४ थ्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगितलें व "जननीही समविभाग पावेल" असें (१५ व्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगितलें. तेथें उपजीविकेपुरतेंच धन घ्यावें. असें जें मत आहे. तें असमीचीन कारण अंशशब्दास व समशब्दास अनर्थप्रसंग येईल.

२१ बहुधन असल्यास **पत्नी**ला उपजीविकेपुरतें मात्र द्यावें. आणि अल्प असलें तर **पत्नी**नें पुत्राबरोबर अंश घ्यावा. असें मत असलें तरी तेंही संभवत नाहीं. कारण **विधिवैषम्य**[1] प्रसंग येतो. तो प्रकार असा. "**पत्नी**लाही समविभाग द्यावा" आणि "जननीही समविभाग पावेल" या वचनेंकरून बहुधन असल्यास **पत्नी**ला उपजीविकेपुरतें द्यावें. असें प्रतिपादन करणें तर वचनांतराच्या आश्रयानें केलें पाहिजे. अन्यथा होत नाहीं. आणि अल्पधन आहे तर

---

१ विधिवैषम्यप्रसंग ह्मणजे ज्यास्थळीं एकवेळ सांगितलें एकवचन पक्षीं सापेक्ष होतें आणि पक्षीं निरपेक्ष होतें असें एकरूपत्व नाही. प्रकृतींही तसेंच आहे.

# प्रकरण ७

## दायविभाग.

पुत्राच्या वांट्याबरोबर वांटा घ्यावा. हें प्रतिपादन करावयास वचनांतराची अपेक्षा नको.

मनु. २२ अपुत्राची जिंदगी पित्यानें अथवा भावांनीं घ्यावी.

शंख. अपुत्रस्वर्गवासीचें द्रव्य भावांनी, त्याच्या अभावीं आईबापांनी, किंवा ज्येष्ठ **पत्नी**नें घ्यावें.

या प्रमाणें मनुवचन व शंखवचन यांवरून अपुत्रधन भावांकडे जातें असें प्राप्त झालें, व "अनपत्य स्त्रीचें आमरणपर्यंत पोषण करावें" **इत्यादि**वचनावरून अनपत्य बंधूची स्त्री पोषणापुरतेंमात्र धनपावती. असें सिद्ध झालें असतां बहुधन अपुत्र मेला तर त्याच्या बायकोने उपजीविकेपुरतें धन घ्यावें. आणि उरलेलें भावांनी घ्यावें.

बरें जर **पत्नी**च्या उपजीविकेपुरतेंच द्रव्य आहे किंवा त्यापेक्षांही न्यून आहे तर काय **पत्नी**च घेईल? अथवा भाऊ घेतील. असा विरोध प्राप्त झाला असतां प्रथम (पत्नी घेईल हा) कल्पच बलवत्तर. असें सुचविण्यासाठीं "**पत्नी**, कन्या," **इत्यादि**काचा उपक्रम केला.

२३ असें जें मत आहे तें ही पूज्य आचार्य मान्य करीत नाहीं. कारण "अपुत्राची जिंदगी पित्याने अथवा भावांनी घ्यावी." असा मनूनें विकल्प सांगितल्यावरून हें (मनु) वचन (पित्याच्याअभावीं भाऊ असा) क्रम दाखविणारें नव्हे. केवळ जिंदगी घेण्याविषयीं अधिकार दाखविणारें मात्र होय. ह्मणून हें मनुवचन पत्न्यादिगणाच्या अभावींही कृतार्थ होतें. शंखवचनही **संसृष्ट** भावांविषयींच आहे.

# प्रकरण ७

## दायविभाग.

अणखी असें आहे कीं, अल्पधन असल्यास **पत्नी** घेईल असें ह्या (२६ व्या शाखेच्या मूळ) वचनापासून किंवा प्रकरणापासून देखील अवगत होत नाहीं.

हारीत. विधवा तारुण्यदशेंत असल्यामुळें जर **कर्कशा** आहे तर तिच्या आयुष्याच्या क्षयार्थ अन्नाच्छादन मात्र द्यावें.

असें जें वचन तें ही जर ती **कर्कशा** ह्मणजे शंकितव्यभिचारिणी आहे तर तिला सकलधनग्रहणाच्या निषेधाविषयीं. अर्थात् या वचनावरून अशंकित व्यभिचारिणी आहे तर तिने सकल धन घ्यावें हें सिद्ध होतें.

शंखही हेंच अभिमत करून सांगतो.

शंख. अपुत्र स्वर्गवासीचें द्रव्य भावांनीं, त्याच्या अभावीं आईबापांनीं, अथवा ज्येष्टपत्नीने घ्यावें.

ज्येष्ट ह्मणजे गुणेकरून ज्येष्ट, व जी शंकितव्यभिचारिणी नव्हे. तिनें सकळधन घेऊन दुसऱ्या **कर्कशेचें**ही मातृवत् पालन करावें. याप्रमाणें येथपर्यंत सर्व निर्दोष जाणावें.

२४ तस्मात् विभक्त व **असंसृष्ट** असा अपुत्र मरणपावला असतां त्याची लग्नाची व व्रतस्थस्त्री साऱ्या जिंदगीची मालक होती. असें सिद्ध झालें.

२५ तिच्या अभावीं लेंकी मालक होतात. "लेंकी" असा बहुवचनांत निर्देश केला तो. समानजातीय व असमान जातीय लेंकीस समविषमांश प्राप्त्यर्थ केला. पत्नीच्या अभावीं कन्या वारीश.

कात्यायन. भर्त्याच्या जिंदगीची वारीश **पत्नी** परंतु व्यभिचारिणी नसेल

# प्रकरण ७

## दायविभाग.

तर. तिच्या अभावीं कन्या. पण जर ती **अविवाहित** असेल तर,

बृहस्पति ही नवऱ्याचें धन घेणारी **पत्नी**, तिच्या अभावीं कन्या, कारण पुत्राप्रमाणे कन्येचाही आईबापाच्या प्रत्येक अंगापासून संभव आहे. यास्तव पितृधन (कन्या संभवत असतां) दुसरा मनुष्य कसें घेईल?

लेंकींत ही विवाहित व **अविवाहित** अशा कन्यांचा समवाय असल्यास **अविवाहित** कन्येनेंच घ्यावें. कारण, "तिच्या अभावीं कन्या, पण जर ती **अविवाहित** असेल तर" असें कात्यायनाचें विशेष वचन आहे.

तसेंच सधन व निर्धन यांचा समवाय असल्यास निर्धनच घेईल, तिच्या अभावीं सधन कन्या.

गोतम. **स्त्रीधन अविवाहित** व निर्धन अशा कन्येकडे जातें.

असें गोतमवचन पितृधनाविषयींही समानच आहे.

परंतु हें (गोतमवचन) **पुत्रिके** विषयीं असें ही कोणी मानितील तर मानूं नये कारण "**औरसा** सारिखाच **पुत्रिकासुत**" असें **पुत्रिका** व तिचा पुत्र हे **औरसा** सारिखेच असें पुत्रप्रकरणीं (२८ व्या शाखेचे मूळवचनांत) पठित आहे.

२६ लेंकीच्या अभावीं दौहित्र जिंदगीचा वारीश होतो. कन्येच्या अभावीं दौहित्र वारीश.

विष्णु. पुत्र व पौत्र संतान नसेल तर दौहित्र जिंदगी घेतील आणि मातामहादिकांच्या श्राद्धादिक्रियांविषयीं दौहित्र पौत्राच्या ठिकाणीं अधिकारी होतो.

# प्रकरण ७

## दायविभाग.

मनुही. कन्या पुत्रस्थानीं मानलेली असो किंवा नसो तिला **सवर्णा** पासून जो पुत्र होतो तेणेकरून तो आईचा बाप पौत्रवान् होतो. तो पौत्र त्या मातामहाचें धन घेतो व पिंड देणाराही होतो.

२७ दौहित्राच्या अभावीं जननी जिंदगीची मालक होती. पित्याचे आधीं जननीला जिंदगीचा अधिकार सांगण्याचें कारण पिता सर्वपुत्रांविषयींही एक सारखाच. परंतु जननी इतरपुत्रां (सावत्रपुत्रा) विषयीं तशी नाहीं. ह्मणून **प्रत्यासत्ती**च्या आधिक्यास्तव. व "**सपिंडां**मध्यें जो सन्निहित असेल तो जिंदगी घेईल". अशा मनुवचनावरून जननीलाच प्रथमतः धनग्रहण सयुक्त आहे. — दौहित्राच्या अभावीं जननी वारीश.

२८ (धनग्रहणाविषयीं) **प्रत्यासत्ती**चा नियम **सपिंडां**तच असें नाहीं. **समानोदका**दिकांत ही सामान्यतः धनग्रहण प्राप्त झालें असतां तेथें ही **प्रत्यासत्ती**च नियामक असें या (वरच्या मनु) वचनावरून अवगत होतें.

यास्तव आईबापांतून जननीचीच अतिशय **प्रत्यासत्ति** ह्मणून प्रथमतः तिलाच धनग्रहण विशेषेंकरून सयुक्त आहे.

२९ जननीच्या अभावीं बाप जिंदगीचा वारीश होतो. बापाच्या अभावीं भाऊ जिंदगीचे वारीश. — जननीच्या अभावीं बाप वारीश त्याच्या अभावीं भाऊ.

मनु. अपुत्राची जिंदगी पित्यानें घ्यावी. अथवा[1] भावांनी घ्यावी.

---

१ अथवा ह्मणजे पित्याचे अभावीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### धारेश्वराचें मत

मनु. अनपत्यपुत्राची जिंदगी आईनें घ्यावी. आई निवर्तल्यावर पितामहीनें घ्यावी.

अशा मनुवचनावरून पिता जीवंत असतां ही आई निवर्तल्यावर पितामही जिंदगीची वारीश. पिता नाहीं. कारण पित्यानें घेतलेलें धन भिन्नजातीयपुत्रांकडे ही जातें. आणि पितामहीनें घेतलेलें तर सजातीयपुत्रांकडेसच जातें ह्मणून पितामहीनेंच घ्यावें.

असें जें धारेश्वरानें सांगितलें तें ही आचार्यास अनुमत नाहीं. कारण भिन्नजातीयपुत्रांस ही धनग्रहण (१६व्या शाखेंत) सांगितलें आहे.

मनु. राजानें ब्राह्मणद्रव्याचें कधीं ही हरण करूं नये. अशी शास्त्रमर्यादा आहे.

असें जें वचन, तें राजाच्या उद्देशें करून. पुत्राच्या अभिप्रायें करून नाहीं.

३० भावांत ही प्रथमतः सखे भाऊच घेतील. कारण सापत्नबंधूची जननी भिन्न होय ह्मणून. — बापाच्या अभावीं सखे भाऊ वारीश.

मनु. सपिंडांमध्यें जो सन्निहित असेल तो जिंदगी घेईल.

३१ सख्या बंधूच्या अभावीं सावत्र भाऊ जिंदगीचे वारीश. — सख्याबंधूच्याअभावीं सावत्रबंधु वारीश.

भावांच्या अभावीं पुतणे[१] आपापल्या पित्याच्या अनुक्रमानें

---

१ हा अनुक्रम १० व्या शाखेंत सांगितला आहे; त्याप्रमाणेंच पुतण्या एक किंवा बहुत असले तरी पितृद्वाराच भाग मिळेल स्वरूपतः नाहीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

जिंदगीचे वारीश.

३२. भाऊ व पुतणे हे दोघे असल्यास जिंदगी घेण्याविषयीं पुतण्यास अधिकार नाहीं. कारण भावांच्या अभावीं पुतण्यास अधिकार. असें वचनावरून अवगत होतें.

३३. अपुत्र भाऊ मरण पावल्यानंतर त्याच्या भावांस तर सामान्यतः धनसंबंध प्राप्त झाला असतां मयत भावाच्या जिंदगीचे वांटे होण्यापूर्वीच जर त्यांतून एखादा भाऊ मेला तर त्याच्या पुत्रांस पितृद्वारा वांटा घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. यास्तव त्या सर्व भावांस जिंदगी वांटून घेण्याविषयीं पित्याचे द्वारें (१० व्या शाखेंत सांगितलेली) विभागाची रीतिच सयुक्त.

३४ पुतण्याच्या अभावीं **गोत्रज** जिंदगीचे वारीश. पुतण्याच्या अभावीं गोत्रज.

**गोत्रज** ह्मणजे पितामही **सपिंड व समानोदक**. त्यांत प्रथमतः पितामही धनाची वारीश. "आई निवर्तल्यावर पितामहीनें घ्यावी." असा आईच्या पाठीमागें पितामहीला धनग्रहणाविषयीं अधिकार प्राप्त असतां आईपासून पुतण्यापर्यंत वारिशांच्या बांधलेल्या अनुक्रमांत मध्यें पितामहीचा प्रवेश होऊं शकत नाहीं. कारण "पितामहीनें घ्यावी." हें वचन पितामहीला धनग्रहणीं केवळ अधिकारमात्र दाखवितें. ह्मणून पुतण्याच्या अभावीं पितामही वारीश असा विरोधपरिहार जाणावा.

३५ पितामहीच्या अभावीं **समानगोत्रज सपिंड** मातामह **इत्यादिक** जिंदगीचे वारीश **भिन्नगोत्र** अशा सपिंडाचें ग्रहण तर **बांधव** शब्दें करून होतें.

# प्रकरण ७

## दायविभाग.

३६ पितृसंतानाच्या अभावीं पितामही, पितामह, चुलता, चुलतभाऊ, हे अनुक्रमाने जिंदगीचे अधिकारी. — पितृवंश नसल्यास पितामहाचा वंश.

३७ पितामहाचा वंश नसल्यास प्रपितामही, प्रपितामह, त्याचे पुत्र, त्याच्या पुत्रांचे पुत्र. याप्रमाणें सातव्या पिढीपर्यंत **समानगोत्र, सपिंड**, यांस धनग्रहण जाणावें. — पितामहाचा वंश नसल्यास प्रपितामहाचा वंश.

३८ त्यांच्या (समानगोत्रांच्या व सपिंडांच्या) अभावीं **समानोदक** जिंदगीचे वारीस. ते **समानोदक सपिंडांवर** अणखी पुढें सात पिढ्यापर्यंत किंवा ज्याचें जन्म नाव ठाऊक आहे तेथपर्यंत (पुरुष) जाणावे.

बृहन्मनु. **सपिंड** सात पिढ्यापर्यंत, पुढें नाहींत. आणि **समानोदक** तर चौदा पिढ्यापर्यंत. कोणी ह्मणतात कीं, जन्म नाव यांची स्मृति आहे तेथपर्यंत **समानोदक**. त्याच्या पुढें गोत्र ह्मटलें आहे.

३९ **गोत्रजांच्या** अभावीं **बांधव** जिंदगी घेण्याविषयीं अधिकारी होतात. — बांधव जिंदगीचे वारीस

### **बांधव** तीन प्रकारचे.

### आत्मबंधू, पितृबंधू, आणि मातृबंधू.

स्मृति.

**आत्मबंधू**— आपल्या आतेचे पुत्र, आपल्या मावशीचे पुत्र, आणि आपल्या मामाचे पुत्र. — आत्मबंधु.

**पितृबंधू**— बापाच्या आतेचे पुत्र, बापाच्या मावशीचे पुत्र, आणि बापाच्या मामाचे पुत्र. — पितृबंधु.

**मातृबंधू**— आईच्या आतेचे पुत्र, आईच्या मावशीचे पुत्र, आणि आईच्या मामाचे पुत्र. — मातृबंधु.

# प्रकरण ७

## दायविभाग.

४० त्यांत जवळच्या नात्यामुळें, प्रथमतः **आत्मबंधू** जिंदगीचे वारीश. त्यांच्या अभावीं **पितृबंधू**. **पितृबंधूंच्या** अभावीं **मातृबंधू**. असा क्रम जाणावा. सदरहू बंधूंस जिंदगीचे ण्याचा क्रम.

४१ **बांधवांच्या** अभावीं **आचार्य**, त्याच्या अभावीं शिष्य जिंदगीचा अधिकारी. बंधूंच्या अभावीं आचार्य त्यांच्या अभावीं शिष्य.

आपस्तंब पुत्राच्या अभावीं जो जवळचा **सपिंड** असेल तो. त्याच्या अभावीं **आचार्य**, त्याच्या अभावीं शिष्य.

४२ शिष्याच्या अभावीं **सब्रह्मचारी** जिंदगीचा वारीश. **सब्रह्मचारी** ह्मणजे ज्या सहवर्तमान एका गुरूपासून मुंज व वेदाध्ययन आणि त्या वेदाचें अर्थज्ञान प्राप्त झालें तो. शिष्याच्या अभावीं सहाध्यायी.

४३ ब्राह्मणद्रव्य असल्यास **सब्रह्मचारीच्या** अभावीं **श्रोत्रिय** वारीश. निपुत्रिक ब्राह्मणाची वेवारीश जिंदगी श्रोत्रियास द्यावी.

गौतम. निपुत्रिक ब्राह्मणाची जिंदगी **श्रोत्रियानें** घ्यावी.

**श्रोत्रियाच्या** अभावीं सामान्य ब्राह्मण जिंदगीचा वारीश.

मनु. सर्व वारीशांच्या अभावीं **त्रैविद्य**, शुचिर्भूत, इंद्रियनिग्रह करणारे, असे ब्राह्मण जिंदगीचे वारीश. असें झालें असतां धर्मलोप होत नाहीं.

असें आहे ह्मणून ब्राह्मणद्रव्य **राजानें** कधींही घेऊं नये.

मनु. **राजानें** ब्राह्मणद्रव्याचें कधींही हरण करूं नये. अशी शास्त्रमर्यादा आहे.

नारदही. ब्राह्मण मरण पावला असतां त्याच्या जिंदगीला कोणी वारीश नाहीं तर **राजानें** ती जिंदगी ब्राह्मणासच द्यावी. असें न केल्यास **राजा**

पापी होतो.

४४ क्षत्रियादिकांचे धन तर **सब्रह्मचारी** पर्यंत वारीश नसल्यास **राजानें** घ्यावें. ब्राह्मण अधिकारी नाहींत.

ब्राह्मणाखेरीज इतरजातींत बेवारीशजिंदगीराजानेंघ्यावी.

मनु. इतर जातींत सर्व वारिशांच्या अभावीं **राजानें** घ्यावी.

## शाखा २७

पुत्र व पौत्र जिंदगी घेतात. त्यांच्या अभावीं **पत्नी इत्यादिक** अधिकारी असें सांगितलें. या दोहोंचें बाधक सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **वानप्रस्थ**, सन्यासी, आणि **ब्रह्मचारी**, यांच्या जिंदगीचे **आचार्य**, सच्छिष्य **धर्मभ्रात्रेकतीर्थी**, हे क्रमाने वारीश होतात.

टीका.

१ **वानप्रस्थ**, सन्यासी, आणि **ब्रह्मचारी**, यांच्या जिंदगीचे **आचार्य**, सच्छिष्य, **धर्मभ्रात्रेकतिर्थी**[1], हे क्रमाने ह्मणजे उलट क्रमानें वारीश होतात.

२ येथें **ब्रह्मचारी** ह्मणजे **नैष्ठिक**. कारण **उपकुर्वाण ब्रह्मचारीचें** धन आई वगैरे घेतील. **नैष्ठिकाचें** धन तर वरच्या वचनबळावरून आई वगैरेचा बाध करून **आचार्याने** घ्यावें.

---

१ बैरागी गोसावी वगैरे चाही वानप्रस्थांतच अंतर्भाव.

# प्रकरण ७

## दायविभाग.

३ संन्याशाची जिंदगी तर सच्छिष्याने घ्यावी. सच्छिष्य ह्मणजे जो अध्यात्मशास्त्राचें श्रवण, मनन, आचरण, यांविषयीं समर्थ तो. कारण आचार्यादिक ही जर दुर्वृत्त आहेत, तर धन घेण्यास अधिकारी नाहींत. संन्याशाच्याजिंदगीचा वारीश सच्छिष्य.

४ वानप्रस्थाचें धन घेण्यास धर्मभ्रात्रेकतीर्थ अधिकारी आहे. धर्मभ्रात्रेकतीर्थ ह्मणजे धर्मभ्राता (धर्मार्थ मानलेला भाऊ) असा एकतीर्थ ह्मणजे उभयतांचा ब्रह्मचर्यादिक आश्रमही एकच असा जो तो धर्मभ्रात्रेकतीर्थ ह्मटला आहे वानप्रस्थाच्या जिंदगीचा वारीश धर्मभ्रात्रेकतीर्थ.

सदरहू आचार्य सच्छिष्य व धर्मभ्रात्रेकतीर्थ हे मेले, आणि त्यांचे पुत्रादिक जरी विद्यमान आहेत तरी (ब्रह्मचारी यती वानप्रस्थ) यांच्या जिंदगीचा वारीश एकतीर्थच.

वसिष्ठ. ५ शंका —— ज्यांनी आश्रमांतर[1] घेतलें त्यांस विभाग नाहीं.

अशा वसिष्ठवचनावरून आश्रमांतरगतांसमुळीं जिंदगीचा संबंधच नाहीं, मग विभाग तर कोठून.

नैष्ठिकब्रह्मचारी यास स्वसंपादितधनाचा तर संबंधच नाहीं. कारण त्याला प्रतिग्रहादिक नियमाचा निषेध आहे.

गौतम. भिक्षूने संचय करूंनये.

---

१ आश्रमांतर ह्मणजे संन्यास किंवा वानप्रस्थाश्रम असावा.

# प्रकरण ७

## दायविभाग.

असें वचन आहे ह्मणून भिक्षूला स्वसंपादित धनाचा संबंध नाहीं.

स्मृति. ६ समाधान — "एका दिवसा पुरता, अथवा एक महिन्या पुरता, किंवा साहा महिन्या पुरता, अथवा वर्षापुरता, धान्यसंचय करावा. आणि (अधिक) केलेला आश्विनमासीं टाकावा" (आणि तीर्थयात्रेस जावें) अशा वचनावरून **वानप्रस्थास** धनसंबंध आहेच.

स्मृति. ७ संन्याशासही "कौपीन व अंगवस्त्र यांसाठीं त्यानें वस्त्रधारण करावें. आणि योगाभ्यासासाठीं सामग्री, व शाच पादुकाही घ्याव्या" **इत्यादिक** वचनावरून वस्त्रपुस्तकादिकांचा संबंध आहेच.

८ **नैष्ठिकब्रह्मचारी** यासही यात्रेंत शरीरसंरक्षणार्थ वस्त्रादिकांचा संबंध आहेच.

यास्तव त्यांचा (वानप्रस्थ, संन्यासी, आणि नैष्ठिकब्रह्मचारी, यांच्या धनाचा) विभाग सांगितला तो युक्तच आहे.

### शाखा २८

निपुत्रिक मरण पावला असतां त्याच्या धनाचे वारीश **पत्नी** कन्या **इत्यादिक.**
असें पूर्वी (२६ व्या शाखेंत) सांगितलें
त्याचें बाधक सांगतो.

# प्रकरण ७

## दायविभाग.

मूळ.

याज्ञवल्क्य. **संसृष्टी**च्या जिंदगीचा वारीश **संसृष्टीच**.

टीका.

१ जें विभाग केलेलें धन पुनः एकत्र मिळविलें, तें **संसृष्ट**. तें ज्याला आहे तो **संसृष्टी**. संसृष्टीचें स्वरूप.

**संसृष्टी** भलत्या कोणाशीं होऊं शकत नाहीं. तर बापाशीं अथवा भावाशीं किंवा चुलत्याशीं होतो.

बृहस्पति. जो विभक्त झाला असतां पुनः बापाशीं, भावाशीं, अथवा चुलत्याशीं, संतोषानें एकत्र राहातो. तो त्याचा **संसृष्ट** ह्मटला जातो.

२ **संसृष्टी** मेला असतां त्याचा अंश विभागकाळीं भार्या **अज्ञातगर्भा** असल्यामुळें विभाग झाला; नंतर पुत्र झाला तर त्या पुत्राला त्या **संसृष्टी**नें विभाग द्यावा. पुत्राच्या अभावीं **संसृष्टी**नें घ्यावा. **पत्नी** कन्या **इत्यादिकां**स मिळणार नाहीं. निपुत्रिक संसृष्टी मेल्यानंतर पत्नी वगैरे असतांही संसृष्टीच जिंदगी घेईल.

१ ल्या अंकाचें मूळवचनाचें बाधक वचन सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **संसृष्ट** सख्या बंधूला पुत्र झाल्यास वांटा द्यावा. आणि अपुत्र मरेल तर त्याचा अंश यानें घ्यावा.

टीका.

३ "**संसृष्टीच्या जिंदगीचा वारीश संसृष्टीच**". या स्मृतीची[1] **अनुवृत्ति** झाली. यास्तव सखा बंधु **संसृष्टी** होऊन संसृष्टीचें धन संसृष्ट सखा भाऊ घेईल.

---

१ या स्मृतीची ह्मणजे १ ल्या अंकाचे मूळवचनाची.

# प्रकरण ७

## दायविभाग.

मरण पावला असतां संसृष्ट झाल्यानंतर जर पुत्र झाला तर त्यास वांटा द्यावा. आणि पुत्राच्या अभावीं आपण घ्यावा. असा पूर्वीं (२ऱ्या अंकां) प्रमाणेंच संबंध आणावा.

४ या प्रमाणेंच सखे भाऊ, सापत्नबंधू, हे संसृष्ट झाले असतां संसृष्टी सख्या भावाचें धन संसृष्टी सखा भाऊच घेण्यास अधिकारी. सापत्नबंधु संसृष्टी असला तरी अधिकारी नाहीं. ह्मणून पूर्वीं सांगितल्यानें (१ल्या अंकाचे मूळवचनाचें) बाधक वचन.

## शाखा २९

आतां अपुत्र संसृष्टी मरण पावला असतां संसृष्टी सापत्नबंधु व सखा भाऊ असंसृष्टी असे दोघेही विद्यमान असल्यास कोणी धन घ्यावें असा संदेह प्राप्त झाला असतां दोघांनी वांटून घेण्याचें कारण सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. सापत्न भाऊ असून संसृष्टी आहे तर जिंदगी घेईल. असंसृष्टी सावत्र भाऊ घेणार नाहीं. असंसृष्टी असूनही सखा भाऊ आहे तर तो घेईल. सावत्र भाऊ संसृष्टी असला तरी तो एकटाच जिंदगी पावणार नाहीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

टीका.

१ सावत्रभाऊ **संसृष्टी** आहे, तरच धन घेईल. सावत्रभाऊ **संसृष्टी** नाहीं, तर धन घेण्यास अधिकारी नाहीं. असा **अन्वयव्यतिरेक** सांगितल्यावरून सावत्रभावाचें **संसृष्टीत्व** धन घेण्याविषयीं कारण सांगितलें. सावत्रभाऊ संसृष्ट असल्या सर्वांटा घेईल.

२ **असंसृष्टी** ही **संसृष्टीचें** धन घेतो, पण तो (असंसृष्टी) सखाभाऊ आहे तर. येणेकरून **असंसृष्टी** सख्याभावाला धन घेण्याविषयीं सख्याभावाचें नातें कारण आहे. असें सांगितलें सखाभाऊ संसृष्ट न झालेला ही संसृष्टीचें धन घेतो.

३ **संसृष्टी** सावत्रभाऊच **संसृष्टीचें** धन घेतो असें नाहीं. तर **असंसृष्टी**ही घेतो. असा **अप्यर्थबोधक** "ही" शब्द सांगितल्यावरून. व "सावत्र भाऊ **संसृष्ट** असला तरी तो एकटाच घेणार नाहीं." अशा निश्चयबोधक "च" शब्दाने निषेध सांगितल्यामुळें **असंसृष्ट** सखाभाऊ व **संसृष्ट** सावत्रभाऊ यांनी वांटून घ्यावें असें सिद्ध झालें. कारण दोघांस धन घेण्याविषयीं एकेक निरनिराळें कारण आहेच.

मनुही हेंच स्पष्ट सांगतो.

मनु. विभक्त झालेले एकत्र होऊन पुनः धनाचें वांटे करितील तर "असा **संसृष्टी** विषयीं विभागाचा उपक्रम करून" त्या **संसृष्ट** भावांतून वडील, धाकटा, किंवा मधला भाऊ विभागसमयीं आपल्या वांट्याला मुकेल किंवा एखादा मरेल तर त्याचा भाग लोपला जाणार नाहीं. संसृष्टींतून कोणी मरेल तर त्याचा वांटा काढून ठेवावा.

# प्रकरण ७

## दायविभाग

अर्थ.

**संसृष्ट** भावांतून जो वडील, मधला, किंवा कनिष्ठ, **आश्रमांतर** घेतल्यामुळें किंवा ब्रह्महत्यादिपातकामुळें विभागकाळीं वांट्याला मुकेल किंवा मरेल तर त्याचा तो वांटा लोपला जाणार नाहीं. या स्तव निराळा काढून ठेवावा **संसृष्टीं**नींच घेऊं नये.

वांटा निराळा काढून ठेवावा. असें वर सांगितलें त्याचा विनियोग सांगतो.

मनु. **संसृष्ट** असे सावत्र भाऊ, व सखे भाऊ यांनी येऊन व सख्या बहिणी. यांनी तो विभाग समसमान वांटून घ्यावा. तो काढून ठेवलेला वांटास मविभाग वांटून घ्यावा.

अर्थ.

४ तो निराळा काढलेला वांटा सखे भाऊ **असंसृष्ट** ही असले तरी व देशांतरीं गेले असले तरी त्यांनीं एकत्र मिळून आणि जे सावत्र भाऊ असून **संसृष्ट** आहेत, ते व सख्या बहिणी या सर्वांनी समविभाग वांटून घ्यावा. न्यूनाधिक विभाग करूं नयेत.

## शाखा ३०

पुत्र[1] **पत्नी** आदिकरून व **संसृष्टी**, यांस जें धनग्रहण सांगितलें त्याचें बाधक सांगतो.

---

सुबोधिनी. १ पुत्र शब्दें करून पौत्राचें ही ग्रहण होतें व आदि शब्दें करून कन्या दौहित्र आई बाप इत्यादिकांचें ग्रहण.

# प्रकरण ७

## दायविभाग.

मूळ.

याज्ञवल्क्य. षंढ, पतित, व पतितापासून उत्पन्न, पांगळा, उन्मत्त, अज्ञान, अंधळा, असाध्यरोगग्रस्त इत्यादिकांस विभाग न देतां पोषण मात्र करावें.

टीका.

१ षंढ, पतित व पतितापासून झालेला, पांगळा, उन्मत्त, अज्ञानी, अंधळा, व (मुळांतील) "इत्यादिक" शब्दें करून ज्यांनी आश्रमांतर घेतलें आहे, ते व पितृद्वेषी, उपपातकी, बहिरा, मुका, निरिंद्रिय, देही घ्यावे. षंढपतित वगैरेस विभाग नाहीं.

वसिष्ठ. ज्यांनी आश्रमांतर घेतलें, त्यांस विभाग नाहीं.

नारदही. पितृद्वेषी, पतित, षंढ व उपपातकी हे औरस असले तरी विभाग पावत नाहींत, मग क्षेत्रज कोठून पावतील.

मनुही. नपुंसक पतित यांस विभाग नाहीं. तसाच जन्मांध, व जन्मबहिरा, उन्मत्त व अज्ञान, मुका, व जे कोणी निरिंद्रिय असतील त्यांस ही विभाग मिळणार नाहीं.

निरिंद्रिय ह्मणजे व्याध्यादिक उपद्रवाने ज्याचें इंद्रिय गेलें तो. हे (सदरहू सांगितलेले) षंढादिक जिंदगीचे विभागी होत नाहींत. केवळ अन्नाच्छादन मात्र पावतात. पोषण न केलें तर पातित्याचा दोष येतो.

मनु. सुज्ञाने सर्वांस (षंढादिकांस) ही मरण पर्यंत यथाशक्ति अन्नाच्छादन द्यावें. हें न्याय्य होय. कारण न देणारा पतित

# प्रकरण ७

## दायविभाग.

होतो.

२ त्यांस (षंढादिकांस) विभाग मिळणार नाहीं. असें जें सांगितलें तें, विभागाचे पूर्वी तो तो दोष उद्भवला असल्यास विभाग नाहीं. विभाग झाल्यानंतरही औषधादिकेंकरून दोष निराकरण झालें असतां विभाग आहेच. कारण "विभक्त झाल्यानंतर सवर्णभार्येचाठायीं झालेला पुत्र विभागाचा अधिकारी होतो." असें जें (१२ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचे मूळवचनांत) सांगितलें तें येथेही लागू पडतें.

विभागानंतर औषधादिकेंकरून निर्दोष झाल्यास विभाग योग्य होतात.

३ पतितादिकांविषयीं जो पुल्लिंग निर्देश केला. त्याची विवक्षा नाहीं. यास्तव पत्नी, कन्या, आई, बाप, इत्यादिक[१] ही वरच्याप्रमाणें दोषदुष्ट असल्यास विभागहीन जाणावे.

षंढादिकांस विभाग नाहीं. असें सांगितल्यावरून त्यांच्या पुत्रादिकांस ही विभाग नाहीं. असें प्राप्त झालें असतां त्याविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. यांचे औरस व क्षेत्रजपुत्र, निर्दोष असल्यास विभागाचे अधिकारी होतात.

---

१ इत्यादिक ह्मणजे भाऊ, पुतणे, पितामही, पितामह, प्रपितामही, प्रपितामह, चुलता, चुलतभाऊ, गोत्रज, सपिंड, समानोदक, आत्मबंधू, पितृबंधू, मातृबंधू, शिष्य, सब्रह्मचारी,

# प्रकरण ७

## दायविभाग.

टीका.

४ ह्या (१ल्या अंकांत सांगितलेल्या) **षंढा**दिकांचे **औरस** किंवा **क्षेत्रज** पुत्र, निर्दोष ह्मणजे विभाग घेण्यास अटकाव करणारे असे **षंढत्व**, अंधत्व, **इत्यादिक** जे दोष तद्रहित असल्यास विभागाचे अधिकारी होतात. षंढ अंधळा वगैरेच्या पुत्रा स विभाग आहे.

५ त्यांत नपुंसकाचा **क्षेत्रज** पुत्र संभवतो. इतरांचे (अंधादिकांचे) **औरस** पुत्र ही संभवतात.

येथें (४थ्या अंकाचे वचनांत) **औरस** व **क्षेत्रज** यांचेंच मात्र ग्रहण केलें, तें इतरांचें (१० पुत्रांचें) ग्रहण नव्हावें एतदर्थ.

**षंढा**दिकांच्या कन्यांविषयीं विशेष सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ह्यांच्या कन्यांचें लग्न होईपर्यंत पोषण करावें.

टीका.

६ ह्यांच्या ह्मणजे **षंढा**दिकांच्या कन्यांचें लग्न होईतोपर्यंत पोषण करावें. आणि लग्न ही करावें. षंढ अंधळा इत्यादिकांच्या कन्यांचें पोषण करावें.

**षंढा**दिकांच्या स्त्रियांविषयीं विशेष सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ह्यांच्या निपुत्रिक स्त्रिया जर सदाचारसंपन्न आहेत तर पोसाव्या. आणि व्यभिचारिणी, तशाच प्रतिकूल असतील

# प्रकरण ७

# दायविभाग.

त्या घालवून द्याव्या.

टीका.

७ ह्या (१ल्या अंकांत सांगितलेल्या) षंढादिकांच्या निपुत्रिक अशा स्त्रिया जर सदाचारसंपन्न आहेत तर त्यांचें पोषण करावें. आणि व्यभिचारिणी तशाच प्रतिकूल असल्यास घालवून द्याव्या. परंतु प्रतिकूल असून जर सदाचारसंपन्न आहेत तर त्यांचें पोषण करावें.

षंढपतित इत्यादिकांच्या बायका व्यभिचारिणी असल्यास पोसूं नयेत.

स्त्रीधनाविषयीं.

## शाखा ३१

आई बाप निवर्तल्यावर पुत्रांनीं जिंदगी व कर्ज हीं समान वांटून घ्यावीं असें (६व्या शाखेच्या १ल्या अंकाचे मूळवचनांत) सांगितलें. तेथें स्त्रीपुरुषांच्या धनाचा विभाग संक्षेपें करून सांगून पुरुषधनाचा विभाग विस्तारानें सांगितला. आतां **स्त्रीधनाचा** विभाग विस्तारानें सांगताना प्रथमतः त्या स्त्रीधनाचें स्वरूप सांगतो.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### मूळ.

याज्ञवल्क्य. पिता, माता, नवरा, भाऊ, यांनी दिल्हेलें व **अध्यग्नि** तसेंच **आधिवेदनिक इत्यादिक स्त्रीधन** सांगितलें आहे.

### टीका.

१ बापानें, आईनें, नवऱ्यानें, आणि भावानें जें दिल्हें असेल तें, व जें **अध्यग्नि** ह्मणजे विवाहकाळीं विवाहाग्नीसमीप मामावगैरेनी दिल्हेलें तें. **आधिवेदनिक** ह्मणजे दुसरें लग्न करिते समयीं पहिल्या बायकोला दिल्हेलें तें."**अधिविन्न स्त्रीला धन द्यावें**." असें पुढें (३३वे शाखेच्या ८ व्या अंकानें मूळांत) सांगितलेलें आणि **इत्यादिक** ह्मणजे (१ल्या शाखेच्या १८ व्या अंकांत सांगितलेलें) "खुला **दाय**, **क्रय**, अटकावलेला **दाय**, **अधिगम**, **परिग्रह**." यासंबंधानें मिळालेलें. हें **स्त्रीधन** होय. असें मन्वादि ऋषींनीं सांगितलें आहे. स्त्रीधनाचें स्वरूप.

मनु. २ **अध्यग्नि**, **अध्यावहनिक**, **प्रीतिदत्त**, तसेंच भाऊ व आई व बाप यांपासून[१] मिळालेलें; असें साहाप्रकारचें **स्त्रीधन** सांगितलें.

असे जे **स्त्रीधनाचे** साहाप्रकार सांगितले, ते साहाप्रकारां

---

१ यांपासून ह्मणजे या प्रत्येकापासून जें निरनिराळें मिळालेलें असेंतीन प्रकारचें जें धन त्यालाच सौदायिक ह्मटलें

पेक्षां कमी प्रकार नाहींत असें समजण्यासाठीं, केवळ साहा प्रकारांपेक्षां अधिक प्रकारचें **स्त्रीधन** नाहीं असें नव्हे.

**अध्यग्नि इत्यादिक स्त्रीध**

**नाचें स्वरूप कात्यायन सांगतो.**

कात्यायन.

३ **अध्यग्नि** — विवाहसमयीं विवाहाग्नीच्या संनिध जें धन स्त्रियांस दिल्हें जातें तें.

**अध्यावहनिक** — कन्येला माहेराहून (सासऱ्यां) नेते समयीं जें मिळतें धन तें. (त्यालाच आंदण ह्मणतात)

**पादवंदनिक तेंच प्रीतिदत्त** — जेव्हां वधू सासू सासरा यांचे पायां पडावयास जाते तेव्हां जें त्यांनी प्रीतीने तिला दिल्हें जातें तें.

**सोदायिक** — लग्न झाल्यानंतर नवऱ्याच्या घरीं, किंवा माहेरीं, भावांपासून अथवा आईबापांपासून प्राप्त होतें तें.

मूळ.

याज्ञवल्क्य. तसेंच **बंधूंनी** दिल्हेलें **शुल्क**, आणि **अन्वाधेयेक**, हेंही **स्त्रीधनच**.

टीका.

४ **बंधुदत्त** — **मातृबंधू पितृबंधू** यांनी दिल्हें तें.

**शुल्क** — जें द्रव्य घेऊन कन्या दिल्हीजाती तें.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### स्त्रीधनाविषयीं.

**अन्वाधेयक** — लग्न झाल्यावर मग जें दिल्हें जातें.

कात्यायन. लग्न झाल्यानंतर सासरच्यांकडून, तसेंच माहेरच्यांकडून जें मिळतें. तें **अन्वाधेयक स्त्रीधन** ह्मटलें आहे.

## शाखा ३२

याप्रमाणे जें **स्त्रीधन** सांगितलें त्याचा विभाग सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. अनपत्य स्त्री मृत झाली असतां तिचें धन **बांधवांस** मिळेल.

टीका.

१ अनपत्य ह्मणजे कन्या, कन्येची कन्या, दौहित्र, पुत्र, नातू, याविरहित अशी स्त्री निवर्तली असतां तिचें पूर्वें (३१व्या शाखेंत) सांगितलेलें **स्त्रीधन, बांधव** ह्मणजे नवरा वगैरे घेतील. अनपत्यस्त्रीच्याधनाचे वारीशनवरावगैरे.

सामान्यतः **बांधव** धन घेण्याविषयीं अधिकारी दाखविले. आतां लग्नाच्या भेदें करून जिंदगी घेण्याविषयींजे अधिकारी त्यांचाही भेद सांगतो.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### स्त्रीधनाविषयीं.

मूळ.

याज्ञवल्क्य. **ब्राह्मादिक** चार विवाहांतून विवाहित अशा अनपत्य स्त्रीचें धन नवरा घेईल. **आसुरादि** विवाहांतून विवाहित अनपत्य स्त्रीचें धन आईबापांकडे जाईल. परंतु ती, लेंकुरवाळी असल्यास कन्या घेतील.

टीका.

२ **ब्राह्म, देव, आर्ष**, आणि **प्राजापत्य**, या चार विवाहांतून कोणत्याही विवाहानें विवाहित अशी अनपत्य स्त्री निवर्तली असतां तिचें पूर्वीं (३१ व्या शाखेंत) सांगितलेलें **स्त्रीधन** प्रथमतः नवरा घेईल. त्याच्या अभावीं त्याचे जवळचे **सपिंड** घेतील. ब्राह्मदेवआर्षआणिप्राजापत्ययाविवाहांतून विवाहितस्त्रीचेंधननवरा घेईल.

३ **आसुर, गांधर्व, राक्षस**, आणि **पैशाच**, या विवाहांतून कोणत्याही विवाहानें विवाहित अशी अनपत्यस्त्री मरण पावली असतां तिचें धन आईबापांनी घ्यावें. त्यांत प्रथमतः आईनें घ्यावें. आईबापांच्या अभावीं त्यांचे जवळचे संबंधी धन घेण्यास अधिकारी. आसुरादिकविवाहसंबंधिअनपत्यस्त्रीचेंधनआईबापघेतील.

४ आठ विवाहांतून कोणत्याही विवाहानें विवाहित अशी स्त्री जर लेंकुरवाळी आहे तर तिचें तें धन कन्यांनी घ्यावें. लेंकुरवाळीस्त्रीनिवर्तल्यावरतिचेंधनकन्यांनीघ्यावें.

येथे कन्या शब्देंकरून कन्यांच्या कन्या जाणाव्या. कारण साक्षात् कन्याविषयीं "कर्ज फिटून राहिलेलें आईचें धन कन्यांनी घ्यावें." असें पूर्वीं (७ व्या शाखेच्या १ल्या अंकाचे

# प्रकरण ७

## दायविभाग.

स्त्रीधनाविषयीं.

मूळवचनांत सांगितलेंच आहे. यास्तव आईचें धन आई निवर्तल्यावर प्रथमतः कन्यांनी घ्यावें. त्यांत विवाहित व **अविवाहित** असल्यास **अविवाहितेने** घ्यावें. तिच्या अभावीं विवाहितेने घ्यावें. त्यांत सधन व निर्धन असल्यास निर्धन कन्येने घ्यावें. तिच्या अभावीं सधन लेंकीने घ्यावें.

गौतम. **स्त्रीधन अविवाहित** व निर्धन अशा कन्येकडे जातें.

५ हा (कन्यांनी धन घेण्याचा) प्रकार सांगितला, तो **शुल्का**शिवाय इतर **स्त्रीधना**विषयीं. **शुल्क** तर सख्या भावांनीच घ्यावें.

गौतम. बहिणीचें **शुल्क** सख्या भावाचें, त्यांच्या अभावीं आईच्या सत्तेंत येतें.

६ सर्व कन्यांच्या अभावीं (मातृधन) लेंकीच्या लेंकींनीं घ्यावें. कारण "लेंकुरवाळी असल्यास कन्या घेतील" असें (याज्ञवल्क्य) वचन आहे. लेंकीच्याअभावीं लेंकीच्यालेंकी घेतील.

त्या (लेंकीच्या लेंकी) जर सावत्र आहेत आणि समविषम (ह्मणजे एकीची एक, दुसरीच्या दोन, तिसरीच्या चार, अशा) आहेत. तर त्यांस आपापल्या आईच्या[1] द्वारें विभाग

---

1 आईच्या द्वारें ह्मणजे १० व्या शाखेंत जसा पित्याच्या द्वारें पुत्रांस विभाग सांगितला आहे. त्याचरीतीने येथेही. आईच्या वांट्यांत लेंकीचे वांटे

# प्रकरण ७.

## दायविभाग.

### स्त्रीधनाविषयीं.

मिळतील.

गौतम. संततीला आपापल्या जननीच्या द्वारेंच विभागयोजना करावी.

७ लेंकी व लेंकीच्या लेंकीही विद्यमान असल्या तर त्यांस-(लेंकीच्या लेंकीस) कांहीं तरी द्यावें.

मनु. ज्या लेंकीच्या लेंकी विद्यमान असतील त्यांस ही मातामहीच्या धनांतून संतोषानें यथाशक्ति कांहीं तरी द्यावें.

८ कन्यांच्या कन्या नसल्यास दौहित्रानें धन घ्यावें. दौहित्री नसल्यास दौहित्र घेतील.

नारद. आईचें धन कन्यांनी घ्यावें, त्यांच्या अभावीं त्यांच्या (कन्यांच्या) वंशानें (दौहित्रानें) घ्यावें.

९ दौहित्राच्या अभावीं पुत्र धन घेतील. कारण "कन्यांच्या अभावीं पुत्रादिकानी घ्यावें" असें (७ व्या शाखेच्या ३ व्या अंकाचे वचनांत) सांगितलें आहे. दौहित्राच्या अभावीं पुत्र वारीश.

मनुही कन्यांकडे आणि पुत्रांकडे मातृधनाचा संबंध दाखवितो.

मनु. जननी मृत झाली असतां तिची जिंदगी सर्व सख्या भावांनी सारखी वांटून घ्यावी. व सख्या बहिणींनीही समान वांटून घ्यावी.

अर्थ.

जननीचें धन सर्व सखे भाऊ समान वांटून घेतील. व सख्या बहिणीही घेतील. परंतु सखे भाऊ व सख्या बहिणी यांनी एकत्र मिळून वांटून घ्यावें असें नाहीं.

समान वांटून घ्यावी असें (वरच्या मनुवचनांत) सांगितलें तें उद्धार

# प्रकरण ७

## दायविभाग.

### स्त्रीधनाविषयीं.

विभाग निवृत्त्यर्थ. आणि "सखेभाऊ" असें सांगितलें तें सावत्रभावांच्या निषेधार्थ.

१० अनपत्य निकृष्टजातीच्या स्त्रीचें धन तर सावत्र कन्याही घेईल. परंतु ती आपल्यापेक्षां उत्कृष्टजातीच्या सवतीची असल्यास. तिच्या अभावीं मयत स्त्रीच्या अपत्यानें घ्यावें. अनपत्यनिकृष्टजातीयस्त्रीच्या धनाचीवारीशउत्कृष्टजातीय कन्या.

मनु. स्त्रीला बापानें दिल्हेलें वित्त असेल तें (औरस कन्येच्या अभावीं) ब्राह्मणीकन्येनें घ्यावें. अथवा मयत स्त्रीच्या औरस पुत्रानें घ्यावें.

येथें (मनुवचनांत) ब्राह्मणी ग्रहण केलें तें आपल्यापेक्षां उत्कृष्ट जातीच्या स्त्रीचें उपलक्षण. यास्तव अनपत्य (मृत) वैश्येचें धन क्षत्रिया कन्या घेईल.

११ पुत्रांच्या अभावीं पौत्र पितामहीचें धन घेण्यास अधिकारी.

गौतम. जे कर्ज फेडतील ते जिंदगी घेण्याविषयीं अधिकारी होतात.

"पुत्रांनी व नातवांनी कर्ज फेडावें" असें (२ऱ्या प्रकरणाच्या ७व्या शाखेच्या १ल्या अंकाचे वचनांत) सांगितल्यावरून नातवांसही पितामहीचें ऋणफेडावयास अधिकार आहे.

१२ पौत्राच्या अभावीं नवरा इत्यादिक बांधव जिंदगीचे वारीश होतील. पौत्राच्या अभावीं बांधव घेतील.

## शाखा ३३

### स्त्रीधन विभागाच्या प्रसंगसंगतीनें

# प्रकरण ७

## दायविभाग.

### स्त्रीधनाविषयीं.

जिचा वाङ्निश्चय झालेला आहे तिज
विषयीं कांहीं सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. कन्या **वाग्दत्त** करून परत घेणारास दंड करून खर्च झालेला सव्याज भरून देवावा.

टीका.

१ कन्येचें वाग्दान करून ती पुनः परत घेणारापासून **राजा**ने द्रव्यादिकाच्या खर्चाच्या तारतम्यानें दंड घ्यावा. वाङ्निश्चय झाल्यावरकन्या परत घेणारास दंड.

२ हा प्रकार परत घेण्याविषयीं योग्य कारण नसल्यास जाणावा. योग्यकारण असल्यास "वाग्दान केलेली ही कन्या परत घ्यावी. परंतु जर (पहिल्या वरापेक्षां) उत्कृष्ट वर मिळेल तर" अशी (याज्ञवल्क्य वचनें करून) परत घेण्याविषयीं अभ्यनुज्ञा आहे ह्मणून त्यापासून दंड घेऊं नये. वाङ्निश्चयानंतरही योग्यकारण असल्यास कन्या परत घ्यावी.

३ आणि वाङ्निश्चयासाठीं नवऱ्यानें आपल्या आप्तांच्या व नवरीच्या आप्तांच्या सत्कारासाठीं जें द्रव्य खर्चिलें असेल, तें कन्यादान करणारानें वराला सव्याज द्यावें. वाङ्निश्चयासाठीं झालेला खर्च परत घ्यावा.

**वाग्दत्त** झालेली कन्या विवाहसंस्कार
होण्यापूर्वींच कदाचित् मरेल तर काय करावें तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **वाग्दत्त** झालेली कन्या मेली असतां दिल्हेल्या द्रव्यांत उभ

# प्रकरण ७

## दायविभाग.

### स्त्रीधनाविषयीं.

यतांचा खर्च वजाकरून बाकी परतघ्यावें.

टीका.

४ जर कन्या **वाग्दत्त** झाल्यावर मरेल तर जें कांही अंगठी वगैरे **शुल्क** नवऱ्याने दिल्हें असेल तें परत घ्यावें. परंतु आपला व कन्यादान करणाचा जो खर्च झाला असेल तो वजा करून उरलेलें घ्यावें.

वाङ्‌निश्चय झाल्यावर विवाहापूर्वी कन्या मरण पावल्यास जें शुल्क वगैरे दिलें असेल तें परत घ्यावें.

५ कन्येला मातामहादिकांनी डोईचा नग नगोटा वगैरे जें दिल्हें असेल. अथवा क्रमप्राप्त असेल तें सख्या भावांनी घ्यावें.

बौधायन. मेलेल्या कन्येचें धन सख्या भावांनी घ्यावें. त्यांच्या अभावीं आईने, तिच्या अभावीं बापाच्या सत्तेंत येतें.

अनपत्य मेलेल्या स्त्रीचें धन नवऱ्याच्या-सत्तेंत जातें. असें (३२ व्या शाखेच्या २ऱ्या अंकांत) सांगितलें. आतां जिवंत असून लेंकुरवाळीही स्त्री असली तरी समयविशेषीं नवऱ्याला घेण्याचा अधिकार आहे. असें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. दुकळांत, धर्मकृत्यासाठीं, व्याधि दूर होण्यासाठीं, व बंधांतून सुटण्यासाठीं, नवऱ्याने घेतलेलें **स्त्रीधन** जर त्याची परत देण्याची इच्छा नाहीं तर स्त्रीला तें मिळणार नाहीं.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### स्त्रीधनाविषयीं.

टीका.

६ (जवळ द्रव्य नसल्यामुळें) दुकळांत कुटुंबपोषणार्थ, व जें अवश्य केलें पाहिजे अशा धर्मकार्यासाठीं, व्याधि दूर करण्यासाठीं व बंधांतून मुक्त होणें; **इत्यादिका**साठीं, नवऱ्याने **स्त्रीधन** घेतलेलें पुनः परत देऊं नये. परंतु नवऱ्याला जर **स्त्रीधना**शिवाय दुसरें द्रव्य नसेल तर. या शिवाय दुसऱ्या कार्यासाठीं घेईल तर तें परत द्यावें. संकटकाळीं नवऱ्याने घेतलेलें स्त्रीचें धन तिला परत मिळणार नाहीं.

७ विधवा स्त्री जिवंत असतां तिचे धनाचा कोणत्याही वारिशाने अपहार करूंनये. केला असतां दंड सांगितला आहे. विधवेच्या जिंदगीचा वारिसाने अपहार करूं नये.

मनु. (विधवा) स्त्रिया जिवंत असतां त्यांचे धनाचा जे **बांधव** अपहार करितील त्यांस **राजाने** चोराच्या दंडाने शिक्षा करावी.

मनु. तसेंच नवरा जिवंत असतांना जो दागीना स्त्रियांनी नेहेमी वापरला जातो त्याचे वारीशांनी वांटे करूंनयेत. केले असतां अधोगतीस जातात. "असा दोषही सांगितला आहे."

### आधिवेदनिक स्त्रीधन (२१ व्या शाखेच्या १ ल्या अंकांत) सांगितलें त्याचें स्वरूप सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. नवरा दुसरा विवाह करितो तर त्याच्या खर्चासमान **अधिविन्न** स्त्रीला धन द्यावें. पण तिला **स्त्रीधन** दिल्हें नसेल तर. दिलें असल्यास अर्धे द्यावें.

# प्रकरण ७

## दायविभाग.

### स्त्रीधनाविषयीं.

टीका.

८ जिशीं लग्न केल्यानंतर अणखी विवाह केला जातो, ती पहिली स्त्री **अधिविन्न** ह्मटली आहे. त्या **अधिविन्न** स्त्रीला दुसरा विवाह करण्यानिमित्त जें धन द्यावयाचें, तें सम, ह्मणजे विवाहांतर करण्यासाटीं जितका खर्च केला असेल तितकें द्यावें. परंतु तिला जर आपण (नवऱ्यानें) किंवा सासऱ्यानें **स्त्री धन** दिल्हें नसेल तर. दिल्हें असल्यास विवाहांतर करण्यास जो खर्च केला असेल त्याचें अर्धें द्यावें.. दुसरें लग्न केलें तर त्याच्या खर्चाइतकें पहिले बायको ला धन द्यावें.

९ येथें (वरच्या वचनांत) अर्धशब्देंकरून समविभागाचें ग्रहण नाहीं. ह्मणून पूर्वीं दिल्हेलें **स्त्रीधन** जितक्यानें **आधिवेदनिक** द्रव्या इतकें होईल तितकें द्यावें. असें तात्पर्य.

## शाखा ३४

याप्रमाणें विभागव्यवस्था सांगून आ-
तां त्या विभागाच्या संदेहाविषयीं नि-
र्णयाचीं कारणें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. विभागाचा **निह्नव** केला असतां ज्ञात, **बांधव**, साक्षी, लेख, व स्थावरांचे वांटे, यांकडून विभागाचा पुरावा करावा.

# प्रकरण ७

## दायविभाग.

टीका.

१ कोणी विभाग झाल्याचा **निह्नव** केला असतां जात. **बांधव** जे पूर्वी (२६व्या शाखेच्या ३९ अंकांत) सांगितलेले त्यांकडून, व साक्षीकडून, आणि लेखाकडून, आणि घरांचे वांटे, व **क्षेत्रान्चे** वांटे, ह्मणजे निरनिराळी शेतकी करणे, तशीच **पंचमहायज्ञा**दिक धर्माचीं अनुष्ठानें हीं वेगवेगळालीं, इतक्या कारणांवरून विभाग झाल्याचा निर्णय जाणावा. विभागाविषयींसंशयअसल्यामनिर्णयकरण्याची साधनें.

नारद ही विभागाचीं चिन्हें सांगतो.

नारद. वारिशांचा विभाग झाला किंवा न झाला असा संदेह प्राप्त झाला असतां ज्ञातीकडून, व विभागपत्रावरून, आणि निरनिराळें कर्म करीत असल्यास त्यांवरून, विभागाचा निर्णय करावा. कारण **अविभक्त** भावांचा सर्वांमिळून एकच धर्म (पंचमहायज्ञ, श्राद्ध, इत्यादिक,) चालत असतो व विभक्त झाले असतां धर्म देखील निरनिराळा होतो.

तशींच अणखी विभागाचीं चिन्हें तोच (नारद) सांगतो.

नारद. २ साक्ष, जामिनकी, देणें घेणें, हे व्यवहार विभक्त झालेले भाऊ करूं शकतात. **अविभक्त** बंधूंनी कधींही करूं नयेत.

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

### शाखा १

आतां सीमेच्या विवादाचा निर्ण
य सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **क्षेत्रा**च्या सीमेचा वाद उपस्थित झाला असतां **सामं त, वृद्ध, इत्यादिक**, तसेच गुराखी शिवेजवळचें शेत नागरणारे, व सर्व रानवासी यांनी; टेंकडी, कोळसे, कोंडा, वृक्ष, **सेतु**, वारूळ, खोरा, हाडें, **चैत्य**, **इत्यादिक** खुणानी उपलक्षित जीसीमा ती दाखवावी.

टीका.

१ दोहों गांवांसंबंधी जें **क्षेत्र** त्याच्या सीमेचा वाद, तसाच एका गांवासंबंधी जें **क्षेत्र** त्याच्या सीमेचा वाद पडला असतां, **सामंत**, **वृद्ध**, **इत्यादिक**, व गोळी, शिवेच्याजवळचे शेतकरी, व सर्वरानवासीयांनी टेंकडी, कोळसे, कोंडा, वृक्ष, **सेतु**, वारूळ, खोरा, हाडें, **चैत्य**; व (मूळांतील) **इत्यादिक** शब्देंकरून वेणू, वाळू, वगैरे पूर्वी केलेल्या चिह्नांकडून युक्त जी सीमा तिचा निश्चय करावा. सामंतादिकांनी शिवेच्या खुणा दाखवाव्या.

२ सीमा — **क्षेत्रा**दिकांची हद्द. ती चार प्रकारची. देशाची सीमा, गांवाची सीमा, **क्षेत्रा**ची सीमा, आणि घराची सीमा.

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

या चार प्रकारच्या सीमेचीं यथासंभव
पांच लक्षणें आहेत तीं नारद सांगतो.

नारद. ३ **ध्वजिनी, मत्स्यिनी, नैधानी, भयवर्जिता,** आणि **राजशासननीता.** अशी पांच प्रकारची सीमा सांगितली आहे.

**ध्वजिनी** — वृक्षादिकें करून जी चिन्हित ती. कारण वृक्षादिक प्रसिद्धपणाने ध्वजासारिखे आहेत.

**मत्स्यिनी** — जी उदक विशिष्ट ती. कारण येथें मत्स्य शब्दें करून मत्स्यांचें आश्रयभूत जें जल त्याची **लक्षणा** केली आहे.

**नैधानी** — आंत पुरलेला कोंडा, कोळसे, **इत्यादिकें** करून जी युक्त ती. कारण कोंडा, कोळसे, वगैरे जमीनींत पुरल्यामुळें **निधि**तुल्य आहेत.

**भयवर्जिता** — वादिप्रतिवादींचा परस्पर वाद विवाद होऊन निर्णीत केलेली ती.

**राजशासननीता** — सीमेचीं उद्बोधक चिन्हें नसल्यामुळें **राजा**ने स्वेच्छेने करून दिल्हेली.

अशा प्रकारच्या सीमेविषयीं साहा प्रकारचा विवाद संभवतो.

कात्यायन. ४ कांहीं अंशीं आधिक्य, व कांहीं अंशीं न्यूनता, कांहीं अंशीं आहे ह्मणणें, आणि नाहीं ह्मणणें. तशीच **अभोगभुक्ति** आणि सीमा अशीं स्थावर वादाविषयीं सहा कारणें आहेत. सीमेच्यावादाचीं कारणें साहा आहेत.

हेंच स्पष्ट करून दाखवितो.

# प्रकरण ८.

## सीमाविवाद.

५ आधिक्य ह्मणजे माझी येथे पांचा **निवर्तनां**पेक्षां अधिक जमीन आहे. असें कोणी ह्मटलें असतां दुसरा ह्मणतो कीं पांच **निवर्तनें**च जमीन आहे अधिक नाहीं असा अधिकपणाविषयीं विवाद. अधिकपणाविषयींवाद

६ न्यूनता ह्मणजे पांच **निवर्तनें** माझी जमीन आहे. असें कोणी ह्मटलें असतां दुसरा ह्मणतो नाहीं त्यापेक्षांही कमी आहे. असा न्यूनतेविषयीं विवाद. शिवेंच्याकमतीविषयींवा

७ आहे ह्मणणें आणि नाहीं ह्मणणें ह्मणजे असें पांच **निवर्तनें** माझा हिसा आहे. असें ह्मटलें असतां प्रतिवादी ह्मणतो तुझा हिसा नाहीं असा आहे नाहीं ह्मणण्याविषयीं वाद.

८ **अभोगभुक्ति** ह्मणजे ह्या माझ्या भूमीवर पहिल्यापासून याचा भोगवटा नसतां हा आतां उपभोग करीत आहे. असें ह्मटलें असतां दुसरा ह्मणतो असें नाहीं. बहूत काळापासून निरंतर माझाच भोगवटा आहे. असा **अभोगभुक्ती**विषयीं वाद संभवतो. अभोगभुक्तीविषयींवाद

९ सीमा ह्मणजे ही या **क्षेत्रा**ची शींव ही या **क्षेत्रा**ची शींव असा सीमेविषयीं वाद संभवतो.

याप्रमाणे साहा प्रकारचा विवाद संभवतो. स्थावराविषयीं या साहा प्रकारच्या वादांत वचन व न्याय यांकडून शिवेचाही निर्णय केला जातो. ह्मणून या सीमानिर्णयप्रकरणीं स्थावराविषयींच्या वादांचा अंतर्भाव केला.

१० **सामंत**—आसपासचे राहाणारे ह्मणजे जे चोहीं दिशे सामंतांचेंस्वरूप.

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

स जवळचे गांव नगर वगैरे ते.ते दर शिवेस आहेतच.

कात्यायन. गांवाचा **सामंत** गांव. **क्षेत्राचा सामंत क्षेत्र**. घराचा **सामंत** घर. असें आसमंतात **सामंतांनीं** वेष्टिलें आहे.

या वचनांतील गांव **क्षेत्र इत्यादि** शब्दें करून गांवकरी **क्षेत्री इत्यादिकांची लक्षणा** करावी "असें गांव पळाला" (असें ह्मटलें असतां गांवांतील लोक पळाले असा अर्थ होतो) तसाच **सामंतांचा** निर्देश केला तो **सामंतांचे**ही जे **संसक्त** (शेजारी) असतील त्यांचा संग्रह होण्यासाठीं.

कात्यायन **सामंत** ह्मणजे आसपासचे शेजारी. शेजाऱ्यांचे शेजारी तेही **सामंत**च त्या **सामंतांचे**ही जे अणखी शेजारी तेही **सामंत**च. असें कमलाचे दलांसारिखे[1] वर्णिले आहेत.

११ (१ ल्या अंकाचे मूळवचनांतील) **इत्यादिक** शब्दें करून **मोल** व **उधृत** घ्यावे.

**वृद्ध, मोल, उधृत**, यांचे स्वरूपही तो (कात्यायन) च सांगतो.

---

१ दलांसारिखे ह्मणजे जसा कमलाचे दलांचा आंतला एक थर, त्याच्या बाहेरून दुसरा थर, त्याचेही बाहेरून तिसरा थर असतो.त्याप्रमाणे सामंत ही जाणावे.

# प्रकरण ८.

## सीमाविवाद.

१२ **वृद्ध**— वयाने **वृद्ध** असोत किंवा नसोत परंतु शींव निष्पन्न झालेली किंवा शिंवेचा निर्णय झालेला ज्यांनी पाहिला असे जे माहितगार ते. वृद्धांचें स्वरूप.

कात्यायन. **मौल**— जे पूर्वी तेथें **सामंत** होते नंतर देशां तरीं गेले. असे मूळचे तेथचे राहणारे ते. मौलांचे स्वरूप.

**उधृत**— उपश्रुति व उपभोग कार्य यांच्या कथनानें जे शींव दाखविणारे ते. उधृतांचे स्वरूप.

मूळ वचनांत सर्व रानवासी असे ह्मटलें आहे ते कोणते ते मनु सांगतो.

मनु. १३ व्याध, व पक्षी मारून उपजीवन करणारे, गुराखी, व ढीवर, व वृक्षादिकांचीं मुळखंडें खणून उपजीवन करणारे, सर्पधरणारे (गारोडी) **उंछवृत्तीने** उपजीविका करणारे, व अणखी जे (फळपुष्यासाठीं) रानांत संचार करणारे तेही.[१]

१४ टेंकडी, कोळसे, कोंडा, वड पिंपळ **इत्यादिक वृक्ष, सेतु, चैत्य** व (मुळांतील) **इत्यादि** शब्दें करून वेळूवाळू वगैरे घ्यावे.

ह्यावर सांगितलेल्या शिवेंच्या खुणा उघड व गुप्त या भेदें करून दोन प्रकारच्या आहेत. त्या मनु सांगतो.

---

१ हे वड्डूत करूनपाहाडी वैद्य असावे.

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

मनु. १५ वड, पिंपळ, पळस, कांटेशेवरी, **शाल**, ताड, वज्यास चीक येतो असे जे वृक्ष (शेर वगैरे) ते, **गुल्म**, वेणू, शमी, वेली, टेकडी, शेर, **कुब्जकगुल्म** असे शिवेवर वृक्ष लावावे. असें केलें असतां शीव नष्ट होत नाहीं. व तळीं, **कूप**, विहिरी, झरे, ओढे, अशीं शिवेच्या ठिकाणीं करावीं. आणि देवालयें करावीं "हीं उघडीं चिन्हें आहेत." शिवेच्या उघड खुणा.

मनु. १६ धोंडे, हाडें, पशूंचीं पुछें, कोंडा, राख, खापऱ्या, शेणी, इटा, कोळसे, रेती, वाळू, व अणखीही ज्या अशा प्रकारच्या असतील त्या. अशा प्रकारच्या खुणांस काळें करून भूमि ग्रासीत नाहीं, ह्मणून; व सीमासमजण्याविषयीं उत्तरोत्तर लोकांत बुद्धिविपर्यय आहे, ह्मणून अशा प्रकारच्या गुप्त खुणा शिवेच्या संधीवर कराव्या. शिवेच्या गुप्त खुणा.

याप्रमाणे उघड्या व गुप्त खुणा ज्या **सामंता**दिकांनी दाखविल्या त्यांकडून **राजा**ने शिवें विषयीं वाद सांगणाराच्या शिवेंचा निर्णय करावा.

### शाखा २

जर शिवेच्या खुणा नसतील अथवा असून संदिग्ध असतील तर निर्णय करण्याचा उपाय सांगतो.

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

मूळ.

याज्ञवल्क्य. अथवा चार, आठ, किंवा दाहा, असे जवळचे **सामंत** यांनी रक्तवस्त्रें नेसून रक्तपुष्पें घालून मस्तकीं क्षितिखंड घेऊन शींव दाखवावी.

टीका.

१ चार, आठ, किंवा दाहा, असे समसंख्याक व **प्रत्यासन्नसामंत** यांनी तांबडीं वस्त्रें नेसून रक्तपुष्पांच्या माळा घालून मस्तकीं मातीचे ढेंकूळ घेऊन शींव दाखवावी.

शिवेच्या खुणा नसल्यास सामंतांनी निर्णय सांगावा

२ (मुळांत) अथवा असा विकल्प सांगितला. तो स्मृत्यंतरीं जे साक्षी सांगितले आहेत त्यांचा संग्रह व्हावा या अभिप्रायें करून.

मनु. सीमावादाच्या निर्णयाविषयीं साक्षींवर विश्वास.

त्यांत साक्षींकडून निर्णय करणे मुख्यपक्ष, त्यांच्या अभावीं **सामंत.**

मनु. साक्षींच्या अभावीं तर जवळच्या चहूंकडील चार गांवांनी **राजा**च्या समक्ष शिवेचा निर्णय करावा.

त्यांच्या (सामंताच्या) अभावीं **सामंता**चे शेजारी जे **सामंत** ते निर्णायक.

कात्यायन. स्वार्थसिद्धीविषयीं निर्दिष्ट केलेले **सामंत** जर सदोष ठरले तर **सामंतां**चे जे शेजारी असतील त्यांकडून निर्णय करावा. या विषयीं संशय नको. जर **सामंता**च्या शेजाऱ्यांवर **दोषोद्भावन** केलें तर त्या शेजाऱ्यांचे ही शेजारी असतील ते निर्णायक सां

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

गितले आहेत. परंतु धर्मज्ञ **राजाने** जे सदोष असतील ते निर्णायक करूं नयेत.

३ **सामंता**दिकांच्या अभावीं **मोल, उधृत** हे निर्णायक करावे. सामंताच्या अभावीं मोल उधृत निर्णायक.

कात्यायन. त्यांच्या अभावीं सहा प्रकारच्या स्थावरवादाविषयीं **मोल, वृद्ध, उधृत इत्यादिक** निर्णायक करावे.

हे **सामंता**दिक संख्या, गुण, यांच्या उत्कर्ष तारतम्याने निर्णायक होतात.

स्मृति. निर्दोष व **गुणी** असे **सामंत** सीमानिर्णयाविषयींचें मुख्य साधन होय आणि **सामंतांचे** शेजारी **सामंतां**पेक्षां द्विगुण असल्यास निर्णायक होतात. त्यांच्याही पलीकडचे शेजारी पहिल्यांपेक्षा तिपट असले तर निर्णायक होतात.

४ ते साक्षी व **सामंता**दिक यांनी आपापल्या जातीस विहित शपथ घेऊन शिवेचा निश्चय सांगावा. साक्षी सामंतांनीं शपथ घेऊन शींव दाखवावी.

मनु. शींव दाखविणारांनी मस्तकीं मृत्तिका घेऊन व गळ्यांत माळा घालून रक्तवस्त्रें नेसून आपापल्या पुण्याची शपथ करून समंजसपणाने शींव दाखवावी.

५ सीमानिर्णय करणारे बहुत असावे, किंवा एक असावा. दोहोंचा मात्र निषेध.

नारद. जर शींव दाखविणारा एकच आहे तर त्याने उपोषित राहून व तांबड्या फुलांच्या माळा घालून, रक्तवस्त्र परिधान करून, मातीचें ढेकूळ मस्तकीं धरून शींव दाखवावी.

# प्रकरण.८

## सीमाविवाद.

अशी नारदाची एकाविषयीं ही आज्ञा आहे.

स्मृति. विश्वासू मनुष्य असूनही तो जर एकआहे तरत्याजकडून शिवे चा निर्णय करूंनये. कारण या सीमानिर्णयाचें कार्य मोटें ह्मणून ही क्रिया बहुतांवर आहे.

असा जो एकाविषयीं निषेध सांगितला तो निषेध सीमानिर्णय करणारा एक असून तो जर दोघांस संमत आणि धर्मज्ञ नाहीं तर त्याविषयीं जाणावा.

टेंकडी कोळसे **इत्यादिक** सीमाचिन्हाच्या अभावीं शींव समजण्याचा उपाय विशेष नारद सांगतो.

नारद. ६ शिंवा नदीच्या पुराने स्थानभ्रष्ट झाल्या अथवा नष्ट झाल्या तर त्या त्या प्रदेशाच्या सुमाराने ह्मणजे ज्या स्थानभ्रष्ट किंवा नष्ट झालेल्या खुणा, त्यांचें हेंच मूळ ठिकाण असावें अशा अनुमाने करून किंवा गांवाच्या पश्चिमेस हजार दंड परिमित हें **क्षेत्र** आहे. अशा प्रमाणें करून अथवा वादिप्रतिवादीच्या समक्ष, निरंतर, **स्मार्तकाल**, जो भोगवटा तेणेकरून शिंवेचा निर्णय करावा.

शिंवा नदीच्या पुराने वाहवल्या तर अनुमानाने निर्णय करावा.

शिंवेच्या निर्णयाविषयीं जे साक्षी त्याविषयीं बृहस्पति विशेष सांगतो.

बृहस्पति. **आगम, प्रमाण**, भोगवटा, अमुक काळ, अमुक नाव, आणि भूमीच्या शिंवेचीं लक्षणें, जे जाणतात ते या शिंवेच्या निर्णयाविषयीं साक्षी.

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

८ राजाने हे साक्षी व सामंत इत्यादिकांस शपथ देऊन कुल, श्रेणी इत्यादिकांच्या समक्ष पुसावें.

मनु. राजाने पूग व कुल, श्रेणी, यांच्या समक्ष आणि वादिप्रतिवादींच्या समक्ष साक्षींस शिंवेच्या खुणा पुसाव्या.

९ नंतर त्या सर्वसाक्षी व सामंत इत्यादिकांनी एक मताने शिंवेचा निर्णय सांगावा. आणि आठवण राहावी ह्मणून राजानें जो शिंवेचा निर्णय केला तो व त्यांनी दाखविलेल्या सकल खुणा व साक्षि सामंतांचीं नावेंहीं पत्रीं लिहावीं. (या पत्रास सीमापत्र असें ह्मटलें आहे) साक्षिसामंतादिकांनीएकमताने निर्णयसांगावा.

मनु ही हेंच सांगतो.

मनु. त्या सामंतास पुसल्यावर ते शिंवेविषयीं जसा निर्णय सांगतील तशी शींव बांधून द्यावी. आणि त्या सर्वांचीं नावें (पत्रावर) लिहावीं.

१० ह्या साक्षि सामंतादिकांस सीमा दाखविलेल्या दिवसापासून दीड महिना पर्यंत जर कांहीं राजिक व दैविक संकट उपस्थित झालें नाहीं, तर त्यांनी शींव दाखविल्यावरून केलेला सीमा निर्णय खरा.

कात्यायन. शिंवेच्या निर्णयाविषयीं, कोशदिव्याविषयीं, तसेंच पायाचे शपथेविषयीं, अनुक्रमाने दीड महिना, पक्ष. आणि सप्तकपर्यंत दैविक राजिक संकटउपस्थित होण्याची मर्यादा.

जर ह्यांस (सामंतास) दिढा महिन्या<br>च्या आंत रोगादिक उद्भवेल अथवा

# प्रकरण ८.

## सीमाविवाद.

पहिल्या साक्षीपेक्षां संख्येने किंवा गुणाने अधिक असे जे प्रतिवादीने अणखी दाखविलेले साक्षी त्यांची साक्ष जर पहिल्या साक्षीपेक्षां विरुद्ध आहे तर पहिले साक्षी खोटे साक्षी ठरले. ह्मणून त्यांपासून दंड घ्यावा असें सांगतो.

मूल.

याज्ञवल्क्य. खोटें सांगितलें ह्मणून राजानें त्या प्रत्येकास **मध्यमसाहस** दंड करावा.

टीका.

११ सर्व **सामंतांनी** खोटी साक्ष दिल्ही ह्मणून त्या प्रत्येकास **मध्यमसाहस** ह्मणजे ५४० **पण** दंड करावा. खोटीसाक्षदेण्याबद्दल प्रत्येकसामंतासमध्यमसाहसदंड.

साक्षी व **मोल इत्यादिकांस** स्मृत्यंतरीं निराळा दंड सांगितला आहे ह्मणून वरचें वचन **सामंता** विषयींच.

मनु. वास्तविक सांगून सीमा दाखविणारे ते खरे साक्षी अतएव पुनीत होतात. आणि विपरीत सांगणारे तर २००(**पण**)दंडाचे पात्र होतात.

नारदही. जर शिवेच्या निर्णयाविषयीं **सामंत** अनृत बोलतील तर त्या सर्वांपासून **राजाने पृथक् पृथक् मध्यमसाहस** दंड घ्यावा. " असा **सामंतांस मध्यमसाहस** दंड सांगून "जर शिवेच्या निर्णयाविषयीं नियुक्त केलेले असे इतर (सामंताचे सेजारि व मोलादिक) अनृत बोलतील तर त्या प्रत्येक दुष्टापासून **प्रथमसाहस** दंड घ्यावा. " असा **सामंताचे** शेजारी जे **सामंतादिक**, त्या प्रत्येकास

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

**प्रथमसाहस** दंड सांगता झाला"

**मोल, वृद्ध, इत्यादिकांस** तो (वरचा)च
दंड सांगतो.

नारद. १२ इतर (ह्मणजे) **मोल वृद्ध इत्यादिक** जर अनृत बोलतील तर त्या प्रत्येकास **प्रथमसाहस** दंड करावा.

**इत्यादिक** शब्दें करून गुराखी, पारधी, व्याध व इतर जे अ अरण्यांत राहणारे. ते घ्यावे.

जरी पारधी व्याध वगैरे हे पापकर्मीं रत असल्यामुळे त्यांचा खुणा दाखविण्याविषयीं मात्र उपयोग. सीमानिर्णयाविषयीं उपयोग नाहीं खरा, तथापि खुणा दाखविण्याविषयीं खोटें बोलण्याचा संभव आहे ह्मणून दंड सांगितला तो युक्तच आहे.

कात्यायन. १३ साक्षीविषयीं **कृत करून** घेतलेले सर्व साक्षी जर भयाने किंवा लोभाने निर्णय सांगतील तर त्या प्रत्येकास निरनिराळा **उत्तम साहस** दंड करावा.

असा, जाणून अनृत सांगणाऱ्या साक्षि **सामंतादिकांस** कात्यायनानें निराळा दंड सांगितला आहे ह्मणून ११ व्या अंकाचे मूळवचनांत जो **मध्यमसाहस** दंड सांगितला. तो अज्ञानाने खोटें सांगितलें असल्यास त्याविषयीं.

तसाच साक्षींच्या बोलण्यांत विपर्यास
पडला असतांही हा (वरचा)च दंड
सांगतो.

कात्यायन. सांगण्यांत विपर्यास पडला तर **उत्तमसाहस** दंड करावा.

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

१४ याप्रमाणें अज्ञानादिकें करून अनृत भाषण घडलें असतां साक्षी सामंतादिकांस दंड करून पुनः शिवेविषयीं वाद चालवावा.

कात्यायन. अज्ञानानें खोटें सांगितलें असतां दंड करून पुनः सीमाविचार करावा. "असें सांगून" सामंत व मोलादिकां सुद्धां अन्य जे कोणी दुष्ट (खोटे बोलणारे) असतील त्यांस टाकून सीमानिर्णय करावा. असें धर्मज्ञ बोलतात. "असा सीमानिर्णयाचा प्रकार सांगता झाला"

### शाखा ३

जर शींव जाणणारे सामंतादिक नाहींत व शिवेच्या खुणाही नाहींत तर कसा निर्णय करावा तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. शिवेचे माहितगार व शिवेच्या खुणा नाहींत तर राजानें शींव पाडून द्यावी.

टीका

१ शिवेचे माहितगार सामंतादिक नाहींत व शिवेच्या ज्या वृक्षादिक खुणा त्या नाहींत तर राजाच शींव बांधून देणारा. ह्मणजे दोहों गांवांमधल्या विवादास्पदीभूत जमीनीचे सारिखे वांटे करून, ही याची जमीन, आणि ही याची जमीन, अशी दोघांस वांटून देऊन मध्यभागीं शिवेच्या खुणा राजानें करून द्याव्या.

## प्रकरण

## सीमाविवाद

२ जरत्या (विवादास्पदीभूत) भूमीचा दोहों गांवांतून अमुक गांवास अधिक फायदा दिसेल तर त्याच गांवच्या सत्तेंत ती सगळी भुमि द्यावी.

मनु साक्षिसामंतादिक, व शिवेच्या खुणा नसल्यामुळें शिवेचा निर्णय होऊं शकत नाहींतर राजाने शींव पाडून द्यावी. परंतु जर दोहों गांवांतून एकास विशेष फायदा असेल तर त्याच गांवाकडे सारीजमीन द्यावी. अशी शास्त्र मर्यादा आहे.

### शाखा ४

ही (३ ऱ्या शाखेच्या १ ल्या अंकाची) स्मृति
न्यायमूल आहे असें दाखविण्या साटी
अतिदेश सांगते.

मूळ

याज्ञवल्क्य बाग, निवेशन, गांव, व पानीयस्थान, क्रीडावन, घर, आणि पर्जन्याचे पाणी वाहाण्याचा मार्ग इत्यादिका विषयीं हाच प्रकार जाणावा.

टीका

१ बाग ह्मणजे फुलांच्या व फळांच्या समृद्धीचे कारण जी भूमि तो, निवेशन ह्मणजे वैरण काडी वगैरे ठेवण्याची जागा गांव, गांव शब्देंकरून नगर शहर इत्यादिक घ्यावीं, व विहीरी कूप वगैरे पाण्याचें ठिकाण, क्रीडावन ह्मणजे क्रीडेसाठीं केलेली रमणीय भूमि, घरें, तसेंच पावसाचें पाणी जावयाचे मार्ग, ह्मणजे या दोहों घरांच्या मधू

# प्रकरण ८
# सीमाविवाद

न पावसाचें पाणी जात असतें किंवा या दोहों घरांमधून जात असतें अशा प्रकारच्या विवादाविषयीं, तसेंच **प्रासादा** विषयीं हि हा (३ ल्या शाखेच्या ३ ल्या अंकापासून एथपर्यंत सांगितलेला) विधि जाणावा.

कात्यायन **क्षेत्र, कूप**, नळीं, **केदार**, बाग, घरें, गांव, राजमंदिरें, देवालयें, यांविषयीं हाच (सदर्हू) विधि जाणावा.

## शाखा ५

शिवेविषयीं निर्णय सांगून प्रसंगानें मर्यादेच्या भंगादिकाविषयीं दंड सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य मर्यादेच्या भंगाविषयीं व शिवेच्या अतिक्रमाविषयीं आणि **क्षेत्राचे** अपहाराविषयीं अनुक्रमाने **प्रथमसाहस, उत्तमसाहस**, आणि **मध्यमसाहस**, दंड योजावे.

टीका

१ मर्यादा ह्मणजे अनेक **क्षेत्राचे** विभाग करणारी अशीजी साधारण भूमि, तिचा विशेषेकरून भंग केला असतां, व शिवेचें उल्लंघन करून अधिक नांगरलें असतां, आणि धमकी वगैरे दाखवून **क्षेत्राचा** अपहार केला असतां, (यातिहीं अपराधांस अनुक्रमानें **प्रथमसाहस, उत्तमसाहस मध्यमसाहस** दंड जाणावे. मर्यादेचा भंग शिवेचे उल्लंघन व क्षेत्राचे हरण करणारास दंड

# प्रकरण ८

## सीमाविवाद

२ (मुळांतील) **क्षेत्र** शब्देंकरून घर, बाग, **इत्यादिक** घ्या वीं (यास्तव घर बाग वगैरेचा अपहार करणारास ही मध्यम साहस दंड योजावा.)

३ जरहें माझें आहे अशाभ्रांतीने **क्षेत्रा**दिकाचा अपहार करितोतर २०० (पण) दंड करावा — हे माझें अशाभ्रांतीनेदुसऱ्या चेंशेतवगैरेअपहारकरणारास दोनशें पण दंड.

मनु जर धमकी दाखऊन घर, तळें, बाग, किंवा **क्षेत्र** यांचा अपहार करील तरत्यापासून ५०० **पण** दंड घ्यावा. जरअज्ञानानेअपहारक रीलतर २०० **पण** दंड घ्यावा.

अपहार केलेलें **क्षेत्रा**दिक मोठें आहे तर तारतम्याने कदाचित् **उत्तमसाहस** ही दंड योजावा.

नारद वध, सर्वस्वहरण, गावांतून हांकून देणें, डाग देणें, आणि ज्या अवय वाने अपराध केला असेल तो तोडणें, असा **उत्तमसाहस** दंडसांगितलाआहे.

दुसऱ्याच्या **क्षेत्रां**त त्याला विचारून<br>
किंवा द्रव्य देऊन त्याची आज्ञा घेऊन<br>
**सेतु कूप इत्यादि** बांधायास इच्छि<br>
त असतां प्रतिबंध करणारा जो माल<br>
क त्यासच दंड सांगतो

मूळ

याज्ञवल्क्य थोडेशा भूमीला अडवून बहुतांस उपयोगी असा जो **सेतु** त्याविषयीं, तसाच दुसऱ्याच्या थोडेशा भूमीला अडविणारा परंतु उदक समृद्धीमुळें बहुतांस उपयोगी असा जो **कूप** त्याचे निर्मा णाविषयीं मालकानें निषेध करूं नये.

# प्रकरण ८.

## सीमाविवाद

टीका

४ परकीय भूमीला अडचण करणारा असा जो सेतु त्याचे निर्माणा विषयीं मालकानें अडथळा करूंनये, परंतु तो जर थोडी जमीन अडवून बहुत उपयोगी होईल तर; आणि कूप ही थोडें क्षेत्र अडविल्यामुळें थोडासा उपद्रव करणारा खरा परंतु जल समृद्धीमुळें बहुतांस उपयोग ह्मणून तो बांधण्याविषयींमालकानेंहरकत करूंनये.

सेतुविहीरवगैरेबांधणाराला मालकानें हरकत करूंनये.

(मुळांत) कूपाचा निर्देश केला तो वापी पुष्करणी इत्यादिकांचा संग्रह होण्या साठीं.

५ जर सेतु कूप इत्यादिक, हे सगळ्या क्षेत्रास अडवून बहुत अडचण करणारे व नदी इत्यादिकाच्या जवळील क्षेत्रांत बांधल्यामुळें त्यापासून विशेष उपयोग होत नाही, असें आहे तर ते सेतुकूपादिक बांधण्या विषयीं निषेध करावाच असें अर्थात् सिद्ध होतें.

सेतुविहीरयांच्या बांधण्यानेविशेषफायदा नसल्यासहरकत करावी.

सेतु दोन प्रकारचा असें नारद सांगतो.

नारद ६ सेतु दोन प्रकारचा सांगितला आहे, खंटलेला आणि बांधलेला. खंटलेला सेतु ह्मणजे पूल आणि बांधलेला सेतु ह्मणजे धरण.

७ दुसऱ्यानें निर्मिलेला सेतु फुटून नाश पावला असतां जो कोणी त्याचा जीर्णोधार करावयास इछितो त्यानें त्याच्या पहिल्या धन्यास किंवा (धन्याच्या अभावीं) त्याचा वंश असेल त्याला अथवा (त्याच्या अभावीं) राजाला विचारून जीर्णोधार करावा.

जीर्णोधार करणारानेमालकाचीआज्ञा घ्यावी.

नारद पूर्वीं बांधलेला सेतु कालें करून मोडला असतां त्याच्या धन्याला पुसल्या वांचून जो त्याच्या सेतूचा जीर्णोधार करितो, त्याला त्याचें

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

(सेतूचें) उत्पन्न मिळणार नाहीं. (धनीच घेईल) मालकाच्या अभावीं (त्याच्या वंशाला) किंवा वंशाच्या अभावीं राजाला पुसून नंतर सेतूचा जीर्णोद्धार करावा.

क्षेत्राच्या धन्याविषयीं सांगितलें.
अतां सेतु बांधणारा विषयीं सां
गतो.

मूळ

याज्ञवल्क्य मालकास नपुसतां त्याच्या क्षेत्रांत सेतु बांधील त्याचें उत्पन्न मालक घेईल, त्याच्या अभावीं राजा घेईल.

टीका

८ मालकास, त्याच्या अभावीं राजाला पुसल्यावांचून त्याच्या क्षेत्रांत जो सेतु बांधितो त्याला त्याचें (सेतूचें) उत्पन्न मिळणार नाहीं, तर त्याचें उत्पन्न क्षेत्राच्या धन्याने घ्यावें. त्याच्या अभावीं राजा घेईल. सेतुवगैरे बांधणाराने मालकास पुसावें

तस्मात् प्रार्थनेने किंवा द्रव्य देण्याने क्षेत्रीची व त्याच्या अभावीं राजाची आज्ञा घेऊनच दुसऱ्याच्या क्षेत्रांत सेतु बांधावा असें तात्पर्य

क्षेत्राच्या धन्याने सेतु बांधण्या विष
यीं हरकत करूंनये असें सांगितलें.
आतां त्याच्याच प्रसंगसंगतीने स्थ
लविशेषीं प्रकारांतर सांगतो.

# प्रकरण ८

## सीमाविवाद.

मूळ

याज्ञवल्क्य. नांगरलेलें क्षेत्र जो स्वतां वाहत नाहीं आणि दुसऱ्याला वाहूं देत नाहीं, त्यापासून त्या नांगरलेल्या क्षेत्राचें उत्पन्न घेऊन क्षेत्र दुसऱ्या कडून करवावें.

टीका

१ जो क्षेत्राच्या धन्याजवळ "मी हें शेत करीन असें" कबूल करून नंतर टाकून देतो, आणि दुसऱ्यालाही वाहूं देत नाहीं, असें जरी थोडेंसें नांगरलेलें म्हणजे चांगलें पेरणी करावया जोगें नांगरलेलें नाहीं, तथापि त्यांत "इतकें पीक उत्पन्न व्हावया जोगें हें आहे असें" सामंतादिकांनीं निर्णीत केलेलें. तितकें उत्पन्न त्यानांगरणारा पासून देवावें, आणि तें पहिल्या शेतकऱ्यापासून घेऊन दुसऱ्या कडून करवावें.

# प्रकरण ९

## स्वामिपालविवाद

शाखा १

व्यवहार प्रकरणांचा परस्पर कार्यकारणभाव नाहीं ह्मणून (१ ल्या प्रकरणाच्या ४थ्या शाखेच्या ४थ्या अंकांतल्या मनुवचनांत) "ऋणादान, निक्षेप, अस्वामिविक्रय" इत्यादि जो अनुक्रम सांगितला तो एथें विवक्षित नाही. अतएव क्रमापेक्षा न धरितां स्वामिपालविवादाचें निरूपण करितो.

मूळ

याज्ञवल्क्य· धान्याचा नाश करणाऱ्या ह्मशीला आठ माष दंड, गाईला त्याचें अर्ध, आणि शेळ्या मेंढ्यांस अर्धाचें अर्ध दंड.

टीका

१ परकीयाच्या धान्याचा नाश करणाऱ्या ह्मशीला आठ माष दंड करावा, गाईला त्याचें अर्ध ह्मणजे चार माष, आणि शेळ्या मेंढ्यांस दोन दोन माष दंड करावा. दुसऱ्याच्या शेताचा नाश करणाऱ्या ह्मैस वगैरेस दंड

पशूंस धनसंबंध नाही, अतएव वर सांगितलेला जो दंड तो त्यांच्या धन्याला समजावा.

एथें माष ह्मणजे तांब्याच्या पणाचा विसावा अंश.

नारद माष ह्मणजे पणाचा विसावा अंश सांगितला आहे.

# प्रकरण ९

## स्वामिपालविवाद

२ हा (वरचा) दंड प्रकार, अज्ञानामुळें घडलेल्या अपराधा विषयीं. जाणून केलेल्या अपराधाविषयीं तर (खालच्या) स्मृतींत सां गितलेला दंड योजावा.

स्मृति गाईला अर्धा पण दंड, म्हशीला त्याच्या दुपट (एक पण), तसाच शेळ्या मेंढ्यांस पणाचा एकेक चतुर्थांश, दंड करावा.

नारद ३ गाईला एक माष, म्हशीला दोन माष, तसाच शेळ्या मेंढ्याया प्रत्येकांस अर्ध माष दंड करावा.

असें जें सांगितलें तें पुनः फुटावया जोगी अशीं मुळें फांद्या वगैरे राहून भक्षिलें असल्यास त्याविषयीं जाणावें.

अपराधाच्या आधिक्यामुळें क्वचित् दु पट दंड सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य खाऊन तेथेंच बसलीं तर त्या त्या स्थळीं सांगितलेल्या दंडाच्या दुपट दंड.

टीका

४ जर पशू दुसऱ्याच्या शेतांतलें धान्य खाऊन कोणी नहा किंवा तथेंच बसतात तर वर (१ ल्या अंकांत) सांगितलेल्या त्यात्या दंडाच्या दुपट दंड जाणावा, आणि वांसरांसुद्धां धान्य खाऊन तेथें च बसलीं तर पूर्वीं (१ ल्या अंकांत) सांगितलेल्या त्यात्या दंडा च्या चौपट जाणावा. गुरे धान्य खाऊन तेथेंच बसल्यास दुपट दंड

स्मृति (धान्य खाऊन तशींच) बसलीं तर दुपट आणि वांसरांसुद्धां तशीं बसलीं तर चौपट दंड.

# प्रकरण ९

## स्वामिपालविवाद

दुसऱ्या क्षेत्राविषयीं व दुसऱ्या पशूंविषयीं अतिदेश सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य विवीताचाही नाश केला असतां क्षेत्राच्या नाशाप्रमाणेंच ह्मशी इत्यादिकांस दंड करावा. व गाढव व उंट यांसही ह्मशी प्रमाणेंच दंड.

### टीका

५ विवीत — ज्यामध्ये पुष्कळ तृणें, काष्ठें, आहेत असा घेऊन राखलेला भूप्रदेश, त्याचा नाश केला असतां ही इतर क्षेत्राच्या नाशाविषयीं जो दंड सांगितला आहे, तोच ह्मशी वगैरे पशूंस योजावा. आणि गाढव उंट यांसही ह्मशी समानच, ह्मणजे ह्मशीला ज्या अपराधीं जो दंड केला जातो तोच दंड गाढव व उंट या प्रत्येकास त्या त्या अपराधीं करावा. कारण, धान्यनाशाविषयीं गाढवें व उंटें हीं ह्मशी प्रमाणेंच आहेत. व दंड ही अपराधानुसारच आहे.

विवीतनाशाविषयींही क्षेत्रनाशाप्रमाणेंच दंड व गाढव उंट यांस ह्मशीप्रमाणें दंड.

## शाखा २

दुसऱ्याच्या क्षेत्रांतील धान्यादिकांच्या नाशाविषयीं पशूंच्या धन्याला दंड सांगितला. आतां शेतकऱ्याचें नुकसान देखील त्याचकडून देविण्याविषयीं सांगतो.

# प्रकरण ९

## स्वामिपालविवाद

### मूळ

याज्ञवल्क्य जितकें धान्य नाशिलें असेल तितकें क्षेत्रीचे भरून देवावें. गुराख्याला ताडन दंड. आणि पशुस्वामी तर पूर्वी सांगितले त्या दंडास योग्य होतो.

### टीका

१ एथें धान्यशब्देंकरून जें क्षेत्रांत उत्पन्न होतें तें सर्व. त्या क्षेत्रांतलें जितकें धान्य पवेरण वगैरे, गुरांनीं नाशिलें असेल तितकें उत्पन्न "इतक्या क्षेत्रांत इतकें उत्पन्न होत असतें असें सामंतांनीं क्लृप्त केलेलें" क्षेत्रीला पशुस्वामीकडून देवावें. गुराख्याला तर ताडन मात्र करावें. त्याजकडून उत्पन्न देवू नये. गुराख्याला जें ताडन करणें तें त्याच्या अन्यायानें सस्यनाश झाला असल्यास पूर्वी (१ ल्या शाखेंत) सांगितलेल्या दंडासुद्धां करावें. मध्यस्थांनीं क्लृप्त केलेलें मालकाचें नुकसान भरून देवावें.

स्मृति जर गुराख्याच्या अन्यायामुळें चुकलेली गाय[१] (दुसऱ्याचें) शेत खाती तर तिच्याबद्दल पशुस्वामीला दंड नाहीं. गुराखीच त्या दंडास योग्य होतो.

२ पशुस्वामीच्या अन्यायानें धान्य नाश झाला असल्यास पशुस्वामी पूर्वी (१ ल्या शाखेंत) सांगितलेल्या दंडास मात्र योग्य होतो, ताडन नाहीं. पशुस्वामीचा, किंवा गुराख्याचा, कोणाचा ही अन्याय असला तरी नुकसान भरून देणें पशुस्वामीकडेसच. कारण, त्या क्षेत्रांतलें फलादिक खाऊन पुष्ट झालेल्या गुरांच्या दुधा कोणाचा ही अन्याय असला तरी पशुस्वामीनें नुकसान भरून दिल्हें पाहिजे

---

१ एथें गायशब्द पशुमात्राचें उपलक्षण.

## प्रकरण १

## स्वामिपालविवाद

त्या उपभोगधनी घेतो. अतएव तद्द्वारा क्षेत्रांतील उत्पन्नाचा उपभोग ही पशुस्वामीकडे येतो. यास्तव गुरांनी खाऊन राहिलेलें पलाल ही पशुस्वामीनें घ्यावें. कारण, मध्यस्थांनी सांगितलेलें मोल दिल्यामुळें तें उत्पन्न विकत घेतल्यासारिखेंच आहे.

नारदही क्षेत्रांत पेरलेलें धान्य गुरांनी खाल्लें क्षेत्री परत मागतो तर तें सामंत सांगतील तितकें धान्यादिक (किंवा त्याचें मोल) क्षेत्रीला परत द्यावें. पलाल पशुस्वामीनें घ्यावें आणि धान्य तर क्षेत्रीनें घ्यावें.

## शाखा २

काहीं क्षेत्रांविषयीं अपवाद सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य मार्ग, गांव, किंवा विवीत याजवळचे क्षेत्रांत नकळतां गुरें चरलीं असतां दोष नाहीं. बुद्ध्या चारिलीं असतां चोराप्रमाणें दंड.

१ वाटेजवळचें क्षेत्र, गांवाजवळचें क्षेत्र, आणि विवीताजवळचें क्षेत्र, नकळतां गुरांनी खाल्लें असतां गुराख्याकडे व पशुस्वामीकडे दोष नाहीं. वाटेजवळचे वगैरे शेताच्या नुकसानीविषयीं

ऐथें दोष नाहीं असें जें सांगितलें तें दंड न होण्यासाठीं व गुरांनी खालेल्या फलादिकांचें मोल न देण्यासाठीं.

# प्रकरण ९

## स्वामिपालविवाद

(वरसांगितलेल्या क्षेत्रांत) बुद्ध्या गुरें चारलीं असतां चोरा प्रमाणे दंड ह्मणजे चोरास जो दंड तोच त्याला दंड.

२ हा (१ ल्या अंकांतला) प्रकार ज्या क्षेत्राला कुंपण नाहीं त्याविषयीं जाणावा. कुंपण न केलेल्या शेतांत गुरें चारलीं असतां दंड नाहीं.

मनु क्षेत्र उघडें असल्यामुळें जर गुरें त्या क्षेत्राची नासडी करितील तर त्याबदल राजानें गुराख्यास दंड करूं नये.

असा उघड्या शेताविषयीं दंडनिषेध सांगितला आहे.

३ कुंपण केलेलें अशा मार्गी इत्यादिकाजवळच्या क्षेत्रांत गुरें चरलीं असतां दोष आहेच.

कुंपण घालण्याचा प्रकारही तोच सांगतो.

मनु जेणेकरून उंटाच्या दृष्टीस तें क्षेत्र पडणार नाहीं असें कुंपण करावें, आणि कुतरीं डुकरें यांचीं तोंडें शिरकावयोगीं अशीं छिद्रें बुजवावीं. कुंपण करण्याचा प्रकार

## शाखा ४

काहीं पशूविषयीं दंडाचा निषेध सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य पोळ, उत्सृष्टपशु, प्रसूत झालेली, व चुकलेला पशु, इत्यादिक, हे सोडून द्यावे. व ज्यांस रक्षक आहे तेही राजदैविक उपद्रवानें पीडीत झालेले आहेत तर सोडून द्यावे.

# प्रकरण९

## स्वामिपालविवाद

टीका

१ पोळ ह्मणजे वळू, **उत्सृष्टपशु** ह्मणजे वृषोत्सर्ग विधाने करून किंवा देवतोद्देशें करून सोडिलेले बैल, व्यालेली सोयरतुली, (गाय वगैरे). आपल्या कळपांतून चुकलेला पशु, हे सोडून द्यावे. ह्मणजे दुसऱ्याचें शेत खाल्लें असतां दंड करूं नये. पोळउत्सृष्टगैवगैरेपशूंनी शेतखाल्लें असतां दंड नाहीं.

२ ज्यांस रक्षक आहे तेही जर **देवराजिक** उपद्रवानेपीडीत झाल्यामुळें दुसऱ्याचे धान्यादिकाचा नाश करितात, तर दंड करूं नये. व (मुळांतील) **इत्यादि** शब्दें करून हत्ती, घोडे, वगैरे घ्यावे. राजदैविकउपद्रवानेपीडित झालेल्यागुरांस दंड नाहीं.

उशना ३ हत्ती, घोडे, हे दंडास योग्य नाहींत. कारण, ते **प्रजापाल** ह्मटले आहेत. तसेच काणा, पांगळा, व वारंवार शेतांत शिरतात ह्मणून ताडन वगैरे करून ज्यांस कांहीं खूण केलेली ते, ही दंडास योग्य नव्हत. तसीच कळपांतून चुकलेली, किंवा सोयरतुली, किंवा फळावया करितां सोडलेली गाय **दंड्य** नाहीं. तसेंच लग्नादिकउत्सव काळीं व श्राध्दकाळीं पशूंस दंड नाहीं. हत्तीघोडेवफळावयाकरितांसोडलेलीगायइत्यादिकांस दंड नाहीं.

एथें (१ ल्या अंकात) **उत्सृष्टपशूं**चा निर्देश केला तो दृष्टांतासाठीं. ह्मणजे जसा **उत्सृष्टपशूं**स दंड नाहीं. तसाच पोळ **इत्यादिकां**स ही नाहीं.

## शाखा ५

पशुस्वामीविषयीं सांगितलें. आतां गुरा

# प्रकरण ९.

## स्वामिपालविवाद

त्याविषयीं सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य वेतनदार गुराख्याने धन्यापासून जशीं गुरें आणिलीं असतील तशीं सायंकाळीं परत करावीं. हयगईमुळें मेलेलीं किंवा हरवलेलीं धन्याचीं भरून द्यावीं.

टीका

३ धन्याने सकाळीं जशीं मोजून गुरें हवालीं केलीं असतील तशींच संध्याकाळीं वेतनदार गुराख्याने धन्याचीं मोजून परत करावीं. यांतीं गुराख्याच्या हयगईमुळें मेलीं किंवा हरवलीं, तर गुराख्याने धन्याचीं भरून द्यावीं. हयगईनें नष्ट झालेलीं गुरें गुराख्यानें भरून द्यावीं

वेतन देण्याची रीति नारद सांगतो.

नारद २ शंभर गायींसाठीं दरवर्षास एक कालवड वेतन, दोनशें गायींसाठीं एक दुभती धेनु वेतन द्यावें आणि दर आठव्या दिवशीं (सर्व) गुरांचें दूध द्यावें गुराख्याचें वेतन.

गुराख्याच्या हयगईमुळें गुरांच्या नाशाचा प्रकार मनु सांगतो.

मनु ३ हरवलेलें, किंवा साप विंचू इत्यादिकाने खाल्लेलें, अथवा कुत्र्याने[1] मारलेलें, किंवा अपघाताने मेलेलें, गुराख्याने भरून द्यावें. परंतु गुराख्याच्या हयगईमुळें घडलें असेल तर. अन्यायाने नाश पावलेलीं गुरें गुराख्यानें भरून द्यावीं.

चोरांनीं जबरीने हरण केलें असल्यास गुराख्याकडून देवूं नये.

मनु चोरांनीं गलबला करून हरण केलेलें गुराख्याकडून देववूं

---

[1] कुतरा शब्दें करून वाघ लांडगा इत्यादिक ही घ्यावे.

# प्रकरण ९

## स्वामिपालविवाद

नये. परंतु जर गुराखी त्याच वेळेस गांवाला किंवा आपल्या धन्यालानि वेदन करितो तर.

— ४ दैविक (किंवा राजिक) उपद्रवाने मेलेल्या गुरांचें कर्णादिक अंग (धन्याला) दाखवावें. मेलल्या गुरांचा मुद्दा धन्याला दाखवावा

मनु (राजदैविक उपद्रवाने) गुरें मेलीं असतां कान, कानडें, पुच्छ, वसा, स्नायु, रोचन, असे त्याचे अवयव आणून गुरांच्या धन्याला द्यावे. व इतर[1] अवयव ही दाखवावे.

मूळ

याज्ञवल्क्य गुराख्याचे अपराधाने गुरें नाश पावलीं तर गुराख्याला साडेतेरा पण दंड करून धन्याचें नुकसान भरून देवावें.

टीका

५ गुराख्याच्या अपराधाने गुरें नाश पावलीं असतां गुराख्याला १३॥ पण दंड करून नाश पावलेल्या गुरांचें मोल मध्यस्थाने सांगितल्या प्रमाणें धन्याला देवावें. गुराख्याच्या अन्यायाने नुकसान झाल्यास दंड करून नुकसान भरून देवावें.

गुराख्याला दंड किती असावा हें समजण्या साठीं हें वचन. वरकड पूर्वी (३ या अंकांत) सांगितलेंच आहे.

## शाखा ६

गुरांच्या प्रसंगाने गुरें चारण्याचा प्रकार सांगतो.

---

[1] इतर अवयव ह्मणजे ज्या अवयवावर व्यावर्तक चिन्हें असतील ते. ते.

# प्रकरण९

# स्वामिपालविवाद

मूळ

याज्ञवल्क्य गांवाच्या इच्छेप्रमाणे, भूमीच्या तारतम्याने, किंवा राजाच्या इच्छेप्रमाणे, गुरें चारण्यासाठीं रान राखावें. द्विजाने तृण, काष्ठें, फुलें, हीं सर्वस्थलापासून सत्तेने घ्यावीं.

टीका

१ गांवकराच्या इच्छे प्रमाणे, अथवा भूमीच्या अल्पत्व महत्वाच्या तारतम्याने, किंवा राजाच्या इच्छे प्रमाणें, कांहीं एक भूभाग, गुरें चारण्यासाठीं नांगरल्या वांचून तसाच राखावा. दरगांवास गुरे चारण्यासाठीं एकरान राखावें.

२ द्विजानें[1] तृणादिक नसल्यास गायी, अग्नि, देवता, यांसाठीं तृण, काष्ठें, फुलें, हीं पाहिजे तेथून सत्तेने आणावीं, निवारण केल्यास घेऊं नयेत. फळें घेणें तर ज्याला कुंपण नाहीं अशा क्षेत्रादिकांतून घ्यावीं. ब्राह्मणानें तृण काष्ठादिक पाहिजे तेथून घ्यावें.

गौतम गाई, अग्नि, यांसाठीं तृण, काष्ठें, वनस्पतींची फुलें पाहिजे तेथून आणावीं. फळें तर उघडया (क्षेत्रादिका) पासून मात्र.

३ हा प्रकार (२ रा अंक) ज्याला स्वामी आहे अशा क्षेत्राविषयीं. अस्वामिक क्षेत्राविषयीं तर ब्राह्मणा खेरीज इतरांची ही परिग्रहानेच सत्ता उत्पन्न होती. असें त्याने (गौतमाने) च (७ व्या प्रकरणीं १ ल्या शाखेच्या १८ व्या अंकांत) सांगितलें आहे "रिक्थ, क्रय, संविभाग, परिग्रह, आणि अधिगम, इतक्यानिमित्तांवरून मालक समजला जातो."

स्मृति ४ तृण, काष्ठें, फुलें, अथवा फळें, हीं कोणी न पुसतांना घेतो

---

[1] एथें द्विज शब्दें करून ब्राह्मण घ्यावे.

# प्रकरण ९

## स्वामिपालविवाद

तर तो हस्तछेदास योग्य होतो

असें जें सांगितलें तें ही ब्राह्मणाखेरीज, इतरां विषयीं. अथवा चालत्या काळा विषयीं, किंवा गाई अग्नि इत्यादिकां वांचून इतरां विषयीं.

गाई इत्यादिकांस जाण्या येण्याचें सुगम पडावें ह्मणून अणखी एक चारण्याचें स्थल सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य गांव व क्षेत्रें यांमध्यें शंभर धनुष्यें रान राखावें. खर्वटास दोनशें धनुष्यें आणि नगराला चारशें धनुष्यें.

टीका

५ गांव व क्षेत्रें यांमध्यें शंभर धनुष्या इतकें गांवाच्या सभोंवतें पेरणी केल्या वांचून तसेंच रान राखावें, आणि खर्वट ह्मणजे ज्या गांवाला कांटे झाडें, निंबारा, पुष्कळ आहे तो. अशा गांवाला दोनशें धनुष्यें रान राखावें. आणि शहरांत वस्ती फार ह्मणून चारशें धनुष्यें रान राखावें.

गुरें चारण्यासाठीं गांवाच्या सभोंवतें रान राखण्याचा प्रकार

# प्रकरण ३०

## अस्वामिविक्रय.

### शाखा १

आतां अस्वामिविक्रय संज्ञक व्यवहार प्रकरणाचें निरूपण करितो.

त्याचें स्वरूप नारद सांगतो

नारद १ दुसऱ्याची ठेव, किंवा हरवलेलें सांपडलें, अथवा चोरलेलें द्रव्य मालकाच्या परोक्ष (व आज्ञेशिवाय) जें विकलें जातें, तो अस्वामिविक्रय ह्मटला आहे. *(अस्वामिविक्रयाचें स्वरूप)*

त्या द्रव्याविषयीं पुढें काय करावें तें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य तिऱ्हाइतानें विकलेलें जें स्वीय द्रव्य, तें घ्यावें, गुप्त खरीदी केल्यास खरेदी करणारा दोषी, अयोग्य पुरुषापासून व एकांतीं, व कमी दरानें, व अकाळीं खरीद करणारा चोर.

टीका

२. (आज्ञेशिवाय) तिऱ्हाइतानें विकलेलें असें आपलें द्रव्य जर पाहतो तर तें घ्यावें कारण, त्याजवर विकणाराचें स्वत्व नाहीं, ह्मणून त्यानें केलेला जो विक्रय तो विक्रय नव्हे. *(आपल्यास न कळतां विकलेलें द्रव्य मालकास सांपडलेलें घ्यावें.)*

याप्रमाणेंच गाहाण ठेवलें किंवा दान दिल्हें असल्यास त्याविषयीं जाणावें. कारण, मालकाच्या परोक्ष विकल्यामुळें विवाद एकसारिखाच आहे.

# प्रकरण १०

# अस्वामिविक्रय

कात्यायन  विकरी, दान, गहाण हे व्यवहार निंहाइताने[1] केले ते उलटतात.

२  खरीद करणाराने गुप्तांत खरेदी केल्यास तो अपराधी ठरतो. तसेंच त्या द्रव्याचा आगम दाखविण्याविषयीं असमर्थ अशा पुरुषापासून, किंवा एकांतीं, किंवा बाजार किमती पेक्षां फार अल्प मोलाने, अथवा अकाळीं ह्मणजे रात्रीं, खरेदी केल्यास खरेदी करणारा चोरा प्रमाणे दंड्य होतो.

गुप्तांत, कमी दराने, किंवा अकाळीं विकणारा किंवा खरेदी करणारा दोषी ठरतो.

स्मृति  मालकाच्या परोक्ष विकलेलें द्रव्य दृष्टीस पडलेलें, मालकाने घ्यावें. प्रसिध्दपणें विक्रय झाला असतां दोष नाहीं. एकांतीं क्रय करणारा चोर.

## शाखा २

खरीद करणारास मालकाने धरल्यानंतर त्याने काय करावें तें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य[2]  हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें हस्तगत करून हरण करणारास धरवावें. काल देश यांची अडचण पडल्यास स्वतांच धरून द्यावा.

---

१  निंहाइताने ह्मणजे मालक व त्याचा आज्ञांकित याशिवाय दुसऱ्याने

---

२ मिताक्षरा(?) सुबोधिनी यावचनाचा अर्थ असा सांगितला आहे कीं हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें द्रव्य ज्या कोणी निंहाइता पासून क्रय प्रतिग्रह इत्यादिकें करून मिळालें असतां तोही आणखी दुसऱ्यास विकतो, तेव्हां विकत घेणाराने मधल्याला धरावें.

# प्रकरण १०

## अस्वामिविक्रय

टीका

१ हरवलेल्या किंवा चोरीस गेलेल्या द्रव्याची खरेदी (गहाण) इत्यादिक व्यवहार करणाराने आपल्यावरचा आळ जावा, व राजदंड न व्हावा, एतदर्थ विकणारास (किंवा गहाण वगैरे ठेवणारास) चोर धरणाराकडून धरवावें. — अस्वामि द्रव्याच्या विकणारास धरून द्यावें.

जर तो अविज्ञात देशीं गेला किंवा कालांतरीं मेला सबब मूल दाखविण्या विषयीं असमर्थ, अतएव विकणाराची उजूर न धरितां खरेदी करणारानेच तें धन नाष्टिकाचें परत द्यावें ह्मणजे तितक्यानेच तो निर्दोष होतो. — जर तो सांपडत नाहीं तर खरीद करणाराने नाष्टिकाचें परत द्यावें.

२ अशी श्री शंकराचार्यांनीं व्याख्या केली आहे, परंतु त्याची उपपत्ति होत नाहीं. कारण, हा अर्थ पुढें (३ ऱ्या अंकाचे मूळवचनांत) सांगितल्या मुळें पुनरुक्त दोष मात्र येतो. यास्तव प्रकारांतरें करून त्याची व्याख्या करितो.

हें (१ ल्या अंकाचें मूळवचन) नाष्टिका विषयीं सांगितलें. ह्मणजे असें. हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें स्वीयद्रव्य खरीद करणाराचे हातांत पाहून त्याला नाष्टिकाने चौकीदार वगैरे कडून धरवावें. जर कदाचित् देश काल यांची अडचण पडल्यास, व चौकिदार वगैरे ही जवळ नाहींत सबब त्यांस सांगण्याचे पूर्वींच हा पळून जाईल अशी शंका आहे तर, नाष्टिकाने आपणच त्याला धरून चौकी दाराचे हवालीं करावें.

खरेदी करणारास धरल्या नंतर काय करावें तें सांगतो.

# प्रकरण १०

# अस्वामिविक्रय

मूळ

याज्ञवल्क्य विकणारास दाखवून दिल्याने (खरीदकरणारा) निर्दोष होतो. मग जो तें द्रव्य विकणारा, त्यापासून नाष्टिक आपलें द्रव्य, खरीद करणारा मोल, पावतात. व राजा दंड घेतो.

टीका

३ जर तो धरलेला खरीद करणारा ह्मणेल कीं हें मी चोरिलें नाहीं दुसऱ्यापासून विकत घेतलें. तर विकणारा दाखविल्यानें तो निर्दोषी होतो. सबब त्यावर दावा लागू होणार नाही. त्याने दाखवून दिलेल्या विकणारावर **नाष्टिका**ने वाद सांगावा. खरीदकरणाराने विकणारास दाखविलें ह्मणजे निर्दोषी होतो.

बृहस्पति **मूल** दाखवून दिल्यानंतर खरीद करणारास धरूनये मग त्या मूळाबरोबर **नाष्टिका**ने वाद सांगावा.

४ त्या वादांत जर हें **अस्वामिक** द्रव्य विकलें आहे असा निर्णय होतो. तर त्या हरवलेले किंवा चोरीस गेलेल्या गाय (ह्मैस) वगैरे जिनसेचा जो विकणारा, त्यापासून **नाष्टिका**ची जिनस व खरीद करणाराचें मोल देवबून अपराधानुसार दंड घ्यावा. चोरीस गेलेलें किंवा हरवलेलें दुसऱ्याचें द्रव्य विकणारास दंड

५ जर तो (विकणारा) देशांतरीं गेला असेल तर त्याला आणावया करितां मार्गाच्या तारतम्याने मुदत द्यावी. मुद्दा देशांतरीं असल्यास आणावया करितां मुदत देण्याचा प्रकार

स्मृति खरीदी करणें ती प्रसिध्दपणें करावी. किंवा **मूल** दाखवून द्यावें. तो देशांतरीं गेला असेल तर आणावया करितां मार्गाच्या क्रमाने मुदत द्यावी.

६ जर **मूल** अविज्ञात देशीं गेल्या मुळें तें खरीद करणारा दाखवूं शकत नाही. तर खरेदीची (साक्षीलेख्यादिके करून मूळ दाखवूं शकत नाहीं तर खरेदीची शाबिती करावी.

## प्रकरण १०.

# अस्वामिविक्रय

न) शाबिती करून दिव्यानेच तो निर्दोष होतो.

स्मृति मूल दाखवूं शकत नाहीं तर खरेदीचाच पुरावा करून द्यावा.

७ जर साक्षीलेख्यादिकें करून अथवा दिव्याने खरेदीचा पुरावा करीत नाहीं. व विकणारास ही दाखवीत नाहीं.तर त्यानेच (मोल देऊन) दंड द्यावा. खरेदीचीही शाबीतीकरित नाहीतर दंड

स्मृति मूल दाखवीत नाहीं व खरेदीचाही पुरावा करून देत नाहीं. तरफिर्यादी अन्वयें नाष्टिकाचें धन देववून दंड ही करावा.

तिऱ्हाइताने विकलेलें आपलें द्रव्य घ्यावें असें (१ ल्या शाखेच्या २ ऱ्या अंकाचे मुळांत) सांगितलें. तें घेणारा जो नाष्टिक त्यानें काय करावें तें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य हरवलेलें द्रव्य नाष्टिकाने आगमा कडून किंवा उपभोगाने आपलेंसे शाबीत करावें. शाबीत करीत नाहीं तर त्यापासून राजाने नष्ट झालेल्या द्रव्याचा पंचमांश दंड घ्यावा.

टीका

८ अमुक प्रकाराने हरवलें किंवा चोरीस गेलेलें हें माझें द्रव्य आहे. असें मालकानें आगमा कडून किंवा उपभोगाने शाबीत करून द्यावें. शाबीत करूं शकत नाहीं तर त्यापासून राजाने त्या (विवादास्पदीभूत) द्रव्याचा पंचमांश दंड घ्यावा. हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें मालकाने आपलें सें शाबीत न केल्यास पंचमांश दंड

ह्मणजे एथे क्रम असा. हरवलेलें द्रव्य प्रथमतः नाष्टिकाने

# प्रकरण १०

## अस्वामिविक्रय

आपलेसें शाबीत करावें. नंतर खरीद करणाराने आपल्यावरील चोरीचा दोष जाण्यासाठीं व दिल्हेलें मोल परत मिळण्यासाठीं विकणारास दाखवून द्यावें. जर दाखवूं शकत नाहीं तर केलेल्या खरीदीचा (साक्षिलेखाकडून) पुरावा करून देऊन विकत घेतलेलें द्रव्य नाष्टिकानें घ्यावें.

## शाखा ३

चोराला छपावून ठेवणाराविषयीं सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें द्रव्य राजासनकळवितां जो स्वतांच त्यापासून घेतो त्याला ९६ पण दंड करावा.

### टीका

१ हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें द्रव्य चोरादिकांच्या हातीं पाहून "हें माझें द्रव्य याने अपहारिलें" असें सर्कारांत नकळवितां दर्पादिकें करून स्वतांच घेतो त्यापासून ९६ पण दंड घ्यावा. कारण चोराला छपाविल्यामुळें अपराधी ठरला.

सर्कारांत नकळविता स्वतांच चोरापासून आपलें द्रव्य घेतो त्यास ९६ पण दंड

सर्कारी शिपायानी आणिलेलें द्रव्य काय करावें, तें सांगतो.

# प्रकरण १८

# अस्वामिविक्रय

मूळ

याज्ञवल्क्य हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें द्रव्य जकातदार किंवा पाहरेकरी यानी सर्कारांत दिल्यानंतर एका वर्षांत मालक हजर झाल्यास मिळेल. पुढें सर्कारानें घ्यावें.

टीका

१ हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें द्रव्य जकातदार किंवा चोकीदार यानी सर्कारांत हजर केल्यानंतर एकावर्षाचे आंत मालक हजर झाल्यास मिळेल वर्षापुढें सर्कार घेईल हरवलेलें द्रव्याविषयींएकवर्ष पर्यंत मालकाचीवाटपाहावी

सर्कारी मनुष्यानी आणिलेलें द्रव्य लोकांत प्रसिध्द करून एकवर्ष सर्कारानें तसेंच राखावें.

गौतम हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें द्रव्य सांपडलेलें सर्कारांत कळवावें. सर्कारानें लोकांत प्रसिध्द करून एकवर्ष पर्यंत रक्षावें.

मनु हरवलेलें द्रव्य सांपडलें असतां तें राजानें तीन वर्षे राखावें. तीनवर्षांचे आंत जर मालक हजर होईल तर त्याला द्यावें. पुढें राजानें घ्यावें.

असा जो मनूनें तीन वर्षांचा अवधिसांगितला. तो श्रुतवृत्त संपन्न अशा ब्राह्मणा विषयीं.

रक्षणानिमित्त राजानें षष्ठांशादिक घ्यावें. असें तो (मनु) च सांगतो.

# प्रकरण १०

## अस्वामिविक्रय

मनु ३ हरवलेलें द्रव्य सांपडलें असतां त्यांतून राजाने सध्धर्मास अनुसरून साहवा, दाहवा, किंवा बारावा, हिसा (रक्षणानिमित्त) घ्यावा. रक्षणानिमित्तराजानें साहवा वगैरे अंश घ्यावा.

साहवा, दाहवा, किंवा बारावा, असे भाग सांगितले, ते, तिसरें, दुसरें, आणि पहिलें, वर्ष यांच्या अनुक्रमाने[1] घ्यावें. हा प्रकार पूर्वी (२ या प्रकरणाचे १६ व्या व १७ व्या शाखेंत) सविस्तर सांगितला आहे.

"साहवा, दाहवा, बारावा, हिसा घ्यावा" असें मनूने सांगितलें. त्याचें कांही द्रव्य विशेषीं बाधक सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य एका खुराचे पशू बदल चार **पण**. मनुष्या बदल पांच **पण**. ह्मैस, उंट, गायी, या प्रत्येकां बदल दोन दोन **पण**. आणि शेळ्या मेंढ्या या प्रत्येकां बदल (पणाचा) एकेक चतुर्थांश द्यावा.

टीका

४ एका खुराचा पशू ह्मणजे अश्वादिक, तो हरवलेला सर्कारांत सांपडला असतां त्याचे धन्याने रक्षणानिमित्त चार **पण** सर्कारास द्यावे. मनुष्या विषयीं पांच **पण**. ह्मैस, उंट, गायी या प्रत्येकांचे रक्षणानिमित्त दोन दोन **पण** आणि शेळ्या मेंढ्या या प्रत्येकां बदल **पणा**चा एकेक चतुर्थांश द्यावा. सांपडल्या पशू बदल सर्कारानें करघेण्याचा प्रकार

---

1 अनुक्रमाने ह्मणजे तिसऱ्या वर्षी साहवा, दुसऱ्या वर्षी दाहवा, आणि पहिल्या वर्षी बारावा, या रीतीनें

# प्रकरण ११

# दत्ताप्रदानिक

## शाखा १

आतां विहितमार्ग व अविहितमार्ग यांच्या आश्रयेकरून दत्तानपकर्म, दत्ताप्रदानिक अशा दोहों नावांचें दानसंज्ञक **व्यवहार** प्रकरणाचें निरूपण करितो.

त्यांत **दत्ताप्रदानिका**चें स्वरूप नारद सांगतो.

नारद अविहितमार्गानें द्रव्य देऊन पुनः परत घेऊं इच्छितो तर तें **व्यवहार** प्रकरण **दत्ताप्रदानिक** संज्ञक ह्मटलें आहे.

अर्थ

१ ज्या **व्यवहारीं** अविहितमार्गाच्या आश्रयानें द्रव्य देऊन पुनः परत घेऊं इच्छितो. तो **दत्ताप्रदानिक**. ह्मणजे ज्या दान संज्ञक **व्यवहारीं** दिल्हेलें पुनः हरण केलें जातें; असा जो **व्यवहार** तो. दत्ताप्रदानिकाचें स्वरूप.

२ अर्थात् ज्या **व्यवहारीं** विहितमार्गानें द्रव्य दिल्हेलें पुनः परत घेतलें जात नाही. असा जो दानसंज्ञक **व्यवहार** तो **दत्तानपकर्म** ह्मटला आहे. दत्तानपकर्माचें स्वरूप.

३ असा जो दान संज्ञक **व्यवहार** तो **देय, अदेय, दत्त,** आणि **अदत्त,** असा चार प्रकारचा. दानव्यवहार चार प्रकारचा.

# प्रकरण ११

## दत्ताप्रदानिक

नारद **देय, अदेय, दत्त, अदत्त,** असा, **व्यवहारां**त दान विधि चार प्रकारचा सांगितला आहे.

**देय**— अनिषिद्ध जी दानक्रिया तिजविषयीं जें योग्य तें.(ह्म णजे द्यावयासयोग्य)

**अदेय**— आपलें **स्वत्व** नसल्यामुळें अथवा **दाना**विषयीं निषेधामुळें जें **दान** करण्याविषयीं अयोग्य तें.

**दत्त**— स्वस्थप्रकृतीने दिल्हेलें ह्मणून पुनः परत घ्यावया जोगें नव्हे तें.

**अदत्त**— जें दिल्हेलें परत घ्यावया जोगें तें.

चोहों प्रकारच्या **दान** संज्ञक **व्यवहा** राचें संक्षेपतः निरूपण करितो.

मूळ

याज्ञवल्क्य कुटुंबपोषणाहून अतिरिक्त असें जें स्वसत्तात्मक असेल तें द्यावें.

टीका

४ कुटुंबपोषणाहून अधिक असें जें स्वसत्तात्मक असेल तें **देय**. कारण कुटुंब पोषण आवश्यक आहे. कुटुंबपोषणाहूनअधिकअ सेल तें देय

मनु आईबापवृद्ध, व भार्यापतिव्रता, आणिपुत्र **बाल,** यांचे पोषण शेंकडो कुकर्मे ही करून करावें.

यावरून **देय** एकप्रकारचें आहे असें दाखविलें. आणि "स्व सत्ताक असेल. तें द्यावें." असें सांगितल्यावरून ज्यांवर आपली स त्तानाही अशीं **अन्वाहित, याचितक,** गहाण, समायिकद्रव्य,

# प्रकरण ११

## दत्ताप्रदानिक

व **निक्षेप**, हीं पांच **अदेय** असें **व्यतिरेकें**करून दाखविलें.

नारद ५ **अन्वाहित**, **याचितक**, गहाण, समायिकद्रव्य, ठेव, स्त्री, पुत्र, आणिवंशाकायम असतां सर्वस्व, व दुसऱ्यास **प्रतिश्रुत** केलेलें, तें ही. असीं जरी मनुष्य घोर विपत्तींत असला तरी हीं **अदेय** आहेत. असें आचार्य सांगतात.

असे जे आठप्रकार सांगितले ते. हीं द्रव्यें **अदेय** आहेत अशा अभिप्रायेंकरून. केवळ इतक्या द्रव्यावर आपली सत्ता आहे अशा अभिप्रायेंकरून सांगितलें नाहीं. कारण स्त्रीपुत्र, सर्वस्व, **प्रतिश्रुत**, यांवर आपलें **स्वत्व** आहेच. **अन्वाहिता**दिकांचें स्वरूप तर पूर्वींच सविस्तर सांगितलें आहे.

"स्वसत्तात्मक असेल. तें द्यावें." असें सांगितल्याने स्त्रीपुत्रादिकांवर ही **स्वत्व** आहेच म्हणून तीं ही द्यावीं. असें प्राप्त झालें असतां बाधक सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य स्त्रीपुत्र, यांवांचून द्यावें. व वंशाकायम असतां सर्वस्व देऊंनये. व जें एकाला देऊंकेलेलें तें दुसऱ्यास देऊंनये.

### टीका

६ पुत्र, स्त्री, यांवांचून जें स्वकीय असेल तें द्यावें. स्त्रीपुत्र देऊंनयेत.

# प्रकरण ११

## दत्ताप्रदानिक

तसेंच पुत्रपौत्रादिक वंश कायम असतां सर्वस्व देऊंनये.

स्मृति पुत्रांस उत्पन्न करून व त्यांचे संस्कार करून त्यांस वृत्तिदेऊ न ठेवावी.

तसेंच एकाला देऊंकेलेलें हिरण्यादि द्रव्य दुसऱ्यास देऊंनये.

याप्रमाणे स्त्रीपुत्रादिकां वांचून देय धन सांगून प्रसंगसंगतीनें प्रतिग्रह करणाराने प्रसिध्दपणे प्रतिग्रह करावा. असें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य प्रतिग्रह करणें तो प्रसिध्दपणें करावा. स्थावराचा तर विशेषंकरून.

टीका

७ प्रतिग्रह करणें तर विवाद नव्हावा एतदर्थ प्रसिध्दपणेंच करावा. त्यांत स्थावराचा प्रतिग्रह तर विशेषें करून प्रसिध्दपणेंच करावा. कारण जसें सुवर्णादिक आपल्या जवळ असलेलें (हें माझें आहे असें) दाखवितां येतें तसें स्थावर दाखवितां येत नाहीं. प्रतिग्रह प्रसिध्दपणें करावा.

असें प्रासंगिक सांगून आतां प्रकृत सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य जें ज्याला देऊं केलेलें तें द्यावेंच. देऊन पुनः परत घेऊं नये.

# प्रकरण ११

# दत्ताप्रदानिक

टीका

८ जें त्याला धर्मासाठीं देऊं केलेलें तें त्याला द्यावेंच. परंतु तो धर्मापासून भ्रष्ट झाला नाहीं तर. धर्मभ्रष्ट झाला तर देऊं केलेलें ही देऊंनये. धर्मार्थ देऊं केलेलें ही धर्मभ्रष्ट असल्यास देऊंनये.

गौतम धर्मार्थ कबूल करून ही दानपात्र अधर्मी असल्यास देऊंनये.

९ विहितमार्गास अनुसरून जें दत्तद्रव्य, तें सात प्रकारचें आहे. तें पुनः परत घेऊंनये. तर तसेंच मान्य करावें. विहितमार्गानें दिलेलें परत घेऊंनये.

यावरून, अविहितमार्गास अनुसरून दिलेलें. असें सोळाप्रकारचें ही **अदत्त** द्रव्य परत घ्यावेंच. असें अर्थात् सिद्ध होतें. अविहितमार्गानें दिलेलें परत घ्यावें.

नारद **दत्त** सात प्रकारचें. आणि **अदत्त** सोळा प्रकारचें. शास्त्रांत सांगितले आहे.

**दत्त** द्रव्याचें स्वरूप नारद सांगतो.

नारद **पण्य** द्रव्याचें मोल, **भृति**, बक्षीस (किंवा इनाम), प्रेमतेने दिलेलें, प्रत्युपकाराने दिलेलें, **स्त्रीशुल्क**, आणि पुण्यार्थ दिलेलें, असें **दत्त** द्रव्य सात प्रकारचें दानधर्म जाणणारे बोलतात.

अर्थ

१० **पण्य** द्रव्याचें मोल, ह्मणजे विकत घेतलेल्या जिनसाचें मोल. भृति ह्मणजे काम करणारास दिलेलें. बक्षीस ह्मणजे बंदीजन, भाट, **इत्यादिकांस** दिलेलें. प्रेमतेनेदिलेलें ह्मणजे कन्यापुत्रादिकांस दिलेलें. प्रत्युपकारानेदिलेलें ह्मणजे उपकार करणारास उपकार फिटण्या साठीं दिलेलें. **स्त्रीशुल्क** ह्मणजे विवाहा साठीं कन्येच्या आ दत्तद्रव्याचे सातप्रकार व त्याचीं स्वरूपें.

# प्रकरण ११

## दत्ताप्रदानिक

ईबाप इत्यादिकांस दिलेलें. पुण्यासाठी दिलेलें. असें हें सातप्रकारचें दत्त द्रव्य पुनः परत घेऊंनये.

### अदत्तद्रव्याचें स्वरूप ही तोच सांगतो.

नारद भयग्रस्त, क्रोधाविष्ट, शोकार्त यानी दिलेलें. तसाच लांच, परिहासाने, व्यत्यासाने, कपटाने, दिल्हेलें. बाल, मूढ, परतंत्र, रोगार्त, मत्त, उन्मत्त, यानी दिलेलें. तसेंच. हा माझें हें कामकरील, अशा प्रतिलाभाच्या आशेने दिल्हेलें. स्वतां अपात्र असतां मी सत्पात्र आहें. असें सांगणारास दिलेलें अधर्मकार्यार्थ दिल्हेलें. असें जें अज्ञानाने दिल्हेलें. तें एथे अदत्त ह्मटलें आहे.

### अर्थ

११ भयग्रस्ताने बंदिग्राहादिकांस भयानेदिल्हेलें. क्रोधाविष्टाने पित्रादिकांच्या वैरभावामुळें दुसऱ्यासदिलेलें. शोकार्ताने पुत्रादिकांच्या वियोगामुळें शोकानेदिलेलें. तसाच लांच (उत्कोच) ह्मणजे कार्याविषयीं जो मध्यें प्रतिबंध येतो त्याचें निवारण व्हावें एतदर्थ अधिकाऱ्यांस दिलेलें परिहासानेदिलेलें. व्यत्यासाने ह्मणजे एकाचें द्रव्य दुसऱ्यालादिलें, त्याने ही अणखी तिसऱ्यासदिलेलें. तें. कपटाने ह्मणजे शत देण्याचा संकल्पकरून सहस्राचा उल्लेखकरून दिलेलें. बालानेदिलेलें. मूढाने ह्मणजे शास्त्रीयव लौकिक व्यवहाराविषयीं अनभिज्ञ जो त्याने, दिलेलें. पराधीनाने ह्मणजे पुत्र दास इत्यादिकानेदिलेलें. रोग्यानेदिलेलें. मत्ताने दिलेलें. उन्मत्ताने दिलेलें. तसेंच हा माझें हें कार्य करील अशा प्रतिलाभाच्या इच्छेनेदिलेलें. मी दोन अदत्तद्रव्याचे सोळाप्रकारव त्याचींस्वरूपें.

* परिहासानेदिलेलें ह्मणजे देण्याचा इरादा नधरिता उगेंच मस्करीने दिलेलें.

# प्रकरण ११.

## दत्ताप्रदानिक

पात्र आहे. असें सांगणारा जो अपात्र त्यासदिलेलें. मी यज्ञकरणा[१६]र आहे. अशानिमित्ताने धनसंपादून तें जुगारांत उडविणारा. अशा अधार्मिकासदिलेलें. असें सोळाप्रकारचें दिलेलें हीं नदिल्यासारिखेंच अ नएव पुनः परत घ्यावें. ( कारण अन्यायमार्गानेदिलेलें. )

१२. रोग्याने दिलेलें परत घ्यावें असें सांगितलें तें धर्मकार्या शिवाय दुसराविषयीं. — रोग्यानेदिलेलेंधर्मकार्यासाठींअसल्यासपरतघेऊंनये.

कात्यायन स्वस्थ किंवा रोगार्त असतांना त्याने धर्मार्थ जें दिलें किंवा धर्मार्थदान ऐकविलें तें नदेता जर तो मरेल तर निःसंशय त्याच्या पुत्राकडून देवावें.

तसेंच सर्वविवादां विषयीं साधारण असें अणखी एक संक्षिप्तार्थक वच न सांगतो.

मनु काहीं एकउपाधिवशें करून झालेले जे गहाण, विक्रय, दान, प्रतिग्रह, हे व्यवहार; त्यांचा तो तो उपाधि समजला असतां ते उलटतात.

जो अदेय द्रव्य देतो. किंवा जो सो ळा प्रकारचें अदत्त घेतो त्यां दोघां स नारद दंड सांगतो.

नारद १३ जो लोभाने ( सोळा प्रकारचें ) अदत्त घेतो तो अदत्त घेणारा, अदेय द्रव्य देतो तो अदेय देणारा, ह्मणून त्या दोघांस (त्या द्रव्याच्या तारतम्याने) दंडकरावा.

# प्रकरण १२

# क्रीतानुशय

## शाखा १

### क्रीतानुशयाचें स्वरूप नारद सांगतो.

नारद. १ मोल देऊन जिनस खरीद केल्यावर खरीद करणाराच्या पसंतीस पडत नाहीं तर त्याविषयीं जो **व्यवहार** तो **क्रीतानुशय** ह्मटला आहे. क्रीतानुशयाचें स्वरूप.

त्या **व्यवहारीं** ज्या दिवशीं जिनस खरीद केला त्याच दिवशीं जशाचा तसा परत करावा असें तोच सांगतो.

नारद. २ मोलानें जिनस खरीद केल्यानंतर खरीद करणारास वाटेल कीं खरीदी चांगली झाली नाहीं. तर त्याच दिवशीं जशाचा तसा तो परत करावा. खरीदकेल्यावरपसंतीसनपडे तरत्याचदिवशींपरतकरावा.

पुढें (दुसऱ्या दिवशीं) परत केला असतां विशेष तो (नारद) च सांगतो.

नारद. ३ दुसऱ्या दिवशीं परत केल्यास किमतीचा तिसावा अंश कमी करून किमत माघारीं द्यावी. तिसऱ्या दिवशीं परत केल्यास किमतीचा पंधरावा अंश कमी करावा. याच्या पुढें जिनस परत करूं नये. तिसऱ्यादिवसापुढे जिनसपरत होतनाहीं

वरचा प्रकार (३ रा अंक) उपभोगें करून नाश व्हावया जोगा असा धान्य (लोखंड) **इत्यादि** जिनस. त्या खेरीज जो दुसरा जिनस. त्याविषयीं जाणावा.

# प्रकरण १२
## क्रीतानुशय

धान्य लोखंड इत्यादि जिनस परत करण्याविषयी तर दुसरी मुदत सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य धान्य, लोखंड, पाठाळ, रत्न, दासी, दुभतें गुरूं, दास, या प्रत्येकाची परीक्षा यथाक्रमेंकरून दाहा, एक, पांच, सात, तीस, तीन, पंधरा, दिवसपर्यंत करावी.

टीका

४ धान्य तांदूळ, गोधूम, इत्यादिक; लोखंड; पाठाळ बैल टोणगा वगैरे; रत्न मोती पोंवळीं इत्यादिक; दासी, दुभतें गुरूं, गाय ह्मैस इत्यादिक; आणि दास, यांची यथाक्रमें करून दाहा, एक, पांच, सात, तीस, तीन, पंधरा, दिवस पर्यंत चौकशीकरण्याची मुदत ह्मणजे खरीद केलेल्या धान्यादिकाची चौकशी करून हा जिनस सोइवार किंवा चांगला मिळाला नाहीं असें वाटेल तर वर सांगितलेल्या त्या त्या मुदतींत तो परत करावा. पुढें परत केल्यास घेऊंनये. धान्यादिजिनसपरतकरण्याविषयी.

मनु ५. कांहीं जिनस विकत दिल्यावर किंवा घेतल्यानंतर वाटेलकीं सौदा नीट झाला नाहीं तर दाहा दिवसाच्या आंत तो जिनस परत द्यावा किंवा परत घ्यावा. (पुढें नाहीं)

असी जी मनुने दाहा दिवसांची मुदत सांगितली. ती वर (४ ह्या अंकात) सांगितलले जे लोखंड वगैरे त्याखेरीज, व उपभोगें करून नाश व्हावया जोगें नव्हे असेंजें घर, क्षेत्र, वाहन, शयन, आ

# प्रकरण १२

# क्रीतानुशय

सन, इत्यादिक द्रव्य, त्याविषयीं.

६ हासर्व (१ल्या अंकापासून एथपर्यंत सांगितलेला) प्रकार चौकशीनकरून घेतलेल्या जिनसाविषयीं. चौकशीकरून, व पुनः परत करावयाचा नाही असी कबूलात करून, घेतलेला जिनस तर परत घेऊंनये. चौकशीकरूनवपरतनकरण्याचीबोलीकरूनघेतलेला जिनसपरतहोतनाही.

स्मृति खरीदकरणाराने सतां पूर्वीच चौकशी करून माल घ्यावा. चौकशीकरून घेतलेलामाल विकणारा परत घेणार नाही.

## शाखा २

धान्यादिकांच्या परीक्षाप्रसंगाने सुवर्णादिकाची परीक्षा सांगतो.

### मूळ

याज्ञवल्क्य सोनें अटलें असतां कमी होतनाहीं. रुपें शेंकडा दोन पलें जळतें. त्रपु शिसें आठ पलें. तांबे पांच पलें. लोखंड दाहा पलें जळतें.

### टीका

१ सोनें अटलें असतां कमी होतनाही. यास्तव अलंकार करावयासाठीं सोनाराला जितकें वजन करून दिल्हें असेल तितका अलंकार वजनकरून घ्यावा त्यांतकमती आल्यास तूट भरून घ्यावी. व दंड ही घ्यावा. रुपें अटलें असतां शेंकडा दोन पलें तुटतें. त्रपु शिसें आठ पलें जळतें. तांबें अटलें तर शेंकडा पांच पलें सुवर्णादिधातू अटल्याअसतांकोणत्याधातूचीकिती तूटयाचीनीप्रकार

# प्रकरण १२.

## क्रीतानुशय

जळतें लोखंड आटलें असतां शेंकडा दाहा पलें तुटतें. कांसें तर त्रपु व तांबें या दोहोंनें होतें ह्मणून त्याची तूट त्या दोहों धातूंच्या सुमारानें कल्पावी. यापेक्षां अधिक तूट करणारे कारेगारांस दंड करावा.

ऊर्णादि वस्त्राविषयीं वाढ सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ऊर्णावस्त्र व कापड यांची शेंकडा दाहा पलें वाढ. तींच मध्यम असल्यास पांच पलें वाढ. बारीक असल्यास तीन पलें वाढ.

टीका.

२ लोंकरीच्या जाड्या सुताचें कांबळें धाबळी इत्यादि विणिलें असतां शेंकडा दाहा पलें वाढ. याच प्रमाणें कापसाच्या जाड्या सुताचे कापडाविषयीं जाणावें. मध्यम सूताच्या कापडाची शेंकडा पांच पलें वाढ. बारीक सूताच्या विणलेल्या वस्त्रादिकांस शेंकडा तीन पलें वाढ. कोणते कापड विणलें असतां कितीवाढ येते तो प्रकार

हा प्रकार (१ ला २ रा अंक) कोऱ्या कापडाविषयीं.

दुसऱ्या द्रव्यांविषयीं कांहीं विशेष सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. कार्मिक व रोमबद्ध हीं वस्त्रें विणिलीं असतां तिसावा अंश तूट. कौशेय व वल्कलें यांची तर तूट नाहीं व वाढही नाहीं.

# प्रकरण १२

## क्रीतानुशय

टीका

३ **कार्मिक**[1]— कुशलतेनें विणलेलें कापड ह्मणजे अनेकरंगांच्या सुतानीं विणलेलें वस्त्र तयार झालें असतां कमळें झाडें वेलबुटी **इत्यादि** निष्पन्न होतात. असें जें कापड तें आणि **रोमेबद्ध**[2]— ह्मणजे उत्तरीयवस्त्र लोकरीनें विणलें जातें तें. **कार्मिक** व **रोमबद्ध** हीं विणलीं असतां तिसावा अंश तूट येते.

४ रेशमी कापड (कौशेय) व वल्कलें ह्मणजे वृक्षाचे अंतरसाली पासून निर्मिलेलीं वस्त्रें. यांची तूट नाहीं वाढ ही नाहीं. अतएव विणावयाकरितां जितकें वजनकरून साली **इत्यादि** कांच्या स्वाधीन केलें असेल तितकें परत घ्यावें.

द्रव्याच्या असंख्य पणामुळें प्रत्येक
द्रव्याची वाढ तूट सांगतां पुरवत
नाहीं ह्मणून सामान्यतः वाढ तू
ट समजण्याचा उपाय सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य वस्त्रादि द्रव्य विणल्यानंतर तूट आली तर त्या त्या द्रव्याचे जे माहीतगार ते काल, देश, उपभोग व द्रव्याची योग्यता जाणून जितकें सांगतील तितकें द्यावें.

---

१ गाजम गालिशा सतरंजी हशा पासोडा छीट वगैरे

---

२ रोमबद्ध ह्मणजे धुसा शाल जोडी वगैरे वस्त्र असावें

# प्रकरण ३२

## क्रीतानुशय

टीका

५ **तागापासून** केलेलें कापड व **क्षौम इत्यादि** वस्त्र यांत तूट आली असतां त्यांतले जे माहीतगार असतील ते. देश, काल, उपभोग व त्या सनगाची योग्यता पाहून जें सांगतील तें कारेगारांकडून देवावें.

# प्रकरण १२
## अभ्युपेत्याशुश्रूषा

### शाखा १

आतां **अभ्युपेत्याशुश्रूषा** या
नावाचें जें **व्यवहार** प्रकरण त्याचें
निरूपण करितो
त्याचें स्वरूप नारद सांगतो.

नारद १ जो चाकरी पतकरून पुढें ती करीत नाहींतर त्याविषयीं जो कांहीं वाद प्रवृत्तहोतो त्याचें नाव **अभ्युपेत्याशुश्रूषा.**

२ चाकर पांचप्रकारचा **शिष्य, अंतेवासी, भृतक, नायक, दास.** त्यांत **शिष्यादिक** आधजे चार ते काम करणारे. आणि दास पंधराप्रकारचा तो द्वार, उष्टेखळी, रस्ता, यांचें संमार्जनादि अमंगल कामकरणारा.

नारद हें (वरचें) च स्पष्टकरून दाखवितो.

नारद सेवक पांचप्रकारचा शास्त्रांत सांगितला आहे. त्यांत **शिष्य, अंतेवासी, भृतक, नायक** असे चारप्रकार हे कामकरी. आणि दास तर **गृहजात क्रीत इत्यादिक** पंधराप्रकारचा. या पांचांसही पारतंत्र्य एकसारिखेंच. जाति, काम आणि वृत्ति हीं मात्र निरनिराळीं व त्यांचें कामही दोनप्रकारचें अनिंद्य व अमंगल, त्यांत **शिष्य अंतेवासी भृतक नायक** यांनीं करावयाचें जें काम तें अनिंद्य आणि दासांनीं करावयाचें जें काम ते अमंगल. ह्मणजे घर, द्वार, उष्टेखळी, रस्ता यांचें संमार्जन, गुह्यांगस्पर्श, उच्छिष्ट, विष्ठा, मूत्र हीं घेऊन बाहेर टाकणें व ध

# प्रकरण ३३

## अभ्युपेत्याशुश्रूषा

त्याची इच्छा असल्यास त्याचें आंगरगडणें **इत्यादिक** हें अमंगलकाम ह्मटलें. याहून दुसरें तें सर्व अनिद्यकाम.

**शिष्य** — वेद (शास्त्र) यांचें अध्ययन करणारा.

**अंतेवासी** — शिल्पशास्त्र शिकणारा.

**भृतक** — मजूर मोलानें काम करणारा.

नायक — कामगारावर जो दरोगा ठेवलेला तो.

त्यांत **भृतक** तीन प्रकारचा

शास्त्रोपजीवी, शेतकरी आणि भारवाहक

स्मृति त्यांत शास्त्रोपजीवी उत्तम, शेतकरी मध्यम आणि भारवाहक निकृष्ट

स्मृति ३ **गृहदास, क्रीत, लब्ध, दायप्राप्त, दुर्भिक्षरक्षित,** गहाण ठेवलेला, तसाच **ऋणमोचित, युद्धप्राप्त, पणजित, स्वयंदास, संन्यासभ्रष्ट, कृतकाल, भक्तदास** तसाच **वडवाहृत** आणि आपल्यास विकून घेणारा असे पंधरा दास शास्त्रांत सांगितले आहेत.

अर्थ

**गृहदास** — घरच्या दासीचे ठाईं झालेला.

**क्रीत** — मोल देऊन विकत घेतलेला.

**लब्ध** — प्रतिग्रहादिकें करून मिळालेला.

**दायप्राप्त** — पित्रादिकांचा दास वांटणींत आलेला.

**दुर्भिक्षरक्षित** — आपलें दास्य करावें एतदर्थ दुकळांत मरणापासून रक्षिलेला.

# प्रकरण १२

## अभ्युपेत्याशुश्रूषा

गहाण ठेवलेला ऋणफिटेपर्यंत उत्तमर्णाचा दास होतो

**ऋणमोचित**—— ऋणापासून मुक्तकेल्यामुळें दस्य पतकरून राहिलेला.

**युद्धप्राप्त**—— युद्धांत जिंकून आणलेला.

**पणजित**—— जर यावादांत पराजय पावेन तर तुझ दास होईन असी प्रतिज्ञापूर्वक वादांत पराजित झालेला दास होतोतो.

**स्वयंदास**—— जो स्वतांच दास्य पतकरून राहिलेला.

**संन्यासभ्रष्ट**—— संन्यास धर्मापासून भ्रष्ट झालेला (आमरण पर्यंत राजाचा) दास होतो.

**कृतकाल**—— इतके दिवसपर्यंत तुझा दास होईन असा करार करून राहिलेला.

**भक्तदास**—— जो सर्वकाल अन्नासाठीं दास्य पतकरून राहिलेला.

**वडवाहृत**—— वडवा ह्मणजे घरची दासी तिच्यालोभाने तिशी लग्न लावून दास्य पतकरून राहिलेला. आपल्यास विकून घेणारा. असे पंधरा प्रकार सांगितले आहेत.

मनु ४ **ध्वजाहृत व वडवाहृत, भक्तदास, गृहदास, क्रीत, स्वयंदास, दायप्राप्त, दंडदास** ह्मणजे

---

१ पणजित ह्मणजे कोणी ह्मणतातकीं यूतांत जिंकलेला जो दास होतोतोही

# प्रकरण १२

## अभ्युपेत्याशुश्रूषा

**पणजित.** असे हे सात दास ह्मटले आहेत.

असे जे मनूनें सात दास सांगितले ते. यांस दास्य आहे असें समजण्यासाठीं. केवळ सातांपेक्षां अधिक दास नाहींत असें सांगण्यासाठीं नव्हे.

हे जे शिष्य, **अंतेवासी, भृतक,** नायीक, दास, वर सांगितले. त्यांत शिष्याची वृत्ति तर पूर्वींच (आचाराध्यायांत) "गुरूनें बोलाविलें असतां अध्ययन करावें आणि ह्मटलेल्याची परीक्षा घ्यावी." **इत्यादिकें**करून सांगितली आहे. नायीक व **भृतक** यांची वृत्ति पुढें[1] "जो जितकें काम करितो त्याप्रमाणें त्यास वेतन." **इत्यादिक** सांगितली आहे.

आतां दास व **अंतेवासी** यांच्या वृत्ती विषयीं कांहीं विशेष सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य जबरीनें दास केलेला व चोरांनीं हरण करून विकलेला व धन्याचें प्राण संरक्षण करणाराही मुक्त होतात. **भक्तदास** धन्याचें अन्न न खालें ह्मणजे व दुसरेही दास ते ते निष्क्रय दिल्यानें मुक्त होतात.

टीका

५ जुलमानें गुलाम केलेला, व चोरांनीं हरण करून विकलेला, गहाण ठेवलेला. किंवा दिलेलाही धन्यानें मुक्त करावा.

---

१ पुढें ह्मणजे १५ व्या प्रकरणीं १ ल्या शाखेच्या ८ अंकाचे मुळांत

# प्रकरण १२

## अभ्युपेत्याशुश्रूषा

धनी त्यापासून मुक्तकरीतनाहीं तर सर्कारानें धन्याकडून मुक्तकरवावा.

नारद चोरांनीं हरण करून विकलेलें व जेजुलमानें गुलाम केलेले ते सर्कारानें (धन्याकडून) सोडवावे. कारण त्यावर त्यांचें दासत्वनाहीं.

६ चोर वाघ **इत्यादिकां**चे अडचणींत सांपडल्या धन्याचे प्राण जो वांचविती तोही दासत्वापासून सूट पावती.

धन्याचें प्राण संरक्षण केल्यामुळें दासत्वापासून सूट पावणें हें सर्व दासांविषयीं एकसारखेंच आहे.

नारद या पंधरा दासांतून जो कोणी धन्याला प्राणसंकटापासून मुक्त करितो तो दासत्वापासून मुक्त होऊन पुत्राबरोबर विभाग पावतो.

**भक्तदासा**दिकांचें ही दासत्वापासून सूट पावण्याविषयीं प्रत्येकाचें निरनिराळें कारण सांगतो.

७ **दुर्भिक्षरक्षित** व **भक्तदास** यांनीं दासत्वास आरंभ करून जितकें धन्याचें अन्न खाल्लें असेल तितकें दिलें म्हणजे ते मुक्त होतात. गहाण ठेवलेला दास तर जितकें धन घेऊन धन्यानें गहाण ठेवला असेल तितकें दिल्यानें सूट पावतो. **ऋणदास** ही, जितकें द्रव्य देऊन धन्यानें सावकारापासून सोडविला असेल तितकें द्रव्य सव्याज धन्याचें दिल्हें म्हणजे सूट पावतो.

# प्रकरण ३३

## अभ्युपेत्याशुश्रूषा

नारद तर (सूट पावण्या विषयी) अणखी विशेष सांगतो.

नारद ८ दुर्भिक्षरक्षित दासानें जें दुर्भिक्षांत भक्षिलें असेल तें देऊन आणखी धन्याला दोन गायी द्याव्या. ह्मणजे मुक्त होतो. कारण दुर्भिक्षांत पोषण केलें. हें धन्याचे उपकार केवळ चाकरीनेंच फिटत नाहींत. **भक्तदास** तर जेव्हां भक्षिलेलें अन्न देईल तेव्हां मुक्त होतो. गहाण ठेवलेला दास ही जेव्हां धनी गहाण सोडवील तेव्हां मुक्त होतो. **ऋणदास** सव्याज कर्ज दिल्यानें दासत्वापासून मुक्त होतो. **स्वयंदास, युद्धप्राप्त, पणजित,** हे आपल्या सारिखें काम करणारा असा बदल्या दिल्यानें दासत्वापासून मुक्त होतात. **कृतकाल** दास तर मुदत भरल्यानंतर मुक्त होतो. **वडवाहृत** दास तर तिशीं त्यानें संगनिरोध केला ह्मणजे दासत्वापासून सूट पावतो.

९ **गृहदास, क्रीत, लब्ध, दायप्राप्त,** आणि आपल्यास विकणारा, यांस सूट पावण्याविषयीं विशेष कारण सांगितलें नाहीं. अतएव धन्याचें प्राण संकटापासून संरक्षण करून त्याची प्रीतिसंपादन करावी हेंच एक सर्व साधारण साधन आहे या शिवाय दुसरें साधन नाहीं.

दासाला सूट देण्याचा प्रकार ही तोच सांगतो.

नारद १० जो धनी संतोषाने आपल्या दासाला सूट देऊं इछितो दासाला सूट देण्याचा विधि

# प्रकरण १३
## अभ्युपेत्याशुश्रूषा

त्यानें दासाकडून खांद्यावर जलानें भरलेला कुंभ आणवून फोडावा. आणि अक्षता, पुष्पें, उदक, हीं त्याचे मस्तकीं शिंपडून आतां तूं माझा दास नाहींस असें त्रिवार बोलून पूर्वाभिमुख त्याचा उत्सर्ग करावा.

संन्यासभ्रष्ट दासाला मुक्तताच नाहीं असें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य संन्यासधर्मापासून भ्रष्टझालेला आमरणांत राजाचा दास होतो.

टीका

११ संन्यासधर्मापासून भ्रष्ट झालेला जर प्रायश्चित्त स्वीकारीत नाहींतर मरण पर्यंत राजाचाच तो दास होऊन राहतो. मध्यें त्याचीमुक्तता नाहीं. संन्यासधर्मापासून भ्रष्टझालेलाराजाचादासहोतो.

वर्णांच्या अनुलोमक्रमानें दास करण्याची व्यवस्था सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य वर्णांच्या अनुलोम जातीचा दास करावा प्रतिलोम जातीचा करूंनये.

टीका

१२ ब्राह्मणादि वर्णांच्या अनुलोम जातीचे दास ह्मणजे ब्राह्मणाचे क्षत्रियादिक दास, क्षत्रियाचे वैश्य शूद्र. वैश्याचा निकृष्टजातीनेंउत्कृष्टजातीचेंदास्यकरावें

# प्रकरण १२.

## अभ्युपेत्याशुश्रूषा

शूद्र[1] याप्रमाणें प्रतिलोम जातीचा दास होतनाहीं. स्वधर्मापासून भ्रष्ट असा जो संन्यासी तो तर प्रतिलोम जातीचाही दास होतोच.

स्मृति वर्णाच्या प्रतिलोम जातीचें दासत्व होतनाहीं परंतु संन्यासभ्रष्ट दासाशिवाय इतर दासांचें दास्य भार्ये सारिखें[2] आहे.

### अंतेवासीनें कसें वर्तावें. तें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य शिल्प शास्त्राची विद्या पूर्णझाली तरी नियमित काळ पर्यंत अंतेवासीनें गुरूच्या घरीं भोजन करून राहावें, आणि शिकलेल्या शिल्प विद्येचें फल गुरूला द्यावें.

टीका

१२ अंतेवासीनें गुरूच्या घरीं नियमित काळ पर्यंत ह्मणजे "च्यारवर्षे शिल्प शास्त्र शिकण्यासाठीं तुझ्या घरीं राहीन, अशा करारमुदती पर्यंत" राहावें. जरी करारमुदती चें आंतच अपेक्षितविद्या पूर्ण झाली तरी मुदत भरे पर्यंत त्या

शिल्पशास्त्र शिकणारानें गुरूच्याघरी कसेवर्तावें तोप्रकार

---

१ शूद्रापेक्षां पलीकडे निकृष्ट वर्णनाहीं ह्मणून शूद्राचा शूद्रच दास होतो.

---

२ भार्ये सारिखें ह्मणजें. भार्या जशा अनुलोम जातीच्या आहेत (याचा विशद प्रकार ७व्या प्रकरणीं १८व्या१ल्या अंकांत पाहावा.) तसें दासत्वही.

# प्रकरण १२
## अभ्युपेत्याशुश्रूषा

चे घरीं जेवून व शिकलेल्या शिल्याचें[1] फल गुरूला देऊन राहावें.

नारद या विषयीं विशेष सांगतो.

नारद १४ शिल्प विद्यासंपादना विषयीं प्रवृत्त जो त्यानें आईबाप व गैरेची आज्ञा घेऊन करार मुदत पर्यंत गुरूच्या घरीं राहावें. गुरूनें ही आपल्या घरीं जेवण देऊन पुत्रा प्रमाणें त्यास वर्तवावें. व त्याला दुसरें काम सांगूनये. व आस्थेनें सांगणारा व सुशीलअशा गुरूचा जो त्याग करितो त्याला (राजानें) बलात्कारानें गुरुगृहीं ठेवावें. (नराहीतर) ताडन व बंधन याशिक्षेस योग्य होतो. कृतविद्य झालातरी करारमुदत भरे पर्यंत तेथेंच राहावें. आणि त्या मुदतींत जें काम करील त्याचें फल गुरूला द्यावें. शिल्पविद्या पूर्ण होऊन करारमुदत भरल्यावर गुरूला प्रदक्षिणा घालून स्वगृहीं जावें. व गुरूनें ही त्यास अनुमोदन द्यावें.

---

[1] फल ह्मणजे असें पांचावर्षांचा करार करून राहिला असतां तिहीं वर्षांचें आंत विद्या पूर्ण झालीतर पुढें दोन वर्षें त्याचे घरीं जेवून फुकट शिल्पकर्म करावें किंवा शिल्पकर्मानें जें मिळेलतें.

# प्रकरण १५

## संविद्व्यतिक्रम

### शाखा १

आतां संविद्व्यतिक्रम संज्ञक व्यवहाराचें निरूपण करितो. त्याचें स्वरूपनारद व्यतिरेक द्वारा सांगतो.

नारद १ पाखंड नैगम इत्यादिकांची जी स्थिति तिला समय ह्मटलें आहे. त्या समयाचें उल्लंघन करूं नये. असें आहे अतएव त्या समयाचें उल्लंघन झालें असतां जे व्यवहार त्यांस संविद्व्यतिक्रम ह्मटलें आहे. संविद्व्यतिक्रमाचें स्वरूप

त्याचे उपक्रम समजण्या साठीं कांहीं सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य राजानें नगरांत (एक) स्थल नेमून त्यांत त्रैविद्य अशा ब्राह्मणांस वृत्ति देऊन ठेवावें आणि सांगावें कीं तुह्मी स्वधर्मसंरक्षण करावें.

टीका

२ राजानें ज्यांत स्वच्छ शुभ्र घरें बांधिलेलीं असें आपल्या नगरांत एक स्थळ करून त्यांत त्रैविद्य ब्राह्मणांचा समुदाय ठेवून त्यांस अग्रहार वर्षासनें देऊन सांगावें कीं वर्ण, व आश्रम, व श्रुति, व स्मृति, यांस विहित अशा स्वधर्मांचें संरक्षण करावें. राजानें ब्राह्मणास वर्षासनें अग्रहार देऊन स्वधर्मसंरक्षणाविषयीं नेमावें.

असे स्वधर्म संरक्षणा विषयीं नियुक्त जे त्यानीं काय करावें. तें सांगतो.

# प्रकरण १४
## संविद्व्यतिक्रम

मूळ

याज्ञवल्क्य आपल्या धर्माच्या अविरोधानें जो **सामयिक** धर्म होईल तो, व जो **राजा**नें केलेला धर्म तोही यत्नानें संरक्षण करावा.

टीका

१ आपापल्या **श्रौत स्मार्त** धर्माचा उपमर्द नहोतां गायी चारणें, पानपोई, देवगृह **इत्यादिकां**चें संरक्षण **इत्यादि**रूप जो **समय**धर्म. तसाच स्वधर्मास विरोध न होतां जो **अन्नसत्र,** आमच्या शत्रुमंडलांत अभ्यारिक पाठवूनयेंत. असा **राजा**नें केलेलाधर्म, तोही आस्थेनें रक्षण करावा. स्वधर्म राखून समूह धर्म व राजधर्मही रक्षावा.

## शाखा २

अशा समयधर्माचें संरक्षण करावें असें सांगून त्याचें उल्लंघनादिक केलें असतां दंड सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य जो **गणद्रव्या**चें हरण करितो व **सामयिक** धर्माचें जो उल्लंघन करितो त्याचें सर्वस्वहरण करून राष्ट्रांतून घालवावें.

टीका

१ **गणद्रव्य** ह्मणजे ग्रामादिजनसमूहाचें जें समायीक द्रव्य त्याचा जो अपहार करितो व समूहानें केलेला जो **सामयिक** व **राजा**नें केलेला धर्म त्याचें जो उल्लंघन करितो त्याचें सर्वस्व हरण करून आपल्या देशांतून हाकून द्यावें. गणद्रव्याच्या हरण करणारास हद्दपार करावें.

# प्रकरण १४.

## संविद्व्यतिक्रम

ह्या जो (वरचा) दंड सांगितला. तो अपराध मोठा असल्यास योजावा.

सामान्य अपराधा विषयीं तर मनु सांगतो.

मनु २ ग्रामजनसमूह, देशजनसमूह, यांशीं जो सत्यानें समय करून लोभानें विरुद्ध वागेल त्याला हद्दपार करावें. आणि ४ स्कवर्ण, ६ निष्क, व १०० राजत दंड करावा.

असें मनूनें सांगितलेले जें हद्दपारकरणें, ४ सुवर्ण, ६ निष्क, १०० राजत यांतून एखादा दंड, जाति शक्ति यांच्या तारतम्यानें योजावा.

महाजनांचें वचन इतरांनीं मानावें असें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य समूहशुभचिंतकांचें वचन सर्वांनीं मानावें.

टीका

१ त्यागणांमध्यें जे समूहशुभचिंतक असतील त्यांचें वचन त्या इतरांनीं मान्य करावें.

(वर सांगितल्या प्रमाणें) मान्य न केल्यास दंड सांगतो.

---

१ गण ह्मणजे १ ल्या शाखेच्या २ ऱ्या अंकांत सांगितले व तसीच गावानें किंवा देशानें नेमलेली मंडळी

# प्रकरण १४

## संविद्व्यतिक्रम

मूळ

याज्ञवल्क्य त्यांमध्यें जो विपरीत वागेल त्यास प्रथमसाहस दंड करावा.

टीका

४ जो त्या मंडळीमध्यें समूहशुभचिंतकांचें वचन मानीत नाहीं. त्याला राजानें प्रथम साहस दंड करावा

शुभचिंतकांचे गणा विषयीं राजानें कसें वर्तावें तें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य गणाचे कार्यासाठीं आलेले जे त्यांस राजानें कृतकार्य करून व दानमानें करून सत्कार करून पाठवावें.

टीका

५ ग्रामादिजनसमूह किंवा देशजनसमूह यांचें कार्यसिध्यर्थ जे आपल्याकडे आलेले जे महाजन, त्यांस कृतकार्यकरून व दान मानसत्कारेंकरून संतुष्टकरून परतपाठवावें.

गणास दिल्हेलें जें (वस्त्रादिक) त्याच्या अपहारा करणाऱ्याविषयीं सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य मंडळीचे कार्य सिध्यर्थ पाठविलेला जो त्यास मिळेल तें त्यानें अर्पणकरावें. जर तो स्वतां अर्पण करीत नाहीं तर ११ पट दंड करावा.

# प्रकरण १४.

## संविद्यतिक्रम

टीका

६ मंडळीचे कार्यसिध्यर्थ महाजनांनीं राजा कडे पाठविले ला जो त्याला जें राजा पासून वस्त्रहिरण्यादिक मिळतें तें न माग ता त्यानें महाजनांस निवेदित करावें. करीत नाहीं तर लाभाचे ११ पट दंड करावा.

ते शुभचिंतक कसे असावे तें सां गतो.

मूळ

याज्ञवल्क्य धर्मज्ञ, पवित्र, निर्लोभी, असे ते शुभचिंतक नेमावे. आ णि त्यांचें वचन इतर सर्वांनीं मानावें.

टीका

७ श्रौत स्मार्त्त धर्म जाणणारे, सबाह्याभ्यंतर पवित्र, द्र व्या विषयीं निर्लोभी, असे शुभचिंतक करावे. (हाविधि सांगि तला.) आणि त्यांचें वचन इतरांनीं मानावें. असें पुनः सांगितलें तें आवश्यकता दाखविण्या साठीं. शुभचिंतक गुणशीलसंपन्न असावे.

आतां त्रैविद्या विषयीं सांगितले ल्या धर्माचा श्रेणी पूग इत्यादि कांचे ठायीं अतिदेश सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य श्रेणी निगमवादी पाखंडी गण यांविषयीं ही हा च प्रकार जाणावा व यांचा भेद क्रमागत वृत्ति ही तशीच चाल वावी.

# प्रकरण १४

## संविद्यतिक्रम

टीका

८ **श्रेणी, निगमवादी** ह्मणजे जे वेद आप्तानें सांगितलेला आहे असें वेदाला प्रमाण मानितात ते, **पाशुपत इत्यादिक**[1], **पाखंडी** ह्मणजे जे वेद प्रमाणच मानीत नाहींत ते, **दिगंबर**[2], **सौगत**[3] **इत्यादिक, गण** ह्मणजे हत्यारबंद.

ज्या ज्या धर्माचे जे असतील त्यांचा तो धर्म व मानीनस्त्री ही पूर्ववत् चालवावी.

---

१ इत्यादिक ह्मणजे कापालिक, तेच सोमसिद्धांती हेही पाशुपतांतील भेद आहेत. हे सेश्वरवादी. यांचा वेष, हातांत नरकपाळ, गळ्यांत हाडांच्या माळा, श्मशानवास, नरकपाळांत भिक्षा व भोजनही. यांची उपास्य देवता भैरवरूपी शिव उपासना भैरव देवतोद्देशें करून मांस, सुरा यांचा होम, पशु इत्यादिकांचें बलिदान, व त्यांचें मांसभक्षण. अशा उपासनेनें शिवसारूप्य मोक्ष होतो. जगलांतले पदार्थमात्र परस्पर भिन्न आहेत, पण जग ईश्वराहून भिन्न नाहीं जसें, सोन्याचे कडीं, तोडे, अंगठी वगैरे दागिनें परस्पर भिन्न आहेत, पण सोन्याहून भिन्न नाहींत.

लिंगधारी — लिंगाईत हेही पाशुपतांतील एकभेद आहेत. यांची उपास्य देवता वीरभद्र. परंतु हे कापालिकांप्रमाणें क्रूरकर्म करणारे व यथेछ विषयसेवन करून वागणारे नव्हत. हेही शिवावांचून दुसरा देव मानीत नाहींत.

जंगम — हेही पाशुपतांतील एकभेद आहे यांची उपास्य देवता वीरभद्र.

२ दिगंबर — तेच नग्न — जैन — नास्तिक — निरीश्वरवादी, यांच्या मतीं जीवात्माच उपास्य. नऊ आहेत द्वारें ज्यास असें शरीर एतल्लक्षण जें गृह त्यांत दीपाप्रमाणें परिछिन्नपरिमाण जीवात्माच प्रकाशक मानितात. हल्लीं जे तोंडावर फडकें बांधून हातीं कुंचा घेऊन हातीं दंड कमंडलु घेऊन शुभ्र वस्त्रें नेसून दंभ दाखवितात ते या मताचेच. हे स्रावक मारवाड्यांचें गुरू.

३ सौगत — तेच बौद्धसिद्धांत. हेही निरीश्वरवादी यांच्या मतीं या धर्मासारखा दुसरा धर्म नाहीं. कारण या धर्मांत विषयसौख्य व मोक्ष ही यांच्या मतीं मरण रूपच मोक्ष. यांच्या मतीं ज्ञान दोन प्रकारचें, सविषयक व निर्विषयक. अतएव हे पदार्थमात्र विज्ञानस्वरूप व क्षणक्षयी आहेत असें मानितात. निर्विषयक ज्ञानाला मोक्षकारण मानितात.

बौद्धसिद्धांतांत एक सेश्वरवादी मत आहे यांची उपास्य देवता पारसनाथ यांच्या मतीं ईश्वराचे चोवीस अवतार त्यांत ऋषभयोगी मुख्य. या मताचे प्रवर्तक गौतमाचार्य. दुसऱ्या जातीचे मारवाडी पारसनाथाचे उपासक, यांचे गुरू जती.

## प्रकरण १४

## संविद्यतिक्रम

**इत्यादिक** जे एकाकामावर उपजीवनकरणारे. याचौघांचा ही हाच (१ल्या शाखेच्या १ल्या अंकापासून एथपर्यंत सांगितलेला) प्रकार जाणावा. आणि यांची धर्मव्यवस्था व त्यांचा त्यांची प्राचीन वृत्ति असेल ती ही तशीच चालवावी. (आपल्याबुद्धीनें किंवा धर्मानें ती अयोग्य वाटली तरी तिचा लोपकरूं नये.)

# प्रकरण ३५
# वेतनादान

## शाखा १

वेतनादानाचें स्वरूप नारद सांगतो.

नारद १ चाकराचें वेतन देणें, आणि न देणें, या विषयीं जो **व्यवहार** त्याला **वेतनादान** ह्मटलें आहे.

त्याविषयीं निर्णय सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य मजूरी घेऊन कामकरीतनाहीं तर ती दुपट परत द्यावी. मजूरी घेतली नाहीं. मात्र कबूलात झाली आहे. तर तितकें परत द्यावें. चाकरांनीं औत वगैरे राखावें.

टीका

२ जो चाकर धन्यापासून वेतन घेऊन करारा प्रमाणें काम करीत नाहीं. त्याजकडून दुपट वेतन धन्याचें परत द्यावें. जर वेतन घेतलें नाहीं पण वेतनाविषयीं व कामाविषयीं ठराव मात्र झाला असें असतां कबूल केलेलें कामकरीत नाहीं तर करार केलेल्या वेतनाइतकें द्रव्य धन्याला द्यावें. अथवा करारा प्रमाणें मजूरी देवून जबरीनें त्यापासून काम घ्यावें.

वेतन घेऊन करारा प्रमाणें कामकरीत नाहीं तर दुपट परत द्यावें.

नारद जो चाकर कबूलात करून कामकरीत नाहीं त्यापासून जबरीनें काम घेऊनच त्याची मजूरी द्यावी.

वेतन देण्याचा प्रकार ही तोच सांगतो.

नारद २ ज्या कामाबद्दल जितकें वेतन धन्यानें चाकराला कबूल केलें असेल तितकें, प्रारंभीं, मध्यें, किंवा शेवटीं, अशा अनुक्रमानें द्यावें.

आरंभीं मध्यें किंवा शेवटीं कबुलातीप्रमाणें वेतन द्यावें.

# प्रकरण १५.

## वेतनादान

४ चाकरांनीं औत ह्मणजे नांगर, गाडा, कासरा, नाडा इत्यादिक साहित्य यथाशक्ति रक्षण करावें. अन्यथा शेतकी वगैरे कामें होणार नाहींत. चाकरांनीं औतें संभाळावीं.

मजूरीची कबुलात न करितां चाकरापासून जो काम घेतो त्याविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जो मजूरीचा करार न करितां चाकरापासून काम घेतो त्या धन्यापासून राजानें उदीम, शेतकी, पशू यांच्या उत्पन्नाचा दाहावा भाग त्या चाकराला देवावा.

टीका.

५ वाणी, पशुस्वामी, किंवा शेतकरी, जो कोणी धनी मजूरीचा करार न करितां चाकरापासून उदीम, शेतकी, पशुरक्षण इत्यादि काम घेतलें असतां जो लाभ होईल त्याचा दाहावा अंश राजानें धन्याकडून चाकराला देवावा. चाकरीचीकबुलातकेलीनाहींतरउत्पन्नाचादाहावाभाग देवावा.

धन्यानें सांगितलेलें कामकरणाराविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जो चाकर लाभयोग्य असे काल, देश, यांचा अतिक्रम करील, किंवा तत्तद्देशकालीं तोटा करील, तेथें धन्यानें इच्छेप्रमाणें मजूरी द्यावी. अधिक नफा केल्यास अधिक द्यावी.

टीका.

६ जो चाकर जिनसाची विकरी वगैरे करण्यास योग्य अ

# प्रकरण ३५

# वेतनादान

शादेशीं, किंवा काळीं, सुस्तीनें जिनसाचीविकरी वगैरे करीत नाहीं, किंवा त्याचदेशीं किंवा काळीं तोटाकरून विकतो (किंवा खरेदी करितो) त्याचाकराला मजूरी देण्याविषयीं धन्याची इछा. ह्मणजे जितकी द्यावयाची असेल तितकी द्यावी. सर्वच मजूरी द्यावी असें नाहीं. करून धन्याचा तोटा करितो तर धन्याच्या इछेप्रमाणे मजूरी.

७ जर अमुकदेशीं किंवा अमुककाळीं विकलें असतां अधिक नफा होईल, असें समजून तशादेशीं किंवा काळीं विकून अधिक नफाकरितो, तर कबूल केलेल्या वेतनापेक्षां अधिकही द्यावें. नफाकरीलतरअधिकमजूरी द्यावी.

अनेक चाकरांनीं करावया जोगें अशा
कामा विषयीं वेतन देण्याचा प्रकार
सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य दोघांसही असाध्य असें काम जो जितकें करितो. तितकें त्याला वेतन द्यावें. सुसाध्य आहेतर करारा प्रमाणें द्यावें.

टीका

८ ज्याविषयीं वेतनाचा करारही ठरला असें एकच काम दोघांनीं किंवा बहुतांनी करावया जोगें असून रोगादिकारणामुळें दोघांकडून किंवा बहुतांकडून शेवटास न गेलें, तर जो चाकर जितकें काम करील, त्याला तितक्या कामाप्रमाणें मध्यस्थांनीं ठरविलेलें वेतन द्यावें. करारा प्रमाणें किंवा समविभाग द्यावें. अथवा कामावर वेतनाचा करार नाहीं ह्मणून अगदींच देऊंनये, असें नाहीं. अनेकचाकरानींशेवटास न्यावयाजोगें असें काम अनेकानीं केलें असतां कामाव मजूरी.

# प्रकरण ३५.

## वेतनादान

१. जर साध्य (ह्मणजे एकास व्हावयाजोगें) काम दोघांनीं शेवटास नेलें, तर जितकें वेतन कबूल केलें असेल तितकें दोघांस वांटून द्यावें. प्रत्येकास सगळें देऊं नयें. व कामावर ठरवूनही देऊं नयें.

एकास व्हावयाजोगें काम दोघांनीं केलें तर कामावर मजूरी.

## शाखा २

हत्यारबंद व हेलकरी यांविषयीं सांगतो.[1]

मूळ

याज्ञवल्क्य हेलकऱ्यापासून **राजिक दैविक** उपद्रवावांचून पात्रांचा नाश होईल तर त्यापासून भरून घ्यावें. आणि प्रस्थान करते समयीं विघ्न करणारापासून दुप्पट **भृति** परत घ्यावी.

टीका

१ **राजदैविक** उपद्रवावांचून केवळ हेलकऱ्याच्या हयगयीनें पात्रादिक नाश पावेल तर त्यापासून भरून घ्यावें.

हेलकऱ्याच्या गुन्ह्यानें नुकसान झालेलें भरून घ्यावें.

नारद हेलकऱ्याच्या अन्यायानें पात्रादिक खराब होईल किंवा नाश पावेल तर तें त्याजकडून देवावें, परंतु **राजदैविक** उपद्रवावांचून.

२. विवाहादि मंगलकार्यासाठीं सुमुहूर्तीं प्रस्थान करणारा

आइत्यावेळस काम टाकून जातो तर दुप्पट वेतन परत घ्यावें.

---

[1] शस्त्रोपजीवी उत्तम, शेतकरी मध्यम, आणि भारवाहक निकृष्ट असा तीन प्रकारचा भृतक १३ व्या प्रकरणीं १ शाखेच्या २ ऱ्या अंकांत सांगितला त्यांत शेतकऱ्याविषयीं सदरहू प्रकार सांगितले. आतां शस्त्रोपजीवी व भारवाहक याविषयीं सांगतो.

# प्रकरण १५

## वेतनादान

चें पूर्वी कबूल केलेलें काम (आइत्यावेळेस) मी करीत नाहीं ह्मणून प्रस्थान समयीं विघ्न करितो त्यापासून दुपट भृति परत देवावी. कारण उत्साहाच्या कामाचा प्रतिबंध केला.

मूळ

याज्ञवल्क्य प्रस्थानाविषयीं निश्चय केला असता त्यावेळेस काम टाकितो त्याचे वेतनाचा सातवा भाग, आणि मार्गांतच काम टाकितो तर चौथा भाग, कमी करावा. अर्धमार्गांतच काम टाकितो तर अगदींच भृति देऊं नये, व टाकविणारापासूनही तसेंच.

टीका

३ प्रस्थानाविषयीं निश्चय झाला असता जो पतकरलेलें काम टाकितो त्याचे मजूरीचा सातवा भाग कमी करावा. मुहूर्त निश्चय झाला असतां काम टाकितो तर सातवा हिसा कापावा.

शंका— याचविषयीं वरच्या अंकांत "दुपट भृति परत द्यावी." असें सांगितलें. आणि येथें सातवा भाग सांगितला, ह्मणून विरोध येतो.

समाधान— पतकरलेलें काम आपण करीत नाहीं, व बदल्या देण्यास अवसर असतां बदल्याही देत नाहीं, तर सातवा भाग कमी करावा. व प्रस्थानलग्न[1] समयींच काम टाकून जातो तर त्यापासून दुपट मजूरी परत घ्यावी, असा विरोधपरिहार जाणावा.

४ पतकरलेलें काम मार्ग चालत असतां टाकितो त्याच्या मजूरीचा चौथा हिसा दंड करावा. आणि अर्ध मार्गांत टाकून जातो तर अ मार्गांत काम टाकितो तर वेतन बुडवावें.

---

1 प्रस्थानलग्न ह्मणजे अमुक लग्नावर प्रस्थान करावयाचें असें जें कृप्त केलेलें इष्टलग्न तें

# प्रकरण १५.

## वेतनादान

गर्दींच वेतन देऊंनये.

५ चाकर पतकरलेलें काम करीत असतां धनीच पूर्वी (३ऱ्या ४ थ्याअंकांत) सांगितलेल्या ठीकाणीं चाकराला कामावरून दूर करि तो तर धन्याकडूनही पूर्वी (३ऱ्या ४ थ्या अंकांत) सांगितलेला सातवा वगैरे हिसा चाकराला देवावा.

६ वर (३ऱ्या ४थ्याअंकांत) सांगितलेले प्रकार आजार वगै रे योग्य कारण नसल्यास जाणावे.

स्मृति जो चाकर निरोगी असतो ही पतकरलेलें काम दांडगेपणानें करी त नाहीं त्यासवेतन देऊंनये. व ८ कृष्णल दंड ही करावा. — आजार वगैरे योग्यकरणानें काम यकितो तर दंड नाहीं.

७ आजारामुळें खाडे पडलेले दिवस निरोगी झाल्यावर पुरे भरू न देतोतर करारा प्रमाणें वेतन ही पावतो. — आजारामुळें अंतरलेलें काम, बरा झाल्यावर पुरें करून द्यावें.

मनु आजारामुळें अंतरलेलें काम, बरा झाल्यावर पुरें करून देतो तर फारा दिवसांचें तुंबलेलें ही त्याचें वेतन द्यावेंच.

८ जो चाकर पतकरलेलें काम, बरा झाल्यावर किंवा मुळचा च निरोगी असून थोडेसें जरी उरलेलें असलें तरी आळसामुळें (किंवा कुचराईने) स्वतां संपवीत नाहीं व दुसऱ्या कडून हीं संपवीत नाहीं तर त्याचें वेतन देऊंनये.

मनु पतकरलेलें काम निरोगी झाल्यावर किंवा मुळचाच समाधानी असतां (स्वतां करीत नाहीं व) दुसऱ्याकडून करवीत नाहीं, व तें का म जरीं अगदीं थोडें राहिलें असलें तरीं मजूरी देऊंनये.

# प्रकरण ३६
# जुगाराविषयीं
## शाखा १

जुगारा विषयींच्या वादाचें निरूपण करितो.

त्याचें स्वरूप नारद सांगतो.

नारद फांसे, वादी, शलाका, इत्यादिक यांकडून जी कपटानें पण पूर्वक क्रीडा, तो जुगार ह्मटला आहे. पशुपक्षी यांकडून जी पणपूर्वक क्रीडा ती पैज ह्मटली आहे.

अर्थ

१ फासें, कानड्याची वादी, शलाका ह्मणजे लांब चौकोनी अशा हस्तिदंती केलेल्या (मुळांतील) इत्यादि शब्दें करून बुदबळें, सोंगट्या, गंजीफा, वगैरे क्रीडासाहित्य घ्यावें. अशा अचेतन पदार्थांकडून जी पण पूर्वक क्रीडा केली जाती तो जुगार ह्मटला आहे.

२ कोंबडे, खबुतरें, वगैरे व पहिलवान, एडके, टोणगे, इत्यादिक जे प्राणी त्यांकडून जी पणपूर्वक क्रीडा केली जाती, ती पैज ह्मटली आहे. पैजेचें स्वरूप

मनु अचेतन पदार्थांकडून जी क्रीडा केली जाती, तो लोकांत जुगार ह्मटला आहे. प्राणीकडून जी क्रीडा ती पैज ह्मटली आहे.

जुगाराचे अड्ड्याचा जो नायीक त्याची उपजीविका सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य जुगाराचे डावांत ज्याला शेंकड्यापेक्षा अधिक नफा होईल त्यापासून नायिकानें शेंकडा पांचोत्रा घ्यावा. इतरांपासून शेंकडा दहोत्रा घ्यावा.

# प्रकरण ३६

# जुगाराविषयीं

टीका

३ जुगाऱ्यांनीं परस्परांच्या अनुमतानें केलेले पणज्यामध्यें आहेत तेडाव, त्याडावांत शंभराच्या किंवा त्यापेक्षां अधिक अशा पणाला जो जिंकितो त्यापासून नायिकानें उपजीविकार्थ शेंकडा पांचोत्रा ह्मणजे जिंकलेल्या डावाचा विसावा अंश, कर घ्यावा. जर शंभरापेक्षां कमी संख्येचा डाव आहे तर त्यापासून शेंकडा दाहोत्रा, ह्मणजे त्याडावांत जिंकलेल्या द्रव्याचा दाहवा अंश घ्यावा. नायिकानेजिंकलेल्याडावाचाविसावाअंशकरघ्यावा.

४ अड्डा ह्मणजे जुगार खेळण्यासाठीं केलेलें स्थळ. त्याचा जो धनी, फांसे वगैरे सर्व खेळण्याचें साहित्यसिध्द करून तत्संपादित द्रव्यानें उपजीवन करणारा, तो नायीक ह्मटला आहे. अड्डा ह्मणजे काय.

## शाखा २

अशा कर घेणाऱ्या सभापतीनें काय केलें पाहिजे तें सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य राजरक्षित नायिकानें करार केलेला राज कर द्यावा. आणि जितद्रव्य जिंकणारास देवावें. व त्यानें क्षमायुक्त व सत्यवादी असावें.

टीका

१ याप्रमाणें कर घेणाऱ्या नायिकाचा जुगाऱ्यां पासून राजानें संभाळ करावा. व नायिकानेंही केलेल्या करारा प्रमाणें राजक जुगाऱ्यांच्यानाइकानेंकराराप्रमाणेंराजकरद्यावा.

# प्रकरण ३६

## जुगाराविषयीं

र द्यावा.

२ जिनद्रव्य असेलतें नायिकानें तगादा गहाण इत्यादिकांकडून पराजितापासून वसूलकरून जिंकणारास द्यावें. तसें च क्षमायुक्त होऊन विश्वास पटण्यासाठीं सावीनें वागावें. पराजितापासूनपैजेचेंद्रव्यनाइकानेंवसूलकरावें.

नारद त्याच्यानायिकानें जुगार खेळवावा- व त्यांनी केलेलापण करा राप्रमाणे देवावा.

जरनायीकतेंजिनद्रव्य वसूल करून देऊं
शकत नाहीं तर राजानें देण्याचा प्रका
र सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य जरतो अड्डा दरबार महशूर व नायिकासहित आहे, व नायिकाकडून राजकरही पावत आहेतर पराजितापासून राजानें तोजितपण देवावा. अन्यथा देऊं नये.

टीका

३ जुगाऱ्यांचा अड्डा राजानें नियुक्त अशा अध्यक्षा सहित व नायिकासहित असल्यास आणि मुकदमाकडून राजकरहीपावत असल्यास जुगाऱ्यांनीं करार केलेलें प्रतिज्ञात द्रव्य देवावें. अन्यथा ह्मणजे अध्यक्षा विरहित, व नायिका विरहित, व नायिकाकडून राजकर पावत नाहीं, तर जिंकणारास जितपण देऊं नये.

जयपराजयाविषयीं विप्रतिपत्ति पडली
असतां निर्णयोपाय सांगतो.

# प्रकरण ३६

## जुगाराविषयी

मूळ

याज्ञवल्क्य **व्यवहार** पाहणारे व साक्षी ही तेच असावे.

टीका

४ जुगाराचा **व्यवहार** पाहणारे **सभासद** ते जुगारीच **राजा**नें नेमावे. एथें पूर्वी (३ऱ्या प्रकरणीं २ऱ्या शाखेच्या १ल्या अंकांत सांगितलेले) **सभासदां** विषयींचा नियम उपयोगी नाहीं. साक्षी ही जुगारीच करावे. येथें (५व्या प्रकरणीं २ऱ्या शाखेच्या ३ऱ्या अंकांत सांगितलेला) साक्षी विषयींचा निषेध उपयोगी नाहीं.

## शाखा ३

कपटी जुगाराची मनाई होण्यासाठीं दंड सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य कपटी फांशांनी व ठकविद्येनें जे **द्यूत** खेळतात त्यांस **राजा**नें डागून हद्दपार करावें.

टीका

१ कपटी फासें **इत्यादिकें** करून व बुद्धीस व्यामोह करणारे असे मणि, मंत्र, औषधी, यांकडून जे खेळतात त्यांस **श्वपद इत्यादिकें** करून डागून **राजा**नें हद्दपार करावें. ठकविद्येनें जुगार खेळणारास हद्दपार करावें.

नारद तर हद्दपार करण्या विषयीं विशेष सांगतो.

# प्रकरण २६

# जुगाराविषयीं.

नारद. **राजानें** कपटी फांशांनीं **द्यूत** खेळणारे दुष्टांच्या गळ्यांत फांशांची माळ घालून हद्द पार करावे. ही त्यांस शिक्षा सांगितली आहे.

मनु. जुगार किंवा पैज जो खेळेल किंवा खेळवील आणि ब्राह्मणांचीं चिन्हें धारण करणारे शूद्र या सर्वांस **राजानें** मारावें.

अशीं जीं मनुवचनें **द्यूत** निषेधाविषयीं आहेत तीं ही कपटानें केलेलें जें **द्यूत** त्याविषयीं. किंवा जुगाराच्या अड्याचा चा नाईक व **राजानें** नेमलेला जो अध्यक्ष या वांचून केलेला. जो जुगार त्याविषयीं.

मूळ.

याज्ञवल्क्य. चोर समजण्यासाठीं **राजानें** जुगारावर एक मुख्य नेमावा.

टीका.

२ प्रायः चोरी करून द्रव्य मिळविणारेच जुगार खेळतात. अतएव चोर उमगण्याविषयीं हें एक साधन आहे. ह्मणून वर सांगितलेल्या जुगारावर **राजानें** आपला अध्यक्ष नेमावा.

जुगाराविषयीं जे प्रकार सांगितले त्यांचा

पैजेविषयीं **अतिदेश** सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. हाच प्रकार आणि विषयक जी पैज तिजविषयीं जाणावा.

# प्रकरण १६

## जुगाराविषयीं

टीका.

३ हे (१ ल्या शाखेच्या २ ऱ्या अंकापासून) जे जुगाराचे प्रकार सांगितले. तेच प्राणिविषयक पैज ह्मणजे जेवी, एडके, घोडे, इत्यादिकांची जी पैज तिजविषयीं जाणावा.

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य

### शाखा १

आतां **वाक्पारुष्याचें** निरूपण करितो.

**वाक्पारुष्याचें** स्वरूप नारद सांगतो.

नारद. १ देश, जाति, कुल, **इत्यादिकांस** उद्देश करून जें आक्रोशयुक्त व कठोर असें भाषण, तें **वाक्पारुष्य** ह्मटलें आहे.

अर्थ.

मनुष्यास त्रास होण्यासाठीं त्याचा देश, जात, कुल **इत्यादिकांस** उद्देश करून जें ओरडून कठोर भाषण करणें, तें **वाक्पारुष्य** ह्मटलें आहे.

देशास उद्देश करून आक्रोश ह्मणजे **गौड** हे निश्चयें भांडखोर आहेत.

जातीस उद्देश करून आक्रोश ह्मणजे ब्राह्मणांची जात अत्यंत लोभिष्ट आहे

कुलाक्रोश ह्मणजे विश्वामित्रकुलोत्पन्न मोटे क्रूरकर्म करणारे आहेत.

२ (वचनांतील) **इत्यादिक** शब्दें करून स्वविद्या स्वशिल्प **इत्यादिकांच्या** निंदेनें विद्वान् **शिल्पी इत्यादि** पुरुषांचा आक्रोश घ्यावा.

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य.

**वाक्पारुष्याचे** अपराध भेदेंकरून दंड तारतम्य दाखविण्याकरितां **वाक्पारुष्याचे** निष्ठुर, असभ्य, तीव्र, असे तीन प्रकार सांगून त्यांचें स्वरूपही तोच सांगतो.

नारद. ३ निष्ठुर, असभ्य, तीव्र, या भेदेंकरून तें तीन प्रकारचें सांगितलें आहे. त्यांत **वाक्पारुष्य** अपराधाच्या गोरवामुळें अनुक्रमानें दंडाचें ही गोरव योजावें.

अर्थ.

निष्ठुर— धिक्कार व निर्भर्त्सना यांकडून युक्त जें भाषण तें.

असभ्य— शिवीगाळ करणें.

तीव्र— तूं मद्यपी आहेस **इत्यादिक** आक्रोशयुक्त भाषण तें.

### शाखा २

त्यांत **सवर्णा**ला निष्ठुर भाषण केलें असतां दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. अंगहीन, व इंद्रियहीन, व रोगी, यांच्या विद्यमान दोषांचें उद्घाटन, किंवा वास्तवीक दोष नसतां दोषारोप, अथवा **व्याजस्तुति** यांकडून निर्भर्त्सना करितो, तर त्याला १३॥ **पण**

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य.

दंड करावा.

टीका.

१ अंगहीन ह्मणजे हातपाय **इत्यादिक** अवयवां तून एखादा ज्यास नाहीं तो. इंद्रियहीन ह्मणजे नेत्रादिक इंद्रि य ज्यास नाहीं तो. (अंधळा बहिरा इत्यादिक) रोगी ह्मणजे को ढी रक्तपित्या वगैरे यांच्या विद्यमानदोषांचें उद्घाटन, ह्मणजे बहि ऱ्याला अरे बहिऱ्या? अंधळ्याला अरे अंधळ्या? असें वास्तविकदो षांचें उद्घाटन करणें. व डोळस असतां तूं काय अंधळा आहेस? असेंअविद्यमान दोषांचें उद्घाटनकरणें. आणि **व्याजस्तुति** ह्म णजे वस्तुगत्या कुरूप असतां, वा: तूं देखणा पुरुष आहेस, अ शा प्रकारच्याभाषणांनीं जो दुसऱ्याची निर्भर्त्सना करितो त्याला १२॥ **पण** दंड करावा.

खऱ्यादोषानें किंवामिथ्या दोषानें दुसऱ्याचाउपहास करणारासदंड.

मनु. २ **काणा** अथवा कुबडा किंवा दुसऱ्या प्रकारें अंग हीन असल्यामुळे विद्यमानदोषांचें उद्घाटन करितो त्याला किमान पक्ष (एक) **कार्षापण** दंड करावा.

असें जें मनुवचन आहे तें, अत्यंत दुराचारी असा जो **वर्ण** (ब्राह्मणादिक) त्याविषयीं जाणावें.

जर पुत्रादिक, आईबाप **इत्यादिकां**-
स शिवीगाळ देतात तर त्यांस १०० (पण)
दंड करावा. असें तो (मनु) च सांगतो.

३ आई, बाप, भार्या, भाऊ, सासरा, **गुरु**, यांवर तोंड टाकणारास आणि मार्गांत जात असतां **गुरूला** मार्ग देतनाहीं

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य.

त्यांस ही १०० (पण) दंड करावा.

हा मनुवचनांतला दंड भार्या निरपराध असतां तिला शिवी देणारा व आई,बाप,भाऊ,सासरा,गुरु हे अपराधी असले तरी त्यांस शिवी देणाराविषयीं योजावा.

असभ्य भाषण करणारास दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. आईवरून बहिणीवरून शिवी देणारास राजानें २५ (पण) दंड करावा.

टीका.

४ आईवरून बहिणीवरून किंवा बायकोवरून शिवी देणारास राजानें २५ पण दंड करावा. बरोबरीच्या मनुष्याशी शिवीगाळ करणारास दंड.

या प्रमाणें समान योग्यतेचे,व एका वर्णाचे,यांनीं शिवीगाळ केली असतां दंड सांगून न्यूनाधिक योग्यतेच्या मनुष्यांनीं परस्परांस शिवीगाळ केली असतां दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. अधमाविषयीं त्याचे निमें. परस्त्रीविषयीं व उत्तमाविषयीं त्याचे दुपट (दंड).

टीका.

५ अधम ह्मणजे आपल्यापेक्षां आचरणानें व गुणानें कमी. अशा पुरुषांस शिवीगाळ करणारांस वर (४थ्या अंकांत) सांगितलेल्या

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य.

२५ त्यांचे निमे ह्मणजे १२॥ पण दंड करावा.

६ सामान्यतः परस्त्रीला शिवीगाळ करणारास वर (४ थ्या अंकांत) सांगितलेल्या २५ पणाचे दुपट ह्मणजे ५० पण, तसाच उत्तम ह्मणजे आपल्यापेक्षां आचरणानें व विद्येनें अधिक अशा पुरुषांस शिवीगाळ करणारांस ही ५० पणच दंड. — परस्त्रीला व उत्कृष्टाला शिवी देणारास पंनास पण दंड

## शाखा ३

ब्राह्मणादि वर्णांनीं व मूर्धावसिक्तादि जातींनीं परस्परांस शिवीगाळ केली असतां दंड योजना सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. वर्णाचा परस्परव जातीचा ही परस्पर उच्चनीच भाव पाहून दंड योजना करावी.

टीका.

१ ब्राह्मणादि वर्णाचे व मूर्धावसिक्तादिक जातीचे उच्चनीच मनुष्य यांनीं परस्परांस शिवीगाळ केल्यास दंड योजना करावी. जसें, ब्राह्मणापेक्षां निकृष्ट आणि क्षत्रियापेक्षां उत्कृष्ट अशा मूर्धावसिक्तास ब्राह्मणानें शिवीगाळ केली असतां क्षत्रियास शिवीगाळ केल्या निमित्त जो ब्राह्मणास ५० पण दंड पुढें[1] सां

---

१ पुढें ह्मणजे ४ थ्या अंकांत.

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य.

गितला आहे त्यापेक्षां कांहीं अधिक ह्मणजे ७५ **पण** दंड करा वा. क्षत्रियानें ही **मूर्धावसिक्तास** शिवीगाळ केली असतां ब्रा ह्मणास शिवीगाळ केल्यानिमित्त जो १०० **पण** दंड त्यापेक्षां कांहीं कमी ह्मणजे ७५ **पण** दंड करावा.

२ **मूर्धावसिक्तानें** ब्राह्मणास किंवा क्षत्रियास शिवी गाळ केली असतां तोच (७५पण) दंड करावा.

३ ब्राह्मण व क्षत्रिय यांनीं परस्परांस शिवीगाळ केल्या निमित्त जो परस्परांस दंड सांगितला आहे, तोच दंड **मूर्धावसिक्त** व **अंबष्ठ** यांनीं परस्परांस शिवीगाळ केली असतां योजावा.

या प्रमाणेंच दुसऱ्यांविषयीं[2] उत्कृष्ट निकृष्ट जातीच्या तारतम्यानें दंड योजना करावी.

असा **सवर्णा**विषयीं दंड सांगून आतां
निकृष्ट **वर्णा**नें आपल्यापेक्षां उत्कृष्ट **व**
**र्णा**स शिवीगाळ केली असतां दंडसांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. आपल्यापेक्षां उत्कृष्ट **वर्णा**ला शिवीगाळ करणारे

---

१ तोच ह्मणजे क्षत्रियाला शिवीगाळ करणाऱ्या ब्राह्मणास ५० पण,ब्राह्मणाला शिवीगाळ करणाऱ्या क्षत्रियाला १०० पण दंड पुढें ४थ्या अंकांत.

---

२ दुसऱ्यांविषयीं ह्मणजे निषाद, माहिष्य, उग्र, करण, रथकार इत्यादिकांविषयीं.

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य.

निकृष्ट **वर्णा**विषयीं दुपट तिपट दंड योजावे.

टीका.

४ ब्राह्मणास शिवी देणाऱ्या क्षत्रियास दुपट ह्मणजे पूर्वी (२ ऱ्या शाखेच्या ६ व्या अंकांत) सांगितलेला जो दुपट ह्मणजे ५० **पण**, त्याचे ही दुपट १०० **पण** दंड करावा. वैश्यास तिपट १५० **पण** दंड करावा.

५ शूद्रानें ब्राह्मणास शिवीगाळ केली असतां ताडन करावें किंवा जीभ कापावी, ही शिक्षा. ब्राह्मणास शिवी देणारे शूद्राची जीभ कापावी.

मनु. ब्राह्मणास शिवीगाळ करणारा क्षत्रिय १०० (पण) दंडास योग्य होतो. वैश्य १५० किंवा[1] २०० (पण) दंडास योग्य होतो. शूद्र तर **वध**[2] **दंडा**स योग्य होतो.

६ या न्यायें करून च क्षत्रियाला शिवीगाळ करणारा वैश्य १०० (पण) दंडास व शूद्र १५० (पण) दंडास योग्य होतो. आणि शूद्रानें वैश्याला शिवीगाळ केली असतां १०० (पण) दंड घ्यावा. क्षत्रियांस शिवीगाळ करणारे वैश्यशूद्रांस दंड.

उत्कृष्ट **वर्णा**नें आपल्यापेक्षां निकृष्ट **वर्णा**स शिवीगाळ केली असतां दंड सांगतो.

---

१ येथें किंवा असा विकल्प सांगितला तो अधिक शिवीगाळ केल्यास योजावा.

---

२ वधदंड ह्मणजे शारीरदंड. तो नऊ प्रकारचा २ ऱ्या प्रकरणीं १० व्या शाखेच्या १५ व्या अंकांत सांगितला, त्यांत जिव्हाछेद आहे. अतएव प्रकृतीं वधदंड ह्मणजे जिव्हाछेद घ्यावा.

# प्रकरण १७

# वाक्पारुष्य.

मूळ.

याज्ञवल्क्य. उत्कृष्ट वर्णानें आपल्या निकृष्ट वर्णास शिवीगाळ केली असतां त्यांतून अर्धे, अर्धानें अर्धे, कमी योजावा.

टीका.

७ क्षत्रियास, शिवीगाळ करणारा ब्राह्मण त्यांतून अर्धे ह्मणजे ब्राह्मणाला शिवीगाळ केल्यानिमित्त जो क्षत्रियास १०० पण दंड सांगितला त्याचे निमे ५० (पण) दंडास योग्य होतो. वैश्याला शिवीगाळ करणारा ब्राह्मण अर्धाचें अर्धे ह्मणजे २५ (पण) दंडाचें पात्र होतो. शूद्रास शिवीगाळ करितो तर १२॥ (पण) दंडास योग्य होतो.

मनूही हेंच सांगतो.

मनु. ब्राह्मणानें क्षत्रियास शिवीगाळ केली असतां ५० (पण) वैश्यास केली असतां २५ (पण) दंड शूद्राबद्दल १२ (पण) दंड द्यावा.

८ क्षत्रियानें वैश्याला व शूद्राला शिवीगाळ केली तर अनुक्रमानें ५० (पण) व २५ (पण) दंड. वैश्यानें शूद्रास शिवीगाळ केली असतां ५० (पण) दंड असें योजावें.

गौतम. ब्राह्मण व क्षत्रिय यांनीं शिवीगाळ केली असतां जो परस्परांस दंड. तसाच क्षत्रिय वैश्य यांसही.

मनु. वैश्य व शूद्र या परस्परांसही असाच दंड योजावा.

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य.

### शाखा ४

पुनः[1] निष्ठुर भाषणाविषयीं दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. बाहु, गळा, नेत्र, मांडी, यांचा **वाचिक** विनाश केला असतां १०० (पण) दंड. पाय, नाक, कान, कर, **इत्यादिकांच्या** **वाचिक** विनाशाविषयीं तर त्याचे निमें.

टीका.

१ बाहु, गळा, नेत्र, मांडी, यांच्या छेदाच्या "ह्मणजे तुझा हात तोडीन, (तुझा डोळा फोडीन) असा" वाणीनें उच्चार केला असतां १०० (पण) दंड करावा. पाय, नाक, कान, हात, **इत्यादिकांच्या** छेदाचा वाणीनें उच्चार केला असतां ५० **पण** दंड करावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. या प्रमाणें जर अशक्त पुरुष बोलेल तर १० **पण** दंड करावा. शक्त पुरुष बोलेल तर तसाच दंड करून त्यापासून बोलल्या प्रमाणें घडूं नये ह्मणून जामीन घ्यावा.

टीका.

२ ज्वरादिकेंकरून अशक्त झालेला मनुष्य वर (१ल्या अंकांत) अशक्त मनुष्यास धरून

१ २ऱ्या शाखेंत निष्ठुरभाषणाविषयीं दंड सांगून नंतर शिवीगाळ करणारास दंड सांगितला. आतां सिंहावलोकनन्यायेंकरून पुनः निष्ठुरभाषणास उद्देश करून दंड सांगतो.

# प्रकरण १७.

## वाक्पारुष्य.

सांगितल्या प्रमाणें बोलेल. तर त्यापासून १० पण दंड घ्यावा. जर बळकट मनुष्य अशक्त मनुष्यास बोलेल तर पूर्वी (१ल्या अंकांत) सांगितल्याप्रमाणें दंड करून त्या अशक्त मनुष्यास त्यापासून उपद्रव न व्हावा एतदर्थ जामीन घ्यावा. तुच्छबोलेलतरदंड.

## शाखा ५

तीव्र भाषणाविषयीं दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **पतित** व्हावयाजोग्या दोषांचें भाषण केलें असतां **मध्यमसाहस** दंड. **उपपातक**युक्त भाषण केल्यास **प्रथमसाहस** दंड.

टीका.

१ **पतित** होण्यास कारणीभूत जीं ब्रह्महत्यादिपापें त्यांकडून **वर्णा**ची निर्भर्त्सना केली असतां **मध्यमसाहस** दंड. **उपपातक**युक्त "ह्मणजे तूं गोहत्यारी आहेस असें" अशा प्रकारचे दुःशब्द बोलले असतां **प्रथमसाहस** दंड करावा. पातित्यादिदोषयावयाजोगें भाषणकेल्यासदंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. **त्रैविद्य**, **राजा**, देव, यांस दुर्भाषणाबद्दल **उत्तमसाहस** दंड. जातीचे **पूग** यांच्या उद्देशानें दुर्भाषण करणारास **मध्यमसाहस**. गांव देश यांविषयींचे दुर्भाषणाबद्दल **प्रथमसाहस** दंड.

# प्रकरण १७

## वाक्पारुष्य.

टीका.

२ **त्रैविद्य**, **राजे**, देव, यांस दुर्भाषण केलें असतां **उत्तमसाहस** दंड. जे नर ब्राह्मण, **मूर्धावसिक्त इत्यादि** जातीचे **पूग**, त्यांस दुःशब्द बोलणारास **मध्यमसाहस** दंड. गांव देश या प्रत्येकांस उद्देशकरून दुःशब्द बोलले असतां **प्रथमसाहस** दंड करावा. त्रैविद्य राजे देवयांस दुर्भाषण करणारास दंड.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

### शाखा १

आतां **दंडपारुष्याचें** निरूपण करितो.

त्याचें स्वरूप नारद सांगतो.

नारद. १ हात, पाय, शस्त्र, **इत्यादिकें** करून जो दुसऱ्याचे शरीरास पीडा देणें, व भस्मादिकें करून जो दुसऱ्याचे अंगास लेप करणें, हें सारें **दंडपारुष्य** ह्मटलें आहे.

अर्थ.

हात, पाय, शस्त्रें व **इत्यादिक** शब्दें करून धोंडे, विटा, यांकडून दुसऱ्याचे स्थावर जंगमरूप द्रव्याला दुःख देणें; तसेंच भस्म, धूळ, चिखळ, शेण, मूत, **इत्यादिक** दुसऱ्याचे अंगावर टाकण्यानें अंतःकरणास दुःख देणें; हें दोहों प्रकारचें **दंडपारुष्य** ह्मटलें आहे. दंडपारुष्याचें स्वरूप.

दंड तारतम्य समजण्यासाठीं हीनद्रव्य, मध्यमद्रव्य, उत्तमद्रव्य, असें तीन प्रकारचें तें **दंडपारुष्य** तोच सांगतो.

नारद. २ हीन, मध्यम, उत्तम, या भेदें करून तें **दंडपारुष्य** तीन प्रकारचें. व शस्त्रादिक उगारणें, निःशंकप्रहार करणे, क्षत उत्पन्न करणें, यांकडून, हीन, मध्यम, उत्तम, या द्रव्यांस पीडा देण्यामुळें हीं तिन्हीं **साहसेंच** ह्मटलीं आहेत. यास्तव येथें अन्यायाचा विचार करणें अवश्य आहे. दंडपारुष्याचे प्रकार.

३ तसेंच **वाक्पारुष्य** व **दंडपारुष्य** या दोहों **व्यव** कलहांमध्यें दोघांतून जो

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

**हारीं** कलह करणारे जे दोघे (वादिप्रतिवादी) यांतून जो क्षमा करितो, तो केवळ दंड पावत नाहीं इतकेंच नाहीं. पूज्यही होतो. [२] तसेंच कलहाविषयीं पूर्वीं जो उपस्थित झाला त्याला अधिक दंड. [३] तसेंच कलहाविषयीं बद्धवैराचें संधान करणाराच दंडाचें पात्र होतो. [४] तसेंच दोघांतून कोणाचा अपराध अधिक आहे हें समजण्यांत येत नाहीं तर समान दंड करावा. [५] तसेंच **चंडाला**दिकांनीं महाजनांचा अपराध केला असतां त्यांस शिक्षा करण्याविषयीं महाजनच अधिकारी. त्यांस सामर्थ्य नसल्यास **राजा**नेंही शिक्षाच करावी. धनदंड घेऊं नये.

क्षमा करितो त्यास दंड नाहीं. जो पहिल्यानें भांडण काढितो त्यास अधिक दंड.

नारद. [१] **वाक्पारुष्य** किंवा **दंडपारुष्य** याविषयीं आवेशानें दोघे क्षुब्ध होऊन प्रवृत्त झाले असतां त्यामध्यें जो क्षमा करितो तो पूज्य होतो. आणि जो क्षमा करीत नाहीं तो **दंड्य** ठरतो. [२] जो अगोदर (विनापराध दुसऱ्यास) * शिवीगाळ करितो तो निश्चयें अपराधी ठरतो. व जो त्याला उलट करितो तोही अपराधी खरा, पण अगोदर अपराध करणारा अधिक दंडाचें पात्र होतो. [३] कलहाविषयीं समान प्रवृत्त जे दोघे त्यांतून जो पुनःपुनः उगवणी करितो तो, दोघांचेही दंडाचें पात्र होतो. [४] **वाक्पारुष्य** व **दंडपारुष्य** यांविषयीं एक समयावच्छेदें करून प्रवृत्त झाले आणि दोघांचेही अपराध समान आहेत तर शिक्षाही समान करावी. [५] **श्वपाक, पंड, चांडाल**, अंगहीन, हिंसेनें उपजीवन करणारे,

---

* शिवीगाळ करितो किंवा दंडपारुष्य करितो.

# प्रकरण १९

## दंडपारुष्य.

हस्तिप, व्रात्य,* दास, यांनीं गुरु, आचार्य, राजा, (सन्यासी) यांच्या मर्यादेचा अतिक्रम केला असतां तत्काळ घातरूपच शिक्षा करावी. हे (श्वपाक पंड इत्यादिक) ज्या सत्पुरुषाचा उपमर्द करितील तोच त्यांस शिक्षा करील. (तो शिक्षा करावयास शक्त असल्यास) राजानें करूं नये. हे (श्वपाक पंड इत्यादिक) मनुष्यांचा मलरूप आहेत. अतएव त्यांचें धन ही मलरूपच ह्मणून राजानें त्यांचा घातच करावा. धनदंड करूं नये. असा हा वाक्पारुष्य दंडपारुष्य यांचा पांच प्रकारचा विधि सांगितला आहे.

दंडयोजनेविषयीं दंडपारुष्याचे स्वरूपाचा निर्णय कारण आहे ह्मणून त्याचे स्वरूपाविषयीं संदेह प्राप्त झाला असतां निर्णयोपाय सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. असाक्षिक हवन घडलें असतां मुद्रा, युक्ति, जनप्रवाद, यांकडून अपराधनिर्णय करावा. कारण कदाचित् खोटा मुद्राही संभवतो.

टीका.

४ जर कोणी फिर्याद करील कीं यानें मला एकांतीं[1] मारिलें. (किंवा शिवीगाळ दिली) तर मुद्रा ह्मणजे जखम, रक्तस्राव, यांकडून — एकांतीं दंडपारुष्य झाल्यास निर्णयोपाय.

---

* दासाचे पंधरा प्रकार आहेत. त्यांचीं स्वरूपें १३ व्या प्रकरणीं १ल्या शाखेच्या ३ अंकांत पाहावीं.

---

१ एकांतीं हें उपलक्षण. यास्तव रात्रीं, अंधकारांत, निर्जन अरण्यांत, व अशे प्रकारचे दुसरे ठिकाणीं ही.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

अथवा कोणत्या निमित्तामुळें, किमर्थ मारिलें अशा युक्तिविचारानें, अथवा जनप्रवादावरून, अथवा दिव्यानें परीक्षा करावी. कारण खोट्या व जखमा वगैरे मुद्दा दाखवून तर्कटानें असें संभवतें.

अशा प्रकारें अपराधनिश्चय झाल्यानंतर कोणत्या अपराधीं कोणता दंड करावा तें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. राख, चिखल, धूळ, हीं लाविलीं असतां १० **पण** दंड. अमंगळ, टांच, थुंकी, हीं लाविलीं असतां त्याचे दुपट. हा प्रकार सजातीयाविषयीं. परस्त्रियाविषयीं व उत्तमाविषयीं त्याचे दुपट. निकृष्टाविषयीं तर त्याचे निमें. मोह, माद, **इत्यादि** कारणामुळें घडल्यास दंड नाहीं.

टीका.

५ राख, चिखल, किंवा धूळ, हीं जो दुसऱ्याचे अंगावर टाकितो त्यास १० **पण** दंड. तसेंच अमंगळ ह्मणजे अश्रूदक, शेंबूड, नखें, केंस, कानांतला मळ, नेत्रमळ, उष्टें, **इत्यादिक**, व टांच, आणि थुंकी, हीं दुसऱ्याचे अंगावर टाकिलीं असतां दुपट ह्मणजे २० **पण** दंड.

दुसऱ्याचे अंगावर राख चिखल वगैरे फेंकणारास १० पण दंड.

शेण (विष्ठा) **इत्यादि** टाकिलीं असतां कात्यायन विशेष सांगतो.

कात्यायन. ६ ओक, मूत, शेण, (किंवा विष्ठा) **इत्यादिक** दुसऱ्यास लाविलीं तर चौपट, (४० पण) दंड. तीच कमरेच्यावर आणि गळ्याचे

शेण वगैरे दुसऱ्याचे अंगावर टाकणारास शरीराच्या अवयवभेदें करून दंड

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

खालीं लाविलीं असतां मद्यापट (६० पण) दंड. आणि मस्तकीं लावि लीं तर आठपट (८० पण) दंड सांगितला आहे.

(या अंकांतील) **इत्यादिक** शब्दानें **वसा, शुक्र**, रक्त, **मज्जा** हीं घ्यावीं.

हा वर (५ व्या व ६ व्या अंकांत) सांगितलेला प्रकार, साधारणस जातीयांविषयीं जाणावा.

७ सामान्यतः परस्त्रीचे अंगावर तसेंच उत्तम ह्मणजे आपल्या पेक्षां अधिक श्रुतवृत्तसंपन्न अशा मनुष्याचे अंगावर तीं[1] तीं द्रव्यें टाकि लीं असतां पूर्वीं (५ व्या अंकांत) सांगितलेला जो १० **पण** २० **पण** दंड त्याचे दुपट घ्यावा. परस्त्री व आपल्यापेक्षां मोटे यांविषयीं दुपट दंड.

८ निकृष्ट ह्मणजे आपल्यापेक्षां श्रुतवृत्तानें कमी अशा मनुष्या चे अंगावर तीं तीं द्रव्यें टाकिलीं असतां पूर्वीं (५ व्या अंकांत) सांगितले ला जो १० **पण** २० **पण** दंड, त्याचे निमे ह्मणजे ५ **पण** व १० **पण** दंड करावा[2]. निकृष्टांविषयीं निमे दंड.

९ मोह ह्मणजे चित्तवैकल्य तद्विशिष्ट, व **मत्त, उन्मत्त, प्रमत्त, इत्यादिकांनीं** दुसऱ्याचे अंगावर राख वगैरे टाकिलीं असतां दंड करूंनये. मोहादिकेंकरून घडल्यास दंड नाहीं.

---

१ तीं तीं ह्मणजे ५ व्या अंकांत सांगितलेलीं. तशींच ६ व्या अंकांत सांगितलेलीं हीं द्रव्यें टाकिलीं असतां ६ व्या अंकांतील जो ४० पण ६० पण ८० पण दंड सांगितला तोही दुपट वाढवावा.

---

२ याप्रमाणेंच ६ व्या अंकांतलाही दंड निमे निमे करावा.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

### शाखा २

निकृष्ट वर्णानें आपल्यापेक्षां उत्कृष्ट वर्णाचा अपराध केला असतां दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ब्राह्मणास पीडा करणार क्षत्रियादिकांचा अवयव कापावा (शस्त्रादिक) उगारलें असतां **प्रथमसाहस** दंड. तुसता स्पर्श केला असतां त्याचे निमे.

टीका.

१ ब्राह्मणास पीडा करणारा असा जो क्षत्रिय, वैश्य, शूद्र, यांचा हात, पाय, (नाक, तोंड) **इत्यादिक** अवयव कापावा. ब्राह्मणास पीडा करणारे इत यांचा अवयव तोडावा.

२ या प्रमाणेंच क्षत्रिय, वैश्य, यांस पीडा करणाऱ्या शूद्राचाही अवयव छेदावाच. क्षत्रिय वैश्य यांस पीडा देणाऱ्या शूद्राचाही अवयव तोडावा.

मनु. शूद्र आपल्यापेक्षां उत्कृष्टास ज्या कोणत्या अवयवानें पीडा देईल तो तो त्याचा अवयव छेदावाच. अशी मनूची आज्ञा आहे.

असा **द्विजाति**मात्राचा शूद्रानें अपराध केला असतां अंगछेदन सांगितलें आहे.

३ या न्यायें करूनच क्षत्रियास पीडा करणारा जो वैश्य त्यासही हाच (वर सांगितलेला) दंड जाणावा.

४ मारण्याच्या उद्देशानें शस्त्रादिक उगारलें असतां **प्रथम साहस** दंड करावा. परंतु शूद्रानें शस्त्रादिक उगारलें असतां हस्तादि शस्त्रादिक उगारलें असतां प्रथम साहस दंड.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

क अवयवच तोडावा.

मनु. (शूद्रानें) हात उगारला किंवा शस्त्र उगारलें तर हात तोडावा.

५ उगारण्यासाठीं नुसता शस्त्रादिकास स्पर्श केला असतां त्याचे निमे ह्मणजे **प्रथमसाहसाचे** अर्धा दंड करावा.

शस्त्रादिकास नुसता स्पर्श केला तर प्रथमसाहसाचे निमे.

६ क्षत्रिय व वैश्य यांनीं १ल्या शाखेच्या ५ व्या व ६ व्या अंकांत सांगितलेला अपराध केल्यास १७ व्या प्रकरणीं ३ ऱ्या शाखेच्या ४ अंकांत जसा दंड सांगितला आहे त्या न्यायें[1] करून येथें ही योजावा. तशा अपराधींही शूद्राचा तर हस्त छेदच करावा.

क्षत्रिय वैश्य यांनीं शस्त्र वगैरे फेंकल्यास दंड.

मनु. जर शूद्र दांडगेपणानें (ब्राह्मणादिकाचे अंगावर) थुंकेल तर **राजा**नें त्याचे दोन्हीं ओंठ कापावे. मुतेल तर शिश्न कापावें. हगेल तर तें इंद्रिय कापावें.

---

१ तो न्याय ह्मणजे असें १ल्या शाखेच्या ५ व्या अंकांत सांगितलेला अपराध जर ब्राह्मणाचा क्षत्रियानें केला असेल तर त्या अंकांत त्या त्या अपराधीं जो १० पण २० पण दंड सांगितला त्याचे दुपट ह्मणजे २० पण ४० पण दंड करावा. क्षत्रिया निमित्त वैश्यासही दुपटच. ब्राह्मणाचे अपराधा निमित्त वैश्यास तिपट ह्मणजे ३० पण ६० पण दंड करावा.

---

२ या मनुवचनांत जो शूद्राला शारीर दंड सांगितला तो सामान्य ब्राह्मणादिकाविषयीं नव्हे, श्रुतवृत्तसंपन्न पूज्य अशा ब्राह्मणादिकाविषयीं असावा.

# प्रकरण १८

# दंडपारुष्य.

## शाखा ३

असा निकृष्ट जातीनें आपल्यापेक्षां उत्कृष्ट जातीचा अपराध केला असतां दंड सांगू न पुनः सजातीयास उद्देश करून सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जातींमध्येंच परस्परांनीं हात उगारला असतां १० **पण**, पाय उगारला असतां २० **पण** दंड. आणि शस्त्र उगारलें असतां **मध्यमसाहस** दंड.

टीका.

१ ताडनासाठीं हात उगारला तर १० **पण** दंड व पाय उगारल्यास २० **पण** दंड. वधाच्या उद्देशानें परस्पर शस्त्र उगारलें तर सर्व **वर्णांस** (किंवा जातीस) **मध्यमसाहस** दंड. ताडनाच्या इराद्यानें शस्त्रादिक उगारलें असतां दंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. पाय, केश, वस्त्र, हात, हीं हिसकलीं असतां १० **पण** दंड. व वस्त्रानें वेष्टून पीडा होई असें जें लाथडणें त्याविषयीं १०० (पण) दंड.

टीका.

२ जो पाय, केश, वस्त्र, हात, यांतून एखादें एकाएकीं ओढितो त्याला १० **पण** दंड करावा. व पीडा होई असें ओढणें, वस्त्रानें बांधणें, लाथ मारणें, इतकीं एकदांच केलीं असतां, ह्मण केशवस्त्रादिक हिसकणारास व मोटकळी बांधून मारणारास दंडयोजना.

# प्रकरण १९

## दंडपारुष्य.

जे ओंढून, बळकट धरून, वस्त्रानें बांधून, लातांनीं मारिलें असतां १०० **पण** दंड करावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. रक्त न येई असें काष्ठादिकें करून दुखावतो त्याला ३२ **पण** दंड करावा. रक्त निघेल तर त्याच्या दुपट दंड.

टीका.

३ जो रक्त न निघे असें हलकें काष्ठादिकें करून ताडन करितो त्याला ३२ **पण** दंड करावा. बळकट मारिल्यामुळें रक्त निघेल तर दुपट ह्मणजे ६४ **पण** दंड करावा. काष्ठादिकें करून मारणारास दंडयोजना.

त्वचा, मांस, हाड, यांचें विदारण केलें असतां मनु विशेष दंड सांगतो.

मनु.[1] ४ त्वचेचा भेद करणारास १०० (पण) दंड. तसाच रक्त काढणारास १०० (पण) दंड. मांस विदारण करणारास ६ **निष्क** दंड आणि हाड मोडणारास हद्दपार करावें. रक्तमांसादिक दुखविणारास दंडयोजना.

मूळ.

याज्ञवल्क्य. हात, पाय, दांत, यांचा भंग केला असतां, कान, नाक यांचा छेद केला असतां, तसेंच व्रण फोडला असतां, आणि **मृतकल्प** होई असें मारिलें असतां, **मध्यमसाह**

---

सुबोधिनी याज्ञवल्क्य रक्तस्राव करणारास ६४ पण दंड सांगतो आणि मनु तर १०० पण दंड सांगतो. त्याची व्यवस्था अशी कीं मर्मस्थळीं रक्त काढणारास १०० पण दंड आणि इतरस्थळीं रक्तस्राव करणारास ६४ पण दंड करावा.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

स दंड करावा.

टीका.

५ हात, पाय, दांत, या प्रत्येकांचा भंग केला असतां, व कान नाक, या प्रत्येकांचा छेद केला असतां, उत्पन्न झालेला फोड दुखावला असतां, तसेंच **मृतकल्प** होई असें ताडन केलें असतां **मध्यमसाहस** दंड करावा. हस्तादिक अवयवजखमी करणारासमध्यमसाहसदंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. गमन, भोजन, वाणी, यांचा अवरोध केला असतां व नेत्र **इत्यादिकां**चा भेद केला असतां व गळा, बाहु, मांडी, यांचा भंग केला असतां **मध्यमसाहस** दंड.

टीका.

६ गमन, भोजन, भाषण या प्रत्येकाचा अवरोध केला असतां, तसेंच नेत्र व (मूळांतील) **इत्यादिक** ह्मणजे जीभ यांचा भंग केला असतां, व गळा, बाहु, मांडी, हीं प्रत्येक छेदिलीं असतां **मध्यम साहस** दंड करावा. गमनादिकांचानिरोधवनेत्रादिकांचाभेदकरणारासमध्यमसाहस दंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. एकास मारणारे जे बहुत, त्यांस वर[1] सांगितल्या दंडाचे दुपट दंड.

टीका.

७ जर बहुतांनीं मिळून एकाचा वर सांगितलेला अपराध बहुतांनींएकासमारिलेंअस

---

१ वर ह्मणजे १ ल्या शाखेच्या ५ व्या अंकापासून वरच्या अंकापर्यंत

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

केला तर ज्या ज्या अपराधीं जो जो दंड सांगितला आहे, तो त्या प्रत्येकापासून दुपट घ्यावा. कारण त्यांचें क्रूरत्व मोटें. तां प्रत्येकास दुपट दंड.

८ उत्कृष्ट जातीनें आपल्यापेक्षां निकृष्ट जातीचा अपराध व निकृष्ट जातीनें आपल्यापेक्षां उत्कृष्ट जातीचा अपराध केला असतांही हा[1] जो सजातीयाविषयीं सांगितलेला जो दंड समुदाय तोच **वाक्पारुष्यां**[2]त सांगितल्या क्रमानें दुपट व निमे करून योजावा. उत्कृष्टानें निकृष्टाचा किंवा निकृष्टानें उत्कृष्टाचा अपराध केला असतां दंडयोजना.

मनु. उत्कृष्टानें आपल्यापेक्षां निकृष्टाचे व निकृष्टानें आपल्यापेक्षां उत्कृष्टाचे अपराध केले असतां **वाक्पारुष्यांत** जे दंड सांगितले आहेत ते च दंड **राजानें** या **दंडपारुष्यांत** ही क्रमानें करावे.

---

१ हा ह्मणजे ३ऱ्या शाखेच्या १ल्या अंकापासून येथपर्यंत.

---

२ वाक्पारुष्यांत सांगितलेल्या क्रमानें ह्मणजे असें, चालत्या प्रकरणीं ३ऱ्या शाखेच्या १ल्या अंकापासून येथपर्यंत सांगितलेलाजोजोअपराध तो तो जर निकृष्ट जातीनें आपल्या उत्कृष्ट जातीचा केला आहे तर १७ व्या प्रकरणीं ३ऱ्या शाखेच्या ४ थ्या ५व्या ६व्या अंकांत जसा दुपट तिपट दंड चढविला आहे, तसा येथें ३ऱ्या शाखेच्या १ल्या अंकापासून येथेपर्यंत सांगितलेला प्रत्येक दंड हा दुपट तिपट चढवावा. या प्रमाणेंच उत्कृष्ट जातीनें आपल्यापेक्षां निकृष्ट जातीच्या अपराध केला असतां १७ व्या प्रकरणीं ३ऱ्या शाखेच्या ७ व्या ८ व्या अंकांत जसा निमे निमे कमी केला आहे, तसा येथें ३ऱ्या शाखेच्या १ल्या अंकापासून येथपर्यंत सांगितलेला प्रत्येक दंड निमे निमे उतरावा.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

### मूळ.

याज्ञवल्क्य. कलहांत जें अपहारिलें असेल तें दोवें. व दंड दुपट घ्यावा.

### टीका.

९ कलह प्रवृत्त झाला असतां त्यांत जें (वस्त्रादिक) ज्यानें अपहारिलें असेल तें त्याजकडून ज्याचें त्याला परत दोवें. आणि अपहार केला सबब त्याला अपहृत द्रव्याचे दुपट दंड करावा. कल्ह्यांत जें अपहारिलें असेल तें देववून दुपट दंड घ्यावा.

### मूळ.

याज्ञवल्क्य. जो दुसऱ्यास दुःख उत्पन्न करितो त्यानें तें दुःख बरें करण्यासाठीं जो खर्च लागेल तो द्यावा. आणि ज्या कलहांत जो दंड सांगितला असेल तो द्यावा.

### टीका.

१० जो ज्याला ताडनादिकें करून दुःख उत्पन्न करील, त्यानें त्याची ती जखम वगैरे बरी होण्या करितां औषधासाठीं व पथ्यासाठीं जो खर्च लागेल तो देऊन ज्या **दंडपारुष्य** रूप अपराधा जो दंड सांगितला आहे तोही द्यावा. नुसता खर्च द्यावा असें नाहीं. जखम वगैरे दुःख बरें करण्यासाठीं खर्च देववून सांगितलेला दंडही घ्यावा.

## शाखा ४

दुसऱ्याचे शरीरास दुःख दिल्हें असतां त्याविषयीं दंड सांगून आतां गृहादि स्थावर पदार्थांचा नाश केला असतां दंड सांगतो.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

मूळ.

याज्ञवल्क्य. भिंतीचा अभिघात, भेद, छेद केला असतां व अगदीं पाडिली असतां अनुक्रमानें ५, १०, २० आणि ३५ **पण** दंड व त्याचा खर्च घ्यावा.

टीका.

१ मुद्गरादिकेंकरून दुसऱ्याची भिंत (किंवा अशा प्रकारचा दुसरा माल) दुखाविली असतां ५ **पण**, विदारिली असतां १० **पण**, दुभाग केली असतां २० **पण**, अगदीं पाडिली असतां ३५ **पण**, दंड करावा. आणि भिंत पुनः घालण्यासाठीं जें द्रव्य लागेल तें मालकास द्यावें. दुसऱ्याचे घराची भिंत फोडणारास दंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. दुःख देणारें असें द्रव्य घरांत टाकणारास १६ **पण** दंड व प्राण घेणारें असें द्रव्य टाकणारास **मध्यमसाहस** दंड.

टीका.

२ दुःखदेणारें असें कंटकादिद्रव्य दुसऱ्याचे घरांत टाकणारास १६ **पण** दंड करावा. व प्राण घेणारें असें विष, सर्प, **इत्यादिक** द्रव्य टाकणारास **मध्यमसाहस** दंड करावा. दुसऱ्याचे घरांत कांटे सर्प इत्यादिक टाकणारास दंड.

पशूंस दुःख देणारास दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. क्षुद्रपशूंस दुःख दिल्हें असतां, रक्ताळ केलें असतां, वशृंग छेदिलें असतां, व अंगादिक छेदिलें असतां, अनुक्रमानें २ **पणा**पासून चढता दंड.

टीका.

३ शेळ्या, मेंढ्या, हरणें, **इत्यादिक** क्षुद्रपशूंस ताडनादिकेंकरून दुःख दिल्हें असतां २ **पण**, रक्ताळ केलें असतां ४ **पण**, शेळ्या मेंढ्या वगैरेस इजा देणारास दंड.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

शृंगादिक छेदिलें असतां ६ **पण**, हात, पाय, वगैरे अंग छेदिलें असतां ८ **पण** दंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. खच्ची केलें असतां व जिवें मारिलें असतां **मध्यमसाहस** दंड. व त्याचें मोलही. महापशूंविषयीं या अपराधीं तर तो तो दंड दुपटीनें वाढवावा.

टीका.

४ वर[1] सांगितलेले क्षुद्रपशूंस खच्ची केलें असतां व जिवें मारिलें असतां **मध्यमसाहस** दंड. आणि मालकास किमत द्यावी. गाय, हत्ती, घोडे **इत्यादि** महापशूंविषयीं त्या त्या ह्मणजे (३ऱ्या अंकांत सांगितलेल्या) ताडन, रक्ताळ करणें, शिंगमोडणें, अंगछेद, या अपराधीं पूर्वी[2] सांगितलेल्या त्या त्या दंडाचे दुपट दंड करावा. क्षुद्रपशूंस वाडनादिकेलें असतां दंड.

## शाखा ५

वृक्षादिकांस दुःखदिलें असतां दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ज्यांचीं कलमें लागतात असे जे वृक्ष व **उपजीव्य** वृक्ष

---

१ वर ह्मणजे ३ऱ्या अंकांत.

२ पूर्वी ह्मणजे त्याच ३ऱ्या अंकांत सांगितलेला जो २ पण ४ पण ६ पण ८ पण दंड.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

त्यांच्या शाखा, खांद्या, किंवा ते समूळ छेदिले असतां अनुक्रमानें २० पण दंडाला दुपटीनें वाढवावें.

टीका.

१ ज्या तोडिल्या असतां पुनः फुटतात त्या शाखा, ज्यांपासून शाखा निघतात त्या खांद्या. ज्यांचीं कलमें लागतात असे जे वृक्ष त्यांच्या शाखा छेदिल्या असतां २० **पण** दंड, खांद्या छेदिल्या असतां ४० **पण** दंड. समूल वृक्ष छेदिले असतां ८० **पण** दंड. ज्यांचीं कलमें लागत नाहींत असेही जे **उपजीव्य** ह्मणजे अंबा फणस **इत्यादि** वृक्ष त्यांच्या शाखा. व खांद्या छेदिल्या असतां २० **पण** व ४० **पण** दंड. समूल छेदिलें असतां ८० **पण** दंड करावा. ज्यांचीं कलमें लागतात त्या वृक्षांचे छेदाविषयीं दंड.

२ कलमें लागत नाहींत असे व **उपजीव्य** नव्हत असे जे वृक्ष त्यांचें शाखास्कंधादिक छेदिलें असतां तारतम्यानें दंड कल्पावा. अंबा फणस वगैरे वृक्षछेदाविषयीं दंड.

कांहीं वृक्षाविषयीं विशेष सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **चैत्य**, श्मशान, शींव, पवित्रभूमि, देवालय, या स्थळीं झालेल्या वृक्षांच्या व प्रसिद्ध वृक्षांच्या शाखा स्कंध छेदिले असतां दुपट दंड.

टीका.

३ **चैत्य**, श्मशान, शींव, पवित्रभूमि, देवालय, या स्थळीं झालेले वृक्षांच्या शाखा स्कंध छेदिले असतां व ते समूल वृक्ष छेदिले शींव देवालयें वगैरे ठिकाणचे वृक्ष तोडिले असतां दंड.

# प्रकरण १८

## दंडपारुष्य.

असतां पूर्वीच्या दंडाच्या दुप्पट दंड, पिंपळ, पळस, इत्यादिक प्रसिद्ध वृक्षांविषयीं ही हाच प्रकार.

गुल्मादिकांविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **गुल्म**, गुच्छ, **क्षुप**, लता, **प्रतान**, ओषधि, आणि **वीरुध**, यांच्या वर सांगितलेल्या शाखादि छेदनीं पूर्वीं सांगितलेल्या दंडाच्या निमे दंड.

टीका.

४ **गुल्म** ह्मणजे फार लांब नव्हत असे मालती जाई **इत्यादिक**, गुच्छ ह्मणजे कोरांटा **इत्यादिक**, **क्षुप** ह्मणजे कण्हेर वगैरे, लता ह्मणजे द्राक्षीचा वेल वगैरे, **प्रतान** ह्मणजे कांडवेल वगैरे, ओषधि ह्मणजे साळी गहूं वगैरे, आणि **वीरुध** ह्मणजे तोडिल्या असतांही पुनः फुटतात अशी गुळवेल वगैरे यांचीं पूर्वीं (१ल्या अंकांत) सांगितलेलीं त्यानें ह्मणजे शाखा खांद्या किंवा समूळ छेदिलीं असतां पूर्वीं (१ल्या अंकांत) सांगितलेला जो जो दंड त्याचे निमे निमे करावा. लहान झाडें वेलीवगैरे तोडिलें असतां दंड.

१ पूर्वींच्या १ ल्या अंकांत सांगितलेल्या २० पण ४० पण ८० पण दंडाच्या

# प्रकरण १९

## साहस.

### शाखा १

आतां **साहस** नामक **व्यवहाराचें** निरूपण करितांना प्रथमतः त्याचें स्वरूप सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. समायीक द्रव्याचें बलात्कारानें हरण केलें असतां तें **साहस** म्हटलें आहे.

टीका.

१ यथेछ विनियोग करण्याविषयीं अयोग्य असें समायीक किंवा परकीय द्रव्याचें बलदर्पानें हरण केलें असतां, म्हणजे असें, राजदंड व लोकांचा गलबला यांचें भय न धरितां सरकारी मनुष्य व इतरजन यांच्या समक्ष जें कांहीं मारणें परस्त्रीला झोंबणें **इत्यादि** केलें जातें, तें सर्व **साहस** म्हटलें आहे. अतएव समायीक द्रव्य किंवा परकीय द्रव्याचें जबरीनें हरण केलें असतां तेंही **साहसच**. साहसाचें स्वरूप.

नारद ही **साहसाचें** स्वरूप विशद करितो.

नारद. बलें करून मत्त अशा पुरुषांनीं बल व दर्प यांच्या धुंदीनें जें कांहीं कर्म केलें जातें, तें **साहस** म्हटलें आहे.

२ जरी हें **साहस, स्तेय, वाक्पारुष्य, दंडपारुष्य, स्त्रीसंग्रहण**, यांत संबद्ध आहे. तथापि बलदर्पाच्या धुंदीनें केल्यामुळें त्यांहून निराळें आहे. म्हणून त्याविषयीं अधिक दंड समजण्यासाठीं निराळें **साहस** सांगितलें आहे. साहस चोरी वाक्पारुष्य स्त्रीसंग्रहण यांचा भेद.

# प्रकरण १९

## साहस.

या **साहसा**च्या अपराधभेदें करून निरनिराळे दंडाचें प्रतिपादन करण्यासाठीं **प्रथमसाहस, मध्यमसाहस, उत्तमसाहस**, असे तीन प्रकार सांगून त्यांचें स्वरूपही तो च सांगतो.

नारद. ३ प्रथम, मध्यम, उत्तम, असें तें (साहस) पुनः तीन प्रकारें सांगून, त्यांचें स्वरूपही पार्थक्यें करून शास्त्रांत सांगितलें आहे. साहस अपराध तीन प्रकारचे

नारद. फल, मूल, उदक, तसें च **क्षेत्रा**चें औत, यांचा भंग, आक्षेप, आणि उपमर्द करणें हें **प्रथमसाहस** ह्मटलें आहे.

नारद. वस्त्र, पशू, अन्न, पाणी, तसेंच घराचें औत, यांचा भंग, आक्षेप, उपमर्द, करणें हें **मध्यमसाहस** ह्मटलें आहे.

नारद. विषशस्त्रादिकें करून दुसऱ्याचा द्रोह करणें, परस्त्रीला झोंबणें व अणखी ही जें कांहीं प्राणघातक काम करणें तें सर्व **उत्तमसाहस** ह्मटलें आहे. उत्तमसाहस अपराधाचें स्वरूप.

नारद. ४ त्या **प्रथमसाहसा**पराधीं किमानपक्ष १०० (पण) दंड, **मध्यमसाहसा**पराधीं किमानपक्ष ५००(पण) दंड सांगितला आहे. **उत्तमसाहसा**पराधीं किमानपक्ष १००० (पण) दंड करावा. वध, सर्वस्वहरण, गांवांतून हांकून देणें, डागदेणें, अंगछेद, असा दंड **उत्तमसाहसा**पराधीं सांगितला आहे. तीनप्रकारच्या साहसापराधीं दंड.

**उत्तमसाहस** अपराधीं हे वर सांगितलेले जे वधादिक दंड ते अपराध तारतम्यें करून सगळे मिळून किंवा त्यांतून पाहिजेत तितके योजावे.

# प्रकरण १९

# साहस.

## शाखा २

त्यांत दुसऱ्याचे द्रव्याचा अपहाररूप जें
**साहस** त्याविषयीं दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. त्याच्या किमतीपेक्षां दुपट दंड. **निन्हव** केला तर चौपट.

टीका.

१ त्या चोरलेल्या द्रव्याचें जें मोल त्याचे दुपट दंड. जो **साहस** करून "मी केलें नाहीं" असा **निन्हव** करितो त्याला किमतीच्या चौपट दंड करावा. चोरलेल्या द्रव्याचे दुपट दंड.

२ असा विशेष दंड सांगितल्यावरूनच वर (१ल्या शाखेच्या ४ थ्या अंकांत) सांगितलेले **प्रथमसाहसा**दि सामान्य दंड अपहृत द्रव्या खेरीज इतरां विषयीं जाणावे.

**साहस** करणाराविषयीं दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जो **साहस** करवितो त्याला दुपट दंड. व जो मी देईन असें बोलून करवितो त्याला चौपट दंड.

टीका.

१ तूं **साहस** कर अशी भर देऊन जो **साहस** करवितो त्याला **साहस** करणाराचे दुपट दंड करावा. मी तुला पैका देईन तूं **साहस** कर, असें सांगून **साहस** करवितो, त्याचा अधिक अप साहस करवितो त्याला चौपट दंड.

# प्रकरण १९

## साहस.

राध अनएव चौपट दंड करावा.

**साहसिका** विषयीं अणखी दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. पूज्य मनुष्याची निर्भर्त्सना व आज्ञाभंग करणारा, भावाच्या भार्येला प्रहार करणारा, देऊं केलेलें न देणारा, मुद्रित गृह उघडणारा, **सामंत** स्वकुलोत्पन्न **इत्यादिक** यांस अपकार करणारा, या प्रत्येकास ५० **पण** दंड करावा असा निर्णय आहे.

टीका.

४ पूज्य ह्मणजे पूजा करावयास योग्य जो **आचार्यादिक** त्याची निर्भर्त्सना व आज्ञाभंग जो करितो, व जो भावाच्या भार्येला ताडन करितो, व देऊं केलेलें जो देत नाहीं, व जो मुद्रित केलेलें घर उघडतो, व आपल्या घराचे शेजारी व **क्षेत्राचे सामंत** व आपले कुळांत झालेले ते व (मुळांतील) **इत्यादिक** शब्देंकरून आपले गांवकरी व स्वदेशीय यांस अपकार करणारा, या प्रत्येकास ५० **पण** दंड करावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. विधवेशीं यथेच्छ संग करणारा, व गलबला झाला असतां जो धांवत नाहीं, व कारण नसतां ओरडतो, व जो चंडाल उत्तमांस स्पर्श करितो, व शूद्रजातीचे संन्यासी यांस हव्यकव्यांत भोजन घालणारा, व अयोग्य शिवीदेणारा, व अयोग्य पुरुष योग्य काम करणारा, तसेंच बैल व क्षुद्रपशु यांस खच्ची करणारा, समायीक द्रव्याचा अपहार करणारा, दासीचा गर्भपात करणारा, व पिता, पुत्र, भगिनी, भाऊ, भार्या, पति, आ

# प्रकरण १९.

## साहस.

चार्य, शिष्य, यांतून कोणी पतित नसतां परस्परांचा त्याग क रणारा. या प्रत्येकास १०० (पण) दंड करावा.

टीका.

५. नियोगावांचून जो यथेच्छ विधवेशीं संग करितो. व चोरादिकांच्या भयानें गलबला झाला असतां शक्त असूनही जो सहाय होत नाहीं. जो कारण नसतां वृथा गलबला करितो. व जो चंडाल ब्राह्मणादिकांस स्पर्श करितो. व जो शूद्र जातीचे सन्यस्त ह्मणजे नग्न गोसावी (कानफटे) इत्यादिकांस हव्य कव्यांत भोजन घालितो. व जो अयोग्य ह्मणजे आईवरून (किंवा अशा प्रकारची दुसरी) शिवीगाळ देतो. तसेच अयोग्य जो शूद्रादिक तो स्वजातीस योग्य नव्हे असें अध्ययनादि कर्म करितो. व बैल व शेळ्या मेंढ्या वगैरे क्षुद्र पशू यांस खच्ची करणारा किंवा हिंग वगैरे औषधाच्या प्रयोगेंकरून वृक्षादिकांचीं फलें पुष्पें पाडणारा. सामायीक द्रव्याचें हरण करणारा. व दासीचा गर्भपात करणारा. व पिता, पुत्र, भगिनी, भाऊ, भार्या, पति, आचार्य, शिष्य, यांतून कोणी पतित नसतां परस्परांचा त्याग करणारा या प्रत्येकांस १०० पण दंड करावा.

# प्रकरण १९

## साहस.

### शाखा ३

**साहस** प्रसंगानें **साहसा** सारिखे जे परीट (रंगारी) वगैरेचे अपराध त्यांविषयीं दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. दुसऱ्यानें वस्त्र नेसणारा परीट ३ **पणांनीं** दंडावा. विकलें, भाड्यानें दिल्हें, गहाण ठेवलें, तसलमात दिल्हें, असतां १० **पण** दंड.

टीका.

१ धुवायास दिल्हेलीं वस्त्रें जर परीट स्वतां नेसतो, (पांघरतो) तर त्यास ३ **पण** दंड. जो तीं (वस्त्रें) विकतो, भाड्यानें देतो, किंवा गहाण ठेवितो, अथवा मित्रांस तसलमात देतो त्यास प्रत्येक अपराधीं १० **पण** दंड करावा. धुवायास दिलेलीं वस्त्रें वहिवाटणार परिटास दंड.

२ परिटानें तीं वस्त्रें मृदु सांवरीच्या फळीवर धुवावीं, धोंड्यावर धुऊं नयेत. त्यांची सदलाबदल करूं नये. व घरांत ठेवूं नयेत. अन्यथा दंड करावा. धुवायास दिल्हेल्या वस्त्रांची परिटानें सदलाबदल के ल्यास दंड.

मनु. परिटानें तीं वस्त्रें मृदु अशा सांवरीच्या फळीवर धुवावीं. त्यांची सदलाबदल करूं नये. व घरीं वहिवाटूं नयेत.

जर तीं परिटाचे हयगईनें नाश पावतील तर त्याविषयीं नारद सांगतो.

नारद. ३ एकवार धुतलेल्या वस्त्राचे किमतीचा आठवा भाग कमी. परिटाचे हयगईनें वस्त्रेंस

# प्रकरण १९

## साहस.

दोनवार धुतलेल्यास पाद कमी. तीनवेळ धुतलेल्याचे तीन भाग. चारवेळ धुतलेल्याचे अर्धे मोल कमी. अर्धे जुनें झाल्यावर पुढें एकेकपाद मूल्य देवावें. परंतु जो पर्यंत त्यांच्या दशा झडल्या नाहींत तों पर्यंत. — रावझाल्यासदंडयोजना.

### अर्थ.

आठ **पणा**ला खरीद केलेलें एकवार धुतलेलें वस्त्र जर परिटापासून नाश पावेल तर आठवा भाग कमी. ह्मणजे १ **पण** कमी करून परिटापासून मोल देवावें. तेंच दोनवेळ धुतलेलें असल्यास २ **पण** कमी करून ह्मणजे ६ **पण** किमत भरून द्यावी. तेंच वस्त्र तीन वेळ धुतलेलें परिटापासून नाश पावेल तर ५ **पण** किमत देवावी. चार वेळ धुतलेलें असल्यास निमें किमत देवावी. या पुढें दर धुण्यास ३. २, १, **पण** किमत देवावी. परंतु दशा झडल्या नाहींत तोंपर्यंत. पुढें इच्छे प्रमाणें.

### मूळ.

याज्ञवल्क्य. पिता पुत्रांच्या कलहांत साक्षीस ३ **पण** दंड. व त्यांत जो जामीन राहतो त्यास आठपट दंड.

### टीका.

४ पिता पुत्र यांच्या कलहांत जो कलह न तोडितां उलटी साक्षी राहतो त्याला ३ **पण** दंड व जो त्यांच्या प्रतिज्ञापूर्वक वादांत प्रतिज्ञात द्रव्य देण्याविषयीं जामीन राहतो व त्यांचा कलह वाढवितो त्याला ३ **पणा**च्या आठपट ह्मणजे २४ **पण** दंड करावा. स्त्री पुरुषांच्या कलहाविषयींही हाच प्रकार योजावा. — पितापुत्र स्त्रीपुरुष यांचेकलहांतसाक्षीवजामीनराहणासदंड

# प्रकरण १९

## साहस.

मूळ.

याज्ञवल्क्य. तराजू, सनद, माप, नाणें, यांत खोटें करणारा, व हीं खोटीं करून त्यांकडून व्यवहार करणारा, या प्रत्येकास **उत्तमसाहस** दंड.

टीका.

५ तराजू, सनद, (शासन) पूर्वीं[1] सांगितलेली, माप, ह्मणजे **प्रस्थ, द्रोण, इत्यादि, व द्रम्म, निष्क, इत्यादि.**[2] नाणें यांत त्या त्या देशप्रसिद्ध परिमाणापेक्षां कमजास्ती करितो, किंवा नाणें तांब्या हिणाचें करून चालवितो तो, व मुळचें खोटें माहीत असतांही त्यांकडून व्यवहार करितो, त्या प्रत्येकास **उत्तमसाहस** दंड करावा.

सराफाविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जो सराफ खऱ्या नाण्याला खोटें ह्मणतो, आणि खोटें असतां माल खरें ह्मणून सांगतो त्याला **उत्तमसाहस** दंड.

टीका.

६ जो सराफ रुपया वगैरे नाणें गैरसाळ असतां मालखरें आहे

खोट्यालाखरें किंवा खऱ्यालाखोटें सांगणाऱ्या सराफास दंड

---

१ पूर्वीं ह्मणजे २ऱ्या प्रकरणीं ७व्या शाखेच्या १ल्या अंकांत.

---

२ हल्लींच्या व्यवहारांत प्रस्थ द्रोण हीं मापें चालू नाहींत, ह्मणून त्यांचे बदल अधोली पायली वगैरे मापें घ्यावीं याचप्रमाणें द्रम्म निष्क या नाण्या बदल ही रुपये मोहरा पुतळ्या वगैरे नाणें घ्यावें.

# प्रकरण १९

## साहस.

असें सांगतो, व मालखरें असतां खोटें ह्मणतो, त्या प्रत्येकास **उत्तमसाहस** दंड करावा.

वैद्याविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जो आडाणी वैद्य पशू पक्षी **इत्यादिका** विषयीं वैद्यक्रिया करणारा त्यास **प्रथमसाहस** दंड. सामान्य मनुष्यां विषयीं **मध्यमसाहस**, सरकारी मनुष्याविषयीं **उत्तमसाहस** दंड.

टीका

७ जो आडाणी ह्मणजे वैद्यशास्त्रांत अनभिज्ञ असा वैद्य आपली उपजीविका चालावी ह्मणून पशु पक्षी **इत्यादिका** विषयीं वैद्यक्रिया करितो त्यास **प्रथमसाहस** दंड. सामान्यमनुष्याविषयीं करितो त्यास **मध्यमसाहस**. सरकारी मनुष्या विषयीं **उत्तमसाहस** दंड. पशूपक्षी **इत्यादिका** विषयीं किमतीच्या तारतम्यानें, सामान्य मनुष्यांत **वर्ण** व गुण यांच्या तारतम्यानें, आणि सरकारी मनुष्यांत अधिकाराच्या तारतम्यानें वर सांगितलेल्या दंडांतून्यूनाधिक्य योजावें. खोट्या वैद्यक्रियेवर उपजीवन करणारास दंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. बांधायास योग्य नव्हे अशा मनुष्यास जो बांधितो, व बांधायास योग्य अशा मनुष्यास **व्यवहार** निर्णय झाल्यापूर्वीं जो सोडितो त्याला **उत्तमसाहस** दंड.

# प्रकरण १९

## साहस.

टीका.

८ बांधायास योग्य नव्हे ह्मणजे निरपराधी मनुष्यास राजाज्ञे वांचून जो बांधितो, व **व्यवहारा**साठीं बोलावून आणिलेला अशामनुष्यास **व्यवहार** निर्णयझाल्यापूर्वींच सोडून देतो, त्या प्रत्येकास **उत्तमसाहस** दंड करावा.

निरपराधीमनुष्या सधरणारा व अपराध्याला सोडुन देणारा यास उत्तमसाहस दंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. जोउदमी विकाऊ जिनसाचा आठवा भाग मापानें किंवा तराजूनें चोरितो त्याला २०० (पण) दंड. या पेक्षां कमी किंवा जास्ति चोरितो तर दंड ही कमजास्ती करावा.

टीका.

९ जोउदमी तांदूळ कापूस वगैरे विकाऊ जिनसाचा आठवा भाग खोट्या तराजूनें किंवा खोट्यामापानें अथवा दुसऱ्याप्रकारानें चोरितो, त्याला २०० **पण** दंड करावा. या पेक्षां कमजास्ती चोरील तर दंडही कमजास्ती योजावा.

खोट्यातराजूनें किंवा मापानें कमजास्ती जिनस देणारास दंड.

## शाखा २

मूळ.

याज्ञवल्क्य. औषध, स्नेह, लवण, सौगंधिक, धान्य, गूळ, **इत्यादिक** जो विकाऊ जिनस त्यांत हीनद्रव्य मिश्रित करणारास १६ पण दंड करावा.

# प्रकरण १९

## साहस.

टीका.

१ औषध, स्नेह ह्मणजे तेल तूप वगैरे, लवण, वाळा, (कापूर) वगैरे सौगंधिक द्रव्य, धान्य, गूळ, व (मुळांतील) **इत्यादि** शब्दें करून हिंग मिरें, यांत तो तो वाईट पदार्थ मिसळणारास — १६ **पण** दंड. चांगल्या मालांत वाईट मालमिसळणारास दंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. मृत्तिका, चर्म, मणि, सूत, लोखंड, काष्ठ, वल्कल, वस्त्रे, एतज्जातीय हीन पदार्थांस कृतीनें किंमतदार करणारास त्या त्या विकाऊ जिनसाचे आठपट दंड.

टीका.

२ हलक्या मोलाचे जे मृत्तिका, चर्म, मणि **इत्यादि** पदार्थ ते अधिक किमतीनें विकावे एतदर्थ, त्या त्या पदार्थांस दुसऱ्या पदार्थांचे गंध वर्ण (शुक्ल नीलादिक) रस **इत्यादिक** लावून भारी किमतीचा करून दाखविणें, ह्मणजे असें, मृत्तिकेला मालतीचा सुवास लावून हें सुगंधामलक, मांजराच्या कातड्याला एक तऱ्हेचा रंग देऊन व्याघ्रचर्मासारिखे करणें, स्फटिकादि मणीस रूपांतर देऊन पद्मरागासारिखा करणें, सुतालाच कांहीं प्रकारचा गुणोत्कर्ष करून **पट्टसूत्रा**सारिखें करणें, लोखंडास आंगची चकाकी आणून (किंवा मुलामा देउन) रुप्यासारिखें करणें, बिल्वकाष्ठास चंदनाचा सुवास लावून चंदनासारिखें करणे, सुती कापडास कांहीं प्रकारचा गुणोत्कर्ष करून रेशमीवस्त्रासारिखें करणें, अशा कृतीचा जिनस करणारास त्या त्या विकाऊ ह्लकापदार्थअसतांकृतीनें मोल्याकिमतीचाकरणारास आठपट दंड.

# प्रकरण १९.

## साहस.

जिनसाचे आटपट दंड करावा.

### मूळ.

याज्ञवल्क्य. जो आंतल्या मालासुद्धां करंड्याची सदला बदल करितो, सारद्रव्य कृतीचें करून गहाण ठेवितो, किंवा विकतो, त्यास दंड योजना. सदरहू जिनस पणापेक्षां कमी किमतीचा असल्यास ५० (पण) दंड. एक पण किमतीचा असल्यास १०० (पण). दोन पण किमतीचा असल्यास २०० पण. या प्रमाणें किमतीच्या आधिक्याप्रमाणें दंडही अधिक योजावा.

### टीका.

कृतीचा जिनस करून विकणारास दंड योजना.

२ जो गिऱ्हाइकास प्रथमतः मोत्यांनीं भरलेला करंडा दाखवून हातचलाखीनें दुसरा स्फटिकांनीं भरलेला करंडा देतो, व जो कस्तूरिकादि जिनस कृतीचा करून विकतो, किंवा गहाण ठेवितो, त्याला दंड योजना. अशीकीं, जर कृतीचा जो कस्तूरिका वगैरे जिनस[1] त्याची किमत एक पणापेक्षां कमी आहे, असा जिनस विकला तर ५० पण दंड घ्यावा. कृत्रिमानें केलेला व तोच जिनस जर एक पण किमतीचा असेल तर १०० पण दंड, दोन पण किमतीचा असेल तर २०० पण दंड, या प्रमाणें त्या कृत्रिम जिनसाची किमत जसजसी अधिक असेल तसा दंड ही अधिक योजावा.

---

१ येथें किमतीची तारतम्य योजना अशी कीं, ज्या जिनसाची किमत तांब्याचा पण संभवेल तेथें घ्यावा. जेथें रुपया किंवा दुसरें नाणें संभवेल तेथें तें घ्यावें. कारण कस्तूरी मोत्यें वगैरेची किमत तांब्याचा पण संभवत नाहीं.

# प्रकरण १९

## साहस.

### उदम्यांविषयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. तोटा नफा जाणत असतांही जे एकोपा करून कारू व शिल्पी यांस पीडा होई अशा महागाईनें विकतात त्यांस उत्तम साहस दंड.

टीका.

४ राजानें ठरवून दिलेल्या निरखांत आपला तोटा नफा जाणून ही सर्व वाणी उदमी मिळून अधिक लाभासाठीं रंगारी वगैरे कारू (तसेच साळी वगैरे व्यापारी) व चितारी वगैरे शिल्पी यांचें नुकसान होई असा भारी निरख ठरवितात त्यांस १००० पण दंड करावा. सरकारानें ठरविलेल्या निरखापेक्षां कमजास्तीदरानें विकणारास दंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. जे वाणी एकमत करून कमीदरामुळें जिनसाची बंदी करितात, किंवा महाग विकतात, त्यांस उत्तम साहस दंड विहित आहे.

टीका.

५ जे वाणी उदमी मिळून देशांत राहून आलेला जिनस कमी दरानें मागतात, त्या प्रमाणें त्यांनी न दिल्यामुळें त्या जिनसाचा अवरोध करितात, किंवा महाग विकतात, त्यांस उत्तम साहस दंड मन्वादि ऋषींनीं सांगितला आहे. देशांत राहून आलेला माल महागाईनें विकणारास दंड.

# प्रकरण १९

## साहस.

कोणत्या निरखानें विकावातें सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **राजा**नें आपल्या समक्ष जो निरख ठरवून दिल्हा असेल त्या प्रमाणें दररोज **क्रय विक्रय** करावा. त्यांत जी शिलक राहील तो त्यांचा नफा सांगितला आहे.

टीका.

६ **राजा**नें आपल्या समक्ष जो निरख ठरवून दिला असेल त्या प्रमाणें वाण्यांनीं दररोज विकरी किंवा खरेदी करावी. त्या निरखांतून जी शिलक राहील तो वाण्यांनीं नफा समजावा. आपल्या इच्छेनें निरख ठरवूं नये. निरखाचा ठराव.

मनूही निरख ठरविण्याविषयीं विशेष सांगतो.

मनु. **राजा**नें आपल्या समक्ष पांच पांच दिवशीं किंवा पंधरा दिवसांनीं किंवा महिन्यानें जिनसाचा निरख ठरवावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. सद्यः **क्रय विक्रय** करणाऱ्या उदम्यानें स्वदेशींच्या मालावर शेंकडा ५ आणि परदेशींच्या मालावर शेंकडा १० नफा घ्यावा.

टीका.

७ जो उदमी ज्या देशांत उदीम करितो, त्या देशांतलाच जिनस घेऊन विकतो, त्यानें शेंकडा ५ ह्मणजे १०० **पणा**स ५ **पण** नफा घ्यावा. परदेशांतील आलेला माल घेऊन विकतो तर शेंकडा १० ह्मणजे १०० **पणां**स १० **पण** नफा घ्यावा. स्वदेशींच्या मालाला शेंकडा ५ नफा आणि परदेशींच्या मालावर शेंकडा १० नफा.

# प्रकरण १९

## साहस.

८ खरीद केल्या दिवशींच जो जिनस विकला जातो व जो का ल्यांतरीं विकला जातो त्याविषयीं दिवसांच्या तारतम्यानें नफाही अधिक उणा योजावा.

सारांश जेणें करून स्वदेशीच्या जिनसांवर शेंकडा ५ **पणा** प्रमाणें नफा मिळेल तसा **राजा**नें निरख ठरवावा.

परदेशांतील जिनसाविषयीं निरख ठरविण्याचा प्रकार सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. विकाऊ मालासाठीं जो खर्च झाला असेल तो त्यांत भागूनजेणेंकरून खरीद करणारा व विकणारा यांस योग्य नफा तसा निरख ठरवावा.

टीका.

१ देशांतराहून आलेला जिनसाचा जाणें, येणें, व बैल, भाडें, वासन, व जकात वगैरे जितका उपयोगी खर्च लागला असेल तो भागून, जेणें करून १०० **पणांस** १० **पण** नफा मिळेल, असा खरीद करणारास व विकणास किफायतवार निरख ठरवून द्यावा. परदेशाहून आलेल्यामाला च्या निरख.

# प्रकरण २०

## विक्रीयासंप्रदान.

### शाखा १

आतां **विक्रीयासंप्रदान**संज्ञक **व्यवहारा**चें निरूपण करितो.

त्याचें स्वरूप नारद सांगतो.

नारद. १ जिनसाचें मोल घेण्यानें विकरी करून जर खरीद करणारास तो देत नाहीं तर त्या विषयींचा जो वाद त्याचें नाव **विक्रीयासंप्रदान.** विक्रीयासंप्रदानाचें स्वरूप

त्यांत विकाऊ जिनसाला स्थावर, जंगम, या भेदें करून द्वैविध्य सांगून अणखी साहा प्रकार ही तोच प्रतिपादन करितो.

नारद. २ व्यवहारांत माल दोन प्रकारचा, स्थावर आणि जंगम. अशा दोन प्रकारच्या मालाचे देण्या घेण्याविषयीं अणखी साहा प्रकार सांगितले आहेत. ते असे, गणित, वजनी, मापी, क्रिया, रूपवान्, आणि कांतिमान् व्यवहारांत परीक्षाकरूनदेण्याघेण्याविषयीं जिनसाचे प्रकार.

अर्थ.

गणित—— गणना करून घ्यावयाजोगा सुपारी (केळीं नारळ बदाम) वगैरे.

वजनी—— वजन करून घ्यावयाजोगा कापूर (कुंकू केशर) वगैरे.

मापी—— गहूं, साळी, वगैरे धान्य.

क्रियावान्—— वाहन, दोहन, **इत्यादि** क्रियेनें परीक्षा करून घ्यावया जोगा घोडा, म्हैस, इत्यादिक.

# प्रकरण २०

## विक्रीयासंप्रदान.

रूपवान्— रूपावर किंमत करून घ्यावयाजोगा या रांगना इत्यादि माल.

कांतिमान्— तेजावर परीक्षा करून घ्यावयाजोगा पाच हिरा वगैरे.

## शाखा २.

अशा साहा प्रकारचे जिनसाची विकरी करून तो मालकास न देणारा विषयीं दंड सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. ज्याचें मोल घेतलें तो जिनस जो उदमी खरीददारास देत नाहीं त्यापासून नफ्यासुद्धां देवावा. जिनस देशांतराहून आलेला असल्यास देशांतरींच्या नफ्यासुद्धां देवावा.

### टीका.

जिनसांचे मोल घेऊनही न दिल्यास नफ्यासुद्धां देवावा.

१ विकणारानें गिऱ्हाइकापासून ज्या जिनसाचें मोल घेतलें आहे, तो जिनस स्वदेशींचा खरीद करणारा मागत असतांही उदमी देत नाहीं व तो जिनस विकत घेते वेळेस महाग घेतला पण कालांतरीं सवंग मिळतो असें असल्यास त्याच्या सवंगाईमुळें त्या जिनसावरचा जो नफा बुडाला असेल त्यासुद्धां तो जिनस खरीद करणारास देवावा.

२ जर सवंगाई झाल्यामुळें जिनसापासून कांहीं नफा नाहीं आणि विकत घेते वेळेसच इतक्या मोलाचा हा जिनस आहे व खरीद

# प्रकरण २०

## विक्रीयासंप्रदान.

करणारें तें पतकरलें आहे तर तो जिनस घेऊन स्वदेशीं विकणारा स जो नफा होतो, त्यासुद्धां किंवा शेंकडा दोन तीन अशा पूर्वीं (३ प्र करणीं १ल्या शाखेच्या ३ऱ्या अंकांत) सांगितलेल्या व्याजासुद्धां खरीद करणाराच्या इच्छेप्रमाणें तो जिनस विकणारानें द्यावा.

नारद. जर दर कमी होईल तर नफ्यासुद्धां किंवा व्याजासुद्धां खरीद करणारास जिनस द्यावा. असा स्वदेशीच्या उदम्याविषयीं नियम आहे. परदेशांतून जिनस अणणारास परदेशीय जिनसाप्रमाणेंच नफा द्यावा.

३ जर महागाईमुळें जिनसाची कमती पडली तर त्या त्या वस्त्र, घर, **इत्यादिक** जिनसाचा जो वापरणें सुखानें राहणें वगैरे विकणारानें उपभोग घेतला असेल त्यासुद्धां (ह्मणजे त्याच्या लाभासुद्धां) तो जिनस खरीद करणारास द्यावा.

नारद. जिनसाचा भाव ठरवून त्याचें मोल घेऊन जो गिऱ्हाइकास देत नाहीं आणि तो जिनस जर स्थावर आहे तर त्या स्थावराच्या नुकसानासुद्धां तो खरीद करणारास देवावा. आणि जंगम मालाचें भाडें वगैरे देवावें.

येथें नुकसान ह्मणजे विकणाराचा उपभोग समजावा. कारण, स्थावरादिक माल मोल दिल्यानें खरीद करणाराच्या स्वत्वांत आल्यानंतर जर विकणारा भोगवटा करितो तर त्यांत खरीद करणाराचें नुकसान होतें. केवळ नुकसान ह्मणजे भिंत पडली, धान्य नाश झाला, वगैरे समजूं

स्मृति नये. कारण, त्या विषयीं तर निराळेंच सांगितलें आहे कीं, "जर माल नासेल जळेल, किंवा चोरीस जाईल, तर तें विकणाराचें नुकसान होईल.

# प्रकरण २०

## विक्रीयासंप्रदान.

कारण, त्यानें मोल घेतलें असतां जिनस गिऱ्हाइकास दिल्हा नाहीं"

४ जर खरीदकरणारा परमुलखांतून माल खरेदीसाठीं आला असेल तर तो जिनस घेऊन जाऊन परमुलखीं विकरी केल्यानें जो त्याला नफा व्हावयाचा असेल त्यासुद्धां तो जिनस विकणाराकडून खरीद करणाराचा देवावा. परंतु हा (एतावत्पर्यंत सांगितलेला) जो विकलेला जिनस देण्याविषयींचा नियम, तो **अनुशय** झाला नसल्यास समजावा. जर **अनुशय** झाला तर परत करण्याविषयीं (३२व्या प्रकरणीं १ल्या शाखेच्या ५व्या अंकांतील) मनुवचनांतील मुद्दत येथेंही योजावी. खरीदकरणारपरमुलखाहूनमालखरेदीसाठीं आला असल्यास त्याच्यानफ्यासुद्धांदेवावें

मूळ.

याज्ञवल्क्य. पहिला खरीददार घेतनसल्यास विकलेलाही जिनस विकावा. पहिल्या खरीदीमुळें जो तोटा होईल तो पहिल्या खरीददाराचा.

टीका.

५ जर खरेदी करणारा विकत घेतलेला जिनस **अनुशय** झाल्यानंतर घेऊं इच्छित नाहीं तर तो विकलेलाही जिनस मालकानें दुसऱ्याला विकावा. विकलेलाही जिनसतो घेतनसल्यास दुसऱ्यास विकावा.

जर विकरी झालेला जिनस विकणारा देत असतांही खरीदकरणारा घेत नाहीं आणि तो जिनस **राजदैविक** उपद्रवानें नाश पावतो तर तें खरीदकरणाराचें नुकसान. कारण, **विक्रेता** देत असतां खरीदकरणारानें घेतला नाहीं हा अन्याय खरीददाराचा. विकलेलामाल विकणारा देतअसतांही खरीददारानें घेतला नाहीं तर नुकसान होईल तें खरीददाराचें.

मूळ.

याज्ञवल्क्य. मागत असतांही उदम्यानें दिल्हा नाहीं पुढें **राजदैविक** उपद्रवानें तो माल खराब झाला. तर तें नुकसान विकणाराचेंच.

# प्रकरण २०

## विक्रीयासंप्रदान.

टीका.

६ जर खरीददार खरीद केलेला जिनस मागत असतां व विकणारास **अनुशय** झाला नसतांही विकणारा जिनस देत नाहीं. आणि तो जिनस जर **राजदैविक** उपद्रवानें नाश पावला तर तो तोटा विकणाराचा झाला. यास्तव पहिल्या जिनसासारखाच दुसरा चांगला जिनस खरीद करणारास घेऊन द्यावा.

विकरीझाल्यानंतरखरीददारजिनसमागतअसतां विकणारानेंनदिल्यामुळेंमालखराबझाल्यासतेंनुकसानविकणाराचें

मूळ.

याज्ञवल्क्य. जो एकाला विकलेला दुसऱ्यास विकतो अथवा सदोष जिनस असून निर्दोषाप्रमाणें विकतो, त्या प्रत्येकास किमतीच्या दुपट दंड होईल.

टीका.

७ जो विकणारा एकाला विकलेला जिनस **अनुशय** नसतां पुनः दुसऱ्यास विकतो, अथवा जिनसाला दोष असतां तो आच्छादून विकतो त्याला त्या विकलेल्या जिनसाचे किमतीच्या दुपट दंड करावा.

एकालाविकलेलाजिनस दुसऱ्यासविकतोकिंवाचोखमालदाखवूनवाईटदेतोत्यास दुपट दंड.

नारदही याविषयीं विशेष सांगतो.

नारद. जो उदमी कांहीं एक जिनसाची एकाशीं विकरी करून तोच जिनस पुनः दुसऱ्यास विकतो त्यापासून पहिल्या खरीददाराचें द्रव्य दुपट देववून तितकाच (दुपट) राजदंड घ्यावा. तसेंच जो निर्दोष जिनस दाखवून सदोष देतो, त्यापासूनही दुपट मोल देववून तितकाच राजदंड घ्यावा.

८ हा वरचा (या शाखेंतील) सर्व प्रकार ज्या जिनसाचें मोल दिलें असेल त्याविषयीं समजावा. ज्या जिनसाचें मोल दिलें नाहीं, केवळ

मोलनदेतांठुसतांतोंडचाचकरारझालाअसल्यास दुसऱ्यालाही विकावा.

# प्रकरण २०

## विक्रीयासंप्रदान.

देण्या घेण्याचा तोंडचा करार मात्र ठरला, आणि त्याची देवघेव विकणा स व गिऱ्हाईक यांनीं करार केलेल्या मुदती बाहेर (किंवा मुदती शिवाय) अन्यत्र स्थळीं झाली तर कोणाकडेसच दोष नाहीं.

नारद. हा प्रकार ज्या जिनसाचें मोल दिलें आहे त्याविषयीं जाणावा. मोल दिलें नाहीं व करारही झाला नाहीं तर दुसरें ठिकाणीं विकरी होईल.

### शाखा ३

असा विकरी विषयीं येथें **अनुशय** सांगितला. खरीदी विषयीं **अनुशयाचें** स्वरूप तर पूर्वीं (१२व्या प्रकरणीं) सांगितलें. आतां त्या दोघां विषयीं साधारण प्रकार सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. उदम्यानें (पूर्वीं) जिनसाचा तोटा नफा नजाणून खरेदी केली, नंतर **अनुशय** करूं नये. केला असतां साहावा भाग दंड पावेल.

टीका.

१ चौकशी करून जिनस खरेदी केल्यानंतर खरीद केलेल्या वेळेच्या मोलापेक्षां पुढें जिनस सवंग मिळेल असें नजरेस न आलें तर **अनुशय** करूं नये. विकणारानें ही पुढें सवंगाई झाल्यामुळें आपला तोटा होईल हें समजण्यांत नयेतां विकरी केली असतां **अनुशय** करूं नये. अर्थात् नफा तोटा समजण्यांत आला असतां **अनुशय** करावा हें सिद्ध झालें.

पुढें होणारा तोटा नफा पूर्वींपाहवा तेंनपाहतां उदीम केल्यावरस गजिनस परत होणार नाहीं.

# प्रकरण २०

## विक्रीयासंप्रदान.

किती दिवस पर्यंत **अनुशय** करावा ती मुदत नारद सांगतो.

२ जिनस खरीद केल्यानंतर खरीददारास वाटेल कीं खरीदी चांग ली झाली नाहीं, तर त्याच दिवशीं जशाचा तसा तो परत करावा. दुसऱ्या दिवशीं परत केल्यास किमतींत तिसावा अंश कमी करून किमत माघारी द्यावी. ति तिसऱ्या दिवशीं परत केल्यास किमतीचा पंधरावा अंश कमी करावा. याच्या पुढें जिनस परत होणार नाहीं. जिनसपरतकरण्याचीमुदत.

३ चोकशी केल्या वांचून केलेल्या खरीदी विषयीं (किंवा विकरी विषयीं) तर नफा तोटा समजल्यामुळें परत करण्याची मुदत तरपूर्वी (१ल्या प्रकरणाच्या १ल्या शाखेच्या ४ थ्या अंकांत) सांगितलीच आहे. तस्मात् अशा युक्तीनें तोटा नफा समजणें हेंच **अनुशयास** मुख्य कारण अवगत होतें. जशी जिनसाची चोकशी केल्यानें तो बरा वाईट समजला असतां **अनुशय** संभवतो. तसाच जिनसा विषयीं दोषोद्भावन व तोटा व नफा अशी तिन्हीं कारणें नसतां **अनुशय** करण्याच्या मुदतींत ही **अनुशय** करितो तर (खरीद करणारापासून किमतीचा साहावा भाग) विकणारापासून जिनसाचा साहावा भाग दंड घ्यावा.

४ **अनुशया** विषयीं योग्य कारण असतांही जर **अनुशय** करण्याची मुदत टळल्यावर **अनुशय** करितो, तर त्यासही हा (साहवा भाग) च दंड जाणावा.

५ उपभोगानें खराब न होणारा अशा टिकाऊ (घर शेत पलंग वगैरे) मालाविषयीं मुदत टळल्यावर **अनुशय** केला असतां मनूनें (खालीं) सांगितलेला दंड योजावा.

# प्रकरण २०

## विक्रीयासंप्रदान.

मनु. कांहीं जिनसाचा सौदा झाल्यावर दाहा दिवसांनंतर तो जिनस खरीद करणारानें परत देऊं नये, व विकणारानें ही परत घेऊं नये. अत एव परत देणारा व घेणारा यांपासून राजानें ६०० (पण) दंड घ्यावा.

# प्रकरण २१

## संभूयसमुत्थान

### शाखा १

आतां अनेक उदमी किंवा कसबी मिळून पांथीनें उदीम करण्याविषयींचा जो **व्यवहार** त्याचें निरूपण करितो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जे वाणी लाभार्थ पांथीनें कांहीं एक उदीम करितात, त्यांस त्यांचे पांथी प्रमाणें तोटा नफा, किंवा करारा प्रमाणें.

टीका.

× १ आपण इतके मंडळी मिळून (एका विचारें) हें काम करूं, असा करार करून जे वाणी, उदमी, तमासगीर, नाचे वगैरे लाभार्थ निरनिराळें काम करितात, त्यांस त्यांच्या द्रव्या प्रमाणें ह्मणजे माल खरेदीसाठीं (किंवा कसबासाठीं) ज्यानें जितका ऐवज पांथीनें दिल्हा असेल त्याला त्याच्या हिश्शा प्रमाणें तोटा नफा होईल. अथवा प्रधान गुण भावाचा विचार करून अमुकानें दोन भाग घ्यावे, अमुकाला एक भाग, अमुकानें अर्धा भाग, वगैरे जसा प्रथमतः करार केला असेल त्या विभागा अन्वयें तोटा नफा वांटून घ्यावा

पांथीनें उदीम करणारांनीं तोटा नफा आपले हिश्शाअन्वयें किंवा आरंभींचा करारा प्रमाणें वांटून घ्यावा.

---

सुबोधिनी. १ उदाहरण, तीहीं असामींनीं आपलें द्रव्य एकत्र करून कांहींएक व्यापार आरंभिला. त्यांत एकाचे पांच रुपये, दुसऱ्याचे दाहा, आणि तिसऱ्याचे पंधरा. एकूण रुपये ३० या प्रमाणें प्रत्येकानें द्रव्य जमा करून व्यवहार रीती प्रमाणें उदीम केला असतां एकंदर मुद्दला वर साहा रुपये नफा आला. तेव्हां ज्याचे पांच रुपये मुद्दल होते त्या

# प्रकरण २१

## संभूयसमुत्थानें.

### मूळ.

याज्ञवल्क्य. पांथीदारांनीं निषेधिलेलें किंवा अनाज्ञप्त केलेलें काम करण्यानें किंवा हेगयीमुळें जो नुकसान करील त्यानें तें भरून द्यावें. आणि संकटापासून रक्षिलें तर दशमांश नफा घ्यावा.

### टीका.

२ पांथीनें उदीम करणारांमध्यें ह्या जिनसाचा अमुक प्रकारें उदीम करूंनये अशी ताकीद झाली असतांही तीन मानितां, ज्यानें जें नुकसान केलें असेल तें, अथवा ज्याविषयीं मंडळीची आज्ञा नसेल तें काम करणारानें जें नुकसान केलें असेल तें, किंवा ज्यानें जें प्रमादेंकरून नाशिलें असेल तें, नुकसान त्यानें पांथीदारांस भरून द्यावें. पांथीदारांतून ज्यानें नुकसान केलें असेल त्यानें भरून द्यावें.

३ पांथीदारांतून जो कोणी चोर, राजा, वगैरेंच्या उपद्रवापासून मालाचें संरक्षण करितो तो त्या संभाळलेल्या मालांतून दाहावा हिसा पावतो. त्यांतून जो मालाचें उपद्रवापासून बचाव करील त्यास दाहावा हिसा नफा द्यावा.

### मूळ.

याज्ञवल्क्य. निरख ठरवून देण्याबद्दल राजानें विसावा अंश कर घ्यावा व जें राजाज्ञेनें निषिद्ध व जें राजयोग्य असें विकलेलें असलें तरीं राजानें घ्यावें.

---

स एक रुपया, ज्याचे दाहा रुपये होते त्यानें दोन रुपये, ज्याचे पंधरा रुपये मुदल होते त्यास तीन रुपये, असा नफा वांटून घ्यावा. याप्रमाणें तोटा असल्यास तोही वांटून घ्यावा.

# प्रकरण २१

## संभूयसमुत्थान.

टीका.

४ अमुक जिनस अमुक दरानें विकावा, असा राजानें निरख ठरवून द्यावा. आणि त्याबदल जिनसाचे किमतीचा विसावा अंश जकात घ्यावी. खुपषीवरील जकात घेण्याचा प्रकार.

५ जो राजोपभोगास योग्य असा मोत्यें हिरे वगैरे माल, व "अमुक माल सरकाराखेरीज दुसरे ठिकाणीं विकूं नये असा" राजाज्ञेनें निषिद्ध केलेला माल राजाला न कळवितां अधिक नफ्याच्या लोभानें अन्यत्र विकला तर त्याची किंमत न देतां तो सर्व माल सरकारांत घ्यावा. सरकारास उपयोगी अथवा सरकारानें अन्यत्र मना केलेला सरकारानें घ्यावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. जिनसाचें खोटें परिमाण सांगतो, किंवा जकातीचें नाकें चुकावतो, अथवा संशयित मालाचा **क्रय विक्रय** करितो, त्या प्रत्येकास आठपट दंड करावा.

टीका.

६ जो उदमी जकात न पडावी किंवा कमी जकात पडावी म्हणून परिमाणांत लबाडी सांगतो, अथवा जकातीचें नाकें चुकावून जातो, व जो "याचा किंवा त्याचा असा" **विवादास्पदीभूत** माल खरीद करितो किंवा विकतो त्या प्रत्येकापासून मालाच्या आठपट दंड घ्यावा. जो जकातदारांस ठकवितो त्यास आठपट दंड.

मूळ.

याज्ञवल्क्य. जळमार्गाचा जकातदार जर खुषकी वरील जकात घेतो तर १० **पण** दंड. तसेंच स्वगृहसन्मुख व शेजारी अशा ब्राह्मणांस आमंत्रण न करणारास ही हाच दंड.

# प्रकरण २१

## संभूयसमुत्थानं.

### टीका.

७ जकात दोन प्रकारची खुषकीची आणि जळमार्गाची. पैकीं खुषकीच्या जकातीचा प्रकार ४थ्या अंकांत सांगितला. जळमार्गावरील जकातीचा प्रकार खालीं मनुवचनांत (८व्या अंकांत) सांगितला आहे.

तरीवरील जकातदार (नावाडी) जर खुषकीवरील जकात घेता तर त्यापासून राजानें १० **पण** दंड घ्यावा. तसेंच जो आपल्या घरा समोरचे घरांतल्या व शेजारच्या घरांतल्या **श्रुतवृत्तसंपन्न** ब्राह्मणा स आनुकूल्य असतां श्राद्धादिकांत आमंत्रण करीत नाहीं त्याला ही हाच ह्मणजे १० **पण** दंड जाणावा. — जळमार्गाचा जकातदार खुषकीवरील जकात घेतो तर त्या स दंड.

मनु. ८ रिकाम्या वाहना विषयीं तरीवर १ **पण** जकात घ्यावी. भारवाही पुरुषापासून अर्धा **पण** उतार घ्यावा. पशू व स्त्रिया यांपासून एक पाव उतार घ्यावा. रिकाम्या मनुष्यापासून **पणा**चा आठवा हिस्सा उतार घ्यावा. आणि गाडे वगैरे वाहनें जर मालानें भरलेलीं आहेत तर मालाच्या सारासार तारम्यानें उतार घ्यावा. (पेट्या वगैरे) रिकामें सामान, तसेंच माला वांचून रिकाते वाणी उरमी यांविषयीं थोडा उतार घ्यावा. — जळमार्गावरील जकात घेण्याचा प्रकार.

दोहों प्रकारच्या (खुषकीवरील व जळमार्गावरील) जकाती विषयीं आणखी विशेष सांगतो.

स्मृति. **कार्षापणा**पेक्षां कमी मोलाचा (किंबहुना एका पणाचा) जिनस व कारागीर (सुनार गौंडी चिनारी वगैरे) यांचेकरे जामूद व

# प्रकरण २१

## संभूयसमुत्थान.

भिक्षेनें मिळालेलें व चोरीस जाऊन उरलेलें व **श्रोत्रिय** तसाच **प्रव्रजित** यांवर जकात नाहीं. तसेंच यज्ञोपयोगी द्रव्य आणाव याचें असल्यास अथवा तें आणावयासाठीं जात असल्यास त्याला जकात नाहीं.

### शाखा २

देशांतरीं मृत जो उदमी त्याचें जिंदगीवि षयीं सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. देशांतरीं गेलेला उदमी मेला तर त्याची जिंदगी **दायादांनीं बंधूंनीं** किंवा ज्ञातीनें, तदभावीं पांथीदारानीं, त्यांच्याहीअभावीं **राजानें** घ्यावी.

टीका.

१ पांथीनें उदीम करणारांतून एखादा देशांतरीं गेलेला (तेथें) मरण पावला तर त्याची जिंदगी पुत्रादिक वारिशांनीं घ्यावी, किंवा (त्यांच्या अभावीं) **बांधवांनीं** किंवा (त्याच्या अभावीं) ज्ञातीनें ह्मणजे पुत्रादिक **दायादा** खेरीज **सपिंडांनीं** किंवा पांथीदार जे देशांतरींहून आलेले त्यांनीं घ्यावी. त्यांच्या अभावीं **राजानें** घ्यावी. पांथीदारांतून कोणी मरण पावला असतां जिंदगीचे विभागाचा प्रकार.

येथें **सपिंडांनीं** किंवा पांथीदारांनीं असा विकल्प सांगितल्यानें **सपिंडास** जिंदगी देण्याविषयीं **वैकल्पिक** अधिकार दाखविला.

# प्रकरण २१

## संभूयसमुत्थानं.

१ अपुत्र मरण पावला असतां जिंदगीची अधिकारी **पत्नी**, तिच्या अभावीं कन्या वगैरे जो क्रम पूर्वी (७ व्या प्रकरणीं २६ व्या शाखेंत) सांगितला आहे तोच येथें जाणावा. निराळें वचन सांगण्याचें प्रयोजन इतकेंच कीं पूर्वी (७ व्या प्रकरणीं २६ व्या शाखेंत) **बंधू**, त्यांच्या अभावीं शिष्य, त्यांच्या अभावीं **सब्रह्मचारी**, त्यांच्या अभावीं ब्राह्मण, असें जें सांगितलें त्याचा बाध करून त्यांच्या बदल येथें पांथीदार जिंदगीचे अधिकारी जाणावे. (ह्मणजे पुत्र आदि करून पांथवापर्यंत वारिशांच्या अभावीं पांथीदार जिंदगी घेतील.)

२ पांथीदारांतून ही जो पिंड देण्यास व ऋण फेडण्यास समर्थ असेल तो जिंदगी घेईल. जर पिंडदान व कर्ज फेडणें याविषयीं सर्वांचें ही सामर्थ्य समान आहे तर सर्व पांथीदार **संसृष्टी** यांनीं विभागून घ्यावें. त्यांच्या ही अभावीं **राजा** नें दाहा वर्षेपर्यंत वारिशांची वाट पाहावी. दाहा वर्षेपर्यंत कोणी वारस हजर न झाल्यास पुढें **राजा** नें घ्यावें. त्यांतून जो कर्ज फेडण्यास व पिंड देण्यास अधिकारी असेल तो घेईल. सगळे तसे असल्यास त्यांनीं वांटून घ्यावी.

नारद ही हेंच स्पष्ट सांगतो.

नारद. पांथीदारांतून एखादा मरण पावला तर त्याची जिंदगी **दायाद** घेतील. **दायाद** नसल्यास दुसरा जो त्या पांथीदारांतून पिंड देण्यास व कर्ज फेडण्यास समर्थ असेल तो घेईल. कोणी ही समर्थ नसल्यास अथवा सारे समर्थ असल्यास सर्वांनीं वांटून घ्यावी. त्यांच्या अभावीं ती जिंदगी **राजा** नें दाहा वर्षेपर्यंत तसीच (अनामत) राखावी. दाहा वर्षांत कोणी वारीश हजर होत नाहीं, तर पुढें **राजा** नें घ्यावी. असें केलें असतां धर्मलोप होत नाहीं.

# प्रकरण २१

## संभूयसमुत्थान.

### मूळ.

याज्ञवल्क्य. त्यांत जो प्रतारक असेल त्याला लाभहीन करून घालवा वें. व जो असमर्थ असेल त्यानें काम दुसऱ्याकडून करवावें.

### टीका.

४ पांथीदारांतून ज्यानें इतरांस प्रतारणा करून व्यापारांत लाभ संपादिला असेल तो त्यापासून घेऊन त्याला मंडळींतून हांकून द्यावा. आणि पांथीदारांमध्यें ज्याच्यानें सामग्रीची देखरेख वगैरे स्वतांचें काम न करवेल त्यानें तें सामान वाहणें, तोटा नफा पाहणें, वगैरे आपलें काम दुसऱ्याकडून करवावें. पांथीदारांतजो प्रतारक असेल त्याला घालवावें. अशक्त असल्यास त्यानें आपलें काम दुसऱ्याकडून करवावें.

## शाखा ३.

वर सांगितलेला जो उदम्यांच्या वर्तणुकी चा प्रकार तोच ऋत्विज वगैरे विषयीं समजावा, असा अतिदेश सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. ऋत्विज, शेतकरी व कारागीर यांविषयींही हाच प्रकार जाणावा.

### टीका.

१ पहिल्या शाखेच्या १ ल्या अंकापासून येथपर्यंत सांगितलेला जो उदम्यांच्या वर्तणुकीचा प्रकार तोच होता, अध्वर्यु, इत्यादिक ऋत्विज, व शेतकरी, आणि तमासगीर, नाचे, नर्तक, पांथीदारांप्रमाणेंच तमासगीरयांचीवर्तणूक असावी.

# प्रकरण २१

## संभूयसमुत्थान.

व सुतार वगैरे शिल्पकर्मानें उपजीवन करणारे, त्यांज विषयीं हाच वर्तणुकीचा प्रकार समजावा.

पैकीं ऋत्विजांच्या धन विभागाविषयीं विशेष नियम मनु सांगतो.

मनु. सर्व ऋत्विजांमध्यें जे मुख्य ते अर्धविभागाचे अधिकारी, दुसरे अर्धाच्या अर्धभागाचे विभागी. तिसरे तृतीयांशाचे विभागी. आणि चौथे चतुर्थांशाचे विभागी होतात.

अर्थ.

ज्योतिष्टोम यज्ञांत यजमानाला शत संख्याक गोरूप द्रव्यानें दीक्षा देऊन मग तें दक्षिणारूप गोशत सोळा ऋत्विजांनीं वांटून घ्यावें. त्यांत सोळा ऋत्विजांनीं शंभर गाई कशा वांटून घ्याव्या तो प्रकार, सोळा ऋत्विजांमध्यें जे मुख्य चार ह्मणजे होता, अध्वर्यु, ब्रह्मा, उद्गाता, हे अर्धविभागाचे ह्मणजे यांणीं समसमान विभाग आले पाहिजेत. अतएव अठ्ठेचाळीस गाईचे सम विभागी होतात. दुसरे चार ह्मणजे मैत्रावरुण, प्रतिप्रस्थाता, ब्राह्मणाच्छंसी, प्रस्तोता, हे अर्धभागाच्या अर्धाचे ह्मणजे चोवीस गाईचे सम विभागी होतात. जे तिसरे चार ऋत्विज ह्मणजे अछावाक, नेष्टा, आग्नीध्र, प्रतिहर्त्ता, ते तृतीयांशाचे ह्मणजे सोळा गाईचे समविभागी होतात. आणि चौथे ह्मणजे ग्रावस्तुत, उन्नेता, पोता, व सुब्रह्मण्य, हे चतुर्थांश बारा गाई समविभाग वांटून घेतात.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं

### शाखा १

आतां चोरीचें निरूपणकरितो.

चोरीचें स्वरूप मनु सांगतो.

मनु. १ द्रव्याचा संरक्षक व सरकारी मनुष्य वगैरे यांच्या समक्ष बळात्कारानें जें दुसऱ्याचें धन हरण **इत्यादिक** केलें जातें तें **साहस** ह्मटलें आहे. आणि चोरी ह्मणजे द्रव्याचा मालक व सरकारी मनुष्य यांस नकळतां त्यांच्या असमक्ष दुसऱ्याच्या धनाचा अपहार करणें. चोरीचें स्वरूप.

जो द्रव्याचा मालक व राजपुरुष वगैरेंच्या समक्ष अपहारादिक करून मी केलें नाहीं, असा भयानें **निन्हव** केला जातो तेंही **स्तेयच** होय.

नारदही सांगतो.

नारद. निद्रित, **मत्त, प्रमत्त,** अशांचें द्रव्य कपट करून नाना प्रकारच्या उपायांनीं जें हरण ती चोरी ह्मटली आहे.

त्यांत चोरीचा मुद्दा शाबीत झाल्यावांचून दंड संभवत नाहीं. आणि मुद्दा शाबीत करणें तर चौकशीचें स्वाधीन आहे ह्मणून प्रथमतः समजण्याचा उपाय सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. चोर ह्मटलेला तो रक्षकांनीं धरावा. किंवा मुद्यावरून अथवा माग काढून धरावा. तसाच पूर्वी चोरीच्या अपराधांत सांपडलेला, व अविज्ञात स्थळीं वस्ती करणाराही धरावा.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

### टीका.

चोरधरण्याचावमुद्दाशाबीत करण्याचाउपाय.

२ हा चोर, हा चोर, असा ज्या विषयीं लोक गलबला करितात तो चौकीदार वगैरे सरकारी माणसांनीं धरावा. अथवा भांडें वगैरे चोरलेल्याजिनसाच्या मुद्यावरून धरावा. किंवा चोरी झालेल्या ठिकाणापासून चोरीचा माग काढून धरावा. अगर पूर्वी हा चोऱ्या करीत होता, असा प्रसिद्धीस आलेला, तसाच ज्याचें राहण्याचें ठिकाण माहीत नाहीं तोही धरावा.

### मूळ.

याज्ञवल्क्य. अणखी ही जे जात, नाव इत्यादिकाचा निन्हव करितात, व जे जुगार, स्त्रिया, मद्यपान, यांत धुंद, जे म्लानवदन, भिन्नशब्द, जे दुसऱ्याचीं घरें द्रव्य विचारणारे, जे वेष बदलून संचार करणारे, जे हरवलेल्या द्रव्याचा विक्रय करणारे, तेही वहम्यानें धरावे.

### टीका

चोर ओळखण्याचा उपाय.

3 वर सांगितल्या प्रमाणें असतील तेच चोर ओळखावे, दुसरे केवळ तर्केंच नाहीं. अणखी ही खालीं सांगितलेल्या चिन्हांवरून चोर ओळखून धरावे. कदाचित् हा चोर असेल अशा संशयित अपराध्यासही धरावें. आणि जे जात, नाव, देश, गांव, कूळ, वगैरे वास्तवीक सांगत नाहींत ते चोर समजावें. व जे कसबिणी, जुगार, मद्यपान, या विषयीं अत्यंत व्यसनी, तसेच चौकीदार वगैरे धरणारांनीं "कोण रे तूं असें" पुसलें असतां घाबरेपणानें ज्यांची मुखश्री उतरती व शब्द बदलतो, तोही चोर जाणावाच अणखी ही (कोण रे तूं कोटचा अ

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

सें पुसिलें असतां) त्याच्या कपाळावर घाम येतो कांप सुटतो इत्यादिक ही चोर समजावे. तसेंच जे याजपाशीं द्रव्य किती आहे हें आणि याचें घर कोठें आहे? असें विनाकारण पुसतो ते, व जे दुसरा वेष घेऊन संचार करितात, व जे मिळकत नसतांही पुष्कळ खर्च करितात, आणि जे जुनी वस्त्रें, भांडीं, वगैरे हरवलेल्या बिनमालक द्रव्याची विकरी करितात, ते सर्व चोर असतील अशा शंकेनें धरावे.

४ अशा नाना प्रकारच्या चोरीच्या चिन्हांवरून त्यांस धरावें आणि हे चोर किंवा साव, यांविषयीं पुरी चौकशी करावी. केवळ मुद्दा दिसल्यावरूनच निर्णय करूं नये. कारण, सावांवर देखील कदाचित् चोरीच्या मुद्याचा संबंध घडतो.

नारद. कोणाच्या हातांतून एखाद्याच्या घरांत कांहीं वस्तु पडलेली संभवती किंवा जमीन खणीत असतां तींत पूर्वी दुसऱ्यांनीं पुरून ठेवलेलें द्रव्य खणणारास सहज सांपडलेलें संभवतें अथवा चोरांनीं बुध्या टाकलेलें ही संभवतें. ह्मणून अशा मुद्याविषयीं पुरतेपणें चौकशी करावी.

तसेंच लबाड मनुष्य भल्या गृहस्था सारिखे दिसतात, आणि भले मनुष्य अप्रामाणिका सारखे वाटतात. असे नाना तऱ्हेचे भाव होतात. ह्मणून चौकशी करणें अवश्य आहे.

# प्रकरण २२

# चोरीविषयीं.

## शाखा २

या प्रमाणें चोरीच्या शंकेनें धरलेल्या मनुष्यानें आपल्यावरील दोष घालविण्याचा प्रकार सांगतो.

### मूळ.

याज्ञवल्क्य. चोरीच्या वहम्यानें धरलेला आपल्याला निर्दोष करूं शकत नाहीं तर, हरण केलेलें द्रव्य त्याजकडून देवबून चोरदंडानें दंडावा.

### टीका.

१ चोरीच्या वहम्यानें धरलेला पुरुष जर आपला निर्दोषपणा शाबीत करीत नाहीं, तर पुढें सांगितलेल्या धन वध इत्यादिक दंडाचा अधिकारी होतो. यास्तव त्यानें **मानुष प्रमाणानें**, त्यांच्या अभावीं **दिव्य प्रमाणें** करून, आपल्यावरील वहम घालवावा. चोरीच्या वहम्यानें धरलेलाजो निर्दोष होऊं शकत नाहीं तर दंड.

२ शंका — जर चोर मी चोरी केली नाहीं असें **मिथ्योत्तर** सांगेल तर **प्रमाण** कसें संभवेल बरें? कारण, **मिथ्योत्तर** केवळ **अभावरूप** आहे आणि **प्रमाण** तर **भावगोचर** आहे (ह्मणून मी चोरी केली नाहीं, या विषयीं अमुक साक्षी आहेत असें सांगणें संभवत नाहीं.)

३ समाधान — मानुष प्रमाण केवळ **भावगोचर** आहे खरें, पण **दिव्य प्रमाण** तर **भावगोचर** व अ

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

**भावगोचर** आहे. कारण "परस्परांच्या संतोषानें वादिप्रतिवादींतून एकानें **दिव्य** करावें. आणि दुसऱ्यानें (अनुमोदन द्यावें अथवा) **मानुषप्रमाण** करावें" असें **दिव्य** प्रकरणीं प्रतिपादन केलें आहे.

**मानुषप्रमाण** जरी शुद्ध **मिथ्योत्तरीं** संभवत नाहीं, तथापि **कारणोत्तर** विशिष्ट **मिथ्योत्तरस्थळीं** संभवतें. ह्मणजे **मिथ्योत्तराचें** साधन करणारें जें **भावगोचर कारणोत्तर** तेणें करून (मिथ्योत्तरांतील) **अभावक्रियेस** ही दाखवितेंच. **सकारण मिथ्योत्तर** ह्मणजे, जसें याची वस्त नाहींशी झाली, किंवा चोरीस गेली, त्यावेळेस मी देशांतरीं होतों असें प्रतिवादीनें पुराव्यानें शाबीत करून दिल्हें असतां मी चोरी केली नाहीं हें अर्थात् सिद्ध झाल्यामुळें प्रतिवादी निर्दोष होतो.

## शाखा ३

चोरास दंड सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. अपहृत द्रव्य चोराकडून परत देवून विविध वधांनीं त्याला शिक्षा करावी.

टीका.

१ जो वर (१ल्या शाखेंत) सांगितलेल्या चौकशीनें किंवा तशा चौकशीची गरज न लागतांही, ज्यावर चोरी शाबीत झाली त्याज चोराला दंड.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

कडून मालकाचें चोरीस गेलेलें द्रव्य किंवा त्या द्रव्याचें मोल देवू न अनेक प्रकारच्या वधांनीं[1] त्याला मारावें.

२ हा प्रकार **उत्तमसाहस** दंड करावया जोगा असा **उत्तमद्रव्या**चा जो अपहार त्याविषयीं जाणावा. केवळ फुलें व स्त्रें वगैरे **क्षुद्रद्रव्य** व **मध्यमद्रव्य** यांच्या अपहाराविषयीं नव्हे.

नारद. **प्रथमसाहस, मध्यमसाहस, उत्तमसाहस**, अशा तिहीं अपराधीं जो दंड सांगितला आहे. तोच दंड **प्रथमद्रव्य, मध्यमद्रव्य, उत्तमद्रव्य**, यांच्या **स्तेया**विषयीं अनुक्रमानें जाणावा.

अशी नारदवचनांत वधरूप **उत्तमसाहस** दंडाची **उत्तमद्रव्याच्या स्तेया**विषयीं व्यवस्था सांगितली आहे.

वृद्धमनु. हे चोर अन्यायानें धनसंपादन करितात ह्मणून त्याचें धन केवळ पापरूप आहे. यास्तव **राजानें** त्यांचा घातच करावा. धनदंड करूं नये.

असें जें वचन आहे तेंही महापराधाविषयींच.

कांहीं चोराविषयीं **अपवाद** सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. ब्राह्मण चोर असल्यास सचिन्ह करून राष्ट्रांतून हांकून द्यावा.

---

१ येथें वध ह्मणजे शारीरदंड. अथवा जीवजाण्याचे उपाय.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

टीका.

३ जरी ब्राह्मण मोठा अपराधी किंवा चोर आहे तरी त्या चा घात करूंनये. त्याच्या कपाळीं **श्वपदाचें** चिन्ह करून राष्ट्रां तून हांकून द्यावा. ब्राह्मणचोरअसल्यासहद्दपारकरावा.

मनु. **गुरुतल्पगमना**विषयीं **भगाकार** डाग द्यावा. मद्य प्राशनाच्या (अपराधाविषयीं) **सुराध्वजाकार** डाग द्यावा. **स्ते याविषयीं श्वपदाकारानें** डागावें. आणि ब्रह्महत्यारिला **कबंधाकार** डागावें. डागदेण्याचेकिंवाचिन्हकरण्याचेप्रकार.

मनु. सर्व **वर्ण** यथाविधि प्रायश्चित्त करितात, तर **राजानें** त्यांच्या कपाळीं डागूंनयें. त्यांपासून **उत्तमसाहस** दंड घ्यावा. प्रायश्चित्तघेणारांसडागूंनये.

## शाखा ४

चोर न सांपडल्यास चोरीस गेलेलें द्रव्य मि ळण्याचा उपाय सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जर गांवांत वध किंवा चोरी झाली तर ग्रामाधिपतीचा दोष. परंतु चोराचा माग निघालेला दाखवीत नाहीं तर **विवीतां** त झाल्यास **विवीत** स्वामीचा दोष. **विवीता**खेरीज व वाटेवर झाल्यास चोर धरणारांचा दोष.

टीका.

१ जर गांवामध्यें मनुष्यादिकांचा वध किंवा चोरी झाली गांवांत चोरी वधझाल्यास अधिकाऱ्यानेंचोरकिंवाचोरीद्यावी.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

तर गांवच्या अधिकाऱ्याचा (पाटील जमीदार मामलेदार वगैरेचा) व उपेक्षा दोष होय. ह्मणून त्यांनीं आपला दोष जाण्यासाठीं चोर धरून राजाकडे पाठवावा. असें न करवेल तर मालकाची चोरी भरून द्यावी. परंतु जर चोराचा माग आपल्या गांवच्या शिवे बाहेर गेलेला दाखवूं शकत नाहीं तर. जर माग दाखवून देतो तर ज्या तालुक्यांत जाईल तेथच्या अधिकाऱ्यानें तो चोर व चोरीस गेलेला माल असें हुजूर पाठवावें.

नारद. ज्या तालुक्यांत चोराचा माग जाईल तेथच्या अधिकाऱ्यानें तो चोर धरावा. त्याच्यानें न धरवेल तर चोरी भरून द्यावी. परंतु जर माग त्या शिवेंच्या बाहेर गेला नसेल तर. आणि माग बाहेर गेला पण जर दुसऱ्या ठिकाणीं पडलेला आढळत नाहीं तर तेथच्या सामंताकडून व वाटराख्यांकडून व नाकेदार यांजकडून देवावे.

२ जर विवीतांत चोरी झाली तर विवीतांच्या धन्याचा दोष. जर मार्गांत चोरी होईल किंवा विवीताहून दुसऱ्या क्षेत्रांत चोरी होईल, तर चोर धरणारांचा अथवा वाटराख्यांचा किंवा नाकेदारांचा अपराध. मार्गांतचोरीहोईलतर नाकेदारांचादोष.

### मूळ.

याज्ञवल्क्य. गांव हद्दीच्या आंत चोरी वगैरे झाल्यास गांवानें चोरी भरून द्यावी. अथवा जेथें माग जाईल तेथच्यांनीं द्यावी. कोसाच्या बाहेर असल्यास, पांचागांवांनीं किंवा दाहा गांवांनीं भरून द्यावी.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

टीका.

३ ज्या गांवाच्या बाहेर गांव शिवेपर्यंत शेतांत चोरी वगैरे होईल, त्या गांवकऱ्यांनीं चोरी भरून द्यावी. परंतु जर त्या शिंवेच्या बाहेर चोरीचा माग गेला नसेल तर. शिंवे बाहेर गेला असल्यास ज्या ग्रामादिकांत माग शिरला असेल त्या गांवानें चोर धरून द्यावा. (चोर धरवत नाहीं तर चोरी भरून द्यावी.

४ जर अनेक गांवांच्या मध्यभागीं एका कोसावर खून पडला किंवा चोरी झाली, आणि माग लोकांच्या वदळीमुळें मोडला, तर भोंवतालच्या पांच गांवांनी किंवा दाहा गांवांनी चोरी भरून द्यावी. (अथवा खून असल्यास मुद्दा धरून द्यावा.) "पांच गांव किंवा दाहा" असा विकल्प सांगितला तो चोरी झालेल्या ठिकाणाला जे जे गांव सन्निहित असतील त्यांनीं द्यावी. केवळ पांच गांवांनीच व दाहा गांवांनींच चोरी भरून द्यावी असें नाहीं. माग न सांपडे तर सामंतानी चोरी भरून द्यावी.

५ जर **राजा** चोरीस गेलेलें द्रव्य सदरहू सांगितलेल्यांकडून देववूं शकत नाही, तर त्याणें आपल्या **कोशां**तून द्यावें.

गौतम. चोरांनीं हरण केलेलें जिंकून ज्याचें त्याला द्यावें. (असें नहोई तर) आपल्या **कोशां**तून द्यावें.

६ चोरी झाली किंवा नाहीं याविषयीं संदेह झाला असतां **मानुषप्रमाणा**नें किंवा **दिव्या**नें निर्णय करावा.

वृद्धमनु. चोराकडून मालकाचें धन देविलें पाहिजे, परंतु चोरी झाली किंवा नाहीं याविषयीं संशय होईल तर चोरी झाली या बद्दल

# प्रकरण २२

## चोरीविषयीं

मालकांकडून शपथ घ्यावी, किंवा मालकानें बंधू[1] कडून शाबीत करावें.

## शाखा ५

कांहीं अपराधविशेषामुळें निराळा दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **बंदिग्राह**, तसेच अश्वगज यांचें हरण करणारे, व बलात्कारानें घात करणारे, अशा मनुष्यांस सुळीं द्यावें.

टीका.

१ **बंदिग्राह**, तसेच अश्वगज यांचा अपहार करणारे, व बलात्कारानें घातकरणारे, अशा पुरुषांस सुळावर द्यावें. हा **वध-दंड** करण्याचा एक विशेष नियम सांगितला.

घोडाहत्तीवगैरेचा अपहारकरणाराचावध करावा.

मनुही. होमशाळा, शस्त्रशाळा, देवालय, हीं फोडणारे व हत्ती घोडा रथ यांचा अपहार करणारे यांस विचार न करितां मारावेंच.

मूळ.

याज्ञवल्क्य. उचलून घेणाराचा हात तोडावा. व गांठ सोडून घेणाराचीं बोटें तोडावीं. दुसऱ्यानें अपराध केल्यास एकेक हातपाय तोडावा.

---

सुबोधिनी. १ येथें बंधू म्हणजे साक्षी वगैरे घ्यावे.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

### टीका.

२ आंगावरील वस्त्रादिक उचलून चोरून घेणाराचा हात तोडावा. वस्त्रांत बांधलेलें सुवर्णादिक गांठ सोडून किंवा वस्त्रादिक कातरून चोरून घेणाराच्या हाताचीं बोटें (आंगठा व तर्जनी) तोडून टाकावी. परंतु एकवार अपराध घडला असल्यास ही शिक्षा दुसऱ्यानें असा अपराध घडेल तर त्याचा हात पाय व हात तोडावा.

हा प्रकार **उत्तम साहस** दंड करावया जोग्या **उत्तम द्रव्या**च्या अपहाराविषयीं जाणावा. कारण "(वध सर्वस्व हरण गांवांतून हांकून देणें डाग देणें व) त्याचा अंग छेद करणें" असा **उत्तम साहस** अपराधाविषयीं नारदानें दंड सांगितला आहे.

तिसऱ्यानें सदरहू अपराध करील तर त्याचा वध करावा. तिसऱ्यानें अपराध केल्यास वध.

मनु. गांठचें सोडून नेणाराचीं दोन बोटें तोडावीं. परंतु एकवार असें घडल्यास. दुसऱ्यानें असें करील तर एकेक हात पाय तोडावा. तिसऱ्यानें करील तर वध करावा.

या प्रमाणें जात, द्रव्य, परिमाण, व द्रव्याचें मोल, यांच्या तारतम्यानें, योजना करावी.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

### शाखा ६

जात, द्रव्य, परिमाण, परिग्रह[1], विनियोग, वय, शक्ति, गुण, देश, काल, वगैरे कदंडाविषयीं लाघव गौरवाचीं कारणें अनंत आहेत, सबब प्रत्येक द्रव्यापहारीं निराळें सांगतां पुरवत नाहीं, याखव सामान्यतः दंड कल्पनेचा उपाय सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. क्षुद्रद्रव्य, मध्यमद्रव्य, व उत्तमद्रव्य, यांच्या अपहाराविषयीं तारतम्यानें दंड योजावा. ती योजना देश काल वय शक्ति यांचा विचार करावा.

टीका.

क्षुद्रद्रव्य, मध्यमद्रव्य, आणि उत्तमद्रव्य यांची चोरी केली असतांद्रव्याचेकिमतीच्या तारतम्यानें दंड योजावा. — चोरलेल्याद्रव्याच्या तारतम्यानें दंडयोजना.

क्षुद्रद्रव्यादिकांचें स्वरूप नारद सांगतो

नारद. २ मडकीं, आसन, बाज, हाडें, (हस्तिदंती फांसे सोंगट्या — क्षुद्रद्रव्यें कोणती.

---

सुबोधिनी. १ परिग्रहह्मणजे असें, सामान्यतः गाईच्या चोरीपेक्षां ब्राह्मण प्रतिगृहीत गोहरणाविषयीं अधिक दंड.

तसें विनियोगह्मणजे सामान्यतः ब्राह्मणापेक्षां गाईचें दूध होमास उपयोगी पडावें ह्मणून अग्निहोत्र्यास दिलेली गाय चोरली असतां त्यापेक्षांही अधिक दंड असावा. अर्थात्परिग्रह विनियोगाच्या अभावीं दंडही कमी.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

वगैरे) लांकडी सामान, कानडें, तृण, **शमीधान्य** (उडीद, मूग वगैरे) व शिजलेलें अन्न, अशीं **क्षुद्रद्रव्यें** जाणावीं.

नारद. **कौशेया**खेरीज वस्त्रें व गाईखेरीज इतर पशु तसे सोन्या खेरीज इतर धातु आणि **व्रीही**, यव, अशीं **मध्यमद्रव्यें** जाणावीं. मध्यमद्रव्यें कोणतीं.

नारद. हिरण्य, रत्नें, **कौशेय**, स्त्री पुरुष, गाय, हत्ती, घोडा, हीं द्रव्यें आणि देवब्राह्मण, राजा, यांचें द्रव्य, हीं **उत्तमद्रव्यें** जाणावीं. उत्तमद्रव्यें कोणतीं.

अशा तीन प्रकारच्या द्रव्याचे चोरी विषयीं **प्रथमसाहस मध्यमसाहस** आणि **उत्तमसाहस** दंडही तोच (नारद) सांगतो.

नारद. ३ **प्रथमसाहस, मध्यमसाहस, उत्तमसाहस,** अपराधाविषयीं जो दंड सांगितला आहे, तोच दंड सदरहू तीन प्रकारच्या द्रव्याचे चोरीविषयीं ही अनुक्रमानें जाणावा.

मडकीं वगैरे **क्षुद्रद्रव्यें**, गाईखेरीज म्हैस शेळी वगैरे **मध्यमद्रव्यें**, व ब्राह्मण संबंधी कनक, धान्य, **इत्यादिक** यांचें तारतम्य आहे. यास्तव चोरलेल्या द्रव्याचे किमतीच्या तारतम्यानें दंड कल्पावा, आणि त्या दंड कल्पनेविषयीं कारणभूत जीं देश, काल, वय, शक्ति, जाति, द्रव्य, **परिग्रह**, यांचा नीट विचार करावा. तो प्रकार असा, ज्या चोरीविषयीं जो दंड सांगितला आहे, ती चोरी विद्वान् शूद्रानें केलेली आहे तर तिजविषयीं तो दंड आठपट अधिक योजावा. आणि विद्वान् असे वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण, यांणीं केलेली आहे तर अनु विद्वानानें केलेल्या चोरीविषयीं अधिक दंड वाढवावा.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

क्रमानें सोळा पट, बत्तीस पट, आणि चौसष्ट पट, योजावा. यास्तव कीं, त्यांच्या अपराधाविषयीं अधिक दंड योजण्याचें कारण त्या शूद्रादिकांची विद्वत्ता होय.

मनूही हेंच स्पष्ट करितो.

मनु. गुण दोष जाणणाऱ्या शूद्रानें केलेल्या चोरी विषयीं आठ पट दंड, तसा वैश्याला सोळा पट दंड, तसा क्षत्रियाला बत्तीस पट दंड, आणि तसा ब्राह्मणाला चौसष्ट पट किंवा बरोबर १०० किंवा चौसष्टाच्याही दुपट दंड, योजावा.

तसेंच चोरलेल्या द्रव्याच्या परिमाणतारतम्यानें ही दंडाधिक्य पाहण्यांत येतें.

मनु. ४ दाहा **कुंभा**पेक्षां अधिक धान्याची चोरी करणारास **वध दंड** करावा. त्यापेक्षां कमी धान्य चोरणारास चोरलेल्याच्या अकरापट दंड करून मालकाची चोरी भरून देवावी. वीस **द्रोणां**चा एक **कुंभ** होतो.

५ चोर व चोरीस गेलेला जिनस व मालक याचे गुण, व सुकाळ, दुकाळ, यांचे तारतम्यानें (मनुवचनांतील) वधशब्दें करून ताडन अंगछेद वध हे दंड योजावे.

रत्नादिकांविषयीं संख्येच्या आधिक्यामुळें दंडाचें आधिक्य सांगतो.

मनु. ६ **सुवर्ण**, **रजत**, व महावस्त्रें[1] आणि सर्व जातीचीं रत्नें, हीं सोनें रत्नें वगैरेंच्या चोरीच्या दंडप्रकार.

---

१ महावस्त्रें ह्मणजे शालजोडी, पितांबर, भरजरी पोषाख, वगैरे.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

प्रत्येक द्रव्यें १०० रापेक्षां अधिक चोरिलीं असतां **वधदंड** करावा. ५० सांपेक्षां अधिक चोरलीं असतां हात तोडावा. ५० सां पेक्षां कमी चोरलीं असतां त्या द्रव्याच्या किमतीच्या ११ पट दंड योजावा.

तसाच अणखी द्रव्याविषयींही दंडाचा प्रकार सांगतो.

मनु. ७ कुलीन पुरुष, स्त्रिया, व सर्व प्रकारचीं रत्नें, यांचा अपहार करणारा **वधदंडा**स योग्य होतो.

पुरुषस्त्रियावगैरेंच्याचोरी विषयींवधदंड.

अकुलीनांविषयीं तर निराळा दंड सांगतो.

सामान्य पुरुषांचा अपहार करणारांस **उत्तमसाहस** दंड सांगितला आहे. स्त्रीच्या अपहाराविषयीं सर्वस्वहरण दंड. आणि कन्येचा अपहारकरणास **वधदंड**.

क्षुद्रद्रव्याचे चोरीविषयीं तर थोडा दंड सांगतो.

नारद. ८ **माषा**पेक्षां कमी मोलाचे जिनसाच्या चोरीविषयीं किमतीच्या पांच पट दंड. काष्टपात्रें, तृणादिक, मृन्मयपात्रें, तसेंच वेळूबुरडी सामान, तशी **स्नायू**, अस्थि, (हाडें व हस्तीदंती सामानही) चर्मनिर्मितपदार्थ, शाका, ओलीं मुळें (रताळीं गाजरें मुळे वगैरे) फळें, गोरसविकार (दहीं ताक वगैरे) उंसापासून झालेले पदार्थ (गूळ साखर वगैरे) व मीठ, तेल, तशीं पक्कांनें (जिलबी घिंवर वगैरे) शिजलेलीं अन्नें, मत्स्य, औषध, व अणखी जे अल्पमोलाचे पदार्थ, यांची चोरी केली असता किमतीच्या पांचपट दंड करावा.

क्षुद्रद्रव्यापहारींकिमतीचेपांचपटदंड.

९ क्षुद्रद्रव्यापहारीं १०० रापासून ५०० शेंपर्यंत (किंवा) **प्रथमसाहस** दंड सांगितला, तो १ **माष** मूल्याचा किंवा **माषा**पेक्षां अ

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

धिक मोलाच्या जिनसाविषयीं तारतम्यानें योजावा." त्यांच्या किमती पेक्षां दुपट दंड करावा." असें जें **क्षुद्रद्रव्याचे** चोरी विषयीं मनुवचन आहे तें, अगदीं थोडक्या किमतीचें व विशेष उपयोगी नव्हे असें जें पर क वगैरे त्याविषयीं जाणावें. अगदींहलक्यापदार्थांचेचोरीविषयीं किमतीचे दुपटदंड.

चोरीचा अपराध मोटा असल्यास दंडही अधि क सांगतो.

स्मृति. १० जे चोर रात्रीं दारें भिंती वगैरे फोडून चोरी करितात, त्याचे हात तोडून **राजानें** त्यांस सुळीं द्यावें. भिंतवगैरे फोडणारासुळीं द्यावें.

या प्रमाणें द्रव्याच्या असंख्यपणामुळें प्रत्येक द्रव्याविषयीं निर निराळा दंड सांगतां पुरवत नाहीं. ह्मणून जात, द्रव्य, परिमाण, **इत्यादि** कारणावरून दंडही लहान मोटा योजावा.

११ वाटसरांनीं तर अल्प द्रव्याचा अपहार केला असतां दंड नाहीं. वाटसरांनीं अल्पापहारकेला असतांदंडनाहीं.

मनु. मार्गस्थ द्विजानें मार्ग क्रमीत असतां जवळचें खावयाचें सरल्यामुळें दुसऱ्याच्या मळ्यांतून दोन मुळे व दोन ऊंस (किंवा असें दुसरें कांहीं) घेतलें असतां तो दंडाचें पात्र होत नाहीं.

स्मृति. वाटसरांनीं हरभरे, **व्रीहीं**, गहूं, यव, मूग, उडीद, यांची एकेक मूठ घ्यावी, परंतु कोणी प्रतिबंध नकरील तर.

स्मृति. तसेंच दिवसाचे आठ भाग कल्पून साहा भाग पर्यंत जर कांहीं खावयास नमिळे आणि उपाशीं नराहवेतरसातव्या भागांत निंद्यकर्मानें (यथा कथंचितूल्लेयानें) त्या दिवसा पुरतें मात्र घ्यावें.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

### शाखा ७

जो स्वतां चोर नसतांही चोरास मदत देतो त्याला दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. अन्न, स्थळ, अग्नि, पाणी, उपदेश, खर्ची, साहित्य. हीं चोराला किंवा वध करणारास जाणून देतो त्याला उत्तमसाहस दंड.

टीका.

१ अन्न, राहावयास स्थळ, हिंवालेल्यास अग्नि, तृषित असल्यास पाणी, चोरी करण्याचा उपदेश, व चोरी करावयाचें साहित्य, आणि चोरी करावयास देशांतरीं जात असतां फराळाचें, अशी चोराला किंवा वध करणारास त्यानें दुष्ट जाणत असतांही जो देतो. त्याला उत्तमसाहस दंड करावा.

चोरकिंवावधकरणारयांची मदतकरणारासदंड.

२ जे चोराविषयीं (चोर धरावयास किंवा त्यांची बंदी करावयास समर्थ असतां) उपेक्षा करितात तेही अपराधी होतात.

चोराविषयींउपेक्षाकरणारा अपराधीहोतो.

नारद. जे (चोर धरावयास) समर्थ असून उपेक्षा करितात तेही त्याच्या अपराधाचे विभागी होतात.

# प्रकरण २२

# चोरीविषयीं

## शाखा ८

मूळ.

याज्ञवल्क्य. शस्त्रघात. व गर्भपात केला असतां **उत्तमसाहस** दंड. पुरुष व स्त्री. यांच्या हनना विषयींही **उत्तमसाहस** किंवा **प्रथमसाहस** दंड योजावा.

टीका.

जखम व गर्भपात वगैरे करणारास उत्तमसाहस दंड.

१ दुसऱ्याच्या आंगावर शस्त्रघात करणारास. व दासीगर्भ व ब्राह्मणगर्भ यांवांचून गर्भपात करणारास **उत्तमसाहस** दंड करावा. दासीगर्भाविषयीं तर १९ व्या प्रकरणीं २ ऱ्या शाखेच्या ५ व्या अंकांत १०० **पण** दंड सांगितलाच आहे. ब्राह्मणाच्या गर्भपाताविषयीं तर प्रायश्चित्ताध्यायांत [1]ब्रह्महत्येचा **अतिदेश** सांगितलाआहे. पुरुष, व स्त्री, यांचा वध करणास त्यांपुरुषस्त्रियांचेशील वृत्त यांच्या तारतम्यानें **उत्तमसाहस** किंवा **प्रथमसाहस** ह्मणजे कुळशीलसदाचारसंपन्न अशा पुरुषाचा किंवा स्त्रीचा वधकरणारास **उत्तमसाहस** दंड. तद्रहित पुरुष किंवा स्त्री यांचा वध करणारास **प्रथमसाहस** योजावा. (अर्थात् यत्किंचित्

---

१ ब्रह्महत्येचा अतिदेश ह्मणजे नजाणतां ब्राह्मणवध घडला असतां जें द्वादशवार्षिक प्रायश्चित सांगितलें आहे तेंच नजाणतां ब्राह्मणगर्भाचा पात केला असतां प्रायश्चित करावें. जाणून घडल्यास तें प्रायश्चित्त करून भृगुपात करून मरावें.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

(कुलशीलसदाचारसंपन्न पुरुष किंवा स्त्री यांच्या वधकरणारास मध्यमसाहस दंड.)

मूळ.

याज्ञवल्क्य. भ्रूणहत्या करणारी. पुरुषवधकरणारी व मर्यादेची विच्छेद करणारी. अशा स्त्रीला शिळा बांधून पाण्यांत बुडवावी. परंतु गर्भवती नसल्यास.

टीका.

२ आपला गर्भपात करणारी, पुरुषास मारणारी, मर्यादेचा भेद करणारी, अशा स्त्रीच्या गळ्यांत शिळा बांधून पाण्यांत बुडवावी. कीं पुनः वर न येई. परंतु ती गर्भिणी नसल्यास. गर्भपातवगैरे साहस करणाऱ्या स्त्रीला पाण्यांत बुडवावी.

मूळ.

याज्ञवल्क्य. विषप्रहार करणारी, आगलावणारी, व नवरा, गुरु, आपलें आपत्य, यांस मारणारी. अशा स्त्रीला कान, हात, नाक, ओष्ठ. कापून बैलां कडून मारवावें.

टीका.

३ जी दुसऱ्यास जीव घेण्याच्या उद्देशानें अन्नादिकांत विषप्रयोग करिती. जी गांव इत्यादिक जाळण्यासाठीं अग्निप्रयोग करिती. तशीच जी आपला नवरा, गुरु, अपत्य. यांस मारती. तिचे कान, नाक, हात, ओंठ, कापून माजलेल्या पोळाकडून तिला मारवावी. परंतु गर्भिणी नसल्यास या वाक्याची मागील स्मृतीतून अनुवृत्ति घ्यावी. पतिइत्यादिकांस मारणाऱ्या स्त्रीला पोळाकडून मारवावी.

स्तेयप्रकरणीं जें हें साहसिकाविषयीं दंडविधान सांगितलें तें प्रसं

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

गोपाळ समजावें.

### शाखा ९

वध करणारा माहीत नसल्यास समजण्या
चा उपाय सांगतो.

#### मूळ.

याज्ञवल्क्य. वध करणारा माहीत नाहीं तर खुनीचे पुत्र बांधव यां स त्याचे कलहाविषयीं लोकर पुसावें. व त्याच्या स्त्रियाही ज्या पर पुरुषाशीं रत झालेल्या. त्यांस ही पृथक् पृथक् पुसावें.

#### टीका.

१ वध करणारा माहीत नाहीं तर मेलेल्याचे पुत्रांस व जवळचे बांधवांस लागलेच पुसावें कीं कोणाशीं याचा कलह झाला होता कीं काय? तसेंच त्याच्या बायकांस व ज्या परपुरुषाचे ठाईं रत झालेल्या त्यांस ही पुसावें कीं याचा कोणा बरोबर कज्या झाला होता कीं काय? खून करणारा अविज्ञात असल्या सविकाण्या लावण्याचा उपाय.

कोणत्या रीतीनें पुसावें हें सांगतो.

#### मूळ.

याज्ञवल्क्य. हा स्त्री काम होता, द्रव्यकाम, किंवा वृत्तीविषयीं यत्न करीत होता. अथवा कोणा बरोबर हा गेला होता. या प्रमाणें वध स्थाना जवळच्या लोकांसही युक्तीनें पुसावें.

# प्रकरण २२

## चोरीविषयीं.

टीका.

१ काय हा स्त्रीविषयीं इच्छा करीत होता, असल्यास कोणाच्या बायकोवर त्याची प्रीति होती, किंवा कोणत्या द्रव्याव र त्याची प्रीति होती, कशामुळें हा स्त्रीविषयीं अभिलाष क रीत होता, व कोणाबरोबर देशांतरीं गेला होता, असें त्याच्या व्यभिचारिणी स्त्रियांस वेगवेगळें व आश्वासन देऊन पुसावें. तसें च वध झालेल्या ठिकाणाजवळ राहणारे जे गोळी, अरण्यक वगै रे, त्यांसही विश्वासपूर्वक पुसावें. प्रश्न करण्याचा प्रकार.

या प्रमाणें नाना तऱ्हेचे प्रश्नांकडून वध करणारा अमुक असा निर्णय करून त्याला जो योग्य दंड असेल तो करावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. क्षेत्र, घर, क्रीडावन, गांव, बिवीत, खळें, यांस आग लावणारे, व राजपत्नीशीं संग करणारा यांस कटाग्नीनें जाळावें.

टीका.

२ जे परिपक्व दशेस आलेलें क्षेत्र, घर, वन[1] अथवा घर इत्यादिकांस आग लावणारा व राजपत्नीशीं संग करणारा यांस जाळून टाकावें.

---

१ येथें वन ह्मणजे जें नदी इत्यादिकांचे आश्रयानें स्वतःसिद्ध वृक्षादिकें करून युक्त स्थळ तें.

## प्रकरण २२.

## चोरीविषयीं.

जे उडावन . गांव . विहीत . किंवा खळें . जाळतात . व जो राजपत्नीशीं संग करणार त्यांस सर्वांस कटाग्नीनें जाळावें .

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं

### शाखा १

आतां स्त्रीसंग्रहणाविषयींचा व्यवहार सांगतो.

**स्त्रीसंग्रहण** ह्मणजे परस्त्री व पुरुष यांचा परस्पर संयोग (किंवा संयोग होण्याचे उपाय)

**स्त्रीसंग्रहण** करणारास **प्रथमसाहस** **मध्यमसाहस** व **उत्तमसाहस** दंड होण्यामाटीं त्या **स्त्रीसंग्रहणाचें** स्वरूप तीन प्रकारचें व्यास सांगतो.

व्यास. १ निर्जनस्थळीं व अकाळीं व प्रसिद्ध देशभाषेखेरीज (संकेत शब्दांनीं) जो परस्त्रीशीं कटाक्षावलोकन. हास्य (विनोद) केला जातो. तें **प्रथमस्त्रीसंग्रहण** ह्मटलें आहे. प्रथमस्त्रीसंग्रहण.

व्यास. सुवासिक गंध (चंदन बुका अर्गजा वगैरे) फुलें, धूप. भूषणें, वस्त्रें, आणि अन्नपान यांकडून प्रलोभन करणें, हें **मध्यमस्त्रीसंग्रहण** ह्मटलें आहे. मध्यमस्त्रीसंग्रहण.

व्यास. एकांतीं व एका आसनावर बसणें, व परस्परांचें आलिंगन, खांद्यावर हात ठेवणें, व हातांत हात धरणें, आणि परस्परांचे केशपाश धरून क्रीडा करणें, **उत्तमस्त्रीसंग्रहण** ह्मटलें आहे. उत्तमस्त्रीसंग्रहण

**स्त्रीसंग्रहण** करणारास जो दंड करणें तो प्रथमतः तें **संग्रहण** समजल्याशिवाय घडत नाहीं. ह्मणून तें समजण्याचा उपाय अगोदर सांगतो.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

### मूळ.

याज्ञवल्क्य. परस्त्रीशीं संभोग करण्याविषयीं प्रवृत्त जो पुरुष तो पर स्पर केशग्रहण, अथवा तात्कालिक जीं कामजनित चिन्हें, तसाच उ भयतांचा संकेत, या मुद्यावरून धरावा.

### टीका

२ परस्त्री बरोबर परस्पर केशपाश धरून क्रीडा केल्याव रून अथवा कामाच्या आवेशानें नखक्षत दंतक्षतादि तात्कालिक चिन्हें होतात त्या मुद्यावरून अथवा दोघांच्या संकेतावरून हा संयो गाविषयीं प्रवृत्त झालेला असें समजून धरावा. येथें परस्त्रीशब्दें करून नियुक्ता व अवरुद्धा यांवांचून इतर घ्याव्या. स्त्रीसंग्रहणसमजण्याचा उपाय.

### मूळ.

याज्ञवल्क्य. जो ओढीळ, व स्तनावरील पदर, मांडी केश यांस स्पर्श करितो. व अकाळीं निर्जनस्थळीं संभाषण करितो. किंवा एकासनीं बसलेला तोही धरावा.

### टीका.

३ जो परस्त्रीच्या नेसलेल्या वस्त्राची गांठ व स्तनावरील पदर मांडी केशपाश इत्यादिकांस प्रीतिपूर्वक स्पर्श करितो. तसाच जो एकांतीं किंवा मंडळींत असोन अंधकारांत किंवा अका ळीं संभाषण करितो. व क्रीडेच्या उद्देशानें परस्त्रीसहवर्तमान एका शय्येवर बसतो. तोही संयोगाविषयीं प्रवृत्त झालेला स मजून धरावा.

४ हे (सदर्हू सांगितलेले) प्रकार ज्या पुरुषाविषयीं

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

अशा दोषाची शंका आलेली असेल त्याविषयीं. इतरांकडून[1] असें घडलें असतां दोष नाहीं.

मनु. हा सोदा आहे असा पूर्वी निंदित न केलेला (साळसूद) पुरुष जर कांहीं योग्य कारणावरून तिशीं बोलेल तर तो किंचित् देखील अपराधी होत नाहीं.

जो परस्त्रीनें धरिलें असतां क्षमा करितो तोही धरावा असें तोच सांगतो.

मनु. ५ जो एकांतीं परस्त्रीला धरितो व स्त्रीनें (कामबुद्धीनें) धरिलें असतां राग येत नाहीं (क्षमा करितो) असें परस्परांच्या अनुमतानें घडतें तरतें सर्व **संग्रहण** ह्मटलें आहे.

जो मी ही सुंदरी पुष्कळदां उपभोगिली. अशी इच्छेनें सोद्यांचे मंडळींत ख्याति करितो तोही धरावा असें तोच सांगतो.

मनु. ६ जो गर्वानें, किंवा मोहानें, अथवा श्लाघेमाठीं, बोलेल कीं हिला मी पूर्वी उपभोगिली आहे. तर तेंही **संग्रहण** ह्मटलें आहे.

## शाखा २

स्त्रीपुरुषांस निषेधिलें असतां पुनः परस्पर

---

१ इतरांकडून ह्मणजे निश्चयें अव्यभिचारी आहेत त्यांकडून. असें ह्मणजे एकांतीं, अकाळीं, संभाषण, एकासनीं बसणें वगैरे दुसरा व्यापार.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

संभाषणादिक केल्यास दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. स्त्रीला निषेधिलें असतां प्रवृत्त झाली. तर १०० **पण** दंड. पुरुष प्रवृत्त झाला तर २०० **पण** दंड. उभयतांसही निषेधिलें असतां पुनः प्रवृत्त झालीं तर **संग्रहणीं** जो दंड. तो येथें घ्यावा.

टीका.

१ नवरा बाप वगैरेंनीं या पुरुषाशीं तूं संभाषणादिक करूं नको. असा ज्याविषयीं निषेध केला. त्या पुरुषाशीं संभाषणादिक करणारी जी स्त्री तिला १०० **पण** दंड करावा. पुरुषास (अमुक स्त्रीशीं तूं संभाषणादिक करूं नको असा) निषेध केला असतां संभाषणादिकाविषयीं प्रवृत्त होतो तर त्याला २०० **पण** दंड. दोघांसही निषेधिलें असतां पुनः प्रवृत्त झालीं तर या **संग्रहण** प्रकरणीं **वर्ण** भेदें करून जो जो दंड पुढें सांगितला आहे तोच येथें जाणावा. निषेध केला असतां पुनः परस्परसंभाषणादिकरणारे स्त्रीपुरुषांस दंड.

२ हा (वर सांगितलेला) दंड नट वगैरेंच्या बायकाखेरीज करून इतर बायकांविषयीं जाणावा. नटवगैरेंच्या बायकांशीं संग करणास दंड नाहीं.

मनु. हा दंडविधि नटादिकांच्यास्त्रियांविषयीं व ज्या स्त्रिया व्यभिचारानें उपजीविका करणाऱ्या त्यांविषयीं नव्हे. कारण ते (नटादिक) व आपल्या स्त्रियांस परपुरुषाचे ठायीं सज्ज करितात व गुप्तरूपें करून अशाकर्माविषयीं पाठवितात.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

### शाखा २

आतां व्यभिचाराविषयीं दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. सजातीविषयीं **उत्तमसाहस** दंड. **अनुलोम**जाती विषयीं, **मध्यमसाहस**. आणि **प्रतिलोम**जातीविषयीं पुरुषाचा वध, व स्त्रीचें कर्णादिक कापावें.

टीका.

१ चोहों **वर्णां**मध्येंही बलात्कारानें सजातीय गरत परस्त्रीशीं संगकरणारास १०८० **पण** दंड करावा. सजातीय बायकोबरोबर जबरी करणारास उतमसाहस दंड.

२ आपल्यापेक्षां निकृष्ट **वर्णा**ची व **अगुप्त** अशा परस्त्रीशीं संग करितो त्याला **मध्यमसाहस** दंड करावा. आपल्यापेक्षां निकृष्ट जातीच्या स्त्रीशीं संग करणास मध्यम साहस दंड.

सजातीय असून **अगुप्त** किंवा आपल्यापेक्षां निकृष्ट जातीची असून गरत अशा स्त्रीशीं संगकरणाराविषयीं

तर मनु विशेष सांगतो.

मनु. ३ ब्राह्मणीशीं जर बलात्कारानें ब्राह्मण संग करितो तर त्याला १००० **पण** दंड करावा. जर तिच्या इच्छेनें संग करितो तर

---

सुबोधिनी. याप्रमाणेंच गरत क्षत्रियेशीं क्षत्रिय गरत वैश्येशीं वैश्य गरत शूद्रेशीं शूद्र संग करितो तर हाच दंड.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

५०० पण दंड करावा. गरत क्षत्रियेशीं किंवा गरत वैश्य स्त्रीशीं बळात्कारानें संग करणारा ब्राह्मण १००० पण दंडास योग्य होतो. तसाच क्षत्रिय किंवा वैश्य जर गरत शूद्रेशीं बळात्कारानें संग करितो तर त्यालाही १००० पणाचें दंड करावा.

हें जें दंडविधान सांगितलें तें गुरु, मित्र इत्यादिकांचे भार्ये खेरीज इतर स्त्रियांविषयीं जाणावें.

नारद. ४ आई, मावशी, सासू, मामी, आत, चुलती, मित्रभार्या, शिष्यस्त्री, बहीण, बहिणीची सखी, सून, कन्या, आचार्यस्त्री, सगोत्र, तशीच जी शरण आलेली ती, राजपत्नी, प्रव्रजिता, दाई. (उपमाता) साध्वी आणि उत्तम वर्णाची स्त्री; यांतून एखादी जवळ जाणाराही गुरुतल्पग ह्मटला आहे. त्या गुरुतल्पगामीचें शिश्न कापावें. याशिवाय दुसरा दंड नाहीं.[1] — आई वगैरेशीं संग करणारा जो गुरुतल्पगामी त्याचें शिश्न कापावें.

५ आपल्यापेक्षां उत्कृष्ट वर्णाच्या स्त्रीशीं पुरुष संग करितो तर त्याचा वध करावा. परंतु ती गरत असेल तर गरत नसल्यास धनदंड करावा. — उत्कृष्टजातीच्या स्त्रीशीं संग करणाराचा वध करावा.

मनु.[2] जर गुप्त ब्राह्मणी स्त्रीशीं क्षत्रिय (किंवा) वैश्य संग करितो तर त्याला शूद्राप्रमाणें दंड करावा. (ह्मणजे वधदंड करावा) अथवा कटाग्नीनें जाळावें.

---

१ दुसरा दंड नाहीं असें येथें ह्मटलें खरें परंतु गुरुतल्पगामीच्या कपाळीं भगाकार डागून, सर्वस्वहरण करून, राष्ट्रांतून हांकून द्यावें असें सांगितलें आहे तेंही प्राप्त होतें.

---

सुबोधिनी. २ या वचनांत दुसरा वधदंड अथवा कटाग्नीनें दहन असा विशेष सांगितला तो अग्निहोत्र्याची भार्या व गुणवती ब्राह्मणी यांविषयीं जाणावा.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

मनु. जर **अगुप्त** ब्राह्मणीशीं वैश्य व क्षत्रिय संग करितात, तर वैश्यास ५०० शें[1] **पण** दंड करावा, आणि क्षत्रियास १००० **पण** दंड करावा.

६ आपल्यापेक्षां उत्कृष्ट **वर्णाची अगुप्त** अशा स्त्रीशीं जो शूद्र संग करितो, त्याचें शिश्न कापून सर्वस्वहरण करावें. गुप्तीशीं संग करितो तर त्याचें सर्वस्व हरण करून वधकरावा. उत्कृष्टजातीच्यास्त्रीशीं संगकरणाऱ्याशूद्राचालिंगछेद.गुप्तीशींजाईलतर वध.

मनु. शूद्र जर **द्विजाती**च्या व्यभिचारिणीस्त्रीशीं संग करितो तर त्याचें एकांग (शिश्न) कापून सर्वस्वहरण दंड करावा. आणि गुप्त स्त्रीशीं संग करितो तर सर्वस्वहरण करून वध करावा.

७ जर नारी आपल्यापेक्षां नीच जातीच्या पुरुषाशीं जाते तर तिचें कान नाक वगैरे कापावें. आपल्यापेक्षां उत्कृष्ट जातीच्याशीं किंवा सजातीयाशीं संग करणाऱ्या स्त्रीला तारतम्यानें[2] दंड कल्पावा. निकृष्टवर्णाच्यापुरुषाशीं संगकरणाऱ्यास्त्रीचें नाक कान कापावें.

८ वर सांगितलेला वधादि दंड **राजानें** करावा, कारण, प्रजापालनाविषयीं **राजाला** अधिकार आहे. केवळ **द्विजाति**मात्रास अधिकार नाहीं. कारण, "ब्राह्मणांनीं परीक्षा पहावयास देखील शस्त्र धार वधादिदंडकरण्याविषयीं अधिकारी राजा

---

सुबोधिनी १ क्षत्रिय हा वैश्यापेक्षां उत्कृष्ट व जवळचा असतां ही त्याला अधिक दंड सांगितला त्याचें कारण. तो प्रजापालनपदीस अधिकारी सबब त्याजकडून असें कुकर्म नघडावें एतदर्थ.

---

२. तारतम्य ह्मणजे निकृष्टजातीच्या पुरुषाशीं संगकरणाऱ्यास्त्रीला शारीरदंड सांगितल्यावरून अर्थात् आपल्यापेक्षांउत्कृष्टजातीच्यापुरुषाशीं संगकरणारी सगुण वअगुण याच्या तारतम्यानें योग्यधनदंडकरावा. सजातीयाशीं संगकरणारीला वरधिग्दंड करावा.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

ण करूं नये." असा शस्त्रग्रहणाविषयीं निषेध आहे.

जर सरकारास जाहीर करावयास गेलें असतां इकडे कार्यहानि होईल अशी शंका असेल तर आपणच जारादिकांस मारावें. सरकारांत कळविण्याची सवड नाहीं तर आपणच धरून मारावें.

स्मृति. जेथें धर्माचा उपरोध होत आहे अशा स्थळीं द्विजांनीं शस्त्र धारण करावें.

स्मृति. नसेंच प्रसिद्धपणें किंवा गुप्तपणेंही आततायाचा वध केला असतां मारणारास दोष लागत नाहीं. कारण, याचा राग त्याचे रागाला मारितो. (हा त्याला मारितो असें नाहीं.)

अशी शस्त्र धरण्याविषयीं द्विजातींस आज्ञा आहे.

९ क्षत्रिय जर वैश्येशीं जातो तर त्याला १००० पण दंड करावा. व वैश्य क्षत्रियेशीं संग करितो तर त्याला ५०० शें पण दंड करावा.

मनु. जर गरत क्षत्रियेशीं वैश्य संग करितो तर ५०० शें पण दंडास योग्य होतो. तसाच गरत वैश्येशीं संग करणारा क्षत्रिय १००० पण दंडाचें पात्र होतो.

परस्त्रीगमनाविषयीं दंड सांगण्याचे प्रसंगानें
*
कन्येविषयींही दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. अलंकृत व सजातीय कन्येचें हरण करणारास उत्तम

---

* या प्रकरणीं कन्या ह्मणजे जी उपवर झालेली कांहींशीं मुग्धा असावी.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

साहस दंड. अलंकृत नसल्यास प्रथमसाहस दंड. आपल्यापेक्षां उत्कृष्ट जातीच्या कन्येचें हरण करणाराला वध सांगितला आहे.

टीका.

१० विवाहासिद्ध, सालंकृत, व सजातीय, अशा कन्येचें हरण करणारास उत्तमसाहस दंड करावा. विवाहास सिद्ध न झालेल्या सजातीय कन्येचें हरण करणास प्रथमसाहस दंड करावा. आपल्यापेक्षां[1] उत्कृष्ट जातीच्या कन्येचा अभिलाष करणाऱ्या क्षत्रियादिक जातीचा वध करावा. कन्येचा अपहार करणाराविषयीं दंडयोजना.

असें दंड विधान सांगितल्या वरून हरण करणारापासून घेऊन दुसऱ्याला द्यावी असें अर्थात् सिद्ध होतें.

आपल्यापेक्षां निकृष्ट जातीच्या कन्येच्या अपहाराविषयीं दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. अनुलोम जातीच्या कन्येचा अभिलाष करणारास दोष नाहीं. पण ती सकाम असल्यास. अन्यथा प्रथमसाहस दंड.

टीका.

११ जो आपल्यापेक्षां निकृष्ट जातीची व सकाम अशा कन्येचा अभिलाष करितो, तो अपराधी नाहीं. ह्मणून दंड्य ही नाहीं. परं निकृष्टजातीच्या सकाम कन्येचें हरण करणास दंड नाहीं; सकाम नसल्यास प्रथमसाहस दंड.

---

[1] २२ व्या प्रकरणीं ६ व्या शाखेचे ७ व्या अंकांत सामान्यतः कन्येचें हरण करणारा वधदंडास योग्य होतो असें सांगितलें आहे. तेथें ही आपल्यापेक्षां उत्कृष्ट जातीची कन्या समजावी.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

तु ती सकाम नसतां तिचें हरण करितो तर **प्रथमसाहस** दंडास योग्य होतो.

कन्येलाक्षतकरणास दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. कन्येला नखक्षतादिक करणाराचा हात तोडावा. उत्तमजातीय कन्येविषयीं तसें करितो तर वध करावा.

टीका.

१२ जो अनुलोमजातीची कन्या सकाम नसतां तिला बलात्कारानें नखक्षतादिकें करून दुखावतो त्याचा हात तोडावा. जर तिच्या योनींत बोटें घालून क्षत करून दुखावतो तर (खालीं सांगितलेल्या) मनुवचनांतील ६०० **पण** दंड करून बोटें कापावीं. कन्येला बलात्कारानें क्षतकरणाराचा हात तोडावा.

मनु. जो पुरुष कामावेशानें बलात्कार करून कन्येला (योनींत बोटें घालून) क्षत करितो त्याचीं बोटें (२) तोडावीं आणि ६०० **पण** दंड घ्यावा.

जो सकाम कन्येला वर सांगितल्या प्रमाणें दुखावतो त्याविषयीं विशेषही तोच सांगतो.

मनु. सकाम कन्येला (योनींत बोटें घालून) दुखावणाराचीं बोटें तोडूं नयेत. पुनः त्याचे हातून असें घडूं नये ह्मणून २०० **पण** दंडमात्र करावा. सकामकन्येलाक्षतकरणारा सदोन्नशेंपणदंड.

जर कन्याच कन्येला दुखावती किंवा जाणती स्त्री दुखावती तर त्याविषयींही विशेष

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

तोच सांगतो.

१३ कन्याच कन्येला (योनिक्षत) करील तर तिला २०० पण दंड करावा. तिच्या बापाला द्विगुण कन्याशुल्क देवावें. व तिला दाहा चापट्या माराव्या. आणि जर जाणती स्त्री (योनिक्षत) करिती तर तिचें तत्काळ मुंडन करावें. किंवा बोटें तोडावीं. अथवा गाढवावर बैसवावी.

१४ जर उत्कृष्टजातीची कन्या सकाम किंवा कामरहित असो, तिशीं निकृष्ट जातीचा पुरुष संग करितो तर त्याचा वध करावा. उत्कृष्टजातीच्याकन्येशीं संग करणाराचावध करावा.

मनु. उत्कृष्ट जातीच्या कन्येशीं जाणारा निकृष्ट जातीचा पुरुष वध-दंडास योग्य होतो.

१५ सजातीय सकाम कन्येशीं संग केला असतां कन्येच्या बापाला दोन गाई शुल्क द्यावें, परंतु जर बाप घेऊं इच्छितो तर. बाप घेत नसल्यास त्याच दोन गाई राजाला दंड रूपें करून द्याव्या. सजातीय व सकाम नव्हे अशा कन्येशीं संगकरणाराचातरवध चकरावा. सजातीयसकाम कन्येला क्षतकरणारानेंतिच्याबापाला दोन गाई द्याव्या. तीसकाम नसतां तिशीं संग करणाराचावध करावा.

मनु. सजातीय, सकाम, अशा कन्येशीं संग करणारानें तिच्या बापाला (दोन गाई) शुल्क द्यावें, परंतु तो घेऊं इच्छितो तर. जो सकाम नव्हे अशा सजातीय कन्येला बलात्कारानें दुखावतो तो त

---

१ येथें जाणत्या स्त्रीला तीन शिक्षा सांगितल्या त्या अपराध तारतम्यें करून सभस्त किंवा एकेक योजावी.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

स्कोळ व्रधदंडास योग्य होतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. कन्येच्या वास्तवीक दोषाचें उद्घाटन करणारास १०० पण दंड. मिथ्या दोष सांगणारास २०० **पण** दंड. पशूंशीं संग करणारासही १०० **पण** दंड. आणि हीनजाती स्त्री व गाय यांशी जाणाराला **मध्यमसाहस.**

टीका.

१६ जो एखाद्या कन्येला वास्तवीक **अपस्मार राजयक्ष्मा**दिक निंद्य महारोग व पुरुषसंगादि दोष प्रसिद्ध करून ही कन्या अयोग्य आहे. असें दूषण ठेवितो, त्याला १०० **पण** दंड करावा. अविद्यमान दोषाचें उद्घाटन करितो तर २०० **पण** दंड करावा. आणि गाई वांचून इतर पशूंशीं संग करणारापासून १०० (पण) दंड घ्यावा. तसेंच अंत्यजस्त्री सकाम असो किंवा अकाम असो तिशीं संग करणारास व गाईशीं संग करणारास **मध्यमसाहस** दंड करावा. कन्येला दूषण ठेवणारास व पशूंशीं संग करणारास दंड.

### शाखा ४

साधारणस्त्रीशीं संग करणास दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. **अवरुद्धा**, दासी, **भुजिष्या**, तशाच (वेश्या) या संग

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

योग्य असल्या तरी पुरुषास ५० **पण** दंड करावा*.

टीका.

१ **दासी**——१३ व्या प्रकरणीं सांगितलेले दासाचे प्रकार तेच दासीविषयीं समजावे. त्या दासी आपआपल्या जातीच्या किंवा आपल्यापेक्षां निकृष्ट जातीच्या होतात. साधारणस्त्रीचें स्वरूप. व त्यांशीं संग करणारास दंड

२ **अवरुद्धा**—— त्या दासीच धन्यानें आपल्या सेवेंत अंतर न पडावें ह्मणून त्यांस घरीच राहवें अशी आज्ञा करून परपुरुषाशीं उपभोगाची बंदी करून घरांत ठेवलेल्या त्या.

३ **भुजिष्या**—— जी एका पुरुषानें अंकित करून ठेवलेली ती.

४ जर दासीच **अवरुद्धा** किंवा **भुजिष्या** होतात, तर त्यांशीं संग करणारापासून, तसेंच पुरुषमात्रास संग करावयास योग्य अशा **स्वैरिणी** व वेश्या या स्त्रिया **भुजिष्या** होतात तर अशांशीं संग करणारापासून ५० **पण** दंड घ्यावा. कारण, त्या परपुरुषानें अंकित ठेवल्यामुळें परस्त्री समानच आहेत. दुसऱ्यानें ठेवलेल्या स्त्रीशीं संग करणारास ५० पण दंड.

नारद. ब्राह्मणी[१] अशी **स्वैरिणी**, वेश्या, दासी व जी **निष्कासिनी**, ह्या स्त्रिया स्वजातीच्या किंवा आपल्यापेक्षां निकृष्ट जातीच्या असल्यास संग करावयास योग्य होतात. आपल्यापेक्षां उत्कृष्टजातीच्या स्त्रि

---

१ ब्राह्मणी शब्दें करून क्षत्रियादिक व अनुलोम जातीचाही संग्रह करावा.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

यांशीं संग करूनये. परंतु ह्यांच[1] जर भुजिष्या आहेत तर यांशीं संग करणारास परस्त्रीशीं संग केलेल्याचा दोष लागतो. कारण, त्या संग करावयास योग्य असल्या तरी त्या दुसऱ्यानें अंकित करून ठेव ल्यामुळें परदार तुल्य आहेत.

५ शंका—— वर सांगितलेल्या **स्वैरिणी इत्यादिक** स्त्रिया सर्वसाधारण्यें करून संग करावया जोग्या, असें सांगणें सयु क्त नव्हे. कारण, जातिधर्मानें, किंवा शास्त्रप्रमाणानें, सर्वपुरुषांस संभोगाचें पात्र अशा स्त्रिया लोकांत उपलभ्यमान नाहींत. तो प्रका र असा.

याज्ञवल्क्य. **स्वैरिणी**—— जी नवऱ्याला सोडून स्वेच्छेनें परपुरुषा चा आश्रय करिती ती.

याज्ञवल्क्य. निकृष्टजातीनें आपल्यापेक्षां उत्कृष्ट जातीचें (किंवा समा नजातीचें) दास्य करावें, उत्कृष्टानें निकृष्टाचें दास्य करूंनये.

असें आहे ह्मणून **स्वैरिणी** दासी ह्या तर आपल्या जातीच्या (किंवा उत्कृष्ट जातीच्या) स्त्रिया होतात.

स्मृति. नवरा दुःशील, विषयी, किंवा गुणहीन, कसाही असो, पतिव्र ता स्त्रीनें तो देवाप्रमाणें पूज्य मानावा.

स्मृति. पति मेल्यानंतर अनिषिद्ध फुलें, मुळें, फळें, हीं भक्षण करून ति नें आपला देह अत्यंत क्षीण करावा. परपुरुषाचें नाव देखील घेऊंनये.

---

१ ह्यांच ह्मणजे स्वैरिणी, वेश्या, दासी आणि निष्कासिनी.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

असा निषेध सांगितला आहे ह्मणून त्या त्या वर्णाच्या (किंवा जातीच्या) स्त्रियांस पति जीवंत असतां किंवा मेल्यानंतर ही परपुरुषाशीं संभोग क्रियेचीउत्पत्ति होत नाहीं.

६ स्त्री, कन्यावस्थेंत ही सर्वपुरुषांच्या संभोगाचें पात्र होऊं शकत नाहीं. कारण, आई बाप वगैरे यांनीं संरक्षण केलेल्या कन्येचेंच दान करावें, असें सांगितलें आहे. दान करणारा नसला तरी तसल्या व कन्येचा स्वयंवर करावा, अशी शास्त्राज्ञा आहे.

७ दासी भावामुळें स्वधर्माधिकारभ्रष्ट होतो असेंही ह्मणतां येत नाहीं. कारण दास्य ह्मणजे पराधीनपणामात्र. स्वधर्माचा त्याग नव्हे.

८ वेश्याही सर्वपुरुषसाधारण्येंकरून संभोगाचें पात्र ह्मणतां येत नाहीं. कारण, ब्राह्मणादिवर्णाखेरीज व अनुलोमजातीखेरीज सर्वपुरुषांस संभोग करावयाजोगी असा निराळेजातीचा मुळींच असंभव आहे. ब्राह्मणादिवर्णांत किंवा अनुलोमजातींत अंतर्भाव ह्मणावा तर वरच्या दोहों स्मृतींत सांगितल्याप्रमाणें पतिपरायण झाल्यामुळें (स्वैरिणी अगर दासी असल्यास त्या त्या पुरुषाचे स्वाधीन असल्यामुळें) ती सकल पुरुषांचें संभोगपात्र होतनाहीं. प्रतिलोमजातीची ह्मणावी तर अगदींच अगम्य.

९ असें आहे ह्मणून कोणत्याही वर्णाच्या किंवा जातीच्या स्त्रीला नवऱ्या वांचून (स्वैरिणी असल्यास नियत पुरुषावांचून) परपुरुषाशीं संभोग निषिद्ध आहे. अतएव निषिद्धकर्माचरणानें त्या

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

**पतित** होतात. व **पतिता**चा संसर्ग तर अगदीं निषिद्ध आहे, ह्मणून सकल पुरुषांचें संभोगपात्र होत नाहींत.

१० समाधान— खरें, परंतु जसें परस्त्रीशीं संग केला असतां आई बाप नवरा वगैरे रक्षकांकडून मारण्याचें व राजदंडाचें दृष्ट भय आहे, तसें **स्वैरिणी** वेश्या यांच्या उपभोगाविषयीं नाहीं. ह्मणून त्या सकल संभोगयोग्य, असें सांगणें सुयुक्त आहे.

११ "**अवरुद्धा भुजिष्या इत्यादि** स्त्रिया पुरुषविशेषानें अंकित केल्यामुळें त्यांशीं संग करणारास ५० **पण** दंड" (४थ्या अंकांत) सांगितल्यावरून ज्या पुरुषविशेषाच्या अंकित नाहींत अशा **स्वैरिणी** वेश्या यांशीं संगकरणारास दंड नाहीं हें अर्थात् सिद्ध होतें.

१२ (पुरुषास दंड नाहीं तर नसो) **स्वैरिण्या**दि स्त्रियांसही दंड नाहीं. कारण, स्त्रियांस दंड करावा असें विधान नाहीं, व "उत्कृष्टजातीय पुरुषाशीं संग करणाऱ्या कन्येपासून कांहींच (दंड) घेऊं नये" असा दंडनिषेध सांगितला आहे.

स्वधर्मस्खलन निमित्त प्रायश्चित तर **स्वैरिणी** वेश्या यांस व त्यांशीं संगकरणारास समानच आहे.

१३ वेश्येचा **वर्णांत** किंवा **अनुलोम**जातींत अंतर्भाव. कारण, **प्रतिलोम**जात्यंतर नसतां मनुष्यजातीची आहे. जसे ब्राह्मणादिक, तशी. अशा **अनुमानप्रमाणें**करून वेश्येचा **वर्णां**त अंतर्भाव कोणी सांगितला आहे, परंतु अशा **अनुमानानें**

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

अंतर्भाव होत नाहीं. कारण, **कुंडगोलकादिकांवर**[1] **अनेकांतिक**दोष येतो. तो असा कीं, जशी वेश्या ही **प्रतिलोम**जात्यंतर न सतां मनुष्यजातीची, या हेतूवरुन तिचा **वर्णांत** किंवा **अनुलोम**जातींत अंतर्भाव होतो. तसा **कुंडगोलक** हे **प्रतिलोम**जात्यंतर नसतां मनुष्यजातीचे आहेत. या हेतूवरून त्यांचाही **वर्णांत** व **अनुलोम**जातींत अंतर्भाव होऊं लागेल. तो तर आचाराध्यायांत निषेधिला आहे. यास्तव वेश्या ही कोणी एक निराळी अनादिसिद्ध जाति आहे.

वेश्या——जी वेश्येचे ठायीं आपल्यापेक्षां उत्कृष्टजातीच्या सजातीच्या पुरुषापासून उत्पन्न झालेली, व पुरुषसंभोगच जिची उपजीविका ती. **ब्राह्मणी इत्यादिका** प्रमाणें लोकप्रसिद्धीवरून जाणावी. आणि लोकप्रसिद्धि निर्मूलही नाहीं. कारण, स्कंदपुराणांत सांगितलें आहे कीं "पंचचूडा नामें कोणी अप्सरा होत्या. त्यांची संतति ही वेश्यासंज्ञक पांचवीजात[2]" यास्तव त्या वेश्यांस नियतपुरुषांशीं विवाहसंस्काराचा मुळींच अभाव आहे, म्हणून त्यांनीं समान किंवा उत्कृष्टजातीच्या पुरुषाशीं संग केला असतां त्या स्त्रियांस पाप नाहीं व राजदंडही नाहीं. परंतु अशा स्त्रियांशीं संग करणारास जरी राजदंड नाहीं तथापि पातक आहेच." कारण,

---

सुबोधिनी. १ कुंड व गोलक यांचा कोणत्याही वर्णांत किंवा जातींत अंतर्भाव नाहीं असें आचाराध्यायांत सांगितलें आहे.

---

२ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अशा चारजाती आणि ही पांचवी.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं

सर्वकाळ स्वस्त्रीशींच रत असावें" असा नियम सांगितला आहे. दुसरें असें कीं "पशू व वेश्या यांशीं संग केला असतां प्राजापत्य करावें" असें प्रायश्चित्त ही सांगितलें आहे. या प्रमाणें सर्व निर्दोष जाणावें.

## शाखा ५

(४थ्या शाखेच्या ४ अंकांत) अवरुद्धा स्वैरिणी इत्यादिक स्त्रियांच्या संगाविषयीं दंड सांगितल्यावरून स्वतंत्र स्त्रियाविषयीं राजदंड नाहीं हें अर्थात् सिद्ध झालेलें सांगितलें त्याचें बाधक सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. बळात्कारानें दासीशीं संग करणारास १० पण दंड. व बहुत मिळून एकीशीं बळात्कारानें संग करितात, तर प्रत्येकास २४ पण दंड सांगितला आहे.

टीका.

१ पुरुषसंभोगें करून उपजीविका करणाऱ्या दासी स्वैरिणी इत्यादिकांशीं जो मोल न देतां बळात्कारानें संभोग करितो त्याला १० पण दंड करावा. मोल न देतां बळात्कारानें संग करणारास १० पण दंड.

२ जर बहुत मिळून एकीशीं व तिची इच्छा नसतां बळात्कारानें संभोग करितात तर प्रत्येकास २४ पण दंड बहुत मिळून बळात्कारानें संग करणारास २४ पण दंड.

# प्रकरण २३
## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

करावा.

जर तिच्या इच्छेप्रमाणें मोल दिल्हें, नंतर ती संभोग करूं
देतनाहीं ह्मणून बलात्कारानें संभोग करितात तर त्यांजकडे दो
ष नाहीं. परंतु जर तिला कांहीं व्याधि वगैरे उपद्रव नसेल तर.

नारद. व्याधित, श्रमलेली, व्यग्रचित्त, राजकार्याविषयीं तत्पर, अ
शी दासी बोलाविली असतां येणार नाहीं तर तिला दंड करूंनये.

व्याधितअसल्यामुळें संभोगार्थनआल्यासदंडनाहीं

मूळ.

याज्ञवल्क्य. द्रव्य घेऊन वेश्या संग करूं इच्छित नाहीं, तर दुपट
परत देवावें. करारमात्र झाला असल्यास करार केलेलें परत देवा
वें. पुरुषाविषयींही असेंच.

टीका.

१ जर वेश्या मोल घेऊन निरोगी असतांही त्याशीं सं
भोग करूं इच्छित नाहीं, तर घेतलेल्या मोलाचें दुपट द्रव्य त्याला द्या
वें. तसेंच द्रव्य दिल्हें नाहीं परंतु करार झाला आणि संग करूं इच्छि
त नाहीं, तर तिजकडून करार केलेलें परत देवावें. करार करून हा
तिशीं जात नाहीं, तर याजकडून करार केलेलें देवावें. यानें मोल
दिलें आणि संग करावयास इच्छित नाहीं तर मोल परत मिळणा
र नाहीं.

मोलघेऊनसंगकरूंइच्छितनाहींतरतिलादुपटदंड

नारद. पण्यांगना द्रव्य घेऊन त्याशीं संग करूं इच्छित नाहीं, त
र तिनें दुपट परत द्यावें. मोल दिल्यावर पुरुषच तिशीं संग क
रूं इच्छित नाहीं तर दिलेलें मोल त्याला परत मिळणार नाहीं.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

तसेंच अणखीही विशेष तोच सांगतो.

नारद. वेश्येशीं संभोग करून मोल देत नाहीं, किंवा ती इच्छित नसतां ताडन दंत नखक्षतादिक करून बळेंच कोंडाळून धरून संग करितो तर, अथवा जो योनीवांचून इतर इंद्रियांत (मुखांत वगैरे) रतिसुख करितो, तसाच बहुतांकडून संभोग करवितो, तर त्याप्रत्येकाकडून दिलेल्या मोलाच्या आठपट द्रव्य तिला देवावें, व तितकाच राजदंड घ्यावा. आणि त्या वेश्यांच्या घरांत **व्यवहार** उपस्थित झाला असतां त्या वेश्यांच्या घरांत ज्या मुख्य स्त्रिया (नायिकिणी) असतील त्यांच्या विचारें निर्णय करावा.

संभोग करून मोल देत नाहीं किंवा बहुतांकडून संभोग करवितो तर आठपट दंड.

### मूळ.

याज्ञवल्क्य. जो स्त्रीशीं योनिभिन्न इंद्रियांत संग करितो, किंवा पुरुषासन्मुख लघुशंका करितो, तसाच जो **प्रव्रजिता** स्त्रीशीं संग करितो त्या प्रत्येकास २४ **पण** दंड.

### टीका.

४ जो स्त्रीच्या मुखाचे ठायीं रतिसुख अनुभवितो, किंवा पुरुषाच्या संमुख लघुशंका करितो, तसाच **प्रव्रजिता**[1] स्त्री

---

सुबोधिनी १ ३ऱ्या शाखेच्या ४ थ्या अंकांतील नारदवचनांत "राजपत्नी, प्रव्रजिता, उपमाता असा उपक्रम करून यांतून कोणत्याही स्त्रीजवळ जाणारा गुरुतल्पग म्हटला जातो. त्या गुरुतल्पगाचें शिश्न कापावें, याखेरीज दुसरा दंड नाहीं" असें सांगितलें आणि येथें (याज्ञवल्क्यस्मृतींत) तर प्रव्रजितास्त्रीगमनाविषयीं २४ पण दंड सांगितल्यामुळें स्मृतींचा परस्पर विरोध दिसतो. त्याचा परिहार असा, अत्यंत सदाचारसंपन्न प्रव्रजितास्त्रीगमनाविषयीं व तिचे ठायीं वारंवार गमन केलें असल्यास त्याविषयीं नारदवचन. एतद्विपरीतविषयीं याज्ञवल्क्य वचन समजावें.

# प्रकरण २३

## स्त्रीसंग्रहणाविषयीं.

ज्यांशीं संग करितो त्या प्रत्येकास २४ **पण** दंड करावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. चांडालीशीं संग करणारास **भगाकार** डागून निर्वासन करावें शूद्र जर चांडालीशीं जातो तर चंडालच होतो. आणि अंत्यजानें आर्यस्त्रीशीं संग केला तर वध करावा.

टीका.

६ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यानीं चांडाली संग केला असतां, जर प्रायश्चित्त नघेतात तर, "अंत्यज स्त्रीशीं संगकरणारास १००० **पण** दंडकरून (कपाळीं) **भगाकार** डागून आपल्या राष्ट्रांतून त्यास घालवून द्यावें. चांडालीशीं संग करणारा सहजारपण दंड.

परंतु प्रायश्चित्त घेण्यास सिद्ध आहेत तर नुसता (धन) दंडच मात्र करावा.

शूद्र जर चांडालीशीं जातो तर तोही चांडालच होतो. चांडालादिक जर उत्कृष्ट जातीच्या स्त्रीशीं जातो तर त्याचा वधच करावा. चंडालउत्तमस्त्रीशीं जातोतर वध दंडच.

# प्रकरण २४

## स्त्रीपुंधर्म

### शाखा १

**व्यवहार** प्रकरणामध्यें **स्त्रीपुंध र्म** संज्ञक अणखी एक **व्यवहार** मनुनारदानीं सांगितला आहे.

नारद. १ जेथें स्त्रियांचा व पुरुषांचा विवाहादि विधि सांगितला जातो तत्संबंधी जो **व्यवहार** त्याला स्त्रीपुरुषांसंबंधी **व्यवहार** ह्मटला आहे. स्त्रीपुरुषांचा व्यवहार.

मनु. पुरुषांनीं स्त्रिया अहोरात्र आपल्या आज्ञेंत ठेवाव्या. स्वतंत्र ठेवूंनयेत. आणि गृहकृत्याविषयीं तत्पर राहतील व आपल्यास अनुकूळ अशा ठेवाव्या.

२ **इत्यादिक** सांगितलीं आहेत. जरीं स्त्रीपुरुषांनीं परस्पर वादिप्रतिवादी होऊन **राजा**च्या समोर **व्यवहार** करणें निषेधिलें आहे. तथापि स्त्रीपुरुषांचा परस्पर व्यभिचार प्रत्यक्ष समजल्यावरून किंवा कर्णोपकर्णीं ऐकिल्यावरून **राजा**नें दंडादिकें करून तीं स्त्रीपुरुषें आपापल्या धर्ममार्गांत राहीत असें करावें. असें नकेल्यास **राजा** दोषी होतो यास्तव या **व्यवहार** प्रकरणीं राजधर्मांतस्त्रीपुरुषांचे धर्माचा उपदेश सांगितला. परंतु हा (स्त्रीपुंधर्म) विवाहप्रकरणीं सविस्तर सांगितला ह्मणून याज्ञवल्क्यानें येथें पुनः सांगितला नाहीं. स्त्रीपुरुषें आपापल्यामार्गीं राजानें स्थापावीं.

# प्रकरण २४

## प्रकीर्णक

### शाखा २

आतां **प्रकीर्णक** या नावानें **व्यवहार**
प्रकरण सांगतो, त्याचें स्वरूप नारद सांगतो.

नारद. १ या **प्रकीर्णकव्यवहारीं** जें राजाज्ञेचें उल्लंघन, राजाज्ञे प्रमाणें वर्तणें, व केलेल्या कर्मास प्रत्युपकार करणें, किंवा किल्ले, सेनेची छावणी **इत्यादि** रूप जी नगरें त्यांच्या संरक्षणार्थ खर्च देणें, प्रजाचें संमेलन, **पाखंडी, निगमवादी, श्रेणी**, इत्यादिकांचा धर्मविपर्यास, पितापुत्रांचा विवाद, प्रायश्चित्ताचा विपर्यास, प्रतिग्रहाचा लोप, ब्रह्मचारी **इत्यादिक आश्रम** संपन्नाचा धर्मभ्रंश, तसाच वर्णसंकर दोष, आणि त्या त्या ब्राह्मणादि **वर्णा**च्या वृत्ती, व नियम आणि जें पूर्वी (ऋणादानादि प्रकरणीं) सांगितलें नाहीं तें या सर्व विवादांचा केवळ **राजा**नेंच निर्णय करावा. प्रकीर्णकसंज्ञकव्यवहाराचें स्वरूप.

या प्रमाणें ज्या **व्यवहारां**चा केवळ **राजा**नेंच निर्णय केला पाहिजे असे जे **व्यवहार** ते या प्रकरणांत आहेत ह्मणून हें **प्रकीर्णक** असें अर्थात् सिद्ध झालें.

त्या **प्रकीर्णकां**त अपराध विशेषें करून
दंडही निरनिराळे सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. जो **राजशासनां**त न्यूनाधिक लिहितो, व जो परदार

# प्रकरण २५

## प्रकीर्णक.

रत किंवा चोर यांस सोडून देतो, त्याला **उत्तमसाहस** दंड.

टीका.

२ जो **राजानें** दिलेलें जें स्थावर किंवा **निबंध** त्याच्या परिमाणांत कमी जास्ती करून त्या अन्वयें **राजशासनां**त लिहितो, आणि जो परस्त्री लंपटाला व चोराला धरून **राजा**कडे न पाठवितां सोडून देतो, त्या प्रत्येकास **उत्तमसाहस** दंड करावा. सरकारीपत्रकांत कमजास्तीकरणास उत्तमसाहस दंड.

खुद्द राजानें निर्णय करावयाजोगे जे **व्यव वहार** त्याच्या प्रसंगानें दुसरेही व्यवहारविषय सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. अभक्ष्य पदार्थानें **द्विजाला पतित** करणारास **उत्तम साहस** दंड. क्षत्रियाला दूषित करणारास **मध्यमसाहस**. वैश्याविषयीं **प्रथमसाहस**. आणि शूद्राविषयीं प्रथमाचें निमे दंड करावा.

टीका.

३ भक्षणास अयोग्य जें मूत्रपुरीषादिक तें अन्नांत अथवा पाण्यांत मिळवून किंवा स्वरूपें करून ब्राह्मणाकडून खावविते, त्याला **उत्तमसाहस** दंड करावा. याप्रमाणें क्षत्रियास खाववितो तर **मध्यमसाहस** दंड करावा. तसेंच वैश्याला खाववितो तर **प्रथमसाहस** दंड करावा. आणि शूद्राकडून खावविणारास त्याच्या (प्रथमसाहसाच्या) निमे दंड करावा. लसूण वगैरे अभक्ष्य पदार्थ ब्राह्मणादिकांकडून अभक्ष्य खावविणारास दंड.

# प्रकरण २८

## प्रकीर्णक.

खावविल्यास दोषतारतम्येंकरून[1] दंड योजावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. खोट्या सोन्यानें व्यवहारकरणारा, व निंद्यमांस विकणारा, या प्रत्येकास अंगहीनकरून **उत्तमसाहस** दंड करावा.

टीका.

४ निरस सोन्याला पारदसंयोगादिकेंकरून रंग आणून तें सरस सोन्यासारिखेंकरून तेणेंकरून व्यवहारकरणारा जो सोनार वगैरे, व जो कुतरें वगैरेचें कुत्सित मांस विकणारा खाटिक वगैरे, तसेंच जो खोटेंरूपें वगैरे धातूनें व्यवहार करितो, त्या प्रत्येकाचीं नाक, कान, हात, अशीं तीन अंगें तोडावीं. आणि **उत्तमसाहस** दंड करावा.

सोनें वगैरेंत लबाडी करणारा व कुत्सित मांस वगैरें विकणारयास दंड.

मनु सर्वांसि कंटकरूपी, पापिष्ट, असा सोनार जर अन्याय कर्माविषयीं प्रवृत्त होतो तर त्याचे सुरीनें तुकडे तुकडे करावे.

असें जें मनुवचन आहे तें देवब्राह्मण **राजा** यांच्या सुवर्णाविषयीं जाणावें.

कांहीं एक अपराधाविषयीं दंड नाहीं असें सांगतो

मूळ.

याज्ञवल्क्य. **चतुष्पदा**कडून घडलेला अन्याय धन्याकडे नाहीं.

---

१ तारतम्य ह्मणजे असें, लसूण वगैरे अभक्ष्य पदार्थ भक्षणीं जेंजें प्रायश्चित्त सांगितलें आहे त्यावरून दोषबाहुल्य जाणून ब्राह्मणादिवर्ण व सगुण निर्गुण त्वादि तारतम्यानें दंड योजावा.

# प्रकरण २४

## प्रकीर्णक.

परंतु एकीकडे सरा असें मोठ्यानें बोलत आहे तर. तसाच काठी सो टा तीर धोंडा बाहु जुंपलेलें जनावर यांकडून घडलेला ही. फेंक णाराकडे नाहीं.

टीका.

५ गाय, हत्ती, घोडा, **इत्यादिक चतुष्पदा**कडून घडलेला जो मनुष्य मारण वगैरे दोष, तो त्या गाई हत्ती वगैरेंच्या धन्याकडे नाहीं. परंतु धनी जर "एकीकडे सरा असें" मोठ्यानें ओरडून सांगत आहे तर. तसेंच सोटा, (शक्ति, **तोमर**) तीर, धोंडा. फेकण्यानें व बाहूनें, व वाहनाला जुंपलेल्या अश्वादिकांकडून. घडलेला जो मनुष्य मारणादिक दोष, तोही लांकुड वगैरे फेंकणा राकडे (व अश्वादिक हांकणाराकडे) नाहीं. परंतु एकीकडे सरा असें ओरडून सांगत आहे तर.

पशूंकडून खून वगैरे झाल्यास धन्याला दंड नाहीं.

लांकूड वगैरे फेंकण्यानें मनुष्यादि हिंसा घडली असतां फें कणाराकडे दोष नाहीं. असें सांगणें दंड न होण्यासाठीं. अबुद्धि पूर्वक हिंसादि घडली एतन्निमित्त प्रायश्चित्त तर आहेच.

मूळ.

याज्ञवल्क्य. जुंपलेल्या जनावराची वेसण तुटल्यामुळें. तसेंच जूं वगैरे मोडल्यामुळें, व वाहन पाठीमागें सरल्यामुळें, हिंसा घडली असतां धनी अपराधी होत नाहीं.

टीका

६ वाहनास जुंपलेल्या **चतुष्पदा**ची वेसण (किंवा लगाम) तुटल्यामुळें, तसेंच जूं, आंख, चाक, मोडल्यामुळें, व

वाहनास जुंपलेल्या पशूंकडून अपराध घडल्यास धन्याला दंड नाहीं.

# प्रकरण २४

# प्रकीर्णक.

धनी पाठीमागें किंवा एकीकडे किंवा समोर होत असतां, जर मनुष्यादि हिंसा घडली तर धन्याकडे किंवा सारथ्याकडे दोष नाहीं. कारण, ती हिंसा बुध्या त्यांनीं केलेली नव्हे.

मनु. वेसण तुटल्यामुळें, जूं मोडल्यामुळें, वाहन तिर्कस किंवा समोर गेल्यामुळें, तसेंच आंस किंवा चाक मोडल्यामुळें व जुंपलेल्या **चतुष्पदा**च्या मानेवरचें आडवें लांकूड मोडल्यामुळें, कासरा (किंवा लगाम) तुटल्यामुळें आणि पैसव्हा असें ओरडून सांगत असतांही मनुष्यादि हिंसा घडली तर (धन्याला किंवा सारथ्याला) दंड नाहीं. असें मनु सांगता झाला.

हयगय केली असतां धन्याला दंड सांगतो.

## मूळ.

याज्ञवल्क्य. जो धनी समर्थ असतांही दाढांचे जनावरापासून व शृंगीपासून सोडवीत नाहीं तर **प्रथमसाहस** दंड घ्यावा. ओरडत असतांही सोडवीत नाहीं तर दुपट घ्यावा.

## टीका.

१ गैरमाहीत हांकणारानें हांकलेलीं दाढांचीं जनावरें (हत्ती वगैरे) शिंगांचीं जनावरें बैल वगैरे, यांकडून घात पावणाऱ्या मनुष्यादिकांस धनी त्या घातापासून मुक्त करावयास समर्थ असतांही उपेक्षा करितो तर गैरमाहीत सारथ्याला त्या कामावर योजिलें यास्तव धन्याला **प्रथमसाहस** दंड करावा. हयगय केल्यामुळें हिंसा वगैरे घडल्यास धन्याला दंड

जर अरे मेलों, मारलें, धावा, असें ओरडत असतांही सोडवीत नाहीं तर (प्रथमसाहसाच्या) दुपट दंड घ्यावा.

# प्रकरण २४

# प्रकीर्णक.

जर माहीतगार सारथ्याच्या हातून वर सांगितल्याप्रमाणें घडेल तर सारथ्यालाच दंड करावा धन्याला नाहीं.

मनु. जर सारथी त्या कामांत प्रवीण आहे, (आणि त्याच्या हांकण्यानें मनुष्यादिकांस पीडा होईल) तर सारथीच दंडास योग्य होतो.

प्राणि विशेषें करून दंड कल्पना मनु सांगतो.

मनु. ८ मनुष्यहिंसा घडली असतां हिंसक चोरा प्रमाणें दोषी[1] ठरतो. गाय, हत्ती, उंट, घोडे, **इत्यादि** महापशूंची हिंसा घडली असतां अर्धा[2] दंड करावा. क्षुद्रपशूंची हिंसा घडली असता २०० (पण) दंड करावा. पवित्र असे मृग (हरण वगैरे) पक्षी (राघूमोर वगैरे) यांची हिंसा घडली असतां ५० (पण) दंड करावा. गाढव शेळी मेंढी यांच्या हिंसेनिमित्त ५ **माष** दंड करावा. आणि कुतरें डुकर यांच्या हिंसेनिमित्त १ **माष** दंड करावा.

## मूळ.

याज्ञवल्क्य. जाराला, चोर असें बोलणारास ५०० **पण** दंड. आणि त्यापासून लांच घेऊन सोडून देणारापासून तो आठपट घ्यावा.

## टीका.

१ आपल्या कुळाला बट्टा न लागावा ह्मणून जारालाच

जारपुरुषास चोर असें बोलणारास ५०० पणदंड.

---

१ दोषी ह्मणजे उत्तम साहस दंडाचें पात्र.

---

२ अर्धा ह्मणजे मध्यम साहस.

# प्रकरण २४

# प्रकीर्णक.

चोर चोर असा हाकाटा करणारास ५०० पण दंड करावा. आणि जो जारापासून लांच घेऊन सोडून देतो तर त्याणें जितका लांच घेत ला असेल त्याच्या आठपट दंड घ्यावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. वारंवार राजाचें अनिष्ट बोलणारा, व त्याचीच निंदा करणारा, व त्याची मसलत उघाडीस आणणारा या प्रत्येकाची जी भ कापून मुलूख पार करावें.

टीका.

१० राजास अभिमत नव्हे, अशी त्याच्या शत्रूची स्तुति वा रंवार करणाराची, व राजाची निंदा करणाराची, आणि आपल्या राजाची स्वराष्ट्र वाढविण्याविषयीं, व परराष्ट्रपक्षाचा क्षय करण्या विषयीं जी मसलत ती शत्रूंस कळविणाराची, जीभ कापून राष्ट्रांतून हांकून द्यावें. राजाची निंदा व अनिष्ट करणारास जीभ कापून हद्दपार करावें.

११ जो सरकारचा जानदारखाना चोरितो त्याचा वधच करावा. सरकारच्या खजीना चोरणारास वध दंड.

मनु. राजाचें भांडार हरण करणारे, व त्याच्या अनिष्टाविषयीं प्र वृत्त, व शत्रूंशीं फितूर करणारे, अशा पुरुषांस (सर्वस्वहरण, अंग छेद, वध इत्यादिक) विविध दंडांनीं घात करावा.

१२ सर्वस्व हरण केलें तरी जें ज्याचें उपजीविकेचें साधन अ सेल तें हरण करूं नये. परंतु चोरी करण्याच्या साधना खेरीज. सर्वस्व हरण केलें तरी उपजीविकेच्या साधनाचें हरण करूं नये.

नारद. शिपायांची शस्त्रें, पाठाळ, चित्र वगैरे वरउपजीविका करणाराचें तें तें साधन. तसेंच वेश्यांचे अलंकार, वाद्यें वाजविणारांची वाद्यें, तसें

# प्रकरण २४

## प्रकीर्णक.

व अणखींही जें ज्याचें उपजीविकेचें साधन असेल तें, व जेणेंकरून शिल्पी उपजीवन करितात तें, जरी राजानें सर्वस्व हरण केलें तरी हें (वरसांगितलेलें) हरण करूंनये.

१३ " शारीर दंड ब्राह्मणास नाहीं " असा निषेध सांगितल्यावरून ब्राह्मणास नर वधाबद्दल त्याचें मुंडन करावें (धिंड काढावी)

मनु. ब्राह्मणाचें मुंडन करावें हाच त्याचावध तसेंच गांवांतून हांकून देणें, कपाळीं डाग देणें, आणि गाढवावर बसवून फिरविणें.

मूळ.

याज्ञवल्क्य. प्रेताच्या अंगावरचें विकणारा, गुरूला ताडन करणारा तसाच राजाच्या वाहनासनावर बसणारा, या प्रत्येकास उत्तमसाहस दंड करावा.

टीका

१४ प्रेतावरचें वस्त्रपुष्पादिक विकणारा, व बाप आचार्य यांस ताडन करणारा, तसेंच राजाज्ञेवाचून राजाच्या हत्ती घोडा वगैरे वाहनावर व सिंहासनादिकांवर बसणारा यांस उत्तमसाहस दंड करावा.

मूळ.

याज्ञवल्क्य. जो दोन्हीं डोळे फोडितो, व जो राजाच्या अनिष्टाचें भविष्य सांगतो आणिजो ब्राह्मण वृत्तीनें उपजीवन करणारा शूद्र यांप्रत्येकांस ८०० पण दंड करावा.

# प्रकरण २४

# प्रकीर्णक.

टीका.

१५ जो क्रोधादिकांच्या आवेशानें दुसऱ्याचे दोन्ही डोळे फोडितो, व इष्ट सांगणारे व ज्योतिःशास्त्रज्ञ असे गुरु **आचार्य** यां शिवाय जो **राजाचें** अनिष्ट "ह्मणजे अमुक वर्षांत तूं राज्यापासून भ्रष्ट होशील असा" आदेश करितो, तसाच जो शूद्र भोजनार्थ यज्ञोपवीतादिक ब्राह्मणचिन्हें दाखवितो, त्या प्रत्येकास ८०० **पण** दंड करावा.

दुसऱ्याचे डोळे फोडणारास व राजाचें अनिष्ट भविष्य सांगणारास आठशें पण दंड.

१६ श्राद्धभोजनासाठीं ब्राह्मण वेष घेणाऱ्या शूद्राचे अंगावर तप्तशलाकेनें यज्ञोपवीताकार डागावें; असें स्मृत्यंतरीं सांगितलेलें पाहावें. उपजीविकार्थ ब्राह्मणवेषधारण करणाऱ्या शूद्राचा तर वधच करावा. कारण "**द्विज**चिन्हें धारण करणारे अशा शूद्रांचा तर घातच करावा." अशी स्मृति आहे.

ब्राह्मणाचा वेष घेणाऱ्या शूद्राचा वध करावा.

## शाखा ३

**सभासदांनीं** अनुराग, लोभ, **इत्यादिकें** करून निर्णय विपरीत केला असतां दंड सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. दुर्लक्ष्यानें निर्णीत केलेले वाद **राजानें** स्वतां पाहून ज्यानें वाद जिंकला आहे त्यासुद्धां **सभासदांस** वादपराजयनिमित्त दंडाच्या दुपट दंड करावा.

# प्रकरण २४

# प्रकीर्णक.

टीका.

१ शास्त्रप्रतिपादित व आचारप्राप्त जो धर्म त्याचें उल्लंघन करून पुरी चौकशी न करितां प्रीतीनें, लोभानें, किंवा भयानें **सभासदां**नीं विपरीत निर्णय केलेल्या **व्यवहारा**ची **राजा**नें स्वतां चौकशी करून जर त्या **सभासदां**वर खचित दोष लागू होतो तर ज्याच्या तर्फेनें निर्णय केला असेल त्यासुद्धां प्रत्येक **सभासदा**पासून त्या वादांत पराजितास जो दंड केला असेल त्याच्या दुपट दंड घ्यावा. — विपरीतव्यवहारपाहणारांस दंड.

विपरीत **व्यवहार** निर्णय केला असतां **सभासदां**स दुपट दंड १ ल्या प्रकरणांतील ३ऱ्या शाखेच्या ४ थ्या अंकांत सांगितला असतां पुनः येथें सांगितल्यानें **पुनरुक्त**दोष येतो, असें समजूं नये. कारण, तेथें केवळ **सभासदां**सच दुपट दंड सांगितला आहे. आणि येथें तर ज्याच्या तर्फेनें निर्णय केला असेल त्यासही **सभासदां**बरोबर दुपट दंड करावा इतका विशेष.

२ जर साक्षींच्या दोषानें विपरीत **व्यवहार** निर्णय झाला तर त्या साक्षींसच (दुपट) दंड करावा. वाद जिंकणारास व **सभासदां**स करूं नये. — साक्षीच्या दोषामुळें विपरीत चौकशी झाल्यास साक्षीस दंड.

जो **सभासदां**नीं विपरीत **व्यवहार** निर्णय केला तो **राजा**च्या अनुमतानें झाला तर **राजा**नें आपल्यासुद्धां **सभासदा**दिकांस दंड करावा. — राजाच्या अनुमतानेंही चौकशी झालेली बराबर नाहीं तर राजादिकांस दंड.

स्मृति — खोटी चौकशी केल्या निमित्त जो दोष त्याचा एक चतुर्थांश वाद जिंकणाराकडे जातो. व दुसऱ्या चतुर्थांशाचे विभागी साक्षी होतात.

# प्रकरण २४

## प्रकीर्णक.

तिसऱ्या अंशाचे विभागी **सभासद**. चौथा चतुर्थांश **राजा**कडे जातो.

३ ही वर सांगितलेली स्मृति राजादिक प्रत्येक निरनिराळे दोषी होतात इतकेंच सुचविते. केवळ पापाच्या एकेक विभागाचे अधिकारी होतात असें नाहीं[1].

शास्त्रप्रतिपादित जीं **ऐहिक** (धर्मशास्त्रोक्त राजदंडादिक) **पारलौकिक** (नरकपातकादिक) फलें तीं करणारा भोगितो. कारण, करणारापासून तें फलोपभोगाचें साधन (अन्यायादिक) घडतें ह्मणूनच "प्रत्येक **सभासदां**स विवादपराजयनिमित्त दंडाचे दुपट दंड करावा." असें सांगितल्यावरून प्रतिपुरुषास त्याच्या कर्माच्या संपूर्ण फलाचा संबंध आहे.

यथान्यायेंकरून निर्णीत केलेला व्यवहार
फिरविणारास दंड सांगतो.

मूळ

याज्ञवल्क्य. यथान्याय पराजित झाला असतांही, मी अजित आहें, असें मानून जो पुनः वाद सांगायास येतो त्याला पुनः जिंकून दुपट दंड घ्यावा.

---

सुबोधिनी १ कारण, एका दोषांतच जर सर्व मिळून विभागी होतील तर प्रत्येकास दुपट दंड सांगितला आहे तो संभवणार नाहीं. एका दुपटदंडांतच सर्व विभागी होऊं लागतील.

# प्रकरण २८

## प्रकीर्णक.

टीका.

४ जो यथान्याय निर्णय होऊन पराजय पावला असतांही माझी चौकशी नीट झाली नाहीं, असें दांडगेपणानें समजून खोटेका गद वगैरे साधनांनीं आपला दावा शाबीत करण्यासाठीं न्यायाधीशा कडे येतो, आणि न्यायाधीशाही यथान्याय त्याचा पुनः पराजय क रितो, तर त्यापासून दुपट दंड घ्यावा.

यथान्यायनिर्णीतकेलेल्याव्य वहाराबद्दल पुनःफिर्यादकरणा रास दुपट दंड.

नारद. विवादाचा साक्षिलेख्यादि साधनांकडून निर्णयकरून व त्यांत पराजितास दंड केला असतां यथान्याय निर्णय झाला नाहीं असें जो मानितो त्याचा विवाद पुनः घेऊन त्यापासून दुपट दंड घ्यावा.

मनु. साक्षिलेख्यादि यथायोग्य साधनें घेऊन निर्णय केला, व त्या **व्यवहारां**त पराजितास दंडही केला, असें असतां ज्या वादां त कांहीं संशय राहिला नाहीं तो यथान्याय निर्णीत झाला असें समजावें. चतुर पुरुषानें तो फिरवूं नये.

असें जें मनुवचन आहे तें वादिप्रतिवादींतून एखाद्याच्या बो लण्यावरून हा **व्यवहार** निर्णय अधर्मेकडून झाला असा सं शय उत्पन्न झाल्यास पुनः "मी यावादांत पराजित झालों तर दुपट दंड देईन" अशी प्रतिज्ञा करून **व्यवहार** चालू करावा, एतदर्थ सांगितलें. केवळ हा **व्यवहार** निर्णय यथान्याय झा ला असा निश्चय असतां ही **राजा**नें लोभामुळें पुनः तो च **व्यवहार** चालू करावा एतदर्थ नव्हे.

# प्रकरण २४

## प्रकीर्णक.

विपरीतनिर्णय झालेला पुनः सुरथीत करण्याचा प्रकार.

५ अन्य राजानेंही जें कार्य न्यायविरुद्ध झालें ह्मणून फिरविलें असेल तेंही नीट चौकशी करून धर्ममार्गानेंराही असें करावें.

स्मृति. जें दुसऱ्या राजानें जाणून न्यायविरुद्ध केलें असेल तें पुनः न्यायमार्गांत स्थापावें.

अन्यायानें घेतलेल्या दंडाचे द्रव्याचा विनियोग सांगतो.

मूळ.

याज्ञवल्क्य. राजानें अन्यायानें जो दंड घेतला असेल तो स्वतांचे द्रव्यानें तीसपट करून वरुणाला समर्पण करून ब्राह्मणास धर्म करावा.

टीका.

अन्यायानें घेतलेल्या धनदंडांत तीसपट भर घालून धर्म करावा.

६ राजानें अन्यायमार्गानें ह्मणजे लोभादिकेंकरून जो धनदंड घेतला असेल तो आपल्या पदरच्या द्रव्यानें तीसपट करून "हें वरुणाकारणें असो" असा संकल्प करून ब्राह्मणास द्यावें. आणि ज्यापासून अन्यायानें जितकें धन दंडरूपें करून द्रव्य घेतलें असेल तितकें त्याचें परत द्यावें. नाहीं तर अपहारदोषाचा अधिकारी होतो. आणि अन्यायानें घेतलेल्या द्रव्यावर स्वामीचें स्वत्व जाऊन राजाचें स्वत्व उत्पन्न होत नाहीं.

समाप्त

# मयूखदायभाग

## सत्तेविषयीं

### शाखा १

आतां दायभागाचे निर्णयास
उपयोगी जी सत्ता तिचें निरूपण
करितो.

१ सत्ता म्हणजे **क्रय प्रतिग्रह इत्यादिक** जे उपाय[1], त्यां पासून झालेला शक्तिविशेष. सत्तेचें स्वरूप.

**क्रय प्रतिग्रह इत्यादिक**, हे सत्ता उत्पन्न होण्याचे उपाय, हे तर लोकव्यवहारावरून अवगत होतें, शास्त्रव्यवहारावरून अवगत होत नाहीं कारण ज्यांस शास्त्रव्यवहार अगदीं माहीत नाहीं त्या लोकांतही **क्रयविक्रय इत्यादिक** व्यवहार पाहण्यांत येतो, आणि शास्त्रव्यवहार मानिला असतां गौरव ही येतें. नयविवेक ग्रंथांत भवनाथही असेंच सांगतो.

गौतम. **रिक्थ, क्रय, संविभाग, परिग्रह, अधिगम**, इतक्या निमित्तांनीं मालक होतो. ब्राह्मणास **प्रतिग्रहानें** मिळालें तें विशेष. क्षत्रियास जिंकलेलें, वैश्यास उद्यमानें मिळालेलें, शूद्रास (द्विजांच्या) सेवेनें मिळालेलें. सत्ताउत्पन्नहोण्याचे उपाय.

असें जें वचन, तें लोकव्यवहारसिद्ध जे सत्तेचे उपाय त्यांचे **अनुवादक**.

२ जें द्रव्य मालकाची सत्ता नष्ट झाल्यानेंच मात्र आपल्या सत्तेंत येतें, त्यावर **रिक्थ** शब्दाचा प्रयोग (व्यवहार) लोक करितात. रिक्थद्रव्याचें स्वरूप.

---

1 हे उपाय मिताक्षरेच्या ७ वे प्रकरणाचे १ले शाखेचे १८ वे अंकांत स्पष्ट केले आहेत. येथें पुढें ६ व्या अंकापासून सांगितले आहेत.

## मयूखदायभाग

## सत्तेविषयीं

. क्रीत, प्रतिगृहीत, इत्यादिक द्रव्यतर क्रय प्रतिग्रह, इत्यादि कारणानें सत्तेंत येतें. आणि रिक्थ तर मालकाची सत्ता नष्ट झाल्यानेंच मात्र सत्तेंत येतें. हें समजण्यासाठीं "मात्र" असें पद दिल्हें आहे. वस्तुतः येथें मालकाचा जो स्वत्व नाश, त्याजवरच रिक्थ पदाची शक्ति आहे. कारण क्रय प्रतिग्रह इत्यादिक जे सत्तेचे उपाय, त्यांत रिक्थ पदाची गणना केली आहे. (म्हणून रिक्थ हाही द्रव्यसंपादनाचा एक उपाय म्हटला पाहिजे. उपायविशिष्ट द्रव्य म्हणतां येतनाहीं.) आणि न्यायही असाच आहे कीं, ज्या बुद्धीनें विशेषण घेतलें नाहीं ती बुद्धि विशेष्य घेतनाहीं. (म्हणजे असें, वाक्यार्थज्ञानाला पदार्थज्ञान कारण, व विशेष्य ज्ञानाला विशेषणज्ञान कारण आहे, अतएव विशेषणज्ञान झाल्यावांचून विशेष्यज्ञान होतनाहीं. जसें कुंभकार, येथें बुद्धीनें प्रथमतः कुंभ घेतल्यावांचून कुंभकाराचें ग्रहण होतनाहीं, तसें प्रकृतींही मालकाचा स्वत्व नाशरूप उपाय समजल्यावांचून तद्विशिष्टद्रव्याचें ज्ञान होणार नाहीं.)

३. पिता जिवंत असतां त्याच्या द्रव्यावर पुत्रादिकांची जन्मेंकरून सत्ताहोतनाहीं, विभागेंकरून होती, असें धारेश्वराचार्यस्मृतिसंग्रहकारयांचें मत आहे. परंतु तसें नाहीं, कारण "जन्मेंकरून द्रव्याचें स्वामित्व पावतात" इत्यादि वचनांवरून, बापाच्या जिंदगीवर पुत्राचें जन्मच पुत्रत्वाच्यानात्यानें सत्ता उत्पन्न करितें. जन्मेंकरून सत्ता उत्पन्न होती.

याज्ञवल्क्य. (मि॰ पृ॰ २४८ अंक १ मूळ) भूमि; निबंध व द्रव्य, जें पितामहानें संपादित आहे, त्यावर पुत्र व नातू या दोघांचें स्वामित्व समानच.

हें (वरचें) वचनही जन्मेंकरून सत्ता, असें दाखवितें.

# मयूखदायभाग

## सत्तेविषयीं

वरें हें (वरचें) वचन सत्ता उत्पन्न होण्याविषयीं पितामहमरणच कारण, पुत्रजन्म कारण नाहीं, असें सुचवितें म्हणावें, तर तसेंही म्हणतां येत नाहीं. कारण, पितामह मरणकाळीं पुत्र न जन्मला नंतर पुढें जन्मला तर त्या वेळेस पितामह मरणरूप कारण नाहीं. अतएव पितामहद्रव्यावर पौत्राची सत्ताच नाहींशी होऊंलागेल.

४ वस्तुतः येथें (वरच्या वचनांत) पितामहपद च **अविवक्षित** मानिलें पाहिजे. नाहीं तर प्रपितामहादिकांनीं संपादिलेल्या द्रव्यावर पुत्रपौत्रांचें स्वामित्व समान येणार नाहीं.

देवल. पिता मरण पावल्यावर त्याचें द्रव्य पुत्रांनीं विभागून घ्यावें (कारण) **निर्दोष**[1] पिताजीवंत असतां धनावर पुत्रांचें स्वामित्व नाहीं.

असें जें वचन, त्याचें पूर्वार्ध विभागकालाचें विधायक. कारण, "विभागून घ्यावें" असा विधि सांगितला आहे. उत्तरार्ध तर स्तावक वाक्यें करून पित्याचें स्वातंत्र्य दाखवितें. केवळ पुत्राची सत्ता नाहीं एतत्परक. येणेंकरून (खालीं सांगितलेलें) शंखवचनही स्पष्टार्थ झालें.

शंख. जरी पुत्रांनीं मग कांहीं संपादिलें असलें तरी **निर्दोष** पिता जिवंत असतां पारतंत्र्यामुळें पुत्र जिंदगी विभागून घेण्याविषयीं अनधिकारीच.

पुत्रादिकांनीं **प्रतिग्रहादिकें** करून संपादिलेल्यावर जरी पुत्रांचें स्वत्व निर्विवाद आहे तथापि त्यांचें अस्वातंत्र्य, मग पित्यानें संपादिलेल्यावर अस्वातंत्र्य हें सांगायास नको. असें याचें (शंखवचनाचें) तात्पर्य.

---

१ निर्दोष म्हणजे धर्मवर्ती, निरोगी, व्यसनरहित, प्रजनन, शक्तियुक्त.

# मयूखदायभाग

## सत्तेविषयीं

परंतु हें पारतंत्र्य,विभाग, **काम्यधर्म** ,व्यापार , यांविषयीं; सत्ते विषयीं नव्हे.

म्हणूनच हारीत सांगतो.

हारीत. पिता जिवंत असतां व्यापार , विभाग , **आक्षेप** , यांविषयीं पुत्रां स स्वातंत्र्य (अधिकार) नाहीं.

**आक्षेप** म्हणजे दासी (दास) **इत्यादिकां**स शिवी देणें असें मदनाचें मत.

स्मृति. मणी ,मोतें ,पोंवळीं , या सर्वांचा मालक पिता होतो. परंतु स्थावरा चा मालक तर पिता नाहीं. पितामहही नाहीं.

असें जें वचन तें ,कुंडलें , आंगठ्या, **इत्यादिकां**चे उपभोगाविष यीं मात्र पित्याला स्वातंत्र्य दाखवितें. **दान, विक्रय** , यांविषयीं पित्याला स्वातंत्र्य आहे असें दाखवीत नाहीं . व पुत्राचे सत्तेविषयीं पुत्राचें जन्मकार-ण नव्हे असेंही दाखवीत नाहीं . कारण उपभोगानें नाश व्हावयाजोगे नव्हत. अशा मणी मोतीं **इत्यादिकां**चा (स्मृतींत) निर्देश केला आहे तेणेंकरून ही हाच अर्थ अवगत होतो.

स्मृति. स्थावर व **द्विपद** जरी स्वतां संपादिलें असलें तरी सर्व पुत्रांची अनुम ति घेतल्यावांचून त्याचें **दान** होत नाहीं व **विक्रय** होत नाहीं.

या वचनांत **दान विक्रय इत्यादिकां**चाच निषेध केला आहे. उ पभोगाचा निषेध नाहीं.

यास्तव पूर्वी अनेक भाऊ **इत्यादिकां**ची समाईक सत्ता असतीती च पुढें विभागें करून व्यवस्थित केली जाती.

" समुदाय द्रव्यावर जी पूर्वी समाईक सत्ता असती तिचा नाश होऊन

# मयूखदायभाग

## सत्तेविषयीं

समुदायद्रव्याच्या त्या त्या एकदेशीं विलक्षण नवी सत्ता उत्पन्न होत्ये असें कोणी म्हणतात.

५. पूर्वसत्तेचा नाश होऊन नवी सत्ता उत्पन्न होती असें म्हणावें तर गौरव येतें, अतएव पूर्वीं समुदायद्रव्याच्या एकदेशीं स्थित जी सत्ता तीच विभाग झाल्यानें त्या त्या पदार्थविशेषावर त्याची त्याची सत्ता आहे अशी व्यवस्थित होत्ये हेंच युक्त.

प्रासंगिक संपवून प्रकृत[1] सांगतो.

६. "ब्राम्हणास **प्रतिग्रहानें** मिळालें तें अधिक म्हणजे फलजनक." असें कोणी म्हणतात. जिंदगी (रिक्थ) खरेदी **इत्यादिक** जे उपाय सांगितले त्यापेक्षां हा (प्रतिग्रह) उपाय ब्राम्हणासच अधिक. (वरकडांस नाहीं.) ब्राम्हणासप्रतिग्रहानेंमिळालेंतें अधिक.

७ याप्रमाणेंच क्षत्रियास विजयादिकें करून मिळालेलें अधिक, क्षत्रियासविजयानेंमिळालेलें अधिक. हें तर युक्तच आहे. जय झाला असतांही जिंकलेल्याची ज्या गृह **क्षेत्रा**दिकावर पूर्वीं सत्ता होती त्यावरच जिंकणाराची ही सत्ता उत्पन्न होत्ये. परंतु जो जिंकला तो जेथें जेथें कर घेत होता तेथें तेथें या जिंकणारानेंही नुसता करच घ्यावा, याची सत्ता नाहीं. अतएव (सत्ता नाहीं म्हणूनच मीमांसेच्या) साहाव्या अध्यायांत सांगितलें आहे कीं "**सार्वभौम राजानें** संपूर्णपृथ्वीचें **दान** करूं नये, व **मांडलिक राजानें** मंडलाचें दान करूं नये." कारण संपूर्णपृथ्वीमंडलामध्यें गांव **क्षेत्र इत्यादिका**वर सत्ता

---

१ प्रकृत म्हणजे सत्ता उत्पन्न होण्याचे क्रयप्रतिग्रहादिक उपाय लोकसिद्ध आहेत असें १ ल्या अंकांत सांगून इकडे सत्तेविषयीं प्रासंगिक विचार येथपर्यंत सांगून आतां पुनः प्रकृतास अनुसरून गौतमवचनाच्या कांहीं अंशाची व्याख्या करितो.

तर त्या त्या ग्रामाधिपतीची किंवा **क्षेत्रस्वामीची. राजांनीं** नुमता करमा त्र घ्यावा. (दानादि करण्याविषयीं स्वामित्व नाहीं.) म्हणूनच आह्मांकडे जें **पारिभाषिक क्षेत्रदाना**दिक करितात, तेणेंकरून भूमिदानाचें फल येत नाहीं, नुसती वृत्ति कल्पनामात्र होते. त्या त्या अधिकाऱ्यांपासून विकत घेतलेल्या गृह**क्षेत्रा**दिकावर तर सत्ता होतीच. अतएव तशा **क्षेत्रा**दिकाचें **दान** केलें असतां **दाना**चेंही फल येतें.

८ वैश्यांस व्याज, शेतकी, उदीम, पशुरक्षण, यांजकडून मिळालेलें अधिक. व शूद्रास **द्विज**सेवेपासून **भृति** मिळते ती अधिक. वैश्यास उदीम व शूद्रांस सेवा.

९ यास्तव (१ल्या अंकांतील गौतमवचनांत सांगितलेला) **क्रय प्रतिग्रहादिक**, हे सत्तेचीं कारणें **लोकसिद्ध**च होत, असें म्हटलें असतांच आपली गाय(म्हैस) **इत्यादिकां**पासून झालेल्या वत्सादिकावर आपली सत्ता, हा व्यवहार संगत होतो.

१० जर सत्तेचीं कारणें **शास्त्रसिद्ध** मानिलीं तर आपल्या गाईपासून झालेल्या वत्सादिकांवर आपली सत्ता उत्पन्न होणार नाहीं. कारण जननरूप[1] सत्ताजनक उपाय शास्त्रांत सांगितला नाहीं.

११ शंका — सत्तेचीं कारणें लोकसिद्ध मानिल्यानें आपल्या गाईच्या वत्सादिकांवर जशी आपली सत्ता, तशीच कन्यापुत्र आपल्या भार्येपासून झालीं म्हणून त्यांवरही आपली सत्ता होऊं लागेल. कन्यापुत्रादिकांवर आपली सत्ता होईल तर ती आम्हांस इष्टच आहे असें म्हणाल तर तसेंही

---

१ जसे रिक्थ, क्रय, संविभाग, परिग्रह, अधिगम, हे सत्ताजनक उपाय शास्त्रांत सांगितले आहेत, तसा जननरूप म्हणजे उत्पत्ति हा सत्ता होण्याचा उपाय शास्त्रांत सांगितला नाहीं.

# मयूखदायभाग

## सत्तेविषयीं

म्हणतां येत नाहीं. कारण, "विश्वजित् यज्ञांत सर्वस्वदान करावें." अशा वाक्यावरून सर्वस्वदान विहित झालें. त्यांत कन्यापुत्रादिकांवर आपली सत्ता आहे म्हणून त्यांचें ही **दान** अवश्य प्राप्त झालें असतां "कन्यापुत्रादिक देऊं नयेत" असा जो (मीमांसेंतील) साहावा सिद्धांत, त्यास विरोध येईल.

१२ समाधान — कन्यापुत्रादिकांवर मुळीं आपलें स्वत्वच नाहीं. कारण, जसें आपल्या गाईवर (क्रयप्रतिग्रहादिद्वारा) आपलें **स्वत्व** आहे तसें भार्येवर नाहीं. म्हणून तिजपासून झालेल्या अपत्यावरही सत्तेचा अभाव आहे. लोकांत तर; ज्यावर आपली सत्ता आहे तशापासून जें जनन, तें त्या संततीवर सत्ता होण्यास कारण क्लृप्त आहे.

१३ (गाई वगैरे वर जशी क्रयप्रतिग्रहादिद्वारा सत्ता होते तशी) भार्येवर ही **प्रतिग्रहा**नें सत्ता होईल म्हणावें तर असेंही म्हणतां येत नाहीं. कारण, क्षत्रियादिकांस मुळींच **प्रतिग्रहा**चा अधिकार नाहीं; म्हणून त्यांच्या भार्यांवर त्यांचें **स्वत्व**च नाहीं, मग त्यांच्या अपत्यांवर तर सुतरां सत्ता नाहीं, म्हणूनच (मि॰ पृ॰ २८० अंक १ मूळ) "मी सजातीय पुत्रांविषयीं हा विधि सांगितला आहे." असा सजातींतच **दत्तक** घेण्याचा विधि सांगितल्यावरून (क्षत्रियांदिकांस मुळीं प्रतिग्रहाचा अधिकार नाहीं, अतएव) त्यांनीं घेतलेला **दत्तक** गौणच.

जर क्षत्रियादिकांस अनधिकारामुळें त्यांनीं केलेला **प्रतिग्रह** गौण आहे तर तो (पुत्रप्रतिग्रह) विप्रांसच मुख्य कां संभवे ना? असें म्हणावें; तर असेंहीं म्हणतां येत नाहीं. कारण **प्रतिग्रह**रूप जो विधि त्याचे ठायीं एकदांच **वृत्तिद्वय** स्वीकारावें लागतें, तें तर परस्पर विरुद्ध

---

१ वृत्तिद्वय — शक्ति, लक्षणा, आणि व्यंजना, अशा शब्दाच्या तीन वृत्ती आहेत.

आहे.

पुत्राचे **प्रतिग्रहा** विषयीं ब्राम्हणच अधिकारी, क्षत्रियांस अधिकार नाहीं, असेंही म्हणतां येत नाहीं. कारण "**दौहित्र, भागिनेय**, हे शूद्रासही **दत्तक** होतात." **इत्यादिक** जीं शौनकादिकांचीं वचनें यांकडून क्षत्रियादिकांस ही पुत्र घेण्याचा अधिकार आहे, असें अवगत होतें.

१४ याप्रमाणें **ब्राम्हविवाहानें** क्षत्रियादिकांच्या कन्येशीं ब्राम्हणाचा विवाह झाला असतां ते **दान प्रतिग्रह** गौण व ब्राम्हणाचा ब्राम्हणी कन्येशीं झाला असतां ते **दान प्रतिग्रह** मुख्य म्हणावे तर (पूर्ववत्) **वृत्तिद्वय** स्वीकारावें लागतें तें तर विरुद्ध आहे. क्षत्रियादि जातींत **ब्राम्हविवाह** करण्याची प्रवृत्ति तर सर्वांच्या मतीं निर्विवादच आहे.

१५ (असा वृत्तिद्वय विरोध येतो) म्हणूनच पुत्रादिकांचें **दान** गौणच, असें तंत्ररत्नग्रंथांत मिश्र सांगतात.

स्वभार्या, स्वपुत्र, स्वकन्या, असा जो शब्द व्यवहार आहे त्यावरून भार्या पुत्रादिकांवर आपलें **स्वत्व** आहे, असें कल्पावें तर असेंही म्हणतां येत नाहीं. कारण स्वमाता, स्वपिता, या शब्दव्यवहारीं जशी स्व म्हणजे स्वसजातीय माता, पिता, अशी उपपत्ति करितां, तशीच स्वभार्या, स्वपुत्र, येथें ही स्वसजातीय भार्या

---

गौणीवृत्तिही लक्षणेंतलाच भेद एका शब्दाचीशक्तिएकाअर्थाविषयीं मानिल्यानंतर पुनः त्या शब्दाचा दुसरा अर्थ करणें तो शक्तीनें होत नाहीं, तेव्हां लक्षणेनें करावा. केला असतां एका शब्दाच्या दोन वृत्ती स्वीकारिल्या असतां त्या शास्त्रमतीं विरुद्ध आहेत. प्रकृतीं ब्राम्हणांनीं केलेला प्रतिग्रहविधि मुख्य, येथें प्रतिग्रह शब्दाची शक्ति. आणि क्षत्रियादिकांनीं केलेला प्रतिग्रहविधि गौण, येथें प्रतिग्रह शब्दाची लक्षणा. अशा एका प्रतिग्रह शब्दाला दोन वृत्ती स्वीकारणें हें शास्त्रमतें विरुद्ध आहे.

# मयूख दायभाग.

## सत्तेविषयीं

पुत्र कन्या अशी जातिवाचक स्वशब्देंकरून ही उपपत्ति संभवत्ये. व जातीचे ठायींही स्वशब्दाची शक्ति आहे. "जाति, आत्मा, आत्मीय, आपलें धन, इतक्याचे ठायीं स्वशब्दाची शक्ति आहे." असें कोशप्रमाण आहे.

१६ (मीमांसेच्या) साहव्या अधिकरणांत जें गर्भदासाचें दान सांगितलें आहे त्याविषयीं तर विचार च आहे. कारण त्या गर्भदासाचे आईवर मुख्य **दान, प्रतिग्रह, क्रय, इत्यादिक** सत्तेचीं साधनें घडलीं नाहींत. मग अशा दासीपासून झालेल्या गर्भदासावर तर मुतरां सत्ता नाहींच. हा प्रासंगिक विचार पुरे.

---

## शाखा २

आतां **दाय** म्हणजे काय तें निरूपण करितो.

१ **दाय** —— जें द्रव्य **संसृष्ट** नसतां विभाग करावया जोगें तें. दायम्हणजेकाय

अधिक नफा होण्यासाठीं पातीदारानी एकवट केलेल्या द्रव्याचें **दाय** शब्देंकरून ग्रहण नव्हावें म्हणून (लक्षणांत) "**संसृष्ट** नसतां" असें विशेषण दिल्हें. कारण उदम्यानी (व्यापारार्थ) एकवट केलेलें, वांटे करावयाजोगें, जें द्रव्य त्यावर **दायभाग** शब्दाचा प्रयोग नाहीं. या प्रमाणेंच पुढें (१०व्या शाखेच्या १ल्या अंकांत) सांगितलेल्या **पारिभाषिक संसृष्ट** धनाचीही निवृत्ति झाली. (कारण संसृष्टधनावर दायभागशब्दाचा प्रयोग नाहीं)

# मयूख दायभाग

म्हणूनच स्मृतिसंग्रह ग्रंथांतही
सांगतो.

स्मृति. १ २ पित्याचे द्वारें प्राप्त व आईचे द्वारें प्राप्त जें द्रव्य, तें दाय म्हटलें आहे. त्यांचा विभाग आतां सांगतो

निघंटु विभागून घ्यावयाजोगें जें पितरांचें द्रव्य तें. दाय म्हटलें आहे.

वरचे वचनांत पितृशब्दाचा निर्देश केला तेणेंकरून ज्याचें द्रव्य आपणास मिळावयाजोगें. असे जितके संबंधी तितके घ्यावे.

३ हा (वर सांगितलेला) दाय दोन प्रकारचा अटकाव केलेला (सप्रतिबंध) खुला (अप्रतिबंध)

अटकलेला म्हणजे मालक किंवा त्याचे पुत्रादिक जिवंत असणें, हा सत्ता होण्याविषयीं ज्याला अटकाव आहे. जसें (भाऊ) चुलता. इत्यादिकांचें धन. अटकावलेल्या दायाबद्दल.

खुला म्हणजे क्रयप्रतिग्रहादिक उपायांची गरज न लागतां केवळ मालकाच्या संबंधानें (नात्यानें) च आपल्या सत्तेंत येतें, तो. जसें, पुत्राला बापाचें धन. खुल्यादायाचें स्वरूप.

## शाखा २

असें दायाचें स्वरूप सांगितलें आतां त्याचे विभाग.

नारद. १ ज्या स्थळीं आईबापांच्या द्रव्याचा पुत्रांनी विभाग केला जातो तें दायभाग या नावाचें व्यवहारप्रकरण पंडितांनीं म्हटलें आहे.

---

१ पित्याचे द्वारें प्राप्त स्वामिसंबंधानें प्राप्त म्हणजे असें पित्याचें स्वसंपादित किंवा इतरांनीं उपार्जित पित्याचे सत्तेंत आलेलें आपणास प्राप्त होतें.

## मयूख दायभाग

वचनांतील पुत्रशब्दें करून पौत्रादिकही घ्यावे. मदनानें तर वचनांतील "पित्याच्या" या ठिकाणीं पित्रादिकांच्या असा पाठ केला आहे.

२ **दायभाग** शब्दांचें स्वरूप सांगितलें. आतां अगदींद्रव्य नसलें तरी. तुजपासून मी विभक्त झालों. अशा नुसत्या बुद्धिव्यवस्थे करूनही विभाग होतो. कारण विभाग म्हणजे बुद्धिविशेष आहे. याचीच ज्ञापक ही (वर सांगितलेली) व्यवस्था. नुसत्याबुद्धीनेंही विभाग होतो

आतां विभागाचे काल सांगतो.

मनु. ३ पिता आणि माता निवर्तल्या नंतर भावानी एकत्र मिळून त्यांचें धन समान वांटून घ्यावें. आईबाप जीवंत असतां पुत्र समर्थ नाहींत. आईबापाचे मरणानंतर विभाग

वचनांत "पिता आणि माता निवर्तल्या नंतर" असें सांगितल्यानें दोघांचे मरण बोधित होतें. परंतु तशी विवक्षा नाहीं. (तर जो मरेल त्याचे धनाचे वांटे करावे.)

म्हणूनच मदनरत्न व स्मृतिसंग्रहांत

ही सांगतो.

स्मृति. माता जिवंत असतांही पित्याच्या जिंदगीचा विभाग होतो. कारण नवऱ्या वांचून आईला स्वातंत्र्यें करून स्वामित्व नाहीं. तसाच पिता जिवंत असतांही **मातृधना**चा विभाग होतो. कारण अपत्यें विद्यमान असतां **स्त्रीधना**वर नवऱ्याचें स्वामित्व नाहीं.

याचें बाधक सांगतो.

बृहस्पति. ४ आईबापाच्या मागें भावांनी विभाग करावा. आईबाप जीवंत असतांही आई **निवृत्तरजस्क** झाल्यावर विभाग करावा.

नारद. आईबाप मरण पावल्या नंतर बापाची जिंदगी पुत्रांनी सारखी आईबापवियोगकिंवाबाप

# मयूख दायभाग

वांटून घ्यावी. (आईबापजिवंत असतांही) आई निवृत्तरजस्क व बहिणीचीं लग्नें झालीं असतां. व पिता निवृत्तरमण किंवा द्रव्याविषयीं निस्पृह झाला असतां व बहिणीचीं लग्नें झालीं असतां. (पुत्रांनी विभाग करावा.) चाकामगेलाअसतांविभाग.

गौतम. पितृमरणानंतर किंवा (पिता जिवंत असतां) आई निवृत्तरजस्क झाल्यानंतर पुत्रांनी जिंदगीचे वांटे करावे. अथवा पिता जिवंत असतांही तो विभाग करूं इच्छितो तर. "विभाग करूं इच्छितो तर" येणेंकरून आईचा विटाळ गेला नसला तरी पित्याच्या इच्छेनें विभाग होतो असें दाखविलें.

कदाचित् पित्याची इच्छा नसल्यासही
विभाग सांगतो.

बृहस्पति. ५ परंपरागत अशा गृह क्षेत्राविषयीं पितापुत्र समविभागी होतात परंतु पित्यानें संपादित असल्यास पित्याचे इच्छेवांचून पुत्र विभाग करूं शकत नाहींत परंपरागतस्थावराचाविभाग.

अर्थात् पितामहादिकांनीं संपादिल्याविषयीं तर पित्याची इच्छा नसली तर पुत्र विभाग करूं शकतात. असें तात्पर्य.

पितामहानें संपादिलेल्याचाही कचित् पित्याच्या इच्छेनें विभाग सांगतात.

मनुविष्णू. ६ पितामहानें संपादिलेल्या द्रव्याचें कोणी हरण केलें तें पितामहाकडून हस्तगत न झालेलें जर पिता हस्तगत करितो तर तें पित्याचें स्वसंपादित द्रव्य झालें (अतएव) त्याची इच्छा नसल्यास पुत्रांकडून वांटे होणार नाहींत. हरणकेलेलें हस्तगतकेलें अशा द्रव्याचे विभाग.

---

१ येथें पितामहशब्देंकरून पितामहप्रभृति पूर्वज घ्यावे.

## मयूख दायभाग.

बृहस्पति. कोणी हरण केलेलें पितामहाचें द्रव्य, बापानें स्वसामर्थ्यानें जें हस्तगत केलें, व बापानें विद्यापराक्रम इत्यादिकें करून जें संपादिलें, यांवर बापाचें स्वामित्व, अतएव त्यांनें स्वेच्छे प्रमाणें त्या धनाचें त्याग भोग करावे.

नारद. व्याधित, कुपित, किंवा ज्याचें अंतःकरण विषयासक्त. अथवा शास्त्रविपरीत करणारा, असा पिता विभागाविषयीं अधिकारी नाहीं.

हारीत. पिता अकाम, वृद्ध, अधर्मी, महारोगग्रस्त, झाला असतां जिंदगीचा विभाग होतो.

अकाम म्हणजे विभाग करूं इच्छित नाहीं असा मदनरत्नांत अर्थ केला आहे. (अकाम म्हणजे निरतरमण. असाही अर्थ होतो.) तात्पर्य. पित्याची विभागेच्छा नसली तरी (पुत्रांच्या इच्छेनें) विभाग होतो.

पिता समर्थ नसल्यास ज्येष्ठपुत्राच्या
अनुमतीनें विभाग मागतो.

हारीत. [१] पिता दीन, अथवा प्रवासास गेला, किंवा महारोगग्रस्त झाला असतां ज्येष्ठपुत्रानें विभागाचा विचार करावा. ज्येष्ठाच्या अनुमतीनें विभाग

शंख, लिखित. पिता अशक्त झाला असतां ज्येष्ठानें किंवा (त्याच्या अभावीं) त्याचा अनुज व्यवहारज्ञ असल्यास त्यानें कुटंबपोषण करावें. परंतु ज्येष्ठाच्या अनुमतानें.

सारांश कुटुंबाचें पोषण वगैरे विषयीं समर्थ असेल त्याच्या इच्छेनें विभाग होतो. सारे तसे असल्यास अमुकानेंच करावा असा नियम नाहीं. व्यवहारज्ञ असेल त्याच्या अनुमतीनें विभाग.

---

१ दीन म्हणजे वार्धक्यादिकेंकरून अशक्त.

# मयूख दायभाग

(सर्वानुमतीने ही होतो)

याज्ञवल्क्य . ८ (मि०पृ० २२७ अंक १-२ मूळ) जर पिता विभाग करील तर समविषमविभाग.
इच्छे प्रमाणें पुत्रांस विभाग द्यावे . ज्येष्ठाला **श्रेष्ठ** विभाग किंवा सर्वांस सम विभाग द्यावे.

येथे (वचनांत) पूर्वार्धात जो इच्छेनें विभाग सांगितला त्याचेंच उत्तरार्धेकरून विवरण केलें. म्हणजे असें उत्तरार्धात सांगितलेले जे दोनपक्ष त्याविषयींच इच्छेला **नियमविधि** संभवत असतां या दोहों पक्षां खेरीज इच्छेला स्वातंत्र्याचा संबंध नाहीं. (तात्पर्य हेंकीं वांटे करण्याचे दोनपक्ष सांगितले त्यांत पित्याची इच्छा. दोहों पक्षांबाहेर पित्याची इच्छा स्वतंत्र नाहीं.) आणि असें न केलें तर **वाक्यभेद**[1] दोष येतो. आणि एकाला लक्ष रुपये, एकाला दपर्डिक, व दुसऱ्यास अगदींच कांहीं नाहीं अशी व्यवस्थाही होईल.

ज्येष्ठादिपुत्रांचे विभागाविषयीं विशेष सांगतो.

मनु. ९ ज्येष्ठाला सर्व समायीक द्रव्यांतून विसावा अंश (शेंकडा ५) उद्धारविभाग.
**उद्धार**, व सर्व द्रव्यांत श्रेष्ठ असेल तें. मधल्याला त्याचें[2] अर्ध, आणि कनिष्ठाला अर्धाचें अर्ध. जर **उद्धार** न काढिला तर व्यवस्था अशी, ज्येष्ठाला एक अंश अधिक. त्याच्या अनुजाला अर्धा अंश अधिक. आणि कनिष्ठानीं एकेकच अंश घ्यावा. अशी धर्मव्यवस्था.

---

१ वाक्यभेद म्हणजे वाक्याचा उद्देश्यविधेयभाव घटित एक अर्थ होत असतां, ते उद्देश्य विधेय बदलून अनेक वाक्यार्थ करणें हा वाक्यभेद, मीमांसक दोष मानितात.

---

२ त्याचें म्हणजे शेंकडा पांचाचें अर्ध म्हणजे अडीच. याप्रमाणेंच पुढें कनिष्ठाला अर्धाचें अर्ध म्हणजे शेंकडा सवा.

# मयूख दायभाग.

जुळ्यांमध्यें प्रथम जन्मलेला ज्येष्ठ असें

सांगतो.

मनु. १० (ज्योतिष्टोमयज्ञांत वपाहोमानंतर) सुब्रह्मण्या म्हणून प्रयो गविशेष आहे. त्यांत जन्मेंकरून जो ज्येष्ठ त्यानें आव्हान करावें. असें सांगितलें आहे. अतएव जावळे जन्मले जे, त्यांत प्रथम प्रसूत जो त्यास ज्ये ष्ठत्व संमत आहे. जेजावळे जन्मतात त्यांमधून प्रथमतः ज्याचें मुख आइ बापाचे दृष्टीस पडतें. त्यावर ज्येष्ठत्व सिद्ध आहे. — जुळ्यामध्यें पहिल्यानें जन्मलेला वडील.

११ गर्भधारणापासून प्रसवपर्यंत पिंडसिद्धि कसकशी होते एतत्प्र तिपादक वैद्यक ग्रंथांत तर "मागून जन्मलेला वडील." असें जें सांगितलें तें येणेंकरून (वरल्या मनुवचनें करून) कांहीं कार्यांशीं बाधित होतें. कार ण वैद्यकग्रंथांत सांगितलें तें श्रुतिमूलक नव्हे. जसें "जननाशौचाची मद्दि न्यानें शुद्धि होते". (असें आहे परंतु जातेष्टि इत्यादिक जें कर्तव्य तें, दाहा दिवसानंतर करावें. येथें जननाशौचाचा कार्यांशीं बाध होतो) तसें प्रकृ तींही.

भागवत. १२ (जेव्हां गर्भधारणसमयीं वीर्य दुभाग होऊन एकवीर्यसेक प्रथम तः नंतर दुसऱ्यानें वीर्यसेक होतो.) तेव्हां दोन गर्भ होतात. म्हणून प्रसव गर्भधा रण यांचा विपर्यास[१] होतो.

**इत्यादिकें** करून भागवतांत मागून झालेल्यास ज्येष्ठत्व सांगितलें आहे तेंही येणेंकरून (वरल्या मनुवचनें करून) बाधित होतें. कारण पु राणांत स्मृतिविरुद्ध आचार बहुत पाहण्यांत येतात.

कोणी म्हणतात देशाचारप्रमाणें व्यवस्था जाणावी. युक्त तर पूर्वो

---

१ विपर्यास म्हणजे जो वीर्यसेक मागून झालेला तो गर्भ पहिल्यानें जन्मतो आ णि प्रथमतः राहिलेला मागून जन्मतो.

## मयूख दायभाग.

(वरच्या मनुवचनांत) सांगितलेलेंच.

१३ हा (८ व्या व ९ व्या अंकांत सांगितलेला) **उद्धार** विभाग कलियुगांत इष्ट नाहीं. कारण कलीमध्यें जीं वर्ज्य[१] सांगीतलीं आहेत त्यांत **उद्धार** विभाग आहे. हें आम्ही समयमयूखांत निर्णीत केलेंच आहे. उद्धारविभागाचा कलियुगांत निषेध.

(विभाग करितानां) बापानें दोन अंश घ्यावे. असें सांगतो.

नारद. १४ आपल्यापासून पुत्रांस विभाग देणाऱ्या पित्यानें स्वतां दोन अंश घ्यावे. विभागकरणाऱ्यापित्यानें दोन अंश.

"ज्याला एकच पुत्र आहे तर त्या पित्यानें (विभाग करितानां) दोन वांटे आपल्याला घ्यावे." अशा शंखलिखितवचनावरून वरचें नारदवचन, ज्यास एकपुत्र आहे त्याविषयीं.

(शंखलिखिताचे वचनांत) एकपुत्र म्हणजे श्रेष्ठ आहे पुत्र ज्याचा. एकुलता पुत्र ज्यास आहे असा अर्थ नव्हे. "एक शब्द मुख्य, अन्य, केवल, इतरांचा वाचक" असा अमर आहे. एकपुत्र म्हणजे गुणवान् पुत्र (असल्यास पित्यानें दोन अंश असें तात्पर्य.)

पितामहानें संपादिलेल्याविषयीं तर एका पुत्राबरोबरही समविभाग. असें पारिजातग्रंथांत सांगतो.

बृहस्पति. १५ पितामहानें संपादित जें स्थावर जंगम द्रव्य, त्याविषयीं पितापुत्रांचे समविभाग सांगितले आहेत. वडिलोपार्जितस्थावरांत पितापुत्रांचे समभाग.

याज्ञवल्क्य. (मि॰ पृ॰ २४८ अंक १ मूळ) भूमि **निबंध** व द्रव्य जें पितामहानें संपादित आहे त्यावर पितापुत्र या दोघांचें स्वामित्व समानच.

---

१ मि॰ पृ॰ २३४ कलिवर्ज्यें सांगितलीं आहेत.

## मयूख दायभाग.

कात्यायन. जें सकल द्रव्य सामान्य असेल तें माता पितर व भ्राते यांनीं समविभाग घ्यावें हा यथा धर्म विभाग.

याज्ञवल्क्य. १६ (मि० पृ० २३२ अंक २ मूळ) विषम विभागानें विभक्त झाले जे त्यांचा तो पित्यानें केलेला विभाग धर्म्य होय. — बापानें केलेला विभाग धर्मशास्त्राप्रमाणें असल्यास उलटत नाहीं.

असें जें वचन त्याचें तात्पर्य पित्यानें केलेला विभाग जर धर्म्य म्हणजे धर्मशास्त्राप्रमाणें आहे तर उलटत नाहीं अन्यथा उलटतो असें मदनरत्न विज्ञानेश्वर (मि० पृ० २३२ अंक २) इत्यादिक म्हणतात.

नारद १७ बापानेंच जे सम किंवा विषम विभागानें विभक्त केले त्यांचा तोच विभाग धर्मशास्त्राप्रमाणें होय. कारण त्या सर्व द्रव्याचा स्वामी पिता आहे.

असें जें वचन तें कलियुगावांचून इतर युगाविषयीं

### शाखा ४

(विभाग दोन प्रकारचा सम आणि
विषम पैकीं) आपण व पुत्र यांच्या
समविभागपक्षीं पत्नीलाही सम
विभाग याज्ञवल्क्य (मि० पृ० २३०
अंक १ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. १ जर पुत्रांस समविभाग देतो, तर पत्नींनाही समविभाग द्यावे. परंतु ज्यांस नवऱ्यानें किंवा सासऱ्यानें स्त्रीधन दिलें नसेल त्यांस. — पत्नींनां पुत्रांबरोबर समविभाग.

स्त्रीधन दिलें असल्यास अर्ध द्यावें. कारण "स्त्रीधन दिलें असल्यास अर्ध द्यावें." असें वचन आहे. — स्त्रीधन दिलें असल्यास अर्धा वांटा.

## मयूख दायभाग.

अर्थ म्हणजे पूर्वी दिलेलें स्त्रीधन जितक्यानें पुत्रांच्या विभागाशीं सम होईल तितकें द्यावें. असें तात्पर्य. विभागापेक्षां स्त्रीधन अधिक असल्यास विभाग देऊं नये.

स्वतां द्रव्य संपादनाविषयीं समर्थ असल्यामुळें विभाग घेऊं इच्छित नाहीं तर त्याविषयीं तो (मि० पृ० २३१ अंक १ मूळ) च सांगतो.

याज्ञवल्क्य २ स्वतां समर्थ अतएव पितृद्रव्य घेऊं इच्छित नाहीं तर त्याला यत्किंचित् देऊन फारखत करून घ्यावी. — स्वतां समर्थ असल्यामुळें विभाग घेत नसल्यास कांहीं तरी देऊन फारखत करावी.

यत्किंचित् देणें हें तरी पुढें त्याच्या पुत्रांस वांटा घेण्याची इच्छा निवृत्त व्हावी एतदर्थ. असें मिताक्षरेंत (पृ० २३१ अंक १) सांगितलें आहे.

आइबापांच्या मरणानंतरही सम विभाग तो (मि० पृ० २३२ अंक १ मूळ) च सांगतो.

याज्ञवल्क्य ३ आईबाप निवर्तल्यावर पुत्रांनीं जिंदगी व कर्ज समान वांटून घ्यावीं. — आईबापांचें कर्ज व जिंदगी समान वांटून घ्यावी.

हारीत. पिता मेल्यानंतर जिंदगीचा विभाग समान.

याज्ञवल्क्य. (मि० पृ० २५५ अंक १ मूळ) पिता निवर्तल्यावर वांटे करणारांची जननीही समविभाग पावेल.

विष्णु. माता (आपापल्या) पुत्रभागाशीं समविभाग पावतात.

स्मृत्यंतर. निर्धन[१] जननी तर विभाग करितानां पुत्रांबरोबर समविभाग

---

१ निर्धन जिला स्त्रीधन मिळालें नाहीं ती.

# मयूख दायभाग.

पावत्ये.

सधन असल्यास जितक्यानें तिचें स्त्रीधन पुत्र विभागाशी सम होईल तितका वांटा द्यावा. मुळचेंच स्त्रीधन विभागापेक्षां अधिक असल्यास देऊं नये. विभागापेक्षां स्त्रीधन अधिक असल्यास विभाग नाहीं.

सापलमाता व पितामही यांस विभा
ग सांगतो.

व्यास. ४ बापाच्या निपुत्रिक ज्या पत्नी (म्हणजे आपापल्या सापलमाता) व पितामही या सर्व मातृतुल्य सांगितल्या आहेत (म्हणून त्यांसही समविभाग द्यावे.) सापलमाता पितामही यांस विभाग.

वचनांत "या सर्व" असें म्हटल्यावरून पितामहीच्या सवती ही घ्याव्या.

अनेक भात्यांचे पुत्रांची विभागव्यवस्था
याज्ञवल्क्य (मि० पृ० २४७ अंक १ मूळ)
सांगतो.

याज्ञवल्क्य. ५ नातवांस आपापल्या पित्याच्या द्वारें विभागयोजना. नातवाला पित्याचे विभागांत हिस्सा.

म्हणजे एकाला एकच पुत्र, दुसऱ्याला दोन, अन्यास तीन, आहेत तर पित्याच्या संख्येनें (म्हणजे आपापल्या पित्याचा जो अंश त्याचे पोटांत) प्रत्येक पुत्रांचे विभाग. विभाग करणाऱ्या पुत्रांच्या संख्येवर विभाग नाहींत.

कात्यायन. भ्राता अविभक्त मेला असतां त्याचा पुत्र जिंदगीचा विभागी करावा. कारण ज्याला पितामहापासून जीवन मिळालें नाहीं तो चुलत्यापासून किंवा (त्याच्या अभावीं) चुलतभावापासून बापाचा हिस्सा घेईल. तोच हिस्सा त्याच्या सर्व भावांचा न्यायें करून विभाग रूप होतो. या प्रमाणेंच मृताचा नातूही विभाग पावेल. पुढच्यांस (प्रपौत्रादिकांस)

# मयूख दायभाग.

मिळणार नाहीं.

पिता, पितामह, प्रपितामह, हे मेले. अनंतर वृद्धप्रपितामह होता तो मेला असतां त्याचा आणखी कोणी पुत्रादिक जिवंत असल्यास वृद्धप्रपितामहाचें धन, या प्रपौत्राच्या पुत्रादिकांस मिळणार नाहीं. वृद्धप्रपितामहाचे दुसरे पुत्रपौत्र प्रपौत्र कोणी नसल्यास हा प्रपौत्र पुत्रही घेईल.

देवल. ६ मुळचे **अविभक्त**, अनंतर विभक्त होऊन पुनः **संसृष्ट** झाले. असे जे कुळांतले, त्यांचा चौथे पिढीपर्यंत[1] पुनः विभाग होतो. चौथ्या पिढीपर्यंत विभाग.

अशा वचनांवरून हें (वरचें कात्यायन वचन) ही **अविभक्तां** विषयीं नव्हे. **संसृष्टी** विषयीं.

देवल वचनांत "कुळांतले" म्हणजे वृद्धप्रपितामह व त्याचे पुत्र घ्यावे.

परंतु हें (देवलवचन) एक देशांत राहणारे जे **संसृष्टी** त्यां विषयीं.

७ देशांतरीं राहणारी तर पांचवी[2] पिढी वगैरे (वृद्धप्रपितामहाची) जिंदगी घेईलच. देशांतरीं राहणारी तर पांचवी पिढी घेईल.

बृहस्पति. ऋण, लेख, घर, शेत, हें ज्याचें पितामह संपादित असेल तो (नातू वगैरे) परागंदा झाला तरी आल्यावर विभागी होईल. आपल्या वंशास साधारण असें गृह **क्षेत्रा**दिक टाकून जो अन्य देशीं राहिला त्याच्या वंशांतील कोणी विभागी आला असतां त्यास निःसंशय

---

१ पर्यंत म्हणजे चौथी पिढी समाप्त होईपर्यंत.

---

२ पांचवी पिढी म्हणजे प्रपौत्राचा पुत्र.

# मयूख दायभाग.

विभाग द्यावा, कारण तिसरा, पांचवा, सातवा, किंवा त्याचें जन्म नाव माहीत आहे असा वंशांतला कोणी आला असतां तो आपला परंपरागत विभाग घेईल.

असें देशांतरीच्या उपक्रमानें वचन आहे. (म्हणून देशांतरीं राहणारी पांचवी पिढीही जिंदगी घेईल)

क्वचित् आईच्या द्वारें विभाग सांगतो.

बृहस्पति ८ एका जातीचे व समसंख्येचे असे एकापासून झाले बहुत सावत्र भाऊ आहेत तर त्यानीं मातेच्या द्वारें म्हणजे आपापल्या आईचा विभाग कल्पून त्याचे पोटांत वांटे करून घ्यावे. एकाजातीचे व समसंख्यअ ल्यास आईचेद्वारें विभाग.

व्यास. एका जातीचे व समसंख्येचे अशा एका पित्याचे सावत्र पुत्रांस आपापल्या आईचा विभागच शास्त्र आहे.

याचें उलटें उदाहरण सांगतो.

बृहस्पति. ९ सवर्ण असून संख्येनें विषम जे सावत्र भाऊ त्यांस पितृद्वारा विभाग धर्मशास्त्र आहे. विषमसंख्येचे असल्यास बापाचेद्वारें विभाग.

## शाखा ५.

आतां भिन्नजातीचे पुत्रांचा विभाग याज्ञवल्क्य (मि० पृ० २५९, अंक १ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. ब्राम्हणोत्पन्न पुत्र क्रमेंकरून चार, तीन, दोन, एक, असे विभाग पावतात. तसेच क्षत्रियोत्पन्न पुत्रही तीन, दोन, एक, तसेच वैश्योत्पन्न पुत्र दोन, एक, विभाग पावतात. भिन्नजातींच्या पुत्रांचे विभाग.

ब्राम्हणोत्पन्न म्हणजे ब्राम्हणी, क्षत्रिया, वैश्या, शूद्रा, यांचेठायीं

# मयूख दायभाग.

ब्राम्हणापासून झालेले . क्षत्रियोत्पन्न म्हणजे क्षत्रिया, वैश्या, शूद्रा, यांचे ठायीं क्षत्रियापासून झालेले . याप्रमाणेंच वैश्योत्पन्नही जाणावे. (शूद्राला तर एकच सजातीय भार्या अतएव त्यास भिन्नजातीचे पुत्र नाहींत)

बृहस्पति. २ ब्राम्हणापासून क्षत्रियादिस्त्रियांचे ठायीं झालेल्या पुत्रांस **प्रतिग्रहा**नें संपादिलेली भूमि देऊं नये . जरी त्यांच्या बापानें दिल्ही असेल तरी बाप निवर्तल्यावर ब्राम्हणीपुत्रानें माघारी घ्यावी. प्रतिग्रहसंपादितभूमीचा क्षत्रियादिपुत्रांस विभाग नाहीं.

देवल. ३ शूद्रीचे ठायीं **द्विजां**पासून झालेला पुत्र भूमीचा विभाग घेऊं शकत नाहीं शूद्राचा स्वजातीचा पुत्र तर बापाची सर्व जिंदगी पावतो. शूद्रापुत्रांस स्थावराचा विभाग नाहीं. अशी धर्म व्यवस्था आहे.

द्रव्याचा तर विभाग घेईलच परंतु स्थावर जरी खरेदी वगैरे करून मिळालें असलें तरी विभाग मिळणार नाहीं असें तात्पर्य.

४ **अविवाहित** शूद्रेचे ठायीं झालेला तर द्रव्याचा देखील विभाग घेऊं शकत नाहीं. ब्राम्हणादिकांच्या शूद्र दासीपुत्रांस विभाग नाहीं.

मनु. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, यांपासून शूद्रेचे ठायीं झालेला पुत्र विभागाचा अधिकारी नाहीं. जितकें त्याचे बापानें दिल्हें असेल तितकेंमात्र त्याचें धन होईल.

(ब्राम्हणादिकापासून झालेल्या
शूद्रापुत्राचा) बाप मेल्यानंतर
विशेष सांगतो.

बृहस्पति. ५ अनपत्य[1] मरण पावला असतां त्याचा **शूद्रापुत्र** जर शूद्रापुत्रास अन्नाछादन द्यावें

---

१ अनपत्य म्हणजे ज्यास ब्राम्हणी, क्षत्रिया, वैश्या, या स्त्रियांचें अपत्य नाहीं असा ब्राम्हणादि तिहीं वर्णांतिला कोणी.

# मयूख दायभाग.

गुणवान् व शुश्रूषा करणारा आहे तर तो अन्नाछादनमात्र पावेल. बाकीचें सर्व, मृताचे **सपिंड** घेतील.

गौतम. अनपत्याचा **शूद्रापुत्र** शुश्रूषातत्पर असल्यास अन्नाछादनमात्र पावतो.

गौतम. (वर सांगितलेल्या) **शूद्रापुत्रा** प्रमाणेंच **प्रतिलोम** स्त्रियांविषयीं ही.

**प्रतिलोम** स्त्रिया म्हणजे **उत्पादका**पेक्षां उत्कृष्टवर्णाच्या स्त्रिया, त्यांचे ठायीं उत्पन्न जे त्याविषयीं. असें तात्पर्य.

शूद्रापासून **अविवाहित** शूद्रेचे ठायीं झालेल्या पुत्रां विषयीं विशेष याज्ञवल्क्य (मि० पृ० २८२ अंक १ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. ६ शूद्रापासून दासीचे ठायीं झालेलाही पुत्र पित्याच्या इच्छेनें विभाग पावतो. पिता मेल्यानंतर **औरस** पुत्रांनीं त्यास अर्धा वांटा द्यावा. (शूद्राच्यादासीपुत्रास बापाच्यामागे अर्धावांटा.)

"शूद्रापासून दासीचे ठायीं" असें सांगितल्यानें अर्थात् **द्विजां**चा दासीपुत्र तर पित्याच्या इच्छेनेंही विभाग घेऊं शकत नाहीं. व बाप मेल्यानंतर अर्ध विभागही नाहीं. **औरस** पुत्रांच्या अभावीं सर्व जिंदगी ही मिळणार नाहीं. असें मदनरत्नादिग्रंथांत सांगितलें आहे. (ब्राम्हणादिकांच्या दासीपुत्रास अगदींच विभाग नाहीं.)

**विभक्तज** पुत्राविषयीं विशेष सांगतो.

स्मृति. ७ **विभक्तज** पुत्रानें आईबापांचेंच (धन घ्यावें) (विभागानंतर झालेल्या पुत्रास आईबापांचा हिस्सा.)

बृहस्पति. पुत्रांबरोबर विभक्त झालेल्या पित्यानें जें कांहीं स्वतां संपादिलें

# मयूख दायभाग.

असेल तें सर्व विभक्तजाचेंच. विभागापूर्वीच्या पुत्रांचा त्या धनावर संबंध नाहीं. जसा धनावर संबंध नाहीं तसाच ऋण, दान, गहाण, खरेदी यांवर ही [1]त्यांचा परस्पर संबंध नाहीं. परंतु सोयर, सुतक, तर्पण, यांवांचून

८ बापानें नुसतें कर्जमात्र असल्यास पूर्वी विभक्त झालेल्या भावांपासून आपला विभाग घेतल्यावांचून देऊं नये. कारण "रिक्थग्राहानें कर्ज द्यावें." असें पुढें (ऋणादान प्रकरणीं) सांगितलें आहे. नुसतें कर्ज असल्यास विभाग घेतल्यावांचून विभक्तजानें देऊं नये.

९ बापाशीं कोणी संसृष्ट झाला असल्यास त्या बरोबर विभक्तजानें विभाग करावा. बापाशीं संसृष्ट झालेल्या बरोबर विभक्तजाचा विभाग.

मनु. विभक्तज पुत्र आईबापांचेंच धन घेईल. अथवा बापाशीं जे संसृष्ट असतील त्यां बरोबर विभाग घेईल.

पिता गेल्या नंतर सावत्र आई किंवा भावजय गरोदर आहे असें विभाग समयीं समजण्यांत न येतां विभाग झाले. नंतर उत्पन्न झालेल्या पुत्रा विषयीं विशेष याज्ञवल्क्य (मि० पृष्ठ २५१ अंक १ मूळ) सांगतो.

[2]याज्ञवल्क्य. १० विभक्त झाल्यानंतर सवर्णभार्येचेठायीं झालेला पुत्र विभागाचा अधिकारी होतो. विभाग समयीं गरोदर न समजतां पुढें उत्पन्न झालेल्या पुत्राचा विभाग.

---

१ त्यांचा म्हणजे विभागापूर्वीचे व विभक्तज यांचा.

---

२ हें याज्ञवल्क्य वचन मिताक्षरेंत पिता जिवंत असतां विभागानंतर झालेल्या पुत्राविषयीं सांगितलें आहे. तेथें विभागाच्या म्हणजे आई बापांच्या जो विभाग त्याचा.

# मयूख दायभाग

तो विभाग तर सर्व भावांनीं आपापल्या अंशांतून कांहीं कांहीं कांहीं काढून जेणेंकरून आपापल्या वांट्यासमान वांटा होई असा करून द्यावा.

विष्णु. पित्याशीं विभक्त झालेल्या पुत्रांनीं **विभक्तजास** वांटा द्यावा.

परंतु हा प्रकार पूर्वीं विभक्त झालेल्यांचे विभाग जमाखर्चावांचून असल्यास.

जमाखर्चासहित विभाग आहेत तर त्याविषयीं हा तो (मि॰ पृ॰ २५२ शा खा १३ मूळ) च सांगतो.

याज्ञवल्क्य ११ (वांटून घेतलेल्याचा) आय व्यय तपासून बाकी जें विद्यमान द्रव्य त्यांतून त्याला विभाग द्यावा. — जमाखर्च तपासून बाकीच्या द्रव्यांत विभाग.

भावांच्या विभागकाळीं विशेष सांगतो.

वसिष्ठ. १२ आईबापांचे मरणानंतर भावांनीं विभाग करावा. परंतु स्त्रिया[1] गरोदर असल्यास प्रसूत होई पर्यंत प्रतीक्षा करावी. — विभागसमयीं स्त्रिया गरोदर असल्यास प्रतीक्षा करावी.

पितृमरणानंतर विभागाविषयीं विशेष सांगतो.

बृहस्पति. १३ जे **असंस्कृत** भाऊ असतील त्यांचे संस्कार **पूर्वसंस्कृत** बंधूनीं समायीक पितृद्रव्यानें करावे — धाकट्या बंधूचे संस्कार समायीक द्रव्यांतून करावे.

भावांविषयीं प्रकार सांगितला तोच बहिणीविषयीं जाणावा. — बहिणींचे संस्कार समायीक द्रव्यांतून करावे.

नारद. ज्या **असंस्कृत** बहिणी असतील त्यांचे संस्कार वडील भावानीं पितृद्रव्यानें यथाशास्त्र करावे.

भगिनींच्या संस्काराविषयीं याज्ञवल्क्य

---

१ स्त्रिया म्हणजे आई, सावत्र आई, किंवा विधवा भ्रातृपत्नी.

# मयूख दायभाग.

(मि० पृ० २५६ अंक २ मूळ)

विशेष सांगतो.

याज्ञवल्क्य. १४ पूर्वी ज्यांचे संस्कार झाले असतील त्या बंधूंनी बहिणीचे संस्कार आपापल्या अंशांतून चतुर्थांश देऊन करावे.

विभाग झाल्यानंतर बहिणीचे लग्नें चतुर्थांश देऊन करावीं

चतुर्थांश म्हणजे ज्या जातीची कन्या असेल त्या जातीच्या पुत्राचा जो अंश असेल त्याच्या चतुर्थांशाचा विभाग त्या प्रत्येक बहिणीस देऊन त्यांचे संस्कार करावे.

## शाखा ६

जिंदगी घेण्याचे व्यवस्थेविषयीं उपयोगी अशी मुख्य गौण पुत्रांची व्यवस्था याज्ञवल्क्य (मि० पृ० २६९ शाखा २० मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. १ धर्मविवाहित स्त्रीचे गर्भी आपल्यापासून झालेला तो [१]**औरस** पुत्र. त्यासारिखाच [२]**पुत्रिकासुत**. सगोत्रापासून किंवा इतरापासून आपल्या **क्षेत्रीं** झालेला [३]**क्षेत्रज** पुत्र. घरांत गुप्तांत उत्पन्न जो पुत्र तो [४]**गूढज**. कन्येपासून झालेला [५]**कानीन**. तो मातामहाचा पुत्र म्हटला आहे. **अक्षत** किंवा **क्षत** अशा **पुनर्भू**चे गर्भी झालेला [६]**पौनर्भव** आई किंवा बाप, ज्याचें **दान** करितात. तो (घेणाराचा) [७]**दत्तक**. आईबापांनी जो विकला तो [८]**क्रीत** जो स्वतां प्रयत्नें करून केला तो [९]**कृत्रिम** जो स्वतांच दुसऱ्याचा पुत्र होतो तो [१०]**स्वयंदत्त** गरोदर स्त्रीशीं विवाह केला असतां जो पुत्र होतो तो [११]**सहोढज**. टाकलेला जो पुत्र त्याचा स्वीकार करून घेतला जातो तो [१२]**अपविद्ध**.

मुख्य व गौण मिळून बारा प्रकारचे पुत्र.

## मयूख दायभाग.

२ **औरस — सवर्ण धर्मपत्नी** चे ठायीं झालेला तो मुख्य पुत्र. (वरकड सारे गौण.) औरसपुत्र

३ **पुत्रिकासुत** — तो दोन प्रकारचा (कन्याच पुत्रस्थानी मानलेली किंवा तिचा मुलगा पुत्रस्थानी मानलेला.) पुत्रिकासुत

वसिष्ठ. ही **अभ्रातृक** कन्या मी तुला सालंकृत करून देतों हिला जो पुत्र होईल तो माझा पुत्र. (किंवा) **पुत्रिकाच** दुसरा पुत्र.

"**पुत्रिकाच** दुसरा पुत्र" या पक्षीं कन्येनेंच बापाचें श्राद्धादिक करावें.

४ **क्षेत्रज** — निपुत्रिक भाऊ **इत्यादिकांचे पत्नी** चे ठायीं गुरु **नियोगे**करून दीर किंवा इतर **सगोत्र** यांपासून झालेला. क्षेत्रजपुत्र.

५ **पौनर्भव — अक्षत** किंवा **क्षत** अशा **पुनर्भू** चेठा यीं दुसऱ्या नवऱ्यापासून झालेला. पौनर्भवपुत्र

६ **दत्तका**वांचून इतर गौणपुत्र कलीमध्यें वर्ज आहेत. कारण "**दत्त व औरस** यांवांचून इतरांचे पुत्रत्वें करून ग्रहण" (कलिमध्यें वर्ज आहे.) असा कलिनिषिद्धांमध्यें पाठ केला आहे. दत्तकावांचून वरकडपुत्रांचा कलींत निषेध.

## शाखा ७

## दत्तकाविषयीं

आतां **दत्तका**चा विधि सांगतो.

मनु. १, आईनें किंवा बापानें, अथवा उभयतांनीं आपत्कालीं रीतीनें उदकदानपूर्वक जो सदृश पुत्र ज्यास दिला जातो तो त्याचा **दत्तक** पुत्र जाणावा. दत्तकपुत्र

"आईनें किंवा बापानें" अशा विकल्पावरून आईच्या अभावीं पित्यानेंच व पित्याच्या अभावीं आईनेंच, उभयतां असल्यास उभयतांनीही, असें मदनाचें मत.

## दत्तकाविषयीं.

२. वचनांत "आपत्कालीं" असें म्हटल्यावरून आपत्काल नस ल्यास देऊं नये. हा निषेध देणारालाच पुरुषार्थ[1] होय. क्रतूसाठीं (अदृष्टार्थासाठीं) नव्हे. असें विज्ञानेश्वराचें मत.

३ परंतु हें (विज्ञानेश्वराचें) मत चांगलें नाहीं. कारण या निषेधास वचनें करून दृष्ट फल सांगीतलें नाहीं अतएव हा क्रतूसाठीं (अदृष्टासाठीं) असें अवगत होतें. अथवा जरी महत्कष्टें करून दृष्टार्थता सिद्ध केली तथापि "आपत्कालीं पुत्रदान करावें" असा नियमविधि[2] जो केला त्याचें दृष्टफल तर संभवत नाहीं. अतएव अदृष्टफल अवश्य क्लृप्त आहे. म्हणून नियमविधीचें उल्लंघन केलें असतां कार्यविशेष म्हणजे नियमविधीपासून होणारें जें इष्ट त्याचें साधन जें अदृष्ट त्याची सिद्धि होणार नाहीं.

४ कोणी म्हणतात कीं (१ल्या अंकांतल्या मनुवचनांतल्या) "आपत्कालीं पुत्र द्यावा" या वाक्यास आपत्काल नसतां पुत्र देऊं नये. असें निषेधार्थकत्व नाहीं. कारण आपत्कालीं या शब्दाचा जो अर्थ त्याचा त्याग व दुसऱ्या अर्थाची (म्हणजे आपत्काल नसतां अशी) कल्पना करावी

---

१ पुरुषार्थ म्हणजे ऐहिक दृष्टफळ संपादन प्रकृतींही पुत्रसौख्यरूप दृष्टफल किंवा लोकनिंदा असेंही कोणी म्हणतात.

---

२ नियमविधि म्हणजे कामतः प्राप्त जें कांहीं एक कर्म त्याचा अमुक कालीं करावें असा अदृष्टार्थ जो नियम करणें तो. नियमविधि. प्रकृतीं रागतः प्राप्त जें पुत्रदान त्याचा आपत्कालीं नियम केला

# मयूख दायभाग

## दत्तकाविषयीं.

लागते. असा परिसंख्या[1] दोष येतो. म्हणून आपत्काल शब्द केवळ निमित्तमात्राचा बोधक (म्हणजे आपत्काल निमित्त पुत्रदान.)

५ जर पुत्रदानाविषयीं आपत्काल निमित्त मानिलें तर आपत्कालीं पुत्र न दिल्यास दोष येईल. असें म्हणाल तर दोष नाहीं. कारण हें वाक्य (वरचें मनुवचन) संज्ञा व संज्ञी यांचा जो परस्पर संबंध त्याचें बोधक आहे. व आपत्काल प्राप्त झाला असतां तन्निमित्त पुत्रदान करावें असें विधायक वचनही नाहीं.

६ "रोगिणी अभ्रातृक अशा कन्येशीं विवाह करूं नये." अशा निषेधाचें उल्लंघन केलें असतां दृष्टविरोध (लोकाचार विरोध) मात्रच. भार्यालि तर उत्पन्न होतेच. असें जें (आचाराध्यांत) विवाहप्रकरणीं त्यानें (विज्ञानेश्वरानें) च सांगितलें, तें ही येणेंकरून (३ ऱ्या अंकानें) च निरस्त झालें.

७ . (मनुवचनांत) "सदृशपुत्र" असें म्हटलें तेथें सदृश म्हणजे कुल, गुण, यांकडून सदृश. एकजातीय नव्हे. अतएव ब्राम्हणादिकांस क्षत्रियादि जातींचाही दत्तक होतो. असें मेधातिथीचें मत.

---

१ परिसंख्याविधि म्हणजे कांही एकविधि सांगीतला असतां जेथें त्याचें स्वार्थीं प्रामाण्य नसतां तद्विरुद्धार्थीं प्रामाण्य असतें तो.

अतएव परिसंख्यास्थळीं स्वार्थत्याग, प्राप्तबाध, आणि परार्थकल्पना. असे तीन दोष येतात म्हणूनच नियमविधि संभवत असतां परिसंख्याविधि स्वीकारीत नाहींत. प्रकृतींही "आपत्कालीं पुत्र द्यावा." या वाक्यांत स्वार्थत्याग म्हणजे आपत्काल शब्दाचा जो अर्थ त्याचा त्यागकरून प्राप्त जो पुत्रदानविधि त्याचा बाधकरून "आपत्कालनसतां पुत्र देऊं नये." अशी अन्यार्थाची कल्पना करावी लागते असा परिसंख्या दोष येतो.

# मयूख दायभाग

## दत्तकाविषयीं

जात्यासदृश असें कुल्लूकभट्टाचें मत. आणि हेंच सयुक्त. कारण याज्ञवल्क्यानें (मि० पृ० २६९ शाखा २० मूळ) "धर्मविवाहितस्त्रीचेठायीं झालेला **औरस** पुत्र." असा बारांही पुत्रांचा उपक्रम करून "मी सजातीयपुत्रांविषयीं हा विधि सांगितला आहे." असा (मि० पृ० २८० अंक १ मूळ) उपसंहार केला आहे. व पुढें (८ व्या शाखेच्या २ऱ्या अंकांत) सांगितलेल्या शौनकवचनें करून हें स्पष्ट केलें आहे. विज्ञानेश्वराचें (मि० पृ० २७२ अंक १) मतही असेंच.

मनु. ९ "ज्येष्ठपुत्र झाल्यानें मानव पुत्रवान् होतो". अतएव ज्येष्ठासच पुत्रकार्य करण्याविषयीं मुख्यत्व आहे. म्हणून ज्येष्ठ देऊं नये. हाही निषेध देणारासच घेणारास नाहीं. असें ही तोच (मि० पृ० २७२ अंक २) सांगतो. खरें परंतु हें (मनुवचन) जर ज्येष्ठपुत्राचे दानाविषयीं निषेधक असेल तर "ज्येष्ठ पुत्र देऊं नये." हा निषेध देणारासच होईल परंतु हें (मनु) वचन ज्येष्ठपुत्रदानाचें निषेधक म्हणावें तर प्रमाण नाहीं. व "पुत्रवान् होतो." या वाक्यें करून पुत्रवत्वमात्र सांगितल्यानें (पुत्र झाला असतां) पितृऋणापासून मुक्त होतो. एतत्परच केवळ हें वचन आहे. अतएव (म्हणजे ज्येष्ठपुत्र झाल्यानें) "पिता पितृऋणापासून मुक्त होतो. यास्तव तो (ज्येष्ठपुत्र) पित्यापासून सर्व (द्रव्य) घेतो."[1] हें उत्तरार्ध लागतें. (अन्यथा लागत नाहीं. कारण पूर्वार्धांत "ज्येष्ठपुत्र देऊं नये." हें सांगणें आणि उत्तरार्धांत "पिता ऋणापासून मुक्त होतो". हें सांगणें अगदीं विसंवादी पडतें.)

१० पुरुषच **दत्तक** होतो. कन्या होत नाहीं. कारण "तो त्याचा

---

१ हें उत्तरार्ध, याचेंच पूर्वार्ध वरचें मनुवचन एकूण सगळी स्मृति.

# मयूख दायभाग.

## दत्तकाविषयीं.

दत्तक पुत्र जाणावा" असें जें संज्ञासंज्ञी यांचा परस्पर संबंध जाणविणारें वाक्य (१ला अंक) त्या वाक्यांतील "जो" या सर्वनामशब्देंकरून आईबापांनीं केलेलें, प्रीतिजल एतद्गुणसंपन्न, आपत्कालनिमित्तक अशा दानाला विषयीभूत अशा सजातीयपुरुषाचें ज्ञान होतें. जसें "आठवर्षांच्या ब्राम्हणाचें उपनयन करावें. आणि त्याला अध्यापन करावें." या वाक्यांतील "त्याला" या सर्वनामशब्दानें, अष्टवर्षे ब्राम्हण्य एतद्विशिष्ट व उपनयनेंकरून संस्कृत अशा पुरुषाचेंच ज्ञान होतें. (तसा प्रकृतींही पुरुषाचाच परामर्श होतो कन्येचा होत नाहीं.)

दत्तक शब्देंकरून वराला किंवा अन्याला दत्त जी कन्या तिचा ही संग्रह होतो. असें कोणाचें ही मत आहे तेंही वर सांगितलेल्या रीतीनेंच परास्त झालें.

## शाखा ८

### दत्तक घेण्याचा प्रकार सांगतो.

शौनक. १ निपुत्रिक किंवा मृतपुत्र यानें पुत्रासाठीं उपोषण करून नंतर धर्मसंपन्न, वैष्णव[1], साद्यंत वेद पढलेला अशा आचार्यास वस्त्रें, कुंडलें, पागोटें, पवित्रक देऊन, कुशांसुद्धां बर्हि व पलाशसमिधा इत्यादि आणून दत्तकघेण्याचाविधि.

---

१ येथें वैष्णव म्हणजे विष्णु आहे आराध्य देवता ज्याची असा अविरोधिमतानुयायी असावा. वैष्णव म्हणजे माध्वसांप्रदायिक असावा असें नाहीं.

# मयूख दायभाग.

## दत्तकाविषयीं.

व बंधू ज्ञाती यांस बोलावून, बंधू व विशेषेंकरून ब्राम्हण यांस भोजन घालून, आधानादि आज्योत्पवनांत कर्मकांड करून, नंतर पुत्र देणाराच्या समक्ष जाऊन, "पुत्रदे" अशी प्रार्थना करावी. नंतर दान करणारानें विधानोक्त मंत्रपूर्वक दान करावें. घेणारानें ही विधानोक्त मंत्रपूर्वक प्रतिग्रह करून त्याचें मस्तक हुंगून पुत्रस्थानापन्न तो सुत वस्त्रादिकें करून अलंकृत करून नृत्य गीत व स्वस्तिशब्द करीत वाजत गाजत घरांत आणावा. नंतर यथाशास्त्र चरुहोम करून अवशिष्ट कर्म समाप्त करावें.

शौनक २ ब्राम्हणानीं सपिंडांतला दत्तक घ्यावा. त्याच्या अभावीं असपिंडांतला याहून पलिकडचा घेऊनये. क्षत्रियांनीं स्वजातीचा किंवा गुरूच्या गोत्राशीं समान ज्याचें गोत्र असेल असा दत्तक घ्यावा. वैश्यानी वैश्यजातीचा, व शूद्रानीं शूद्रजातींतला दत्तक घ्यावा. सर्व वर्णांस आपापल्या जातींतलाच दत्तक. भिन्न जातींतला होत नाहीं. दौहित्र, भागिनेय हे शूद्राचेही दत्तक होतात. ज्यास एकुलता पुत्र असेल त्यानें पुत्र कधीं देऊंनये ज्यास बहुतपुत्र आहेत त्यानें पुत्र दान करावें. पुत्रदान करणारा ब्राम्हण असल्यास त्यानें गुरूला यथाशक्ति दक्षिणा द्यावी. क्षत्रियानें अर्धे राष्ट्र वैश्यानें तीनशें वित्त[1] द्यावें आणि शूद्रानें सर्वस्व[2] द्यावें. अशक्त असल्यास यथाशक्ति द्यावें.

---

१ वित्त शब्देंकरून रुपये मोहरा पुतळ्या वगैरे ज्यादेशांत जें चालत असेल तें तें शक्ति तारतम्यानें द्यावें. कोणी वित्त म्हणजे निष्क म्हणतात. परंतु प्रमाण सांपडत नाहीं.

---

२ "वंश कायम असतां सर्वस्व देऊनये" असें (मि० द० ३६८ अंक ६) सांगितलें आहे

# मयूखदायभाग

## दत्तकाविषयीं.

३ "**दौहित्र**, **भागिनेय**, हे शूद्राचे **दत्तक** होतात." असें जें (वरच्या अंकांत) सांगितलें त्याविषयीं विचार, काय शूद्राचेच **दौहित्र भागिनेय दत्तक** किंवा **दौहित्र भागिनेय** च शूद्राचे **दत्तक**. अशा दोहों प्रकारच्या वाक्यांतून कोणता **नियमविधि** घ्यावा. येथें मीमांसेंतला दृष्टांत घेऊन शूद्रशब्दाची षष्ठी विभक्ति तिला उद्देशरूप जो चतुर्थीचा अर्थ. तो कल्पून इतका वाक्यार्थ झाला (औरसपुत्र न झाल्यामुळें) पितरांचा ऋणी जो शूद्र त्याचे **दौहित्र भागिनेय** ही. (एवंच वाक्यार्थ इतका कीं पितरांचा ऋणी जो शूद्र तो या दौहित्रभागिनेयांकडून ऋणमुक्त साधित केला.)

४ यास्तव[1] शूद्रास उद्देश करून **दौहित्रभागिनेयांचें** विधान सांगितल्यानें **दौहित्र भागिनेय** च शूद्रास **दत्तक** होतात. असा **नियमविधि** मयुक्त सांगितला. शूद्र तर कोणत्या[2]ही वाक्यार्थांत **विधेय** होत नाहीं. म्हणून शूद्र[3] **नियमविधी**चा विषय होऊं शकत नाहीं. अतएव

---

आणि येथे तर "सर्वस्व द्यावें" असा विरोध येतो. दुसरें असें कीं पुत्र झाला असतां पुत्रांचें जन्मतः द्रव्यावर स्वत्व उत्पन्न होतें. अतएव पुत्रवान् पित्याला मुर्क्षी सर्वस्व देण्याचा अधिकारच नाहीं. यास्तव येथें सर्वस्व म्हणजे पुत्र बापका व आपण यांचे विभाग करून जो आपला विभाग तें त्याचें सर्वस्व. असा कथंचित् निर्वाह.

---

१ यास्तव म्हणजे मीमांसेतील न्याय घेऊन शूद्रशब्दाच्या षष्ठीला उद्देशरूप चतुर्थी करून वरचा वाक्यार्थ केला म्हणून.

---

२ कोणत्या म्हणजे शूद्राचेच दौहित्र भागिनेय दत्तक. किंवा दौहित्रभागिनेयच शूद्राचे दत्तक. अशा वरच्या अंकांत सांगितलेल्या दोहों प्रकारच्या

---

३ वाक्यामध्यें जें विधेय असतें त्याविषयींच प्रायः नियम विधि असतो. असा

# मयूख दायभाग.

## दत्तकाविषयीं.

शूद्रासच **दौहित्र भागिनेय** असा वाक्यार्थाचा स्फोट केला असतां ब्राम्हणादिकांविषयीं **परिसंख्या** दोष येतो.

५ तस्मात् **दौहित्र भागिनेयच** शूद्रास मुख्य **दत्तक.** त्यांच्या अभावीं दुसरा सजातीय घ्यावा कारण "शूद्रांनी शूद्रजातींतला" असें त्यानें (शौनकानें) च सांगितलें आहे.

शूद्रांत दौहित्र भागिनेयां च्या अभावीं दुसरा दत्तक होतो

त्या (शूद्रजातींतला, यांतल्या) जातिपदाचा **दौहित्र भागिनेय** यांचे गर्यीं[1] उपसंहार करितो. (म्हणजे शूद्रानें शूद्र जातीचे दौहित्रभागिनेय दत्तक घ्यावे) असें ही म्हणतां येत नाहीं. कारण शूद्रांत **दौहित्र भागिनेय** म्हटलें असतां त्याजवर नियमेंकरून शूद्रजातीयत्व आहेच. यास्तव शूद्रजातीचे **दौहित्र भागिनेय** असें म्हणणें व्यर्थ आणि एका ऋषीच्या स्मृतींत सामान्यार्थाला वैयर्थ्य ही येतें.

याविषयीं द्वैतनिर्णय[2] ग्रंथीं तीर्थरूपांनीं विवरण केलें आहे. व शिष्टाचार ही असाच आहे.

---

प्राय: नियम आहे. जसें स्त्रीस उद्देशकरून कामत: गमन विहित झालें त्याविषयीं "ऋतूंचे गर्यीं गमन करावें." असा नियम केला सारांश ज्याचें विधान, त्याविषयीं नियमविधि हा पक्ष घेऊन प्रकृतीं शूद्रासच दौहित्र भागिनेय किंवा दौहित्र भागिनेयच शूद्रास दत्तक. या दोहों वाक्यांत ही शूद्रोद्देशें करून दौहित्र भागिनेयांचें विधान आहे म्हणून त्यांविषयीं नियमविधि केला.

---

१ शूद्राला भिन्नजातीचे दौहित्र भागिनेय असते तर त्यांचें ग्रहण न होण्यासाठीं शूद्रजातीचे दौहित्र भागिनेय हें म्हणणें योग्य होतें. परंतु तसें नाहीं. त्याला सजातीयच भार्या. अतएव शूद्राचे दौहित्र भागिनेय म्हटलें असतां नियमेंकरून त्यांवर सजातीयत्व आहेच. म्हणून उपसंहार करितां येत नाहीं.

---

२ द्वैतनिर्णय ग्रंथ मयूखकाराचे तीर्थरूपानें केला आहे.

# मयूख दायभाग.

## दत्तकाविषयीं

६ एवंच **निषादस्थपती**[1]स असा यज्ञकरण्याचा अधिकार सिद्ध झाला त्यासारिखा शूद्राला **दत्तक** घेण्याचा अधिकार सिद्ध झाला असतां. "ज्यामध्यें वेदोक्त मंत्रपूर्वक होम आहे असें जें दत्तविधान त्याविषयीं शूद्रास अधिकार नाहीं." असें जें शुद्धिविवेकग्रंथांत सांगितलें आहे त्याचा ही येणेंकरूनच निरास झाला.

७ शूद्रानें समंत्र होम तर ब्राम्हणद्वारा करावा.

पराशर. उपवास, व्रत, होम, तीर्थ, स्नान, जपादिक, हीं कर्में ज्याचीं ब्राम्हणद्वारा घडलीं आहेत त्याचीं तीं सफल झालीं.

स्मार्तहरिनाथांचें मतही असेंच आहे.

पराशर. ८ जो ब्राम्हण दक्षिणेसाठीं शूद्रानें होमादि कर्म करील तो ब्राह्मण[2] शूद्र होईल. आणि (शूद्राचें कर्म सांग झालें म्हणून) शूद्र तर ब्राम्हण होईल.

असें जें वचन तेंही ब्राम्हणास मात्र दोष. परंतु शूद्राचें कर्म तर यथा

---

१ "निषादस्थपती कडून याग करवावा" असें वाक्य आहे. निषाद म्हणजे ब्राम्हणापासून शूद्रीचे ठायीं झालेला. स्थपती म्हणजे त्यांचा राजा. निषादस्थपती येथें दोन समास होतात. तत्पुरुष आणि कर्मधारय, त्यांत निषादांचा स्थपति असा तत्पुरुष केला असतां निषाद संबंध्यभिन्न स्थपति इतका अर्थ होतो. यांत अभेद संबंध प्रविष्ट झाल्यामुळें गौरव येतें. म्हणून लाघवात् कर्मधारय समास करून निषाद असा (म्हणजे निषादजातीचा) जो स्थपती, इतका अर्थ सिद्ध झाला. एवंच निषादस्थपतीकडून याग करावा. या वाक्यांत समास भेदें करून लाघव गौरव विचार होउन निषादजातीय जो स्थपती त्याजकडून याग करवावा असें सिद्ध झालें. नंतर तावन्मात्र त्यास अधिकार कल्पावा. तर कल्पना करणें हें शास्त्रमतें गौरव आहे खरें परंतु कार्यसिद्ध झाल्यानंतर गौरवविचार करणें अप्रयोजक कारण तें दोषावह होत नाहीं. तसें सद्धतीं शूद्रास दत्तक घेण्याचा अधिकार वगैरे विचयीं जाणावें.

---

२ ब्राम्हण शूद्र होईल म्हणजे प्रायश्चित्तार्ह होईल. आणि शूद्र ब्राम्हण होईल म्हणजे त्याचें कर्म सांग झाल्यामुळें त्यास अधिक फळप्राप्त होईल. असें तात्पर्य.

# मयूख दायभाग.

## दत्तकाविषयीं

सांग होतें. असें प्रतिपादन करितें. असें माधवाचें मत.

९ स्त्रीलाही शूद्राप्रमाणेंच (दत्तक घेण्याचा) अधिकार. कारण "स्त्री शूद्र यांचा धर्म एकसारिखा" असें वाक्य आहे.

वसिष्ठ. आईबापांच्या शुक्रशोणितांपासून जो पुरुष संभवतो. व ज्याचीं निमित्तकारणें आईबाप. अतएव त्याचें **दान, विक्रय**, परित्याग, यांविषयीं मातापितर मालक आहेत. परंतु एकच पुत्र असल्यास देऊं नये. व घेऊंही नये. कारण तो पित्याचा उद्धार करितो. स्त्रीनें नवऱ्याच्या आज्ञेवांचून पुत्र देऊं नये व घेऊंही नये. **दत्तक** घेणारानें **बांधवां**स बोलावून, सरकारांत कळवून, मध्यघरांत होमकरून, ज्याचे **बांधव** दूर नाहींत असा व जवळचाच घ्यावा. ज्याचे **बांधव** दूर आहेत त्याविषयीं संदेह झाल्यास शूद्रासारखा ठेवावा. एका **दत्तका**नें बहुतांस (पितरादिकांस) तारिलें. — औरस झाल्यास दत्तकाला चौथा हिस्सा

वसिष्ठ. १० **दत्तक** घेतल्यानंतर **औरस** पुत्र झाल्यास **दत्तक** चतुर्थांशाचा विभागी होईल. — औरस झाल्यास दत्तकाला चौथा हिस्सा.

११ (९ व्या अंकांतल्या वसिष्ठवचनांत स्त्रीला दत्तक घेण्याविषयीं) नवऱ्याची आज्ञा सांगितली ती सुवासिनीलाच. कारण दृष्टप्रयोजन[१] आहे. विधवेला तर नवऱ्याच्या आज्ञेवांचूनही पित्याच्या आज्ञेनें त्याच्या अभावीं ज्ञातीच्या आज्ञेनें **दत्तक** होतो अतएव "कन्यावस्थेंत पित्यानें, यौवनावस्थेंत पतीनें, पुत्रांनीं तर म्हातारपणीं रक्षण करावें. यांच्या

---

१ दृष्टप्रयोजन म्हणजे त्याच्या आज्ञेवांचून घेतल्यास त्याला राग येईल. हें असें मयूखकारांचें मत. वस्तुतः अदृष्ट फलही आहे कारण "बापाच्या, नवऱ्याच्या, पुत्राच्या आज्ञेवांचून स्त्री जें परलोकामार्ग करिल्ये तें निर्चे विफल होतें." असें कात्यायनवचन व यांत वल्स्यवचनही आहे हीं दोन्हीं वचनें खालीं सांगितलीं आहेत.

# मयूखदायभाग
## दत्तकाविषयीं

अभावीं ज्ञातीनें . तस्मात् स्त्रीला स्वातंत्र्य कधीं नाहीं." असें (मिताक्षरा आचाराध्यायांत) याज्ञवल्क्यानें अवस्थाविशेषींच नवऱ्याचें पारतंत्र्य सांगितलें आहे. नवऱ्याच्या अभावीं किंवा म्हातारपणामुळें तो दुर्बळ झाल्यास पुत्रादिकांचें ही पारतंत्र्य आहे.

कात्यायन. बापाच्या, नवऱ्याच्या, किंवा पुत्राच्या आज्ञेवांचून स्त्री जें परलोकासाठीं कर्म करिल्ये तें तिचें विफळ होतें.

अशी त्या त्या अवस्थाविशेषींच पिता. भर्ता **इत्यादिकांची** आज्ञा सांगितली आहे. यास्तव ज्या अवस्थाविशेषीं नवऱ्याची आज्ञा ग्राह्य झाली तिचाच येथें **अनुवाद** केला. नवें विधान सांगितलें नाहीं. म्हणून विधवेला पतीच्या आज्ञेवांचून ही **दत्तक** घेण्याचा अधिकार आहे.

१२ (९व्या अंकांतील वसिष्ठवचनांत) "ज्याचे **बांधव** दूर नाहींत असा." म्हणजे जितका जवळचा **सपिंड** असेल तो. जवळच्यांमध्यें ही भावाचा पुत्र मुख्य. सपिंडांतला दत्तक घ्यावा. त्यांत भावाचा पुत्र मुख्य.

मनु सख्या भावांतून एक जरी पुत्रवान् होईल तरी त्या पुत्रें करून ते सारे भाऊ पुत्रवंत असें मनु बोलला.

असें मिताक्षरेंत (पृ० २७९ अंक १३) सांगितलें आहे आणि हेंच या वचनाचें प्रयोजन योग्य आहे. दुसरें प्रयोजन संभवत नाहीं.

१३ लग्न झालेला व पुत्रवान् ही **दत्तक** होतो. असें तीर्थरूपाचें मत. आणि हें युक्त ही आहे. कारण बाधक कांहीं नाहीं. कोणाच्या मतीं लग्न झालेला व पुत्रवान् ही दत्तक होतो.

कालिकापुराण १४ ज्या पुत्रास **जनकपित्या**च्या गोत्रें करून चौलपर्यंत संस्कार झाले आहेत तो **पालकपित्या**चा पुत्र होणार नाहीं. अन्यथा

# मयूख दायभाग.

## दत्तकाविषयीं.

(चौलपर्यंत संस्कार झाले नसल्यास) होईल. पालकपित्यानें स्वगोत्रेंक रून चौल, मुंज, हे संस्कार केले आहेत तर ते दत्तकादिक, त्यांचे पुत्र होतील. नाहीं तर दास समजावे. पांचा वर्षांचा पुत्र दत्तक घेऊन प्रथमतः पुत्रेष्टिक रावी. (असें आहे म्हणून) पांचा वर्षांपुढें दत्तकादि पुत्र होत नाहींत.

असें जें सांगितलें तें परगोत्रींचा दत्तक घेणें असल्यास त्याविषयीं जाणावें.

परंतु हें (कालिकापुराणांतलें) वचन तसें विश्वास ठेवाया जोगें नव्हे. कारण दोन तीं कालिकापुराण पुस्तकांत पाहण्यांत आलें नाहीं

## शाखा ९.

१ हा (वरच्या शाखेंत सांगितलेला) दत्तक दोनप्रकारचा केवल दत्तक आणि द्व्यामुष्यायण दत्तक. करारावांचून झालेला केवल दत्तक. हा पुत्र आपल्या दोघांचा ही (कार्यकर्ता) असा करारकरून घेतलेला द्व्यामुष्यायण. त्यांत केवळदत्तक पालकपित्याचेंच उत्तरक्रिया श्राद्धादिक करील. म्हणजे असें, पुत्र (दत्तक) ग्रहणाविषयीं साध्याची[१] आकांक्षा आहे म्हणून "दत्तक घेणारानें बांधवांस बोलावून" इत्यादिक जो (८व्या शाखेच्या १ व्या अंकांतले वसिष्ठवचनांतला) पुत्र घेण्याचा विधि त्यांत प्रतिग्रह रूपसाधनें करून (दत्तकावर) पुत्रत्व साध्य करावयाचें असें सां

दत्तक दोन प्रकारचा.

---

१ साध्याची आकांक्षा म्हणजे पुत्र ग्रहणें करून ऐहिक पारलौकिक साध्य करावयाचें. अशी इच्छा म्हणजे उद्देश.

# मयूख दायभाग

## दत्तकाविषयी

गितलें (परंतु यावर शंका कीं पुत्रत्व, जेव्हां पुत्रजन्मला तेंव्हांच सिद्ध झालें - नवें काय साध्य करितां असें म्हणाल तर सांगतो.) येथे जन्यत्वविशिष्ट जें पुत्रत्व, तें साध्य सांगितलें नाहीं. तर, पुत्रशब्दें करून पुत्रानें करावयाचें जें कार्य (श्राद्धादिक) तें लक्ष्य करून त्याला प्रयोजक जें अदृष्ट तें येथे **प्रतिग्रहें** करून साध्य करावयाचें असें स्वीकारिलें पाहिजे. यास्तव **पालकपित्या** चे कुलांत (दत्तकावर) पुत्रत्व साध्य करणें शक्य आहे. म्हणूनच **दत्तकपुत्र व पालकपिता** यांचा जो परस्पर संबंधविशेष, तत्प्रयुक्त जीं जीं कार्यें तीं प्रवृत्त होतात.

मनु. **दत्तक** पुत्र आपल्या जनकाचें गोत्र व जिंदगी यांचा अधिकारी होत नाहीं. (तर ज्याचा दत्तक होतो त्याचें गोत्र व जिंदगी पावतो.) तसेंच पिंडदान (श्राद्धादिक) ही ज्याचें गोत्र व जिंदगी पावतो त्याचा उद्देशें करून करावें. कारण देणारापासून स्वधा निवृत्त होत्ये.

म्हणजे प्रायः गोत्र**रिक्थास** अनुसरून पिंड राहतो असें तात्पर्य.

(वचनांत) **दत्तक**पुत्र सांगितला तो **केवळदत्तक**. कारण **द्व्यामुष्यायणदत्तका**ला **जनकपित्या**चीं गोत्र **रिक्थें** येतात असें पुढें (या शाखेच्या ८व्या अंकांत) सांगितलें आहे.

(वचनांतील) पिंडशब्दें करून उत्तरकार्य, श्राद्धादिक असें मेधातिथि कुल्लूकभट्टादिकांचें मत. पिंड म्हणजे **सापिंड्य** आणि स्वधा म्हणजे उत्तरकार्य श्राद्धादिक असें दुसऱ्याचें मत.

२ वस्तुतः तर "काळे केश असतां पुत्र झाला असतां अग्निसिद्ध करावा." येथें जसें (काळ्या केशांची अपेक्षा न धरितां) तारुण्यावस्थेचें ग्रहण होतें. व "यूपाचें अर्ध वेदीच्या आंत व अर्ध बाहेर." येथें जसें

# मयूख दायभाग

## दत्तकाविषयीं.

त्या देशविशेषाचें ग्रहण होतें. तसेंच येथें (मनुवचनांत) गोत्र, जिंदगी, पिंड, स्वधा, यापदांकडून जनकादिकांचें पितापुत्रसंबंधप्रयुक्त जें जें कार्य त्याची निवृत्ति सांगितली तणें करून अर्थात् सखेभाऊ, चुलते, **इत्यादिकां**च्या संबंधाची निवृत्तिही सिद्ध झाली. म्हणूनच **केवळदत्तका**च्या पुत्रानेंही पित्याचें सपिंडीकरण, पार्वणश्राद्धादिक, **पालकपितामहा**शीं मिळवून करावें. असेंच **केवळदत्तका**च्या पौत्रानेंही.

कात्यायन. जर यांस (दत्तकादिपुत्र घेणारांस) स्वस्त्रीचेठायीं अपत्य नसेल तर त्यांची जिंदगी (दत्तकादिपुत्र) घेतील व यांस तीन पुरुषपर्यंत पिंड देतील. जर दोघांस (जनक पिता व पालक पिता यांस) अपत्य नसेल तर दोघांस ही (त्रिपुरुष पर्यंत) पिंड देतील. एका श्राद्धांत दोघांस पृथक् उद्देश करून उच्चार करावा.

असें जें वचन आहे तें **द्व्यामुष्यायण दत्तका**विषयीं. कारण "जे **दत्तक क्रीत पुत्रिकासुत**, दुसऱ्यानें पुत्रलें करून घेतल्यामुळें दोहों कडचे संबंधी झाले अतएव ते **द्व्यामुष्यायण** होतात." असा **द्व्यामुष्यायणां**स उपक्रम करून (वरचें) वचन सांगितलें आहे.

२ येणें करून (इतकें सिद्ध झालें कीं) **जनकपित्यास** व **पालकपित्यास औरस**पुत्र नसल्यास **द्व्यामुष्यायणा**नें पिंड द्यावा व त्यांची जिंदगी घ्यावी. **औरस**पुत्र असल्यास देऊं नये. (व जिंदगीही घेऊं नये.) जर दोघांसही **औरस**पुत्र आहेत तर कोणासही (पिंड) देऊं नये.

# मयूख दायभाग

## दत्तकाविषयीं

४ **दत्तका**दिपुत्र **पालकपित्याच्या औरस** पुत्राचा जो विभाग त्याचा चतुर्थांश पावतात. दत्तकादिपुत्रांस चौथा हिस्सा

वसिष्ठ. **दत्तक** घेतल्यावर **औरस** पुत्र होईल तर **दत्तक** चौथ्या हिशाचा विभागी होईल.

कात्यायन **औरस** पुत्र झाल्यावर तर इतर पुत्र चौथ्या हिशाचे विभागी होतात. परंतु ते (इतरपुत्र) **सवर्ण** आहेत तर. **असवर्ण** असल्यास अन्नाछादन पावतील.

(वचनांत चौथ्या हिशाचे विभागी असें म्हटलें त्याबद्दल) कल्पतरूचा पाठ "तिसऱ्या हिशाचे विभागी" असा आहे.

**सवर्ण** म्हणजे **क्षेत्रज दत्तक इत्यादिक** असें मिताक्षरेंत (पृष्ठ २७५ अंक ४ सांगितलें आहे.

५ जर दोघांस (जनकपिता व पालकपिता यांस) पुत्र नाहींत तर "एका श्राद्धांत" **इत्यादिक** जो पूर्वी[1] सांगितलेला प्रकार तेणेंकरून दोघांचेंही एकश्राद्ध करावें.

कार्ष्णाजिनी. ६ **दत्तका**दिपुत्रांनीं मेलेल्याचे जेजे पितृवर्ग असतील त्यांबरोबर त्यांचें सपिंडीकरण करावें. त्यांच्या पुत्रांनीं दोघांशीं मिळून सपिंडीकरण करावें. त्यांच्या पौत्रांनीं तर एकाशीं मिळून करावें. चौथ्या पुरुषाविषयीं इच्छेप्रमाणें. तस्मात् यांचें त्रिपुरुषपर्यंत (सपिंडीकरण). साधारणकाळीं तर त्रयीचा विशेष नाहीं. मृत दिवशीं तर एकास उद्देश करून यथाविधि श्राद्ध करावें.

---

१ पूर्वी म्हणजे २च्या अंकांतील कात्यायन वचनांत.

# मयूख दायभाग.

## दत्तकाविषयीं

असें जें हेमाद्रिग्रंथांत वचन आहे त्याचाही अर्थ (२ऱ्या अंकांतील) कात्यायन वचनासारखाच.

(वरल्या वचनाचा) अर्थ

**द्व्यामुष्यायण दत्तका** दिकांनीं **जनक पिता** व **पालक पिता** यांचे कुलांत जे मेले असतील त्यांचें सपिंडी करण, त्याचे (मृताचे) पिता **इत्यादिक** जे स्वर्गस्थांशीं मिळवून करावें. **दत्तकादिकां**चे पुत्रांनीं तर मेलेले जे **दत्तका**दिक आपले पितर त्यांचें सपिंडी करण **जनक**[1] **पिता** व **पालक पिता** यांशीं मिळवून करावें. त्यांच्या (द्व्यामुष्यायण दत्तकांच्या) नातवांनींही आपल्या बापाचें सपिंडीकरण **द्व्यामुष्यायण** जो आपला पितामह व **द्व्यामुष्यायणा**चा **जनक पिता** जो आपला प्रपितामह यांशीं मिळवून करावें. चौथ्या पुरुषाला (द्व्यामुष्यायणाच्या प्रपौत्राला) सपिंडी कर्तव्य आहे तर इच्छे प्रमाणें म्हणजे **पालक पित्या**चा उच्चार करावा किंवा न करावा. **जनक पित्या**चा तर उच्चार केलाच पाहिजे. अमावास्यादि साधारण काळीं तर **जनक पिता** व **पालक पिता** यांचीं **पावर्णे** घेऊन यथाविधि श्राद्ध करावें. मृत दिवशीं तर एकास उद्देश करून **एकोद्दिष्ट** करावें.

७ कोणी म्हणतात[2] कीं **केवळ दत्तका**चें कोठे विधान

---

१ जनकपिता, व पालकपिता, हे दोघे सपिंडी करणाराचे पितामह होतात.

२ म्हणतात म्हणजे ६व्या अंकांतील कार्ष्णाजिनि वचनाचा असा अर्थ करितात.

# मयूख दायभाग
## दत्तका विषयीं.

नाहीं म्हणून **केवल दत्तक** नाहींच." हा दोघांचें ही कार्य करणा रा" अशा करारानें (दत्तक प्रकरणीं) विधान नाहीं अतएव करारावां चून घेतलेला **दत्तक** ही **द्व्यामुष्यायण**च होतो . त्यानेंच अमावास्यादि साधारणकाळीं **जनकपिता** व **पालकपिता** यांच्या उद्देशें करून दोन श्राद्धें किंवा एक करावें..**द्व्यामुष्यायणा**च्या पुत्रानें तर आपल्या बापाचें सपिंडीकरण , **पार्वण** श्राद्धादिक कार्य, **जनकपिता** व **पालकपिता** यांशीं मिळून करावें . या प्रमाणेंच त्याच्या (द्व्यामुष्यायणाच्या) पौत्रानें ही करावें .

असें जें केचिन्मत आहे तें विचारणीय[1] आहे.

८ जरी **केवलदत्तक** कोठेंही शब्दतः उक्त नाहीं तथापि पूर्वीं[2] सांगितलेल्या मनुवचनें करूनच **जनकपित्या** कडील याव त्संबंधाची निवृत्ति सांगितल्यानें . व **द्व्यामुष्यायण दत्तका**ला **जनकपित्या**चा संबंध सांगितल्यावरून अर्थातच **केवलदत्तक** सिद्ध होतो दुसरें असें कीं (जर केवल दत्तक न मानिला तर) "**जनकपित्याचे पितृबंधू** कडून सप्तपुरुषांनंतर व **मातृबंधू** कडून पांच पुरुषांनंतर ." अशा गौतम वचनें करून **जनकपित्या**चे कुळांत सप्तपुरुष पर्यंत विवाह अति विरुद्ध आहे . असा जो निषेध सांगितला तो **द्व्यामुष्यायण दत्तका** विषयीं

१ विचारणीय म्हणजे प्रायः निर्मूळ किंवा युक्तिशून्य .

२ पूर्वीं म्हणजे चालत्या शाखेच्या १ ल्या अंकांत .

# मयूखदायभाग

## दत्तकाविषयीं

लागू पडत नाहीं. कारण **द्यामुष्यायणा**ला **जनकपित्या** कडचें **सापिंड्य** आहेच. ( तेव्हां गोतमवचन निरर्थक पडेल ) अतएव त्याचें सार्थक्य होण्यासाठीं अवश्य **केवल दत्तक** म्हटला पाहिजे. कारण **केवल दत्तका**ला **जनक पितृ**कुळीं **सापिंड्या**ची निवृत्ति सांगितली आहे.

प्रवराध्याय. (अणखीं असें कीं केवल दत्तक न मानिला तर) जे **दत्तक** कीं तू पुत्र **द्यामुष्यायण** होतील त्यांचा दोहीं (जनक पित्याचें व पालक पित्याचे ) गोत्रांत विवाह नाहीं. जसा शौंग व शैशिर यांचा दोहों गोत्रांत विवाह नाहीं तसा.

येणें करून **द्यामुष्यायणा**ला दोन गोत्रें सांगितली. आणि पूर्वींच्या मनुवचनानें तर **जनकपित्या**च्या गोत्राची निवृत्ति सांगीतली तेणें करून विरोध येतो त्याचा परिहार **केवळदत्तक** व **द्यामुष्यायण दत्तक** असा दोन प्रकारचा **दत्तक** मानिल्यावांचून होत नाहीं. तस्मात् **केवळ दत्तक** ही सिद्ध होतोच.

म्हणून भट्ट सोमेश्वर सांगतो

शूर **राजा**नें कुंतिभोज राजाला **दत्तक** दिलेल्या कुंतीचा पुत्र जो

---

१ काहीं एक विधान प्राप्त झाल्यावांचून निषेधाची प्रसक्ति नाहीं असें आहे. प्रकृतीं दत्तविधानानंतर केवल दत्तकाचें जनकपितृकुळीं सापिंड्य तुटतें. असें मनुवचनें करून सांगितल्यानें जनकपितृकुळीं केवल दत्तकाला विवाहप्राप्ति आली असतां तिचा वरचे गोतमवचनावरून निषेध केला. जर तुमचा द्यामुष्यायणच दत्तक मानिला तर द्यामुष्यायणाला जनकपितृकुळीं सापिंड्य आहेच अतएव त्या कुळीं द्यामुष्यायणाला विवाहाची प्राप्तीच नाहीं तेव्हां गोतमवचन व्यर्थ पडतें.

---

२ पूर्वीं म्हणजे चालत्या शाखेच्या १ अंकांतल्या.

# मयूख दायभाग

## दत्तकाविषयीं.

अर्जुन त्याची, शूराचा पुत्र जो वसुदेव त्याची कन्या जी सुभद्रा, तिशीं **सापिंड्य** निवृत्ति पूर्वीच्या (१ल्या अंकांतल्या) मनुवचनानें सांगून, **जनक पित्या**चे पुत्रापासून झालेली सुभद्रा आहे तरी तिशीं विवाह करूंनये. असा केवळ विवाहनिषेध वरच्या गौतमवचनानें सांगून अर्जुनानें सुभद्रेशीं विवाह करूनये. अशी आशंका घेऊन वार्तिकग्रंथांत सांगितलेलें जें, "(अर्जुनाचा व सुभद्रेचा साक्षात् संबंध नाहीं) मध्यें व्यवधान आहे, अशी कल्पना करावी." असें समाधान तो सांगतो.

केचिन्मत, सोमेश्वरानें (वरच्या) गौतमवचनावरून कुंतीला शूरकुलीं सप्तपुरुषपर्यंत **सापिंड्य** सांगितलें आहे.

असें कोणी म्हणतो त्याला ग्रंथाचें अध्यन नाहीं म्हणून. कारण सोमेश्वरानें तर (१ल्या अंकांतल्या) मनुवचनें करून **जनकपित्या**च्या कुलीं **सापिंड्य** निवृत्ति प्रथमतः सांगून (वरचें) गौतम वचन **जनक पित्या**च्या कुलीं विवाह करूंनये. अशा निषेधाविषयीं मात्र सांगितलें **सापिंड्य** बोधनाविषयीं नव्हे.

९ याप्रमाणें **केवलदत्तक** व **द्व्यामुष्यायणदत्तक** असा दोन प्रकारचा **दत्तक** सिद्ध झाला असतां, हा पुत्र दोघांचें ही कार्य करणारा होईल. असा करार ही सिद्ध झाला. कारण हा पुत्र **द्व्यामुष्यायण** आहे. असें (पालक पित्याला) समजलें पाहिजे. असें दृष्ट कारण आहे.

१० **केवल दत्तका**ला **पालक पित्या**चे कुलांत सप्तपुरुष पर्यंत व मातृकुलीं पांचपुरुषपर्यंत **सापिंड्य** आहे. केवलदत्तकाचें सापिंड्य.

वृद्धगौतम. स्वगात्रें करून जे **दत्तक क्रीत इत्यादि** पुत्र केले. ते

# मयूखदायभाग

## दत्तकाविषयीं.

त्या विधीनें गोत्र मात्र पावतात. **सापिंड्य** पावत नाहींत.

बृहन्मनु. **दत्तक क्रीत इत्यादि** पुत्रांस जनकाचे कुलीं सप्तपुरुष व पंच पुरुषपर्यंत **सापिंड्य**. **पालक पित्या**नें तर गोत्रमात्र.

नारद. आपल्या गोत्रें करून जे पुत्र **औरसपुत्रा** प्रमाणें धर्मार्थ[1] वाढविले. ते केवळ **पालकपित्या**च्या विभागाचे अधिकारी व पिंड देणारे मात्र होतात (त्यांस पालकपितृकुलाकडचें सापिंड्य नाहीं.)

अशीं जीं हीं वचनें आहेत तीं निर्मूल. कदाचित् समूल मानिलीं तर **ह्या मुख्यायणा**ला **पालकपित्या**च्या कुलीं सप्तपुरुषपर्यंत **सापिंड्य** नाहीं असें प्रतिपादन करितात. कारण पूर्वीं (८ व्या अंकांत) सांगितलेल्या गौतमवचनें करून **केवल दत्तका**ला **पालकपित्या**च्या कुलीं सप्तपुरुषपर्यंत **सापिंड्य** सांगितलें. आणि मनुवचनें[2] करून **जनकपित्या**च्या कुलीं **सापिंड्या**ची निवृत्ति सांगितली आहे.

११ **जनकपित्या**चे गोत्रानें संस्कृत केलेल्या (दत्तकादिकांस) तर **जनकपित्या**च्या कुलीं पित्याकडचें सप्तपुरुषपर्यंत, जननीकडचें पांच पुरुषपर्यंत **सापिंड्य**. **पालकपित्या**चे कुलीं तर तीनपुरुषपर्यंत **सापिंड्य**. कारण **पालकपित्या**वर मुख्य पितृत्वाचें संपादक जें **उत्पादकत्व व उपनेतृत्व**, तें नाहीं म्हणून त्याजवर पितृत्व गौण आहे. **पालकपित्या**चे गोत्रानें संस्कार झालेल्या **दत्तका**ला तर **पालकपित्या**चे कुलीं सात पुरुष पांच पुरुष **सापिंड्य** आहेत.

---

1 धर्मार्थ म्हणजे श्राद्धादिक करण्याकरितां.

---

2 चालत्या शाखेच्या १ ल्या अंकांतल्या.

# मयूखदायभाग

## दत्तकाविषयीं.

कपित्याचें कुळीं सातपुरुष पांचपुरुष सापिंड्य आहेच.

असा जो सापिंड्यनिर्णयस्थळीं कोणी मान्यपुरुषाचा लेख आहे. त्याचें मूळ आह्मी जाणत नाहीं.

१२ अणखीं असें कीं उत्पादकत्व व उपनेतृत्व हे धर्म, पालकपित्यावर नाहींत. अतएव पिताच नो नष्ट मग (त्याचे कुळीं) दत्तकाला तीन पुरुष सापिंड्य तरी कसें? व पालकपिता इत्यादिकाचें श्राद्ध करण्याचा अधिकार तरी कसा? (समाधान) पितृत्व व सापिंड्य हीं नियमें करून एकाच ठिकाणीं राहतात असें नाहीं. जर असें असतें तर मग पालकपित्यावर पितृत्व नाहीं अतएव सापिंड्य नाहीं हें म्हणणें समर्पक होतें.

१३ वस्तुतः तर "जनकपित्याचे पितृबंधूकडून सप्तपुरुषानंतर" अशा गौतमादिकांच्या[१] वचनांकडून पालकपित्याशीं सापिंड्य पूर्वीं सांगितलेंच आहे.

## शाखा १०

आतां पुत्राचें दान व ग्रहण याचा विधि.

१ अनेकपुत्र असल्यास ज्येष्ठावांचून इतर पुत्र देण्याविषयींच सर्वांस अधिकार आहे. — ज्येष्ठपुत्र देण्याविषयीं अधिकार नाहीं.

---

१ (ह्या शाखेंतील गौतम वचन व आदिशब्दें करून मनुवचनादिक.

# मयूख दायभाग

## दत्तकाविषयीं.

पुत्र घेण्याविषयीं तर ज्यास मुळीं पुत्र झालाच नाहीं. किंवा होऊन मेला त्यास अधिकार. पुत्र घेण्याविषयीं निपुत्रिकास अधिकार.

स्त्रिया सभर्तृक असल्यास नवऱ्याच्या आज्ञेनें अधिकार. नवरा नसल्यास बाप वगैरेच्या आज्ञेनें अधिकार. स्त्रियांस नवऱ्याच्या आज्ञेनें अधिकार.

शूद्रांनीं **दौहित्र** किंवा **भागिनेय** घ्यावा. (या दोघांतून एखादा असतां) दुसरा घेऊं नये. शूद्रांस दौहित्र भागिनेय दत्तक.

वरकडांनीं जवळचा **सपिंड**. त्याच्या अभावीं दूरचा (सपिंड) घ्यावा. परंतु अन्यजातीचा घेऊं नये. वरकडांस जवळचा सपिंड.

२ येथें पुत्र देणारानें **प्रतिग्रह** दिवशीं देशकालादिस्मरण करून नंतर आमचा व या पुत्राचा विद्यमान जो पितापुत्रादि संबंध, तन्निमित्तक जीं तीं तीं कार्यें त्यांची निवृत्ति होण्यासाठीं व **पालकपिता इत्यादिकांचा** व या पुत्राचा जो परस्पर पितापुत्रादि संबंध तं निमित्तक जीं तीं तीं कार्यें त्यांची प्रवृत्ति होण्यासाठीं पुत्रदान करितों. असा संकल्प करून गणेशपूजा, स्वस्तिवाचन, मातृकापूजा, वृद्धिश्राद्ध, **इत्यादि** सकल कर्म करावें. पुत्रदेण्याचा विधि.

३ पुत्र घेणारानें (पालकपित्यानें) तर पुत्र घेण्याचे पूर्वदिवशीं उपोषण करून दुसऱ्या दिवशीं **बांधवांस** बोलावून, पुत्र घेण्याचा प्रकार सरकारांत कळवून, देशकालादि संकीर्तन करून, **दत्तक** घ्यावयाचा जो पुत्र व त्याचे जनकादिक, यांचा विद्यमान जो परस्पर पितापुत्रादि तो तो संबंध त्यांची निवृत्ति होण्यासाठीं आमचा व त्याचा परस्पर जो पितापुत्रादि तो तो संबंध तन्निमित्तक कार्यांची प्रवृत्ति होण्यासाठीं, पुत्र घेतों. असा संकल्प करून गणेशपूजा, स्वस्तिवाचन, मातृकापूजा, वृद्धिश्राद्ध, आचार्यवरण करून, व कुंडलें, पवित्रक, धोत्रजोडा, पागोटें, **इत्यादिकें** करून संकल्पपूर्वक आचार्यपूजन दत्तपुत्रघेण्याचा विधि.

करून (किमान पक्ष) तीन ब्राह्मणांस व **बांधवां**स जेऊं घालावें.

४ नंतर आचार्यानें[1] स्वकर्म करितों असा संकल्प करून साद्यंत होम कर्म करावें. (असें प्रासंगिक परिसमाप्त केलें.)

## शाखा ११

आतां प्रकृतास अनुसरतो. ऋणवि
भागाविषयीं विशेष सांगतो.

कात्यायन १ बापाचें साक्षात्कर्ज, बापाचें कर्ज फेडण्यासाठीं काढिलेलें कर्ज, कुटुंबपोषणार्थ कोणीही केलेलें, व स्वतां केलेलें असें कर्ज भावानीं विभागकाळीं वांटून घ्यावें. अविभक्त दशेंतलें कर्ज विभागकाळीं वांटून घ्यावें.

कात्यायन भावानें चुलत्यानें (किंवा) आईनें जें कुटुंबार्थ केलेलें कर्ज असेल तें सर्व, विभाग काळीं वारिशानीं फेडावें.

जिंदगीपेक्षां कमी कर्ज असल्यास त्याविष
यीं नाच सांगतो.

कात्यायन. २ कर्ज व (बापानें) संतोषानें **प्रतिश्रुत** केलेलें देऊन बाकी (जिंदगी) वांटून घ्यावी. कर्ज फेडून बाकीची जिंदगी वांटून घ्यावी.

नारद. पित्यानें **प्रतिश्रुत** केलेलें देऊन व पित्यानें कर्ज फेडून अवशिष्ट राहील तें भावांनीं वांटून घ्यावें. अन्यथा पिता ऋणी राहील.

---

१ स्वकर्म म्हणजे त्याविषयीं ज्ञान आचार्यतान्त्रीनुसारी घतलो आहेतें.

# मयूखदायभाग

## दत्तकाविषयीं.

नारद. पित्यांनें धर्मार्थ किंवा संतोषानें **प्रतिश्रुत** केलेलें व त्यानें स्वताचें कर्ज, आणि जी विद्यमान जिंदगी ही दोन्ही वांटून घ्यावीं. याशिवाय दुसरें[1] कर्ज बापाच्या जिंदगींतून फेडूं नये.

काहीं जिंदगी कोणी वंचना करून ठेविली. अशी शंका झाल्यास ही तोच सांगतो.

नारद. ३ घर, **क्षेत्र**, पशु, जें कांहीं विद्यमान आहे तें वांटून घ्यावें कोणी वंचनाकरून ठेविल्याची शंका झाल्यास विश्वासाचें कारण सांगितलें आहे कीं घरांतील साहित्य, पागळ, गुरें, दागिने, दास, दासी, हीं विद्यमान असतील तीं वांटून घ्यावीं. वंचना केली असल्यास **कोशदिव्य** द्यावें असें मनु बोलला. समायिकांतून कांहीं लपवूनठे विल्यानें वांटे.

अतएव वंचित द्व्याविषयीं **दिव्य**प्रकरणीं मनु **कोशदिव्य**च नियमित करितो.

मनु. ४ शंका, अविश्वास याविषयीं व वारिशांचा विभाग, पाथीनें उदीम किंवा कसब, करणाराविषयीं **कोशदिव्य**च द्यावें.

## शाखा १२

अविभाज्यधन.

---

१ दुसरें म्हणजे व्यसनानिमित्त केलेलें व तमासगीर वगैरेस देऊं केलेलें व वांटेकरणारानीं ही कुटुंबपोषणाशिवाय केलेलें.

# मयूखदायभाग

## अविभाज्यधन

मनु. १ जें ज्यानें विद्येवर मिळविलें असेल तें त्याचें धन. तसेंच **मैत्र**, **वैवाहिक**, **माधुपर्किक** हीं. अविभाज्यधनें.

व्यास. विद्येवर मिळविलेलें, शौर्यावर मिळविलेलें, व **सौदायिक**[1], हीं संपादकाचींच. विभाग काळीं वारिशांनी त्याजकडे पाहूं नये.

२ हीं (वर सांगितलेलीं) द्रव्यें आईबापाचें द्रव्य न खर्चितां संपादलेलीं असल्यास **अविभाज्य** जाणावीं.

याज्ञवल्क्य. (मि० पृ० २३७ अंक १ मूळ) आईबापाचें द्रव्य न खर्चितां जें स्वतां संपादिलेलें, तसेंच[2] **मित्रलब्ध**, **विवाहलब्ध**, वारिशांस मिळणार नाहीं. तसेंच हरण केलेलें परंपरागत द्रव्य संपादिलें जातें तें, व **विद्यालब्ध**, हीं वारिशांस देऊं नये.

हरण केलेलें परंपरागत स्थावर हस्तगत केलें असल्यास त्याविषयीं सांगतो.

शंख. ३ पूर्वीं हरण केलेली परंपरागत भूमि जो कोणी हस्तगत करितो त्याला चतुर्थांश देऊन इतरानीं यथाविभाग वांटून घ्यावी. हरण केलेलें परंपरागद द्रव्य हस्तगत करणारास चतुर्थांश अधिक.

हस्तगत केलेल्या भूमीचा चतुर्थांश **उद्धारका**स देऊन बाकीची भूमि **उद्धारका**सुद्धां सर्वांनीं वांटून घ्यावी.

मनु. आईबापाचें द्रव्य न खर्चितां मेहेनतीनें (सेवायुद्धादिकें करून) जें संपादिलें त्याचा विभाग वारिशांस देऊं नये. व **विद्याधन** ही देऊं नये.

---

१ सौदायिकधनाचें स्वरूप ५८० च्या अंकांत पाहावें.

---

२ तसेंच म्हणजे आईबापाचें द्रव्य न खर्चितां याचा प्रत्येक द्रव्यावर अन्वय याचप्रमाणें च पुढेंही जाणावें.

# मयूखदायभाग

## अविभाज्यधन

व्यास. आई बापांच्या द्रव्याचा आश्रय न करिता स्वशक्तींनें जें संपादिलें तें व तसेंच **विद्याधन** वारिशांस देऊं नये.

**विद्याधनाचें** स्वरूप सांगतो.

कात्यायन. ४ परान्नभोजनें करून जी विद्या संपादिली त्या विद्येकडून मिळालें जें तें **विद्याधन** म्हटलें आहे. विद्याधनाचें स्वरुप.

**विद्याधन** अणखीं विशद करून तोच सांगतो.

कात्यायन. प्रतिज्ञापूर्वक उपन्यास करून मिळविलेलें **विद्याधन** म्हटलें आहे. त्या **विद्याधनाचा** विभाग नाहीं. शिष्यापासून, तसेंच **आचार्यापासून**, सभेंत पूर्वपक्ष करून, किंवा संदिग्ध प्रश्नाचा निर्णय सांगून, अथवा आपलें ज्ञान प्रख्यापन करून, अगर विप्रतिपत्ति जिंकून जें मिळविलें तें **विद्याधन** म्हटलें आहे. त्याचा विभाग नाहीं. कारागीर लोकांविषयीं हाच विधि. म्हणजे किमतीपेक्षां अधिक मिळेल तें त्याचें **विद्याधन** म्हटलें आहे. विद्येंत प्रतिज्ञापूर्वक दुसऱ्यास जिंकून मिळविलें तें ही **विद्याधन** म्हटलें आहे त्याचा विभाग नाहीं. असें बृहस्पति (म्हणतो) यज्ञांत **ऋत्विजास** मिळालेलें अथवा शिष्यापासून (गुरूला) मिळालें तें सर्व **विद्याधन** असें भृगु म्हणतो.

वचनांत आरंभीं "उपन्यासकरून" असें म्हटलें तेथें उपन्यास म्हणजे संकलित अशा क्रमजटादिकांचा पाठ हें मदनरत्नाचें मत. गूढप्रमेयाचें सभेंत विवरण करणें असेंही कोणी म्हणतात.

५ सर्वत्र विद्या व तत्संपादित धनही आईबापाचें द्रव्य न खर्चितां संपादिलीं असल्यास **अविभाज्य**, द्रव्य खर्चून संपादिलीं असल्यास **विभाज्य** न. पित्रद्रव्यखर्चूनसंपादिलेलें विद्याधनविभाज्य.

## अविभाज्यधन

म्हणूनच कात्यायन सांगतो.

कात्यायन. कुलापासून किंवा बापापासून विद्या संपादून तद्द्वारा द्रव्य संपादिलें तसेंच शौर्येंकरून संपादिलें तें भावानीं वांटून घ्यावें. असें बृहस्पति म्हणतो.

६ आई बापांचें द्रव्य खर्चूनि ही संपादिलें तरी संपादकानें दोन हिसे घ्यावे. पितृद्रव्य खर्चूनि संपादिलें त्यांतें संपादकास दोन हिसे.

वसिष्ठ. भावांमध्यें जो कोणी स्वतां संपादन करील तो दोन हिसे घेईल.

कांहीएक **विद्याधना** विषयीं विशेष सांगतो.

नारद. ७ विद्याध्ययन करणाऱ्या भावानें कुटुंबपोषण जो करितो तो **अश्रुत** असला तरी त्या **विद्याधना**चा विभागी होतो. कुटुंबपोषण करणारास विद्याधनाचा विभाग.

**अश्रुत** म्हणजे विद्याहीन असें मदनरत्नाचें मत. **विद्याधना**तील भाग तुला देईन. असा ज्याशीं करार केला नाहीं तो. हाच अर्थयुक्त.

आई बापाचें द्रव्य न खर्चितां संपादिलें त्या द्रव्याविषयीं विशेष सांगतो.

गौतम. ८ विद्वानानें इच्छा असल्यास स्वसंपादित द्रव्याचा विभाग विद्वान भावांस द्यावा. विद्वानाला विद्याधनाचा हिसा नाहीं.

कात्यायन. विद्वानानें अविद्वानांस **विद्याधन** कधीं देऊं नये. बरोबरीचे किंवा अधिक विद्वान आहेत त्यांस द्यावें. इच्छा नसल्यास विद्वानानें विद्वानांस स्व संपादित धनाचा हिसा देऊं नये. परंतु तें **विद्याधन** आई बापांचें द्रव्य न खर्चितां संपादिलें असल्यास.

**विद्याधना**चा हिस्सा भावांस देऊं नये. असा वर निषेध सांगितला

# मयूख दायभाग

## अविभाज्यधन

तो भावांस, या शिवाय दुसरें द्रव्य असल्यास समजावा. द्रव्यांतर नसेल तर त्यांस ही हिस्सा द्यावा. असें मदनानें मत.

आई बाप वगैरेनीं दिलेलेंही **अविभाज्य**. असें सांगतो.

बृहस्पति. ९ आजा, बाप, आई, यांनीं ज्यास जें दिलें असेल तें त्याचेंच, तसेंच **शौर्यसंपादित** व **स्त्रीधन** ही. या धनांचा कोणी अपहार करूं नये. — आई बापांनीं जें ज्याला दिलें असेल त्याला विभाग नाहीं.

नारद. **शौर्यधन स्त्रीधन** व **विद्याधन** हीं तिन्ही **अविभाज्य**. आणि बापानें जें ममतेनें दिलें असेल तेंही.

कात्यायन. **ध्वजाहृत** असेल तें अविभाज्य. **ध्वजाहृत** म्हणजे जें शत्रूचें सैन्य पळवून (त्याचे निशाणापर्यंत जाऊन) संग्रामांतून आणिलें तें. व संकट समयीं स्वामीसाठीं प्राणत्याग करून मिळविलें तेंही. — ध्वजाहृत द्रव्याचा विभाग नाहीं

कात्यायन. कदाचित् प्राणनाशही होईल अशा संशयित स्थळावर चढून साहसकर्म करण्यानें धन्याची मर्जी संतुष्ट करून जें मिळविलें तें **शौर्यसंपादित** म्हटलें आहे.

याविषयीं विशेष सांगतो

व्यास. १० समायीक वाहनादिकाचा (किंवा शस्त्रादिकाचा) आश्रय करून पराक्रमानें द्रव्य संपादन करितो तर त्याविषयीं भाऊ विभागी होतात. परंतु संपादकास दोन हिस्से देऊन बरकडांनीं समविभाग घ्यावे.

## **सौदायिक** धनाचें स्वरूप.

व्यास. ११ लग्न झाल्यानंतर नवऱ्याचे घरीं नवऱ्यापासून, किंवा कन्या असतां माहेरीं भावांपासून अथवा आईबापांपासून मिळतें तें **सौदायिक** म्हटलें आहे. — सौदायिक धनाचें स्वरूप.

# मयूखदायभाग.

## अविभाज्यधन

कात्यायन. सजातीय कन्येशीं विवाह करितानां जें मिळतें तें **कन्यागत**. तें द्रव्य तिचें शुद्ध. व शुद्धिकरणारें म्हटलें आहे. जें भार्यावस्थेंत मिळालें तें तर तिचें **वाहिक** द्रव्य. हें व अशा प्रकारेंचें मिळालें तें सर्वद्रव्य धर्माचें साधन जाणावें.

**आर्षविवाह** तर "वरापासून दोन गाई घेऊन कन्या दिली जाते तो" अशा प्रकारें लब्ध जें तें **कन्यागत.**

हें (वर सांगितलेलें सौदायिक स्त्रीधन) ही **विद्याधना** प्रमाणेंच आई बापाचें द्रव्य न खर्चितां मिळालें असल्यास **अविभाज्य.**

१२ विद्या (किंवा शौर्य) **इत्यादि** साधनावांचून दुसऱ्या उपायांनीं मिळविलेलें तर **विभाज्य** च. शेतकीवगैरेकडून मिळलें तें विभाज्य.

मनु अविद्वान भावांनीं आईबापाचें न खर्चितां शेतकी वगैरेकडून धन मिळविलें तर सर्वांस समविभाग. असा निर्णय.

## शाखा १३

अणखीही **अविभाज्य** द्रव्यें मनु सांगतो.

मनु. वस्त्र, वाहन, अलंकार, **कृतान्न**, उदक स्त्रिया, **योगक्षेम**, **प्रचार** हीं अविभाज्य द्रव्यें म्हटलीं आहेत. दुसरीं अविभाज्य द्रव्यें

अर्थ.

१ जें वस्त्र, वाहन, किंवा अलंकार, जो वहिवाटींत असेल तें त्याचेंच परंतु समान किमतीचें असल्यास. कम जास्ती असल्यास वांटून घ्यावें. जो जें वस्त्रादिक वहिवाटीत असेल तें त्याचेंच.

# मयूख दायभाग

## अविभाज्य धन.

२ पित्यानें वापरलेलें वस्त्रादिक तर त्याच्या श्राद्धीं जेवणाऱ्या ब्राम्हणास द्यावें. पित्याचें वस्त्रादिक तर ब्राम्हणास द्यावें.

बृहस्पति. वस्त्र, अलंकार, शय्या, वाहन, **इत्यादिक** जें पित्याचें असेल तें पिता मरण पावल्यानंतर गंधपुष्पादिकें करून पुजून श्राद्धीं उपविष्ट ब्राम्हणास द्यावें.

शेळ्या वगैरे विषम असल्यास त्याविषयीं

विशेष सांगतो.

मनु. ३ शेळ्या बकऱ्या आणि **एकशफ** हीं विषम असल्यास वांटून येत. शेळ्या बकऱ्या **एकशफ** हीं ज्येष्ठानेंच घ्यावीं. एकशफ ज्येष्ठानेंच घ्यावें.

४ **कृतान्न** व उदक (वापी कूप इत्यादिक) यांचा यथासंभव उपयोग करावा. दासी ही विषम असल्यास त्यांजकडून पाळीनें काम घ्यावें. सम (विभागपर्याप्त) असल्यास वांटून घ्याव्या. पित्याच्या **अवरुद्धा** तर सम असल्या तरी वांटून येत. वापीकूपादिकांचा यथासंभव उपभोग करावा.

गौतम. उपभोगार्थ नियमित केलेल्या स्त्रियांचा विभाग नाहीं.

५ **योगक्षेम** शब्दें करून मंत्री उपाध्याय **इत्यादिक** घ्यावे. असें कल्पतरूंत सांगितलें आहे. योगक्षेमाचा विभाग नाहीं

लौगाक्षी. **क्षेम** म्हणजे **पूर्त** आणि **योग** म्हणजे यज्ञादिक, असें तत्ववेत्ते म्हणतात. ते **योगक्षेम** व शयन, आसनें, यांचा विभाग नाहीं.

**पूर्त** म्हणजे तळीं बाग **इत्यादिक** आणि **इष्ट** म्हणजे याग, ब्राम्हणभोजनादिक, त्या **इष्टा**साठीं किंवा **पूर्ता**साठीं जें द्रव्य ज्यानें सर्वानुमतीनें निराळें ठेविलें असेल त्या द्रव्याचा त्यानेंच उत्सर्ग करावा. दुसऱ्यानें करूं नये. किंवा सर्वांनीं मिळून ही करूं नये असें तात्पर्य.

# मयूखदायभाग

## अविभाज्यधन

६. **प्रचार** म्हणजे गृहादिकांत जाण्यायेण्याचा मार्ग किंवा गाई वगैरे चारण्याचें रान, (तो मार्ग व तें रान हीं अविभाज्य.) — गृहादिमार्ग किंवा गाई चारण्याचें रान यांचा विभाग नाहीं.

शंखलिखित. घराचा विभाग नाहीं व उदकपात्र[1], दागीना, उपभुक्तवस्त्रें, यांचा ही (विभाग नाहीं.)

व्यास. **याजना** पासून लब्ध व **क्षेत्र**, वाहन, **कृतान्न**, उदक, (वापी कूपादिक) स्त्रिया[2], यांचे वांटे स्वगोत्राचीं सहस्र कुळें होईपर्यंत ही होऊं शकत नाहींत.

असा जो गृह**क्षेत्र** यांच्या विभागाचा निषेध सांगीतला तो तीं **गोप्रचार**, जमीन, घरें, धर्मार्थ असल्यास त्याविषयीं. अथवा **प्रतिग्रहा**नें संदिन जीं **प्रचार**, जमीन, घरें, यांचा क्षत्रियादिपुत्रांस विभाग मिळण्याविषयीं. कारण **प्रतिग्रहा**नें संपादित गृह **क्षेत्रा**दिकाचा क्षत्रियापुत्रांस विभाग देऊं नये. असा पूर्वीं निषेध सांगितला आहे. किंवा घर जमीन **प्रचार** हीं अल्पमूल्य असल्यास किंमत करून त्याद्रव्याचा विभाग करावा.

वस्त्रादिकांचे विभागाविषयीं विशेष सांगतो.

बृहस्पति. ७ वस्त्रादिक **अविभाज्य** असें ज्यांनीं सांगीतलें त्यांनीं विचार के — वस्त्रें दागिने इत्यादिकांचा भागाचा प्रकार.

---

1 उदकपात्र म्हणजे पाणी सांठवण्याचीं मोठमोठालीं भांडीं डोणी इत्यादिक तीं जसजसा ज्यास उपयोग पडेल ममतेनें वहिवाटावीं

उदकप्राशनार्थ वगैरेसाठीं जें भांडें ज्याच्या वहिवाटीस असेल तें. असा कोणी अर्थ करितात.

उदकपात्रशब्देंकरून उदकाचे आधारभूत जें वापी कूपादिक तें असें दुसऱ्याचें मत.

---

2 स्त्रिया म्हणजे पित्यानें ठेवलेल्या. किंवा दासी विषम असल्यास त्याही.

# मयूख दायभाग

## अविभाज्यधन

ला नाहीं. कारण धनिकानें धन कापड दागीने हेंच असतें. यास्तव त्याचा उपभोग न घेतां समायीक ठेवावें. व तें एकटा घेऊं शकत नाहीं. अतएव त्याचा विभागच करावा. न केल्यास तें निरर्थक होईल. वस्त्रें दागीने विकून त्याच्या मूल्यद्रव्याचा विभाग करावा. लिहिलेलें कर्ज वसूल करून वांटून घ्यावें शिजलेलें अन्न ही कोरड्या अन्नाशीं बरोबर करून वांटून घ्यावें. **वापी कूप** याचा उपयोगानुसार पाणी घेण्यानें उपभोग करावा. दासी एक (म्हणजे विषम) असल्यास पाळीनें दर घरचें काम घ्यावें. बहुत असल्यास समविभाग वांटून घ्याव्या. दासां विषयींही हाच प्रकार. **सेतु, क्षेत्र**, ही यथाविभाग वांटून घ्यावें. **प्रचार** ही वारिशानी नेहमी चाली प्रमाणें वहिवाटावा.

कात्यायन. "हें इतकें धमार्थ" असा लेख करून ठेविलेलें जें धन तें, उदक, दास, परंपरागत **निबंध** आणि वापारलेलें व जें विभाग योग्य नव्हे असें वस्त्र, अलंकार, हीं सर्व भावांनीं कारणानुसार वहिवाटावीं.

भावांतून कोणी वंचना करून ठेविल्या द्रव्या चा विभाग याज्ञवल्क्य (मि० पृ० २६२ अं०१ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. ८ परस्परांनी अपहार केलेलें द्रव्य विभाग झाल्या नंतर जें उघाडीस येतें तें पुन: समविभाग वांटून घ्यावें असी शास्त्र मर्यादा आहे. लपवून ठेविलेल्या द्रव्याचा विभाग.

येथें परस्परांनीं म्हणजे ज्येष्ठ कनिष्ठ **इत्यादिकानी**

मनु. जो वडील भाऊ लोभानें धाकट्या भावांशीं प्रतारणा करितो. तो वडील विभागहीन करून **राजांनी** त्याला शिक्षा करावी.

असा जो मनूनें ज्येष्ठास दोष सांगितला तो **दंडापूपिकान्यायें** करून सर्व **दायादांस** येतो. म्हणजे वडील भाऊ वंचना करील तर त्यास

ही दोष. मग धाकट्यांस दोष येईल हें काय सांगावें. असें तात्पर्य.

गौतम. विभाग योग्याला जो विभाग देत नाहीं त्याला तो भागापासून भ्रष्टक रितो. व तो विभागापासून भ्रष्ट झालेला आपल्यास भाग न देणाराचा नाश करितो. जर त्याचा नाश करीत नाहीं तर त्याच्या पुत्राचा किंवा पौत्राचा नाश करितो.

नारद. ९ विभक्तानें जें संपादिलें असेल तें त्याचेंच. परंतु हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें सांपडलें तें, व वर (८व्या अंकांत) सांगितलेलें, याचा पुनः विभाग होतो.

मनु. विभाग केल्यानंतर जर अणखी समायीक द्रव्य समजण्यांत आलें तर पूर्वीं केलेला विभाग नाहीं. यास्तव पुनः विभाग करावा. — पूर्वविभागांत छविमझाल्यास पुनः विभाग

## शाखा १४

विभक्तभावांतून कोणी विभागाचा निन्हव केल्यास निर्णयसाधनें याज्ञवल्क्य (भि० पृ० ३२५ शाखा २४ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. १ विभागाचा निन्हव केला असतां ज्ञाति, **बांधव**, साक्षी, लेख, व स्थावरांचे वांटे, यांकडून विभाग निर्णय करावा. — विभागाचा निन्हव केला असतां निर्णयोपाय.

नारद. विभाग झाला किंवा नाहीं असा संदेह असल्यास ज्ञातीकडून, विभागपत्रावरून, व निराळें कर्म (पंचमहायज्ञादिक) करीत असल्यास त्यावरून वारिशांचा विभाग निर्णय करावा. कारण **अविभक्त** भावांचा सर्व मिळून एकत्र धर्म (पंचमहायज्ञादिक) चालत असतो. विभक्त झाल्यानंतर धर्महीं निर

निराळा होतो.

१ या वचनांतील "**अविभक्त**" हेंच पद उद्देश्य. आणि "भावांचा" हें **अविभक्तांचें** विशेषण. तेणें करून **अविभक्तांस** उद्देश करून एकधर्म प्रवृत्तीचें कथन केलें भावांस उद्देश करून केलें नाहीं. (तेणें करून वचनांत "अविभक्त भावांचा" असें आहे तेथें भाऊ **अविभक्त** असतां, इतका अर्थ झाला.) अतएव पिता, पितामह, पुत्र, पौत्र, चुलते, पुतणे, **इत्यादिक** हे **अविभक्त** असतां एकच धर्म चालतो.

"प्रयोगभेद असला तरी देश, काल, कर्ता, **इत्यादिकांचें** ऐक्य आहे तर तंत्रें करून कर्म होतें." अशी कर्माची तंत्रता न्यायें करून प्राप्त आहे. अतएव येथें श्राद्ध करणारे भिन्न आहेत म्हणून जरी तंत्रता न्यायें करून येथें प्राप्त नाहीं तथापि वचनें करून बोधित होत्ये. तेणें करून श्रौतस्मार्त अग्निसाध्य जे धर्म ते **अविभक्तांचे** निरनिराळेच. कारण **आहवनीय अवसथ्य इत्यादि** संबंधानें कर्म करणारे भिन्न आहेत. याप्रमाणेंच **अविभक्त** चुलते पुतण्यानीं करावयाचें जें अमावास्यादि श्राद्ध तेंही निरनिराळेंच. कारण दोन्ही श्राद्धाच्या देवता भिन्न आहेत भाऊ असूनही **निरग्निक** आहेत तर तंत्रें करूनच कर्म होतें. कारण पितृरूप देवता संबंधी एकच. प्रवासादि कारणानें देशभेद झाल्यास श्राद्धही निरनिराळेंच कारण देशभेद आहे. भाऊ **आहिताग्नी** असल्यास त्यांचें **अग्निसाध्य** कर्म निरनिराळें. परंतु गृहदेवतापूजा, वैश्वदेव, **इत्यादि** कर्म तर तंत्रें करूनच. देशकालकर्तादेवता हीं एक असल्यास एकतंत्रानें सकल कर्म होतें.

शाकल. **अविभक्त** असून एकपाकें करून राहणारे जे त्यांचे घरांत देवार्चन

---

१ भाऊ हें विशेषण आणि अविभक्त हें विशेष्य. भाऊ शब्द अणखी जे कोणी अविभक्त असतील त्यांचा उपलक्षक.

## मयूख दायभाग.

व वैश्वदेवही एकच. विभक्तांचें तर दर घरीं निरनिराळें कर्म.

आश्वलायन. ३ विभक्त असले तरी एका पाकेंकरून राहणारे जे त्यांत जो मुख्य असेल त्यानें ब्रम्हयज्ञपूर्वक चारी **महायज्ञ** (वैश्वदेव, श्राद्ध, होम, अतिथिभोजन) करावे. विभक्त होऊन **अविभक्त** झाले. परंतु निराळा पाक करून राहत आहेत. अशा **द्विजानीं** प्रतिदिवशीं भोजना पूर्वी **पंच महायज्ञ** निराळे करावे.

असें जें पारिजातग्रंथांत आश्वलायनवचन आहे तें **संसृष्टीं** विषयीं, कारण वचनांतील "विभक्त असले तरी एकपाकेंकरून राहणारे" या वाक्यें करून "विभक्त होऊन **अविभक्त** झाले." या वाक्येंकरूनही **संसृष्टी** चेंच प्रतिपादन केलें आहे. यास्तव **संसृष्टी**चा कदाचित् पाक निराळा झाल्यास **पंचमहायज्ञ**ही निराळेच.

४ ब्रह्मयज्ञपूर्वक म्हणजे ब्रह्मयज्ञ आहे पूर्वी ज्यांच्या असे. येथें ब्रम्हयज्ञास सोडून पुढचे चार यज्ञ घ्यावे. ब्रम्हयज्ञ तर ज्याचा त्याने निराळा करावा.

परंतु हें (आश्वलायनाचें) वचन हय शिष्ट तसें मानीत नाहींत.

स्मृति. ५ **अविभक्त** पुत्रांनीं सर्वांमिळून आई बापांचें सांवत्सरिक एकच करावें. भिन्नदेशीं राहत असल्यास दर्श, श्राद्ध, मासिक, हें निरनिराळें करावें. **अविभक्त** असूनही ग्रामांतर करतील तर दर्श, मासिक, श्राद्ध, निरनिराळें करावें. **अविभक्त** व एका गावांत न राहणारे व आपापले मिळवून खाणारे आहेत त्यानीं सांवत्सरिक, **पार्वण** पृथक् करावें.

स्मृति. (**अविभक्त** असून) देशांतरीं राहत असल्यास वैश्वदेव, सांवत्सरिक, महालय, हें ज्याचें त्यानें पृथक् करावें. तसेंच दर्श श्राद्धही.

अशीं जीं धर्मप्रवृत्तीत व स्मृतिसमुच्चयांत वचनें आहेत. तीं भिन्नदेशीं राहणारे जे **संसृष्टी** त्यांविषयीं असें कोणी म्हणतात व रूढ: तर

# मयूखदायभाग

चीं निर्मूलिच. अथवा देश,काल, कर्त्ता, **इत्यादिकांचें** ऐक्य असल्यास तंत्रता **न्यायें** करून प्राप्त आहे. कर्ता भिन्न असला तरी तंत्रें करून कर्म करावें असें वचनें करून प्राप्त होतें. देशभेद असल्यास तर वचनाची च **न्यायाची** प्रवृत्ति नाहीं अतएव श्राद्धादिक पृथक् करावें अशीं युक्तिमूलक हीं वचनें कोणी केलेलीं आहेत.

आणखीही विभागाचीं चिन्हें सांगतो.

नारद. ६ साक्ष, जामिनकी, कर्ज देणें घेणें, हे व्यवहार विभक्त भाऊ परस्पर करितात. **अविभक्त** भाऊ करीत नाहींत, पशू, अन्न, घर, **क्षेत्र**, यांचा **प्रतिग्रह** विभक्तांचा निराळा होतो. तसाच लेख, **आगम** खर्चही निराळे होतात. लोकांत हे व्यवहार ज्या **दायादांचे** आपापल्यांत होतात ते विभागपत्रावांचूनही विभक्त झाले असें समजावें. विभागाचीं चिन्हें.

७ पशू अन्न **इत्यादिकांचे प्रतिग्रह** (किंवा खरेदी वगैरे) निरनिराळे असले तरच लोकांनते (प्रतिग्रहादिक) सत्ता उत्पन्न करितात. **अविभक्तां**तून तर एखाद्यानें जरी **प्रतिग्रहा**दिक केलें तरी इतरांची सत्ता होय.

बृहस्पति. जमा खर्च, गहाण, सावकारा, आणि उदीम, हे व्यवहार जे परस्पर निरनिराळे करितात ते निःसंशय विभक्त झाले असें समजावें.

याज्ञवल्क्य. (मि० पृ० १३८ अंक १ मूळ) भाऊ, पितापुत्र, स्त्रीपुरुष, हे **अविभक्त** असतां यानी जामिनकी, कर्ज, साक्ष, हे व्यवहार करूं नयेत. असें सांगितलें आहे.

हीं (वर सांगितलेलीं) विभाग चिन्हें नसल्यास विभागाविषयीं **दिव्यप्रमाण**.

याज्ञवल्क्य. (मि० पृ० ६२ अंक १ मूळ) यांतून कोणतें न मिळे तर **दिव्यप्रमाणां**तून एखादें घ्यावें.

# मयूख दायभाग

वृद्धयाज्ञवल्क्य. विभागाविषयीं संशय आल्यास **बांधव**, साक्षी, विभागपत्र, यांकडून निर्णय करावा. **दिव्य** घेऊं नये.

असें जें वचन आहे तें ही दुसरीं विभागचिन्हें असल्यास **दिव्य** घेऊं नये. सर्वथा **दिव्य** करूं नये असें नाहीं.

विभक्त किंवा **अविभक्त** आहेत अ

सा संदेह कोणत्याही प्रकारें न जाईतर

पुनः विभाग सांगतो.

मनु. ८ वारीश जरी निराळे राहिले असले तरी विभागाविषयीं संदेहझा ल्यास पुनः विभाग करावा. विभागाविषयीं संदेह नजाई तरपुनः विभागहोतो.

विभाग झालेल्याचीं कृत्यें सांगतो.

नारद. ९ जे वडत भाऊ **पंचमहायज्ञ**, उदीम, निरनिराळे करीत आहेत. व ज्यांची घर शेत **इत्यादिकांचीं** ओतें निराळीं आहेत. व व्यवहारांत परस्परांची अनुमति न घेतां स्वेच्छेनें देतात. किंवा विकतात. व आपापल्या धनाचा यथेष्ट विनियोग करितात. ते निःसंशय विभक्त झालेले समजावे. विभक्तांचीं कृत्यें.

विभक्तांनीं परस्परांची अनुमति न घेतां **दान विक्रया** दिक व्यवहार करावे.

बृहस्पति. १० दायीज विभक्त किंवा **अविभक्त** असोत. स्थावर मालाविषयीं एक सारिखेच अधिकारी. अतएव (स्थावरांचें) गहाण. **दान विक्रय** करण्याविषयीं एकटाच धनी नाहीं. स्थावरमालाविषयीं सर्वांनें सामिलसारखें

असें जें वचन तेंही जंगमद्रव्याविषयीं. विभक्त असले तरी **अविभक्त** अशा **क्षेत्रा**दिकापासून उत्पन्न जें धान्यादिक त्याचे दानादिकाविषयीं परस्परांच्या अनुमतीवांचून एकट्याला अधिकार नाहीं. असा निषेध दाखविण्यासाठीं. असें मदनाचें मत. विभक्त किंवा **अविभक्त** असा संशय नहोतां व्यवहार सुरळीत व्हावा. एतदर्थ सर्वांची अनुमति.

केवळ एकास अधिकार नाहीं असें नव्हे. असें मिताक्षरेंत (पृ० २२६ अंक १९) सांगितलें आहे.

स्वेच्छेनें विभाग होऊन पुनः वांट्यासाठीं भांडूं लागल्यास त्याविषयीं सांगतो.

मनु. ११ स्वेच्छेनें विभाग करून पुनः भांडूं लागले तर **राजानें** त्याचा जो झालेला वांटा आहे तोच खचित करून त्याला शिक्षा करावी. स्वेच्छेनेविभागघेऊनपुनःवांटामागणारासदंड

## शाखा १५

आतां अटकावलेला (सप्रतिबंध) **दाय** घेण्याविषयीं वारिसांचा क्रम दाखवितो. त्यांत विभक्त व **असंसृष्ट** निपुत्रिक मेला असतां जिंदगी घेण्याचा क्रम याज्ञवल्क्य (मि० पृ० २०३ अंक १ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. १ सर्व ज्ञातींत निपुत्रिक मरण पावला असतां त्याच्या जिंदगीचे वारीस **पत्नी**, कन्या, जननी, बाप, भाऊ, पुतण्ये, **गोत्रज**, **बांधव**, शिष्य, **सब्रम्हचारी** यांतून पहिल्याच्या अभावीं दुसरा असे क्रमानें उत्तरोत्तर जाणावे. निपुत्रिकमेला असतां क्रमानें जिंदगीचे वारीस.

२ **पत्नी** पतिव्रता असल्यास जिंदगी घेईल. व्यभिचारिणीला मिळणार नाहीं. व्यभिचारिणीला विभाग नाहीं.

कात्यायन. नवऱ्याचें धन **पत्नी** घेईल परंतु ती व्यभिचारिणी नसेल तर.

हारीत. विधवा तारुण्यदशेंत असल्यामुळें जर **कर्कशा** आहे तर तिच्या आयुष्याच्या क्षयार्थ अन्नाछादन मात्र द्यावें.

# मयूख दायभाग

प्रजापति. (नवऱ्याच्या) अगोदर मेल्यास अग्निहोत्र[1] घेते. आणि नवरा मेल्यावर त्याची जिंदगी घेते. परंतु पतिव्रता असल्यास हा सनातन धर्म आहे. व स्थावर आणि जंगम म्हणजे **कुप्य**, सोने रस, वस्त्रें, अशीं द्रव्यें घेऊन **पत्नी**नें नवऱ्याचें मासिक षाण्मासिक सांवत्सरिक श्राद्ध करावें. स्त्रियांनीं नवऱ्याचा चुलता, **गुरु**, **दौहित्र**, **भागिनेय**, मामा, यांचें श्राद्धादिक करावें. व वृद्ध, अतिथी, यांस भोजन घालावें.

बृहस्पति. ३ नवरा (भाऊ बाप वगैरेशीं) विभक्त झाला असतां त्याचें जें गहाण वगैरे अनेक प्रकारचें धन असेल तें त्याची विधवा भार्या घेईल. परंतु स्थावरावांचून कारण जरी विभाग झाला आहे व स्त्री पतिव्रताही आहे तथापि स्थावर घेऊं शकत नाहीं.

कन्याविरहित स्त्री स्थावर माल घेऊं शकत नाहीं.

असा जो बृहस्पतीनें तिला स्थावर विभागाचा निषेध सांगितला तो कन्याविरहित **पत्नी** असल्यास तिजविषयीं. कन्यासहित असल्यास स्थावर देखील घेईल. असें स्मृतिचंद्रिकेंत सांगितलें आहे. माधव तर वारिशांच्या अनुमतीवांचून स्थावराची खरेदी विकरी वगैरे होत नाहींत. एतत्पर बृहस्पति वचन. असें म्हणतो.

कात्यायन. ४ (अपुत्र) भर्ता मेल्यानंतर त्याची जिंदगी पतिव्रता **पत्नी** जिवंत आहे तोंपर्यंत घेईल. परंतु त्याचें दान गहाण विकरी करण्याविषयीं तिला स्वामित्व नाहीं.

धर्मकार्यासाठीं स्थावराचें गहाण विकरी विषयीं पत्नीला अधिकार

असा जो तिला दानादिकाविषयीं निषेध सांगितला तो नाच तमाशा वगैरे कारणानिमित्त दानादि करण्याविषयीं. धमार्थदान किंवा धर्मोपयोगी द्रव्यासाठीं गहाण वगैरे तर तिने करावेंच. कारण पूर्वींच्या (२ऱ्या अंकांतील प्रजापति) वचनांत "स्थावर जंगम" **इत्यादि** सांगी

---

[1] अग्निहोत्र घेणे म्हणजे तें अग्निहोत्र तिच्या बरोबर जातें.

नलें आहे.

कात्यायन. व्रत, उपवास, याविषयीं तत्पर, ब्रम्हचर्य संपन्न, व इंद्रियदमन, **दान** यांविषयीं आसक्त; अशी स्त्री अपुत्र असली तरी स्वर्गलोकीं जाईल.

कात्यायन. ५. बेवारीश जिंदगी **राजानें** घ्यावी. पण मालकाच्या स्त्रियांस अन्नाछादन व मालकाचें श्राद्धादिक व चाकर यांपुरतें ठेवून बाकी राहिलेली. परंतु **श्रोत्रियाची** जिंदगी बेवारीश असल्यास (मालकाच्या स्त्रिया, श्राद्धादिक, चाकर, यांपुरतें राखून बाकी) श्रोत्रियांस द्यावी.

मालकाच्या राखलेल्या स्त्रिया, चाकर, श्राद्ध, यांपुरतें ठेवून बेवारीश जिंदगी सरकारानें घ्यावी. परंतु ब्राम्हणाखेरीज.

नारद. ब्राम्हणाशिवाय अन्यजातींतली बेवारीश जिंदगी सरकारानें घ्यावी. आणि मालकाच्या स्त्रियांस उपजीविका द्यावी. असा **दाय** घेण्याचा विधि सांगितला.

अशीं जीं वरचीं दोन्ही वचनें तीं **अवरुद्ध** स्त्रीविषयीं. कारण वचनांत **पत्नी** पदाचा निवेश नाहीं.

नारद. ६ जर भावांतून कोणी निपुत्रिक मरेल किंवा संन्यासी होईल. तर त्याचें धन इतर भावांनीं वांटून घ्यावें. परंतु **स्त्रीधना** वांचून. आणि त्याच्या स्त्रियांचें मरणपर्यंत पोषण करावें. परंतु पतिव्रता असल्यास. पतिव्रता नसल्यास अन्नाछादनही देऊं नये.

अविभक्त भावांतून कोणी मेल्यास त्याचें धन वरकडांनीं वांटून घ्यावें.

असें जें वचन तें **अविभक्त** किंवा **संसृष्टी** मृत झाला तर त्याच्या स्त्रियांविषयीं. कारण **संसृष्टि** प्रकरणीं हें वचन आहे. असें मदनाचें मत.

कात्यायन. ७ **अविभक्त** (किंवा संसृष्ट) नवरा मेल्यानंतर स्त्री आमरणपर्यंत अन्नाछादन पावल्ये. आणि विभक्त होऊन मेला तर हिसा घेत्ये.

अविभक्त मेला असतां बायकोला विभाग नाहीं.

मदन या वचनाचा असा अर्थ करितो कीं **अविभक्त** नवरा मेल्यानें

तर अवरुद्ध स्त्री मरणपर्यंत अन्नाछादन पावेल. आणि पत्नी तर विभाग पावेल. परंतु अशी व्यवस्था करण्याविषयीं मूळ नाहीं.

वास्तवीक व्यवस्था तोच सांगतो.

कात्यायन. ८ (सासू सासरा वगैरे) गुरुजनांच्या सेवेंत तत्पर अशी स्त्री आपला विभाग घेऊं शकते. जर सेवा करणार नाहीं तर अन्नाछादनमात्र द्यावें. अविभक्त मेला असतां बायकोला वडिलांच्या इच्छेनें विभाग

(सेवा करण्याचें कारण) त्यांच्या इच्छेनें तिला विभाग. अन्यथा अन्नाछादन असा अर्थ (परंतु हें नवरा **अविभक्त** असल्यास. विभक्त मेल्यानंतर पुत्राभावीं सर्वधन पत्नीचेंच)

कात्यायन. ९ अपकार करणारी, निलाजरी, द्रव्यनाश करणारी, व्यभिचारतत्पर, अशी स्त्री विभाग घेऊं शकत नाहीं. नवऱ्यानें दुर्जन स्त्रीला अन्नाछादनमात्र द्यावें.

स्मृति. १० **पतित** स्त्रियांविषयींही हाच (म्हणजे पतिताचे त्यागाविषयींचा) विधि करावा. आणि यांस अन्नाछादन देऊन एका कोंपऱ्यांत गहूं द्यावा.

असा जो प्रकार सांगितला तो भर्ता जिवंत असल्यास त्यानें करावा. असें ग्रंथकर्ते म्हणतात.

११ जी विषयीं व्यभिचाराची शंका आहे तिचें ही पोषणमात्र करावें. शंकित व्यभिचारिणीचेंही पोषण करावें.

हारीत. विधवा तारुण्यदशेंत असल्यामुळें **कर्कशा** आहे तर तिच्या आयुष्याच्या क्षयार्थ अन्नाछादनमात्र द्यावें.

१२ तस्मात्[1] पतिव्रता **पत्नी** (नवऱ्याच्या) जिंदगीची वारीस होते. असें सिद्ध झालें. **पत्नी** अनेक असल्यास यथाविभाग घेतील. पतिव्रता व्रतस्थ अशी स्त्री नवऱ्याची जिंदगी पावते.

---

1 तस्मात् ३ऱ्या अंकापासून येथपर्यंत विचार होऊन

# मयूख दायभाग.

१३ **पत्नी**च्या अभावीं कन्या जिंदगी घेईल. — पत्नी नसल्यास कन्या घेते.

मनुः जसा आत्मा तसा पुत्र आणि पुत्रासारिखीच कन्या. अशी आत्मस्थाना पन्न कन्या असतां दुसरा कसा धन घेईल.

कन्या अनेक असल्यास यथाविभाग वांटून घेतील. त्यांत ही कोणी विवाहित व कोणी **अविवाहित** असल्यास **अविवाहित** च घेईल. — अनेक असल्यास वांटून घेतील विवाहित व अविवाहित असल्यास अविवाहित घेतील.

कात्यायन. नवऱ्याचें धन **पत्नी** घेईल परंतु व्यभिचारिणी नसेल तर तिच्या अभावीं कन्या परंतु **अविवाहित** असेल तर.

सर्व ही विवाहित असून त्यामध्यें कोणी सधन कोणी निर्धन असल्या सनिर्धनच घेईल. — सर्वा विवाहित असल्यास निर्धन असेल ती घेईल.

गोतम **स्त्रीधन अविवाहित** व निर्धन अशा कन्याचें. "**स्त्रीधन**" येथील स्त्री शब्द बापाचा ही उपलक्षण असें सांप्रदायिक म्हणतात.

१४ कन्येच्या अभावीं **दौहित्र** जिंदगीचे वारीश होतील. — कन्या नसल्यास दौहित्र.

विष्णु. पुत्र पौत्र संतान नसेल तर **दौहित्र** जिंदगी घेतील. कारण पूर्व जांच्या (मातामहादिकांच्या) श्राद्धादिकाविषयीं पौत्राच्या ठिकाणीं **दौहित्र** अधिकारी.

१५ **दौहित्रा**च्या अभावीं पिता जिंदगीचा वारीश. त्याच्या अभावीं जननी. — दौहित्र नसल्यास पिता, तो नसल्यास आई

कात्यायन. निपुत्रिकाच्या जिंदगीची वारीश कुलीन **पत्नी** अथवा[1] कन्याही. तदभावीं पिता त्याच्या अभावीं माता, भाऊ, पुतणे, सांगितले आहेत.

विष्णु. निपुत्रिकाची जिंदगी **पत्नी**कडे जात्ये, तिच्या अभावीं कन्या, तिच्या अभावीं **दौहित्र**, त्याच्या अभावीं पिता, त्याच्या अभावीं माता,

---

1 अथवा म्हणजे पत्नीच्या अभावीं

# मयूखदायभाग

तिच्या अभावीं भाऊ, त्याच्या अभावीं पुतण्या, त्याच्या अभावीं **गोत्रज**, घेतील.

विज्ञानेश्वर. (पृ० २९९ अंक २७) पिता सर्वपुत्रांविषयीं एकसारखाच परंतु जननी इतरपुत्रां (सावत्रपुत्रां) विषयीं तशी नाहीं. (जननीचें जवळ नातें आहे) म्हणून **प्रत्यासत्ती**च्या आधिक्यास्तव आधीं जननी तिच्या अभावीं पिता जिंदगीचा वारीश.

असें जें सांगितलें तें, वरच्या (विष्णु) वचनास विरुद्ध आहे म्हणून निरस्त केलें. कारण मातेचें विशेष नातें आणि बापाचा सर्वपुत्रांविषयीं साधारण संबंध, हीं धनग्रहणाचे क्रमाविषयीं नियामक मानावीं याविषयीं प्रमाण नाहीं.

१६ जननीच्या अभावीं सखा भाऊ जिंदगीचा वारीश. त्याच्या अभावीं सखा पुतण्या.

जननीच्या अभावीं सखेभाऊ त्यांच्या अभावीं पुतणे

विज्ञानेश्वर. (पृ० ३०० अंक ३१) सख्या बंधूच्या अभावीं सावत्र भाऊ. त्याच्या अभावीं पुतणे.

असें सांगितलें तें नीट नाहीं. कारण "भाऊ" या पदाची सख्या भावावर शक्ति कल्पिली व सावत्र भावावर **लक्षणा** कल्पिली असतां **वृत्तिद्वयविरोध** येतो.

१७ पुतणेही चुलत्याचे मरणसमयीं आपला बाप जीवंत होता अतएव आपले बापाचा वांटा आपणास मिळावा असें इच्छितील तर त्यांनीं विभाग करणाऱ्या दुसऱ्यां चुलत्यां बरोबर (मि० पृ० २४७ अंक १ मूळ) "नातवांस आपापल्या पित्याचे द्वारें विभाग" या न्यायें करून आपल्या बापाचा वांटा घ्यावा.

कांहीं पुतण्ये व कांहीं सखे भाऊ असल्यास वांटून घेण्याची रीत.

१८ पुतण्याच्या अभावीं **गोत्रज सपिंड** वारीश. त्यांतही प्रथमतः पितामही.

पुतण्याच्या अभावीं गोत्रज घेतील त्यांत प्रथम पितामह

मनु. आई निवर्तल्यावर पितामहीनें जिंदगी घ्यावी.

जरी मनुवचनांत आईच्या नंतर (पितामही) वारीश सांगितली तथापि पूर्वी

पासून पुतण्यापर्यंत बांधलेल्या क्रमांत मध्ये पितामहीचा निवेश होऊं शक तनाहीं व आगंतुकांचा शेवटीं निवेश असा न्यायही आहे म्हणून पुतण्याच्या पुढें पितामहीला जिंदगी सांगितली.

१९ पितामहीच्या अभावीं बहीण जिंदगीची वारीश. पितामहीच्या अभावीं बहीण.

मनु. **सपिंडा** मध्यें जो जो सन्निहित (नात्यानें जवळ) असेल तो जिंद-गी घेईल.

बृहस्पति. (विभागाविषयीं) ज्ञाति, **बांधव**, कुळांतले, असे बहुत प्राप्तझा ले असतां त्यांत जो विशेष जवळचा असेल तो निपुत्रिकाची जिंदगी घेईल.

या दोहों वचनावरून व भावाच्या गोत्रांत उत्पन्न झाली अतएव तीही **गोत्रज** होत्ये. म्हणून **गोत्रजां** मध्यें पितामहीच्या अभावीं बहिणच वारीश.

आतां बहीण **सगोत्र** नाहीं तर नसो कारण येथें **सगोत्रास** जिंद गी सांगितली नाहीं. (गोत्रजास सांगीतली आहे.)

२० बहिणीच्या अभावीं पितामह व सावत्र भाऊ यांनीं जिंदगी विभा गून घ्यावी. विभागून घेण्याचें कारण. दोघांचें नात एकसारखेंच आहे म्हण जे असें पितामह हा **रिक्थी** च्या जनकाचा जनक. व सावत्र भाऊ हा **रिक्थी** च्या जनकाचें जन्य. म्हणजे **रिक्थी** पासून पितामह दुसरा होतो. व सावत्र भाऊ ही दुसराच होतो. बहीण नसल्यास पितामह सावत्र भाऊ यांनीं वांटून घ्यावी.

२१ या प्रमाणेंच नातें एक सारखें असल्यास व पाठक्रमांतही परस्पर अनुभाव विशेष नसल्यास अन्यन स्थळींही असाच प्रकार जाणावा. म्हणजे असें कीं पितामह व सावत्र भाऊ यांच्या अभावीं प्रपितामह, चुलता, सावत्र भावाचा मुलगा हे समविभाग करून घेतील कारण हे तिघेही मृत **रिक्थी** चे सारख्या[1] नात्याचे होतात. याच रीतीनें सर्व **सपिंड** व **समानोदक** प्रत्या

---

[1] सारख्या नात्याचे म्हणजे असें प्रपितामह हा मृताचा स्वजनकजनकजनक.

# मयूख दायभाग

**सर्वां**च्या क्रमानें जिंदगीचे वारीश होतात.

**सपिंड व समानोदक** कोणते

तें सांगतो.

मनु. २२ **सपिंड** तर सातवा पुरुष अतिक्रांत होईपर्यंत (पुढें नाही.) सपिंड व समानोदक.

**समानोदक** तर जन्माचें व नावाचें स्मरण आहे तेथपर्यंत.

२३ **समानोदकां**च्या अभावीं **बंधू** जिंदगीचे वारीश. ते **बंधू** तीन प्रकारचे **आत्मबंधू पितृबंधू** आणि **मातृबंधू**. असे स्मृत्यंतरी सांगीतले आहेत. समानोदकांच्या अभावीं बंधू वारीश.

स्मृति.

**आत्मबंधू**—— आपल्या आतेचे पुत्र, आपल्या मावशीचे पुत्र, आणि आपल्या मामाचे पुत्र. आत्मबंधू.

**पितृबंधू**—— पित्याच्या आतेचे पुत्र. पित्याच्या मावशीचे पुत्र. आणि पित्याच्या मामाचे पुत्र. पितृबंधू.

**मातृबंधू**—— आईच्या आतेचे पुत्र. आई आईच्या मावशीचे पुत्र. आणि आईच्या मामाचे पुत्र. मातृबंधू.

त्यांत जिंदगी घेण्याचा क्रमही वरलिहिल्या प्रमाणेंच

२४ शंका—— **पत्नी** (कन्या) **इत्यादिक** हे सर्व, मृताचे नातेवाईक. म्हणूनच त्याच्या जिंदगीचे वारीश होतात. तसाच **आत्मबंधू**सही मृताच्या नात्यानेंच जिंदगीचा अधिकार होतो. परंतु **पितृबंधू, मातृबंधू** यांस कोणत्या नात्याने अधिकार? वर सांगीतलेल्या स्मृतीनें अधिकार म्हणावा तर तसेंही म्हणतां येत नाहीं. कारण ती स्मृति तर केवळ **पितृबंधू, मातृबंधू** या संज्ञा व या संज्ञा ज्यांस आहेत ते **संज्ञी**, हा संबंध दाखविण्या

---

चुलताही सजनकजनकजन्य आणि सावत्र भावाचा पुत्र सजनकजन्यजन्य. होतो म्हणजे हे तिघे ही मृतापासून एकसारखे तिसरे होतात.

# मयूखदायभाग.

साठींच मात्र प्रवृत्त आहे. धनाधिकार दाखवीत नाहीं.

२५ समाधान वरची स्मृति **संज्ञा** व **संज्ञी** यांचा संबंध दाखविण्यासाठीं प्रवृत्त नाहीं. कारण जशी पित्याचे मातुळ, पित्याचा चुलता, **इत्यादि** स्थलीं **योगें** करून तत्तच्छब्दाची प्रवृत्ति संभवत आहे तशी **पितृबंधू मातृबंधू** येथेंही **योगार्थें** करूनच प्रवृत्ति संभवत असतां मग या स्मृतीनें **संज्ञा संज्ञी** यांचा संबंध दाखविणें व्यर्थ होऊं लागेल. यास्तव **बंधूं**स उद्देश करून जिंदगीचा अधिकार सिद्ध झाला असतां **पितृबंधू मातृबंधू** यांस जिंदगीचा अधिकार दाखविण्यानेंच ही स्मृति सार्थ आहे. **बंधूं**स उद्देश करून सूतकविधिविषयींही असेंच.

२६ **बंधूं**च्या अभावीं **आचार्य** जिंदगी घेईल. त्याच्या अभावीं शिष्य. बंधूनसल्यास आचार्य तो नसल्यास शिष्य.

आपस्तंब. पुत्राच्या अभावीं जवळचा **सपिंड** असेल तो (जिंदगी घेईल) त्याच्या अभावीं **आचार्य** त्याच्या अभावीं **अंतेवासी**.

२७ शिष्याच्या अभावीं **सब्रम्हचारी** जिंदगी घेईल. त्याच्या अभावीं **श्रोत्रिय**. शिष्य नसल्यास सहाध्यायी त्याच्या अभावीं श्रोत्रिय.

गौतम. अनपत्य (मृत) ब्राम्हणाची जिंदगी **श्रोत्रियानीं** घ्यावी.

२८ श्रोत्रियाच्या अभावीं अन्यब्राम्हण जिंदगी घेईल. श्रोत्रियाच्या अभावीं सामान्य ब्राम्हण.

कात्यायन सर्व वारिशांच्या अभावीं **त्रैविद्य**, शुचिर्भूत, इंद्रियदमन करणारे, असे ब्राम्हण जिंदगीचे वारीश. असें झाल्यानें धर्मलोप होत नाहीं.

नारद. सर्व जातींतली बेवारीश जिंदगी सरकारानें घ्यावी. परंतु ब्राम्हणधनावांचून. ब्राम्हणाची बेवारीश जिंदगी **श्रोत्रिया**स द्यावी.

बृहस्पति. २९ ज्यांस पुत्र, **पत्नी**, भाऊ, कोणी नाहींत असे जे क्षत्रिय, वैश्य, शूद्र, त्यांची जिंदगी **राजानें** घ्यावी. कारण तो सर्वांचा प्रभु आहे. क्षत्रियादिकांची बेवारीश जिंदगी सरकारानें घ्यावी.

# मयूखदायभाग

## शाखा १६

सन्यासी **इत्यादिकांचे** जिंदगीविषयीं
विशेष (मि० पृ० ३०४ अंक १ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. १ **वानप्रस्थ**, सन्यासी, आणि ब्रम्हचारी, यांच्या जिंदगीचे **आचार्य**. सच्छिष्य. **धर्मभ्रात्रेकतीर्थ** हे क्रमाने[1] वारीश होतात. — वानप्रस्थादिकांचें धनचे ण्यास अधिकारी.

ब्रम्हचारी म्हणजे **नैष्ठिकब्रम्हचारी उपकुर्वाणब्रम्हचारी** चें धन तर बाप वगैरेच घेतील.

**धर्मभ्राता** म्हणजे धर्मार्थ मानलेला भाऊ. आणि **एकतीर्थ** म्हणजे एका **आश्रमाचे धर्मभ्राता** असा जो **एकतीर्थ** तो **धर्मभ्रात्रेकतीर्थ**.

**आचार्या**दिकांच्याउलट्या क्रमानें म्हणजे **वानप्रस्थाचे धर्मभ्रात्रेकतीर्थ** सन्याशाचे धन सच्छिष्य आणि ब्रम्हचारीचें धन **आचार्य** असें विज्ञानेश्वराचेंमत (मि० पृ० ३०४ शाखा २७) "**वानप्रस्थाचें** धन **आचार्य** घेईल किंवा शिष्य घेईल." अशा विष्णुवचनावरून अनुक्रमाने **आचार्या**दिक वारीश. असें मदनाचें मत.

२ मृताचा जो कोणी **राजा** पर्यंत **रिक्थ** घेईल त्याने त्याची दाहा दिवसपर्यंत क्रिया करावी. — मृताची जिंदगी घेणाराने दहा दिवस क्रिया करावी.

विष्णु. जो **रिक्थग्राह** होईल तो पिंड देणारा सांगितला आहे.

हें म्या श्राद्धमयूखांत श्राद्धाविषयीं अधिकारी सांगितले त्यानिर्णयप्रसंगी निरूपित केलें आहे.

---

१ क्रमानें म्हणजे वानप्रस्थाचे आचार्य. सन्याशीचे सच्छिष्य आणिब्रह्मचारीचे धर्मभ्रात्रेकतीर्थ वारीस.

# मयूखदायभाग

## शाखा १७

संसृष्टी विषयीं.

आतां **संसृष्टी** विषयीं निर्णय सांगतो.

त्यांत **संसर्ग** कसा तो सांगतो.

बृहस्पति. १ जो विभक्त झाला असतां बापाशीं, भावाशीं, अथवा चुलत्याशीं पुनः एकवट राहतो तो त्याचा **संसृष्ट** म्हटला जातो. संसृष्टीचें स्वरूप

बाप, भाऊ, पुत्र, चुलता, हेच परस्पर **संसृष्ट** होतात दुसरा कोणी होत नाही. कारण वचनांत दुसऱ्याचें ग्रहण केलें नाही. असें मिताक्षरादि ग्रंथांत (मि॰पृ॰ ३०७ अंक १) सांगितलें आहे.

२ जे जे विभाग करणारे ते ते **संसृष्ट** होतात. असें **सामानाधिकरण्यें** करून **संसृष्टी** म्हणावे हें युक्त. वरच्या वचनांतील बाप, भाऊ, चुलता, हीं पदें तर जितके विभाग करणारे तितक्यांचीं उपलक्षण. तेणें करून **पत्नी**, पितामह, भाऊ, नातू, चुलता, पुत्र, **इत्यादिक** ही परस्पर **संसृष्ट** होतात. संसृष्टीचें लक्षण.

३ जो जो विभक्त झालेला एकवट झाला तो **संसृष्ट**. असें **सामानाधिकरण्य** आहे म्हणून विभक्त झालेल्या भावांचे पुत्र परस्पर **संसृष्ट** होऊं शकत नाहींत

४ विद्यमान किंवा पुढें मिळणारें आपापल्या उभयतांचें धन, पुनः विभाग होईपर्यंत समायीक असावे. अशी बुद्धि किंवा इच्छा हा **संसर्ग** म्हटला आहे

त्यांत **संसृष्टी**च्या पुनर्विभागाविषयीं विशेष सांगतो.

मनु. ५ विभक्त झालेले एकवट होऊन पुनः धनाचे वांटे करितील तर विभा संसृष्टींनीं समविभाग करावे.

# मयूखदायभाग

## संसृष्टीविषयीं.

ग समान होईल. **विषम** विभाग नाहीं.

येथें (वचनांत) "विभाग समान होईल" या वाक्येंकरूनच **विषम** विभागाचा निरास झाला असतां पुनः "**विषम** विभाग नाहीं" असें जें सांगितलें तें ज्येष्ठतामुळें **विषम** विभाग नाहीं हें सुचविण्यासाठीं नाहीं तर एकवट होते वेळे त्या द्रव्याच्या न्यूनाधिक्यामुळें त्या द्रव्यानुसार **विषम** विभाग आहेच हें सुचविण्यासाठीं असें कोणी म्हणतात.

६ ज्येष्ठाला ही अधिक विभाग नाहीं मग इतरांस कोठून मिळेल. अशा **अर्थवादें** करून द्रव्याचें न्यूनाधिक्य असलें तरी समच विभाग करावा. आणि आचारही असाच आहे, यास्तव हें (वरचें) वचन आचारमूल संभवत असतां आचारास विरुद्ध श्रुति कल्पून ती श्रुती या वचनास मूळ कल्पावी हा अन्याय. व व्याकरणाच्या शब्दप्रयोगासारखें व्यवहार शास्त्रही आचारमूलक आहे. संसृष्टधनांत उद्धारविभाग नाहीं.

बृहस्पति. ७ **संसृष्टीं**तून जो कोणी विद्या, शौर्य, **इत्यादिकें** करून धन संपादन करितो त्याला दोन अंश देऊन बाकीच्यानीं समविभाग वांटून घ्यावे. संसृष्टीतून कोणी नवें द्रव्य संपादिल्यासही समविभागच.

"संपादकानें दोन भाग घ्यावे" या वचनें करून[1] दोन विभाग सिद्ध असतां पुनः येथे सांगण्याचें प्रयोजन हें कीं पितृद्रव्य न खर्चितां संपादन केल्यास दोन विभाग. असें पूर्वी सांगीतलें आणि येथें **संसृष्टी** विभागी तर **संसृष्ट** धनाचा खर्च करूनही संपादिलें तरी संपादकास दोन विभाग. असें या वचनानें सांगितलें असें मदनाचें मत.

**संसृष्टी**ची जिंदगी घेण्याविषयीं अधि

---

१ या म्हणजे १ ल्याखालें ल्या ६ व्या अंकांत सांगितलेल्या.

# मयूखदायभाग

## संसृष्टीविषयीं.

कारी कोण हें याज्ञवल्क्य (मि० पृ० ३०४ अंक १ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. ८ **संसृष्टी**च्या तर जिंदगीचा वारीश **संसृष्टी**च. — संसृष्टीचें धन संसृष्टीच घेईल बायको वगैरेस मिळणार नाहीं.

हें वचन, "**पत्नी**, कन्या," **इत्यादिक** (१४ व्या शाखेच्या १ ल्या अंकाचें) जें वचन त्याचें बाधक. तेणेंकरून इतका अर्थ झाला कीं **संसृष्टी**चें धन घेण्याविषयीं **पत्नी** कन्या **इत्यादिकां**स अधिकार नाहीं. तर **संसृष्टी**ला.

९ ज्याविषयीं **सामान्यशास्त्रा**ची प्रवृत्ति, तेथेंच. **विशेषशास्त्रा**ची प्रवृत्ति आहे म्हणून वर पूर्वीं[1] सांगितले जे "निपुत्रिक मृत" या पदांची **अनुवृत्ति** आहे म्हणून हें (वरचें वचन) ही पुत्रपौत्ररहित अशा **संसृष्टी**विषयीं. यास्तव तशा (पुत्रपौत्ररहित) मृत **संसृष्टी**ची **पत्नी** कन्या **इत्यादिक** असले तरी दुसरा **संसृष्टी**च धन घेईल.

असें जें विज्ञानेश्वर मदनादिकांचें मत तें चिंत्य म्हणजे विचार्य. कारण **अनुवृत्ति**वांचून वचनाची गति होत असतां **अनुवृत्ति** करावी. याविषयीं प्रमाण नाहीं.

ह्या पहिल्या चरणाचें (८ व्या अंकाचें) बाधक सांगतो.

याज्ञवल्क्य. १० सख्या भावाचें तर सख्या भावानें घ्यावें. येथें "**संसृष्टी**च्या तर जिंदगीचा वारीश **संसृष्टी**च" या वाक्याची मागून **अनुवृत्ति** केली तेव्हां असा अर्थ झाला **संसृष्ट** सखा भाऊ व **संसृष्ट भिन्नोदर** हे — संसृष्ट सख्या भावाचें धन संसृष्ट सखा भाऊ घेईल.

---

१ पूर्वीं म्हणजे १५ व्या शाखेच्या पहिल्या अंकांत

## संसृष्टीविषयीं.

दोघे आहेत. तर मृत **संसृष्टी**ची जिंदगी **संसृष्ट** सखा भाऊच घेईल.

याज्ञवल्क्य. ११ मृताला झालेल्या पुत्रास विभाग द्यावा. पुत्र नसल्यास याने द्यावा.

संसृष्ट मेल्यानंतर त्याचे पुत्रास विभाग द्यावा पुत्र नसल्यास यानें द्यावा.

येथें ही "**संसृष्टी**च्या जिंदगीचा वारीस **संसृष्टी**च." याची **अनुवृत्ति** केली तेव्हां मृत **संसृष्टी**च्या जिंदगीचे विभागसमयीं त्याची **पत्नी** गरोदर आहे असें समजण्यांत न येतां विभाग झाले नंतर उत्पन्न झालेल्या पुत्रास **संसृष्टी** चुलत्यानें त्याचा विभाग द्यावा. पुत्र नसल्यास यानें द्यावा. असें तात्पर्य.

१२ येथें यावत् पुत्रांस बापाची जिंदगी घेण्याविषयीं अधिकार केवळ विभागानंतर झालेला पुत्र अधिकारी नव्हे. कारण विभागानंतर उत्पन्न होणें हें धनग्रहणाविषयीं प्रयोजक नाहीं. (कदाचित् मानिलें असतां) गौरव[1] येतें व देशांतरीं विभागापूर्वीं उत्पन्न झाला. आणि विभागानंतर समजण्यांत आला तर तो विभागाविषयीं अनधिकारी होऊं लागेल. (कारण विभागानंतर उत्पन्न होणें, हा धर्म त्यावर नाहीं.) यास्तव विभागापूर्वीं झालेला पुत्र **असंसृष्टी** ही जरी आहे तथापि **संसृष्टी** चुलत्यानें त्याला विभाग द्यावा.

## असंसृष्टी सखा भाऊ व संसृष्टी

१ गौरव असें कीं विभागानंतर उत्पन्न होणें हें एक प्रयोजक विभागापूर्वीं उत्पन्न होणें हें एक प्रयोजक. विभागकालीं उत्पन्न होणें हेंही एक प्रयोजक अशीं अनेक प्रयोजकें होतील.

# मयूखदायभाग.

## संसृष्टीविषयीं.

**भिन्नोदर** यादोघांनीं जिंदगी वांटू
नघेण्याचें कारण तोच (मि०ए०३०८
शाखा २६ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य १३ **भिन्नोदर** असून **संसृष्टी** आहे तर जिंदगी घेईल. **असंसृष्टी भिन्नोदर** घेऊं शकत नाहीं. **असंसृष्टी** असून ही सखा भाऊ आहे तर तो घेईल. **भिन्नमातृक. संसृष्टी** असला तरी तो एकटाच घेऊं शकत नाहीं.

मेल्यासंसृष्टीची जिंदगीअसंसृष्टी सख्याभाऊ व संसृष्टी भिन्नोदर यादोघांनी वांटून घ्यावी.

१४ येथें "**भिन्नोदर व भिन्नमातृक**" यापदांकडून केवळ सावत्र भावाचेंच ग्रहण होतें असें नाहीं. चुलता वगैरेचेंही ग्रहण होतें. कारण **भिन्नोदर** म्हणजे एका उदरांतले नव्हेत आणि **भिन्नमातृक** म्हणजे एका आईचे नव्हेत तेव्हां हाअर्थ सावत्र भाऊ चुलते वगैरेवर लारखाच. अन्यथा चुलते वगैरेशीं जो संसर्ग सांगितला तो निरर्थक होईल. कारण **संसृष्ट** होण्याचें दुसरें कार्य कांहीं नाहीं.

१५ वचनाचे वाक्यार्थ असे झाले; **पत्नी**, पिता, पितामह, सावत्र भाऊ, चुलता, हे **संसृष्ट** असल्यास जिंदगी घेतील. **असंसृष्टी भिन्नोदरास** मिळणार नाहीं. येणेंकरून **भिन्नोदरास** धन मिळण्याविषयीं **अन्वयव्यतिरेकें** करून **संसर्ग** कारण सांगितला. उत्तरार्धेंकरून सख्याभावाला सख्या भावाचें नातें कारण सांगितलें. एवंच सखाभाऊ व **संसृष्टी** यानीं जिंदगी वांटून घ्यावी. असा फलितार्थ.

हाच अर्थ **संसृष्टि** प्रकरणीं स्पष्ट
करितो.

मनु. यांतून वडील किंवा धाकटा विभागसमयीं वांट्याला मुकेल किंवा एखा मेलेल्या संसृष्टिजींदगीसंबं

# मयूखदायभाग.

## संसृष्टीविषयीं.

हा मरेल तर त्याचा भाग लोपला जाणार नाहीं. तर सखे भाऊ वजे संसृष्ट यांनीं घेऊन व सख्या बहिणी यांनीं तो विभाग समान वांटून घ्यावा. — भाऊव संसृष्टीनीं वांटून घ्यावी व सख्या बहिणीनीं ही

वांट्याला मुकेल म्हणजे आश्रमांतर घेतल्यामुळें किंवा पतित झाल्यामुळें (विभाग हीन होईल.)

वचनांतील संसृष्ट म्हणजे पत्नी, पिता, पितामह, सावत्रभाऊ, चुलता. इत्यादिक.

संसृष्टीचे विभागाविषयीं विशेष सांगतो.

प्रजापति. १६ जें गोप्य धन असेल तें संसृष्टींनी घ्यावें. आणि भूमि, घर, हें असंसृष्टींनी यथा विभाग वांटून घ्यावें. — जंगमद्रव्यसंसृष्टींनीं व स्थावर माल सख्याभावांनीं घ्यावा.

गोप्य धन म्हणजे भूमींत पुरून ठेवण्यानें गोपन करावयाजोगें सुवर्ण रुपें इत्यादि हें भिन्नोदरानें घ्यावें. आणि भूमी तर सख्या भावांनीं.

गाई, अश्व, इत्यादिक तर सख्खा भाऊ भिन्नोदर यांनीं वांटून घ्यावें असें तात्पर्य.

घर, अश्व, इत्यादिकही भिन्नोदर संसृष्टीनें घ्यावें असें मदनाचें मत. तें तर याववचनांत नाहीं.

गोप्यधन, भूमि, गाई, इत्यादिक यांतून एखादें मात्र असल्यास असंसृष्ट असला तरी सख्खाच भाऊ घेईल. असें जें स्मृतिचंद्रिकेंत सांगितलें आहे त्याविषयीं प्रमाण शोधिलें पाहिजे.

१७ सख्या भावांतूनही कांहीं संसृष्ट व कांहीं असंसृष्ट आहेत तरी संसृष्टीच घेतील. कारण सखे भाऊ व संसृष्टी अशीं दोन — सख्खा बंधूत कांहीं संसृष्ट व कांहीं असंसृष्ट असल्यास संसृष्ट सखे भाऊच घेतील.

# मयूख दायभाग.

## संसृष्टीविषयीं.

नातीं त्यांवर आहेत.

गौतम: **संसृष्टी** मेला असतां त्याचा **रिक्थग्राह संसृष्टीच**.

बृहस्पति. जे प्रीतीनें पुनः **संसृष्ट** झाले ते परस्परांचे **रिक्थग्राह** होतात.

१८ येथें फलितार्थ इतकाकीं, पुत्र पित्यांशीं **संसृष्ट** असो किंवा नसो सगळा पित्याचा हिसा तो घेईल. कारण पुत्राला बापाचा हिसा घेण्याविषयीं पुत्रत्व कारण आहे.

पुत्र संसृष्टी नसला तरी बापाची जिंदगी घेईल.

पुत्रांतही एक **संसृष्ट** आणि दुसरा **असंसृष्ट** आहे तर **संसृष्ट**च घेईल. कारण "**संसृष्टी**च्या जिंदगीचा वारीश **संसृष्टी**" असें पूर्वीं (८ व्या अंकांत) सांगीतलें आहे.

एक पुत्र संसृष्ट व दुसरा असंसृष्ट असल्यास संसृष्टच घेईल.

पुत्र व पुत्रावांचून दुसरा कोणी हे **संसृष्ट** असल्यास पुत्रच घेईल. कारण हा अर्थ "मृताला झालेल्या पुत्रास विभाग द्यावा. पुत्र नसल्यास यानें घ्यावा." या वचनीं पूर्वीं (११ व्या अंकांत) व्याख्यात केलाच आहे.

पुत्र व पुत्रभिन्न हे बापाशीं संसृष्ट असल्यासही पुत्रच घेईल.

पुत्रावांचून इतर **संसृष्टी** ह्मणजे आईबाप, भाऊ, चुलता, हे **संसृष्टी**, विद्यमान असल्यास आईबापच घेतील. त्यांत प्रथमतः आई मग बाप असें मदनाचें मत. भाऊ व चुलता **इत्यादिक** तर वांटूनच घेतील. कारण धनग्रहणाविषयीं प्रयोजक जो **संसर्ग** तो सर्वांवर सारखाच आहे.

पुत्रावांचून आईबाप चुलता वगैरे संसृष्ट असल्यास आईबापच घेतील.

सखा भाऊ. **असंसृष्ट**, व सावत्र भाऊ चुलता **इत्यादिक संसृष्ट**, यांचा समवाय असल्यासही वांटूनच घेतील. कारण "**असंसृष्टी** असूनही सखा भाऊ आहे तर तो घेईल. **भिन्नमातृक संसृष्टी** असला तरी तो एकटाच घेऊं शकत नाहीं." व "**संसृष्टी**च्या तर जिंदगी

सखा भाऊ असंसृष्ट व सावत्र भाऊ वगैरे संसृष्ट असल्यास वांटून घेतील.

# मयूख दायभाग

## संसृष्टीविषयीं.

चा वारीश संसृष्टीच" "संसृष्ट सख्याभावाची जिंदगी संसृष्ट स ख्या भाऊच घेईल." असें पूर्वी त्या त्या स्थळीं सांगितलें आहे.

एकटी पत्नीच संसृष्ट असल्यास तीच घेईल. कारण " संसृष्टी च्या नर जिंदगीचा वारीश संसृष्टीच. असें पूर्वी (८व्या अंकांत) सांगितलें आहे.

एकटी पत्नी च संसृष्ट आहे तर तीच घेईल.

पत्नी संसृष्ट असून ही तिच्या सुद्धां अणखी दुसरे संसृष्ट यांचा समवाय असल्यास तेच घेतील. पत्नी ला मिळणार नाहीं.

पत्नी व अणखी दुसरे संसृष्ट आहे न तर पत्नीला मिळणार नाहीं.

संसृष्ट प्रकरणी शंख नारद सांगतात.

शंखनारद. जर भावांतून कोणी निपुत्रिक मरेल किंवा संन्यासी होईल तर त्याचें धन इतर भावांनी वांटून घ्यावें परंतु स्त्रीधना वांचून. आणि त्याच्या स्त्रियांचें मरणपर्यंत पोषण करावें. परंतु पतिव्रता असल्यास. पतिव्रता नसल्यास अन्नाछादनही देऊं नये. आणि जी त्याची कन्या असेल तिचें पोषण विवाह होई पर्यंत तिच्या बापाच्या अंशातून करून नंतर भावांनी भाग घ्यावा. विवाहानंतर तिचें पोषण नवऱ्यानें करावें.

शंख १९ निपुत्रिक मेला असतां त्याचें धन भावांकडे जातें. त्याच्या अभावीं आईबाप घेतील किंवा ज्येष्ठ पत्नी.

असें जें संसृष्टि प्रकरणीं शंखवचन आहे तें, चुलता, पुतण्या, किंवा सावत्र भाऊ, यांशी जो संसृष्ट झाला तो मेल्यानंतर संसृष्टीही मेला असतां. त्याचे जे असंसृष्ट भाऊ वगैरे आहेत त्याना या अनुक्रमानें जिंदगी मिळावी. एतदर्थ. असें मदनाचें मत. त्यांतही प्रथमतः आई मगबाप, असेंही त्याचें मत. त वचनांत ज्येष्ठ पत्नी असें म्हटलें तेथें ज्येष्ठ ह्मणजे पातिव्रत्यादि गुणें करून ज्येष्ठ.

# मयूखदायभाग.

## संसृष्टीविषयीं

२० **पत्नी**च्या अभावीं बहीण जिंदगी घेईल.

बृहस्पति. ज्यास अपत्य, भार्या, आई, बाप नाहींत असा मेल्यानंतर त्याच्या बहिणीनें त्याचें धन घ्यावें असा धर्म आहे.

"जी त्याची कन्या असेल तिनें घ्यावें" असा कोणाच्या मतीं पाठ आहे.

कन्या बहीण यांच्या अभावीं जवळचा **स पिंड** घेईल.

## शाखा १८

### स्त्रीधनाचें निरूपण.

मनु. १ **अध्यग्नि, अध्यावहनिक, प्रीतिदत्त,** तसेच भाऊ, आई, बाप, यांपासून[1] मिळालेलें असें साहा प्रकारचें **स्त्रीधन** सांगितलें आहे. स्त्रीधनाचे प्रकार

"वचनांत साहा प्रकारचें" म्हटलें तें साहा प्रकारापेक्षां कमी नाहींत. असें समजण्यासाठीं तेणेंकरून "पिता, नवरा, भाऊ, यांनीं दिलेलें, व **अध्यग्नि** तसेच **अध्यावहनिक, इत्यादि स्त्रीधन** सांगितलें आहे" या याज्ञवल्क्य वचनांतील "**इत्यादिक**" पदाची ही संगति लागत्ये.

अधिकप्रकार सांगतो.

विष्णु. पिता, माता, पुत्र, भाऊ, यानीं दिलेलें, व **अध्यग्नि, अधिवेदनिक, बंधुदत्त, शुल्क,** आणि **अन्वाधेयक** (असें स्त्रीधन म्हट-

---

[1] यांपासून म्हणजे या प्रत्येकापासून निरनिराळें मिळालेलें. असें तीन प्रकारचें जें त्यास सौदायिक म्हटलें आहे.

# मयूख दायभाग

## स्त्रीधन

लें आहे.

### अध्यग्नि इत्यादिक स्त्रीधना

चें स्वरूप सांगतो.

कात्यायन. २ विवाहसमयीं विवाहाग्नीच्या संनिध जें (धन) स्त्रियांस दिल्हें जातें तें अध्यग्नि नामक स्त्रीधन

**अध्यग्नि** या नावानें **स्त्रीधन** म्हटलें आहे.

कात्यायन. ३ कन्येला माहेराहून (सासऱ्या) नेतेसमयीं जें मिळतें धन, तें **अध्या** अध्यावहनिकाचें लक्षण.

**वहनिक स्त्रीधन** म्हटलें आहे. (यालाच आंदण म्हणतात)

कात्यायन. ४ जेव्हां वधू सासूसासरा यांचे पायां पडावयास जाते तेव्हां जें त्यांनीं पादवंदनिक स्त्रीधन.

प्रीतीनें दिलें जातें तें **पादवंदनिक**. त्यालाच **प्रीतिदत्त** ही म्हटलें आहे.

कात्यायन. ५ लग्न झाल्यानंतर सासरच्यांकडून व माहेरच्यांकडून जें मिळतें तें अन्वाधेयक स्त्रीधन.

**अन्वाधेयक स्त्रीधन** म्हटलें आहे.

कात्यायन. ६ **परीभांड**, वाहन, दुभतें गुरु, दागीना, दास, दासीही हींस शुल्क.

रूपतः किंवा यांचें जें मोल मिळतें तें **शुल्क** म्हटलें आहे. यालाही आंदण

म्हणतात.

**परीभांड इत्यादिक** न मिळाल्यास त्याबद्दल कन्यादानसमयीं जें निष्क पहिलें जातें तें **शुल्क** असें तात्पर्य.

### आधिवेदनिक स्त्रीधनाचे विव

रण याज्ञवल्क्य (मि० ए ३२४ मूळ)

करितो.

याज्ञवल्क्य. ७ नवरा दुसरा विवाह करितो तर त्याच्या खर्चासमान **अधिविन्न** आधिवेदनिक स्त्रीधन

स्त्रीला धन द्यावें. पण तिला **स्त्रीधन** दिलें नसेल तर. दिलें असल्यास अर्धे द्यावें.

# मयूखदायभाग

## स्त्रीधन.

अर्थे ह्मणजे जितकें दिल्यानें पूर्वीचें **स्त्रीधन आधिवेदनिक** द्रव्याइतकें होईल तितकें द्यावें असें तात्पर्य. (नवऱ्यानें देऊं केलेलें स्त्रीधन पुत्रांनींही द्यावें.)

देवल. ८ नवऱ्यानें स्त्रीला देऊं केलेलें **स्त्रीधन** पुत्रांनीं कर्जाप्रमाणें फेडावें.

स्त्रियांस धन देण्याविषयीं विशेष सांगतो.

कात्यायन. ९ पिता, माता, भ्राता, भाऊ, ज्ञाती, यांनीं स्त्रीला यथाशक्ति दोन हजार पर्यंत **स्त्रीधन** द्यावें. परंतु स्थावरावांचून. (दरवर्षी स्त्रीला दोन हजार पणापर्यंत धन द्यावें.)

स्थावरावांचून दोन हजार **पणा** पर्यंत द्यावें. असें मदनाचें मत.

व्यासही. स्त्रीला परा काष्ठा दोन हजार पर्यंत धनाचा **दाय** द्यावा.

असें जें दोन हजार पर्यंत देणें सांगितलें. तें प्रतिवर्षी. अनेक वर्षांमागींत रयाहून ही अधिक शक्ति असल्यास व स्थावरही द्यावें. असें तोच (म्हणजे मदन) म्हणतो.

बारिशांशीं प्रतारणा करून स्त्रीला दिलेलें
धन व केवळ धारण करण्यासाठींच मात्र दि
लेले दागिने यांवर स्त्रीचें स्वत्व नाहीं. असें
सांगतो.

कात्यायन. १० नवऱ्यानें, भावानें, अथवा बापानें, कांहीं एक कारणवशें करून अथवा कांहीं मिषानें जें स्त्रीला दिलें तें **स्त्रीधन** होत नाहीं. (भावांस वांटा न मिळावा अशा प्रतारणेनें स्त्रीला दिलेलें परत घ्यावें.)

कौशल्यें करून मिळालेलें व पिता नवरा वगैरे
शिवाय सखी **इत्यादिका** पासून मिळालेलें.
यांवर स्त्रीची सत्ता नाहीं असें तोच सांगतो.

११ कला कौशल्यादिकें करून जें कांहीं मिळालें. तसेंच नवरा पिता वगैरे (कला कौशल्यादिकें करून)

# मयूखदायभाग.

## स्त्रीधन.

शिवाय मेत्रीण वगैरे पासून जें मिळालें त्यांवर नवऱ्याचें स्वामित्व. (हें स्त्रीधन नव्हे) बाकीचें **स्त्रीधन** ह्मटलें आहे. — मिळालेल्या धनावर स्त्रीची सत्ता नाहीं.

स्मृति. १२ भार्या, पुत्र, दास, हे तिघे निर्धन सांगितले आहेत. हे तिघे जें द्रव्य मिळवितील तें ज्याच्या सत्तेंत हे राहतात त्याचें धन.

असें जें वचन, तेंही कला कौशल्यादिकें करून संपादिलेल्या धनाविषयींच. असें कोणाचें मत.

**आधिवेदनिक इत्यादि स्त्रीधना** वरही नवऱ्याच्या आज्ञेशिवाय स्त्रीचें स्वातंत्र्य नाहीं. असें पारतंत्र्य दाखविण्याविषयीं हें सांगणें तरयुक्त.

मनु. स्त्रीनें नवऱ्याचे आज्ञेशिवाय कुटुंबाचे समयीकद्रव्यांतून व स्वकीय धनांतून खर्च करूंनये. — स्त्रीने नवऱ्याचे आज्ञेवांतून कुटुंबाचे द्रव्यांतून कुणगा करूंनये.

कांहीएक **स्त्रीधना** विषयीं स्त्रीचें स्वातंत्र्य सांगतो.

कात्यायन. १३ विवाहित कन्येला पती सहवर्तमान सासऱ्यां अथवा माहेरीं भावापासून अथवा आईबापांपासून जें मिळालें तें. **सौदायिक** ह्मटलें आहे. — सौदायिकस्त्रीधनावर स्त्रीचें स्वामित्व.

**सौदायिक** धनावर स्त्रीचें स्वामित्व योग्य आहे. कारण तिला विषादनयावा एतदर्थ हें त्यांनीं उपजीवन दिलें आहे. अतएव दान **विक्रय** करण्याविषयीं **सौदायिक** धनावर स्त्रियांचें सर्वदा यथेष्ट स्वातंत्र्य आहे मग तें **सौदायिक** स्थावरही असो.

१४ नवऱ्यानें दिलेल्या स्थावरावर तर तिचें स्वातंत्र्य नाहीं. — नवऱ्यानें दिलेल्या स्थावरावर स्त्रीचें स्वातंत्र्य नाहीं.

नारद. नवऱ्यानें संतुष्ट होऊन स्त्रीला दिलें तें नवरा मेल्यानंतरही तिनें यथेच्छ उपभोगावें. अथवा स्थावरावांतून द्यावें

# मयूखदायभाग

## स्त्रीधन

### नवरा वगैरे यांस स्त्रीधनाविषयीं स्वातंत्र्य नाहीं असें तोच सांगतो.

नारद. १५ स्त्रीधनाचें ग्रहण किंवा त्याग करण्याविषयीं नवरा, पुत्र, पिता, भाऊ, हे कोणी स्वतंत्र नाहींत. जर यांतून एखादा बळात्कारानें स्त्रीधन तोंडांत टाकील तर त्याजकडून सव्याज देवावें. व दंडही शक्त्यनुसार करावा. परंतु तें (स्त्रीधन) जर तिच्या संतोषानें संमती घेऊन खाईल तर त्याला मिळेल तेव्हां मुद्दलमात्र परत देवावें

नवरा वगैरेनीं जबरीनें स्त्रीधन घेतल्यास दंड.

तिच्या संतोषानें घेतल्यास मुद्दलमात्र देवावें.

मनु. स्त्रिया जीवंत असतां त्याचे धनाचाजे बांधव अपहार करितील त्यांस धार्मिक सरकारानें चोराप्रमाणें शिक्षा करावी व नवरा जिवंत असतां जो दागिना स्त्रिया (नेहमीं) घालित असतील. तो वारिसांनीं वांटून घेऊं नये. वांटून घेतला असतां अधोगतीस जातात.

दागीना घालीत असतील म्हणजे नवरा वगैरेनीं तिला दिलेला जो त्या घालीत असतील असा अर्थ.

देवल. १६ वृत्ति, दागिना, **शुल्क**, आणि लाभ, हें स्त्रीधन म्हटलें आहे याचा स्वतां तीउपभोग करणारी हें स्त्रीधन आपत्काळ नसतां नवरा घेऊं शकत नाहीं. त्याचें **वृथादान** केलें किंवा भोग केला तर स्त्रीचें सव्याज द्यावें परंतु पुत्राची पीडा दूर होण्याकरितां तर नवरा स्त्रीधन घेऊं शकतो.

आपत्काला वांचून नवऱ्यानें स्त्रीधन घेऊं नये घेतल्यास सव्याज देवावें.

#### अर्थ

वृत्ति म्हणजे उपजीविकेसाठीं आई बाप वगैरे यानी दिलेलें धन. लाभ म्हणजे व्याज बट्टा, पुत्र परदेंक रून कुटुंबाचें ग्रहण होतें.

याज्ञवल्क्य. दुष्काळांत (अवश्य कर्तव्य) धर्मकृत्यासाठीं, व्याधि दूर होण्यासाठीं, बंधांतून सुटण्यासाठीं, नवऱ्यानें घेतलेलें स्त्रीधन जर त्याची परत देण्याची

# मयूखदायभाग.

## स्त्रीधन

इच्छा नाहीं तर स्त्रीला ते परत मिळणार नाहीं.

वचनांत नवरा या पदाचा निर्देश केल्यावरून अर्थात् नवऱ्यावांचून दुसऱ्या नें दुकळ वगैरे संकटकाळीही **स्त्रीधन** घेऊं नये असें दर्शविलें.

परत देण्याची इच्छा नसल्यासही कचित्
दिलें पाहिजे असें सांगतो.

देवळ ९७ दोन स्त्रिया आहेत आणि त्यांतून एकीशीं संगादि वर्ज केलें आहे तर पूर्वी संतोषानें ही तिनें दिलें असलें तरी याकडून जबरीनें तें तिचें परत देवावें. स्त्री ला अन्नाछादन स्थळ, मिळणार नाहीं तेव्हां तिनें आपलें द्रव्य घ्यावें व वारिसां पासून विभागही घ्यावा. नवऱ्यानें स्त्रीशीं संगादिक वर्ज केल्यास तिनें घेतलेलें द्रव्य परत द्यावें.

हें वचन पतिव्रतेविषयीं, दुष्ट असल्यास तर विभाग मिळणार नाहीं.

देवळ. अपकार करणारी, निर्लज्जरी, द्रव्यनाश करणारी, व्यभिचारतत्पर, अशी स्त्री विभाग घेऊं शकत नाहीं.

देवळ. द्रव्य यज्ञार्थ विहित आहे म्हणून त्याचा धर्मस्थानींच विनियोग करावा. स्त्री, मूर्ख, अधर्मवंत, यांचेठायीं करूं नये.

## शाखा १९

स्त्रीमरणानंतर **अन्वाधेयक स्त्री**
**धन** घेण्याविषयीं अधिकारी सांगतो.

मनु. १ **अन्वाधेयक** द्रव्य व नवऱ्यानें संतुष्ट होऊन जें दिलें तें ती मेल्या नंतर पति जिवंत असतांही अपत्यानें घ्यावें. स्त्रीमरणानंतर अन्वाधेयक द्रव्य अपत्यानें घ्यावें.

अपत्याविषयीं विशेष नोंद सांगतो.

# मयूख दायभाग

## स्त्रीधन

मनु. २ जननी मृत झाली असतां तिची जिंदगी सर्व सख्या भावांनीं सारखी वांटून घ्यावी. व सख्या बहिणींनीही समान वांटून घ्यावी. आई मेल्यानंतर तिची जिंदगी सख्या भावांनीं बहिणींनीं वांटून घ्यावी.

वचनांत कन्या, पुत्र यांनीं मिळून वांटून घ्यावी. असें अपूर्व विधान नाहीं. तर कन्या **इत्यादिकां**चा अभाव आहे तर पुत्रांनीं मिळून वांटून घेण्याचा अधिकार. जेथें केवळ कन्यांसच अधिकार आहे तेथें कन्यांनी मिळून वांटून घ्यावी. हा **अनुवाद** केला असा मिताक्षरेचा आशय.

**अन्वाधेयक**, नवऱ्यानें **प्रीतिदत्त**, याद्रव्याविषयीं. कन्यापुत्रांनी मिळून वांटून घ्यावें असें अपूर्व विधान केलें. (अनुवाद नाहीं) असें कोणी म्हणतात.

बहिणी विषयीं विशेष सांगतो.

मनु ३ **स्त्रीधन** अपत्यानीं घ्यावें. त्यांत कन्येला पुत्रासमान वांटा. परंतु **अविवाहित** असल्यास विवाहित असल्यास कांहीं मानापुरतें पावतें. स्त्रीधनांत कन्येला पुत्रांबरोबर वांटा.

**अविवाहित** कन्या नसल्यास सुवासिनीस भावासमान वांटा.

कात्यायन. सुवासिनी बहिणी, भावांबरोबर विभाग पावतात.

कन्यांच्या कन्यांसही कांहीं (संतोषानें दागिना वगैरे) द्यावें.

मनु. ज्या लेंकीच्या कन्या असतील त्यांसही मातामहीच्या धनांतून कांहीं प्रीतिपूर्वक यथाशक्ति द्यावें.

४ **यौतक स्त्रीधन** तर **अविवाहितां**नेंच पुत्रांस विभाग नाहीं. यौतक स्त्रीधनांत पुत्रांस विभाग नाहीं.

मनु. आईचें जें **यौतक** असेल तो कुमारीचाच भाग.

**यौतक** विवाहादिसमयीं पती सहवर्तमान एकासनीं उपविष्ट असतां जें मिळतें तें. "**दंपतीं**स मिळतें तें **यौतक**" असा निघंटू आहे असें मदनाचें मत.

# मयूखदायभाग.

## स्त्रीधन.

### अन्वाधेय, नवऱ्यानें प्रीतिदत्त, यांहून भिन्न जें पूर्वी सांगितलेलें पारिभाषिक स्त्रीधन, याविषयीं विशेष सांगतो.

गौतम. ५ **स्त्रीधन** कन्यांचें. त्यांत **अविवाहित** असतील त्यांचें सर्व विवाहित असल्यास निर्धन असतील त्यांचें. — स्त्रीधन अविवाहित व निर्धन कन्यांनीं घ्यावें.

ब्राम्हणी कन्या तर सावत्र आईचेंही धन घेत्ये असें सांगतो.

मनु. ६ बापानें दिलेलें जें स्त्रीचें धन असेल, तें ब्राम्हणी कन्येनें घ्यावें. किंवा[1] तिच्या अपत्यानें — स्त्रीधन बापानें दिलें असल्यास ब्राम्हणी कन्या घेईल

कन्येनें आणि तिच्या अपत्यानें वांटून घ्यावें, असें "किंवा" याचा अर्थ.

"ब्राम्हणी" हें पद समान व उत्कृष्ट जातीचें उपलक्षक असें कोणी म्हणंतात परंतु त्याविषयीं प्रमाण शोधिलें पाहिजे.

७ कन्यांच्या अभावीं कन्येची संतती (जिंदगीची) वारीश होईल. — कन्या नसल्यास कन्येची कन्या

नारद. आईचें धन कन्या घेतील कन्यांच्या अभावीं तिचा (आईचा) वंश (पुत्रादिक) घेईल.

८ **भिन्नमातृक** कन्या व कन्यांच्या कन्या यांचा समवाय असल्यास "नांतवास आपल्या पित्याचें द्वारें विभाग कल्पना" यारीतीनें[2] विभाग योजना — सावत्र कन्या व कन्यांच्या कन्या असल्यास विभाग योजना.

---

1 तिच्या म्हणजे कन्येच्या व जिचें धन तिच्या दोन्ही संभवतात. जिचें धन तिचें अपत्य नसल्यास ब्राम्हणी कन्येनें घ्यावें. विकल्पापासूनही हा अर्थ निघतो व प्रत्यासत्ति न्यायेंकरूनही येतो.

---

2 यारीतीनें म्हणजे मिताक्षरेच्या ७ वे प्रकरणीं १० व्या शाखेंत जसा नांतवास

# मयूखदायभाग

## स्त्रीधन.

करावी.

याज्ञवल्क्य. ९ कर्ज फिटून राहिलेलें आईचें धन कन्यानीं घ्यावें. कन्याच्या अभावीं वंशानें घ्यावें. कर्ज फेडून राहिलेलें धन कन्या घेतील.

असें जें सांगितलें तेथें ही वंशपद कन्यासंततीचें उपलक्षण. असे कोणी म्हणतात.

दुसरे म्हणतात कीं कन्येच्या अभावीं पुत्रच घेतील. कारण (वरच्या) नारदवचनांत "विना" या तच्छब्देंकरून आईचाच परामर्श केला आहे. आणि हाच पक्ष आचारास अनुसरून आहे.

"कर्ज फिटून राहिलेलें" याचें तात्पर्य कर्जा पुरतें किंवा त्यापेक्षां कमी असल्यास पुत्रच घेतील असें सांप्रदायिक म्हणतात. कर्जा पुरतें किंवा कमी असल्यास पुत्र घेतील.

१० कन्यादिकांच्या अभावीं पुत्र पौत्र **इत्यादिक** (धन) घेतील.

कात्यायन. कन्याच्या अभावीं आईचें धन पुत्रांचा **दाय** होतो.

हा जो कन्यादिकांस **मातृधना** विषयीं अधिकार सांगितला. तो "**अध्यग्नि, अध्यावहनिक**", **इत्यादिक** पूर्वी सांगितलेलें जेंजें **पारिभाषिक स्त्रीधन**, त्याविषयींच.

११ जर **मातृधन** (स्त्रीधन) शब्द **यौगिक** म्हणजे स्त्री आहे मालक ज्याची असें जें धन तें असा मानिला तर शास्त्रीय **परिभाषेस** वैय्यर्थ येईल. अतएव **स्त्रीधन** (मातृधन) शब्द **पारिभाषिकच** तेणेंकरून "**स्त्रीधन** अपत्यानीं घ्यावें" "**स्त्रीधन** कन्याचें" अशीं पूर्वी सांगितले

---

आपापल्या बापाच्या वांट्यांत विभाग सांगितला तसाच येथें ही आपापल्या आईच्या वांट्यांत लेंकीचे वांटे.

# मयूखदायभाग

## स्त्रीधन.

त्रीं **स्त्रीधन** पदविशिष्ट जीं मनु गौतमादिकांचीं वचनें,तीं **पारिभाषिक स्त्रीधन** परत. आतां "**स्त्रीधन**" अशा पदावांचून ही एकार्थक अशीं, "आईची जिंदगी घेतील" **इत्यादिक** जीं वचनें,तींही **पारिभाषिक स्त्रीधन** परत. कारण एक मूळ कल्पना करण्यांत लाघव आहे. **स्त्रीधन** शब्द **पारिभाषिक** न मानिला तर अनेक मूळ कल्पना करावी लागेल. हें गौरव आहे.

याज्ञवल्क्य. १२ आईबाप निवर्तल्यावर पुत्रांनी त्यांची जिंदगी व कर्ज हीं समान वांटून घ्यावीं.

असा जो आईच्या जिंदगीचा विभाग सांगितला तो. **पारिभाषिक स्त्रीधना** खेरीज द्रव्याचा किंवा सूतकांतणें वगैरे कौशल्यानें मिळविलें त्याद्रव्याचा जो विभाग त्याविषयीं तेणें करून **पारिभाषिका** खेरीज आईचें धन कन्या असतां ही पुत्रादिकच घेतील.

कन्या पुत्र अशी दोहों प्रकारची संतति
नसल्यास **पारिभाषिक स्त्रीधन**
उद्देश करून याज्ञवल्क्य (मि०पृ०२१७
अंक १ मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. १३ अनपत्य स्त्री मेली असतां तिचें धन **बांधवां**स मिळेल.

विवाहभेदें करून धन घेण्याविषयीं **बांधवां**ची व्यवस्था तोच (मि०पृ०२१८ अंक २
मूळ) सांगतो.

याज्ञवल्क्य. १४ **ब्राम्ह इत्यादि**[1] चार विवाहांतून विवाहित अशा अनपत्य स्त्री विवाहभेदें करून मिळाल्या स्त्रीधनाचे वारीस.

---

१ इत्यादिक म्हणजे दैव आर्ष प्राजापत्य

# मयूख दायभाग

## स्त्रीधन.

चें धन नवरा घेईल. इतर[1] विवाहांतून विवाहित अनपत्य स्त्रीचें धन आईबा पांकडे जाईल. परंतु लेंकुरवाळी असल्यास कन्या घेतील.

(ब्राम्हादि विवाहस्थळीं) नवऱ्याच्या अभावीं त्याचे कुळांत तिचा जवळचा संबधी घेईल याप्रमाणेंच (आसुरादि विवाहस्थळीं) आईबापांच्या अभावीं आईबापांचे कुळांतील तिचा जवळचा नातलग घेईल. कारण "**सपिंडा** मध्यें जो जो सन्निहित (नात्यानें जवळ) असेल तो जिंदगी घेईल." असें मनूनें सूत्रानें जवळचें नातेंच जिंदगी घेण्याविषयीं प्रयोजक सांगितलें आहे.

१५ "त्याच्या अभावीं तिचें जवळचे **सपिंड** घेतील." व "आईबापांच्या अभावीं तिचे जवळचे संबंधी." असें जें मिताक्षरेंत (पृ० ३१० अंक २ व ३) सांगितलें, तेथें ही तिचे जवळचे म्हणजे तिच्या द्वारें त्या त्या कुळांतले जवळचे. अशी व्याख्या करावी.

१६ "**ब्राम्ह इत्यादिक** चार" असें (१४ व्या अंकांत सांगितलें) सांगितलें तें ब्राम्हणाविषयीं. कारण ब्राम्हणांसच ते विवाह धर्म्य आहेत, ज्या क्षत्रियादिजातींत **गांधर्व** विवाह ही धर्म्य सांगितला आहे त्याजातींत त्या विवाहानें विवाहित स्त्रीचें धनही नवऱ्यानेंच घ्यावें.

मनु. **ब्राह्म, दैव, आर्ष, गांधर्व, प्राजापत्य**, या विवाहांत (मिळालेलें **स्त्रीधन** ती अनपत्य मेली असतां भर्त्याचेंच **आसुर, राक्षस, इत्यादि** विवाहांत जें तिला दिलें असेल ते. ती अनपत्य मेली असतां आईबापांचेंच.

**ब्राम्ह इत्यादिक** विवाहांतले स्त्री

---

१ इतर म्हणजे आसुर, गांधर्व, राक्षस, पैशाच,

# मयूखदायभाग

## स्त्रीधन.

धन नवऱ्यांच्या अभावीं, व आसु
र इत्यादि विवाहांतलें स्त्रीधन,
आईबापांच्या अभावीं, कोणी घ्या
वें तें सांगतो.

बृहस्पति. १७ मावशी, मामी, चुलती, आत, सासू, पूर्वजपत्नी[1] या मा
तृतुल्य म्हटल्या आहेत. अतएव जर यांस (कन्या व कन्येची कन्या नसे
ल तर दौहित्र किंवा औरस पुत्र घेईल.) औरस पुत्र व दौहित्र अथवा
दौहित्राचा पुत्र नसेल तर बहिणीचा पुत्र वगैरे घेतील. — नवरा व आईबाप नसल्यास अधिकारी.

आसुर इत्यादि विवाहांत बं-
धूंनी दिलेल्या द्रव्याविषयीं विशेष
सांगतो.

कात्यायन. १८ बंधुदत्त जें द्रव्य, तें भावांच्या अभावीं पुत्रांकडे येतें. — बंधुदत्त द्रव्य पुत्रानें घ्यावें

शुल्काविषयीं विशेष सांगतो.

गौतम. १९ बहिणीचें शुल्क सख्या भावांच्या अभावीं आईचे संत
त येतें. — बहिणीचें शुल्क सखे भाऊ घेतील.

"शुल्क तर नवऱ्यानें स्वतां घ्यावें" असें जें शंखानें नवऱ्याला
शुल्कग्रहण सांगितलें तें, ती विवाहाचे पूर्वी मेली तर
येथें याज्ञवल्क्य (मि० पृ० ३२२
अंक ४ मूळ)

---

१ पूर्वजपत्नी म्हणजे वडील भावाची बायको. पितामही असेंही कोणी म्हणतात.

# मयूख दायभाग.

## स्त्रीधन.

याज्ञवल्क्य.२० वाग्दत्त झालेली कन्या मेली असतां, दिलेल्या द्रव्यांत उभयतांचा खर्च वजा करून बाकी परत घ्यावें. वाग्दत्त कन्या मेली असतां खर्च वजा करून परत घ्यावें.

अर्थ.

पूर्वी दिलेले शुल्क, कन्या मेली असतां आपलें व तिच्या बापाचें द्रव्य खर्चून अवशिष्ट राहिलेलें नवऱ्यानें घ्यावें.

कांहीं अंशीं विशेष सांगतो.

बोधायन. २१ मेलेल्या कन्येची जिंदगी सख्या भावांनी सारखी वांटून घ्यावी. त्यांच्या अभावीं आईनें, तिच्या अभावीं बापानें घ्यावी. मेलेल्या कन्येचें धन सख्या भावांनीं वांटून घ्यावें.

हें वचन वाङ्-निश्चय काळीं मातामहादिकांनीं दिलेल्या अलंकाराविषयीं असें सांप्रदायिक म्हणतात.

## शाखा २०

### अनंशांविषयीं[1]

याज्ञवल्क्य. (मि०प्र० ३११ अंक १ मूळ) षंढ, पतित, व पतिता पासून उत्पन्न, पांगळा, उन्मत्त, अज्ञान, आंधळा, असाध्यरोगग्रस्त, इत्यादिकांस विभाग न देतां पोषण मात्र करावें. षंढ पतित इत्यादिकांस विभाग नाहीं.

विभागानंतरही औषधादिकें करून दोषाचें निराकरण झालें असतां विभक्तज पुत्राप्रमाणें विभाग घेतील व.

---

१ अनंश म्हणजे ज्यांस विभाग घेण्याची योग्यता नाहीं ते.

# मयूख दायभाग.

## अनंशाविषयीं.

मनु. नपुंसक, **पतित**, यांस विभाग नाहीं तसाच जन्मांध, जन्म बहिरा, **उन्मत्त**, अज्ञान, मुका यांस व जे कोणी **निरिंद्रिय** असतील त्यांसही विभाग मिळणार नाहीं.

नारद. **पितृद्वेषी**, **पतित**, **पंढ**, व जो **अपयात्रित** हे **औरस** असले तरी विभाग पावत नाहींत मग **क्षेत्रज** कोठून **असाध्यरोगग्रस्त** व जे जड, **उन्मत्त**, पांगळे, तेही पोसावे. त्यांच्या पुत्रांस तर विभाग आहेच.

२ **अपयात्रित** — राजद्रोहादिक अपराध केल्यामुळें भावांनी **घटस्फोटा**दिकें करून बहिष्कृत केलेला. असें मदनाचें मत.

नावेंत बसून समुद्रांतून व्यापारार्थ द्वीपांतरी जाणारा. हा अर्थ सयुक्त. कारण "समुद्रांत नावेंत बसून जाणारा शुद्ध झाला तरी त्याला (जातींत) घेऊं नये" असा कलियुगांत त्यांचा संसर्ग निषेधिला आहे, व राजद्रोहादिक अपराधीं **घटस्फोट** बहिष्कार यांचें विधानही सांगितलें नाहीं.

शंख, लिखित जिंदगी पिंड तिलांजली हीं **अपयात्रिता**पासून निवृत होतात.

वसिष्ठ. ३ **आश्रमांतरगतांस** (जिंदगीचा) विभाग नाहीं. सन्यास्यादिकांस विभाग नाहीं.

**आश्रमांतरगत** म्हणजे **नैष्ठिकब्रम्हचारी**, **वानप्रस्थ**, सन्याशी.

कात्यायन. ४ **अक्रमोढासुत**[1] व **सगोत्रा**[2]पासून झालेला. व **सन्यासभ्रष्ट** यानां कधींही जिंदगी मिळणार नाहीं. सन्यासभ्रष्टाला विभाग नाहीं.

---

१ अक्रमोढासुत म्हणजे ज्याक्रमानें विवाह करावा तो क्रम सोडून जी विवाहित झाली ती अक्रमोढा. तिचा जो पुत्र तो अक्रमोढासुत.

---

२ सगोत्रापासून म्हणजे आपल्या गोत्रींच्या कन्येशीं विवाह केला असतां त्यानवऱ्या

# मयूखदायभाग

## अनंशांविषयीं.

**अक्रमोढासुत** म्हणजे **क्षेत्रज कानीन इत्यादिक** असें कोणी म्हणतात, परंतु ज्येष्ठ कन्येचा विवाह नकरितां कनिष्ठ कन्येचा विवाह केला असतां त्या दोघी **आक्रमोढा** त्यांचे जे पुत्र, ते येथें **अक्रमोढासुत** शब्देंकरून घ्यावे हें युक्त.

५ तो (अक्रमोढासुत) जर पित्याशीं **सवर्ण** आहे तर विभागी होतो. अक्रमोढासुताला विभाग

कात्यायन **अक्रमोढासुत** विभागी होतो, परंतु पित्याशीं **सवर्ण** आहे तर अ**सवर्ण** स्त्रीपासून झालेला व **क्रमोढे**पासून झालेला विभागी होत नाहीं.

**प्रातिलोम्यें** करून प्रसूत जी तिचेठायीं नवऱ्यापासून ही झालेला पुत्र विभाग पावत नाहीं.

वसिष्ठ. **प्रातिलोम्यें** करून प्रसूत झालेल्या स्त्रीचा पुत्र विभागी होत नाहीं त्या च्या भावानीं त्याला मरण पर्यंत अन्नाछादन द्यावें.

गुणवान् पुत्र असतां दुर्वृत्त पुत्र विभागास अयोग्य असें सांगतो.

मनु. ६ सारे भाऊ विरुद्ध कर्माचरण करणारे आहेत तर त्या सर्वांसही जिंदगी मिळणार नाहीं. गुणवान् पुत्र असतां दुर्वृत्त पुत्रास विभाग नाहीं.

बृहस्पति. **सवर्ण** पुत्र असूनही गुणहीन आहे तर आईबापांची जिंदगी घेण्यास अधिकारी नाहीं, श्राद्धकरणारे व श्रोत्रिय असे पुत्र जिंदगी घेतील सत्पुत्र झाला असतां पिता ऋणमुक्त होतो अतएव दुर्वृत्त पुत्र उपयोगी नाहीं.

७ जिंदगी घेणारांनी ह्या **अनंशांचें** आमरणांत पोषण करावें. यांचें पोषण जिंदगी घेणारांनी करावें.

मनु. सुज्ञानें सर्वांसही आमरण पर्यंत यथा शक्ति अन्नाछादन द्यावें हे

# मयूखदायभाग

## अनंशाविषयीं

न्याय्य होय. कारण न देणारा पतित होतो.

८ आश्रमांतरगत, पतित, व यांचे पुत्र यांचें तर पोषण दे खील करूं नये.

पतितादिकांचें पोषणही क रूं नये.

वसिष्ठ. आश्रमांतरगतांस विभाग नाहीं. व षंढ, उन्मत्त, पतित हेही अनंश. त्यांत षंढ उन्मत्त यांचें पोषण करावें.

येथें षंढ उन्मत्त यांचें पोषण सांगितलें तें. आश्रमांतरगत पतित यांचें पोषण करूं नये या अभिप्रायानें.

देवल. पिता मेला असतां नपुंसक, कोढी, उन्मत्त, जड, आंधळा, पतित, व पतिताचें अपत्य व निषिद्ध चिन्ह[१] धारण करणारा हे विभागहीन करावे. त्यांत पतिता वांचून वरकडांस अन्नाछादन द्यावें.

बौधायन. लोकशास्त्रव्यवहार ज्यानीं टाकिले आहेत ते, आंधळा, नपुंसक, व्यसनी, व्याधिग्रस्त, अकर्म करणारे, यांस अन्नाच्छादन पोसावे. परंतु पतिता वांचून.

सन्यासभ्रष्ट व त्याचा पुत्र यांचेंही पोषण करूं नये. असें मदनाचें मत.

९ अनंशांचे पुत्र तर निर्दोष असल्यास विभाग घेतीलच.

विष्णु. त्यांचे (अंधादिकांचे) पुत्र जिंदगी घेतात. पतिताचे म्हणजे पतित व्हावया जोगें कर्म केल्यानंतर त्यास झालेले पुत्र, व आपल्यापेक्षां उत्कृष्ट जातीच्या स्त्रीचे गर्भी झालेले पुत्र, विभाग पावत नाहींत. व तसे पौत्रही

---

१ निषिद्ध चिन्हें म्हणजे आपल्या जातीस योग्य जे केशादिक. त्यांवांचून म्लेंछादि नीच जातीचा पेहेराव.

# मयूखदायभाग

## अनंशांविषयीं

किनामहीची जिंदगी पावणार नाहींत.

याज्ञवल्क्य. (मि०पृ० २१२ अंक ४ मूळ) यांचे औरस व क्षेत्रज पुत्र नि दोंष असल्यास विभागाचे अधिकारी होतात.

### अनंशांच्याकन्या,पत्नी यांविषयीं

विशेष याज्ञवल्क्य (मि०पृ० २१२ अं० ६-७ मूळ)

याज्ञवल्क्य. १० यांच्या कन्यांचें लग्न होई पर्यंत पोषण करावें. व लग्न ही करावें. आणि यांच्या निपुत्रिक स्त्रिया सदाचारसंपन्न आहेत तर पोसाव्या व्यभिचारि णी व प्रतिकूल असतील त्या घालवून द्याव्या.

पंढादिकांच्या कन्या लग्नहोई पर्यंत पोसाव्या स्त्रियाही पोसाव्या.

व्यभिचारिणी असल्यास अन्नाछादन न देतां घालवाव्या. आणि नुसत्या प्रतिकूळ आहेत तर बाहेर घालाव्या. पण पोषण केलें पाहिजे. असें मदनादिकांचें मत.

व्यभिचारिणी घालवून द्याव्या

समाप्त.

LIBRARY OF THE BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC SOCIETY

# कोश

ग्रंथांत जे मोठ्या अक्षरांनीं संस्कृत शब्द
लिहिले आहेत. त्यांचा अर्थ स्पष्ट समजण्या
साठीं कोश.

या कोशांत ज्या शब्दापुढें अंक लिहिला आहे त्या शब्दाचा अर्थ त्या अंकपृष्ठांत चाललेल्या ग्रंथांत किंवा त्या पृष्ठांत नोटींत लिहिला आहे. तेथें पाहावा. बरकड शब्दांचा अर्थ येथें लिहिला आहे. व ज्या शब्दांचा अर्थ नोटींत लिहिला आहे त्या शब्दांवर जी नोटीची निशाणी त्या त्या पृष्ठांत केली आहे ती येथेंही दाखविली आहे.

[1] अकारित. वि० व्याजाचा एकप्रकार ११२

अक्रम. वि० मयूखपृष्ठ १२

अकूटशस्त्र. न० ना० ज्याशस्त्रांत विषादि कृत्रिम नाहींत तें

अकृत. वि० साक्षीचा एकभेद आहे १६९

अकृतकाल. वि० अमुक दिवशीं सोडवीन अशी ज्याविषयीं मुदत केली नाहीं असें एक प्रकारचें गाहाण.

अक्रमोढा. स्त्री० ना० ज्याक्रमानें म्हणजे आधीं वडील वडील कन्येचा विवाह मग धाकट्या कन्येचा, तो क्रम सोडून ज्या विवाहित त्या.

[1] अक्रमोढासुत. पु० ना० मयूखपृ० ९९

अक्रोध. वि० ज्यास क्रोध नाहीं तो

अचिकित्सनीय. वि० ज्याची चिकित्सा होत नाहीं असा जो व्याधि तो.

अतिदेश पु० ना० एका स्थळीं सांगितलेला जो विधि किंवा स्वतःसिद्ध जो अर्थ त्याचें स्थलांतरीं म्हणजे तसेंच येथेंही करावें जाणावें इत्यादि जें कथन तो.

अतिभूरि. वि० ........ ९६

अत्यल्प. वि० ........ २६

अदृष्ट. न० ना० पुण्य

अदृष्टार्थ. पुण्यासाठीं.

अदृष्टफल. न० ना० पुण्याचें फल स्वर्गादि प्राप्ती.

अधिगंता पु० ना० चोरीस गलेलें किंवा हरवलेलें सांपडलें द्रव्य राजा इत्यादिकांपाशीं आणून देणारा

अधनव्यवहार. पु० ना० शिवीगाळ मारामारी खून इत्यादिक विवाद ज्यास हाल्लीं फौजदारी म्हणतात.

अधमर्ण. पु० ना० कुळ

# कोश.

अधिगम. ना० ——— २१९

अधिवास. पु० ना० ——— १८

अध्याहार. पु० ना० ज्यापदावांचून ज्यावाक्याची पूर्ति होत नाहीं अतएव त्यावाक्यांत अन्वयलाविते समयीं जीं बाहेरचीं पदें आणितात तो.

अध्यापन. न० ना० पढविणें

अनवस्था. स्त्री० ना० ——— १७७

अनन्याश्रितद्रव्य. वि ——— १३०

अनागमस्मृतिपरंपरा. स्त्री. ना ८७

अनाथस्त्री. ना० स्त्री. ——— १२

अंतेवासी. ना. पु० शिल्पशास्त्र शिकण्यासाठीं गुरूच्या घरीं करारमुदत भरेपर्यंत राहणारा.

अनियुक्त. वि० ——— ४

अनुकल्प पु० ना० ——— ५

अनुत्तर. ना० जें चार प्रकारचें उत्तर सांगितलें आहे त्याचा अभाव.

अनुपलब्धि. ना. अप्राप्ति.

अनुलोम ना. आपल्यापेक्षां नीचजातीचे स्त्रीचेठायीं उत्तम जातीचे पुरुषापासून संतति होऊन जी मनुष्यादि जाती होत्ये ती प्रत्येकीं.

अनुवाद पु० ना० स्थलांतरीं सांगितलेला जो विधि. किंवा लोकसिद्ध जो प्रकार त्याचें जें सिद्धत्वकथन तो. उ० तसें चोरीस गेलेलें द्रव्य राजानें ज्याचें त्यास परत देवावें हे लोकसिद्ध आहे त्याचाच शास्त्रानें अनुवाद केला

अनुवादक. वि० अनुवाद करणारा

अनुवृत्ति. स्त्री. ना. अन्वयांत कांहीं एक पदांची किंवा वाक्याची अपूर्ति असल्यामुळें त्या अन्वयाची किंवा वाक्याची पूर्ति होण्यासाठीं ज्या मागील स्मृति इत्यादिकांतून पद किंवा वाक्य घेतलें जातें ती.

अनुवध्या. स्त्री. ना० यज्ञांत वधार्थ यूपाशीं बांधायास योग्य जी गाय ती. कोठे अनुबंध्या असेंही आहे. त्या अर्थीं वांस.

अन्यायवर्ती पु० वि० अन्यायानें वागणारा.

अन्वयव्यतिरेक पु० ना० अन्वयव्याप्ति म्हणजे कार्यकारणांची नियमें करून एकत्रस्थिति आणि व्यतिरेकव्याप्ति म्हणजे कार्याचा अभाव तेथें कारणाचाही नियमें करून अभाव राहतो.

अन्वाहित. न. ना. ——— १६६

अपत्यान्वित. पु. ना. ——— मयूख पृ० ९५

अपन्हव. पु. ना. ठाऊक असतां नाकबूल जाणें

# कोश

**अपवाद**. पु० ना० सामान्यविधीचा विशेष विधानें जो बाध होतो तो जसें कोणी एका पाशीं ठेवठेविली असतां ती जशाची तशी परत द्यावी हें सामान्य. परंतु राजदैवोपद्रव्यानें नाश पावल्या मग परत मिळणार नाहीं हा त्याचा अपवाद केला.

**अपवादक** वि० बाधकवचन

**अपविद्ध**. पु० ना० बारापुत्रांतील बारावा. पृ० २७४ पं.४

[२] **अभ्यर्थबोधक**. वि० ——— ८७

**अप्रतिबंधदाय**. पु० ना० खुलादाय ——— २१३

**अप्रकृत**. वि० एकप्रकारचा उत्तराभास आहे ——— २६

**अप्रसिद्ध**. न० वि० एकप्रकारचा पक्षाभास आहे ——— १९

**अप्राप्तव्यवहार**. वि० सोळा वर्षांचे आंत ज्याचें वय तो.

**अप्रामाण्य**. न० ना० प्रामाण्याचा अभाव.

**अंबष्ठ**. पु० ना० ब्राम्हणापासून विवाहित वैश्येचे ठायीं झालेली संतति.

**अभावग्राहकप्रमाण**. न० ना० अभावाचें ग्राहक ह्मणजे दाखविणारें प्रमाण. ——— ८६

**अभिमर्श**. पु० ना० स्पर्श.

**अभिमर्शन**. न० ना० स्पर्श

**अभियोग**. पु० ना० फिर्याद.

[२] **अभिषेकादिगुणयुक्त**. वि० राज्याभिषेक आदिशब्देंकरून पटबंध छत्रचामर किंवा दुसरीं जीं चिन्हें, त्यांकडून युक्त. ——— पृ० १

**अभिशाप**. पु० ना० वास्तविक तो दुर्गुण किंवा दुष्कर्म अंगी नसतां याचे अंगीं अमुक दुष्कर्म आहे अशी स्कीति होते तो.

**अभिशापित**. वि० अभिशापानें विशिष्ट जो तो.

**अभ्युपेत्याशुश्रूषा**. स्त्री० ना० प्रकरण १३ वें.

**अभ्रातृक**. वि० जिला भाऊ नाहीं ती.

**अमात्य**. पु० ना० राजाचे प्रधान.

**अल्पविषय**. वि० ज्या फिर्यादींत फार विषय नाहीं अशी ह्मणजे अगदीं थोड्या रकमेची फिर्याद

**अर्जक**. वि० संपादन करणारा.

**अर्थवाद**. पु० ना० स्तावकवाक्य. वाक्याचे स्वार्थीं प्रामाण्य नसतां स्थलांतरीं सांगितलेल्याची प्रशंसा उ० मोठा वैदिक ही आततायी आला असतां त्याला मारावें. या वाक्याला स्वार्थीं प्रामाण्य नाहीं. ह्मणजे वैदिक आततायी न मारावे मग सामान्य आततायीला मारावें हें सांगायास नको. कैमुतिन्यायेंकरून सिद्ध झालें.

[१] **अर्थशास्त्र**. न० ना० ——— ३

**अवरुद्ध**. वि० इतर पुरुषांशी संगाची बंदी करून जी संभोगार्थ ठेविली ती.

# कोश

**अवध्य**. वि० वधास योग्य नव्हे तो.

**अवसथ्य**. पु० ना० स्मार्ताग्नि, विवाहाग्नि,

**अविभक्त**. वि० विभक्त झालेला नव्हे तो.

**अविभाज्य**. वि० विभाग करावयाजोगें न व्हें असें धन.

**अविभाज्यत्व**. न० ना० अविभाज्य धनावरचा धर्म. अविभाग.

**अविवक्षित**. वि० वाच्यवार्थ सोडून अन्यार्थविषयीं लक्षणा ज्याची केली जाते त्या पदाचें विशेषण.

**अविवक्षितस्वार्थपर**. वि० आपला वा स्तवार्थ सोडून लाक्षणिक अर्थ दाखविणारें जें पद त्याचें विशेषण. ——— २४२

**अविवाहित**. वि० ज्याचा विवाह झाला नाहीं तो किंवा ती.

**अव्याप्ति**. वि० ——— २६

**अश्वदान**. न० ना० अश्वाचें दान.

**अश्वसारथ्य**. न० ना० घोड्यांचा किंवा रथादिकांचा जो सारथि त्याचें काम.

**अश्रुत**. वि० अविद्वान् किंवा ज्यानें करार केला नाहीं तो.

**असपिंड**. वि० आपल्या सपिंडांतला जो नव्हे तो.

**असंकीर्ण**. वि० संकीर्ण म्हणजे मिश्रित नव्हे तें असें उत्तर.

**असवर्ण**. वि० ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य शूद्र असे चार वर्ण आहेत त्यांत आपापल्या वर्णाचा नव्हे तो. ——— २५१

**असंस्कृत**. वि० ज्याचे विवाहादि संस्कार झाले नाहींत तो किंवा ती.

**असंसृष्ट**. वि० विभक्त होऊन पुनः एकत्र झालेला नव्हे तो. किंवा तें धन.

**असंसृष्टी**. ना० असंसृष्ट.

**असाध्यरोगग्रस्त**. वि० साध्य व्हावयाजोगा नव्हे अशा रोगानें व्यापलेला.

**असाधारणव्यवहारमातृका**. ना० प्रकरण २

**अस्वामिक**. वि० ज्या द्रव्याला स्वामी नाहीं तें.

**अस्वामिविक्रय**. पु० ना० प्रकरण १० वें.

**अस्मार्तकाल** पु० ना० स्मरण राहावयाजोगा नव्हे असा जो काल तो. शंभर वर्षें पुढें.

**अस्मार्तकाल, अस्मार्तकालिक**. वि० शंभर वर्षें पुढें जो भोगवटा तो.

**अक्षत**. वि० पुरुषसंयोगानें दूषित न झाली अशी पहिली पुनर्भू, पृ० १३२ पं० ६

**अज्ञानधन**. न० ना० ज्यास ज्ञान नाहीं –

ह्मणजे लौकिक व शास्त्रीय व्यवहार माही तनाहीं त्याचें धन.

**आगम** पु॰ना॰ सत्ता उत्पन्न होण्याचें साधन जें जिंदगी, खरेदी, वांटा, परिग्रह, ठेव सांपडणे, प्रतिग्रह, विजित, वाटी दिढीवगैरे, सेवा, हे व्यवहार किंवा व्यवहार होऊन झालेलें पत्र तो.

**आगमनिरपेक्ष** वि॰ ज्याला आगमाची अपेक्षा नाहीं असा भोगवटा.

**आगमविरहित** वि॰ आगमावांचून झालेला भोगवटा.

**आगमसंपादक** वि॰ आगमाचें संपादन करणारा.

**आगमसापेक्ष** वि॰ आगमाची अपेक्षा ज्यास आहे असा भोगवटावगैरे.

**आचारविरुद्ध** वि॰ आचारास जो विरुद्ध तो.

**आचार्य** पु॰ना॰ उपनयन करून विद्या देणारा. किंवा कांहीं एक विधान करण्यासाठीं वरलेला जो तो.

**आततायी** पु॰ ना॰ शस्त्रादि घेऊन वधार्थ उद्युक्त.

**आत्मबंधू** पु॰ना॰ ——— ३०२

**आधान** न॰ना॰ अग्निसिद्ध करणें.

**आर्ष** व **आर्षविवाह** पु॰ना॰ ज्या विवाहांत दोन गाई घेऊन कन्यादान होतें तो.

**आश्रम** पु॰ना॰ ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, आणि सन्यास असे चार आश्रम आहेत ते प्रत्येकीं.

**आश्रमांतर** न॰ना॰ सन्यास.

**आश्रमांतरगत** वि॰ आश्रमांतरांत गेलेला म्हणजे सन्याशी, वानप्रस्थ,

**आसिद्ध** ना॰ ज्यास द्वाही घातली आहे तो.

**आसुर**, **आसुरविवाह** पु॰ ना॰ — २३८

**आहवनीय** पु॰ ना॰ अग्निहोत्रांतील एक अग्नि आहे.

**आहिताग्नि** पु॰ वि॰ ज्यानें अग्निहोत्र घेतलें आहे तो.

**आक्षेप** पु॰ ना॰ निर्भर्त्सना.

**आज्ञांकित** वि॰ आज्ञाधारक.

**इतिहास** पु॰ ना॰ पूर्वी झालेल्या वृत्ताची कथा, भारतादिक.

**इत्यादि** अ॰ वगैरे.

**इत्यादिक** अ॰ वगैरे.

**उद्गाता** पु॰ ना॰ यज्ञांतील एक ऋत्विज.

**उत्तमर्ण** ना. सावकार.

**उत्तमसाहस** पु॰ ना॰ एक हजार ऐंशीं

पण. किंवा हजारपण धनदंड. वध. सर्वस्व
हरण. गांवांतून हांकून देणें. डागदेणें. अंग
छेद हे दंड उत्तमसाहस म्हटले आहेत. व
या शिक्षा मिळायाजोगा जो अपराध तोही
उत्तमसाहस.

**उत्तमद्रव्यें**. न. ना. पृ. ४७७ पं. ६

**उत्तमांग**. न. ना. शीर शिरकमळ.

**उत्तर**. न. ना. ——— २३

**उत्तरवादी**. पु. उत्तरसांगणारा. उत्तर
काळीं मीं हें घेतलें. उपभोगलें. असें प्रतिपा
दनकरणारा. तोही.

**उत्तरपक्ष**. पु. ना. उत्तरदेणाराचा जो प
क्ष तो उत्तरकाळीं मीं घेतलें भोगिलें असें
प्रतिपादनकरणाचा पक्ष. ही.

**उत्तरत्व**. न. ना. उत्तरावरचा धर्म.

**उत्तराभास**. पु. ना. वस्तुगत्या उत्तर
नसतां उत्तरासारिखें भासतें जें वाक्य.
तें. ——— २५

**उत्पन्नसंकट**. वि. ज्याला संकट उत्प
न्न झालें आहे तो.

**उत्पादक**. वि. पु. उत्पन्नकरणारा. ज
नक.

**उत्पादकत्व**. न. ना. उत्पादकावरचाध
र्म. उत्पादनगुण.

**उद्धार**. पु. ना. काढून ठेविलेला अंश.

**उद्धारविभाग**. पु. ना. १२८ वे दृष्टांत
सांगितलेला श्रेष्ठादिविभाग.

**उद्भावन**. न. ना. प्रगटकरणें शाबीत-
करणें.

**उद्धारक**. वि. हरण केलें किंवा जप्तीम
राहिलेलें द्रव्य हस्तगत करणारा.

**उद्धृत**. पु. ना. शिवधडी एकप्रकारचेसा
मंत ——— १३२

**उन्मत्त**. वि. ——— ११.

**उत्सृष्टपशु**. पु. ना. ——— ३५२

**उपकारक**. वि. उपकारकरणारा

**उपजीव्य**. वि. उपजीवनोपयोगी वृक्षादिक

**उपनिधि**. पु. ना. प्रकरण ४ थें.

**उपनेतृत्व**. न. ना. उपनेता म्हणजे मुंज
करणारा जो त्यावरचा धर्म.

**उपन्यास**. पु. ना. उपपादन.

**उपपातक**. न. ना. ——— १७१

**उपपादन**. न. ना. प्रतिपादन.

**उपप्लव**. पु. ना. उपद्रव.

**उपलब्धि**. स्त्री. ना. प्राप्ति.

**उपस्थ**. न. ना. गुह्येंद्रिय.

**उपसंहार**. पु. ना. आकर्षण. संकोच

**ऋणमोचित**. पु. ना. दासांतील एकप्रकार
३९१ पं. २

# कोश.

**ऋणादान**. नं॰ ना॰ कर्ज देण्या घेण्याचा व्यवहार प्रकरण ३ रें.

**ऋतु**. पु॰ ना॰ वसंतादिक किंवा स्त्रियांचे रजोदर्शनापासून सोळा दिवस.

**ऋत्विज**. पु॰ ना॰ यज्ञांतील अध्वर्यु, होता, इत्यादिक अधिकारी.

**एकशफ**. ना॰ एका खुराचा पशु, घोडा, गाढव, खेचर,.

**एकछायाश्रित**. वि॰ अधमर्णस्थानापन्न जे जामीन ते प्रत्येकीं.

**एकीय**. वि॰ एकाचें जें मत तें.

**एकार्थवादी**. पु॰ना॰ एका अर्थाविषयीं वाद सांगणारे.

**एकार्थविषयक**. वि॰ पृ॰ ६॰ पं॰ ६

**एकोद्दिष्ट**. न॰ ना॰ एकच्या मृतासच उद्देश करून जें श्राद्धादिक तें.

**औरस**. पु॰ना॰ बारा पुत्रांतील मुख्य पुत्र. ———— पृ॰ २७० पं॰ ८

**कटाग्नि**. पु॰ना॰ कट म्हणजे एक प्रकारचें तृण आहे. तद्विशिष्ट जो अग्नि तो.

**कन्यागत**. न॰ ना॰ स्त्रीधनांतील एक प्रकारचें धन. ———— मयूख पृष्ठ ५५ पं॰ ६

**कबंधाकार**. वि॰ कबंध ह्मणजे धड त्याचे आकारासारिखा.

**कर्कशा**. स्त्री॰ वि॰ जी विषयीं व्यभिचाराची शंका आहे ती.

**कर्तव्यतासामग्री**. स्त्री॰ ना॰ करावयाचें जें कार्य त्यांची सामग्री.

**कर्त्रंतर**. न॰ ना॰ एका कर्त्याहून अन्य जो कर्ता तें. जसें स्थलांतर, ग्रामांतर. तसेंच कर्त्रंतरही.

**कर्मजन्य**. वि॰ क्रियेपासून झालेली निवृत्ति.

**कर्मकृत**. स्त्री॰ दाही चा प्रकार पृ॰ १४

**काकिणी**. स्त्री॰ वीस कवड्या म्हणजे एक काकिणी, दमडी.

**काणा**. पु॰ त्रि॰ एकाक्ष. एक्या डोळ्यानें अंधळा.

**कानीन**. पु॰ ना॰ बारा पुत्रांतील पांचवा ———— पृ॰ २७१ पं॰ १

**काम्यधर्म**. पु॰ ना॰ इष्टफलप्राप्तीच्या उद्देशानें केलेला धर्म.

**कायिक**. वि॰ शरीरें करून घडलेला किंवा शरीरसंबंधि जो प्रकार. तो.

**कायिक**. वि॰ व्याजाचा एक प्रकार. ———— पृ॰ ११० पं॰ १९

**कार्मिक**. वि॰ ———— पृ॰ पृ॰ ३७७

**कारणान्तर**. न॰ ना॰ ———— पृ॰ २४

# कोश.

**कारित.** वि० व्याजाचा एकप्रकार पृ० १११

**कार्षापण.** पु० ना० तांब्याचा पण सुमारें पैसा

**कालकृत.** वि० ह्याहीचा एक प्रकार पृ० ७४

**कालकृत.** वि० अमुक दिवशीं सोडवीन अशी मुदत केलेलें गहाण.

**कालिक.** वि० व्याजाचा एक प्रकार पृ० ११०

**कुंड** २लिं० पु० ना० नवरा जिवंत असतां व्यभिचारापासून झालेली संतति.

**कुदृष्टवादी.** पु० ना० माझ्या वादाची न्यायाधीशांनीं चांगली चौकशी केली नाहीं असें बोलणारा.

**कुपित.** वि० कोपानें युक्त.

**कुप्य.** न० ना० जस्त कथील शिसें इत्यादि

**कुंभ.** पु० ना० एकधान्य मोजायाचें माप २० द्रोण म्हणजे एक कुंभ सुमारें १० पायली.

**कुलपरंपरायात.** वि० वंशांत परंपरेनें प्राप्त जें क्षेत्रादिक तें.

**कूटसाक्षी.** २लिं० ना० खोटी साक्ष देणारा

**कूप.** पु० ना० ज्याला पायऱ्या नाहींत असा आड.

**कृतान्न.** न० ना० शिजलेलें अन्न पृ० २५४

**कृतकाल.** वि० मुदतीचें गहाण दासांतील एक प्रकार. —— पृ० ३८१

**कृतकालापनेय** कृतकालोपनेय. वि० मुदतीचें गहाण —— पृ० १५०

**कृत्रिम.** पु० ना० बारा पुत्रांतील नववा पुत्र —— पृ० २७३ पं० १४

**कृत.** वि० साक्षीचा एकप्रकार पृ० १६८ पं० १३

**कृष्णभौम.** न० ना० पृ० २३४ पं० १९

**केदार.** पु० ना० भात खाचरें. केदारसाळी

**केवलदत्तक.** पु० ना० हा पुत्र तुमचें आमचें श्राद्ध करील असा करार नसतां दत्तक दिला जातो तो.

**कैमुतिन्याय.** पु० ना० "किमुत" असा शब्द ज्या न्यायांत आहे तो. उ० मोठा चतुःशास्त्रीही आततायी आला असतां मारावें च. किमुत सामान्य ब्राह्मणास मारावें एथें सामान्य ब्राह्मणास मारणें कैमुतिन्यायें करून सिद्ध होतें यास अर्थवादही म्हणतात.

**कोश.** पु० ना० जामदारखाना. एक दिव्य आहे. ज्यांत अपराध्यास त्याच्या आराध्य देवतेचें तीर्थ पाजावें लागतें. त्या दिव्यास कोशपान संज्ञाही आहे. रेशमी किडा व त्याचें घर न० ना०.

**कौशेय.** पु० ना० रेशीम रेशमी वस्त्र.

**क्रतु.** पु० ना० यज्ञ० याग. अदृष्ट

**क्रमायातत्वंतोधृत** वि०पृ० २३९पं१

**क्रमोढा**. स्त्री. ना० ज्या क्रमाने विवाह व्हाव याचा त्याक्रमानें विवाहित जी स्त्री. ती.

**क्रय**. पु० ना० खरीदी.

**क्रिया**. स्त्री० ना० प्रमाणसाक्षी लेख्यादिक.

**क्रियोपन्यास**. पु० ना० प्रमाणांचें प्रतिपादन. पुरावा दाखविणें.

**क्रीत**. पु० वि० बारापुत्रांतील आठवा. ———— पृ० २७२ पं० ४

**क्रीत**. वि० खरीद केलेला. दासांतील एकभेद आहे ———— पृ० ३८०

**क्रीतानुशय** पु० ना० प्रकरण १२वें.

**क्रोधमूलकव्यवहार**. पु० ना० क्रोधानें उत्पन्न झालेला वाद.

**क्रोधनिमित्तकव्यवहार**. पु० ना० वर प्रमाणें.

**क्लीब**. पु० ना० नपुंसक

**गण**. पु० ना० नेमलेली मंडळी. खूट. सैनिकांचा गट.

**गणद्रव्य**. न० ना० मंडळीचें जें समायीक द्रव्य तें.

**गर्भदास**. पु० ना० जो गर्भांत असतां ज्याची आई दासी झाली. तो किंवा दासीपुत्र ही.

**गांधर्व**. पु० ना० स्त्रीपुरुषांच्या परस्परसंकेतानें जो स्वयंवर होतो तो विवाह.

**गुणप्रधानभाव**. पु० ना० एक मुख्य व दुसरे गोण. त्यांचा जो प्रकार तो.

**गुणवान्**. वि० पृ० १७० वे दर्शनांतलेले साक्षी.

**गुणी**. वि० गुणवान्.

**गुरु**. पु० ना० जो चौलोपनयनादि क्रिया करून वेदाध्ययन सांगतो. तो.

**गुरुतल्पग**. पु० ना० बापाच्या किंवा गुरुच्या स्त्रीशीं संग करणारा.

**गुरुतल्पगामी** पु० ना० गुरुतल्पग.

**गुरुतल्पगमन**. न० ना० बापाच्या किंवा गुरूच्या स्त्रीशीं संग करणें.

**गूढज**. पु० ना० बारापुत्रांतील चौथा ———— पृ० २७१ पं० ५

**गूढ**. वि० साक्षीचा भेद. ———— पृ० १६९

**गूढोत्पन्न**. पु० ना० गूढज.

**गृहदास, गृहजात**, पु० ना० घरच्या दासीचेठायीं झालेला ———— पृ० ३८०

**गोप्य**. न० ना० एकप्रकारचें गहाण. भूमींत पुरून रक्षण करावया जोगें सोनें रुपें इत्यादि धन.

**गोत्रज**. २ लिं० ना० गोत्र म्हणजे यासि

# कोश.

ष, काश्यप, इत्यादिक त्यांत जन्मलेले ते.

गोलक. २ लिं॰ ना॰ विधवेची संतति गोलक

ग्रहावेश. पु॰ ना॰ ग्रहपीडा.

ग्रावस्तुत. पु॰ ना॰ यज्ञांतील एक ऋत्विज आहे.

ग्राहक. वि॰ घेणारा, गिऱ्हाईक.

घटस्फोट पु॰ ना॰ जो प्रायश्चित्त घेऊं इच्छित नाहीं त्याचे त्यागार्थ जी घागर फोडणें इत्यादि क्रियाकरितात तो.

चतुष्पद. ना॰ चार आहेत पाय ज्यांस म्हणजे पशु.

चतुष्पाद वि॰ भूजबानी, उत्तर, पुरावा, आणि निर्णय असे चार आहेत पाय ज्यास असा जो व्यवहार तो.

चमरी. स्त्री॰ ना॰ वनगाई. वनगाईचे केश. चवरी.

चरित्र. वि॰ एकप्रकारचें गहाण. पृ॰ १५७

चंडाल, चांडाल, पु॰ ना॰ शूद्रापासून ब्राह्मणीचेठायीं झालेला. महार. अंत्यज.

छल. न॰ ना॰ कपट.

छलानुसारी. वि॰———— पृ॰ ५३प१६

जडधन. न॰ ना॰ अंतःकरणारानें विकलजो त्याचें धन.

जनकपिता. पु॰ ना॰ ज्यापासून जन्म होतें तो पिता.

जानपद. वि॰ जनपद म्हणजे देश. तत्संबंधी जो लेख इत्यादिक. तो

तत्सम. वि॰ त्या इतका, म्हणजे विवादास्पदीभूत द्रव्या इतका. किंवा विवादपरंपरा जयनिमित्त धनदंडा इतका.

तत्साधक. वि॰ त्याचें साधनकरणारें जें प्रमाण इत्यादिक. तें.

तर्क. पु॰ ना॰ न्याय. युक्ति.

तमोगुणाक्रांत. वि॰ तमोगुणेंकरून व्याप्त.

त्रैविद्य. न॰ ना॰ तिहीं वेदांचे. किंवा तीन आहेत विद्या ज्यांस ते त्रिविद्य. त्यांचा समूह

दंडदास. पु॰ ना॰ दंडाबद्दल दास्य पतकरून राहिलेला.

दंडपारुष्य. न॰ ना॰ मारामारी प्रकरण १८वें

दंडापूपिकान्याय. पु॰ ना॰ पृ॰ २६३ पं॰ ४

दंड्य. वि॰ दंडकरावयास योग्य.

दत्त. न॰ ना॰ दिलेलें द्रव्य.———— पृ॰ ३७० पं॰ ११

दत्तक. पु॰ ना॰ बारा पुत्रांतील सातवा ———————— पृ॰ ३७२ पं॰ १

दत्तात्मा. पु॰ ना॰ बारा पुत्रांतील दाहावा. तोच स्वयंदत्त.———————— पृ॰ २७३

दत्तानपकर्म. न॰ ना॰ प्रकरण १३वें.

## कोश

**दत्ताप्रदानिक** न० ना० प्रकरण ११ वें.

**दमनवाचक**. वि० दमन ह्मणजे दर्पशांति तिचा वाचक.

**दान**. न० ना० ———— पृ० ९० पं ११

**दासी दान** न० ना० दासीचें दान.

**दाय**. पु० ना० जिंदगी. नात्यानें मिळाया चा जो हिस्सा तो ———— मयूखपृ० ९०

**दायग्रास**. पु० दासांतील एकप्रकार ———— पृ० ३८० पं० २०

**दायभाग**. पु० ना० दायाचा जो विभाग म्हणजे वांटा तो. प्रकरण ७ वें.

**दायाद** पु० ना० वारीश.

**दिगंबर**. पु० ना० ———— पृ० ३९३ पं० ३

**दिव्य**. न० ना० मानुषप्रमाणेंकरून निर्णय व्हावयाजोगा नव्हे, असा जो व्यवहार, त्याचा निर्णयकरणारें जें धट, तप्तमाष, इत्यादि प्रमाण. तें.

**दुर्बोधविभक्तिसमास**. पु० ना० कष्टेंकरून ज्यांचा बोध होतो अशा ज्या विभक्ति, समास, ते प्रत्येकीं.

**दुर्भिक्षरक्षित**. पु० ना० दासांतील एक भेद. ———— पृ० ३८० पं० २१

**दुर्व्यसनी**. वि० व्यभिचार. जुगार. भांग. इत्यादि दुर्व्यसन ज्यास आहे तो

**दुष्प्रतिग्रह**. पु० ना० जो प्रतिग्रह केला असतां अधोगतीस जातो तो. म्हणजे वैतरणी. शय्या, लोखंड, तेल, म्हैस, इत्यादि निंद्य प्रतिग्रह.

**द्यूतसमाह्वय**. पु० ना० द्यूत म्हणजे जुगार, आणि समाह्वय म्हणजे टोणगे, एडके, इत्यादिकांची पैज (लढाई) प्रकरण १६ वें

**दृष्टदोष**. वि० ज्याचे मिथ्याभाषण वगैरे दोष पाहण्यांत आले तो.

**देय**. न० ना० द्यावयास योग्य जें द्रव्य. तें.

**देश**. पु० ना० ———— पृ० १८

**दैव**. पु० ना० यज्ञांतील ऋत्विजांस कन्यादान केलें जातें तो दैवविवाह.

**दैव**. वि० मनुष्यसाध्य नव्हे असा जो कांहीं आगलागणे, वाहणे, इत्यादि दैवकृत उपद्रव तो.

**दैविक**. वि० दैव. दैवोपद्रव.

**दोषनिषिद्ध**. वि० दोषामुळें निषेधिलले ———— पृ० ३७२ पं १०

**दोषोद्भावन**. न० ना० दोषप्रगटकरणें, शाबीतकरणें.

**दौहित्र**. पु० ना० कन्येचा पुत्र.

**दौहित्री**. स्त्री० ना० कन्येची कन्या.

**द्रम्म**. पु० ना० सोळापण. टक्का, पावला,

# कोश.

सुमारें सोळा पैसे.

**द्रोण**. पु॰ना॰ एकधान्य मोजावयाचें माप.

**द्वादशवार्षिक**. न॰ना॰ बारावर्षांच्या अवधी चें प्रायश्चित्त इत्यादिक.

**द्विज**. पु॰ ना॰ उपनयनाचे अधिकारी ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, अर्थविशेषीं केवळ ब्राम्हणच,

**द्विपद**. न॰ना॰ दासी दास इत्यादिक.

**द्विपितृक**. दोन आहेत बाप ज्यास तो. द्यामुष्यायण.

**द्यामुष्यायण**. पु॰ ना॰ एकप्रकारचा पुत्र दोघांचें पुत्रत्व पावलेला. ——— पृ॰२६४

**द्यामुष्यायणदत्तक**. पु॰ना॰ हामी तुम्हा सदत्तक देतों हा तुमचें व माझें पुत्रकार्य करील असा करार करून दिलेला दत्तक.

**द्वैध**. न॰ना॰ भेद, मतभेद, विप्रतिपत्ति.

**धनव्यवहार**. पु॰ना॰ ज्या व्यवहारामध्यें देणें घेणें इत्यादि धनसंबंध आहे तो. त्यास हाल्लीं दिवाणी म्हणतात.

**धर्मशास्त्र**. न॰ना॰ धर्मसंरक्षणपूर्वक राजनीति ज्यांत आहे असें शास्त्र.

**धर्मभ्रात्रेकतीर्थी**. पु॰ना॰ ——— पृ॰२०५ पं॰६

**धर्मादिकउपाय**. पु॰ना॰ ——— पृ॰ ११९

**धर्मप्रधान**. पु॰वि॰ धर्मरूप पुरुषार्थाविषयीं तत्पर.

**धर्म्य**. वि॰ धर्मास अनुसरलेला, धर्मयोग्य.

**धिग्दंड**. पु॰ना॰ धिक्काररूप जो दंड तो. पृ॰८२

**ध्वजाहृत**. वि॰ युद्धांत जिंकून आणिलेला जो दास केला तो एकप्रकारचें अविभाज्य धनआहे ——— मयूखपृ॰५४पं॰१

**ध्वजिनी**. स्त्री॰ ना॰ सेनेचा प्रकार पृ॰३२१पं॰६

**नाष्टिक**. पु॰ना॰ ज्याचें द्रव्य हरवलें (किंवा चोरीस गेलें) आहे तो.

**निगमवादी** पु॰वि॰ ——— पृ॰ ३१२

**नित्यकर्म** न॰ना॰ संध्याहोमादिक.

**निगूढार्थ**. न॰वि॰ एकप्रकारचा उत्तराभास ——— पृ॰२६पं॰१६

**निधि**. पु॰ना॰ ठेवा.

**निधिप्राप्ति**. स्त्री॰ना॰ ठेवा सांपडणें

**निबंध**. पु॰ना॰ वृत्ति, शेटेपणा, महाजनकी वगैरे वतन, कर, जकात, दस्त.

**नियतोपायक**. वि॰ ज्यानें उपाय नियमित केले आहेत असें स्वत्व.

**नियमविधि**. पु॰ना॰ मयूखपृ॰२८पं॰७

**नियुक्त** पु॰ना॰ व्यवहार पाहण्याविषयीं वेतन देऊन नेमलेले सभासद.

**नियुक्त**. पु॰ना॰ ज्यास पुत्रोत्पादना विषयीं गुरूचा नियोग झाला आहे तो किंवा ती.

**नियोग**. पु॰ना॰ निपुत्रिक विधवेला अपत्यो

त्पादनार्थ युगांतरी जी शास्त्राज्ञा सांगितली आहे तो.

**निरग्निक**. वि० ज्यास श्रौताग्नि किंवास्मार्ताग्नि नाहीं तो.

**निरर्थ**. वि० ———— पृ०२०

**निरपत्य**. वि० ज्यास अपत्य नाहीं तो किंवा ती.

**निराबाध**. वि० ———— पृ०२०

**निरिंद्रिय**. वि० ज्यास इंद्रिय नाहीं तो नकटा अंधळा बहिरा इत्यादिक.

**निरुद्ध**. वि० बंदीतपडलेला. किंवा उत्तमर्णानें कार्यादि निरोध ज्याचा केला आहे तो.

**निर्ग्रंथ**. पु० ना० नास्तिक, आत्मवादी,

**निर्वर्तन**. न० ना० क्षेत्राचें एकप्रमाण पृ०१८पं० १९

**निर्वृत्तरमण**. वि० ज्याची प्रजनन शक्ति नष्ट झाली तो.

**निवृत्तरजस्क**. वि० जिचा विटाळगेलाती.

**निवेशन**. न० ना० ———— पृ०३४१पं० ३४

**निन्हव**. पु० ना० अपन्हव.

**निन्हववादी**. वि० खोटें बोलणारा. अपन्हववादी.

**निन्हवोत्तर**. न० ना० खोटेंउत्तर.

**निश्चितापराध**. पु० ना० निश्चित असा जो अपराध तो. ———— पृ०१०पं०५

**निषादस्थपतिन्याय**. पुना. मयूखपृ०३५पं.१

**निष्क**. पु० ना० चार सुवर्ण. सुमारें चार तोळे. सोळा द्रम्म म्ह०१६ टके. सुमारें चार रुपये हा बहुतकरून होन असावा.

**निष्प्रयोजन**. वि० ———— पृ०२०

**निक्षेप**. पु० ना० रूपसंख्यादि दाखवून जें विश्वासानें दुसऱ्यापाशीं द्रव्य ठेविलें जातें. तें. ठेव.

**नेष्टा**. पु० ना० यज्ञांतील एक ऋत्विज.

**नैथानी**. स्त्री० ना० सीमेचा प्रकार पृ०३२९पं११

**नैमित्तिककर्म**. न० ना० ग्रहण, व्यतीपात, अर्धोदयप्रयुक्तदान, श्राद्ध इत्यादिक.

**नैष्ठिकब्रम्हचारी**. पु० ना० व्रतबंधापासून ब्रम्हचारीधर्मांतच काळक्रमणाकरणारा.

**न्याय**. पु० ना० निर्णय, चौकशी, इनसाफ, युक्ति, तर्क, मीमांसेतील न्याय. देहलीदीपन्याय, काकाक्षिगोलन्याय, इत्यादिकलौकिकन्याय ही.

**न्यायसभा**. स्त्री० ना० न्यायकरण्याचें स्थळ, कचेरी, दरबार, हाली ज्यास कोर्ट म्हणतात.

**न्यायमूल**. न० ना० ———— पृ०६९पं०१४

**न्यायविरुद्ध**. वि० ———— पृ०२७पं१०

**न्यायाधीश**. पु० ना० न्यायकरण्याविषयीं मुख्य नेमलेला सभासद, प्राड्विवाक, राज-

# कोश.

प्रतिनिधि. पूग. श्रेणी. गण. मुनसफ. जडज. मामलतदार वगैरे.

**न्यास**. पु॰ ना॰ ठेव. ———— पृ॰ १६६

**पंड**. पु॰ ना॰ नपुंसक.

**पंचमहायज्ञ**. पु॰ ना॰ ब्रम्हयज्ञ, पितृयज्ञ, (श्राद्धादिक) देवयज्ञ (होमादिक) मनुष्ययज्ञ (ब्राम्हणभोजन), बलिकर्म (वैश्वदेव),

**पण कार्षापण**. पु॰ ना॰ सोळा माषभार किंवा वीस माषभार एक तांब्याचें नाणें अथवा चार काकिणी (दमड्या) म्हणजे एक पण, प्रतिज्ञा,

**पणजित**. पु॰ वि॰ दासांतील एकभेद. ———— पृ॰ ३८१

**पण्य**. न॰ ना॰ विकावयासाठीं बाजारांत मांडलेला माल.

**पतित**. पु॰ ना॰ शूद्राद्यन्न भक्षणानें अथवा महापातकाचाचरणानेंकिंवा तत्संगानें जोजातिभ्रष्ट झाला तो.

**पत्नी**. स्त्री. ना॰ स्वजाति विहित विवाहानें जी ज्याशीं विवाहित ती त्याची.

**परस्त्री**. ना॰ परस्त्री विषयीं वाद म्ह॰ व्यभिचार.

**परपूर्वस्त्री**. वि॰ स्वैरिणी पुनर्भू. पृ॰ १२३ पं॰ ३

**परामर्श**. पु॰ ना॰ विचार.

**परार्थवादी**. तिऱ्हाईताचे अर्थाविषयीं वाद सांगणारा.

**परिग्रह**. पु॰ ना॰ सत्ता उत्पन्न होण्याचा एक उपाय. ———— पृ॰ २१९ पं॰ १

**परिसंख्या**. स्त्री॰ ना॰ ———— मयूख पृ॰ २९ पं॰ १

**परीभांड**. न॰ ना॰ घरांतील सूप टोपलें वगैरे उपसाहित्य.

**पक्ष**. पु॰ ना॰ फिर्यादीची जबानी किंवा अर्जी ही. परंतु प्रायः जबानीच.

**पक्षाभास**. पु॰ ना॰ निरुपयोगी फिर्याद पृ॰ ११

**पक्षैकदेशव्यापि**. न॰ वि॰ पक्षाच्या एक देशास मात्र व्यापून राहिलेलें. ———— पृ॰ २६

**पाखंडी**. पु॰ ना॰ एक देवतेस पूज्य न मानून इतर देवाची निंदा करावी अशीं जीं अनेक मतें आहेत. त्यांतून एखाद्या मतानें चालणारा, नास्तिकासही म्हणतात.

**पातकी**. वि॰ महापातक उपपातक यांजखेरीज सामान्य पातक करणारा.

**पाद**. पु॰ ना॰ चरण. अंश.

**पादवंदनिक**. तेंच प्रीतिदत्त. वि॰ एक प्रकारचें स्त्रीधन. ———— पृ॰ ३१६ पं॰ १०

**पारिभाषिक**. वि॰ शब्दाची शक्ति म्हणजे अवयवव्युत्पत्तितीनधरितां केवळ परिभाषेनें म्हणजे संकेतानें कल्पिलेला शब्द त्यासांके

# कोश.

तिक. जसें. मंडप. अश्व इत्यादिक

**पारुष्य.** न॰ ना॰ दंडपारुष्य (मारामारी) वाक्पारुष्य (शिवीगाळ)

**पार्वण.** न॰ ना॰ मृतांची जी श्रर्धा म्हणजे पितृपितामह, प्रपितामह, मातृपितामही, प्रपितामही इत्यादिक.

**पालकपिता.** पु॰ ना॰ पालन करणारा पिता ज्याच्या मांडीवर पुत्र दिल्हा जातो तो त्याचा.

**पाशुपत.** न॰ पु॰ ना॰ एक तंत्र आहे व त्याम तास अनुसरणारे ते. लिंगाईत, जंगम, इत्यादिक. ——— पृ॰ ३९३

**पितृत्व.** न॰ ना॰ पितृनिष्ठ लगुण. किंवा धर्म.

**पितृद्वेषी.** पु॰ वि॰ बापाचा द्वेष करणारा

**पितृबंधू.** पु॰ ना॰ ——— पृ॰ ३०२ पं॰ १९

**पुत्रिका.** स्त्री॰ ना॰ कन्या किंवा पुत्रस्थानी मानलेली कन्याही.

**पुत्रिकासुत.** पु॰ ना॰ बारा पुत्रांतील दुसरा ——— पृ॰ २७०

**पुराण.** न॰ ना॰ भागवतादिक.

**पुरोहित.** पु॰ ना॰ उपाध्याय.

**पुनर्भू.** स्त्री॰ ना॰ तीन प्रकारची. पृ १३३

**पुनरुक्तदोष.** पु॰ ना॰ एकत्र सांगितलेला प्रकार किंवा निधि पुनः सांगणें ह्या शास्त्रांत वाक्यदोष सांगितला आहे.

**पूग.** पु॰ ना॰ हकीमदार जमेदार., पृ॰ ६७

**पूर्त.** न॰ ना॰ ——— पृ॰ १३९ पं॰ १६

**पूर्वपक्ष.** पु॰ ना॰ जबानी पहिल्यानें फिर्यादि करणाराचा पक्ष. पूर्वी हें मला क्षेत्रादिक मिळालें आहे असें प्रतिपादन करणाराचा पक्ष.

**पूर्वसंस्कृत.** वि॰ पूर्वी ज्याचा उपनयनादि संस्कार झाला आहे तो किंवा ते.

**पूर्वक्रमागत.** वि॰ पूर्वीपासून म्हणजे तीन पिढ्यांपासून क्रमानें चालत आलेला भोगवटा, क्षेत्र इत्यादिक.

**पूर्ववादी.** पु॰ ना॰ पहिल्यानें वाद सांगणारा, पूर्वी हें क्षेत्र मला मिळालेलें व उपभोगिलें असा वाद सांगणारा.

**पूर्वापरकाल.** पु॰ ना॰ ——— पृ॰ ९२ पं १

**पूर्वापरविरुद्ध.** वि॰ ——— पृ॰ २७

**पैशाच.** वि॰ कन्याहरण करून नेऊन तिशीं जो विवाह तो.

**पौगंड.** न॰ ना॰ आठ वर्षांपासून सोळा वर्षांवांतलें वय तें व तद्विशिष्ट मनुष्यही.

**पौत्रिकेय.** पु॰ ना॰ पुत्रिकासुत.

**पौनर्भव.** पु॰ ना॰ बारा पुत्रांतील साहावा. ——— पृ॰ २७१ पं॰ १६

## कोश

**प्रकृतार्थोपयोगि**. वि० चालत्या अर्था लाउपयोगी.

**प्रचार**. पु० ना० ———— पृ० २४५ पं० १९.

**प्रतिग्रह**. पु० ना० अदृष्टसंपादक असा सता उत्पन्न होण्याचा असाधारण उपाय आहे.

**प्रतिग्रहलब्ध**. वि० प्रतिग्रहानें जें मला मिळालें तें.

**प्रतिगृहीत**. वि० प्रतिग्रहानें घेतलेला.

**प्रतिग्राह्य**. वि० ज्याचा प्रतिग्रह करावयाचा तो.

**प्रतिग्रहप्राप्त**. वि० प्रतिग्रहलब्ध.

**प्रतिन्यास**. पु० ना० ———— पृ० १६६ पं० ११

**प्रतिलोम**. पु० ना० उलटक्रम. आपल्यापेक्षां निकृष्ट वर्णाचे किंवा जातीचे पुरुषापासून उत्कृष्ट वर्णाच्या किंवा जातीच्या स्त्रीचे ठायीं संमति होऊन जी मनुष्य जाति ती प्रत्येकी

**प्रतिप्रस्थाता**. पु० ना० यज्ञांतील एक ऋत्विज

**प्रतिश्रुत**. वि० प्रतिज्ञात देऊं केलेला.

**प्रतिहर्ता**. पु० ना० यज्ञांतील एक ऋत्विज

**प्रत्यासत्ति**. ना० नातें. संबंध.

**प्रत्यासन्यतिशय**. पु० ना० अधिक जवळचें नातें.

**प्रत्युदाहरण**. न० ना० एकदां सांगितलेल्या एकाउदाहरणाचें जें विपरीत उदाहरण. तें.

**प्रतिज्ञा**. स्त्री० ना० जबानी, किंवा अर्जी पण;

**प्रतिज्ञात**. वि० ज्याविषयीं प्रतिज्ञा केली आहे. तें इत्यादिक.

**प्रथमसाहस**. न० ना० प्रथमसाहस दंड व्हावया जोगा जो अपराध. तें

**प्रथमसाहस**. न० ना० शंभरपणांपासून अडीचशें पणपर्यंत. किंवा केवळ दोनशें पण अथवा अडीचशें पण. जो दंड तो.

**प्रपौत्र**. पु० ना० पणतू.

**प्रभूतार्थविषय**. वि० ऋणादानादि व्यवहारीं ज्याक्रियदींत अनेक रक्कमा आहेत ती.

**प्रमाद**. पु० ना० भ्रम. विस्मृति. गैरसावधपणा.

**प्रमाण**. न० ना० पुरावा, वादाचें साधन, साक्षी लेख, भोग, अनुमान, अर्थापत्ति, दिव्य, शपथ;

**प्रमाणोपन्यास**. पु० ना० प्रमाणाचें प्रतिपादन. उपपादन

**प्रमेय**. न० ना० प्रमाणें करून सिद्ध करावयाचा जो विषय, तो साध्य.

**प्रमेयरूप**. न० प्रमेय.

# कोश.

प्रलाप. पु॰ ना॰ निरर्थक भाषण.

प्रवक्ता. वि॰ अधिक व चांगलें बोलणारा. अर्थ सांगणारा.

प्रवासकृत. वि॰ ह्याहीचा एकप्रकार. पृ॰ २४

प्रव्रजित, ता. स्त्री॰ ना॰ सन्यासी. विरक्त स्त्री.

प्रस्थ. पु॰ न॰ ना॰ पायली कोणी अधोली शेर ही म्हणतात. ———— पृ॰ ४४१ पं॰ ५

प्राड्विवाक. पु॰ ना॰ व्यवहार पाहण्या विषयीं राज प्रतिनिधि म्हणजे राजाच्या खालचा मुख्य न्यायाधीश. हाल्लीं ज्यांस जड्ज, कलेकटर, म्हणतात ———— पृ॰ ४· · ·५

प्राड्न्यायोत्तर. न॰ ना॰ उत्तरांतील एकप्रकार ———— पृ॰ २४ पं॰ १२

प्राजापत्य. पु॰ ना॰ ही कन्या तुम्हास देतों. हीच्या सहवर्तमान तुम्ही धर्माचरण करावें. असें सांगून जें कन्यादान करितात तो विवाह

प्रातिलोम्य. न॰ ना॰ प्रतिलोमपणा.

प्राप्तव्यवहार. पु॰ ना॰ सोळा वर्षांपुढें ज्याचें वय तो. व्यवहार जाणणारा.

प्रायश्चित. न॰ ना॰ पापनिर्मुक्ति व्हावी एतदर्थ अदृष्टसंपादक संस्कारविशेष.

प्रीतिदत्त. वि॰ प्रीतीनें दिलेलें ——पृ॰ ११२ पं॰ ८

प्रीतिदान. न॰ ना॰ प्रीतीनें केलेलें दान.

बंदिग्राह. वि॰ बंदिवानास धरणारे पळविणारे

बंधू. पु॰ ना॰ भाऊ. बांधव,

बंधुदत्त. वि॰ एकप्रकारचें स्त्रीधन पृ॰ ३१६ पं॰ १८

बहुभ्रातृक. वि॰ बहुत जिला भाऊ आहेत स्त्री.

बहुश्रुत. पु॰ ना॰ ———— पृ॰ ८ पं॰ ९

बहुभागिनीक. वि॰ बहुत आहेत भगिनी ज्याला तो.

बांधव. पु॰ ना॰ ———— पृ॰ ३०२

बाल. पु॰ ना॰ सोळा वर्षांचे आंत ज्याचें वय तो.

बालधन. न॰ ना॰ बालाची जिंदगी.

बीजी. पु॰ ना॰ ज्याचें बीज तो जनक. शेतांत पेरायास ब्याणें जो देतो तो.

ब्रह्मा. पु॰ ना॰ यज्ञांतील एक ऋत्विज.

ब्राम्ह—ब्राम्हविवाह. पु॰ ना॰ वरास बलावून आणून कन्या यथाशक्ति अलंकार करून देतात. तो विवाह.

भक्तदास. पु॰ ना॰ दासांतील एकप्रकार जो अन्नार्थ दास्य पतकरून राहिलेला.

भगाकार. वि॰ उपस्थासारिखा आहे आकार ज्याचा असा भाग किंवा चिन्ह.

भयवर्जिता. स्त्री॰ ना॰ सीमेचा भेद पृ॰ २२९ ———— पं॰ १४

भागिनेय. पु॰ ना॰ बहिणीचा पुत्र.

भावसिद्धि. स्त्री॰ ना॰ ———— पृ॰ २०८ पं॰ ११

भाषा. स्त्री॰ ना॰ जबानी. ———— पृ॰ १७

## कोश.

भिन्नमातृक. पु॰ स्त्री॰ ना॰ ज्यांचा जननी भेद आहे ते परस्पर सावत्र. चुलतइत्यादि॰

भिन्नोदर. पु॰ स्त्री॰ ना॰ भिन्नमातृक. सावत्र. चुलत वगैरे.

भुजिष्या॰ स्त्री॰ ना॰ ——— पृ॰ ४९९ पं॰ ९

भूतानुसारी. वि॰ ——— पृ॰ ५३ पं॰ १७

भृति. स्त्री॰ ना॰ मजूरी रोज. वेतन. दरमहा

भेदनिषिद्ध. वि॰ एक प्रकारचा वर्ज साक्षी. ——— पृ॰ १७२ पं॰ १२

भोग्य. वि॰ उपभोग करावयाजोगें गहाण जमीन, घर, बैल. घोडा वगैरे.

भ्रूणहत्या. स्त्री॰ ना॰ गर्भपात. ब्रम्हहत्याही.

मज्जा. स्त्री॰ ना॰ हाडांचे आंतला मगज.

मत्त. पु॰ ना॰ दारू भांग इत्यादि पिऊन बेशुद्ध झालेला.

मध्यमसाहस. न॰ ना॰ मध्यमसाहस दंड व्हावयाजोगा अपराध तें.

मध्यमद्रव्यें. न॰ ना॰ ——— पृ॰ ४७७ पं॰ ३

मध्यमसाहस. पु॰ किं॰ न॰ ना॰ पांचशें किंवा ५४० पण दंड.

मत्स्यिनी. स्त्री॰ ना॰ सीमेचा भेद पृ॰ ३२९ पं॰ ८

महारोगग्रस्त. वि॰ ज्वर, क्षय, सन्निपात, मुळव्याध, संग्रहणी, इत्यादिक जे आठ महारोग त्यांतून एखाद्यारोगानें व्यापलेला.

महापातक. न॰ ना॰ ——— पृ॰ १७१ पं॰ १

महायज्ञ. पु॰ ना॰ पंचमहायज्ञ.

मांडलिक. पु॰ ना॰ सार्वभौम राजास करभार देणारे जे संस्थानी राजे. सरंजामी. जहागीरदार वगैरे.

मातृधन. न॰ ना॰ आईची जिंदगी, स्त्रीधन.

मातृबंधू. पु॰ ना॰ ——— पृ॰ ३०२ पं॰ २१

मादकद्रव्य. न॰ ना॰ जेणेंकरून माज, अंमल येतो तें द्रव्य अफू भांग वगैरे.

माधुपर्किक. वि॰ न॰ मधुपर्कसमयीं जें मिळतें तें.

मानसिक. वि॰ अंतःकरणसंबंधी विकार संकल्प इत्यादिक.

मानुष. वि॰ लेखभोगसाक्षी. एतद्रूप प्रमाण.

माष. पु॰ ना॰ पांच कृष्णल गुंजा

माषशत. न॰ ना॰ शंभर माष. पृ॰ २५ पं॰ १५

मित्रलब्धि. स्त्री॰ ना मित्राचा लाभ.

मिथ्योत्तर. न॰ ना॰ उत्तराचा एक भेद. पृ॰ २४

मूर्धावसिक्त. २ लिं॰ ना॰ ब्राम्हणापासून विवाहित क्षत्रियेचे गर्भी झालेली संतति.

मूल. न॰ ना॰ मुद्दल मुद्दा.

मृतकल्प. वि॰ मेल्यासारखा मरणांत कांहीं न्यून असा अर्धमेला.

मृतांतर. वि॰ एक वर्ज साक्षी. पृ॰ १७३ पं॰ १

मैत्र. न॰ वि॰ मित्रापासून प्राप्त जें द्रव्यादिक तें.

मैत्रावरुण. पु॰ ना॰ यज्ञांतील एक ऋत्विज

# कोश.

गौल. पु॰ ना॰ एकप्रकारचें शिवधडे ———— ———— पृ॰ ३३२पं॰ ४

म्लेंछ. पु॰ना॰ यवन. विंध्याद्रि व हिमाचल यांच्या बहिर्देशीं राहणारे.

यदृछागत. वि॰साक्षींतला एक भेद. ———— ———— पृ॰ १६९ पं॰ ८

यज्ञशाळा. स्त्री॰ ना॰ जेथें यज्ञ होतो तें स्थळ.

यज्ञसभा. स्त्री॰ना॰यज्ञशाळा.

याचित, याचितक, न॰ना॰ ———— पृ॰ १६६

याजन. न॰ना॰ यागकरविणें.

यावद्देयोद्यत. वि॰ दामदुप्पट झाली तरी चिंता नाहीं. जेव्हां व्याजसुद्दल देऊं तेव्हां आपलें गहाण परत घेऊं अशा करारानें ठेविलेलें गहाण.

युद्धप्राप्त वि॰ एकप्रकारचा दास पृ॰ ३८१

योग. पु॰ना॰ अवयवार्थबोधकजीशब्दाची शक्ति तो. एकप्रकारचें अविभाज्यधन पृ॰ ३६४ पं॰ २

योगार्थ. पु॰ना॰ शब्दाच्या शक्तीपासून निघालेला अर्थ. शक्यार्थ.

योग्यप्रमिति. स्त्री॰ ना योग्यप्रमाण.

योषिद्ग्राह पु॰ना॰ ———— पृ॰ १३० पं॰ १२

यौगिक. वि॰ योगार्थानें म्हणजे शक्यार्थानें सिद्धकरून घेतलेला शब्द.

यौतक. वि॰ एकप्रकारचें स्त्रीधन. ———— ———— मयूख पृ॰ ८८ पं॰ २०

रस. पु॰ना॰ तेल, दूध, गूळ, गोरस, लवण, इत्यादिक.

रक्षक. वि॰ रक्षणकरणारा.

राजत. न॰ना॰ रुप्याचें नाणें. दहा पलें म्हणजे एकधरण. असे दाहा धरण म्हणजे एक पुराण राजत. सोळा धरण म्हणजे एक शतमान राजतपरिमाण.

राजशासन. न॰ना॰शासन

राजमुद्रा. स्त्री॰ ना॰ राजचिन्ह, सरकारी मोर्तब शिक्का नाण्यावरील शिक्का वगैरे.

राजदैविक. वि॰ दरवडा, चोरी, असी. युद्धप्रसंग वगैरे जो, व दैविक म्हणजे आगलागणें नदीला पूर येऊन गांव वाहवणें वगैरे जो उपद्रव तो.

राजशासननीता. स्त्री॰ ना॰ सीमेचा भेद. ———— पृ॰ ३२९ पं॰ १६

राजयक्ष्मा. पु॰ना॰ क्षयरोग.

राजा. पु॰ना॰ ———— पृ॰ १-७

राजिक. वि॰ युद्धप्रसंग. दरवडा असी वगैरे जो उपद्रव तो.

राक्षस. वि॰ युद्धांत कन्येचें हरण करूनजो विवाह होतो तो.

# कोश.

रिक्थ, ऋक्थ. न०ना० जिंदगी, धन, खुली जिंदगी, अप्रतिबंधदाय.

रिक्थग्राह. पु०ना० जिंदगी घेणारा पृ०१३०

रिक्थी. पु०ना० मालक, जिंदगी घेण्यास अधिकारी दायाद, वारस.

रोगार्त. वि० रोगानें पीडित.

रोमबद्ध. पु०ना० लोंकर कापूस मिळून केलेलें, किंवा नुसतें लोंकरीचें, धुसा शाल जोडी वगैरे. —————— पृ०३७७

लघुप्रायश्चित्त. न०ना० —————— पृ०६२

लब्ध. पु०ना० दासांतील एकभेद — पृ०३८०

लव. पु० ना० —————— पृ०११५

लिखित. वि० साक्षींतील एकभेद — पृ० १६९

लोकसिद्ध. वि० लोकव्यवहारानें सिद्ध जी सत्ता इत्यादिक, ती किंवा लोकांत सिद्ध जो व्यवहार.

लौकिक. वि० लोकसिद्ध.

वचननिषिद्ध. वि० वर्ज्यसाक्षींतील एकप्रकार. —————— पृ०१७२

वडवाहृत. वि० दासांतील एकभेद. —————— पृ० ३८१ पं०१५

वधदंड. पु०ना० शारीरदंड. अंगछेद. किंवा खून —————— पृ०८२ पं०८

वर्ण. पु०ना० ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र हे प्रत्येकीं

वर्णी. वि० त्यात्या वर्णाचा जो तो प्रत्येकीं.

वल्कल. न०ना० वृक्षविशेषाच्या लवे पासून झालेलें. तसरी पट इत्यादिक.

वसा. स्त्री०ना० मेदोधातु मेद.

वस्तुहानि. स्त्री०ना० स्वरूपहानि, विवादविषयीभूतद्रव्याची हानि.

वाक्यभेद. पु०ना० —————— मयूख पृ०१४ पं१०

वाक्पारुष्य. न०ना० शिविगाळ, मर्मोद्घाटन, कठोरभाषण, निंदा, सत्रावें प्रकरण.

वाग्दंड. पु०ना० शिविगाळ, निर्भर्त्सना, एतद्रूप जो दंड तो.

वाग्दत्त. वि० वाणीनें जी देऊं केलेली ती कन्या इत्यादिक, प्रतिश्रुत.

वाग्दान. न०ना० वाणीनें जें देऊं करणें तें, वाङ्निश्चय.

वाणिज्य. न०ना० वाण्याचा उदीम, वाणीपणा.

वाचकशब्दघटित. वि० त्यात्या अर्थाचे वाचक जे शब्द त्यांकडून युक्त.

वाचनिक. वि० वचनानें जो सिद्ध तो प्रकार किंवा ती व्यवस्था इत्यादिक.

वाचनिकधर्मकृत्यें. न०ना० वचनानें सांगितलेलीं जीं धर्मकृत्यें म्हणजे अवश्य कर्तव्य श्राद्धादिक तीं.

# कोश.

**वाचिक**. वि० वाणी संबंधी वाणीनें केललें.

**वानप्रस्थ**. पु० ना० एक आश्रम आहे. त्या आश्रमांत राहणारा तोही.

**वापी**. स्त्री० ना० जिला पायऱ्या बांधिल्या आहेत ती विहीर.

**वाह्य**. वि० पाठाळ. ———— पृ० ११५

**विक्रय**. पु० ना० विक्री.

**विक्रीयासंप्रदान**. न० ना० विसावें प्रकरण

**विवीत**. न० ना० राखलेलें रान किंवा कुरण. ———— पृ० ३४९ पं० ६

**विजयप्राप्त**. वि० विजयानें मिळालेलें.

**विद्याधन**. न० ना० विद्येपासून मिळालेलें धन.

**विद्यालब्ध**. वि० विद्येनें मिळालेलें.

**विद्यासंपादित**. वि० विद्येपासून संपादित केलेलें.

**विधि**. पु० ना० निषेधविपरीत जीं शास्त्राज्ञा तो.

**विधिरूप**. वि० ———— पृ० १०

**विभक्तज**. पु० ना० विभक्त झाल्यानंतर आईबापांस झालेला पुत्रादिक.

**विभाज्य**. वि० विभाग करावयाजोगा स्थावरजंगम माल.

**विरुद्ध**. वि० एकप्रकारचा पक्षाभास, उत्तराभासही. ———— पृ० २०

**विवादास्पदीभूत**. वि० ज्याविषयीं वाद चालला असतो तें द्रव्यादिक.

**विवास**. वि० नागवा गृहहीन. देशनिकासित.

**विवाहलब्ध**. वि० विवाहांत किंवा विवाहानें मिळालेलें द्रव्यादिक.

**विशेषशास्त्र**. न० ना० अपवाद, बाधक शास्त्र, बाधक वचन.

**विषम**. वि० समाच्याउलटा. ———— पृ० २४३

**विषमविभाग**. पु० ना० २२८ व्या पृष्टांत सांगितलेला.

**विषयव्यवस्था**. स्त्री० ना० जे विरुद्ध विषय प्राप्त झाले त्यांची व्यवस्था.

**विहितप्रतिषिद्ध**. वि० वचनानें विधान करून अन्यवचनानें निषिद्ध केलेला असा जो विषय तो ———— पृ० २६७ पं० ७

**वृद्ध**. पु० ना० ऐशीं वर्षांपुढें ज्याचें वय तो (परंतु हालींचे मानानें सत्तर वर्षांपुढें ज्याचें वय तो) शिवे च्या निर्णयाविषयीं उपयोगी जे सामंतादिक त्यांतील एक प्रकार ———— पृ० ३२२

**वृथादान**. न० ना० ज्यापासून दृष्टादृष्ट पुरुषार्थ नाहीं असें जें दान म्हणजे गारोडी, भाट, तालिंबाज, तमासगिर, इत्यादिकांस देऊं केलेलें.

**वृद्धव्यवहार**. पु० ना० प्राचीन शिष्टांचा व्यवहार म्हणजे संप्रदाय.

# कोश.

वेतनादान. न॰ना॰ वेतन देणें प्रकरण १५वें.

वेदपारग. वि॰ साद्यंत वेद पढलेला.

वेदशास्त्रसंपन्न. वि॰ वेद शास्त्र ही दोन्हीं पढलेला.

वैदिक. वि॰ना॰ केवळ वेदच ज्यास येतो तो.

वैवर्ण्य. न॰ ना॰ विवर्णता, निस्तेजपणा.

वैरुध्य. न॰ना॰ विरोध. विरुद्धपणा.

वैवाहिक. वि॰ विवाहसंबंधी जें कांहीं तें, विवाहांत मिळालेलें.

व्यभिचारारोप. पु॰ना॰ व्यभिचाराचा आरोप म्हणजे तुफान.

व्यवहार. पु॰ ना॰ वाद. ——— ८०२

व्यवहारज्ञ. वि॰ प्राप्तव्यवहार.

व्यवहारहानि. स्त्री॰ ना॰ वादाची हानि, म्हणजे वाद सांगण्यास रस्ता नाहींसा होणें.

व्यवहारविषय. पु॰ना॰ ——— ८०९

व्याख्यागम्य. वि॰ ——— ८०२७

व्याधित. वि॰ ज्याला व्याधि झाला आहे तो.

व्याधिग्रस्त. वि॰ रोगादि व्याधीनें व्यापलेला.

व्याकरण. न॰ना॰ शब्दशास्त्र.

व्याजस्तुति. स्त्री॰ना॰ वरस्तुति आणि पोटीं निंदा. निंदात्मकस्तुति.

व्युत्क्रम. पु॰ना॰ प्रतिलोमक्रम, उलटा क्रम.

व्रात्य. पु॰ना॰ गौणकालही अतिक्रांत झाला असतां मुंजीवांचून राहिलेला ब्राह्मणादिपुत्र.

शंकितापराध. पु॰ना॰ अपराधाविषयींशंका म्हणजे वहमा.

शंकितापराधी. वि॰ वहम्यानें धरलेला.

शाद. पु॰ना॰ किराणा. ——— ८०११५

शासन. न॰ना॰ सनद, सरकारी पत्र, राजपत्र. ——— ८०६३ पं॰ १६

शारीर. वि॰ अंगछेदरूप जो दंड तो ८०८२ पं॰ ८

शाल. पु॰ना॰ साग्याचा वृक्ष. अर्जुनसादडा.

शास्त्रसिद्ध. वि॰ शास्त्रप्रमाणानें सिद्ध जी सत्ता. स्वत्व. व्यवहार इत्यादिक.

शास्त्रविरुद्ध. वि॰ शास्त्रास विरुद्ध.

शास्त्रगम्य. वि॰ शास्त्रेंकरून समजावया जोगें स्वत्व इत्यादि.

शास्त्रप्रतिपादित. वि॰ शास्त्रानें ज्याचें प्रतिपादन केलें आहे तें स्वत्व, धर्म इत्यादिक.

शास्त्रविहित. वि॰ हें अमुक करावें, असें शास्त्रानें ज्याचें विधान सांगितलें आहे तो.

शास्त्रीयव्यवहार. पु॰ना॰ शास्त्रांतले जे व्यवहार ते.

शिरोमुंडन. न॰ना॰ डोकें भादरणें, पांचपाट काढणें.

शिल्प. न॰ना॰ कला, कौशल, शिल्पशास्त्र.

शिल्पी. पु॰ना॰ शिल्पशास्त्र जाणणारा कुशल.

सुतार, गौंडी, लोहार, कांसार, चितारी, वगैरे कारागीर

शिक्षक. पु॰ ना॰ शिक्षा करणारा, गुरु.

शुक्र. न॰ ना॰ रेत, धातु.

शुक्तिरजत. न॰ना॰ शिंपिच्या चकाकीमुळें जें तेथें रुपेंसें भासतें तें भ्रमात्मक ज्ञान.

शुद्ध मिथ्योत्तर. न॰ना॰ दुसऱ्या उत्तराचा संकर नसतां नुसतें मिथ्योत्तर.

शुल्क. न॰ना॰ जकात, कर, धारा, एकप्रकारचें स्त्रीधन. ——— पृ॰ ३१६ पं॰ २०

शुभचिंतक. पु॰ ना॰ स्वधर्मसंरक्षण करून सरकारचें कल्याणचिंतन करावें एतदर्थ नियुक्त केलेले महाजन.

शूद्रापुत्र. पु॰ना॰ ब्राम्हणापासून शूद्रेला झालेला पुत्र ——— पृ॰ २७७ पं॰ ८

शौर्यधन. न॰ना॰ युद्धादिप्रसंगीं शौर्य करून मिळविलेलें धन.

शौर्यसंपादित. वि॰ शौर्यानें संपादिलेलें.

श्रेणी. स्त्री॰ ना॰ ——— पृ॰ ९७

श्रेष्ठविभाग. पु॰ना॰ उद्धारविभाग.

श्रोत्रिय. पु॰ ना॰ वेद पढणारा. अग्निहोत्री.

श्रौत. न॰ ना॰ अग्निहोत्र. व तत्संबंधीं कर्म.

श्वपद. न॰ना॰ कुत्र्याचें पाऊल.

श्वपदाकार. वि॰ कुत्र्याचे पावला सारिखा आकार. म्हणजे धातूचें कुत्र्याचें पाऊल करून तें तप्त करून त्याचा कपाळावर डाग किंवा नुसते तशा कृति चिन्ह.

श्वपाक. पु॰ ना॰ मुडदे फरास. डोंब. कुतऱ्याचें मांस खाणारे.

षट्कर्म. न॰ना॰ यजन, याजन. अध्ययन, अध्यापन, दान, प्रतिग्रह.

षंढ. पु॰ना॰ नपुंसक.

संकर. पु॰ना॰ मिसळ.

संकीर्ण. वि॰ मिश्रित. ज्याचा संकर झाला आहे तो. ते.

सगोत्र. वि॰ एका गोत्राचे.

सत्यंकार. पु॰ना॰ गहाणाविषयीं एक प्रकारची कबूलात. ——— पृ॰ १५७

सत्योत्तर. न॰ ना॰ प्रश्नाच्या स्वीकाररूप उत्तर.

सकारणमिथ्योत्तर. न॰ ना॰ कारणासहित जें मिथ्योत्तर तें. ——— पृ॰ २५

संनिपात. पु॰ना॰ एकप्रकारचा रोग, वायू जोमस्तकांत शिरतो तो.

सन्निवेश. पु॰ना॰ ——— पृ॰ २९

संन्यासभ्रष्ट. पु॰ वि॰ दासांतील एक भेद. आहे. ——— पृ॰ ३८३ पं॰ ९

सपिंड. ना॰ आपल्यापासून वरच्या सात पुरुष

## कोश.

पर्यंत जो विस्तार ते प्रत्येकीं परस्परांचे

सप्रतिबंध. पु० वि० अटकावलेला दाय.

सब्रम्हचारी. पु० ना० ——— पृ० ३०२ पं० ९

संभावितस्वातंत्र्य. वि० ज्याचें स्वातंत्र्य संभवना करावया जोगें तो.

सभा. स्त्री० ना० न्यायसभा. न्यायाधिकरण, दरबार, कचेरी, अदालत, हालीं ज्यास कोर्ट म्हणतात.

सभासद. पु० ना० नियुक्तव्यवहारपाहणारे. आशत न्यायाधीश. अमीन. मुनसफ. सदर अमीन वगैरे, वजउज. कलेकटर ही संभवतात.

संभूयसमुत्थान. न० ना० व्यापारार्थ पातीदारांची मंडळी व त्याचें काम. प्रकरण २१ वें.

समदर्शी. वि० समान दृष्टीनें पाहणारे निष्पक्षपाती.

समानोदक. पु० ना० सातां पिढ्यांपुढें चौदा पिढ्यापर्यंत ते प्रत्येकीं परंपरांचे.

सम्यूहशुभचिंतक. वि० आपलें इष्टचिंतन करण्याविषयीं ज्यानें नेमलेले

सरजस्क. स्त्री० वि० जिचा विटाळ गेला नाहीं अशी.

सवर्ण. पु० ना० समानवर्णाचा, म्हणजे ब्राम्हणास ब्राम्हण क्षत्रियास क्षत्रिय यारीतीनें

सवर्णपुत्र. पु० ना० ज्या वर्णाचा नवरा त्या वर्णाच्या विवाहित स्त्रीचें गर्भी नवऱ्यापासून झालेला.

संसर्ग. पु० ना० संबंध

संस्कृत. वि० चूडोपनयनादि संस्कार ज्याचे झाले आहेत. तो किंवा ती.

संसृष्ट. पु० न० विभागिलेलें धन जें पुनः एकत्र मिळविलें तें किंवा विभक्त होऊन पुनः एकत्र झालें ते.

संसृष्टी. २ लिं० ना० संसृष्टधनविशिष्ट जे ते विभक्त होऊन पुनः एकत्र झालेले.

संवित्व्यतिक्रम. पु० ना० संकेताचें उल्लंघन. प्रकरण १४ वें.

संविभाग. पु० ना० सप्रतिबंधदाय. अटकावलेली जिंदगी.

सहार्थतृतीया. स्त्री० ना० ——— पृ० २

सहोढज. पु० ना० बारा पुत्रांतील अकरावा. ——— पृ० २७१

सहोदर. पु० ना० एका जननीच्या पोटचे. परस्पर सख्खे भाऊ वगैरे.

संज्ञी. वि० ज्याला संज्ञा म्हणजे विशेष नाम ठेविलें आहे तो.

साध्यांश. पु० ना० जें आपणास साध्य करावया

# कोश

नें त्याचा अंश म्हणजे रकम, हिस्सा.

साध्यार्थ. पु॰ ना॰ ज्याचें प्रतिपादन करावयाचें तो अर्थ. विषय.

सापत्य. ३लिं॰ वि॰ अपत्ययुक्त.

सापिंड्य. न॰ना॰ सपिंडता. सपिंडाचें नातें.

सामंत. पु॰ना॰ शिवशेजारी. पृ॰ ३३० पं॰२२

सामयिक. वि॰ संकेतानें केलेला धर्म. कायदा वगैरे.

सामानाधिकरण्य. न॰ना॰ नियमें करून एका अधिकरणीं राहणारीं जीं कार्यकारणें. त्यांचा तो साहचर्यनियम. जसा वन्हिधूमांचा साहचर्यनियम म्हणजे जेथें जेथें धूम आहे तेथें तेथें नियमें करून वन्हि आहेच.

सार्वभौम. वि॰ संपूर्ण भूमीवर राज्य करणारा सर्वांवर ज्याची अप्रतिहत आज्ञा तो.

साहस. न॰ना॰ सरकारचें वइतर जनांचें भय नधरितां त्यांच्या समक्ष जें वध जुलूम करणें दरोडा घालणें वगैरे तें प्रकरण १९ वें.

सीमावाद. पु॰ना॰ शिवेचा तंटा प्रकरण ८ वें.

सीमापत्र. न॰ना॰ शिवेचा निर्णय झाला असतां जें पत्र करून देतात तें.

सुब्रम्हण्य. पु॰ना॰ यज्ञांतील एक ऋत्विज.

सुराध्वजाकार. वि॰ कपाळीं डाग देण्या साठीं किंवा चिन्ह करण्या साठीं सुराध्वज म्हणजे दारूचें चिन्ह शिसा, बाटली, दारू काढण्याचें यंत्र इत्यादिकां सारखा लोखंडाचा आकार करितात तो.

सुवर्ण. न॰ना॰ सोनें, वजनाचें परिमाण. पृ॰ २५

सेतु. पु॰ना॰ पूल, धरण, —— पृ॰ ३४४ पं॰ १३

सूत. पु॰ना॰ एक प्रतिलोमजातीचा पृ॰ २१९

सोपाधिक. वि॰ सनिमित्तक, सप्रतिबंधक. सोपाधिक गहण. [illegible]. इत्यादिक.

[२] सौगत. पु॰ना॰ —— पृ॰ ३९३ पं॰ ४

सौदायिक. न॰ना॰ एकप्रकारचें स्त्रीधन. —— मयूख. पृ॰ ५४

स्थान. न॰ना॰ स्थळ. —— पृ॰ १८

स्थानहानी. हानीचा एकप्रकार. —— पृ॰ १८

स्मार्त. न॰ना॰ विवाहाग्नि.

[१] स्मार्तकाल. पु॰ना॰ —— पृ॰ ८७

स्मार्तकालिक. वि॰ भोगवटा वगैरे. पृ॰ ७५

स्मारित. वि॰ एकप्रकारचा साक्षी —— पृ॰ १६१

[२] स्थिरप्राय. वि॰ स्थिर राहणारे व्यवहार म्हणजे ऋणादानादिक —— पृ॰ ५६

स्त्रीधन. न॰ना॰ स्त्रीचें सत्ताविशिष्ट धन. पृ॰ ३१४

स्त्रीपुंधर्म. पु॰ना॰ स्त्रीपुरुषांनीं कसें वर्तावें तो प्रकार प्रकरण २४ वें

स्त्रीसंग्रहण. न॰ना॰ व्यभिचार प्रकरण २३ वें.

स्त्रीशुल्क. न॰ना॰ वरापासून कन्येबद्दल द्रव्य घेतात तें एकप्रकारचें स्त्रीधन.

## कोश

स्वत्व. न॰ना॰ सत्ता.

स्वत्वसाधनता. स्त्री॰ना॰ सत्तेचें साधन जें प्रतिग्रह खरेदी वगैरे तन्निष्ठधर्म.

स्वत्वव्यवहार. पु॰ना॰ सत्तेचा व्यापार सत्ता दाखविणारा व्यापार.

स्वत्वहानि. स्त्री॰ना॰ सत्तेची हानि. सत्ता नाहींशी होणें.

स्वत्वविवाद. पु॰ना॰ सत्तेविषयीं वाद.

स्वदेशीय. वि॰ आपले मुलखांत राहणारा.

स्वयंदत्त. पु॰ना॰ बारा पुत्रांतील दाहावा ———— पृ॰२७३पं॰२८

स्वयमुक्ति. पु॰ना॰ निषिद्ध साक्षींतील एक प्रकार ———— पृ॰१३२

स्वयंदास. पु॰ना॰ दासांतील एक प्रकार ———— पृ॰३८१

स्वामिपालविवाद. पु॰ना॰ प्रकरण १वें.

स्वार्थसाधक. वि॰ आपल्या अर्थाचें साधन करणारें प्रमाण इत्यादिक.

स्वैरिणी. स्त्री॰ना॰ ———— पृ॰१३२

हस्तिप. पु॰ना॰ महात.

हीनवादी. वि॰ खोटा वाद सांगणारा, खोटा फिर्यादी.

हैडावुक. पु॰ना॰ ———— पृ॰९७ पं॰६

होता. पु॰ना॰ यज्ञांतील एक ऋत्विज.

क्षत. वि॰ पुरुषसंयोगानें दूषित अशी पुनर्भू.

क्षुद्रद्रव्यें. न॰ना॰ ———— पृ॰४७६पं॰१२

क्षुप. न॰ना॰ शेतवडा. कुंभा.

क्षेम. न॰ना॰ ———— पृ॰२४५

क्षेत्र. न॰ना॰ जमीन बागाईत, जिराईत, स्त्री.

क्षेत्रज. पु॰ना॰ बारा पुत्रांतील तिसरा ———— पृ॰२७३पं॰४

क्षेत्रदान. न॰ना॰ भूमीचें दान.

क्षेत्रस्वामी. पु॰ना॰ क्षेत्राचा मालक. नवरा.

क्षेत्री. पु॰ना॰ क्षेत्रस्वामी.

क्षौम. वि॰ क्षुमा म्हणजे अतसी तिजपासून झालेलें वस्त्र.

ज्ञापक. वि॰ जाणविणारें प्रमाण. प्रतिग्रहादिक उपाय वगैरे.

---

### कोशांत चुकून राहिलेले शब्द

अच्छावाक. पु॰ना॰ यज्ञांतील एक ऋत्विज

अदत्त. न॰ना॰ जें दिलेलें नव्हे तें. — पृ॰३७१

अदेय. न॰ना॰ द्यावयास योग्य नव्हे तें. पृ॰३६८

अध्वर्यु. पु॰ना॰ यज्ञांतील एक ऋत्विज.

अधिविन्न. स्त्री॰ना॰ जिच्यावर दुसरें लग्न केलें जातें ती पहिली स्त्री.

अध्यग्नि. न॰ना॰ एक प्रकारचें स्त्रीधन. पृ॰३१६पं॰

अध्यात्मशास्त्र. न॰ना॰ वेदांत शास्त्र.

# कोश

**अध्यावहनिक.** नं० ना० एक प्रकारचें स्त्रीधन आहे. ——— पृ० ३१६ पं० ७

**अनंश.** वि० विभागाविषयी अनधिकारी.

**अनैकांतिक.** पु० ना० व्यभिचरित हेतु.

**अनुशय.** पु० ना० पस्तावा.

**अन्वाधेयक.** नं० ना० एक प्रकारचें स्त्रीधन आहे. ——— पृ० ३१७

---

## मिताक्षरेचें शुद्धिपत्र.

| पृ० | पं० | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | ७ | अंकांत) | अंकांचे मूळांत) |
| ११ | १६ | जाणावे | जाणावें |
| १३ | नोट | ८व्याश्लोकेच्या १अंकांत | ८व्या श्लोकेच्या १० व्या अंकांत |
| १६ | १६ | आपलेवादीप्रतिवादीचे | आपलें व वादिप्रतिवादीचें |
| १७ | ७ | उपयोग | उपयोगी |
| २६ | ९ | फिर्याट | फिर्याद |
| २९ | ५ | वादांतल्या | वादांतल्या |
| ४० | ० | प्रकरण १ | प्रकरण २ |
| ५६ | नोट ३ | वादीने | वादी |
| ५७ | ६ | (५व्याअंकाचा) | (६व्याअंकाचा) |
| ६० | ३ | १३ अंक | • |
| ६० | ५ | १४ अंक | • |
| ६० | ६ | (९वा व १०अंक) | (११ वा व १२ अंक) |
| ६० | ६ | एकार्थविषयक | ऐकार्थविषयक |
| ६० | १४ | (९वाअंक) | (११वा अंक) |
| ६० | नोट | ९व्याअंकातील | ११ व्याअंकातील |
| ६२ | ४ | (९व्याअंकावर) | (११व्याअंकावर) |

# मिताक्षरेचें शुद्धिपत्र.

| पृ० | पं० | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६७ | ५ | ११ तसेंच | स्मृति ११ तसेंच |
| ६९ | ५ | ठेवलेल्यावर | ठेवल्यावर |
| ७० | १३ | होनि | हानि |
| ७७ | २२ | जसेंजे | जसें |
| ८२ | ६ | वागदंड | वाग्दंड |
| ८६ | ३ | ते | तें |
| ९७ | ७ | चांमार | चांभार |
| १०१ | ८ | धर्मकृत्यासाठीं | धर्मकृत्यासाठीं व व्याधि दूर होण्यासाठीं |
| १०१ | १४ | (१४ व्या प्रकरणीं २ ऱ्या शाखेत) | (१३ व्या प्रकरणीं ६ व्या व ७ व्या अंकात. |
| १०४ | ४ | (११ व्या प्रकरणीं | (१० व्या प्रकरणीं |
| १०५ | १५ | ११ व्या प्रकरणी | १० व्या प्रकरणीं |
| १०६ | १३ | तिने | निमें |
| १०८ | १ | देणारा | नदेणारा |
| १०८ | ९ | पयत | पर्यंत |
| ११६ | १९ | वरून | करून |
| १२१ | ७ | द्यावे | द्यावें |
| १३० | ३ | निपुत्रिकाचे | निपुत्रिक जो रिक्थी त्याचे |
| १३७ | १२ | बौंधवांस | बांधवांस |
| १३९ | १२ | सहवर्त्त | सहवर्तमान |
| १४५ | १४ | सावकास | सावकारास |
| १४५ | १२ | नैष्ठिक | नैष्ठिक |
| १५० | १४ | कृतकालापनेय | कृतकालोपनेय |
| १५० | १६ | कृतकालापनेय | कृतकालोपनेय |

# मिताक्षरचें शुद्धिपत्र.

| पृ० | पं० | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५६ | १६ | घ्यावा | द्यावा |
| १५८ | १८ | द्यावें | घ्यावें |
| १६३ | १८ | चोरी | चोर |
| २३४ | ३ | अर्थ | ० |
| २५२ | १० | जे विभक्त होऊन — करावी. | हें स्मृतींतलें वाक्य नव्हे यास्तव तुटक ओळीपासून असावें. |
| २७२ | १७ | अदर बांधव | |
| २७२ | १७ | अदर बांधव | अदूर बांधव |
| ३११ | २२ | हेन्या | हें न्याय्य |
| ३१८ | ८ | त्याचेजवळचे | तिचेजवळचे |
| ३१८ | १२ | त्याचेजवळचे | तिचेजवळचे |
| ३३६ | १९ | बृहस्पति आगम | बृहस्पति ७ आगम |
| ३७७ | १६ | नाहीतगार | माहीतगार |
| ३७८ | १ | तागापासून | नागापासून |
| ३७९ | | नायक | नायीक |
| ३८० | | नायक | नायीक |
| ३८१ | १९ | वडवाल्दत | ० |
| ३९१ | १४ | याटविलेला | पाठविलेला |
| ४०४ | २ | गुजारी | जुगारी |
| ४४३ | | ज्ञारवा २ | ज्ञारवा ४ |
| ४८२ | २ | वधकरणास | वधकरणारास. |
| ४८३ | १० | आपत्य | अपत्य |
| ४९२ | | करावा | करावा |
| ४९२ | १२ | दुसरा | दुसरा |

# मयूरवदायभागाचेंशुद्धिपत्र

| पृ० | पं० | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७ | २२ | द्यत्तिद्वय | द्वैविद्वय |
| ३६ | | वसिष्ट ९ अंक | याअंकासबिनानको |
| ५७ | ९ | संहित | संपादित |
| ८४ | | १ ल्यापंक्तीचीबिना. | ही, आठव्याअंकासपाहिजे. |
| ९६ | २ | आक्रमोढा | अक्रमोढा |

OF THE BOMBAY BRANCH OF THE ASIAT

00044532

Digitized with financial assistance from the
Government of Maharashtra
on 15 March, 2016